UNIVERSAL LIBRARY
OU_196106
UNIVERSAL LIBRARY

# स्वामी विवेकानन्द

यांचे

# समग्र ग्रंथ.

अष्टम खंड.

१९१९.

Printed and published by M. N. Kulkarni
at his Karnatak Printing Press,
No. 434, Thakurdwar,
Bombay.



तावद्गर्जंति शास्त्राणि जम्बुका विपिने यथा ।
न गर्जति महाशक्तिर्यावद्वेदान्तकेसरी ॥ १ ॥

केलें स्नान सहस्र तीर्थसलिलीं भूदान त्यानें दिलें
केले याग तयें सहस्र सकलां देवांसही पूजिलें ।
तेणें उद्धरिलें समस्त पितरां तो वंद्य लोकत्रया।
ज्याचें ब्रह्मविचारिं चित्त पळही संपूर्ण गेलें लया ॥

# वाचकांस !

स्वामी विवेकानंद यांच्या ग्रंथमालेचा हा आठवा खंड वाचकांच्या हातीं देण्यास आम्हांस आनंद होत आहे. ज्या कृपासागराच्या आशीर्वादानें व वाचकवर्गाच्या साहाय्यानें आम्हांस येथवर मजल मारतां आली, त्याच्याच कृपेनें ही माला आतां लवकरच तडीस लागेल अशी आशा वाटूं लागली आहे.

प्रस्तुत माला शक्य तितक्या लवकर पुरी करून दुसरी एक तत्त्वरत्नावलि हातीं घेण्याचा आमचा विचार आहे. या नव्या मालेंत देकार्त, ह्युम, लॉक, कँट, शॉपेनहॉर, नीचे वगैरे पाश्चात्त्य पंडितांच्या विचारसरणीशीं मराठी वाचकवर्गाची ओळख करून द्यावी असा आमचा हेतु आहे. हा उद्योग अत्यंत कष्टाचा, कालावधीचा व फार मोठ्या खर्चाचा आहे हें आम्हीं नव्यानें सांगितलें पाहिजे असें नाहीं. वास्तविक पाहतां अशी चिरस्थायी ग्रंथसंपत्ति निर्माण करविण्याचें काम राजेरजवाडे व धनिक शेटसावकार यांचें आहे; पण ' जासूद चेट भटभांड नटादिकांना ' आश्रय देणें या मंडळीस सांप्रत अधिक श्रेयस्कर वाटत असल्यामुळें त्यांच्याकडून मदतीची अपेक्षा करणेंसुद्धां निवळ मूर्खपणाचें होईल. याकरितां आमच्या गरीब वाचकवर्गाच्या सदिच्छेवर व आश्रयावर भिस्त ठेवूनच आम्ही हा उद्योग आरंभणार आहों.

अखेरीस आम्हांस कांहीं नवीन आश्रयदाते मिळवून देण्याची आग्रहाची विनंति आमच्या वाचकांस करून व त्यांच्या भेटीचा योग पुन्हां लवकरच येवो अशी परमेश्वराची प्रार्थना करून त्यांची रजा घेतों.

—प्रकाशक.

# अनुक्रमणिका.


| विषय. | पृष्ठ. |
|---|---|
| १. ज्ञानयोग-व्याख्यान-माला— | |
| १० जीवात्म्याची मुक्ति . . . . . . . . | १ |
| ११ विश्व— | |
| १ बाह्य सृष्टि . . . . . . . . . . | १९ |
| २ अंतःसृष्टि . . . . . . . . . . | ३० |
| १२ अमरत्व . . . . . . . . . | ४९ |
| १३ आत्मा . . . . . . . . . . | ६४ |
| १४ आत्म्याची बद्धता आणि मुक्ति . . . . | ८५ |
| १५ मनुष्याचें सत्य आणि भासमय स्वरूप . . | ९५ |
| १६ व्यावहारिक वेदान्त ( प्रथम पाद ) . . | १२७ |
| १७ ,, ,, ( द्वितीय ,, ) . . | १५४ |
| १८ ,, ,, ( तृतीय ,, ) . . | १७७ |
| १९ ,; ,, ( चतुर्थ ,, ) . . | १९३ |
| २० विश्वव्यापी धर्म अनुभवास येण्याचा मार्ग. . | २१७ |
| २१ विश्वव्यापी धर्माचें ध्येय . . . . . . | २३९ |
| २. पव्हारी बाबा . . . . . . . . . . | २६८ |



# स्वामी विवेकानंद यांचे समग्र ग्रंथ

## अष्टम खंड.

## ज्ञानयोग-व्याख्यान-माला.

१०

### जीवात्म्याची मुक्ति.

ज्या कठोपनिषत् नांवाच्या ग्रंथाचा अभ्यास आपण केला तो ग्रंथ छांदोग्योपनिषत् ग्रंथानंतर बऱ्याच काळानें लिहिला गेला. छांदोग्योपनिषदापेक्षां कठोपनिषदाची भाषा अधिक अर्वाचीन असून त्यांतील विचारसरणीही अधिक व्यवस्थित मांडणीची आहे. प्राचीन उपनिषत्ग्रंथांतील भाषा श्रुतींच्या संहितांप्रमाणें आर्ष आहे. त्याचप्रमाणें त्यांतील विचारांची मांडणीही इतकी अव्यवस्थित आहे कीं त्यांतील खरे महत्त्वाचे मुद्दे समजून घेण्यासाठीं अनेक अनावश्यक गोष्टींचें चर्वण करावें लागतें. श्रुतींपैकीं ब्राह्मणें ह्मणून जो भाग आहे तो सर्व यज्ञयागादि क्रियाकलापानें भरलेला आहे. याच विचारपद्धतीची छाया प्राचीन उपनिषत् ग्रंथांवर इतकी पडली आहे कीं त्यांतीलही अर्ध्याहून अधिक भागांत हव्यकव्यांचेंच वर्णन आहे. असें आहे तथापि प्राचीन उपनिषद्ग्रंथांचा अभ्यास करण्यांतही एक मोठा फायदा आहे. त्यामुळें धार्मिक कल्पनांची वाढ कसकशी होत गेली, याचा विचार ऐतिहासिक दृष्टया आपणास करतां येतो. संहिता आणि ब्राह्मणें यांच्यानंतरच्या कालांत जे उपनिषद्ग्रंथ लिहिले गेले त्यांत पूर्वींच्या साऱ्या कल्पना एकवटल्या असून त्यांची मांडणीही अधिक व्यवस्थित आहे. भगवद्गीता हें या

उपनिषन्मालेचें अखेरचें पुष्प होय असें ह्मणावयास हरकत नाहीं. भगवद्गीतेंत यज्ञयागाचा कोठें मागमूसही नाहीं. अनेक झाडांवरून आणि वेलांवरून सुवासिक आणि दृष्टिमनोहर पुष्पें एकत्र गुंफून सुंदर गुच्छ निर्माण करावा त्याप्रमाणें सर्व उपनिषदांतील सर्व रहस्यें भगवद्गीतेंत एकत्र केलीं आहेत. तथापि या साऱ्या सिद्धांतांची वाढ आरंभापासून कशी झाली आणि ते परिणतावस्थेस कसे पोंचले हें गीतेवरून आपल्या लक्ष्यांत येण्यासारखें नाहीं. त्यांचा मूळ उगम अथवा त्यांचें जन्मस्थान गीतेंत सांपडावयाचें नाहीं. या जन्मस्थानाचा शोध आपणास कर्तव्य असेल तर त्याकरितां वेदग्रंथांचाच अभ्यास केला पाहिजे. श्रुतिग्रंथ अत्यंत पवित्र असा समज फार प्राचीनकाळापासून रूढ असल्यामुळें या ग्रंथांचें रक्षण इतक्या दीर्घ कालपर्यंत उत्तम झालें आहे. श्रुतींइतका प्राचीन ग्रंथ जगांत दुसरा कोणताही नाहीं आणि त्याच्या पावित्र्याच्या कल्पनेमुळें त्यांत मोडतोड झाली नाहीं, अथवा त्यांत क्षेपक भागही घुसला नाहीं. त्यांतील विचार अत्यंत उच्च असले अथवा अत्यंत कमी प्रतीचे असले तरी ते जशाचे तसेच राखले गेले आहेत. त्याचप्रमाणें आवश्यक आणि अनावश्यक अशा दोन्ही गोष्टींचें मिश्रण त्यांत कायम राहिलें आहे. अत्यंत उदात्त आणि उच्च अशा विचारांशेजारींच अनावश्यक आणि किरकोळ अशा गोष्टीही त्यांत सांपडतात. वेदग्रंथांत फेरबदल अथवा घुसडाघुसड करण्यास कोणास छातीच झाली नाहीं. श्रुतिग्रंथांवर अनेक भाष्यें झालीं, त्यांतील विचारांची संगति लावण्याचा यत्न या भाष्यकारांनीं केला आणि अत्यंत सामान्य प्रतीच्या कल्पनांतूनही उदात्त अर्थ काढण्याचा यत्नही त्यांनीं केला; पण मूळ संहितेस त्यांपैकीं कोणीही हात लाविला नाहीं. त्यांत कांहीं पदरचें न घालतां अथवा त्यांतील अक्षरही कमी न करतां ती त्यांनीं जशीच्या तशीच राहूं दिली. यामुळें श्रुतिग्रंथांना ऐतिहासिक दृष्ट्या अत्यंत महत्त्व प्राप्त झालें आहे. काल व्यतीत होत जातो त्याप्रमाणें मनुष्याचे धर्मविचारही वाढत जातात. मनुष्याच्या या वाढीला अनुकूल असे फेरफार जगांतील सर्व धर्मग्रंथांत झाले असल्याचें आपणास ठाऊक आहेच. श्रुतिग्रंथांत मात्र अशा प्रकारचा फेरबदल बहुधा मुळींच झालेला नाहीं; आणि कधीं काळीं तसा बदल झालेला असलाच तर तो इतका थोडा आहे कीं त्याचें अस्तित्व लक्ष्यांत घेण्याचें कारण नाहीं. यामुळें धार्मिक विचारांचा जन्म

कसा झाला आणि त्यांची जोपासना होऊन वाढ कशी झाली, आरंभीं जड सृष्टीबद्दल विचार कसे होते आणि तेच पुढें अधिकाधिक सूक्ष्म होत जाऊन त्यांतून अंतःसृष्टीचे विचार कसे उद्भवले हें समजण्याची सोय श्रुतिग्रंथांनीं आपणास करून दिली आहे. आरंभींच्या अस्पष्ट भावनांपासून तों वेदांताच्या उच्चतम सिद्धांतापर्यंत सारी विचारमाला एकसमयावच्छेदें अवलोकनांत आणण्याची सोय येथें आहे. प्राचीनकालच्या चालीरीतींचा उल्लेखही श्रुति-ग्रंथांत कोठें कोठें आहे. पण उपनिषद्ग्रंथांत असा भाग फारसा आढळून येत नाहीं.

उपनिषद्ग्रंथांची भाषा सूत्ररूप आहे. केवळ स्मरणासाठीं ज्याप्रमाणें आपण टांचणें करतों त्याचप्रमाणें या मंत्रद्रष्ट्यांनीं जणूं काय हीं टांचणेंच करून ठेविलीं आहेत. त्यांत लांबलचक ऊहापोह नाहीं. त्यांतील प्रमेयें जणूं काय पूर्वपरिचयाचींच असल्याप्रमाणें नुसतीं टांचून ठेविलीं आहेत. आपण लिहीत आहों त्याची विल्हेवार माहिती जणूं काय आपल्या वाचकांस अगर श्रोत्यांस पूर्वींपासूनच आहे असें त्यांनीं गृहीत धरलें होतें. कित्येक जागीं कांहीं कथानकेंही आलीं आहेत. तथापि तेथेंही वर्णनाचा प्रकार असाच आहे. कथेंतील पात्रें आणि कथाभाग हीं पूर्वपरिचयाचींच आहेत असें गृहीत धरण्यांत आलें आहे. यामुळें एक मोठीच अडचण उत्पन्न झाली आहे. कालांतरानें तो कथाभाग नष्ट अथवा अत्यंत विकृत झाला असल्यामुळें त्या कथेंतील खरें रहस्य आपल्या लक्ष्यांत येण्यास आज कोणतेंही साधन उपलब्ध नाहीं. या कथांवर नवे अर्थ बसविण्यांत आले आणि त्यांचा प्रवेश जेव्हां पुराणांत झाला तेव्हां त्या कथांना काव्याहून अधिक किंमत राहिली नाहीं. पाश्चात्य देशांकडे पाहतां त्यांत राजकीय दृष्ट्या एक विशेष आढळून येतो. पाश्चात्य मानवकुलांना एकतंत्री राज्यपद्धति सहन होत नाहीं. राजाच्या हातून सत्ता निघून ती लोकांकडे यावी या दृष्टीनें त्यांची धडपड एकसारखी सुरू असते. कोणाही एकाच व्यक्तीच्या हातांत सर्व राजसत्ता जाऊं नये अशासाठीं विलक्षण दक्षता पाश्चात्य लोक बाळगीत असतात. व्यक्तिस्वातंत्र्याच्या अधिकाधिक उच्च कल्पना त्यांच्यांत जन्म पावत आहेत. अशीच स्थिति हिंदुस्थानांतील अतींद्रिय शास्त्राची आहे. राजकीय जीवनासाठीं पाश्चात्य लोकांत जशी धडपड होती तशीच धडपड आध्यात्मिक जीवनासाठीं हिंदुस्थानांत

सुरू होती. श्रुतिकालीं अनेक देवदेवता होत्या. कालांतरानें या सर्वांस रजा मिळून त्यांच्या जागीं एका विश्वनियामकाची स्थापना झाली; आणि उपनिषदकालीं तर या एका परमेश्वराविरुद्धसुद्धां बंड झालेलें आहे. विश्वाला अनेक शास्ते असावे ही कल्पना त्यांस सहन झाली नाहीं, इतकेंच नव्हे तर त्याला सर्वसत्ताक असा एकच शास्ता असावा हेंही त्यांस असह्य झालें. हा सारा इतिहास आपण विशेष लक्ष्यांत ठेवण्यासारखा आहे. संहिता ग्रंथांत ही कल्पना बीजरूपानें पेरली जाऊन तिचा वृक्ष कालांतरानें वाढत वाढत उपनिषद्ग्रंथांत त्याचें अखेरचें फळ आपणास पहावयास सांपडतें. बहुधा साऱ्या उपनिषद्ग्रंथांचा शेवट याच परिणतावस्थेंत झालेला सांपडतो. अखेरीस त्या सर्वांनीं या विश्वनियामकास रजा दिली असल्याचें आढळून येतें. व्यक्तिविशिष्ट परमेश्वर नाहींसा होऊन त्या जागीं केवलरूप परमेश्वर सिंहासनस्थ झाल्याचें आपणास आढळून येतें. परमेश्वर ह्मणजे विशिष्ट व्यक्तिनव्हे, तो मनुष्यप्राणी नव्हे, त्याचीं हीं रूपें नाहींशीं होऊन तो केवळ तत्त्वरूप असल्याचें दिसून येतें आणि या तत्त्वरूपानें तो साऱ्या विश्वांत भरून आहे असें दिसतें. त्याचप्रमाणें मनुष्याचेंही विशिष्टत्व नाहींसें होऊन त्याच्या जागीं तत्त्वरूप मनुष्य दिसूं लागतो. बाह्यतः दिसणारा मनुष्यप्राणी हा केवळ एक देखावा असून खरें तत्त्व अथवा त्याचें अस्तित्व त्याच्या मागें आहे हा सिद्धांत येथें उदय पावल्याचें दिसून येतें. अशा रीतीनें दोहों बाजूंनीं बद्ध स्वरूपाचें असे व्यक्तिविशिष्टत्व नाहींसें होऊन त्या जागीं फक्त केवलरूप तत्त्वें मात्र राहतात असें आपणास आढळून येतें. व्यक्तिविशिष्ट परमेश्वर नाहींसा होऊन तो हळूहळू अव्यक्त अशा केवलरूपाकडे जात आहे व त्याचप्रमाणें व्यक्त मनुष्य नाहींसा होऊन हळूहळू तो अव्यक्तांत रूपांतर पावत आहे असा देखावा उपनिषद्ग्रंथांत आपणास आढळून येतो. यानंतर या परस्परभिन्न दिशा एकमेकींस भेटावयास येत असल्याचें दिसून येतें, त्या ज्या निरनिराळ्या पायऱ्यांनीं पुढील मार्ग आक्रमण करितात त्या पायऱ्यांचें साद्यंत वर्णन उपनिषदांनीं केलें असून अखेरीस त्यांची भेट व ऐक्य यांचेंही दिग्दर्शन केलें आहे. हें अखेरचें ऐक्य ‘ **तत्त्वमसि** ’ या महावाक्यानें निर्दिष्ट झालें आहे. जें कांहीं आहे तें एकच सच्चिदानंदरूप असून तेंच अनेकधा रूपांनीं नटलें आहे.

यानंतर दुसरे तत्त्ववेत्ते निर्माण झाले. उपनिषद्ग्रंथांचें कार्य जेथें संपलें तेथपासून या तत्त्ववेत्त्यांनीं आपल्या कार्यास सुरवात केली. उपनिषद्

ग्रंथांनीं सूत्रें सांगितलीं होतीं आणि सिद्धांतही सांगितले होते; पण त्यांचा तपशील त्यांत नव्हता. तो तयार करण्याचें काम तत्त्ववेत्त्यांनीं केलें. एकच तत्त्व अनेक रूपांनीं नटलें हा सिद्धांत खरा मानला तर तो इतक्या अनेक रूपांनीं कसा नटला असा प्रश्न साहजिक उद्भवतो. पापपुण्याच्या अनेक कल्पनांचा उदय मनुष्याच्या हृदयांत होतो आणि या दोहोंचाही जन्म कसा झाला अशा प्रकारचा प्रश्नही मानवी हृदयांत साहजिक उद्भवतो. या जगांत पाप कां असतें आणि त्याचें कारण काय? प्रश्न विचारण्याची ही तऱ्हा अशास्त्रीय आहे; पण तीच उपनिषद्कालानंतर सशास्त्र झाली. आह्मी दुःखी कां हा प्रश्न गांवढळ वाटतो; पण याच अर्थाचा प्रश्न केवळ तत्त्वदृष्ट्याही करतां येतो. एकच रूप अनेकधा कसें झालें असा हा शास्त्रीय प्रश्न आहे. या प्रश्नाला हिंदू तत्त्वज्ञांनीं चोख उत्तर आपल्या मायावादानें दिलें आहे. एकरूप वस्तुतः अनेकधा झालें नसतांही तें अनेकधा झाल्यासारखें वाटणें हा भ्रम होय. त्या एकरूपांत कोणताही बदल वास्तविक कधींच होत नसून मायेनें तेथें बदल झाल्यासारखा वाटतो. अनेक रूपें दिसणें हा केवळ भ्रम होय. मनुष्य व्यक्तिरूप दिसतो पण हाही केवळ देखावा असून वस्तुतः तो तेंच आहे. त्याचप्रमाणें परमेश्वर ही म्हणजे वस्तुतः विशिष्ट व्यक्ति नसून तोही तेंच एक रूप आहे.

हें अखेरचें उत्तर येईपर्यंत मध्यंतरीं बऱ्याच पायऱ्या आपणास ओलांडाव्या लागतात आणि तेथें निरनिराळ्या तत्त्ववेत्त्यांची विचारभिन्नताही दिसून येते. हिंदुस्थानांतील सर्वच तत्त्ववेत्त्यांनीं मायावाद कबूल केला आहे असें नाहीं; किंबहुना पुष्कळांनीं त्याचा त्याग केला आहे. द्वैतवादी हा प्रश्न उद्भवूंच देत नाहींत. त्याच्या जन्माबरोबरच ते त्याची मान मुरगळून टाकतात. "असले प्रश्न विचारण्याचा अधिकारच तुह्मांस नसून ही केवळ परमेश्वराची इच्छा असल्यामुळें आपण निमूटपणें तिला मान द्यावा असें ते ह्मणतात." त्यांच्या दृष्टीनें जीवात्म्याला पूर्ण मुक्ति केव्हांच मिळत नाहीं. त्यांच्या मताप्रमाणें मनुष्याचे सर्व व्यवहार त्याच्या नशिबानें ठरविल्याप्रमाणें चालतात आणि त्याच्या सुखदुःखाचे भोगही त्याच्या नशीबानें ठरविलेले असतात. याकरितां कोणतेंही दुःख प्राप्त झालें तरी त्याविरुद्ध धडपड न करितां निमूटपणें तें सहन करावें असें त्यांचें मत आहे; कारण आपण तें

निमूटपणें सहन न करतां धडपड केली तर आपणास अधिक शिक्षा मात्र होईल असें द्वैतवादी ह्मणतात. "हें खरें कशावरून" असा प्रश्न त्यांना कोणीं केला तर त्यांजपाशीं श्रुतिप्रमाणें आहेत आणि त्यांजवर त्यांच्या विशिष्ट पद्धतीच्या टीकाही आहेत. या टीका पृच्छकाच्या तोंडावर टाकून ते त्याला गप बसवितात.

आतां तत्त्ववेत्त्यांचा याहूनही आणखी एक वेगळा वर्ग आहे. यांनाही मायावाद कबूल नाहीं; पण त्यांना द्वैतही मान्य होत नाहीं. द्वैत आणि अद्वैत यांच्या मध्य भागीं ते आहेत. हें सर्व विश्व ह्मणजे परमेश्वराचा देह आहे आणि परमेश्वर हा आत्मा आहे असें त्यांचें मत आहे. पापामुळें जीवात्म्याची उत्पत्ति झाली असें ते ह्मणतात. मनुष्यानें दुष्कृत्य केलें ह्मणजे जीवात्मा आकुंचन पावतो आणि त्याचें सामर्थ्यही कमी होतें असें या तत्त्ववेत्त्यांचें ह्मणणें आहे. हें नष्ट झालेलें सामर्थ्य सत्कृत्यानें पुन्हां प्राप्त करून घेतां येतें. केवळ हिंदुस्थानांतील अनेक मतांसच नव्हे तर जगांतील सर्व धर्मास साधारणपणें मान्य असलेली अशी ही एक कल्पना—कित्येकांनीं या कल्पनेचा उल्लेख स्पष्ट शब्दांनीं केला आहे आणि दुसऱ्या कित्येकांनीं ती मुग्ध ठेविली आहे. तथापि सर्वांस ती सारखीच मान्य आहे हें मात्र खरें. मनुष्य हा ईश्वरांश आहे ही ती कल्पना होय. ही कल्पना ज्यांत ग्रथित झाली नाहीं असा एकही पंथ अथवा वर्ग कोठेंही अस्तित्वांत नाहीं. जीवात्मा हा वस्तुतः पूर्ण आणि पवित्र आहे ही कल्पना सर्वांस मान्य आहे. मनुष्याची खरी प्रकृती ह्मणजे त्याचें आनंदमय रूप आणि सर्वशक्तिमत्त्व हीच असून दुःख आणि दौर्बल्य ही त्याची खरी प्रकृति नव्हे. तथापि कोणत्यातरी रीतीनें दुःखाचा प्रादुर्भाव त्यांत झाला आहे. ज्या पंथांची रचना सशास्त्र पद्धतीनें झालेली नाहीं, त्यांनीं सैतान, अहिर्मन् इत्यादि रूपे कल्पून त्यांजपासून दुःखें आलीं असें सांगितलें आहे. दुसऱ्या कित्येकांनीं सुखदुःखांची प्राप्ति एकाच परमेश्वरापासून होत असते असेंही ह्मटलें आहे; पण एकाला सुख कां आणि दुसऱ्याला दुःख कां या प्रश्नाचें उत्तर मात्र त्यांनीं दिलेलें नाहीं. याहून अधिक विचारवंत तत्त्ववेत्त्यांनीं मायावाद पुढें आणला आहे. या साऱ्यांत आपणास एकच मुद्दा पहावयाचा आहे. बुद्धीच्या या साऱ्या पकडी वजा केल्यानंतरसुद्धां जो एकच महत्त्वाचा मुद्दा शिल्लक उरतो तोच आपणास पहा-

वयाचा आहे. मनुष्य हा परमेश्वरस्वरूप आहे आणि आपली खरी प्रकृती तीच आहे हा तो मुद्दा होय.

ईश्वरस्वरूप हीच मनुष्याची खरी प्रकृति असून त्याखेरीज बाकी जें कांहीं दिसतें तें त्यावरील आवरण मात्र आहे असें वेदांताचें मत आहे. हें दृश्य आवरण जीवात्म्याभोंवतीं असलें तरी त्यामुळें त्याची मूळ प्रकृति ह्मणजे त्याचें ईश्वरत्व नष्ट होत नाहीं. मनुष्यप्राणी अत्यंत पापी असला अथवा अत्यंत पुण्यवान् असला तरी त्याचें ईश्वरत्व कोणत्याही परिस्थितींत मृत्यु पावत नाहीं, त्याचा वास सत्पुरुषांत ज्याप्रमाणें आहे त्याचप्रमाणें दुर्जनांतही तो आहे. त्यावर पडलेलें आवरण नाहींसें करून त्याचा प्रकाश स्पष्ट होण्यास अवसर देणें इतकेंच आपलें कार्य उरतें. त्याजवरील आवरण नाहींसें झालें ह्मणजे तो स्वयंप्रकाश आहे असा अनुभव आपणास येईल. गारगोटीच्या अथवा लांकडाच्या पोटीं अग्नि अव्यक्त स्थितींत आहे आणि घर्षणानें तो व्यक्त दशेस आणतां येतो ही गोष्ट प्राचीन लोकांसही ठाऊक होती. त्याचप्रमाणें पूर्णस्वातंत्र्य आणि पूर्णपावित्र्य हीं प्रत्येक जीवात्म्याच्या ठिकाणीं आहेत, हीं त्याच्या ठिकाणीं गुणरूपानें राहात आहेत असें नव्हे. कारण गुण हे बाहेरून येणारे असतात. परिश्रमानें ते ज्याप्रमाणें आणतां येतात त्याप्रमाणें कांहीं कारण झालें तर त्यांचा लोप होण्याचा संभव असतो. याकरितां स्वातंत्र्य हा जीवात्म्याचा गुण आहे असें ह्मणतां येत नाहीं. स्वातंत्र्य अथवा मुक्ति आणि जीवात्मा हीं एकरूप आहेत. सद्रूप आणि जीवात्मा हीं एकरूप आहेत. त्याचप्रमाणें चिद्रूप आणि जीवात्मा हींही एकरूपच आहेत. सच्चिदानंदरूप हा जीवात्म्याचा प्रकृतिभाव असून तो त्याचा जन्मसिद्ध हक्क आहे. या रूपाव्यतिरिक्त जितकीं रूपें आपण पाहतों तितकीं सारीं त्याचींच रूपें असून त्यांच्या द्वारा तो कोठें कमी तर कोठें अधिक प्रमाणानें व्यक्त झाला आहे. कोठें त्याचें स्वरूप मंद तर कोठें उज्ज्वल; फार काय पण मृत्यु हीसुद्धां सद्रूपाचीच एक व्यक्तदशा आहे. जन्म आणि मृत्यु, उत्क्रांति आणि अपक्रांति इत्यादि सारीं रूपें त्या एकरूपाचींच स्पष्ट रूपें होत. अशाच रीतीनें ज्ञानही कधीं ज्ञानरूपानें आणि कधीं अज्ञानरूपानें व्यक्त होत असतें. ज्ञान आणि अज्ञान या दोन्हीही चिद्रूपाच्याच व्यक्तदशा आहेत. चिद्रूप ह्मणजे शुद्ध अथवा केवलरूपाचें ज्ञान. ज्ञान आणि अज्ञान यांत जो कांहीं फरक दिसतो

तो त्यांच्या प्रकृतीचा नसून कमी अधिक प्रमाणाचा मात्र आहे. दोघांची मूळ प्रकृति चिद्रूप हीच असून जेथें व्यक्तदशा अधिक स्पष्ट असते तेथें तिला ज्ञान हें नांव प्राप्त होतें आणि तिच्याच अव्यक्त दशेला आपण अज्ञान ह्मणतों. अत्यंत कनिष्ठ प्रतीचा आनंद ह्मटला तरी तोही सच्चिदानंदरूपाचाच अवतार होय असें वेदांत स्पष्ट ह्मणतो.

वेदांतांतील हा सिद्धांत प्रमुख आहे आणि जगांतील सर्व धर्मांनीं तो ग्राह्य ठरविला असल्याचें मीं नुकतेंच सांगितलें आहे. हा सिद्धांत ज्याला मान्य नाहीं असा धर्म मला तरी अद्यापि ठाऊक नाहीं. हा सिद्धांत विश्वव्यापी असून सर्व धर्मांच्या द्वारें आपलें कार्य तो करीत आहे. उदाहरणार्थ आपण बायबलच घेऊं. पहिला मनुष्य प्राणी अडाम् हा पवित्र होता आणि त्याच्या दुष्कृतीनें त्याचें पावित्र्य पुढें नष्ट झालें अशी कथा बायबलांत आहे. या कथेंतील रहस्य हेंच कीं, मनुष्याची प्रकृति आरंभीं पूर्णावस्थेंत होती आणि आतां जो कांहीं कमीपणा अथवा जें दौर्बल्य मनुष्याच्या ठिकाणीं आपणास दिसतें तें त्याजवरचें केवळ आवरण मात्र आहे. ख्रिस्ती धर्माच्या पुढील इतिहासाकडे अवलोकन केलें असतां नष्ट झालेलें मनुष्याचें पावित्र्य त्यास पुन्हां मिळवितां येतें या मताचाही प्रादुर्भाव त्यांत आढळून येतो. जुना आणि नवा करार या दोहोंचेंही मंथन करून सार काढलें तर तें एवढयांत येईल. महंमदी धर्माचीही गोष्ट अशीच आहे. आदम हा आरंभीं पूर्णरूप असतां पुढें भ्रष्ट झाला आणि महंमदाच्या द्वारें हें नष्ट झालेलें पूर्णत्व त्याला पुन्हां प्राप्त करून घेतां येईल असें त्याचें मत आहे. हीच कथा बौद्ध धर्माचीही आहे. त्याचें अखेरचें साध्य निर्वाण हें आहे. निर्वाण ही या दृश्य जगापलीकडची स्थिति आहे. वेदांत ज्याला ब्रह्म असें ह्मणतो तें ब्रह्म आणि बौद्धांचें निर्वाण हीं एकच आहेत. नष्ट झालेली ही निर्वाण स्थिति मनुष्यास पुन्हां प्राप्त करून घ्यावयाची आहे या मूळ सिद्धांतावरच साऱ्या बौद्ध मताची उभारणी झाली आहे. आपणापाशीं जी कधींच नव्हती अशी अगदीं नवी वस्तु आपणास प्राप्त करून घेतां येणें शक्य नाहीं हें मत सर्व धर्मांत ग्रथित झालें असल्याचें आपणास आढळून येतें. केवळ बाहेरून कोणतीही वस्तु आपणास प्राप्त करून घेतां येत नाहीं. आमचें पूर्णत्व पुन्हां प्राप्त करून घेण्यासाठीं कोणाच्याही तोंडाकडे बघण्याचें कारण आह्मांस नाहीं. या

बाबींत कोणीही आह्मांवर उपकाराचें ओझें लादण्यास नको. आमचा जन्मसिद्ध हक्क या नात्यानेंच आह्मी त्याची मागणी करतों. या स्वानंद-साम्राज्याच्या तक्तावर आमचा हक्कच आहे. आज आह्मी तो गमावून बसलों असलों तरी त्याची मागणी उपकार ह्मणून नव्हे तर हक्कानें आह्मी करतों. येथें मायावादी आणखीही एक शक्कल लढवितात. आपलें साम्राज्य गेलें आहे हा तुमचा भ्रम असून तें वास्तविक गेलेलें नाहीं असें मायावादी तुह्मांस सांगतात. मायावाद आणि इतर मतें यांत फरक आहे तो इतकाच.

जगांतील सर्व धर्मांस आणि सर्व मतांस हा मूळ सिद्धांत मान्य आहे. तथापि नष्ट झालेलें पूर्णत्व पुन्हां प्राप्त करून घेण्याचे मार्ग प्रत्येकानें वेगवेगळेच सांगितले आहेत. कोणी ह्मणतात कांहीं विशिष्ट मंत्रतंत्र करा, कोणी ह्मणतात देवाच्या मूर्तींना देणग्या द्या, कोणी ह्मणतात उपासतापास करा; अशा रीतीनें नानाप्रकारचे मार्ग निरनिराळ्या धर्मांनीं सांगितले आहेत. आकाशांतील बापापुढें गुडघे टेंकून आणि रडून त्याची क्षमा मागावी असाही मार्ग एखादा धर्म सांगतो. उपनिषद्ग्रंथांत हे सारे मार्ग सांपडतात; तथापि सर्व मार्गांचा केवळ मेरुमणी असा जो मार्ग त्यांत सांगितला आहे तो हा कीं तुह्मांस रडण्याचें अथवा करुणा भाकण्याचें मुळींच कारण नाहीं. त्याचप्रमाणें उपासतापास करण्याचें अथवा हव्यकव्यादि नाना क्रिया करण्याचें कारणही तुह्मांस नाहीं. गेलेलें साम्राज्य परत मिळविण्यासाठीं असल्या प्रकारची कोणतीही खटपट नको; कारण वस्तुतः तें साम्राज्य गेलेलेंच नाहीं. जें वास्तविक हरवलेलेंच नाहीं तें शोधण्याची खटपट तरी हवी कशाला? तुम्ही वस्तुतः आधींच पूर्ण आणि मुक्त आहां. ही खूण तुह्मांस ज्या क्षणीं पटेल त्याच क्षणी तुह्मांस तसा अनुभवही येईल. पण 'मी बद्ध आहें' हा भ्रम जोंवर तुम्ही उराशीं बाळगाल तोंवर तुम्ही खरोखरच बद्ध राहाल. वेदांताचें हें मत खरोखरच मोठ्या धाष्टर्याचें वाटतें. हें ऐकून तुह्मांस कदाचित् मोठी भीतीही वाटेल; पण याचा जों जों अधिक विचार तुम्ही कराल आणि तुमचा अनुभव जों जों वाढत जाईल तों तों ह्या मताच्या खरेपणाचा अधिक प्रत्यय तुह्मांस येईल; कारण पूर्णत्व हें तुमच्या मूळ प्रकृतींतच नसेल तर तें तुह्मांस बाहेरून कोठूनही प्राप्त करून घेणें शक्यच नाहीं. त्याचप्रमाणें आरंभीं तुम्ही पूर्ण असून तें पूर्णत्व आतां खरोखरच नष्ट झालें आहे हें मत खरें मानलें

तर यावर आम्ही असा प्रश्न करतों कीं अशा स्थितींत नष्ट झालेलें पूर्णत्व प्राप्त करून घेण्याची खटपट करण्यास तरी तुम्ही मोकळे आहां काय? बद्ध-स्थितींत मुक्त होण्याची खटपट तरी तुम्ही कशी करणार? जर तुम्ही खरो-खरच आरंभीं मुक्त होतां तर तें स्वातंत्र्य कशामुळें नष्ट झालें? जो पूर्ण मुक्त आहे तो कशानेंही बद्ध होऊं शकत नाहीं; खरा बद्ध मुक्तही होऊं शकत नाहीं आणि त्याचप्रमाणें खरा मुक्त बद्धही होऊं शकत नाहीं.

मनुष्य खरोखर बद्ध आहे ही एक बाजू आणि आपण बद्ध आहों असा त्यास भ्रम झाला आहे ही दुसरी बाजू. या दोहोंपकीं तुह्मी कोणती घ्याल? जीवात्मा स्वभावतःच पवित्र आणि मुक्त आहे असें तुह्मी ह्मणाल तर विश्वां-तील कोणत्याही वस्तूनें तो नियंत्रित होणार नाहीं हा सिद्धांत तुह्मांस कबूल केलाच पाहिजे. त्याचप्रमाणें स्वभावतःच त्याच्या ठिकाणीं बद्धता आहे असें ह्मटलें तर तो मुक्त केव्हांच नव्हता हेंही अर्थातच कबूल करावें लागेल. या-करितां आत्म्याला मुक्ति मिळणें शक्य आहे हें खरें असेल तर स्वभावतःच तो मुक्त असला पाहिजे असें ह्मणणें ओघानेंच प्राप्त होतें. याशिवाय दुसरें गत्यंतरच आपणास उरत नाहीं. स्वातंत्र्य ह्मणजे पूर्णत्व अथवा अपरावलं-बित्व. ज्याला पूर्ण करण्यासाठीं बाहेरचें कांहीं आणावें लागत नाहीं अथवा बाह्य वस्तूची जेथें कसलीच अपेक्षा नाहीं तें पूर्णत्व. याचा अर्थ हाच कीं आत्म्याचें पूर्णत्व हें कोणत्याही कारणाचें कार्य होऊं शकत नाहीं. जीवात्मा हा कार्यरूप नाहीं; त्याला कारण नाहीं. याच मूळ सिद्धांतावरून वेदांताचे बाकीचे महत्त्वाचे सिद्धांत निर्माण झाले आहेत. जीवात्मा मुक्त आहे हा सिद्धांत कबूल केल्याशिवाय तो अमर आहे हेंही म्हणतां यावयाचें नाहीं. जीवात्म्याचें अस्तित्व शुद्ध निरपेक्ष असेल तरच तो पूर्ण, स्वतंत्र आणि अमर होऊं शकेल. मृत्यु हें कोणत्या तरी बाह्य कारणाचें कार्य आहे. मी विषप्रा-शन केलें तर मला मृत्यु येतो. यावरून विष नांवाच्या बाह्य वस्तूचा परि-णाम माझ्या देहावर होतो हें उघड दिसून येतें; पण जीवात्मा स्वतंत्र आहे, मुक्त आहे हें खरें असेल तर त्यावर कोणत्याही बाह्य वस्तूचा परिणाम घड-णार नाहीं आणि तो मृत्युवशही होणार नाहीं. हा सिद्धांत ओघानेंच प्राप्त होतो. मुक्ति, अमरत्व, आनंदरूपत्व हीं सारीं कारणकार्यांच्या पलीकडचीं आहेत. हीं सारीं मायातीत आहेत. जीवात्मा मायातीत आणि कारणकार्यांच्या

पलीकडचा असेल तरच तो मुक्त, आनंदरूप आणि अमर होऊं शकेल. आतां तुह्मांपुढें असलेल्या या दोन बाजूंपैकीं तुह्मी कोणती घ्याल ? असा प्रश्न मला कोणीं विचारला तर दुसरीच बाजू मी पसंत करीन. कारण, माझ्या स्वतःच्या मनोभावना आणि आकांक्षा यांशीं ही दुसरी बाजू अधिक मिळती आहे. मी स्वभावतः परिपूर्ण आणि मुक्त आहें असें मला खास वाटतें. माझ्याभोंवतीं दिसणारे हे पाश खरे असून माझें स्वातंत्र्य खोटें आहे हें ह्मणणें मी कधींही कबूल करणार नाहीं.

अशा प्रकारचे वाद जगांतील सर्व तत्त्वज्ञांत आजपर्यंत सुरू आहेत. अगदीं अर्वाचीन काळचीं तत्त्वदर्शनें घेतलीं तरी त्यांतही हे वाद उपस्थित झाल्याचें आपणास आढळून येतें. सर्व बाबींत दोन तट पडलेले आहेत. एक पक्ष ह्मणतो कीं जीवात्मा अशी वस्तूच नाहीं. जीवात्म्याची कल्पना भ्रममूलक आहे. मानवी देह आणि मेंदू यांत जी घडामोड निरंतर चालू आहे तिजमुळें जीवात्मा अशी एखादी वस्तु असल्याचा भ्रम उत्पन्न होतो. शरिरांतील घटक नाहींसे होणें आणि त्या जागीं नवे येणें ही घडामोड प्रत्येक क्षणीं चालू आहे. या घडामोडीमुळें जें गतीचें आंदोलन आपल्या अनुभवास येतें त्यालाच आपण स्वातंत्र्य अथवा मुक्ति असें भ्रमानें समजतों. बौद्ध धर्मांतही अशा मताचे पंथ अस्तित्वांत होते आणि नानाप्रकारच्या उदाहरणांनीं आणि दृष्टांतांनीं ते आपल्या मताची सिद्धि करीत. एखादें जळतें लांकूड हातांत घेऊन झपाट्यानें तें चक्राकार फिरविलें तर अग्नीचें मोठें वर्तुल निर्माण होतेंसें दिसतें. वस्तुतः या अग्निचक्राला अस्तित्व नसतें; पण त्या कोलिताच्या गतीमुळें त्याच्या अस्तित्वाचा भ्रम उत्पन्न होतो. अनेक सूक्ष्म अणू आणि परमाणू मिळून आपण बनलों आहों. आपण म्हणजे अनेक परमाणूंचें संघटित रूप. हे परमाणू एकसारखे जागा बदलीत असल्यामुळें अमर जीवात्म्याचा भ्रम उत्पन्न होतो. यावर दुसरा एक पक्ष असें ह्मणतो कीं विचारांच्या परिभ्रमणामुळें जड वस्तूचा भास उत्पन्न होतो. वस्तुतः जडालाच अस्तित्व नसून जड वस्तु हा भ्रम आहे. अशा रीतीनें एकमेकांशीं हे दोन पक्ष भांडत असतात. जीवात्मा भ्रममूलक आहे असें एक पक्ष ह्मणतो तर जड वस्तु भ्रममूलक आहे असें दुसरा पक्ष ह्मणतो. आपापल्या सिद्धांतांच्या पुष्टीकरणार्थ जो पुरावा हे पक्ष पुढें मांडतात तो एकाच स्वरूपाचा आहे. हें सर्व

चैतन्यरूप आहे; या बाजूचा पुरावा दुसऱ्या बाजूपेक्षां थोडासा अधिक बळकट दिसतो. कारण जड वस्तूचें वास्तविक रूप काय आहे हें अद्यापि कोणींही पाहिलेलें नाहीं. आपल्या पंचेंद्रियांच्या द्वारें बाह्य वस्तूचा जो कांहीं अनुभव आपणास येतो त्यावरूनच त्या वस्तूचें स्वरूप आपण ठरवीत असतों. आपला सारा सिद्धांत इंद्रियांच्या द्वारें येणाऱ्या आंतील अनुभवावर अवलंबून आहे. इंद्रियांच्या बाहेर पडून त्या बाह्य वस्तूचें स्वरूप काय आहे हें आपणापैकीं कोणींही पाहिलेलें नाहीं. याकरितां हें सारें चैतन्यरूप असून जड वस्तु हा भ्रम आहे या मतास अधिक बळकटी येते. दुसरें असें कीं, हा सिद्धांत गृहीत धरला ह्मणजे या विश्वाच्या कोड्याचाही उलगडा होतो. जडवाद खरा मानला तर तसा उलगडा होऊं शकत नाहीं. त्याचा उलगडा आपल्या विवेचक बुद्धीला न्याय्य दिसत नाहीं. जगांतील सर्व तत्त्वदर्शनांचा निव्वळ अर्क काढला तर तीं सारीं या दोहोंपैकीं कोणत्या तरी एका कोटींत पडतात. आत्मा स्वभावतः शुद्ध आणि मुक्त आहे कीं नाही हा प्रश्नही या दोहोंपैकींच आहे. यापैकीं एक बाजू असें म्हणते की आत्म्याचें पूर्णत्व भ्रमरूप आहे आणि दुसरी बाजू याच्या उलट सांगते की त्याची बद्धता ही भ्रममूलक आहे. अर्थातच यापैकीं दुसरी बाजूच आह्मांस मान्य आहे. आत्म्याची बद्धता हाच भ्रम असून वस्तुतः तो पूर्ण आणि मुक्त आहे असाच आमचा सिद्धांत आहे.

आपण बद्ध नसून मुक्त आहों असा वेदांताचा सिद्धांत आहे. इतकेंच नव्हे पण आपण बद्ध आहों असें वाटणें ही मोठी चूक असून ती फार भयंकर चूक आहे असें वेदांत ह्मणतो. असें वाटणें ह्मणजे आपण आपल्यास भूल पाडून घेण्यासारखें आहे. 'मी बद्ध आहें, मी दुर्बल आहें, मी निराधार आहें' अशा कल्पना ज्या क्षणीं तुमच्या चित्तांत येतात त्याच क्षणीं तुमच्या विपत्तीला आरंभ होतो. अशा प्रत्येक कल्पनेबरोबर तुमच्या बंधनशृंखलेंत एकेका नव्या दुव्याची भर पडत जाते. याकरितां असल्या कल्पना उच्चारूं नका. त्यांचा प्रवेशसुद्धां चित्तांत होऊं देऊं नका. 'शिवोऽहं शिवोऽहं' एवढा उच्चार अहोरात्र करणारा एक पुरुष मीं पाहिला. हा पुरुष अरण्यवासी होता. एके वेळीं वाघानें त्याला धरलें आणि तो वाघ त्याला मारण्याकरितां घेऊन चालला. वाघ त्याला नेत आहे हें कांहीं लोकांनीं पाहिलें पण अशा प्रकारें प्रत्यक्ष मृत्यूच्या दाढेंत असतांही तोंडांतून शब्द काढण्याची शक्ति होती तोंपर्यंत

तो पुरुष ‘ शिवोऽहं ’ एवढींच अक्षरें उच्चारीत होता. अशा प्रकारच्या अनेक पुरुषांच्या गोष्टी मीं ऐकल्या आहेत. शत्रु आपल्या तरवारीनें आपल्या शरिराचे तुकडे करीत असतां त्याला आशीर्वाद देणाऱ्या माणसांच्या गोष्टीही पुष्कळ आहेत. ‘ सोऽहं ’ ‘ मी तोच आहें,’ मी ब्रह्मरूप आहें, मी शुद्धस्वरूप आहें, मी पूर्णरूप आहें आणि माझे शत्रूही तसेच आहेत. तत्त्वमसि आणि सोऽहं हीं एकच रूपें आहेत. हीं दोन महावाक्यें एकाच अर्थाचीं द्योतक आहेत. जगांत अत्यंत निर्भय असें ठिकाण हेंच. असें आहे तरी द्वैत सिद्धांतांतही कांहीं कांहीं मनोहर रचना आढळते. प्रकृतिबाह्य परमेश्वर आपणास आधार देतो ही द्वैतमताची भावना कमकुवत मनुष्यांस फार उपयुक्त आहे. दुःखानें अंतःकरण विकल झालें आहे अशा प्रसंगीं शांति देण्याचें बल या भावनेंत आहे; तथापि यावर वेदांत असें म्हणतो कीं अशा प्रकारें प्राप्त करून घेतलेली शांति म्हणजे अफू खाऊन आलेली गुंगी होय. अफूच्या गुंगींत आणि स्वाभाविक झोंपेंत जें अंतर असतें तेंच अंतर अशाप्रकारें मिळविलेल्या शांतींत आणि खऱ्या स्वाभाविक शांतींत आहे. अफूची गुंगी उतरल्यानंतर मनुष्य जसा अधिक दुर्बल होतो त्याचप्रमाणें या भावनेनेंही दिवसें दिवस मनुष्य अधिक दुर्बल होत जातो. आजच्या काळीं आपणा मनुष्यांना कशाची गरज असेल तर ती सबळपणाची आहे. जगांत जें इतकें दुःख आढळून येतें त्याचें कारण मानवी मनाची दुर्बलता हेंच होय असें वेदांताचें म्हणणें आहे. केवळ याच कारणामुळें अनेक प्रकारच्या आपत्तींचा उद्भव झाला आहे. आपण दुर्बल आहों म्हणूनच दुःखी आहों. आपण खोटें बोलतों, चोऱ्या करतों, परस्परांचे जीव घेतों आणि दुसऱ्याहि अपराधांच्या श्रेणींच्या श्रेणी रचतों याचें कारण हेच कीं आपण दुर्बल आहों. या एका दौर्बल्यामुळेंच दुःखाचे डोंगर आपणांवर कोसळतात. केवळ या दौर्बल्यामुळेंच आपण मृत्युवश होतों. या दौर्बल्याचें एकही कारण आपण उरूं दिलें नाहीं तर मृत्यु आणि दुःख यांचा मागमूसही उरावयाचा नाहीं. मायेच्या सपाटयांत सांपडून आपण दुर्बल आणि दुःखी झालों आहों. या मायेचा त्याग करा म्हणजे हीं दुःखें कोठें नाहींशीं होतील हें तुम्हांस समजावयाचें सुद्धां नाहीं. हा सिद्धांत किती साधा आणि किती स्पष्ट आहे पहा. अनेक प्रकारच्या उपपत्ति पुढें आल्या, अनेक तत्त्ववेत्त्यांनीं बुद्धीच्या पकडा आपणापुढें

करून दाखविल्या आणि बुद्धिवादाचा पाऊस पाडला. एवढ्या मोठ्या धामधुमींत जो अखेरचा सिद्धांत आपल्या हातीं आला तो किती साधा, सोपा आणि सरळ आहे पहा.

सत्यवस्तूची मांडणी अद्वैतसिद्धांतानें जितक्या सोप्या आणि सरळ रीतीनें केली आहे तितक्या रीतीनें दुसऱ्या कोणत्याही मतानें ती केलेली नाहीं. द्वैतमताच्या आगमनानें हिंदुस्थानांतच काय पण दुसऱ्या ठिकाणींही एक मोठा अनर्थ उभा केला आहे. कारण, त्यामुळें अखेरचीं तत्त्वें लोकांच्या डोळ्यांसमोर आलीं नाहींत आणि लोक कोरड्या वादविवादांतच गुंग होऊन बसले. सारी जनता शुष्क बुद्धिवादांत गुरफटून पडली. या वादविवादांत सत्यान्वेषण इतकें बाजूस पडलें कीं लोकांस त्याचें भानच राहिलें नाहीं. असल्या भयंकर वादविवादानें सामान्य जनता गांगरून मात्र गेली. सत्यान्वेषण अव्यवहार्य आहे आणि चालू जीवनक्रमांत त्याचा कांहींच उपयोग नाहीं असें सामान्यजनतेस वाटलें. धर्ममार्ग हा सामान्य संसारी लोकांच्या उपयोगाचा नव्हे, असा भ्रम सामान्य जनतेस पडला. यामुळें द्वैत अथवा अद्वैत हे दोन्ही सिद्धांत सामान्य जनतेस पारखे झाले. मी आणि तूं एकच असल्या प्रकारच्या सिद्धांतांचा उपयोग व्यवहारांत झाला तर समाजाची अनवस्था मात्र होईल आणि दुर्वृत्ति बोकाळतील असेंही कित्येकांस वाटूं लागेल. तथापि अद्वैत वेदांताची माहिती सर्व जगास करून दिल्यास त्यामुळें अनीतीचें पीक माजेल असें मला तरी वाटत नाहीं. उलटपक्षीं जगांतील अनीति आणि दौर्बल्य हीं कमी करण्यास हाच एक उपाय आपणास उपलब्ध आहे असें मला मनःपूर्वक वाटतें. अमृतमय पाण्याचा सुंदर झरा जवळ वाहत असतां डबक्यांतलें सडकें पाणी लोकांस पिऊं देणें इष्ट आहे काय? तुम्ही पूर्ण शुद्ध आहां हा सिद्धांत खरा असेल तर साऱ्या जगास तो कां शिकवूं नये? मेघनादानें त्याचा उच्चार कां करूं नये? पापी, पुण्यवान्, स्त्री, पुरुष आणि मुलें, राजा आणि रंक या साऱ्यांपर्यंत तो पोहोंचता कां करूं नये?

हें कार्य अत्यंत मोठें आणि अत्यंत बिकट आहे असें सकृद्दर्शनीं वाटतें. त्याचप्रमाणें कित्येकांना तें भयावहही वाटतें. याचें कारण इतकेंच कीं अनेकप्रकारच्या पूर्वग्रहांचीं खुळें आपण पांघरून बसलों आहों. आपणांपैकीं कांहींजणांना अतिशय खाण्यानें अग्निमांद्य झालें आहे. एखादा पदार्थ पचेल कीं

नाहीं याचा विचार न करतां जें हातास आलें तें त्यांनीं भक्षण केलें यामुळें त्यांना आतां सुंदर आणि परिपक्क अन्न पचविण्याचें सामर्थ्य नाहींसें झालें आहे. दुसऱ्या कित्येकांनीं इतके खडखडीत उपास केले आहेत कीं अन्न पचविणें हें आपलें कार्य आहे ही गोष्ट त्यांचें पोट विसरून गेलें आहे. अगदीं लहानपणापासून दौर्बल्याच्या कल्पनांचा घंटानाद आपल्या कानावर एकसारखा पडत असतो. भुतांच्या अस्तित्वावर आपला विश्वास नाहीं असें तोंडानें ह्मणणारे आपणास पुष्कळ आढळतील पण एकाद्या मनुष्यविहीन आणि अंधाऱ्या जागेंत जाण्याचा प्रसंग आला असतां ज्यांच्या आंगावरचे केस उभे राहात नाहींत असे कितीसे सांपडतील ? याचें कारण इतकेंच कीं पूर्वग्रहांचा पगडा मनुष्याच्या चित्तावर फार काळ राहतो. धर्मविषयक मोळसर कल्पनाही याच कोटींतल्या होत. सैतानाला काल्पनिक अस्तित्व मात्र आहे असें मीं ह्मटलें तर धर्म बुडाला रे बुडाला असें ह्मणणारे लोक तुमच्या इंग्लंडांत तुमच्या या देशांत, किती तरी आढळतील. कित्येकांनीं मला अशा प्रकारचे प्रश्नसुद्धां केले आहेत. सैतान नसेल तर धर्मही असूं शकणार नाहीं असें त्यांस वाटतें. या गोष्टीचें कारण इतकेंच कीं अशाप्रकारें विचार करण्याची संवय लहानपणापासून आपल्या चित्तास लागली आहे. यामुळें तीच आपल्या आंगवळणीं पडून दुसऱ्या प्रकारच्या विचाराचा रिघाव तेथें ती होऊं देत नाहीं. रोजच्या रोज शिव्या खाणाऱ्या मनुष्याला एखाद्या दिवशीं कोणी अपशब्द न बोलला तर आपल्या आयुष्याचा एक दिवस फुकट गेला असें वाटतें. आपण सारे याच पंक्तींतले आहोंत. पूर्वग्रह हेंच या स्थितीचें कारण आहे; तथापि आज ही स्थिति इतकी भयानक असली तरी एक काळ असा येईल कीं ज्या वेळीं या पूर्वग्रहरूप खुणांच्या शृंखला आपल्या पायांतून गळून पडतील आणि सोऽहं व शिवोऽहं इतकाच उच्चार आपण करीत राहूं. वेदांताचा हा एकच सिद्धांत जगांत अखंड राहणार आहे. हाच सिद्धांत जगण्याच्या योग्यतेचा आहे. हा सिद्धांत हिंदु लोकांच्या डोक्यांत जन्म पावला कीं उत्तरध्रुवाजवळील हिममय प्रदेशांत त्याचें उगमस्थान आहे या गोष्टीशीं जगाला कांहींच कर्तव्य नाहीं. सत्य आहे तें हेंच. सत्य अनंत आहे. आणि कोणत्याही एका व्यक्तीचा अथवा एका राष्ट्राचा हक्क त्यावर नाहीं. त्याची सनद कोणाही विशिष्ट व्यक्तीस लिहून दिलेली नाहीं. मनुष्यें, जनावरें आणि

देवदेवता य साऱ्यांचा सारखाच हक्क त्यावर आहे. साऱ्यांनीं खुशाल तें आपलें ह्मणावें असें उज्ज्वल सत्य आपणापाशीं असतां आपलें जीवित आपण दुःखमय कां करून घ्यावें ? नानाप्रकारच्या भोळया आणि खुळ्या कल्पनांचा प्रसार लोकांत कां करावा ? येथल्या केवळ वीसच असामींनीं असल्या कल्पनांचा त्याग केला तर दहा हजार वेळीं मी पुन्हां जन्मास येऊन त्यांची सेवा करीन. अद्वैत वेदांताचा हा सिद्धांत ऐकल्याबरोबर ज्यांची गाळण उडते असे लोक याच देशांत आहेत असें नाहीं तर खुद्द त्याच्या जन्मभूमींतही असे लोक आहेत. हा सिद्धांत संन्याशाच्या मात्र उपयोगी आहे असें ह्मणणारे लोक हिंदुस्थानांतही पुष्कळ आहेत. संसार सोडून अरण्यवास करणाऱ्या संन्याशांना हा सिद्धांत ठीक आहे, पण गरीब बिचाऱ्या संसाऱ्याला तो उपयोगाचा नाहीं असें ते ह्मणतात. त्यांना भीति दाखविण्यास परमेश्वर हवा आणि धार्मिक क्रियाकलापही हवा.

द्वैत कल्पनांचें साम्राज्य दीर्घकाळपर्यंत जगावर चालू राहिलें आहे आणि त्याचा परिणाम हा असा झाला आहे. आतां ही दिशा आपण कां बदलूं नये ? आतां नवा अनुभव आपण कां घेऊं नये ? अद्वैत तत्त्वाचें ग्रहण सर्वांस होण्यास कदाचित् पुष्कळ युगांचा काळ लागेल; पण त्याला आरंभ आतांच कां करूं नये ? अद्वैत सिद्धांताचें बीजारोपण आपल्या साऱ्या आयुष्यांत वीस जणांच्या हृदयांत आपण करून दिलें तरी आपण मोठा कार्यभाग केल्यासारखें होईल.

या मार्गात एक मोठी अडचण आहे. ‘ मी पवित्र आहें, मी पुण्यरूप आहें ’ हे शब्द तोंडानें बोलणें फार सोपें असतें; पण माझ्या आचरणांत त्यांचें प्रतिबिंब दिसत नाहीं. ही गोष्ट अक्षरशः खरी आहे. आपलें साध्य इतकें उच्च आहे कीं त्या बरहुकूम चालणें जवळ जवळ दुरापास्त आहे. आपल्या मस्तकावरील आकाश फार उंच अंतरावर आहे हें लहान मुलाला सुद्धां समजतें; पण त्यामुळें आपली नजर आपण उंचाऊं नये असें होतें काय ? आपलें साध्य खडतर ह्मणून दूर ठेवून पूर्वीचाच भोळसरपणा आपण कायम ठेवला तर त्यानें आपलें बरें तें काय होणार ? प्यावयास अमृत मिळत नाहीं ह्मणून वैतागून जाऊन विष प्राशन केलें तर त्यानें कांहीं फायदा होणार आहे काय ? सत्य प्रकाशाचा अनुभव याच क्षणीं आपणास घेतां येत नाहीं ह्मणून

अंधारांत उडी मारून पूर्वीच्या दौर्बल्यास आणि भोळसरपणास आपण मिठी मारून बसलों तर त्यांत आपला फायदा कोणता ?

द्वैतवादाला तो केवळ द्वैत म्हणून माझी हरकत नाहीं. किंबहुना त्यांतील पुष्कळ आचार मला पसंतही आहेत; पण ज्या ज्या गोष्टींनीं मनुष्याच्या मनाला दौर्बल्य येतें त्या त्या गोष्टी मला पसंत नाहींत. दौर्बल्य आणणारें प्रत्येक मत मला त्याज्य वाटतें. कोणत्याही स्त्रीला, पुरुषाला अथवा मुलाला माझा एकच प्रश्न आहे. तुम्ही सशक्त, सुदृढ आहां काय? मी सशक्त आहें, समर्थ आहें अशी जाणीव तुमच्या चित्तांत आहे काय ? अशी जाणीव जेथें जिवंत आहे तेथें सत्याचा अंश आहे हा सिद्धांत निःसंशय खरा आहे. सत्यावांचून जिवंतपणा असूं शकणार नाहीं. सत्याच्या मार्गाकडे आपण जात असलों तरच आपलें सामर्थ्य वाढीस लागेल. आपल्या आंगीं सामर्थ्य नसेल तर सत्यापर्यंत आपण कधींच पोहोंचूं शकणार नाहीं. याकरितां जो कोणताही धर्मपंथ मनाला दौर्बल्य आणतो तो मनुष्याला भोळा बनवितो. अशा दुर्बल मनाचा मनुष्य अशक्य कल्पनांमागें धांवत सुटलेला असतो. आपल्या भलत्याच कल्पना खऱ्या व्हाव्या अशी वेडी इच्छा त्याच्या मनांत निरंतर वास करते. या साऱ्या गोष्टींचा परिणाम कोणाही व्यक्तीवर फार भयंकर होत असल्यामुळें असले धर्मपंथ मला त्याज्य वाटतात. असल्या धर्मपंथांनीं मनुष्यजातीचें कोणतेंही हित साधलेलें नाहीं. यायोगानें मनुष्याचें मन विकृत होतें. कालेंकरून तें दुर्बल होऊं लागतें. अखेरीस त्या दौर्बल्याची परमावधि इतकी होते कीं सत्याचा अल्पसा अंशसुद्धां ग्रहण करण्याचें सामर्थ्य त्याच्या ठिकाणीं राहात नाहीं. मग त्या सत्यानें दाखवून दिलेल्या मार्गाप्रमाणें आचार करण्याची गोष्ट तर दूरच राहिली. सामर्थ्य या एकाच वस्तूची आपणास जरूर आहे. आपणास जडलेल्या भवरोगावर सामर्थ्य हें एकच रामबाण औषध आहे. श्रीमंत सत्ताधीशांच्या जुलमाखालीं भरडल्या जाणाऱ्या गरीब दुबळ्यांना या एकाच मात्रेची आवश्यकता आहे. एक प्रकारचे पापी लोक स्वतःस पुण्यवान् म्हणून आणि दुसऱ्या गरीब दुबळ्यांस पापी म्हणून त्यांजवर अंमल गाजवितात; तेव्हां या पापी लोकांनाही सामर्थ्याच्या या रामबाण मात्रेशिवाय दुसरा उपाय नाहीं आणि हें सामर्थ्यदानाचें कार्य अद्वैत वेदांताशिवाय दुसरा कोणताही धर्म करूं शकणार नाहीं.

स्वा. वि. २ ख. ८

अद्वैत सिद्धांताशिवाय नीतिशास्त्रही बलवान् राहूं शकणार नाहीं. कोणत्याही कार्यांत सारी जबाबदारी आपल्या शिरावर पडली म्हणजे त्याच्या सिद्धी-साठीं आपलें जीवित खर्ची घालण्यासही आपण मागेंपुढें पाहत नाहीं; पण अशी जबाबदारी नसली ह्मणजे आपण सांगकाम्याप्रमाणें वागत असतों. जबाबदारी आली कीं तेवढया वेळेपुरते तरी आपण त्यागी बनतों. आपला स्वार्थ त्या वेळेपुरता तरी आपणास मागें ठेवावा लागतो. तुमच्यावर जबाब-दारी येऊन पडली ह्मणजे सर्व वाईट कल्पना तुम्ही आपल्या चित्तांतून आपो-आपच काढून टाकतां. तुमची सारी दानत जणूं काय क्षणार्धांत बदलून जाते. अशाच रीतीनें आपल्या आयुष्याची सारी जबाबदारी आपणावरच येऊन पडली ह्मणजे शक्य तितक्या उत्तम रीतीनें ती पार पाडण्यास आपोआपच आपण पुढें सरसावूं. अमक्याची मदत मला होईल अथवा अमक्या प्रका-रच्या कमनशिबानें मला दगा दिला, या कल्पना चित्तांतून निघून जाऊन जें कांहीं घडलें तें माझ्याच सुकृताचें अथवा दुष्कृताचें योग्य फळ आहे अशी खात्री माझ्या चित्ताला एकवार पटली ह्मणजे मी आपोआपच सुधारण्याच्या पंथास लागतों. संकट प्रसंगीं ' देवा, धांव !' असें ह्मणण्याची सोय नाहींशी झाली ह्मणजे माझें सारें बळ एकवटून मी आपोआपच उद्योगाला लागतों. माझें जें कांहीं बरें वाईट होईल तें माझ्या कर्तबगारीनेंच होणार हा सिद्धांत पटला ह्मणजे माझें सारें बळ एकवटण्याचा यत्न मी ताबडतोब करूं लागतों. "**आत्मैव ह्यात्मनो बंधुरात्मैव रिपुरात्मनः।**" हा सिद्धांत आपण चित्तावर पक्का कोरून ठेवला पाहिजे. याला विरोध आणणाऱ्या साऱ्या विचारांचा पूर्ण त्याग आपण केला पाहिजे.

**" मनो बुद्ध्यहंकारचित्तानि नाहं न च श्रोत्रजिह्वे न च घ्राणनेत्रे । न च व्योम भूमिर्न तेजो न वायुश्चिदानंदरूपः शिवोहं शिवोहम् ॥ १ ॥ न च प्राणसंज्ञो न वै पंचवायुर्न वा सप्तधातुर्न वा पंचकोशः । न वाक्पाणि-पादं न चोपस्थपायू चिदानंद० ॥ २ ॥ न मे द्वेषरागौ न मे लोभमोहौ मदो नैव मे नैव मात्सर्यभावः । न धर्मो न चार्थो न कामो न मोक्षश्चिदा० ॥ ३ ॥ न पुण्यं न पापं न सौख्यं न दुःखं न मंत्रो न तीर्थं न वेदा न यज्ञाः । अहं भोजनं नैव भोज्यं न भोक्ता चिदा० ॥ ४ ॥ न मृत्युर्न शंका न मे जातिभेदः पिता नैव मे नैव माता च जन्म । न बंधुर्न मित्रं गुरुर्नैव शिष्य-**

श्चिदा० ॥ ५ ॥ अहं निर्विकल्पी निराकाररूपी विभुत्वाच्च सर्वत्र सर्वेंद्रियाणाम् । न चासंगतं नैव मुक्तिर्न मे यश्चिदा० ॥ ६ ॥"

—निर्वाणषट्कम्.

हेंच स्तोत्र आपण सदोदित ह्मणत असावें अशी वेदांताची आज्ञा आहे. आपल्या अंतिम साध्यास पोहोंचण्याचा मार्ग हाच. 'शिवोऽहं, शिवोऽहं,' एवढेंच तुह्मी नित्य ह्मणा आणि दुसऱ्या प्रत्येकाला हेंच ह्मणण्यास शिकवा. हें तुह्मी नित्य ह्मणत गेलां ह्मणजे तुमच्या हृदयांत सामर्थ्याचा संचार होऊं लागेल. आरंभीं आरंभीं आपलीं पावलें लटपटलीं अथवा आपल्या आवाजांत कंप आला तरी पुढें पुढें तीं नाहींशीं होऊन सामर्थ्याचा संचार अधिकाधिक होत जाईल आणि अखेरीस सत्याचा प्रवेश आपल्या हृदयांत होईल. तें सत्य आपल्या सर्व रोमरोमांत खेळूं लागेल. भ्रमनिरास होईल आणि सत्याचा प्रकाश अधिकाधिक उज्ज्वल होत जाईल. अखेरीस सर्व अंधकार नाहींसा होऊन त्या जागीं एक उज्ज्वल सूर्य मात्र राहील.

# विश्व.

## १ बाह्यसृष्टि.

आपणाभोंवतीं दिसणारीं हीं फुलें किती सुंदर आहेत ! प्रभातकालीं उगवणारा सूर्य किती मनोहर असतो ! सृष्टींत जे नानारंग पसरले आहेत त्यांची शोभा किती अवर्णनीय आहे ? सर्व सृष्टि अत्यंत सुंदर आहे, आणि जगांत मनुष्यप्राणी आल्यापासून तो तिचा उपभोग घेत आहे. गगनास भिडूं पाहाणारी ही पर्वतराजी किती उदात्त आणि भयप्रद आहे ? प्रचंड नद्या समुद्राकडे धांव घेत आहेत. जगांत प्रचंड वालुकामय अरण्यें आणि अगाध समुद्र पसरले आहेत. त्याचप्रमाणें तारकांनीं भरलेलें आकाशही अगाध आहे. या साऱ्या वस्तु मनुष्याच्या मनास चकित करून सोडतात; तथापि त्या उदात्त आणि चित्ताकर्षकही आहेत. मनुष्याभोंवतीं ही जी सारी सृष्टि पसरली आहे तिचा परिणाम त्याच्या चित्तावर कालाच्या आरंभापासून होत आहे.

मनुष्याच्या विचारसृष्टीवर या बाह्यसृष्टीचा परिणाम घडतो. बाह्यसृष्टीचा आघात मनावर झाला ह्मणजे त्याची प्रतिक्रिया ‘ हें काय आहे ? हें विश्व कोणीं निर्माण केलें ? तें कसें निर्माण झालें ? हें रहस्य कोण सांगेल ? ’ अशा प्रश्नांच्या रूपानें उद्भवते. हाच प्रश्न आपल्याही पुढें सध्यां उभा आहे. या प्रश्नाचें उत्तर देण्याकरितां कोट्यवधी मनुष्यांनीं कोट्यवधी प्रयत्न केले तथापि आणखीही कोट्यवधी लोकांना हाच प्रयत्न पुनःपुन्हां करावा लागेल. या प्रश्नाला आजपर्यंत जीं उत्तरें मिळालीं तीं सारीं चुकीचींच होतीं असें नव्हे. त्यांपैकीं प्रत्येक उत्तरांत सत्याचा अंश होता. आणि जों जों काल व्यतीत होत जातो तों तों या सत्यांशांत भर पडत जाते. हिंदुस्थानांतील प्राचीन तत्त्वज्ञांनीं या प्रश्नांचीं उत्तरें कशीं दिलीं आहेत आणि अर्वाचीन ज्ञानाशीं त्यांचा मेळ कसा पडतो याची थोडीशी रूपरेखा आपणास मी आज दाखविणार आहें.

हा प्रश्न अत्यंत जुना आहे. किंबहुना मनुष्याच्या मनांत उद्भवलेला पहिला प्रश्न हाच. याच्या कांहीं अंशाचें उत्तर अगोदरच दिलें गेलें आहे. पहिला मुद्दा असा कीं ज्या वेळी कांहीं होतें असेंही नाहीं अथवा कांहीं नव्हतें असेही नाहीं असा एक काळ होता. त्या वेळीं या जगाला अस्तित्व नव्हतें. समुद्र आणि पर्वत, नद्या आणि दऱ्याखोरीं त्याचप्रमाणें जगांतील अनेक प्रकारचें वस्तुजाल, मनुष्यप्राणी, झाडें झुडपें, चतुष्पाद जनावरें, पक्षी, तारका इत्यादि कोणत्याहि दृश्य वस्तूस त्या कालीं अस्तित्व नव्हतें. खरो-खरच हा मुद्दा खरा असेल काय ? हें उत्तर प्राचीन तत्त्ववेत्त्यांनीं कोणत्या रीतीनें शोधून काढलें याचा आपण थोडासा विचार करूं. आपणासमोर दिसणारें हें लहानसें झुडूपच आपण घेऊं. मनुष्यानें जमिनींत एक बीं टाकलें आणि थोड्या काळानें एक लहानसा अंकुर जमिनींतून बाहेर डोकावूं लागला. हा अंकुर वाढतां वाढतां अखेरीस त्याचा एक प्रचंड वृक्ष बनला. कालें-करून हा वृक्ष मरण पावला आणि त्या वेळीं त्यानें आपलें बीज मात्र मागें ठेवलें. अशा रीतीनें त्यानें आपलें एक वर्तुळ पुरें केलें. बीजांतून तो बाहेर पडला, त्यानें प्रचंड रूप धारण केलें आणि त्याची अखेर पुन्हां बीजांतच झाली. आतां एक पक्षी घ्या. अंड्यांतून तो बाहेर पडतो. कांहीं काळपर्यंत जीवित धारण करून इतस्ततः वागडतो आणि आपलें अंडें मागें ठेवून

आपला अवतार संपवितो. या अंड्यांतून भविष्यत्कालचा पक्षी निर्माण होतो. हीच स्थिति इतर प्राण्यांची आणि मनुष्यांचीही आहे. जगांतील प्रत्येक वस्तूचा आरंभ कोणत्याना कोणत्या प्रकारच्या बीजांत असतो. हीं बीजें त्याचीं मूलरूपें होत. या बीजांत त्या वस्तु सूक्ष्मरूपानें सांठविलेल्या असतात. त्यांतूनच त्या बाहेर पडतात, त्यांची वाढ होते, दिवसेंदिवस त्यांचा आकार वाढण्याची क्रिया चालू असते आणि नंतर आपल्या सूक्ष्म आकाराकडे त्या पुन्हां परत जाऊं लागतात. जशा रीतीनें त्यांची उत्क्रांति होत गेली त्याच्या उलट रीतीनें त्यांची उपक्रांति होऊन ज्या बीजांतून त्या अवतीर्ण झाल्या त्याच बीजांत त्यांचा पुन्हां लय होतो. पावसाच्या या थेंबांत सूर्यकिरण कसें चमकत आहे पहा. सूर्यकिरण जणूं काय त्याच्याशीं खेळत आहे. समुद्रांतून वाफेच्या रूपानें हा जलबिंदु आकाशांतील उच्च हवेंत गेला होता. त्या ठिकाणीं त्याचें पाण्यांत रूपांतर झालें आणि सांप्रत दिसत असणाऱ्या रूपानें तो पृथ्वीवर आला. पुन्हां त्याची वाफ होऊन पुन्हां त्या उच्च स्थळीं ती गमन करणार आहे. जगांत आपणाभोंवतीं दिसणाऱ्या प्रत्येक सृष्टपदार्थांचा हाच ठरींव कार्यक्रम आहे. आपणासमोर दिसणाऱ्या या विशाल पर्वतावर हिमपात आणि नद्या यांचे आघात चालू आहेत हें आपणास माहित आहेच. या आघातांनीं हळूहळू पण निश्चयानें त्यांचें चूर्ण होत आहे आणि वाळूच्या रूपानें तें समुद्रांत जात आहे. समुद्राच्या पोटांत हेंच चूर्ण घट्ट होत जातें. तें घट्ट होतां होतां त्याचे खडक बनतात. त्या खडकांवर आणखी पुढें चढून त्यांस अधिक कठीणपणा येत जातो आणि कालेंकरून तेच खडक नव्या पिढीचे पर्वत बनतात. पर्वत बनण्याची त्यांची क्रिया पूर्ण झाली ह्मणजे त्यांच्या अवतारसमाप्तीस पुन्हां सुरवात होते आणि त्यांचें पुन्हां पीठ बनतें. अशा रीतीनें हें रहाटगाडगें अखंड चालू राहिलें आहे. वाळूचा पर्वत बनतो आणि पर्वताची पुन्हां वाळू बनते.

मनुष्यास जितका कांहीं अनुभव आला आहे त्यावरून सर्व सृष्टि एकाच प्रकारानें रचली गेली आहे असें दिसून येतें. ज्या रीतीनें वाळूचा एक लहानसा कण निर्माण होतो त्याच रीतीनें प्रचंड सूर्य आणि तारेही निर्माण होतात; आणि त्याच रीतीनें हें अनंत विश्वही निर्माण होतें. ज्या रीतीनें वाळूचा एक कण निर्माण होतो, त्याच रीतीनें विश्वही निर्माण होतें आणि

तृणापासून प्रचंड पदार्थापर्यंत सर्वांचा कायदा एकच आहे हें तत्त्व खरें असेल तर यांपैकीं कोणताही एक पदार्थ समजला तर बाकीच्यांचा वेगळा अभ्यास करावयास नको हें श्रुतिवचन अर्थातच खरें असलें पाहिजे. एखादें लहानसें झुडूप घेऊन त्याचा सारा जीवनक्रम तुम्ही लक्षांत आणला तर साऱ्या विश्वाचा अभ्यास तुम्हीं केल्यासारखे होईल. आपणाभोंवतीं दिसणाऱ्या या साऱ्या देखाव्यांस ह्याच नियम लागू केला तर सर्वांचा आदिअंत एका प्रकारेंच होतो ही गोष्ट प्रथम आपल्या लक्ष्यांत येते. वाळूच्या कणांतून पर्वत निर्माण होतो आणि त्याच वाळूच्या स्वरूपास तो परत जातो. पाण्याच्या वाफेंतून नदी निर्माण होते आणि तिच्या पाण्याचें रूपांतर पुन्हां वाफेंत होतें. बीजांतून वृक्ष निर्माण होतो आणि त्याच बीजांत त्याचा लय होतो. सूक्ष्म जंतूंतून मानवी जीवित निर्माण होतें आणि त्याच जीविताचा लय त्या जंतूंत पुन्हां होतो. बाष्परूप स्थितींतून तारे, ग्रह आणि नद्या निर्माण झाल्या असून त्याच बाष्परूप स्थितींत हीं सारीं पुन्हां परत जातील. आतां यावरून आपण काय शिकावयाचें ? हेच कीं, व्यक्त अथवा जड स्थिति ही कार्यरूप असून सूक्ष्म स्थिति ही कारणरूप आहे. सर्व तत्त्वज्ञांचे मुकुटमणी श्रीकपिल यांनीं ही गोष्ट हजारों वर्षांपूर्वी सिद्ध केली आहे. नाश ह्मणजे कारणरूपाकडे परतणें हा नियम कपिलांनीं प्रथम सिद्ध केला. आपणासमोर दिसणारें हें टेबल नाश पावलें तर ज्या सूक्ष्म कारणांतून तें निर्माण झालें होतें त्याच कारणांत तें पुन्हां परत जाईल. मनुष्य मृत्यु पावला म्हणजे ज्या मूल भूतापासून त्याचा देह बनलेला असतो त्या मूल भूताकडे तो परत जातो. यालाच नाश असें नांव आपण देतों. नाश ह्मणजे कारणरूपाकडे परत जाणें. यावरून कारण आणि कार्य हीं परस्परांपासून भिन्न नसून तीं एकरूपच आहेत हा सिद्धांत आपणास समजतो. त्यांत भेद असतो तो फक्त आकाराचा असतो. आपणासमोर दिसणारा प्रत्येक पदार्थ कार्यरूप असून त्याचें कारण सूक्ष्मरूप असतें. सूक्ष्मरूप दृश्यत्वास आलें ह्मणजे त्याला आपण कार्य ह्मणतों. समोरील हा काचेचा तुकडा पहा. यांत कांहीं द्रव्यें आणि तीं एकत्र करणाराच्या अंगांतील सामर्थ्य यांच्या संयोगानें या तुकड्याला हा सध्यांचा आकार आलेला आहे. हा संयोग या तुकड्याचें कारण होय. कांहीं द्रव्यें + मानवी शक्ति या कारणांतून हा तुकडा निर्माण झाला. यांत मानवी शक्तीचा

जो अंश आहे त्या शक्त्यंशामुळें यांतील भिन्नभिन्न पदार्थ एकमेकांस चिकटून राहतात. हे भिन्न पदार्थ अशा रीतीनें एकमेकांस न चिकटले तर त्या तुकड्याला सांप्रतचा आकार प्राप्त होणार नाहीं. त्याचप्रमाणें त्या तुकड्यांत निरनिराळ्या जातींचीं द्रव्येंही कार्यरूपानें दृश्य स्थितीस आलीं आहेत. सूक्ष्म कारणें समवायीरूप होऊन या कांचेच्या आकारानें दृश्यत्वास आलीं आहेत. हा तुकडा फुटून त्याचें चूर्ण झालें म्हणजे यांतील मानवी शक्तीचा अंश आपल्या मूल रूपास परत जाऊन आणि बाकी उरलेला कांचेचा भुगा पुन्हां दुसऱ्या आकारास जाईपर्यंत याच स्थितींत राहील.

यावरून आपण लक्ष्यांत ठेवावयाचा नियम हा कीं, कार्य हें कारणापासून भिन्नरूप नसतें. सूक्ष्म कारणाचें जें स्थूल अथवा दृश्य रूप तेंच कारण. दुसरा नियम लक्ष्यांत ठेवावयाचा तो हा कीं आपणाभोंवतीं जे अनंत आकार आपण पाहात आहों ते कारणकार्यांच्या रूपानें रहाटगाडग्याप्रमाणें चक्राकार अखंड परिभ्रमण करीत असतात. बीजांतून वृक्ष निर्माण होतो, आणि वृक्षांतून बीज निर्माण होऊन त्यांतून नवे वृक्ष निर्माण होतात. अशा रीतीनें हा खेळ अखंड चालू असतो. ही गोष्ट साऱ्या जीवसृष्टीसही लागू आहे. त्याचप्रमाणें आपल्या पंचेंद्रियद्वारांनीं ज्या ज्या पदार्थांचा अनुभव आपणास होतो त्या त्या पदार्थमात्रास हाच नियम लागू आहे. फार काय पण आपली कल्पनासृष्टीही याच नियमास अनुसरून चालते. आपल्या ज्ञानाच्या मर्यादेंत ज्या ज्या वस्तूचा समावेश होतो ती याच नियमानुरूप चालते. मनुष्याच्या शरिरांतून वायू जसा आंत जातो आणि बाहेर येतो त्याचप्रमाणें सारी सृष्टि आंतून बाहेर व बाहेरून आंत अशा खेपा करीत असते. या सृष्टींत हा क्रम अखंड चालू आहे. एक लाट एकीकडे उंच उठत असते तर दुसरीकडे दुसरी सपाटीस जात असते. अशा रीतीनें लाटा उठणें आणि निमणें हा क्रम अखंड चालू आहे. प्रत्येक लाटेच्या पोटीं तिची पोकळी असते आणि प्रत्येक पोकळींत लाट सूक्ष्म रूपानें असते. अशा रीतीनें सर्व विश्व एकाच नियमाबरहुकूम चालत असल्यामुळें त्यांत एकतानता आहे. ज्या कारणांतून हें विश्व निर्माण झालें त्याच कारणांत त्याचा पुन्हां लय व्हावा हें रीतसरच आहे. सूर्य, चंद्र, तारे, पृथ्वी, देह, मन आणि विश्वांतील यच्चयावत् वस्तु आपल्या सूक्ष्म अथवा अदृश्य कारणरूपास पुन्हां अवश्य परत जातील. यालाच आपण प्रलय असें नांव

देतों. तथापि त्यांचा पूर्ण नाश मात्र होणार नाहीं. त्या साऱ्या सूक्ष्म अथवा कारणरूपानें जिवंत राहतील आणि कालेंकरून हेंच सूक्ष्मरूप पुन्हां स्थूल रूपास येऊन पृथ्वी, सूर्य, चंद्र, तारे इत्यादि अनेक आकारांनीं पुन्हां दृश्यत्वास येईल.

विश्वाच्या या भरतीओहोटीबद्दल आणखीही एक गोष्ट लक्ष्यांत ठेवण्यासारखी आहे. वृक्षांतून बीज बाहेर पडतें हें खरें पण तें बाहेर पडतांक्षणींच त्याचें मोठें झाड बनतें असें नाहीं. कांहीं काळ त्याला तसेंच पडून राहावें लागतें. त्या काळांत तें अक्रिय असतें अथवा त्याची क्रिया कदाचित् चालू असली तरी ती इतकी सूक्ष्म असते कीं ती आपल्या हिशेबांत येण्यासारखी नाहीं. तें बीज जमिनींत पडलें ह्मणजे कांहीं कालपर्यंत त्याची क्रिया भूपृष्ठाच्या खालीं चालू असते. तेथें तें छिन्नभिन्न होतें. जणूं काय तेथें त्याची अधिक अवनत स्थिति होते. मग या अवनत स्थितीपासून तें पुन्हां उन्नत होऊं लागतें. अशाच रितीनें या साऱ्या विश्वालाही अत्यंत सूक्ष्म स्थितींत कांहीं काल काढावा लागतो. या काळांत त्याला प्रत्यक्षत्व आणि स्पष्टत्व नसतें. अशा स्थितींतून पुढें नवें विश्व निर्माण होतें. प्रत्यक्षत्वांतून अदृश्य स्वरूपांत जाणें, त्या अदृश्य स्वरूपांत काहीं काळ राहणें आणि त्यांतून पुन्हां दृश्यत्वास येणें या तिन्ही क्रिया मिळून एक कल्प होतो. यानंतर एक महत्वाचा प्रश्न येथें उपस्थित होतो. सूक्ष्म आकार अगदीं हळूहळू वाढतां वाढतां अधिकाधिक जड स्वरूप धारण करीत जात असतो हें आपण पाहिलेंच आहे. तसेंच कारण आणि कार्य हीं वस्तुतः एकरूप असून कार्य हें कारणाचेंच एक दुसरें रूप आहे हेंही आपण पाहिलेंच आहे. याकरितां कारणावांचून कार्य घडत नाहीं असा सिद्धांत निघतो. म्हणून सर्व विश्व कोणत्याही कारणावांचून उत्पन्न झालें असणें शक्यच नाहीं हें उघडच आहे. कारणावांचून कार्य नाहीं आणि कार्य हें कारणाचेंच रूपांतर आहे.

तर मग हें विश्व कशांतून निर्माण झालें ? तें पूर्वीच्या सूक्ष्म विश्वांतून निर्माण झालें असलें पाहिजे. मनुष्य कशांतून निर्माण झाला ? पूर्वीच्याच सूक्ष्म रूपांतून. झाड कशांतून निर्माण झालें ? बीजांतून. सारा वृक्ष त्या बीजांत पूर्वी सांठविलेला होता. त्या बीजांतून तो बाहेर पडतो आणि प्रत्यक्षत्वास येतो. अशाच रीतीनें हें विश्वही पूर्वी सिद्ध असलेल्या सूक्ष्म रूपांतून

प्रत्यक्षत्वास आलें आहे. पूर्वी तें अदृश्यरूपांत होतें आणि आतां तें दृश्यत्वास आलें. याच सूक्ष्मरूपास तें पुन्हां परत जाईल आणि त्यांतून पुन्हां स्पष्टत्वास येईल. सूक्ष्मरूप हळूहळू वाढतें आणि त्याच्या वाढीची मर्यादा संपली ह्मणजे त्याच स्पष्ट रूपांत कांहीं काल तें स्थिर राहतें हें आपणास ठाऊक आहेच. अशा रीतीनें बीजरूपांत मोठ्या आकारास येणें यालाच अर्वाचीन काळीं उत्क्रांति असें ह्मणतात. प्रत्येक पदार्थ अशा रीतीनें उत्क्रांत झाला आहे हें अक्षरशः खरें आहे. याचा प्रत्यक्ष अनुभव प्रत्येकाच्या जीवनक्रमांत त्याला येतोच. कोणीही सामान्यबुद्धीचा मनुष्य या मताच्या सत्यत्वाबद्दल वाद घालणार नाहीं; पण आह्मांला याशिवाय आणखीही एका मुद्द्याचा विचार कर्तव्य आहे. आह्मांला आणखी एक पाऊल पुढें टाकावयाचें आहे. प्रत्येक उत्क्रांतीच्या मागें अपक्रांति अवश्य असतेच. झाडाचें पितृत्व बीजाकडे येतें हें खरें, पण त्या बीजाचें पितृत्व दुसऱ्या एका झाडाकडे येतें हेंही खरें आहे. बीज या सूक्ष्मरूपांतून प्रचंड वृक्ष बाहेर आला, आणि त्याच्या बीजांत भावी प्रचंड वृक्ष अपक्रांत स्थितींत आहे. आजचें दृश्य विश्व सूक्ष्म स्थितींत यापूर्वी होतें. अणूएवढ्या आकारांतून मनुष्यप्राणी निर्माण होतो आणि अणूएवढ्या आकारांत तो अपक्रांत स्थितींत असतो. अपक्रांत स्थितींत तो अणुप्रमाण असतो आणि त्याच स्थितींतून उत्क्रांत होऊन तो मनुष्य ह्मणवितो. ही सारी विचारशृंखला उत्क्रांतिवाद्यांस पटत असली तर आमचा त्यांच्याशीं कोणताही तंटा नाहीं. आमचें हें म्हणणें त्यांच्या गळीं उतरलें तर त्यांना आम्ही धर्मभंजक न म्हणतां धर्मरक्षक असें नांव देऊं.

कारणावांचून कार्य नाहीं आणि अभावांतून भाव उत्पन्न होत नाहीं हा सिद्धांत आपल्या लक्ष्यांत आतां आला असेलच. प्रत्येक वस्तूला अनंतकालापासून अस्तित्व असून ती तशीच अनंतकाल अस्तित्वांत राहणार आहे. तिच्यांत जी कांहीं हालचाल होते ती फक्त भरतीची आणि ओहोटीची. स्थूलांतून सूक्ष्मांत जाणें आणि सूक्ष्मांतून पुन्हां स्थूलांत येणें एवढाच फेरबदल तिच्यांत होत असतो. ही उत्क्रांति आणि अपक्रांति अखिलसृष्टींत चालू आहे. अगदीं क्षुद्र प्राणी उत्क्रांत होत होत अखेरीस तो मनुष्यत्वास पोहोंचला; पण ज्या स्थितींतून तो उत्क्रांत झाला ती स्थितीही दुसऱ्या

एखाद्या उत्क्रांतीची अपक्रांत स्थिति असली पाहिजे. ही अपक्रांत स्थिति कोणत्या स्थितीची अपक्रांतावस्था आहे असा प्रश्न उपस्थित होतो. अपक्रांती कशाची झाली ? परमेश्वरस्वरूपाची ही अपक्रांतस्थिति आहे. असें उत्तर आपण दिलें तर उत्क्रांतिवादी तें चुकीचें ठरवितील. परमेश्वर-स्वरूप हें शुद्ध बुद्धीचें स्वरूप आहे आणि विश्वांत बुद्धीची वाढ पाहिली तर ती उच्च प्रतीच्या प्राण्यांत मात्र आढळून येते. उत्क्रमणावस्थेंत बुद्धीचा उदय फार उशीरां होतो असें दिसून येतें. उच्चप्रतीचे प्राणी आणि मनुष्यें एवढयांतच बुद्धि दिसून येते; पण जग एवढया उत्क्रांतावस्थेस येण्यास कोट्यवधि वर्षांचा काळ लागलेला आहे. याकरितां ज्या अपक्रांत स्थितींतून हें विश्व निर्माण झालें ती स्थिति ईश्वररूपाचीच अपक्रांति होय हें तुमचें म्हणणें चुकीचें दिसतें असें उत्क्रांतिवादी आह्मांस म्हणतील; पण त्यांच्या या आक्षेपांत फारसा अर्थ नाहीं हें आपल्या विचारसरणीवरून आपणास स्पष्ट दाखवितां येण्यासारखें आहे. झाड बीजांतून निर्माण होतें आणि बीजांत पुन्हां परत जातें. आरंभ आणि शेवट या दोहीचें रूप एकच आहे. आपल्या कारणांतून पृथ्वी निर्माण होते आणि त्याच कारणरूपास पुन्हां परत जाते. यावरून आरंभ काय आहे हे आपणास समजलें तर अंत कोठें होणार हेंही आपणास निश्चित करतां येईल. याच्या उलट अंत कसा होतो हें आपणास समजलें तर आरंभ कसा झाला असेल हेही आपणास सांगतां येईल. आतां ही सारी विश्वरचना कशी अस्तित्वांत आली तें पहा. अणुप्रमाण रूपांतून पूर्ण स्वरूपाचा मनुष्य प्राणी निर्माण झाला. विश्वाच्या एका टोंकाला अणु असून दुसऱ्या टोंकाला मनुष्यप्राणी आहे. आरंभीं अणु पाहून त्याच दिशेनें आपण पुढें गेलों तर अखेरच्या टोंकास मनुष्यप्राणी आढळतो. याकरितां आरंभींचा अणु हा पूर्वीच्या मनुष्याचें अथवा बुद्धितत्त्वाचें अप-क्रांत रूप असला पाहिजे हें उघड आहे. अणुप्रमाण स्थितींत त्या बुद्धीचें स्वरूप आपणास गोचर होणार नाहीं तथापि अणुप्रमाण धारण करणारें बुद्धितत्त्वच अधिक अधिक विकसत जात असून मनुष्यत्वाकडे ह्मणजे बुद्धीच्या पूर्ण स्पष्टत्वाकडे तें प्रवास करीत आहे. कोणत्याही यंत्राकडून कांहीं क्रिया आपणास करवून घ्यावयाची असेल तर तें क्रियासामर्थ्य यंत्राच्या ठिकाणीं आपण घातल्यावांचून त्याजकडून ती क्रिया करून घेतां

यावयाची नाहीं. एखाद्या एंजिनांत जें सामर्थ्य आपण घातलें असेल तेवढेंच त्याच्या क्रियाशक्तींत स्पष्टत्वास येईल. त्याहून अधिक अथवा उणें सामर्थ्य त्यांत येणार नाहीं. आतां जें जें कर्म मी करतों त्याचा प्रवेश बीजरूपानें माझ्या ठिकाणीं मीं पूर्वीच केला होता. हें मी करण्यासाठीं जी क्रियाशक्ति लागते ती हवा, अन्न आणि इतर वस्तु यांच्या द्वारें माझ्या ठिकाणीं मीं पूर्वींच सांठविली होती. माझ्या ठिकाणीं ती ज्या स्वरूपांत होती तें स्वरूप मीं बदललें कीं ती क्रियेच्या रूपानें स्पष्टत्वास येते. अशा रीतीनें सांठविलेली क्रियाशक्ति क्रियेच्या रूपानें सर्वत्र स्पष्ट होत आहे. या विश्वांतील समवायी क्रियाशक्तीस एखाद्या तोळ्याचीही भर घालण्याचें सामर्थ्य आपणास नाहीं, अथवा तिच्यांत तोळ्याची उणीवही आपणास करतां येणार नाहीं. हा सिद्धांत खरा असेल तर बुद्धि म्हणजे काय याचाही विचार केला पाहिजे. पूर्वींच्या अणुस्थितींत बुद्धि नव्हती हें उत्क्रांतिवाद्यांचें म्हणणें खरें असेल तर ती अचानकपणें कोठून तरी आली असली पाहिजे; म्हणजे अभावांतून भाव उत्पन्न झाला असें त्याचें ह्मणणें आहे. हें म्हणणें चुकीचें आहे हे उघडच आहे. याकरितां ईश्वरत्वापर्यंत पोहोंचलेला मनुष्य, गुणातीत मनुष्य अथवा सृष्टीच्या मर्यादेपलीकडे गेलेला मनुष्य हा अणुप्रमाण स्थितींतूनच निर्माण झाला असला पाहिजे व ती अणुस्थितीही या पूर्णावताराचें अपक्रांत रूपच असले पाहिजे हा सिद्धांत पूर्णपणें खरा ठरतो.

हीच विचारसरणी साऱ्या विश्वास लागू केली तर त्याचें मूळ कारण बुद्धि हेंच असलें पाहिजे असें आपल्या लक्ष्यांत येईल. या विश्वाची अत्यंत पूर्णावस्था झाली तर ती कशी असेल असें आपणास वाटतें ? अशा स्थितींत बुद्धीचें पूर्ण रूप तेथें असेल असें सहजच आपल्या मनांत येतें. त्या ठिकाणीं बुद्धीचा पूर्ण विकास नजरेस येईल. विश्वाचा शेवट जर बुद्धीच्या पूर्ण स्वरूपांत असेल तर त्याचा आरंभही बुद्धींतच असला पाहिजे हें उघड आहे. विश्वाच्या आरंभीं ही बुद्धि अपक्रांत स्थितींत होती आणि विश्वाच्या अखेरीस ती पूर्ण उत्क्रांत रूपांत असते. विश्वांत बुद्धीचें जें कांहीं समवायी रूप आहे तें या मूळच्या अपक्रांत रूपाचें उत्क्रांत रूप आहे. याच समवायी बुद्धिरूपाला आपण परमेश्वर असें म्हणतों. याला वाटेल तर दुसरें नांव द्या, पण मुख्य मुद्दा इतकाच कीं विश्वाच्या आरंभीं पूर्ण बुद्धिरूपच असलें पाहिजे.

हें बुद्धिरूप अपक्रांत अथवा अव्यक्त स्थितींत असतें आणि नंतर उत्क्रांत होत होत त्याचा शेवट बुद्धासारख्या अथवा ख्रिस्तासारख्या अवतारी पुरुषांत होतो. विश्वाच्या अखेरीस आपल्या मूळरूपास तो परत जाऊं लागतो. याकरितांच आपल्या साऱ्यांचा वास परमेश्वराच्या ठिकाणीं आहे असें सर्व धर्मानीं म्हटलें आहे. केवळ परमेश्वरविषयक शब्दावडंबराला भुलूं नका अथवा बुजूनही जाऊं नका. अशा रितीनें नुसत्या शब्दाला तुम्ही भ्यालां तर तत्त्वज्ञ होण्याची तुमची योग्यता नाहीं असें सिद्ध होईल. याच मूळच्या बुद्धिरूपाला परमेश्वरवादी परमेश्वर असें नांव देत असतात.

जुनापुराणा झालेला परमेश्वर हाच शब्द तुम्ही अझून कां योजितां ? असा प्रश्न कित्येक मला विचारीत असतात. या शब्दयोजनेचें कारण इतकेंच कीं आपल्या कार्याला तो शब्द फार उपयुक्त आहे. या एकाच शब्दांत सर्व मानवजातीच्या आशा, आकांक्षा आणि सुख हीं एकवटलीं असल्यामुळें याहून दुसरा अधिक चांगला शब्द आपणास सांपडणार नाहीं. हा शब्द मनुष्यमात्राच्या मनांत इतका पक्का बिंबून गेला आहे कीं तेथून त्याचें उच्चाटन करणें आतां मुळींच शक्य नाहीं. ज्या संतांनीं ही शब्दयोजना पूर्वी केली त्यांनीं तिचा पूर्ण अर्थ लक्ष्यांत घेऊनच ती केली आहे. कालेंकरून हे शब्द सामान्य जनतेच्या हातीं पडतात आणि अज्ञ लोक भलभलत्या अर्थांचा आरोप त्यावर करतात. यामुळें त्यांतलें चैतन्य आणि सौंदर्य नष्ट होतें. ईश्वर हा शब्द अनादिकालापासून प्रचारांत आला आहे आणि विश्वबुद्धि व यासारखेच इतर पवित्र आणि महत्वाचे विचार या शब्दाशीं अनंत काळापासून संलग्न झाले आहेत. कोणीं मूर्खानें ही शब्दयोजना चुकीची ह्मटली ह्मणून आम्हीही ती टाकून द्यावी असें तुमचें म्हणणें आहे काय ? असें झालें तर वाटेचा कोणीही वाटसरू उद्यां उठेल आणि म्हणेल कीं माझी शब्दयोजना चांगली आहे याकरितां ती घ्या. आपण असें करूं लागलों तर साराच गोंधळ उडेल. याकरितां जुनी शब्दयोजना टाकण्याचें कारण आपणास नाहीं. तिच्यांतील वास्तविक मुद्दा दृष्टिआड होऊं देऊं नये आणि तिजवर कांहीं भोळसट कल्पनांचें आवरण आलें असेल तर तें काढून टाकावें म्हणजे झालें. या प्राचीन शब्दयोजनेंत किती गंभीर अर्थ भरला आहे हें पूर्णपणें लक्ष्यांत ठेवा. शब्दाबरोबर कल्पनांचा संयोग किती बेमालूम झालेला असतो हें लक्ष्यांत आणलें

म्हणजे माझें ह्मणणें तुम्हांस बरोबर पटेल. ईश्वर हा शब्द आजपर्यंत कोट्यवधी लोकांनीं मनोभावानें उच्चारिला आहे; आणि विश्वांतील सर्वोत्तमपणा आणि सर्व पावित्र्य या शब्दाशीं त्यांनीं पक्कें जोडलेलें आहे. मनुष्याच्या प्रकृतींत जें जें उत्तम, महत्वाचें आणि उज्ज्वल स्वरूपाचें आहे तें सारें या शब्दांत एकवटलें आहे. याकरितां या एकाच शब्दाच्या उच्चाराबरोबर त्याच्याशीं संलग्न असलेली सारी विचारपरंपरा आपल्या चित्तांत आपोआपच उभी राहते. याकरितां त्याचा त्याग करणें शक्य नाहीं. अनेक प्रकारचा विचार करतां करतां आणि तत्त्वें शोधतां शोधतां अखेरीस याच प्राचीन स्वरूपावर आपला अखेरचा मुक्काम झाला.

विश्वांत जी कांहीं क्रियाशक्ति आहे तीच जडवस्तु, विचार, सामर्थ्य, बुद्धि इत्यादि अनेक रूपांनीं प्रगट झाली आहे आणि याच शक्तीला आपण आदिरूप असें म्हणतों. आपण जें जें कांहीं पाहातों, ऐकतों अथवा ज्याला ज्याला स्पर्श करतों तें सारें त्यानेंच निर्माण केलें आहे अथवा हीच गोष्ट अधिक सशास्त्र भाषेंत बोलावयाची म्हटलें तर तोच इतक्या रूपांनीं नटला आहे असें आपण म्हणूं अथवा याहून अधिक तात्विक भाषा वापरावयाची असेल तर '**सर्वं खल्विदं ब्रह्म**' या लहानशा सूत्रांत तीच गोष्ट सांगतां येते. सूर्य आणि तारे या स्वरूपांनीं तोच प्रकाशत आहे. पृथ्वीही तोच आणि समुद्रही तोच आहे. पर्जन्यधाराही तोच आणि आपण श्वासोच्छ्वास करीत असलेली हवाही तोच. त्याचप्रमाणें आपल्या शरिरांतील क्रियाशक्तिही तोच. शब्दही तोच आहे. तोच वक्ता आणि श्रोताही आहे. तोच प्रकाश आहे. जें कांहीं आहे तें सर्व तोच, विश्वाचें उपादान कारण तोच आणि अप्रत्यक्ष कारणही तोच. तोच अणुप्रमाण स्थितींत जातो आणि पुन्हां विश्वाच्या रूपानें विस्तारतो. विश्वाच्या कोड्याचें उत्तर हेंच. तोच पुरुष आहे आणि स्त्रीही आहे. तोच तरुण आहे आणि कुबड्यांच्या आधारानें चालणारा गलितवपु वृद्धही तोच. मनुष्यबुद्धीला पूर्ण संतोषकारक होणारें असें विश्वाच्या कोड्याचें उत्तर हेंच. थोडक्यांत इतकेंच सांगावयाचें कीं आपण त्यांतूनच निर्माण झालों असून आपला वास त्यांत आहे आणि आपलें पर्यवसानही त्यांतच होणार आहे.

# विश्व.

## २ अंतःसृष्टि.

आपल्या राहत्या शरिराच्या बाहेर पडावें व इंद्रियद्वारा बाह्य विश्वाचें अवलोकन करावें हा जणू काय मानवी मनाचा स्वभाव आहे. डोळयाला पहावेंसें वाटतें. ऐकल्याशिवाय कानांचें चालत नाहीं. बाह्य जगाचा अनुभव घेण्याची इच्छा सर्व इंद्रियांना आहे, आणि बाह्य विश्वाचें सौदर्य व त्याचा उदात्तपणा यांत मनुष्याचें मन एकदम गुंतून जातें हेंही स्वाभाविकच आहे. मानवी मनांत जे प्रश्न प्रथम उभे राहिले ते बाह्य विचारासंबंधीचे होते. आकाश, तारे, पृथ्वी, नद्या, पर्वत, समुद्र इत्यादि सर्व सृष्ट पदार्थांच्या द्वारें विश्वरहस्याचा उलगडा करण्याचा यत्न मानवी मनानें प्रथम केला. अंधारांत चांचपडणारा मनुष्य हातास सांपडेल ती वस्तु जशी बळकट धरतो त्याच-प्रमाणें विश्वाच्या कोडयाचा उलगडा करूं पाहणाऱ्या मानवी मनानें प्रत्येक बाह्य वस्तूचा आधार घेतला. नद्या, आकाश, ढग, पाऊस इत्यादि सर्व पदार्थांच्या देवता सर्व प्राचीन धर्मांत आढळून येतात. विश्वांतील हीं सारीं कामें निरनिराळया देवता करीत असाव्या असा समज आरंभीं होता. आतां याच देवतांऐवजीं आपण विश्वनियमांची योजना केली आहे. विश्वनियमनाच्या ठरींव कायद्यांप्रमाणें या गोष्टी घडून येतात असें आतां आपण ह्मणतों. प्राचीन काळीं इतक्या निरनिराळया देवता मानवी मनानें निर्माण केल्या होत्या; तथापि एवढया कल्पनांनीं मानवी मनाचें कायमचें समाधान होईना; आणि या प्रश्नाला जसजसा अधिक खोलपणा येत गेला तसतसा बाह्य विश्वाचा कोतेपणा अधिक उघडकीस येऊं लागला. मानवी मनाचें कायमचें समाधान होईल असें उत्तर देण्याचें सामर्थ्य बाह्यविश्वांत नाहीं असें हळूहळू दिसून येऊं लागतांच बाह्य विश्वांत भटकणारी मनाची शक्ति अंतर्मुख झाली आणि त्याचें उत्तर जीवात्म्याकडून मिळतें कीं काय हें ती पाहूं लागली. बाह्यविश्वांतून परावृत्त होऊन अंतःसृष्टींत तिनें प्रवेश केला. तिला एकाच कोडयाचें उत्तर हवें होतें तें बाह्यविश्वांत सांपडत नाहीं असें समजल्यानंतर त्याचा शोध ती अंतःसृष्टींत करूं लागली. बाह्यसृष्टीच्या शोधनानंतर अंतःसृष्टीचें शोधन

आणि पृथक्करण ती करूं लागली. ही गोष्ट मानवी मनाच्या संस्कृतीच्या वाढीची निदर्शक आहे. मानवी प्राणी पशूसारख्या अवस्थेंत राहात होता त्या वेळीं अंत:सृष्टीचा विचार त्याच्या मनांत कधींच आला नाहीं; पण संस्कृतीची पायरी वाढती होऊन सृष्टीसंबंधीं त्याची दृष्टि जेव्हां अधिक खोल होते तेव्हां ती अंत:सृष्टीकडे वळली.

या अंत:सृष्टीची रचना कोणत्या प्रकारची आहे हाच विचार आजच्या बैठकींत आपणास करावयाचा आहे. या प्रश्नाइतका मानवी मनाला अगत्याचा दुसरा कोणताच प्रश्न नाहीं. हा प्रश्न सर्व देशांत आणि सर्व कालीं उद्भवलेला आहे. यावरून मानवी मनाला त्याची केवढी आवड आहे हें सहज दिसून येतें. पुष्कळ देशांत लक्षावधि लोकांनीं या प्रश्नाची चर्चा करून त्याचें निश्चित उत्तर काढण्याचा यत्न केला आहे. सत्पुरुष आणि राजे, श्रीमंत आणि भिकारी, साधु आणि भोंदू; स्त्री आणि पुरुष या साऱ्यांनीं या प्रश्नाची चर्चा अनंत वेळां केली आहे. शरीर मृत्यु पावल्यानंतर पाठीमागें चिरस्थायी काय राहतें हा प्रश्न सर्व दर्जाच्या लोकांनीं परोपरीनें विचारला आहे. मानवी जीवित क्षणभंगुर आहे हा अनुभव तर साऱ्यांस येतोच; पण या क्षणभंगुराच्या मागें चिरकाल टिकणारें असें कांहींच नाहीं काय ? शरिराच्या मृत्यूनें मरत नाहीं असें कांहींच नाहीं काय ? देहाची माती झाल्यानंतर मागें शिल्लक राहील असें कांहीच नाहीं काय ? अशा अनेक प्रकारांनीं हा एकच प्रश्न पुनःपुन्हां अनेकवार उद्भवला आहे. शरिराच्या मृत्यूनंतर त्याच्या पाठिमागें काहीं चिरकाऊ टिकाऊ वस्तु असेल तर देहाच्या पश्चात् तिचें काय होतें ? ती जाते कोठें ? ती आली होती कोठून ? हे प्रश्न आजपर्यंत अनेकांनीं पुन:पुन्हां विचारिले आणि मानवी सृष्टि जिवंत असेल तोंपर्यंत ते पुन:पुन्हां उद्भवल्याशिवाय राहणार नाहींत. हे प्रश्न पुन:पुन्हां उद्भवतात यावरून त्यांचीं निश्चित उत्तरें अद्यापि मिळालीं नाहींत असें तुह्मांस वाटत असेल तर तसें मात्र नव्हे. हा प्रश्न जेव्हां जेव्हां उद्भवला तेव्हां तेव्हां त्याचें उत्तरही मिळालें आहे आणि काल जसजसा अधिक व्यतीत होत जाईल तसतशी ह्या उत्तराला अधिक बळकटीही येत जाईल. या प्रश्नाचें सपूर्ण समाधानकारक उत्तर हजारों वर्षांपूर्वीं एकदांच मिळालें आहे; आणि जेव्हां जेव्हां हा प्रश्न पुन्हां उपस्थित होतो तेव्हां तेव्हां त्याला तेंच उत्तर पुन्हां

मिळतें. क्वचित् कालानुसारानें त्या उत्तराची मांडणी वेगळी होते, त्याची भाषा बदलते पण उत्तर तेंच. आमच्या बुद्धीला ग्राह्य होईल अशा स्वरूपांत तें मांडण्यांत येतें इतकेंच. आपणालाही तेंच उत्तर आज थोड्या निराळ्या स्वरूपांत द्यावयाचें आहे. या प्रश्नावर कांहीं नवा प्रकाश आह्मी पाडणार आहों असा अहंकार आह्मी मुळींच बाळगीत नाहीं. प्राचीन काळचें जुनें उत्तरच तुह्मांसमोर आज मांडावयाचें आहे. अर्वाचीन भाषेंत प्राचीन उत्तर तुह्मांस द्यावयाचें आहे. तत्त्ववेत्त्यांनीं आपल्या भाषेंत दिलेल्या उत्तराचें भाषांतर, सामान्य लोकांच्या चालू भाषेंत आज करावयाचें आहे. देवदेवतांचे विचार मानवी भाषेंत सांगावयाचे आहेत. परमेश्वराचे विचार दीन दुबळ्या मनुष्याच्या भाषेंत व्यक्त करावयाचे आहेत. सामान्य मानवी मनाला त्यांचें आकलन व्हावें इतकाच विचार आज आह्मांपुढें आहे. ज्या शुद्ध चैतन्यांतून हें उत्तर बाहेर पडलें तेंच शुद्ध चैतन्य प्रत्येक मनुष्याच्या अंतर्यामीं असल्यामुळें त्या विचारांचें आकलन त्याला सहज करतां येईल.

मी तुम्हाकडे पाहात आहें. हा एक देखावा घडून येण्यास किती गोष्टींची जरूर आहे बरें? पहिली वस्तु डोळे ही होय. कारण, मजपाशीं सारीं इंद्रियें असून डोळे मात्र नसतील तर मी तुम्हांस पाहूं शकणार नाहीं. दुसरी वस्तु अंतश्चक्षु अथवा बाह्य करणांचा गोलक. कारण बाहेर दिसणारे डोळे हीं खरीं इंद्रियें नव्हत. हीं अंतश्चक्षूचीं साधनें अथवा करणें मात्र होत. या बाह्य चक्षूंच्या मागें त्यांचे गोलक अथवा अंतश्चक्षु असतात. यांचें स्थल मनुष्याच्या मेंदूंत असतें. या गोलकाला कांहीं कारणानें इजा झाली तर बाह्य डोळे उत्तम स्थितींत असतांही मनुष्याला कांहीं दिसावयाचें नाहीं. सर्व इंद्रियांची गोष्ट अशीच आहे. बाहेर दिसणारे कान मेंदूंतील अंतर्गत गोलकांचीं करणें आहेत. बाह्य आघातांचे तरंग गोलकाकडे पोंचविण्याचें काम हीं साधनें करतात. तथापि एवढया दोन वस्तूंनींच सारें भागलें असें नाहीं. कल्पना करा कीं तुह्मी आपल्या खोलींत एखादें पुस्तक वाचण्यांत अगदीं गढून गेलां आहांत अशा वेळीं घड्याळाचे ठोके पडत असतांही तुह्मांस ते ऐकूं येत नाहींत. बाह्य नादाचें अस्तित्व तेथें होतें. त्या नादाचे स्पंद अथवा तरंग हवेंत उमटले. तुमच्या कर्णरंध्रांच्या द्वारें ते स्पंद आंत शिरले आणि त्यांचा आघात मेंदूंतील गोलकावर झाला आणि इतकें होऊनही तो नाद तुह्मांस

ऐकूं आला नाहीं. येथें उणीव कशाची पडली ? उणीव होती ती तुमच्या मनाची. तुमचें मन तेथें हजर नव्हतें. याकरितां मन हजर असणें हेंही आवश्यक आहे असें आपणास दिसून येईल. गोलकाशीं मनाचा संयोग झालेला नसतो अशा स्थितींत बहिःकरणांनीं आणि गोलकांनी आपलें कार्य योग्य रितीनें बजावलें असतांही बाह्यवस्तूचें ज्ञान आपणास होणार नाहीं; तथापि मन हेंही एक साधनच आहे हेंही लक्ष्यांत ठेविले पाहिजे. गोलकानें आणलेले तरंग बुद्धीला पावते करण्याचें काम मन करतें. बुद्धि ही त्या तरंगांचा निश्चय करते. त्यांचें स्वरूप काय आहे हें ती ठरविते; तथापि एवढ्यानेंही सारें काम भागत नाहीं. बुद्धि आपला निश्चय जीवात्म्याला कळविते. जीवात्मा हा या सर्व करणांचा अधिपति अथवा राजा आहे. या सिंहासनस्थाकडे बुद्धि प्रवेश करते. बरोबर आणलेली वस्तु राजापुढें ती मांडते आणि मग काय करावें अथवा काय न करावें याचा हुकूम महाराजांकडून सुटतो. हा हुकूम पूर्वीच्याच मार्गानें इंद्रियांकडे परत येतो, तो प्रथम बुद्धीला मिळतो, ती तो मनाला पोंचविते. मन त्याला इंद्रियांकडे घेऊन जातें; इंद्रियें त्याला आपापल्या बहिःकरणांकडे पोंचवितात आणि अशा रीतीनें एका वस्तूच्या ज्ञानाचें हें एक वर्तूळ पुरें होतें.

करणें अथवा साधनें हीं मनुष्याच्या बाह्य शरीरावर ह्मणजे जड देहाला असतात; पण मन आणि बुद्धि हीं जड देहावर नसतात. त्यांचा वास मनुष्याच्या लिंग देहांत असतो. लिंगदेह हा जड शरीराहून वेगळा आहे. जड शरीराहून तो फारच सूक्ष्म आहे; तथापि तो जीवात्मा मात्र नव्हे. जीवात्मा या साऱ्यांच्या पलीकडे आहे. जडदेह थोड्याशा वर्षांच्या अवधींत नाश पावतो. एखादें सामान्य कारणही त्याची यंत्ररचना बिघडवितें आणि त्याचा नाश करण्यास तें पुरेसें होतें. लिंगदेह इतक्या सोप्या प्रकारानें नाश पावत नाहीं; तथापि त्याला कधीं उन्नतावस्था तर कधीं अवनतावस्था प्राप्त होत असते. वृद्ध मनुष्यांत मनाची शक्ति कशी क्षीण झालेली असते हें आपण पाहातोंच. शरीर निरोगी आणि जोमदार असतां मन कसें जोमदार असतें, कित्येक औषधांचा आणि अमली पदार्थांचा परिणाम मनावर कसा होतो, बाह्य वस्तूंचे आघात त्याजवर होऊन बाह्य जगावर तें प्रत्याघात कसें करतें याचाही अनुभव आपणास आहेच. शरिराला ज्याप्रमाणें वाढ आणि अवनतावस्था हीं

दोन्ही आहेत त्याचप्रमाणें मनालाही चढ आणि पड हीं आहेत. याकरितां मन ह्मणजे जीवात्मा नव्हे. कारण आत्म्याला उन्नति अथवा अवनती नाहीं आणि तो कधीं नासूनही जात नाहीं. याला पुरावा काय ? या मनाच्या पाठीमागें कशाचें तरी अस्तित्व आहे हें आपणास कसें ठरवितां येईल ? ज्ञान हें स्वप्रकाश आहे. ज्ञान ही वस्तु परप्रकाशानें प्रकाशणारी नव्हे. तिचा प्रकाश स्वतःसिद्ध असून तीच बुद्धीचा पाया आहे. याकरितां तें शरीराप्रमाणें जड असूं शकणार नाहीं. ज्यांत स्वतःसिद्ध चैतन्य आहे अशी कोणतीही जड वस्तु आपल्या पाहण्यांत नाहीं. कोणतीही जड अथवा मृतवस्तु स्वयंप्रकाश नाहीं. बुद्धि सर्व जड वस्तूंना प्रकाशित करते. आपण ज्यांत बसलों आहों त्या दिवाणखान्याचा जन्म बुद्धींतूनच झाला आहे; कारण त्याला बांधणारी बुद्धि अस्तित्वांत नसती तर तोही अस्तित्वांत येताना. आपलें हें शरीर स्वयंप्रकाश नाहीं. जर तें स्वयंप्रकाश असतें तर मृत मनुष्यांतही प्रकाश दिसला असता. त्याचप्रमाणें मन अथवा लिंगदेह हींही स्वयंप्रकाश नाहींत. त्यांच्या ठिकाणीं बुद्धीचा अंश नाहीं. जी वस्तु स्वयंप्रकाश असेल तिच्यांत विघटनेची क्रिया होऊं शकणार नाहीं. परप्रकाश वस्तूंतच प्रकाश येतो आणि जातो. स्वयंप्रकाश वस्तूंत प्रकाश जात येत नसतो. ज्या अर्थी तो प्रकाश उसना आलेला नसतो त्या अर्थी तो जाण्याचेंही कारण नाहीं. त्यांत अधिकउणें कां व्हावें ? चंद्राला वाढत्या आणि उतरत्या कला असतात हें आपण पाहतोंच. कारण सूर्याच्या उसन्या प्रकाशानें तो प्रकाशित असतो. एखादा लोखंडाचा गोळा आगींत घालून लाल तापविला असतां कांहीं काळ तो प्रकाशित दिसतो; पण थोड्याच वेळांत त्याचा प्रकाश नाहींसा होऊन जातो; कारण तो प्रकाश त्यानें अग्नींतून उसना आणला होता. याकरितां जेथें उसना प्रकाश आहे तेथेंच विघटनाही आहे; आणि स्वयंप्रकाश वस्तूंत विघटना नाहीं.

आपला जडदेह अथवा बाह्य शरीर स्वयंप्रकाश नाहीं आणि जें स्वयंप्रकाश नाहीं तें स्वतःला जाणूं शकत नाहीं हें आतां आपल्या लक्ष्यांत आलेंच असेल. हीच गोष्ट मनालाही लागू आहे. मनाला तरी ती लागू कां नसावी ? मनालाही चंद्राप्रमाणें चढत्या उतरत्या कला आहेत. केव्हां बलवान् तर केव्हां दुर्बल अशा स्थितींत तें हेलकावे खात असतें. याचा अनुभव आपणास आहेच. त्याचप्रमाणें बाह्य वस्तूंचा आघातही त्याजवर घडतो

हेंही आपण पाहिलेंच. याकरितां त्यांतून दिसणारा प्रकाश त्याचा स्वतःचा नव्हे हें उघड आहे. तर मग तो प्रकाश कोणाचा? जी वस्तु स्वयंप्रकाश असेल अशा एखाद्या वस्तूचा तो प्रकाश असला पाहिजे हें उघड आहे. स्वयंप्रकाश असल्यामुळें त्या वस्तूंत विघटना होऊं शकत नाहीं अथवा तिला चढत्या उतरत्या कला नाहींत अशा वस्तूचा तो प्रकाश असला पाहिजे. स्वयंप्रकाश वस्तु विघटित होत नाहीं अथवा तिचा नाशही होत नाहीं. ती स्वयंप्रकाश आहे एवढेंच नव्हे तर ती स्वतः प्रकाशरूपच आहे. आत्मा जाणतो असें ह्मणतां येत नाहीं. तर तो स्वयमेव ज्ञान आहे. आत्म्याला अस्तित्व आहे असें नव्हे तर तो स्वयमेव अस्तित्व आहे. आत्मा सुखी असतो असें नव्हे तर तो स्वयमेव आनंद आहे. अमुक मनुष्य सुखी आहे असें ह्मणण्यांत तें सुख उसनें आहे असा गुप्त ध्वनि असतो. अमका ज्ञानी आहे याचा अर्थ त्याचें ज्ञान कोठून तरी बाहेरून आलेलें आहे. हीच गोष्ट अस्तित्वालाही लागू आहे. ज्या ठिकाणीं गुण ह्मणून आहेत त्या ठिकाणीं ते दुसऱ्या कोठून तरी येऊन त्या पदार्थांशीं संलग्न झालेले असतात. आत्म्याची गोष्ट अशी नाहीं. अस्ति, भाति आणि प्रियरूपता हे आत्म्याचे गुण नव्हेत, तर आत्मा अस्ति, भाति आणि प्रियरूप आहे.

आतां या साऱ्या वस्तु आह्मीं गृहीत कां धराव्या? असाही एक प्रश्न येथें उपस्थित होण्याचा संभव आहे. आत्मा सच्चिदानंद आहे आणि हे तीन गुण त्यानें उसने आणलेले नाहींत असें आह्मीं कबूल कां करावें? देह आणि मन हीं जशीं परप्रकाश आहेत, त्याचप्रमाणें आत्म्यानेंही आपला प्रकाश कोठून तरी उसना आणला नसेल कशावरून? या वादपद्धतींत एक दोष आहे तो हा कीं, अशा रीतीनें आपण वाद करूं लागलों तर त्याला शेवट कधींच येणार नाहीं. आत्म्यानें या वस्तु कोठून उसन्या आणल्या? या वस्तूंचा उगम दुसऱ्या एखाद्या वस्तूंत असावा असें आपण ह्मटलें तर त्या उगमाचा उगम कोठें हा एक प्रश्न आलाच. अशा रीतीनें ही प्रश्नमालिका आपण लांबवीत बसलों तर तिची अखेर कोठें होईल? तिची अखेर हीच कीं शेवटीं कोठें तरी एखादी स्वयंप्रकाश वस्तु आपणास कबूल करावी लागेल. मग अशा रीतीनें निष्कारण लांबण लावण्यापेक्षां न्यायपद्धतीस अनुसरून पहिल्याच स्वयंप्रकाश वस्तूवर अखेरचा मुक्काम आपण कां करूं नये?

आवरणरूप बाह्य अथवा जड देह हा सर्वांच्या बाहेर आहे. त्याच्या आंत मन, बुद्धि, चित्त आणि अहंकार अशा चतुष्टयाचा लिंगदेह आहे, आणि या लिंगदेहाच्या मागें मनुष्याचें खरें रूप अथवा आत्मा हा आहे, हें आतां आपल्या लक्ष्यांत आलेंच असेल. त्याचप्रमाणें बाह्य देहाचें सामर्थ्य मनापासून आलें असून मनाचें सामर्थ्य त्याला आत्म्याकडून मिळालेलें आहे हेंही आपल्या ध्यानांत आलें असेलच.

आतां या आत्म्याचें स्वरूप कोणत्या प्रकारचें असावें असा प्रश्न येथें उपस्थित होण्याचा संभव आहे. त्याचें स्वरूप स्वयंप्रकाश व सच्चिदानंदमय असावें असें जें आपण नुकतेंच सिद्ध केलें, तें खरें मानलें तर आत्मा हा कशापासून उत्पन्न झालेला पदार्थ नव्हे, असें म्हणणें ओघानेंच प्राप्त होतें. स्वयंप्रकाश आत्म्याचें अस्तित्व दुसऱ्या कोणत्याही प्रकारच्या अस्तित्वावर अवलंबून नाहीं अथवा त्याची उत्पत्ति दुसऱ्या एखाद्या पदार्थापासून झाली असेंही नाहीं. तो निरंतरचा आहे, तो केव्हां नव्हता असा काळच नाहीं. कारण मूळ आत्म्यालाच जर अस्तित्व नव्हतें तर कालकल्पना तरी कोठून उद्भवती ? कालकल्पना आत्म्याच्या अस्तित्वांत अंतर्भूत होते. ज्या वेळीं आत्म्याच्या शक्तीचें परावर्तन मनावर होतें आणि मनाला विचारशक्ति प्राप्त होते तेव्हांच कालकल्पनाही उद्भवते. जेव्हां आत्मा नसेल तेव्हां विचार असणेंही शक्य नाहीं आणि विचारावांचून कालालाही अवकाश नाहीं. याकरितां आत्मा अमुक काळीं होता ही भाषाच चुकीची आहे. आत्म्याला जन्म नाहीं आणि मरणही नाहीं, अशा प्रकारच्या अनेक स्वरूपांनीं तो भासतो इतकेंच. कमी प्रतीपासून उच्च प्रतीपर्यंत निरनिराळ्या रूपांनीं तो व्यक्त होतो. स्वतःचें दिव्य तेज अशा अनेक रीतींनीं आणि स्वरूपांनीं तो व्यक्तदशेला आणीत आहे. मनाच्या द्वारें शरिरावर आणि शरिराच्या द्वारें बाह्य वस्तूवर आघात करून तो स्वतःचें दिव्यरूप व्यक्त करीत आहे. एक शरीर धारण करून त्याचा उपयोग या कार्याकरितां तो करतो आणि तें शरीर हतबल होऊन उद्दिष्ट कार्य साधीनासें झालें म्हणजे दुसरें शरीर तो धारण करतो. अशा रीतीनें व्यक्तदशेस येण्याची त्याची क्रिया अनंतकाल चालू आहे.

या ठिकाणीं पुनर्जन्माचा प्रश्न उद्भवतो. मनुष्याला पुनर्जन्म आहे कीं नाही या प्रश्नावर पुष्कळ मौजेचे वादविवाद नेहमीं चालू असतात. आत्म्याला

पुनर्जन्म आहे असें म्हटल्याबरोबर कित्येक लोक गांगरून जातात. य बाबींत लोकांचा भोळसरपणा इतका परमावधीला पोंचलेला आहे कीं त्याच परिणाम विचारी लोकांच्या चित्तावरही घडतो. स्वतःची उत्पत्ति शून्यांतू झाली असें ह्मणणारे तत्त्ववेत्तेही न्यायपद्धतीच्या मोठमोठ्या कोटया लढवू आपण पुन्हां शून्यरूपांत परत न जातां पुढें चिरकाल तसेच राहणार आहो असें सिद्ध करूं पाहतात; पण हें ह्मणणें तर्कशास्त्राला आणि युक्तीला क पटेल? ज्याची उत्पत्ति शून्यांतून झाली त्याला शून्यांत परत गेल्यावांचू गत्यंतरच नाहीं. तुह्मी, मी अथवा दुसरा कोणीही शून्यांतून आलेला नाह आणि याकरितां त्या शून्यांत परत जाण्याचें कारणही आपणास नाहीं. आप नव्हतों असा काळच कधीं नव्हता आणि आपला आत्यंतिक नाश होई असाही काळ पुढें कधीं येणार नाहीं. आपणास त्या शून्यांत रवाना करी अथवा आपलें अस्तित्व नाहींसें करील अशी शक्ति या त्रैलोक्यांतच का पण त्याच्यापलीकडेही कोठें अस्तित्वांत नाहीं. पुनर्जन्माची ही कल्प ऐकून तुम्ही घाबरून जाऊं नका. तींत घाबरण्यासारखें कांहीं नाहीं; इतकें नव्हे तर मनुष्याच्या नीतिमय जीवितक्रमासाठीं ती अत्यंत आवश्यक आहे. ती शुद्ध तर्कशास्त्रानें सिद्ध होणारी कल्पना आहे. केवळ बुद्धिगम्‍ मार्गानें तुम्ही चाललां तर हा सिद्धांत अगदीं सरळ मार्गानें आपोआप सि होतो. जर यापुढें तुमचें अस्तित्व निरंतर राहणार असेल तर पूर्वीही तुम्ह निरंतरचेच होतां असें म्हटल्याशिवाय दुसरें गत्यंतरच नाहीं. पुनर्जन्माच्य सिद्धांताविरुद्ध अनेक प्रकारचे आक्षेप ऐकूं येतात. त्यांपैकीं कित्येक अगदीं बालिश असतात असें तुम्हांपैकीं पुष्कळजण ह्मणतील. तथापि स्वतः विचारवंत ह्मणविणारे लोकही असले बालिश आक्षेप घेत असल्यामुळें त्यां उत्तर देणें जरूर आहे. कसलीही मूर्खपणाची कोटी कोणीं उभी केली त तिच्या वतीनें भांडणारे थोडे तरी तत्त्ववेत्ते अवश्य सांपडतात असें कोणी म्हटलें आहे तें अगदीं खरें आहे. पुनर्जन्माविरुद्ध एक आक्षेप असा आ कीं गतजन्माचें स्मरण आपणास कां नाहीं? यावर मीही एक प्रश्न अस विचारतों कीं याच जन्मांतल्या सार्‍या गतगोष्टी तुम्हांस आठवतात काय आईचें दूध तुह्मी पीत होतां त्या वयांत तुम्हीं काय काय कृती केल्या तुह्मांस स्मरतें काय? आपल्या कोंवळ्या बाल्यदशेंतल्या गोष्टीसुद्धां आपण

पैकी कोणासच ठाऊक नाहींत. आपल्या अस्तित्वाच्या खरेपणाबद्दल आपल्या स्मरणशक्तीचीच साक्ष घ्यावयाची असेल तर कोंवळ्या बाल्यदशेंत अथवा त्याच्या आधीं आपणास अस्तित्वच नव्हतें असें म्हणावें लागेल. आपलें अस्तित्व आपल्या आठवणीवर अवलंबून आहे असें म्हणणेंही निर्भेळ मूर्खपणाची परम सीमा आहे. गतकाल आपल्या लक्ष्यांत कां राहावा? ज्या मेंदूवर त्याचें प्रतिबिंब पडलेलें होतें त्या मेंदूचे तुकडे तुकडे होऊन गेले आहेत. तो मेंदू अस्तित्वांतून नाहींसा झाला आहे. आणि त्याच्या जागीं नवा मेंदू आला आहे. या नव्या मेंदूवर जीं कांहीं चित्रें आहेत तीं गतकालाच्या गोष्टींच्या समवायी स्वरूपाचीं आहेत, आणि त्या समुच्चयरूपाबरोबर आपलें मन या नव्या देहांत राहावयास आलें आहे.

आपल्यासमोर उभा असलेला हा मी माझ्या अनेक पूर्वजन्मांचें संकलित रूप आहें. माझ्या अनेक पूर्वजन्मांत मीं जें जें कांहीं केले त्या साऱ्या कर्मांचे परिणाम समुच्चयरूपानें या जन्मीं मजबरोबर आलेले आहेत. आतां माझ्या अनेक पूर्वजन्मांच्या कृत्यांचें सविस्तर स्मरण ठेवण्याचें कारण मला काय आहे? एखादा प्राचीन काळचा महर्षि अथवा तत्त्ववेत्ता एखादी गोष्ट आपणास सांगूं लागला तर त्याची गणना मूर्खांत करण्यास आपण चुकत नाहीं. तेंच हक्स्लेच्या अथवा टिंडालेच्या नांवानें कोणी कांही बरळला तरी तें आपण सत्य मानतों. सत्याची प्रत्यक्ष भेट झालेला प्राचीन तत्त्ववेत्ता आपणाला कुचकामाचा वाटतो, आणि अर्वाचीन शास्त्रवेत्त्यांनीं कांहीं ह्मटलें तरी त्याजबद्दल कांहीं प्रमाण न मागतां आपण आंधळ्यासारखे त्याजवर विश्वास ठेवतों. प्राचीन तत्त्ववेत्त्यांनीं सांगितलेल्या गोष्टी खऱ्या मानणें याला आपण अंधश्रद्धा अथवा भोळा विश्वास समजतों, पण अर्वाचीन शास्त्रवेत्त्यांचे सिद्धांत तितक्याच अंधश्रद्धेनें ग्रहण करण्यास आपणास यत्किंचितही दिक्कत वाटत नाहीं. पोप म्हणेल तो धर्म ही समजूत प्राचीन काळीं होती. ती आतां जाऊन तिच्याजागीं अर्वाचीन भौतिक शास्त्री म्हणतील तो धर्म ही समजूत आली आहे. एका जातीचा आंधळेपणा गेला आणि त्याजागीं दुसऱ्या जातीचा आला, एवढाच फरक. असो; मला पूर्वजन्मींची आठवण नाहीं यावरून मला पूर्वजन्म नव्हता हा आक्षेप निरर्थक आहे, हें आपणास आतां समजलें असेलच. हाच आक्षेप विशेष महत्त्वाचा होता. पूर्वजन्माच्या सिद्धीसाठीं पूर्व-

स्मरणाची आवश्यकता आहेच असें नाहीं, तथापि कारणपरत्वें अशा गत-जन्मींच्या गोष्टींचें स्मरणही होतें असें सिद्ध करण्याजोगीं उदाहरणें सांपडतात. फार काय, पण आपण खटपट केली तर आपणासही पूर्वजन्माचें स्मरण पुन्हां ताजें करतां येईल; पण असें होण्यास जीवन्मुक्ताच्या पायरीपर्यंत तुम्हांस पोंचलें पाहिजे. अशा स्थितींत जग हें निव्वळ स्वप्नरूप आहे असा अनुभव तुह्मांस येईल. आपण केवळ नट असून या जगद्रूपी रंगभूमीवर सोंग घेऊन नाचत आहों असें तुह्मांस तेव्हां कळून येईल. जगाच्या व्यवहारांत आज आपण पूर्णपणें गढून गेलेले आहों. अलिप्तपणा ह्मणजे काय याचा अनुभव आतां सांगितलेल्या स्थितींत तुह्मांस येईल. अशा स्थितींत तुमचे डोळे खाडकन् उघडतील. अशा स्थितींत आजची सुखलोलुपता, जीवनाची आशा आणि लौकिकाची दृष्टि हीं सारीं पार नाहींशीं होतील आणि पुन्हां केव्हांही तीं परत येणार नाहींत. अशा स्थितींत या जगाचे फेरे किती झाले, किती कोटयवधी आईबाप तुम्हांस होऊन गेले, किती कोटयवधी मुलेंबाळें तुह्मी प्रसवलां आणि किती कोटयवधी वेळां तुह्मी श्रीमंत व भिकारी झालां हेंही तुह्मांस स्पष्ट दिसेल. लाटेच्या अत्युच्च शिखरावर कित्येक वेळां तुह्मी आरूढ झालां असाल आणि निराशेच्या खोल डोहाच्या तळीं कित्येक वेळां तुह्मी बुडालां असाल. या साऱ्या गोष्टींचें स्मरण तुमच्यासमोर अशा स्थितींत मूर्तिमंत उभें राहील आणि अशा वस्तूच्या भेसुरपणानें तुमचें हृदय यत्किंचितही डगमगणार नाहीं. अशा स्थितींत जगानें तुह्मांवर डोळे वटारले तरी त्याकडे पाहून तुह्मी नुसते हंसाल. अशा स्थितींत प्रत्यक्ष मृत्यु तुमच्यासमोर उभा राहिला तरी तुह्मी त्याला ह्मणाल, " जा, तुझी मला काय पर्वा आहे ?" ही स्थिति आपणा सर्वांस येणार आहे.

केवळ बुद्धिगम्य मार्गानें जाणारे लोक असाही एक प्रश्न येथें उपस्थित करतील कीं पुनर्जन्माच्या या उपपत्तीला पुष्टि देणारा आणि विवेचक बुद्धीस पटणारा असा पुरावा तुह्मांपाशीं आहे काय ? आतांपर्यंत केलेलें विवेचन निषेधात्मक स्वरूपाचें होतें–विरुद्ध मतवाद्यांनीं घेतलेले आक्षेप खरे नसून अप्रमाण आहेत तेवढेंच आपण दाखविलें; पण आपली विध्यर्थी बाजू आपण अद्यापि पुढें मांडलेली नाहीं. असा कांहीं पुरावा आपणापाशीं आहे काय ? होय, अवश्य आहे; आणि तोही अगदीं निश्चित रूपाचा आहे. निरनिराळ्या मनुष्यांतील

ज्ञानसंपादन करण्याच्या सामर्थ्यात जो फरक आपणास आढळून येतो त्याचें कारण पुनर्जन्माचा सिद्धांत गृहीत केल्यावांचून सांगतांच येणार नाहीं. ज्ञान कसें संपादन केलें जातें याचा विचार आपण प्रथम करूं. अशी कल्पना करा कीं, मीं रस्त्यांत गेलों आणि तेथें एक कुत्रा पाहिला. हा कुत्रा आहे हें ज्ञान मला कसें होतें? एका प्राण्याच्या आकाराची छाया नेत्रांच्या द्वारें माझ्या दृगिंद्रियाकडे गेली. तेथून तिचा प्रवेश माझ्या मनांत झाला. या ठिकाणीं माझ्या पूर्वानुभवाचे अनेक पदार्थ मीं सांठवून ठेविलेले असतात. या पूर्वपरिचित वस्तूंपैकीं या नव्या आगंतुकाचें साम्य कोणाशीं आहे हें मी ताडून पाहतों. माझ्या मनाला जणूं काय अनंत खण केलेले असून त्या प्रत्येकांत एक एक वस्तू मीं सांठविली आहे. यांतील एक एक खण उघडून हें साम्य ताडून पाहण्याची क्रिया मी करतों. नव्याचें साम्य या जुन्या वस्तूंपैकीं एखादीशीं मला आढळून आल्याबरोबर ती नवी वस्तु अमुक असा निश्चय करून मी मोकळा होतों. असा निश्चय झाल्याबरोबर माझ्या मनाचें समाधान होतें. असें समाधान होणें याला मी ज्ञान ह्मणतों. तो कुत्रा आहे असें ज्ञान मला होतें याचें कारण हेंच कीं पूर्वी जें तसेंच एक स्वरूप माझ्या मनाच्या खणांत होतें, त्याशीं एका नव्या वस्तूचें तंतोतंत साम्य मला आढळून आलें. ज्या वेळीं अशा प्रकारचें साम्य सारे खण धुंडाळूनही मला कोठें आढळत नाहीं, तेव्हां माझें मन साशंक राहतें आणि त्याचें समाधान होत नाहीं. या साशंक अथवा असमाधान स्थितीला अज्ञान असें नांव आपण दिलें आहे. ज्या वेळीं नव्याजुन्यांत साम्य सांपडून मनाचें समाधान होतें त्या वेळीं त्या स्थितीला आपण ज्ञान ह्मणतों. झाडावरून एक फळ खालीं पडलें; तें वर न जातां खालींच कां पडलें याचें कारण मानवी मनास समजेना, तेव्हां कांहीं काळ तें असंतुष्ट स्थितींत राहिलें. पुढें सर्व फळें खालींच पडतात असा अनुभव त्यास आला, आणि यावरून त्यानें गुरुत्वाकर्षणाचा नियम सिद्ध केला. अशा स्थितींत ज्या वस्तूचा पूर्वानुभव आपणास नसेल त्या वस्तूचें ज्ञान आपणास कधींच व्हावयाचें नाहीं हें सिद्ध होतें. कारण या नव्या वस्तूशीं ताडून पाहण्यास जुन्याची प्रतिमा आपल्या मनाच्या खणांत तयार नसते. मुळांतच तत्सदृश एखादी प्रतिमा नसल्यावर नवी प्रतिमा ताडून पाहण्याचेंही आपणास होणार नाहीं आणि ती नवी वस्तु आपणास अर्थातच अज्ञात राहील.

मूल जन्मास येतें तेव्हां त्याचें मन अगदीं कोऱ्या कागदासारखें स्वच्छ असतें असें कांहीं पाश्चात्य तत्त्ववेत्ते ह्मणतात. या त्यांच्या म्हणण्यांत कांहीं तथ्य असेल तर त्या मुलाला कोणत्याही प्रतीच्या ज्ञानाची प्राप्ति होणें शक्य नाहीं. जुने अनुभव त्याजपाशीं अगोदरच तयार नसले तर नव्यांची तुलना तें कशाशीं करणार? मनुष्यामनुष्यांत या ज्ञानार्जनाच्या बाबतींत भेद आहे. प्रत्येकाची ग्राहकशक्ति वेगळ्या प्रकारची आहे, हें आपणा सर्वांस अनुभवानें माहीत आहेच. जर सारींच मनुष्यें सारखींच कोऱ्या मनानें जन्मास येतीं तर त्यांच्या ग्राहकशक्तींत असा फरक कां दिसता? त्यांच्यांत फरक आहे यावरून प्रत्येकाजवळ त्याच्या अनुभवाचा सांठा वेगवेगळा असतो असें निःसंशय सिद्ध होतें. ज्ञानार्जनाचा मार्ग एकच आहे. तो मार्ग म्हणजे अनुभव. यावांचून दुसरा कोणताही मार्ग आपणास उपलब्ध नाहीं. एखाद्या वस्तूचा अनुभव चालू जीवितांत आपणास झाला नसेल तर पूर्वीच्या एखाद्या जन्मीं तो झाला असला पाहिजे. मृत्यूची भीति सर्वत्र सारखीच कशी आढळून येते? अंड्यांतून नुकतेंच बाहेर पडलेलें कोंबडीचें पोरही ससाण्याला भिऊन आईकडे धांवत जातें. याचें कारण उपजतबुद्धि असें म्हणतात. नुकत्याच जन्मास आलेल्या त्या पिलाला मृत्यूची भीति कां वाटली? बदकाचे अंडें कोंबडीनें उबविलें आणि त्यांतून पिलूं बाहेर पडलें कीं तें ताबडतोब पाण्याकडे धांव घेतें. असें कां होतें? लोक याला उपजतबुद्धि असें नांव देतात. हें नांव मोठें भपकेबाज आहे पण त्यानें आमच्या चित्ताचें समाधान मात्र होत नाहीं. तेवढ्यानें आमच्या माहितींत कांहीं भरही पडत नाहीं. उपजतबुद्धीचें स्वरूप काय आहे याचा विचार आपण आतां करूं. एखादा मनुष्य नुकताच सतार वाजविण्यास शिकत असला तर त्यांतील स्वराचा प्रत्येक पडदा डोळ्यानें त्याला पाहावा लागतो. पुढें हें वाद्य त्याला वाजवितां येऊन कित्येक वर्षांची संवय झाली ह्मणजे तोच मनुष्य डोळे मिटूनही सतार उत्तम वाजवितो. त्याचीं बोटें जणूं काय उपजतबुद्धीनेंच योग्य पडद्यांवरून फिरतात. आरंभींच्या आणि अखेरच्या त्याच्या बुद्धीच्या स्थितींत एवढा फरक कसा पडला? आपण कोणता पडदा दाबीत आहों याची जाणीव आपल्या बुद्धींत आरंभीं तो करून घेत असे. अखेरीच्या स्थितींत अशाप्रकारचे जाणिवेचे श्रम बुद्धीला देण्याचें कारण पुढें त्याला पडेनासें झालें.

त्याच्या जाणिवेच्या बुद्धीचें रूपांतर अखेरीस उपजतबुद्धींत झालें. आपल्या देहांत चालणारी प्रत्येक क्रिया वस्तुतः अशाच स्वरूपाची आहे. आपल्या देहांतील अनेक क्रिया आज उपजतबुद्धीनें चालत आहेत तथापि प्रयत्नानें त्यांचीही जाणीव आपणास करून घेतां येईल. आपल्या शरिरांतील प्रत्येक स्नायू आपल्या बुद्धीच्या हुकमतींत आपणास आणतां येईल, ही गोष्ट आतां सर्वांस ठाऊक झाली आहे. यावरून असें सिद्ध होतें कीं जिला आपण सांप्रत उपजतबुद्धि या नांवानें ओळखतों ती उपजतबुद्धि आपल्या जाणिवेच्या बुद्धीचें अवनतरूप होय. हाच नियम सर्व सृष्टींत सारखाच लागू आहे. मनुष्यांतील उपजत बुद्धि अथवा पशूंची उपजत बुद्धि हें मूळच्या इच्छाशक्तीचें अवनत रूप आहे.

सांप्रत दिसत असलेलें कोणतेंही अवनतरूप मूळच्या उच्चरूपाचें अपभ्रष्ट रूप आहे आणि सांप्रतचें प्रत्येक उन्नतरूप अवनतरूपाचें उच्चस्वरूप आहे, ही गोष्ट पूर्वी एकवार आपण सिद्ध केली आहेच. तो नियम आजच्या या प्रश्नांत आपण लागू केला तर उपजतबुद्धि हें विवेचकबुद्धीचें अवनतरूप आहे हें निराळें सिद्ध करावयास नको. पशूंत अथवा मनुष्यांत जी उपजतबुद्धि आपणास आढळून येते, त्या बुद्धीच्या द्वारें त्यांजकडून आज घडणारीं कर्में पूर्वी त्यांनीं विवेचकबुद्धीच्या साहाय्यानें अनेकवार केलीं असलीं पाहिजेत हा सिद्धांत आपल्या लक्ष्यांत आतां आला असेलच. कोणतेंही कर्म विवेचकबुद्धीच्या साहाय्यानें ह्मणजे जाणूनबुजून करावयाचें असेल, तर पूर्वानुभवावांचून तें करतां येणें शक्यच नाहीं. पूर्वानुभवानें ज्ञान जागृत केलें आणि तें ज्ञान कृतीच्या रूपानें व्यक्तदशेस आलें. बदकाच्या पोरानें उपजतांच पाण्याकडे धांव घ्यावी अशा प्रकारचीं जीं उपजतबुद्धीचीं कृत्यें मनुष्यांत अथवा पशूंत आपणास आढळून येतात तीं त्यांच्या पूर्वानुभवांचीं फळें होत. येथपर्यंतचें विवेचन आपल्या लक्ष्यांत चांगलें आलें असेल आणि या विवेचनांत ज्या गोष्टी आपण सिद्ध केल्या त्यांस अगदीं अलीकडल्या शास्त्रीय शोधांचाही पाठिंबा आहे; पण येथें एक नवी अडचण उपस्थित होते. प्राचीन काळच्या मंत्रद्रष्टयांनीं जे कांहीं सिद्धांत प्रस्थापित केले आहेत, त्यांजकडेच अर्वाचीन भौतिक शास्त्रें हळूहळू येत आहेत आणि येथपर्यंत त्या दोहोंत विचारसंगति ठीक आहे. प्रत्येक मनुष्य आणि प्रत्येक प्राणी जन्म-

तःच पूर्वानुभवाचा सांठा बरोबर घेऊन येतो आणि याच पूर्वानुभवास अनुसरून त्याच्या हल्लींच्या कृती घडत असतात, ही गोष्ट अर्वाचीन शास्त्रानें मान्य केली आहे; पण अर्वाचीन शास्त्रें येथें असा एक प्रश्न उपस्थित करतात कीं हे पूर्वानुभव जीवात्म्याबरोबर आहेत आणि देहाबरोबर नाहींत असें ह्मणण्यास काय आधार आहे ? ते अनुभव देहाचे आहेत असें निश्चयानें ह्मणण्यास काय प्रत्यवाय आहे ? ते आनुवंशिक संस्कारानें पिढयानपिढया चालत येतात असें आह्मीं कां ह्मणूं नये ? माझ्या ठिकाणीं जे कांहीं पूर्वानुभव आज आहेत तो सर्व संग्रह माझ्या पूर्वजांचा असून या देहदानाबरोबर हा अनुभवसंग्रहही त्यांनींच मला दिला असें ह्मणण्यास कोणती हरकत आहे ? अर्वाचीन शास्त्र्यांचा हा अखेरचा प्रश्न आहे. मी अत्यंत क्षुद्र प्राणी होतों तेव्हांपासून उत्क्रांत होत होत मानवी स्वरूपापर्यंत जो अनुभवांचा सांठा मजपाशीं उत्पन्न झाला तो प्रत्येक देहाबरोबर त्या त्या वंशाच्या पूर्वजांनीं मला दिला आणि अशा रीतीनें हा अनुभवसंग्रह वारसदारीच्या नात्यानें मजकडे आला आहे असें अर्वाचीन पंडितांचें ह्मणणें आहे. या त्यांच्या ह्मणण्यांत अडचण कोठें आहे ? हा प्रश्न खरोखरच फार मुद्देसूद आहे आणि आनुवंशिक संस्कार मनुष्याला प्राप्त होतात या मतांत कांहीं ग्राह्यांश आहे हेंही आह्मी कबूल करतों. हा ग्राह्यांश किती ? तो जड पदार्थ पुरविण्यापुरता. या देहांत जीं कांहीं कृत्यें आपण करीत असतों तीं पुढील जन्मीं फलद्रूप होण्यासाठीं विशिष्ट प्रकारच्या शरिराची अपेक्षा असते. पुढील देह जणूं काय या जन्मीं आपण तयार करीत असतों. त्याचा नकाशा या जन्मीं आपण काढतों आणि त्याबरहुकूम पुढें जी रचना आपणास करावयाची असते तिला लागणारा मालमसाला मातापितरांकडून आपणास प्राप्त होतो. आपला जन्म त्यांच्या उदरीं व्हावा अशा प्रकारची तयारी त्यांनींही केलेली असते. आपणास मालमसाला पुरविणाऱ्या आईबापांची जशी अपेक्षा असते, त्याचप्रमाणें अमुक एका विशिष्ट घटनेचा प्राणी आपल्या पोटीं उत्पन्न व्हावा अशी तयारी मातापितरांनीं आपल्या कर्मांनीं केलेली असते. अशा रीतीनें दोन्ही बाजूंनीं झालेली ही तयारी एकत्र झाली ह्मणजे ती फलद्रूप होऊन एक नवा मनुष्यप्राणी जन्मास येतो.

आनुवंशिक संस्कारांत विचारसंक्रमणही होतें ही गोष्ट अर्वाचीन पंडितांनीं योग्य पुराव्यावांचून गृहीत केली आहे. एकाचे मानसिक संस्कार दुसऱ्याच्या

जडदेहाबरोबर जावे असें होण्यास त्या मानसिक विचारांचें रूपांतर जड-रूपांत झालें पाहिजे हें उघड आहे. अशा रीतीनें सूक्ष्माचें रूपांतर जडांत होतें कीं काय हा प्रश्न आहे आणि याची सिद्धि अद्यापि कोणी केलेली नाहीं. असें असतां असें रूपांतर होऊं शकतें असें अर्वाचीन शास्त्री प्रमाणा-वांचून खरें मानतात. मी तुह्मांकडे पाहतों तेव्हां माझ्या मनोरूपी तळ्यावर आघात होऊन एक लाट उठते. कांहीं काळानें ही लाट नाहींशी होते; पण सूक्ष्म अनुभवाच्या रूपानें तिचें सूक्ष्म रूप माझ्या चित्तांत कायम राहतें. जड वस्तूचा ठसा जड वस्तूवर उठेल ही गोष्ट आह्मांस कबूल आहे, पण मानसिक वस्तूचा ठसा जड वस्तूवर राहील असें ह्मणण्यास काय पुरावा आहे? जड देह भस्मीभूत होऊन मृत्तिकेला मिळून जातो मग त्यावर मानसिक ठसे कोठून राहणार? माझ्या अनेक पूर्वजांचे असे अनेक ठसे माझ्या बापाच्या शरिरापर्यंत कसे आले? ते आले असेंही घटकाभर गृहीत धरलें तरी त्यानें ते मला कसे दिले? त्याचें सर्व शरीर माझ्या शरिरांत आलें नाहीं हें तर उघडच आहे. मग बापाच्या देहाबरोबरचे सर्व संस्कार मुलाच्या देहांत कसे येतील? पूर्वीचे सर्व संस्कार अशा रीतीनें बाप मुलाला देतो हें खरें मानलें तर प्रत्येक मुलाच्या वेळीं आईबापांचे बरेचसे संस्कार कमी होत असले पाहिजेत. ह्मणजे एखाद्याला बरीचशीं मुलें झालीं तर त्या वेळीं त्याचें मन केवळ शून्यवत् बनेल. असें केव्हां तरी होत असल्याचा अनुभव आपणास आहे काय?

अनंतकालीं अनंतदेह आपण धारण केले आहेत. या साऱ्या जन्मांचे अनंत ठसे आपणाबरोबर आहेत. हे कोणत्या रूपानें आणि देहाच्या कोणत्या जागीं असतात? जड शास्त्रज्ञांनीं या प्रश्नाचें निर्विवाद उत्तर अद्यापि दिलेलें नाहीं आणि हें उत्तर त्यांजकडून येईपर्यंत त्यांचे ह्मणणें पुराव्यावांचून तसेंच गृहीत करणें आह्मांस शक्य नाहीं. येथवर झालेल्या विवेचनावरून पूर्व-जन्मांचे संस्कार देहावर नसून मनावर झालेले असतात हें आपल्या लक्ष्यांत आतां चांगलें आलें असेल. त्याचप्रमाणें जन्म आणि पुनर्जन्म मनाला होतात, आपणास राहावयास योग्य असें शरीर मन तयार करतें आणि हें शरीर बांधण्यास लागणारा योग्य मालमसाला मिळेपर्यंत मन वाट पाहात राहतें, हेंही आपल्या लक्ष्यांत आतां आलें असेलच. हा मालमसाला आनुवंशिक

संस्कारानें पूर्वजांकडून प्राप्त होतो. त्या मालमसाल्यानें तयार होणाऱ्या देहांत जीवात्मा राहावयास येतो आणि अशा रीतीनें शरिरांमागें शरीराचा आश्रय जीवात्मा करीत असतो. आपल्या मनांत येणारा प्रत्येक विचार आणि आपल्या हातून घडणारी प्रत्येक कृति सूक्ष्मरूपानें आपल्या मनांत राहते आणि नव्या शरिरांत जाण्यास तयार होऊन बसते. मीं तुम्हांकडे पाहिल्या-बरोबर जो ठसा माझ्या मनावर उमटला तो हळूहळू सूक्ष्मरूप धारण करतो आणि अखेरीस अत्यंत सूक्ष्म होऊन मनोरूपी तलावाच्या तळाशीं जाऊन बसतो. त्याचा आत्यंतिक नाश केव्हांच होत नाहीं. स्मरणाच्या रूपानें बाहेर पुन्हां उडी मारण्यास तो सदोदित तयार असतो. अशा रीतीनें जे अनेक ठसे मीं माझ्या मनांत जमा करून ठेविले आहेत, ते माझ्या मृत्यूच्या वेळीं समुच्चयशक्तीच्या रूपानें मजबरोबर येतात. येथें या पडलेल्या चेंडूवर आपणापैकीं प्रत्येकानें एक एक टोला मारला तर चेंडू बाहेर जातांना बरो-बर काय घेऊन जाईल ? तो साऱ्या आघातांचा समुच्चयरूप परिणाम आप-णाबरोबर नेईल. या अनेक आघातांचें रूपांतर त्याला मिळणाऱ्या गतींत झालेलें असतें. या आघातापासून जी गती उत्पन्न होते ती त्या चेंडूला या खोलीबाहेर घेऊन जाते. त्या चेंडूला बाहेर जाण्यास मूळ कारण काय झालें ? त्याला मिळालेल्या सर्व आघातांचा जो परिणाम समुच्चयरूपानें त्याजवर झाला, तोच त्याच्या बाहेर जाण्याचें कारण होय. या समवायी परिणामानें त्या चेंडूच्या गतीला तिची दिशा मिळाली. अशाच रीतीनें एका देहपतनानंतर जीवात्म्याच्या गतीला दिशा कोण देतो ? जीं जीं कर्में त्या जीवात्म्यानें केलीं असतील आणि जे जे विचार त्याच्या मनांत आले असतील त्यांचा समवायी परिणाम त्या जीवात्म्याच्या गतीची पुढील दिशा निश्चित करील. नवे अनुभव प्राप्त होण्याकरितां एखाद्या नव्या प्रकारच्या शरिराची अपेक्षा त्या जीवात्म्याच्या कर्मसमुच्चयामुळें उत्पन्न झाली असेल तर ती अपेक्षा पुरी करण्याच्या स्थितींत ह्मणजे त्याला तशा प्रकारचें शरीर देण्याच्या स्थितीत जीं आईबापें असतील त्यांजकडेच तो अवश्य जाईल. नव्या शरिराला लागणारीं जड साधनें पुरविण्याच्या स्थितींत जीं आईबापें असतील त्यांजकडे तो जाईल. अशा रीतीनें तो अनेक शरीरांतरें करील. कांहीं वेळां तो स्वर्गाला जाईल, कांहीं वेळां तो पृथ्वीतलावर पुन्हां परत

येऊन मनुष्यदेह धारण करील अथवा कर्मपरिपाकानें पशुदेहसुद्धां तो घेईल. अशा रीतीनें सर्व प्रकारचे अनुभव प्राप्त होऊन सर्व वर्तुळ पुरें होईपर्यंत तो पुनःपुन्हां जन्म घेत राहील. संपूर्ण अनुभव त्याला प्राप्त झाले म्हणजे आपण कोण याचें ज्ञान त्याला प्राप्त होऊन त्याचें अज्ञान नाहींसें होईल. अज्ञान नाहींसें झालें म्हणजे त्याचें शक्तिमत्व प्रकट होऊन तो पूर्णत्व पावेल. अशा स्थितींत जड शरीरद्वारा कर्मे करण्याची जरुरी त्याला उरणार नाहीं. फार काय, पण मानसादि सूक्ष्मदेहही त्याला धारण करावे लागणार नाहींत. तो स्वतःच्या प्रकाशानें प्रकाशेल. तो मुक्त होऊन जन्ममरणाच्या फेऱ्याबाहेर जाईल.

आतां या विषयासंबंधीं अधिक खुलासा करण्याचें कांहीं कारण आहे असें मला वाटत नाहीं; तथापि पुनर्जन्माच्या उपपत्तीबद्दल आणखीही एक मुद्दा मी तुम्हांस सांगणार आहें. जीवात्मा अखेरीस पूर्णत्व पावून मुक्त होईल असें जर कोणता एखादा सिद्धांत सिद्ध करीत असेल तर तो हाच सिद्धांत होय. आपल्या हातून कांहीं दुष्कर्म घडलें तर त्याचा दोष दुसऱ्या कोणाच्या तरी शिरावर लादावा हा सामान्य मनुष्यस्वभाव आहे; पण पुनर्जन्माची ही उपपत्ति तुह्मीं गृहीत केली तर अशा प्रकारें आपल्या कर्माचा दोष दुसऱ्यावर लादण्याचें कारणच उरणार नाहीं. स्वतःचे दोष स्वतःस दिसत नाहींत. आपले डोळे दुसऱ्या सर्वांच्या डोळ्यांस पाहूं शकतात, पण ते स्वतःस मात्र पाहूं शकत नाहींत. आपल्या दोषांचें खापर दुसऱ्या कोणाच्या तरी माथीं फोडण्याची यत्किंचित् तरी शक्यता आहे, तोंपर्यंत आपले अपराध आपण कबूल करीतच नाहीं. आमचें दौर्बल्य आम्ही लक्ष्यांत घेत नाहीं. आपल्या जीवनक्रमांत कांहीं अधिक उणा प्रकार घडला म्हणजे त्याचा दोष आपण इतर माणसांवर लादूं पाहातों, आणि तसें करणें अगदीं अशक्यच झालें तर अखेरीस परमेश्वर अथवा दैव यांजवर तो दोष लोटण्यास आपण कमी करीत नाहीं; पण दैव म्हणजे तरी काय? दैव हा कोणत्या जातीचा पदार्थ आहे? जसें पेरावें तसें उगवतें हा सृष्टिनियमच आहे. आपणच आपल्या दैवाचे जनक आहोंत. आपण त्याला जसें निर्माण केलें तसें तें झालें. आपल्या सुदैवाबद्दल जशी दुसऱ्या कोणाची स्तुति करावयास नको, तशीच दुर्दैवाबद्दल कोणाची निंदा करण्याचेंही कारण नाहीं. वारा यदृच्छेनें वाहतो. ज्या जहा-

जांचीं शिडें पसरलेलीं असतात तीं जहाजें तो वारा धरतात आणि आपल्या रस्त्यानें पुढें चालूं लागतात; पण ज्यांचीं शिडें गुंडाळून ठेविलेलीं असतील तीं जहाजें वारा वाहत असतांही जागच्या जागीं राहतात यांत नवल काय आहे ? तीं जागच्या जागीं राहिलीं हा दोष त्या वाऱ्याचा आहे काय ? हा दोष त्या दयामय परमेश्वराच्या माथीं मारावयाचा काय ? त्या दयामय जगत्पित्याच्या कृपेचा वारा अहोरात्र अखंड वाहात आहे. तो सत्पुरुषांवरून आणि पाप्यांवरून सारखाच वाहतो. त्याच्या कृपेला केव्हांही ओहोटी लागत नाहीं. अशा स्थितींत आह्मांपैकीं कांहींजण सुखी आणि कांहीं दुःखी असावे यांत त्या परमेश्वराचा काय दोष आहे बरें ? आपल्या सुखदुःखाचे जनक आपणच आहों. परमेश्वराचा सूर्य बलवानाकरितां आणि दुर्बलांकरितां सारखाच प्रकाशतो. हा पापी, हा पुण्यवान्, हा बलवान् हा दुर्बल अशा प्रकारचा भेदभाव परमेश्वरापाशीं नाहीं. त्याच्या कृपेची छाया सर्वांवर सारखीच पसरली आहे. तो सर्वांचाच पिता आहे. आपल्या दृष्टीनें क्षुद्रशा भासणाऱ्या वस्तू सृष्टिकर्त्या परमेश्वरालाही तशाच क्षुद्र दिसतात असें तुह्मांस वाटतें काय ? परमेश्वराबद्दल अशी कल्पना करणें हें आपल्याच क्षुद्रत्वाचें लक्षण होय. आपण सदोदित धडपड करतों आणि सर्वत्र कमीअधिकपणा पाहतों तसेंच परमेश्वरही करीत असेल असें समजणें हें आपलें मूर्खपण होय, हें आपल्या बालबुद्धीचें चिन्ह आहे. अशा प्रकारचीं बालबुद्धीचीं पोरें खेळत असतां परमेश्वर त्यांजकडे शांतपणें पाहत असतो. आपल्या दुष्कृत्यांचें खापर परमेश्वरावर फोडणें अथवा तो एकाला बक्षिस देतो आणि एकाला शिक्षा करतो असें ह्मणून नसता पक्षपात त्याजवर लादणें, हें आपलें मूर्खत्व होय. '**न मे द्वेष्योस्ति न प्रियः**' असें परमेश्वर म्हणतो. त्याच्या अनंतकृपेचा सागर सर्वांस सर्वदा आणि सर्वत्र सारखाच उघडा आहे. कोणत्याही परिस्थितीनें त्यांत कांहीं फरक होत नाहीं. त्याचा उपयोग कसा करून घ्यावयाचा हें आपल्याच कर्तबगारीवर अवलंबून आहे. याकरितां आपल्या दुःखाचें मूळ दुसऱ्या कोणा मनुष्यांत, परमेश्वरांत, दैवांत अथवा जगांतील दुसऱ्या कोणत्याही वस्तूंत शोधूं नका. आपणास दुःख प्राप्त झालें तर आपल्याच दुष्कृतींचा तो परिपाक आहे हें जाणून सावध व्हा आणि सत्कर्म आचरूं लागा.

आपणांतील कांहीं सुखी कां आणि कांहीं दुःखी कां या प्रश्नाचें उत्तर हें आहे. आपल्या दुःखाबद्दल दुसऱ्यावर दोष लादूं पाहाणारे लोक बहुधा निर्बुद्ध असून स्वतःच्याच दोषांनीं आपणावर ते दुःखें ओढून घेत असतात. आपल्या दुःखाबद्दल इतरांस त्यांनीं कितीही दोष दिला तरी त्यांची स्थिति कशी सुधारणार ? लोकांला दोष देणें हा आपली स्थिति सुधारण्याचा मार्ग नव्हे. सांप्रत दुर्दैवाची गोष्ट ही कीं अशा प्रकारच्या निर्बुद्ध लोकांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. आपल्या अपराधांचा दोष दुसऱ्यांच्या पदरीं बांधल्यानें आपण अधिकाधिक दुर्बळ मात्र होत जातों. याकरितां दुसऱ्या कोणालाही बोल न लावतां तुम्ही आपले अपराध कबूल करा आणि स्वतः कर्तबगारी करून सुखाची परिस्थिति उत्पन्न करा. आपल्या शिरावरील बोजा दुसऱ्यावर लादण्यापासून तुह्मांस काडीचाही फायदा होणार नाहीं. कोणतेंही दुःख तुह्मांस प्राप्त झालें तर त्याचे कर्ते तुह्मीच आहां हें ओळखून त्याच्या निरसनासाठीं तुम्हांसच कंबर बांधिली पाहिजे. जें तुम्हीं निर्माण केलें त्याचा नाश तुम्हीच करूं शकाल. दुसऱ्या कोणीं निर्माण केलेल्या वस्तूचा नाश तुम्हांस करतां येणार नाहीं. त्याचप्रमाणें तुमच्या वस्तूचा नाश दुसऱ्या कोणाच्यानें होणार नाहीं. याकरितां ताठ उभे राहून धीटपणें दुःखाला तोंड द्या. अशा प्रसंगीं आपलें मन दुर्बळ होऊं देऊं नका. आपल्या दैवाचे मालक आपण आहों हें पक्कें लक्ष्यांत ठेवून आपल्या कृत्यांची जबाबदारी दुसऱ्याच्या शिरावर तुम्ही टाकूं नका. तुम्हांला या कामीं मदतीची अपेक्षा लागली तर ती मदत तुमच्या अंतरंगांतूनच तुम्हांस प्राप्त होईल. तुमचा भविष्यत्काल तुमच्याच हातीं आहे. तुम्ही घडवाल तसा तो होईल. मागें झालें तें आतां होऊन गेलें. त्याचा अधिक विचार करून व्यर्थ शीण करून घेण्यांत काय फायदा आहे ? अनंत भविष्यत्काल तुह्मांपुढें आहे. तुमचा प्रत्येक शब्द, प्रत्येक विचार आणि तुमचें प्रत्येक कृत्य हीं तुमचा भावी खजिना निर्माण करीत असतात हें नित्य ध्यानांत ठेवा. तुम्ही मनांत आणलेला प्रत्येक दुष्ट विचार आणि तुमचें प्रत्येक दुष्ट कृत्य हीं वाघासारखीं छपून तुमच्यावर अचानक घाला केव्हां घालतील याचा नेम नाहीं. त्याचप्रमाणें तुमचे सद्विचार आणखी तुमचीं सत्कृत्यें हीं तुमच्या आंगीं एवढें बळ निर्माण करतील कीं हजारों देवदेवतांच्यानें तसें बळ तुह्मांस देववणार नाहीं.

# १२
# अमरत्व.

जीवात्मा अमर आहे काय ? या प्रश्नाची चर्चा आजपर्यंत जितक्या वेळां झाली आहे तितक्या वेळां ती दुसऱ्या कोणत्याच प्रश्नाची झालेली नाहीं. याच प्रश्नाच्या उत्तरासाठीं मनुष्य सारें विश्व जितकें धुंडाळतो तितकें दुसऱ्या कोणत्याही वस्तूकरितां तें तो धुंडाळीत नाहीं. मनुष्याच्या अंतःकरणाला या प्रश्नाइतका आवडता दुसरा एकही विषय नाहीं. आपल्या जीविताशीं हा प्रश्न जितका बद्ध झालेला आहे तितका दुसरा कोणताही विषय त्याशीं बद्ध झालेला नाहीं. या प्रश्नावर कवींनीं काव्यें लिहिलीं, ऋषींनीं याची वाटाघाट केली आणि लहानमोठ्या दर्जाच्या अनेक धर्मवीरांनीं याचा ऊहापोह केला. तक्ताधिपती राजांनीं जशी याची चर्चा केली त्याचप्रमाणें रस्तोरस्तीं भटकणाऱ्या कंगालांनींही त्यावर भवति न भवति केली. मानववंशवृक्षाचा केवळ मोहोर अशा सज्जनांनीं या प्रश्नाकडे पाहिलें आणि मानववंशाला केवळ लांच्छनास्पद होणाऱ्या नरपशूंनींही याच्या उत्तराकडे आशेनें डोळे लाविले. अशा रितीनें याची इतकी चर्चा झाली तरी त्याजबद्दलचें कुतूहल अद्यापिही नष्ट झालेलें नाहीं आणि मनुष्यस्वभाव आज आहे तसा कायम राहील तोंवर तें कुतूहल नष्ट होणारही नाहीं. अनेक प्रकारच्या पुरुषांनीं या प्रश्नाचीं अनेक प्रकारचीं उत्तरें आपापल्यापरी दिलीं आहेत. मध्यंतरीं हा प्रश्न कांहीं काळ मागें पडल्यासारखा दिसला तरी पुनःपुन्हां नव्या दमानें तो पुढें येतो आणि पहिल्या इतकाच तो ताजा असतो. आपल्या जीवनक्रमांतील अहमहमिकेंत आणि खळबळींत याचा विसर आपणास पडल्यासारखा केव्हां केव्हां दिसतो आणि इतक्यांत आपला एखादा अत्यंत प्रिय मनुष्य काळाच्या भक्ष्यस्थानीं पडतो. अशा वेळीं आपली मोठी हानी झाल्यासारखें आपणास वाटतें. आपलें अंतःकरण शोकानें वितळून जातें. आजूबाजूची जगत्प्रपंचाची गडबड आणि धडपड हीं क्षणमात्र थंडावतात आणि आपल्या अंतःकरणांत एक मंदध्वनि उमटतो. "आतां पुढें काय? आतां माझ्या या इष्टाच्या आत्म्याचें काय होणार?" हा तो ध्वनि होय. अनुभव हा आपल्या साऱ्या ज्ञानाचें मूळ आहे. अनुभवावांचून कसलेंच ज्ञान आपणास होऊं शकत नाहीं. आपली विवेचक बुद्धि पूर्वानुभवाच्या

पायावरच उभारली गेली आहे. अनेक प्रकारच्या पूर्वानुभवाची एकतानता हेंच आपल्या साऱ्या ज्ञानाचें मूळ होय. आपणाभोंवतीं थोडा वेळ आपण नजर फेंकली तर आपणास काय आढळून येतें ? हेंच कीं सर्वत्र घडामोड सुरू आहे. सर्वत्र अदलाबदल होत आहे. बीजांतून झाड बाहेर येतें आणि पुन्हां बीजांत परत जातें. बीजांतून निघून आणि एक वर्तुळ पुरें करून तें पुन्हां बीजरूप होतें. एक प्राणी आज निर्माण होतो. कांहीं काळ या पृथ्वीतलावर तो वास्तव्य करतो आणि मरून जाऊन आपलें वर्तुळ पुरें करतो. हीच गोष्ट मनुष्यालाही लागू आहे. मोठमोठाले पर्वत हळूहळू पण निश्चयानें मृत्तिकेंत मिळत आहेत. प्रचंड नद्या हळूहळू पण निश्चयानें शुष्क होत आहेत. समुद्राच्या पाण्यांतून मेघ निर्माण होतात आणि त्यांचें पुन्हां पाणी होऊन तें समुद्रांत पुन्हां परत जातें. अशा रीतीनें आपापलीं वर्तुळें पुरीं करण्याचा हा उद्योग सर्वत्र अखंड चालू आहे. जन्म, संवर्धन, अस्तित्व आणि मृत्यू हीं ठराविक हिशेबानें एका मागून एक जात येत आहेत. हा सारा अनुभव रोज आपल्या डोळ्यांपुढें ताजा आहे. ज्याला आपण जीवित अशी संज्ञा लावतों त्या या प्रचंड घडामोडीच्या मागें त्या जीवितांतील कोट्यवधी आकारांच्या आणि कोटयवधी भिन्न भिन्न प्रकारांच्या मागें एक प्रकारची एकतानता आहे असें आपणास आढळून येतें. विश्वाच्या या अनेकविध आकारांत जे भेद पक्क्या तटबंदीसारखे आजपर्यंत अभेद्य होऊन बसले होते ते हळूहळू नाहींसे होण्याच्या मार्गास लागल्याचा अनुभव आपणास येत आहे. त्या तटबंदींतील एक एक धोंडा ढांसळून पडत आहे. या सर्वांची उत्पत्ति मूळ एकाच पदार्थातून झालेली आहे असें सिद्ध करण्याच्या मार्गास अर्वाचीन शास्त्रें लागलीं आहेत. हा एकच पदार्थ अनेक आकारांनीं आणि अनेक मार्गांनीं व्यक्त होत असून अनेक मण्यांच्या पोटीं एकाच सूत्रासारखा तो भरून राहिलेला आहे असें अर्वाचीन शास्त्रें सिद्ध करूं पाहात आहेत. अनेक दुव्यांची ही लांबच लांब अशी एक सांखळी आहे असें तीं ठरवूं पाहात आहेत. यालाच अर्वाचीन शास्त्र्यांनीं उत्क्रांति असें नांव दिलें आहे. ही कल्पना अत्यंत पुरातन आहे. मनुष्यप्राण्याच्या जन्माइतकीच ती जुनी आहे. फरक इतकाच कीं मनुष्याच्या ज्ञानांत जों जों भर पडत आहे तों तों या मूळ कल्पनेला अधिकाधिक नवें आणि जोमदार

स्वरूप प्राप्त होत आहे. प्राचीन शास्त्रें आणि अर्वाचीन शास्त्रें यांच्या मतां
या बाबतींत एक फरक आहे. उत्क्रमणावस्थेच्या बाबतींत प्राचीनांना ज
एक गोष्ट समजली होती ती अर्वाचीनांना अद्यापि पुरीशी समजल्याचें दिस
नाहीं. ती गोष्ट अपक्रांति ही होय. बीजाचा वृक्ष होतो; पण वाळूच्या कणांच
वृक्ष कधींही होत नाहीं. कारण आणि कार्य हीं एकस्वभाव असावीं लागतात
बापाचा मुलगा होतो पण मातीच्या गोळ्याचें रूपांतर मुलांत होत नाहीं. ह
उत्क्रमणावस्था कशांतून निर्माण होते हा एक महत्वाचा प्रश्न आहे. बीजा
मूळ स्वरूप काय होतें? वृक्षाचें जें मूळरूप तेंच बीजाचेंही रूप होतें. वृक्षाच्य
ठिकाणीं ज्या ज्या वस्तु प्रत्यक्ष आढळून येतात त्या साऱ्या वस्तु सूक्ष्मरूपा
बीजाच्या ठिकाणीं होत्या. स्तनपान करणाऱ्या अगदीं लहान मुलाच्या ठिकाण
मोठेपणीं निर्माण होणारे सारे गुण बीजरूपानें असतात. भविष्यत्कालीं मो
रूप धारण करणाऱ्या प्रत्येक जंतूंत मोठेपणाचे सारे गुण सूक्ष्मरूपानें अस
तात. या वस्तुस्थितीचा अर्थ काय? या वस्तुस्थितीला प्राचीन हिंदु तत्त्व
ज्ञांनीं अपक्रांति असें नांव दिलें आहे. प्रत्येक उत्क्रांत स्थितीच्या मागें अप
क्रांति अवश्य असतेच. जे गुण उत्क्रांत स्वरूपांत आढळून येतात ते सूक्ष्मा
वस्थेंत बीजरूपानें नसतील तर उत्क्रमणावस्थेंत ते नवे उत्पन्न होणा
नाहींत. त्या पदार्थांची उत्क्रांति होत असतां नव्या गुणांची भर बाहेरू
त्यांत होणारी नाहीं. या ठिकाणीं या उपपत्तीला उपकारक असा एक अर्वा
चीन सिद्धांत आपल्या कामीं येतो. जगांतील सर्व शक्तीचें समवायी रू
सर्वकाल एकसारखेंच असतें ही गोष्ट अर्वाचीन शास्त्रांनीं आपणास सांगि
तलीच आहे. विश्वांतील जड पदार्थ अथवा विश्वांत वावरणारी चैतन्य शक्ति
यांच्यांत अणूभरही अधिकउणेपणा आपणास करतां येणें शक्य नाहीं
जगांतील जड पदार्थांपैकीं एक तोळाभर पदार्थही नाहींसा करणें आपल्य
हातीं नाहीं; अथवा चैतन्यशक्तीपैकींही कांहीं भाग आपणास पूर्ण लुप्त
करतां येणार नाहीं. त्याचप्रमाणें एक तोळाभर अगदीं नव्या अशा जड पदा
र्थांची अथवा चैतन्यशक्तीची भर मुळांत आपणास घालतां येणार नाहीं
अशी वस्तुस्थिति असल्यामुळें उत्क्रमणावस्था ही मूळ शून्यांतून आली असें
हें संभवत नाहीं. अशी गोष्ट होणें शक्यच नाहीं. तर मग ती आली कोठून
ती मूळ अपक्रांत स्थितींतूनच आली असली पाहिजे हें उघड आहे. लहा

मूल म्हणजे काय ? लहान मूल ह्मणजे मोठ्या माणसाची अपक्रांतावस्था. त्याचप्रमाणें मोठा मनुष्य म्हणजे मुलाची उत्क्रांत स्थिति. बीज म्हणजे वृक्षाची अपक्रांतावस्था आणि वृक्ष म्हणजे बीजाची उत्क्रांतावस्था. भावी जीवनक्रमांतील सारे शक्य गुण मूलरूपांत असतात. आतां हा सिद्धांत आपणास अधिकाधिक स्पष्ट होत चालला असेल. अत्यंत क्षुद्र कीटकापासून तों थेट अवतारी पुरुषापर्यंत सर्वांच्या पाठीमागें एकरूप चैतन्यसमुद्र आहे. यामुळें केवळ चैतन्यदृष्टीनें या सर्वांची एकरूपता आहे. आपल्या एकाच मनुष्याचा जीवनक्रम घेतला तर त्यांतही बाल्य, तारुण्य, वार्धक्य इत्यादि अनेक अवस्थांतरें दिसून येतात. अशाच रीतीनें या एकरूप चैतन्यसमुद्रांत दिसून येणारे हे अनेक आकार त्यांतील अवस्थांतरें आहेत. वस्तुतः तें सारें चैतन्यरूप एकच आहे. त्यांत भेद नाहीं. अथपासून इतीपर्यंत ती एकसारखी गुंफलेली अशी सांखळी आहे. प्रत्येक उत्क्रांतस्थितीच्या मुळाशीं अपक्रांतावस्था असते हें आपण नुकतेंच सिद्ध केलें आहे. विश्वांत जितकें सारें जीवित दिसून येतें तें सारें सूक्ष्मांतून उत्क्रांत होत होत अवतारी पुरुषापर्यंत स्पष्ट दशेस येतें. अवतारी पुरुष हीं जणूं काय या पृथ्वीवरील परमेश्वराचीं मूर्तरूपेंच होत. अत्यंत क्षुद्र कीटकापासून तों थेट अवतारी पुरुषापर्यंत विश्वजीवनाची ही एक लांबचलांब सांखळी आहे. हें सारें उत्क्रांतरूप मूळच्या अपक्रांतरूपांतूनच उत्पन्न झालें असलें पाहिजे. ज्या अणूपासून तें उत्क्रांत होत होत अवतारी पुरुषापर्यंत पोहोंचलें त्या अणुरूपांतच त्या साऱ्याचा समावेश पूर्वी केव्हांतरी झाला असला पाहिजे. परमेश्वराचा अवतारसुद्धां त्या बीजरूपांतच सांठविला गेला असला पाहिजे. हें बीजरूप पुढें हळू हळू उत्क्रांत होत होत अवतारी पुरुषापर्यंत स्पष्टत्वास आलें. विश्वजीविताचें आज व्यक्त दिसणारें अत्यंत उच्चरूपही त्या मूळ सूक्ष्मरूपांत गुप्तरूपानें वसत असलें पाहिजे. महत् अथवा समवायी बुद्धीचें मूळ सूक्ष्मरूप उत्क्रांत होत होत आज दिसणाऱ्या स्पष्टदशेस प्राप्त झालें आहे. ही बुद्धि वाढली, अधिक झाली असें मात्र समजूं नये. या वाढण्याच्या आणि अधिक होण्याच्या साऱ्या कल्पना तुह्मी आपल्या चित्तांतून काढून टाका. वाढणें अथवा अधिक होणें अशी कल्पना आपल्या चित्तांत आल्याबरोबर मुळांत बाहेरची कांहीं तरी भर पडली अशी कल्पना

साहजिकपणें उद्भवण्याची संवय आपल्या चित्तास लागली आहे. वाढणें आणि बाहेरची भर या दोन कल्पना आपल्या चित्तांत संलग्न होऊन राहिल्या आहेत; पण या गोष्टीचा शास्त्रीय दृष्ट्या विचार कर्तव्य असतां या कल्पनांची जोडी आपणास फोडली पाहिजे. प्रत्येक जीवितापाठीमागें अनंत वस्तु आधींच भरून राहिलेली आहे. फक्त ती अमूर्तावस्थेंत आहे इतकेंच. बाहेरून कोठून भर पडण्याइतकें पारतंत्र्य त्या अनंतवस्तूला नाहीं. ती आधींच पूर्ण आणि अगदीं स्वतंत्र आहे. तिचें अस्तित्व नाहीं असा कोणताच काळ नाहीं. तें अस्तित्व अस्पष्टांतून स्पष्टत्वास यावयाचें असतें इतकेंच.

कारण आणि कार्य हीं नेहमीं एकरूप असतात. कार्य म्हणजे कारणाचेंच दृश्य अथवा स्थूलरूप. कारण आणि कार्य यांच्या गुणधर्मांत कोणताही फरक नसतो. उदाहरणार्थ हा कांचेचा तुकडा पहा. कांहीं जड पदार्थ आणि ही कांच निर्माण करणाराची इच्छा या दोघांच्या संयोगानें ही निर्माण झाली आहे. कांच या कार्याचीं हीं कारणें आहेत आणि या दोहोंचेंही अस्तित्व या कांचेंत आहे; हीं कारणें संयोगरूपानें येथें वसत आहेत. यांतील जडपदार्थास एकत्र ठेवणारी शक्ति यांत नसती तर या कांचेंतील अणु एकमेकांपासून वेगळे होऊन पडले असते. याकरितां जड अणु आणि त्यास एकत्र ठेवणारी शक्ति या दोहोंचेंही अस्तित्व असलें पाहिजे हें उघड आहे. यावरूनही कार्यरूप कांच तिच्या कारणरूपाहून गुणधर्मानें कोणत्याही प्रकारें भिन्न नाहीं हें तुमच्या लक्ष्यांत आलें असेलच. या ठिकाणीं कारण आणि कार्य यांच्यांत स्वभावमूलक अथवा गुणधर्ममूलक फरक नसून फरक दिसतो तो फक्त स्पष्ट आणि अस्पष्ट स्वरूप इतकाच आहे. कारणाचें अस्पष्टरूप कार्यांत स्पष्टत्वानें दिसतें. कारणांतच फरक होऊन त्याला कार्यरूप प्राप्त होतें हा सिद्धांत आपण लक्ष्यांत ठेविला पाहिजे. हा सिद्धांत दृश्य जीवितास लागू केला म्हणजे सांप्रतचें सारें दृश्य जीवित मूळच्या अदृश्य जीविताचेंच कार्य असलें पाहिजे हें आपल्या लक्ष्यांत येईल. प्रथम तें अपक्रांत होऊन अस्पष्टत्वास गेलें आणि नंतर त्या कारणरूपी अस्पष्टरूपांतून कार्यरूपानें तें उत्क्रांत होऊं लागलें आणि हळूहळू तेंच कारण स्थूलरूप घेऊं लागलें.

जीवात्मा अमर आहे कीं नाहीं या प्रश्नाचा निकाल आपण अद्यापि लावलेला नाहीं. विश्वांतील प्रत्येक वस्तु अविनाशी आहे हें आपणास माहीत

आहेच. या विश्वांत अगदीं नवें असें कांहीं नाहीं आणि अगदीं नवें असें कांहीं होणारही नाहीं हेंही आपणास माहीत आहे. तेंच तेंच वस्तुजात पुनःपुन्हां दृश्यत्वास येऊन अदृश्यत्वास जातें. त्याचा हा क्रम चक्रनेमिक्रमानें चालला आहे. एखादी मोठी लाट ज्याप्रमाणें एकदां वर येते आणि एकदां खालीं जाते त्याचप्रमाणें या विश्वाच्या गतीला केव्हां खालीं आणि केव्हां वर असे हेल-कावे होत असतात. अदृश्य अथवा सूक्ष्मरूपांतून एक दृश्य पदार्थांची सांखळी बाहेर येते; सूक्ष्मांतून तिची उत्क्रांति स्थूलांत होते; हे स्थूलरूप कालांतरानें पुन्हां अपक्रांत होऊं लागून आपल्या मूल अथवा सूक्ष्म रूपास परत जातें; पुन्हां त्यांतून उत्क्रांति होऊं लागून जड अथवा स्थूल आकार पुन्हां दिसूं लागतात; अशा रीतीनें सूक्ष्म आणि जड यांचीं रूपांतरें आळीपाळीनें एक-सारखीं चालू आहेत. विश्वांतील सर्व जीवितास हाच नियम लागू आहे. विश्वजीवितांतील प्रत्येक स्पष्ट रूप याच नियमास अनुसरून उत्क्रांत आणि अपक्रांत होत असतें. ही उत्क्रांति आणि अपक्रांति फक्त आकाराला मात्र लागू आहे हें लक्ष्यांत ठेविलें पाहिजे. एक आकार अपक्रांत होऊन अदृश्य-त्वास जातो आणि पुन्हां त्याच कारणांतून उत्क्रांत होऊन दृश्यत्वास येतो. एका दृष्टीनें पाहतां स्थूल आकार आणि जडदेह हींसुद्धां अविनाशी आहेत असेंच म्हटलें पाहिजे. हें कसें ? अशी कल्पना करा कीं चार फांसे घेऊन ते आपण खालीं टाकले. त्यांजवर सहा, पांच, तीन, चार असे आंकडे वर आले. हे फांसे आपण पुनःपुन्हां खेळूं लागलों तर कोणत्यातरी एका काळीं सहा, पांच, तीन चार हा संयोग पुन्हां जमून येईल. या विश्वांतील प्रत्येक परमाणु हा एक फांशासारखा आहे असें गृहीत धरा. विश्वाचे हे फांसे पुनःपुन्हां जमिनीवर पडत आहेत आणि नाना आंकड्यांचा संयोग उत्पन्न करीत आहेत. आपणासमोर दिसत असलेले हे सारे आकार हा असाच एक संयोग आहे. आपणासमोर ही एक कांच आहे, हें एक टेबल आहे, हा एक पाण्याचा घडा आहे आणि आजूबाजूला दुसरेही पदार्थ दिसत आहेत. हे सारे मिळून एक संयोग उत्पन्न झाला आहे. कालांतरानें हा संयोग फुटून हे पदार्थ एकमेकांपासून विभागले जातील; पण हेच पदार्थ याच रूपानें पुन्हां केव्हां तरी संयोग पावतील यांत शंका नाहीं. सांप्रत दिसणारा हा सारा संयोग पुन्हां अवश्य जमून येईल. त्या वेळीं तुम्हीही असेच बसलेले

असाल. मी याच विषयावर असाच बोलत असेन आणि अशा रीतीनें हा संयोग पुन्हां जमून येईल. पूर्वीही अनेक वेळां असा संयोग होऊन गेला आहे आणि पुढेंही अनंत वेळां याच संयोगाची पुनरावृत्ति होईल. दृश्य आकारांची ही गोष्ट झाली. यावरून आपण लक्ष्यांत काय ठेवावें ? हेंच कीं जड आकाराच्या संयोगांची ही पुनरावृत्ति एकसारखी होत असते.

नुकत्याच सिद्ध केलेल्या या उपपत्तीवरून आणखीही कांहीं मौजेच्या गोष्टी आपोआप सिद्ध होतात. एखाद्या मनुष्याचा पूर्वजन्म आणि पुढीलजन्म यांच्या हकीकती सांगणारा मनुष्य तुमच्यापैकीं कदाचित् कोणीं पाहिला असेल. भविष्यत्कालाची घटना शिस्तवार नियमांनीं अगोदरच बद्ध झालेली नसेल तर कसलेंही भविष्य सांगणें शक्य आहे काय ? ही गोष्ट शक्य नाहीं. पूर्वजन्मांतील संयोगाची आवृत्ति उत्तरकालच्या जन्मांत निघत असते हें नुकतेंच आपण सिद्ध केलें आहे. शिकागो येथील फेरिस चक्र नांवाचें प्रचंड चाक तुह्मीं पाहिलें असेलच. हें चाक एक सारखें फिरत असतें. या चाकांत लहान लहान खोल्या आहेत. या खोल्या क्रमाक्रमानें वरच्या जागीं येत असतात. एखाद्या खोलींत कांहीं लोक शिरले म्हणजे या चक्राचा एक सबंध फेरा होऊन नेमलेल्या जागीं त्या खोलींतून ते पुन्हां बाहेर पडतात आणि नव्या माणसांची टोळी त्यांच्या जागीं येते. विश्वाचें प्रचंड चक्रही याच पद्धतीवर चालू आहे. एकेका फेऱ्यांत अत्यंत क्षुद्र कीटकापासून तों थेट अवतारी पुरुषापर्यंत अनेक आकारांची एक टोळी असते. ही टोळी चक्राचा एक सबंध फेरा करते आणि अदृश्यत्वास जाते. यांतील कांहीं जीव पूर्णत्वास येऊन या चक्राबाहेर पडतात; तथापि चक्राचे फेरे अखंड चालू असतातच आणि जोंपर्यंत हे नानादेह या चक्रांतच गुरफटलेले आहेत तोंपर्यंत ते कोणत्या वेळीं कोणत्या जागीं येतील हें अगदीं ठामपणें सांगतां येणें शक्य आहे. अर्थात् ही गोष्ट स्थूल अथवा जड आकारास मात्र लागू आहे. जीवात्म्यांना ती लागू नाहीं. अशा रीतीनें पूर्वजन्म आणि उत्तरजन्म निश्चयानें सांगतां येणें पूर्णपणें शक्य आहे. यावरून दृश्य देखाव्यांची पुनरावृत्ति नियमित कालांतरानें होत असते आणि तेच ते संयोग पुनःपुन्हां अनंत काल चालू आहेत हें आपल्या लक्ष्यांत येईल; पण जीवात्म्याचें अमरत्व तें मात्र हें नव्हे. कोणत्याही शक्तीचा विनाश होत नाहीं अथवा एखादी जड

वस्तुही पूर्णत्वानें नाश पावत नाहीं. मग या जड वस्तूचें काय होतें ? तिच्यांत एकसारखा बदल सुरू असतो आणि लाटांप्रमाणें ती एकसारखी मागेंपुढें हेलकावे खात असते. पुनःपुन्हां ती कार्यरूपास येऊन कारण-रूपास परत जात असते. सरळ रेषेंत गतीची कोणतीही क्रिया पूर्णत्वास येऊं शकत नाहीं. गती चक्राकार परिभ्रमण करीत आहे. एक रेषा आपण एकसारखी वाढवीत गेलों तर अखेरीस आपल्या मूल बिंदूस ती पुन्हां परत येऊन ती वर्तुळाकार होईल. असें आहे तर कोणताही जीवात्मा अव-नत स्थितींत चिरकाल राहूं शकेल हें शक्यच नाहीं. ही गोष्ट विश्वनिय-माच्या विरुद्ध आणि ह्मणून अगदीं अशक्य आहे. प्रत्येक वस्तूला आपापलें वर्तुळ पूर्ण केलेंच पाहिजे व ज्या बिंदूपासून ती निघाली त्या बिंदूंत तिला परत गेलेंच पाहिजे. मी आणि हे सारे जीवात्मे यांचें स्वरूप काय आहे ? आपण सारे विश्वचैतन्याचे भाग आहों ही गोष्ट मागें एकवार आपण सिद्ध केलीच आहे. या विश्वचैतन्यांतील महत् अथवा आदि बुद्धीलाच आपण परमेश्वर, ख्रिस्त, बुद्ध इत्यादि नांवें देतों. यालाच जडवादी शक्ति असें ह्मणतात, आणि संशयवादी यालाच अनंत, अज्ञेय इत्यादि नांवें देतात. आपण सारे याचेच अंश आहों.

या विषयासंबंधीं आणखीही कांहीं शंका उपस्थित होण्यासारख्या आहेत. जगांतील कोणत्याही शक्तीचा आत्यंतिक नाश होऊं शकत नाहीं हें म्हणणें ठीक आहे; पण जगांत आपल्या दृष्टोत्पत्तीस येणारीं शक्तीचीं सर्व स्वरूपें संघटनात्मक आहेत. अनेक घटक मिळून एक आकार निर्माण होतो आणि मग त्याच्या द्वारें एखाद्या रूपानें शक्ति स्पष्टत्वास येते. अशा रीतीनें शक्तीचीं सर्व स्वरूपें संयुक्त अथवा अनेक घटक मिळून झालेलीं आहेत. अनेक शक्तिघटक मिळून त्यांचा जो परिणाम समुच्चयरूपानें आपणास दिसतो त्याला अर्वाचीन शास्त्रांनीं शक्ति असें नांव दिलें आहे. ही अर्वाचीन शास्त्रांची व्याख्या खरी मानली तर आम्हांपैकीं प्रत्येकांत व्यक्तिविशिष्टत्व ह्मणून जें आहे त्याची वाट काय ? विश्वांतील प्रत्येक संयुक्त वस्तूचें केव्हां तरी पृथ-क्करण होऊन तिचे घटक परस्परांपासून अवश्य भिन्न झाले पाहिजेत. या विश्वांत संघटित अथवा संयुक्तस्वरूपाचें जें कांहीं आहे, मग ती जड वस्तु असो अथवा ती चैतन्यशक्ति असो ती आज ना उद्यां विघटित झालीच

पाहिजे. कोणत्या तरी कारणपरंपरेपासून जें कार्य उत्पन्न झालेलें आहे त्याचा नाश होणें अपरिहार्य आहे. त्यांत केव्हां ना केव्हां विघटनेचें कार्य अवश्य सुरू होईल आणि त्याचे घटक परस्परांपासून अवश्य भिन्न होतील. जीवात्मा ही अशा प्रकारची शक्ति नव्हे. अथवा ती विचारशक्तिही नव्हे. विचार त्यापासून निर्माण होतो. तो विचाराचा कर्ता आहे, पण तो स्वतः विचार नाहीं. या देहाचा तो जनक आहे, पण तो स्वतः देह नाहीं. हें कसें ? जीवात्मा म्हणजे जडदेह नव्हे हें तर आपणास उघडपणें दिसून येतें. जडदेहाला जाणीव नाहीं. मृतदेह जाणिवेरहित असतो. खाटकाच्या दुकानांतील मांसाचा तुकडा आणि मनुष्याचा जडदेह अथवा एखादें मातीचें ढेंकूळ यांची किंमत एकच आहे. बुद्धि म्हणजे काय ? बुद्धि म्हणजे प्रतिक्रियाशक्ति. या विषयाचा विचार करण्याकरितां आपणास जरा आणखी अधिक खोल पाण्यांत शिरलें पाहीजे. आपणासमोर हा पाण्याचा घडा आहे. मी तो पाहतों. 'मी तो पाहतों' याचा अर्थ काय? मी तो कसा पाहतों ? त्या घड्यांतून निघालेले प्रकाशकिरण माझ्या नेत्रांतून आंत शिरतात आणि माझ्या कनीनिकेवर एक चित्र उत्पन्न करतात. हें चित्र येथून मेंदूकडे रवाना केलें जातें. इतकी क्रिया झाली तरी तो घडा मीं पाहिला असें होत नाहीं. येथपर्यंत सुद्धां पाहण्याच्या क्रियेचा जन्म झालेला नसतो. संज्ञावाहक ज्ञानतंतूंनीं संवहनाचें कार्य मात्र येथपर्यंत केलेलें असतें. तथापि येथपर्यंत प्रतिक्रियेचा उगम नसतो. येथपर्यंत सारें कार्य एकाच बाजूनें झालेलें असतें. मेंदूंतील गोलक अथवा इंद्रिय तें चित्र मनाकडे नेऊन पोंचवितें. मनाला तें पोहोंचल्याबरोबर तेथें मनाची प्रतिक्रिया सुरू होते, आणि या प्रतिक्रियेबरोबर हे चित्र घड्याचें आहे ही जाणीव उत्पन्न होते. अशी कल्पना करा कीं माझ्या भाषणाकडे तुमचें लक्ष्य पूर्ण वेधून गेलें आहे. तुह्मी अगदीं तल्लीन होऊन गेलां आहांत. इतक्यांत एखादा डांस येऊन तुमच्या नाकाच्या शेंड्यावर बसतो. तो तेथें आपली क्रिया सुरू करतो; पण तुमचें मन भाषणश्रवणांत अगदीं गढून गेलें असल्यामुळें त्या डासाचें अस्तित्व तुमच्या लक्ष्यांत येत नाहीं. हा प्रकार कसा घडला ? त्या डांसानें तुमच्या शरिराच्या एका भागाला चावा घेतला. तेथें असणाऱ्या ज्ञानतंतूंनीं ही हकीकत मेंदूला कळविली. मेंदूच्या गोलकांत ती नमूद झाली; पण मन त्या

जागीं नव्हतें. तें दुसराच कारभार करण्यांत गुंतलें होतें. यामुळें प्रतिक्रियेची लाट तेथून उत्पन्न झाली नाहीं. यामुळें डांसाच्या अस्तित्वाची जाणीव तुह्मांस झाली नाहीं. ज्या ज्या वेळीं एखादें चित्र गोलकाकडे जातें त्या वेळीं मन तेथें हजर नसेल व तें प्रतिक्रिया करीत नसेल तर त्या चित्राचें अस्तित्व आपल्या जाणिवेंत येणार नाहीं; पण ज्या वेळी मनांतून प्रतिक्रिया सुरू होते त्याच वेळीं आपणास स्पर्शज्ञान होतें, आपण पाहतों अथवा ऐकतों. या प्रतिक्रियेच्या लाटेबरोबरच प्रकाश उत्पन्न होतो. हें प्रकाशजननाचें सामर्थ्य जड शरीरांत नाहीं हें आपणास ठाऊक आहेच. आपलें मन प्रतिक्रिया करीत नसेल तर नुसतें शरीर स्पर्शज्ञान उत्पन्न करूं शकत नाहीं हा अनुभव आपणास आहेच. कांहीं विशिष्ट परिस्थितींत कित्येक वेळां विलक्षण गोष्टी घडून येतात. एखाद्या माणसाला एखाद्या भाषेचा शब्दही ठाऊक नसतो आणि कांहीं परिस्थितींत ती भाषा तो घडघड बोलतो अशींही उदाहरणें नमूद झालेलीं आहेत. कित्येक वेळां एखादा मनुष्य आपल्या बालवयांत एखादी विशिष्ट भाषा बोलणाऱ्या लोकांत वाढलेला असतो. त्या वेळीं त्या भाषेचीं नवीं चित्रें त्याच्या मेंदूवर उमटलेलीं असतात. त्याच्या मनाच्या खजिन्यांत जणूं काय तीं सांठविलेलीं असतात. दीर्घकाळपर्यंत मनाची प्रतिक्रिया येथें घडलेली नसते. यामुळें तीं ध्वनिचित्रें स्पष्ट दशेस न येतां तशींच निद्रावस्थेंत राहिलेलीं असतात. पुढं कांहीं आकस्मिक कारणानें मनाच्या खजिन्याच्या या भागाला धक्का बसून त्याची प्रतिक्रिया सुरू होते आणि हे सारे ध्वनि तेथून बाहेर पडतात. इतका काल अंधारांत राहिलेले हे ध्वनि अशा रीतीनें प्रकाशांत येतात आणि तो मनुष्य ती भाषा घडघड बोलूं लागतो. या हकीकतीवरून आणखीही एक गोष्ट सिद्ध होते. ती ही कीं मन सुद्धां स्वतंत्र वस्तु नाहीं. तें दुसऱ्या कोणाच्या तरी हातांतील बाहुलें आहे. तें दुसऱ्या कोणाचें तरी क्रियासाधन अथवा करण आहे. आतांच सांगितलेल्या उदाहरणांत त्या मनुष्याच्या मनांत त्या भाषेचे ध्वनि सांठविले होते; तथापि त्यांच्या अस्तित्वाची जाणीव त्याला नव्हती. ही जाणीव पुढं आकस्मिक कारणानें त्याला झाली. यावरून मनाशिवाय आणखीही कांहीं वस्तु त्या मनुष्यापाशीं होती हें सिद्ध होतें. त्या मुलाच्या लहानपणीं त्या वस्तूनें आपल्या शक्तीचा उपयोग केला नाहीं, पण मोठेपणीं या शक्तीचा उपयोग

केला. प्रथम हें बाह्य शरीर दिसतें. याच्या आंत मन आहे. मन हें विचाराचें साधन आहे. आणि या मनाच्या पाठीमागें मनुष्याचें सत्यरूप असतें. यालाच आत्मा असें नांव आहे. मेंदूंतील घटकांत कांहीं विशिष्ट फेरफार उत्पन्न होऊन विचार उत्पन्न होतो असें अर्वाचीन तत्त्ववेत्त्यांचें मत आहे. यामुळें अशा प्रकारच्या उदाहरणांचें विवेचन त्यांना करतां येत नाहीं. आणि तें त्यांस करतां न आलें म्हणजे अशा गोष्टी ‘सब झूट’ या कोटींत ते ढकलतात: मन आणि मेंदू हीं परस्परांशीं निगडित आहेत. आणि देहाच्या मृत्यूबरोबर मनही मरण पावतें. आत्मा स्वयंप्रकाश आहे. मन हें त्याचें करण आहे. आणि या क्रियासाधनांच्या अथवा करणांच्या द्वारें तो बाह्येंद्रियें चालवितो व अशा रीतीनें पाहणें, ऐकणें इत्यादि क्रिया होतात. बाह्येंद्रियें बाहेरील पदार्थांचा ठसा ग्रहण करितात आणि तो तीं मेंदूंतील गोलकाकडे रवाना करितात. आपल्या जडदेहाबाहेर दिसणारीं कान, डोळे इत्यादि इंद्रियें हीं खरीं इंद्रियें नव्हत. बाहेरील ठसे आंत जाण्याचीं तीं द्वारें मात्र आहेत. खरीं इंद्रियें मेंदूंत असतात आणि तींच कार्य करीत असतात. मेंदूंतील या गोलकांस संस्कृतांत इंद्रियें असेंच नांव दिलें आहे. बाहेरून आलेले ठसे हीं इंद्रियें मनाला पोंचवितात. यांची रवानगी मनाकडून चित्ताकडे होते. तेथून ते बुद्धीकडे जातात आणि बुद्धि त्यांना मुख्य राजाधिराजाकडे पोंचविते. तो त्यांची भेट घेतो आणि मग आपले जे काय हुकूम असतील ते सोडतो. हा हुकूम मनाला मिळाला ह्मणजे त्याची क्रिया इंद्रियांवर ताबडतोब सुरू होते, व इंद्रियें बाह्यकरणांना चेतना देतात. खरा द्रष्टा, खरा नियंता, शास्ता, जनिता, आत्मा हाच होय.

येथवर झालेल्या विवेचनावरून देह अथवा विचार हें मनुष्याचें सत्यरूप नव्हे हें आपल्या लक्षांत येईल. तें सत्यरूप संयुक्त असणें शक्य नाहीं. कारण अनेक वस्तूंच्या संयोगानें जें कांहीं बनलें असेल तें प्रत्यक्ष पाहतां येण्यासारखें असतें अथवा किमानपक्ष त्याची कल्पना तरी करतां येण्यासारखी असते. जें आपल्या दृष्टीस प्रत्यक्ष पडत नाहीं अथवा आपल्या कल्पनेंत जें येऊं शकत नाहीं आणि जें बद्ध होऊं शकत नाहीं तें स्वरूप जडवस्तुही असूं शकणार नाहीं अथवा तें शक्तिरूपही नव्हे. तें कारण नव्हे आणि कार्यही नव्हे. तसेंच अनेक वस्तूंच्या संघातानें बनलेलें असें संयुक्तरूपही तें नव्हे. आपल्या

विचाराची अथवा कल्पनेची कक्षा जेथपर्यंत पोहोंचूं शकते तेथपर्यंतच संयुक्त वस्तूंचें साम्राज्य आहे. त्यापलीकडे त्यांचें नांवही नाहीं. सृष्टीचा कायदाही कल्पनेच्या साम्राज्यमर्यादेपर्यंतच लागू पडतो. या मर्यादेपलीकडे त्याची अंमलबजावणी होऊं शकत नाहीं. आणि या कायद्याच्या पलीकडचें जें कांहीं आहे तें संयुक्तरूप नव्हे. मनुष्याचें आत्मरूप या कार्यकारणाच्या कायद्यापलीकडचें असल्यामुळें तें संयुक्तस्वरूप असूं शकणार नाहीं. तें निरंतरचें स्वतंत्ररूप असून कायद्याच्या मर्यादेंतील सर्व वस्तूंवर त्याची अंमलबजावणी होत असते. तें कधींही मृत्यु पावणार नाहीं. कारण मृत्यु ह्मणजे पूर्व स्थितीला परतणें. एखादी वस्तु नाश पावते याचा अर्थ इतकाच कीं ज्या घटकांच्या संयोगानें ती बनलेली असते त्या घटकांच्या स्वरूपास ती परत जाते. जी वस्तु अनेक घटकांच्या संयोगानें बनलेलीच नाहीं व जी केवळ स्वतःसिद्ध एकरूपच आहे तिचा नाश होणें शक्य नाहीं व ती मृत्यु पावते असे ह्मणणें हा शुद्ध मूर्खपणा आहे.

आपण करीत असलेलें विवेचन आतां अधिकाधिक नाजूक होत चाललें आहे. यांतील कित्येक गोष्टींनीं तुम्हांपैकीं कित्येकजण भिऊन जाण्याचाही संभव आहे. याकरितां आपली बुद्धि खंबीर ठेवून इकडे बारीक लक्ष्य पुरविण्याची सूचना मी करतों. मनुष्याचें आत्मरूप जड वस्तूंच्या विश्वाच्या बाहेरचें असल्यामुळें तसेंच तें कल्पनातीत आणि विचारातीत असल्यामुळें तें स्वतःसिद्ध असें रूप आहे. आणि कोणत्याही स्वतःसिद्ध रूपाला मृत्यु असणें शक्य नाहीं. ज्याला मृत्यु नाहीं त्याला जीवितही अर्थात् नाहीं. कारण जीवन आणि मरण हीं एकाच वस्तूच्या दोन बाजू आहेत. नाण्याला दोन बाजूंकडे ज्याप्रमाणें वेगवेगळीं चिन्हें असतात त्याचप्रमाणें जीवन आणि मरण हीं एकाच वस्तूच्या दोन्ही बाजूंवर कोरलेलीं दोन चिन्हें आहेत. जीवित हें मृत्यूचेंच दुसरें नांव असून मृत्यु हेंही जीविताचें दुसरें नांव आहे. एका वस्तूच्या एका प्रकारच्या स्पष्ट आविष्करणाला जीवित ही संज्ञा आपण लावतों आणि त्याच वस्तूच्या दुसऱ्या प्रकारच्या आविष्करणाला मृत्यु हें नांव आपण देतों. चैतन्याचें पाणी लाटेच्या स्वरूपानें उंचावलें म्हणजे त्याला आपण जीवित म्हणतों आणि तीच लाट खालीं जाऊन तेथें खाडा उत्पन्न झाला म्हणजे त्याला आपण मृत्यु म्हणतों. मृत्यूच्या पलीकडचें असें कांहीं स्वरूप

असेल तर जीविताच्याही पलीकडचें स्वरूप असले पाहिजे हें यावरून उघड सिद्ध होतें. विश्वचैतन्याचें समवायीरूप जो परमेश्वर त्याचेच आपण सारे अंशभूत आहों, या पूर्वींच सिद्ध केलेल्या गोष्टीची आठवण येथें आपणास करून घेणें इष्ट आहे. हें चैतन्यरूप जीविताच्या आणि मृत्यूच्या पलीकडचें आहे हें आतां आपल्या लक्ष्यांत आलें असेलच. तुमचें आत्मरूप कधीं जन्मासही आलें नाहीं आणि त्याला कधीं मृत्युही होणार नाहीं. तर मग आपणासभोंवतीं जें जन्ममृत्यूचें साम्राज दिसतें त्याचा अर्थ काय ? जन्म आणि मृत्यु फक्त शरीराला मात्र होतात. त्यांचा अंमल आत्म्यावर चालूं शकत नाहीं. आत्मा स्वतःसिद्ध आणि सर्वसाक्षी आहे. यावर तुम्ही असा प्रश्न कराल कीं इतके लोक जेथें बसले असतां आणि इतके निरनिराळे आत्मे येथें निगडित स्थितींत दिसत असतां "आत्मा सर्वांतर्यामी आणि सर्वसाक्षी आहे" असें तुम्ही कसें म्हणतां ? यावर मी आपणास एक उलट प्रश्न असा विचारतों कीं, कायद्याच्या मर्यादेबाहेर अशक्य असें काय आहे ? हा काचेचा तुकडा मर्यादित स्वरूपाचा आहे. तो सर्वसाक्षी असूं शकणार नाहीं. कारण आजूबाजूच्या वस्तूंनीं त्याचें स्वरूप जखडून टाकलें असून तें विस्तृत करण्याची परवानगी त्या वस्तु त्याला देत नाहींत. आजूबाजूच्या प्रत्येक वस्तूचा अंमल त्याजवर आहे आणि यामुळेंच हा तुकडा मर्यादित झाला आहे; पण कायद्याच्या पलीकडे जें कांहीं आहे आणि ज्यावर दुसऱ्या कोणत्याही वस्तूची अंमलबजावणी होऊं शकत नाही त्याला मर्यादा तरी कशाची पडणार ? आणि त्याला मर्यादा नसल्यामुळें तो अमर्याद आणि सर्वसाक्षी असला पाहिजे हें उघड आहे. याच न्यायानें तुम्ही विश्वव्यापी आहां. तर मग मी जन्मलों, मला अस्तित्व आहे आणि मी मृत्युही पावणार इत्यादि गोष्टींची वासलात तुम्ही कशी लावणार ? असें तुम्ही विचाराल. हे प्रश्न अज्ञानजन्य आहेत. मेंदूंत झालेल्या भ्रमाचें हें फळ आहे. तुम्हांला जन्म झाला हें खोटें आणि तुम्ही मृत्यु पावणार हेंही खोटें. तुम्हांला जन्म नाहीं आणि मृत्यूही नाहीं. जाणें आणि येणें ही निव्वळ वेडाची लहर आहे. वस्तुतः तुम्ही सर्वव्यापी आहां. तुमच्या सूक्ष्म देहाच्या घडामोडींनीं जन्ममृत्यु, जाणेंयेणें इत्यादि अनेक भ्रम निर्माण होतात. आकाशांत ढग जसे जातात आणि येतात त्याचप्रमाणें हे जन्ममृत्यु तुमच्यावर जातात आणि येतात.

ढग इकडे तिकडे फिरत असले ह्मणजे आकाश चालल्याचा भ्रम उत्पन्न होतो. चंद्राभोंवतीं ढग इकडे तिकडे फिरत असले ह्मणजे ढग स्थिर असून चंद्र चालतो असा दृग्भ्रम पुष्कळ वेळां आपणास होतो. आगगाडी पळत असली ह्मणजे कडेचीं झाडें धांवतात असें वाटतें. वास्तविक पाहतां तुम्ही कोठून आलां नाहीं अथवा तुम्ही कोठें जातही नाहीं. तुह्मांला जन्म नाहीं आणि पुनर्जन्मही नाहीं. तुम्ही अनंत आणि सर्वव्यापी आहां. तुम्ही अक्षय्य स्वतंत्र आणि कार्यकारणांच्या पलीकडचे आहां. याकरितां आतां विचारलेले प्रश्न उद्भवतच नाहींत हे प्रश्न शुद्ध वेडेपणाचे आहेत. तुह्मांस जन्मच नसेल तर मृत्यु तरी कोठून येईल?

आतां आपण आणखी एक पायरी वर चढून गेलों ह्मणजे तर्कशास्त्रानें निर्दिष्ट केलेल्या अखेरच्या मुक्कामाला आपण पोहोंचूं. मध्यंतरीं कोठेंही मुक्काम करण्यासारखें स्थल नाहीं. तुह्मी सूक्ष्मेंद्रियशास्त्राचा अभ्यास करीत आहां तेव्हां मध्यें कोठेंही मुक्काम न करतां त्या शास्त्राच्या अखेरच्या सिद्धांतापर्यंत जाणें तुम्हांस अवश्य आहे. आतां पुढची पायरी अशी. जर आपण कायद्याच्या मर्यादेबाहेरचे असूं तर आपण सर्वसाक्षीही असलें पाहिजे. त्याचप्रमाणें सर्व ज्ञानाचाही निधि आपणापाशींच असला पाहिजे. सर्व सामर्थ्य आपणापाशींच असलें पाहिजे. होय; या साऱ्यांचें धनीपण आपणाकडे आहे. या विश्वांत तुह्मीच सच्चिदानंदरूप आहांत; पण अशा पदवीचे प्राणी एकाहून अधिक असणें शक्य आहे काय? सर्वव्यापी आणि सर्वसाक्षी प्राणी कोट्यवधी असतील हें शक्य आहे काय? नाहीं; ही गोष्ट शक्य नाहीं. तर मग आम्हां इतक्या लोकांची वाट काय? तुह्मी सर्व वस्तुतः एकरूप आहां. एकरूप असें एकच आहे. आणि तें एक आत्मरूप तुह्मीच आहां. बाहेर दिसणाऱ्या या सृष्टीच्या मागें एकच आत्मा आहे. तो सच्चिदानंदरूप आहे. त्याच्याच हुकमानें आकाशाचा पसारा सर्वत्र दिसतो, त्याच्याच हुकमानें वायु वाहतो, त्याच्याच हुकमानें सूर्य प्रकाशतो आणि त्याच्याच हुकमानें सर्वांस सजीवत्व प्राप्त होतें. या सृष्टींत सत्य असें तें एकच रूप. तो तुमच्या आत्म्याचा आत्मा आहे. छे, छे असेंही नाहीं–तो तुह्मीच आहां. तुह्मी आणि तो यांत भेदच नाहीं–जेथें द्वैत आलें त्या ठिकाणीं भय आलें, त्या ठिकाणीं तंटा आला आणि त्याठिकाणीं अहमहमिकाही आली; पण ज्या ठिकाणीं केवळ

एकरूपता आहे त्या ठिकाणीं द्वेष कोणीं कोणाचा करावा? त्या ठिकाणीं तंटा कोणीं कोणाशीं करावा? जीविताचा खरा अर्थ काय? याचा उलगडा हा आहे. पूर्णत्व तें हेंच आणि ईश्वरत्वही हेंच. जोंपर्यंत ही सृष्टि तुह्मांस अनेक रूपानें दिसत आहे तोंपर्यंत तुमचा भ्रम शिल्लक आहे असें समजा. या अनेकत्वाच्या ठिकाणीं एकरूप जो पाहतो, क्षणभंगुर विश्वांत स्थिररूप ज्याला दिसतें आणि तें स्थिररूप मीच आहें असें जो जाणतो तोच मुक्त, तोच स्वतंत्र, तोच कल्याणनिधान, त्यानेंच अखेर मारली. याकरितां विश्वात्मा आणि तुह्मी एकरूपच आहां हें जाणा. '**तत्त्वमसि**' हें महावाक्य लक्ष्यांत ठेवा. मी पुरुष आहें, मी स्त्री आहें, मी रोगपीडित आहें, मी आरोग्यमान आहें, मी सशक्त आहें, मी दुर्बल आहें, मी प्रेम करतों, मी द्वेष करतों इत्यादि अनेक विकार भ्रमजन्य आहेत. याकरितां हा भ्रम फेकून द्या. तुह्मांस दुर्बल कोण करतें? तुम्हांस भय कशाचें वाटतें? तुह्मी साऱ्या विश्वाला व्यापून उरणारें जें एकरूप तेंच आहां. मग तुह्मीं कोणाला भ्यावें? याकरितां एकदम उठून उभे रहा आणि हा सारा भ्रम फेंकून देऊन मुक्त व्हा. मुख्य मुद्याची गोष्ट इतकीच लक्ष्यांत ठेवा कीं, तुह्मांस दुर्बल करणारा प्रत्येक विचार पापरूप आहे. दौर्बल्य हेंच खरें पातक. मनुष्याला दौर्बल्य आणणारी प्रत्येक वस्तु पापजननी आहे. याकरितां तिचाच अव्हेर करा. आकाशांतला सूर्य खालीं कोसळून पडला अथवा चंद्राच्या उद्यां ठिकऱ्या उडाल्या आणि आकाशांतील साऱ्या ग्रहमाला संपूर्ण नाश पावल्या तरी तुह्मांस त्याचें काय? तुह्मीं भ्यावें असें यांत काय आहे? मी सच्चिदानंद-रूप आहें असेंच नित्य ह्मणा. पिंजऱ्यांत सांखळीनें बांधून ठेवलेला सिंह ज्याप्रमाणें सांखळदंड तोडून आणि पिंजरा फोडून स्वपराक्रमानें मुक्त होतो त्याचप्रमाणें आपणाभोंवतीं असलेली ही भ्रमशृंखला एका सपाट्या सरशीं तोडा आणि कायमचे मुक्त व्हा. तुम्हांला भय कोण दाखवितें? तुम्हांला बद्ध कोणीं केलें आहे? अज्ञान व भ्रम यांनींच. याशिवाय तुम्हांस बद्ध करण्याची दुसऱ्या कोणाचीही प्राज्ञा नाहीं. तुम्ही सच्चिदानंदरूप आहां.

तुम्ही पापी आहां असें जे तुम्हांस सांगतात ते महामूर्ख आहेत हें लक्ष्यांत ठेवा. असल्या मूर्खांचीं भाषणें ऐकून तुह्मी कोंपऱ्यांत बसतां आणि ढळढळां रडूं लागतां. तुम्ही पापी आहां हें म्हणणें मूर्खपणाचें आणि अत्यंत दुष्टप-

णाचें आहे. तुम्ही प्रत्यक्ष परमेश्वर आहां. याकरितां छातीचा कोट करून याच मुद्यावर उभे रहा आणि याच पायावर भावी जीवनक्रमाची रचना करा. तुमचा गळा कोणी कापूं लागला तरी तुम्हीच तुमचा गळा कापीत आहां असें समजा. एखाद्या गरिबाला तुम्ही मदत करीत असलां तरी यत्किंचितही गर्व वाटण्याचें कारण तुम्हांस नाहीं. असें करणें हा तुमचा पूजाविधि आहे. हा तुमचा उपासनामार्ग आहे. यांत गर्व वाटण्यासारखें काय आहे ? सर्व विश्व तुमच्या ठिकाणीं नाहीं काय ? जें तुम्ही नाहीं असें या विश्वांत काय आहे ? या विश्वाचा आत्मा ते तुम्हीच. सूर्य, चंद्र आणि तारे ही तुम्हीच. सर्वत्र तुम्हीच प्रकाशत आहां. सर्व विश्व तुम्ही आहां. मग तुम्ही द्वेष कोणाचा करणार ? आणि युद्धें कोणाबरोबर करणार ? याकरितां आपण विश्वरूप आहों हें नित्य लक्ष्यांत बाळगून आपला भावी जीवनक्रम या तत्त्वाला अनुसरून चालवा. जो कोणी हें तत्त्व लक्ष्यांत ठेवून आपली वर्तणूक तदनुसार ठेवील तो अज्ञानाच्या अंधकारांत कधींही चांचपडणार नाहीं.

---

१३

## आत्मा.

‘ वेदांतावर तीन व्याख्यानें ’ या नांवाचें प्रोफेसर मॅक्समुल्लर यांचे सुप्रसिद्ध पुस्तक तुह्मांपैकीं पुष्कळांनीं वाचलें असेलच. त्याचप्रमाणें त्याच विषयावरील प्रोफेसर ड्यूसन यांचें जर्मन पुस्तकही तुम्हांपैकीं कांहींच्या अवलोकनांत आलें असेल. हिंदुस्थानांतील धार्मिक विचारांबद्दल पाश्चात्य देशांत जी माहिती प्रसिद्ध होते तींत मुख्यतः अद्वैतमताचाच विचार केलेला असतो. आणि यामुळे श्रुतींत अद्वैतमताचेंच प्रतिपादन केलेलें आहे असें इकडे पुष्कळ लोकांस वाटतें. तथापि हिंदुस्थानांत अनेक प्रकारचीं मतें प्रचलित आहेत आणि इतर मतांच्या तुलनेनें पाहतां अद्वैत मताचा प्रचार बराच कमी आहे. फार प्राचीन काळापासून हिंदुस्थानांत अनेक प्रकारचे पंथ चालत आले आहेत. प्रत्येक पंथांत विशिष्ट धर्ममतें पाळलींच पाहिजेत अशा प्रकारचा जुलूम हिंदुस्थानांत नाहीं. यूरोपांत एखादा पंथ अस्तित्वांत आला म्हणजे आपलीं मतें तो ठरवितो, सुसंघटित संस्था तो स्थापन करतो आणि त्या पंथांत प्रविष्ट झालेल्या प्रत्येक सभासदाला याच ठरींव मताप्रमाणें वागणें भाग पडतें; पण हिंदुस्थानांत तसें केव्हांही घडलेलें नाहीं. ज्यानें त्यानें

आपापलीं मतें बनवावीं आणि स्वतःच्या इच्छेप्रमाणें त्याचा आचारही करावा अशी मोकळीक सर्वांस असल्यानें अत्यंत प्राचीन काळापासून हिंदुस्थानांत किती शेंकडों पंथ अस्तित्वांत असतील याची मोजदादही माझ्यानें करवत नाहीं. आणि या जुन्या संख्येंत नवीन पंथांची भर प्रतिवर्षी पडते ती वेगळीच. भरतभूमीच्या धार्मिक औत्सुक्याला जणूं काय ओहोटी कधीं लागतच नाहीं.

या अनेक पंथांचे विभाग मुख्यतः दोन पडतात. जे पंथ श्रुतिप्रामाण्य मानतात ते पंथ जुने या भागाखालीं मोडत असून वेदांस पूज्य न मानणारे इतर पंथ दुसऱ्या भागांत गणले जातात. अर्वाचीन पंथांपैकीं श्रुतिप्रामाण्य न मानणारे पंथ ह्मटले म्हणजे जैन आणि बौद्ध हे होत. जुन्या पंथांत कांहीं पंथ शुद्ध बुद्धिवादापेक्षां श्रुतिवचनाला अधिक प्रमाणभूत मानणारे आहेत. याशिवाय या जुन्या पंथांत कांहीं पंथ असेही आहेत कीं युक्तीला धरून जोंपर्यंत श्रुति चालते तोंपर्यंत ती प्रमाण मानावी आणि बुद्धीला न पटणारीं श्रुतीचीं वचनें त्याज्य समजावीं, असें ते ह्मणतात.

जुन्या पंथांत सांख्य, नैय्यायिक आणि मीमांसा असे तीन प्रमुख पंथ आहेत. यांपैकीं सांख्य आणि नैय्यायिक यांची उभारणी त्यांच्या त्यांच्या तत्त्वदर्शनानुसारें झाली असतांही त्यांना प्रत्यक्ष व्यावहारिक स्वरूप आलें नाहीं. त्या मतांचा प्रत्यक्ष आचार करणारे अनुचर या दोन पंथांना कधींच मिळाले नाहींत. तिसरें मत मीमांसकांचें. हिंदुस्थानांतील बहुधा सारे जुने पंथ हल्लीं या एकाच मतांत मोडतात. यालाच वेदांत धर्म असें नांव आहे. हिंदुतत्त्वज्ञांच्या साऱ्या मतांचा उगम वेदांत ह्मणजे उपनिषद्ग्रंथ यांजपासूनच झाला आहे; तथापि सध्यां वेदांत या नांवानें अद्वैत मताचाच संबोध होतो. अद्वैत मताची उभारणी उपनिषद् ग्रंथांवांचून दुसऱ्या कोणत्याही आधारावर झालेली नाहीं. कालेंकरून वेदांत धर्मांचा विजय सर्वत्र झाला आणि सध्यां जितके पंथ अस्तित्वांत आहेत तितक्या साऱ्यांचा उगम मुख्यतः वेदांतांतूनच झालेला आहे. तथापि अशा स्थितींत सुद्धां या साऱ्या मतांचें पूर्ण ऐक्य आहे असें नाहीं.

वेदांत मतांत मुख्यतः तीन प्रकार आहेत. एका बाबतींत या सर्वांचें एकमत आहे. ती बाब ह्मणजे परमेश्वराचें अस्तित्व ही होय. परमेश्वराचें अस्तित्व

या तिघांसही मान्य आहे. त्याचप्रमाणें श्रुति ही ईश्वरदत्त आहे असेंही हे तिन्ही पंथ मानतात; तथापि ख्रिस्ती अथवा मुसलमानी धर्म ज्या अर्थानें बायबलाला अथवा कुराणाला ईश्वरप्रणीत मानतात तो अर्थ मात्र येथें लागू करावयाचा नाहीं हें येथें लक्ष्यांत ठेवलें पाहिजे. श्रुतिप्रामाण्याची यांची भावना ख्रिस्ती अथवा मुसलमानी धर्मानुयायांपेक्षां वेगळ्या प्रकारची आहे. वेद म्हणजे परमेश्वरविषयक ज्ञानाचें प्रत्यक्षरूप असून ज्या अर्थी परमेश्वर अनंत आहे त्या अर्थी हें ज्ञानही सदोदित त्याबरोबर असून त्याला अंत असा कधींच होत नाहीं, अशी वेदांताची कल्पना आहे. त्याचप्रमाणे उत्पत्तीनंतर प्रलय व प्रलयानंतर पुन्हां उत्पत्ति अशा रीतीनें सृष्टि अखंड मंडलाकार आहे या मताबद्दलही या तिहींची एकवाक्यता आहे. सर्व सृष्टि प्रत्यक्ष दिसूं लागते आणि नंतर दृष्टिआड होते. ती प्रत्यक्ष होत असतां हळू-हळू अधिकाधिक जड होत जाते आणि पुष्कळ कालानंतर ती पुन्हां हळूहळू सूक्ष्मरूप घेत जाते आणि शेवटीं अत्यंत सूक्ष्म होऊन आपल्या मूळच्या रूपास परत जाते व पुढें थोडा काळ पूर्ण शांततेचा असतो. पुन्हां ती सूक्ष्म सृष्टि दृश्यत्वास येऊं लागते व पूर्वीप्रमाणेंच ती निरनिराळ्या पायऱ्यांनीं सारीं रूपें धारण करते. मूलद्रव्य आकाश हें असून त्याचें साम्य हल्लींच्या आधिभौतिक शास्त्र्यांच्या ईथरशीं आहे. आकाश हें पहिलें जड तत्त्व असून त्याबरोबर प्राण हें शक्तीचें स्वरूप असतें. या प्राणाच्या स्पंदांमुळेंच सारें विश्व दृश्य स्वरूपास येऊन स्पष्ट होऊं लागतें असें वेदांती सांगतात. अशा रीतीनें एक मंडल पुरें झालें म्हणजे सृष्टींतील सर्व स्पष्ट रूपें हळूहळू सूक्ष्म होत जातात आणि अखेरीस त्या सर्वांचे रूपांतर आकाश या एकाच सूक्ष्म तत्त्वांत होतें. आकाश तत्त्व हें दृश्य नाहीं अथवा स्पर्शानेंही तें जाणतां येण्याजोगें नाहीं; तथापि सर्व सृष्टीची उत्पत्ति त्यांतूनच झाली आहे असे वेदांत सांगतो. सृष्टींत शक्तीचे जितके प्रकार अवलोकनांत येतात ते सारे प्राणापासून उद्भवले आहेत. गुरुत्वाकर्षण, आकुंचन, प्रसरण, विचार, कल्पना, भावना, ज्ञानतंतूचे स्पंद हे सारे शक्तीचे वेगवेगळे प्रकार प्राणस्पंदांपासूनच उद्भवले आहेत. प्रलयकालीं हीं वेगवेगळीं स्वरूपें हळूहळू लय पावत जाऊन अखेरीस प्राणशक्तींत लीन होतात आणि प्राणशक्तीचे स्पंद बंद होतात. अशा शांत स्थितींत कांहीं काळ लोटतो. पुढें नव्या सृष्टीस सुरवात होण्याची वेळ

आली ह्मणजे प्राणाचे स्पंद पुन्हां सुरू होतात व या स्पंदांचा परिणाम आकाश तत्त्वांवर घडून पूर्वींचे अनेकविध आकार पुन्हां स्पष्टत्वास येऊं लागतात.

वेदांत धर्मात अंतर्भूत असलेल्या ज्या तीन प्रमुख मतांचा उल्लेख अगोदर केला त्यांपैकीं द्वैतमताचें विवेचन मी आतां करणार आहें. या विश्वाचा उत्पन्नकर्ता व शास्ता परमेश्वर हा असून तो सृष्टीहून सदोदित भिन्न आहे आणि याचप्रमाणें मानवी जीवात्म्याहूनही तो सदोदित भिन्न रूपानेंच राहतो. ईश्वर अनंत आहे, त्याचप्रमाणें सर्व सृष्टि आणि सर्व जीवात्मेही तसेच अविनाशी आहेत. सृष्टि आणि जीवात्मे व्यक्त दशेस येतात आणि वारंवार बदलतात; पण परमात्मा सदोदित एकरूप आहे. परमेश्वर वैय्यक्तिक स्वरूपाचा आहे आणि तो शरीरधारी नसतांही विशिष्ट गुणांनीं युक्त आहे, असेंही द्वैत पंथाचें मत आहे. तो दयाशील आहे, तो न्यायी आहे, तो सर्वशक्तिमान् आहे; त्याची प्रार्थना करतां येते, भक्ति करतां येते आणि तोही भक्तावर प्रेम करतो. अशा प्रकारें कांहीं मानुषी गुणांचा आरोप द्वैतमतवादी परमेश्वरावर करितात. थोडक्यांत बोलावयाचें ह्मणजे द्वैतमतवाद्यांचा परमेश्वर मानुषी स्वरूपाचा आहे. फरक इतकाच कीं सामान्य मनुष्याहून तो अनंत पटीनें श्रेष्ठ आहे. मनुष्यांत दिसणारे अथवा संभवणारे कोणतेही दुर्गुण त्याच्या ठिकाणीं नाहींत. उत्तमोत्तम गुणांचा तो निधि आहे अशी त्याची व्याख्या द्वैतवादी करतात. जड पदार्थांच्या अस्तित्वावांचून त्याला सृष्टिरचना करतां येत नाहीं आणि प्रकृती या जड पदार्थांपासून सारें विश्व तो उत्पन्न करतो. या पंथाशिवाय परमाणुवादी या नांवाचा आणखीही एक द्वैतपंथ अस्तित्वांत आहे. या पंथाला श्रुति प्रमाणभूत नाहीं. या पंथाच्या मतें सृष्टि ह्मणजे अनंत परमाणूंचा समुद्र असून परमेश्वराच्या इच्छाशक्तीचा परिणाम या परमाणूवर घडून त्यापासून विश्वाची उत्पत्ति होते. श्रुतीला प्रमाण मानणाऱ्या पंथांना हा परमाणुवाद मान्य नाहीं. परमाणुवाद युक्तीला आणि तर्काला अगदीं सोडून आहे असें वेदांत्यांचें म्हणणें आहे. भूमितींत बिंदूचें अस्तित्व ज्याप्रमाणें केवळ मानींव आहे त्याचप्रमाणें परमाणु हेही केवळ मानीव स्वरूपाचे आहेत. त्यांना आकार नाहीं, परीघ नाहीं अथवा त्यांचे विभागही पाडतां येत नाहींत. ज्याला भाग नाहीं, जो शुद्ध निरवयव आहे त्यापासून कोणत्याही सावयव पदार्थांची उत्पत्ति होणें शक्य नाहीं. शून्यांचे कितीही पुंज्य घेतले आणि

त्यांची मिळवणी केली तथापि त्यांची अखेरची बेरीज शून्य हीच. त्यांच्या बेरजेंतून एकाही पूर्ण अंकाची उत्पत्ति होणें शक्य नाहीं. त्याचप्रमाणें परमाणु विभाज्य नसतील आणि त्यांना परीघ नसेल तर त्यांपासून विश्वाची उत्पत्ति होणें ही गोष्ट केवळ असंभवनीय कोटींतील आहे. याकरितां वेदांती, द्वैतवादी हा परमाणुवाद बाजूस सारून मूल प्रकृतीपासून विश्वाची उत्पत्ति परमेश्वर करतो असें म्हणतात. हिंदुस्थानांतील बहुतेक लोक याच मतास अनुसरणारे आहेत. सामान्य प्रतीच्या मनुष्यस्वभावाला याहून उच्चतर रूपाचें आकलन करतां येणें शक्य नाहीं. ज्यांना धर्म ह्मणून कांहीं आहे असे अखिल मानवजातीपैकीं शेंकडा नव्वद लोक खरोखर द्वैतवादीच असतात असें आपणास आढळून येईल. मूल प्रकृतीपासून परमेश्वर विश्व निर्माण करतो असें द्वैतवाद्यांचें मत आहे. युरोपांतील सर्व धर्म आणि पश्चिम आशियांतील धर्मही सारे द्वैतवादी आहेत. आणि असें असणें हेंही योग्यच आहे. कारण ज्याला प्रत्यक्ष स्वरूप नाहीं अशा केवल रूपाचें आकलन सामान्य मनुष्याला करतां येणें शक्य नाहीं. यामुळें बुद्धिग्राह्य अशा वस्तूला तो चिकटतो हें स्वाभाविकच आहे. याचा अर्थ हाच कीं धर्मविषयक अत्युच्च कल्पनांना उच्च पायरीवरून तो खालीं ओढतो आणि त्यांना स्वतःच्या मनःस्थितीस आकलन करतां येईल असें स्वरूप त्यांना मनुष्यप्राणी देत असतो. केवल प्रमेयांचें रूपांतर प्रत्यक्ष सिद्धांतांत केल्यानंतरच मनुष्यबुद्धीस त्यांचें आकलन होतें. जगावरील सामान्य बुद्धीच्या साऱ्या मनुष्यांचा धर्म हाच आहे. स्वतःपासून अगदीं विभक्त आहे अशा स्वरूपाच्या परमेश्वरावरच त्यांचा भरंवसा बसतो. परमेश्वर हा जणूं काय एक मोठा राजा, एक प्रचंड सत्ताधारी चक्रवर्तीच आहे. तथापि अशा रीतीनें परमेश्वराला मानवी रूप देत असतांही पृथ्वीवरील राजांहून त्याचें स्वरूप अधिक शुद्ध राखण्याकडे मानवी मनाचा कल असतो. मनुष्याच्या दृष्टीनें वाईट म्हणून ठरलेले सारे गुण वजा करून आणि सर्व चांगले गुण एकच करून परमेश्वराचें स्वरूप तो बनवीत असतो. वाईटाच्या यत्किंचितही भेसळी वांचून शुद्ध चांगुलपणाचें अस्तित्व जणूं काय शक्यच आहे असें सामान्य मानवी मनास वाटतें. काळोखाच्या अनुभवाशिवाय उजेडाची कल्पना करतां येणें त्याला शक्य वाटतें हें आश्चर्य नव्हे काय ?

सर्व प्रचलित द्वैतमतांचें पर्यालोचन केलें तर एक मोठीच अडचण आरंभीं आपल्या अनुभवास येते ती अडचण अशीः—परमेश्वर न्यायी आणि दयाशील आहे आणि सर्व सद्गुणांचा तो निधि आहे अशा स्थितींत त्याच्या अमलाखालीं इतक्या दुष्ट गोष्टींचा उद्भव जगांत झाला तरी कसा ? जगांतील सर्व द्वैतधर्मांना ही अडचण भासलेली आहे; तथापि तिच्या उत्तरादाखल हिंदूंनीं सैतानाची निष्पत्ति मात्र केली नाहीं हें लक्ष्यांत ठेवण्यासारखें आहे. जगांतील वाईट गोष्टींचें माप त्या सर्वांनीं मनुष्याच्याच पदरांत घातलें आहे आणि असें करणें हें त्यांना फार सोपेंही आहे. असें कां ? याचें कारण हेंच कीं अभावापासून भावरूप आत्म्याची उत्पत्ति होते हें तत्त्व हिंदूंच्या गळीं कधींही उतरलेलें नाहीं. केवळ आपल्या चालू आयुष्यापुरता विचार आपण केला तरी आपला भावी आयुष्यक्रम आपणासच ठरवितां येतो हा अनुभव प्रत्यहीं आपणासच येतो. उद्यां आपला जीवनक्रम कसा असावा याची योजना आपणांपैकीं प्रत्येकजण आजच करीत असतो. आपलें उद्यांचें नशीब आपण आजच बनवीत असतों. परवांचें भविष्य आपण उद्यां ठरवूं. आणि हाच क्रम अव्याहत चालू असतो. आतां हीच विचारसरणी पुढें लांबवितां येणें अथवा गतगोष्टींस ती लागू करणें अगदीं शक्य आहे. आपल्या स्वतःच्या कृत्यांनीं आपलें भविष्यत्कालचें नशीब जर आपणास आज ठरवितां येतें तर हाच नियम गतगोष्टींसही लागू करण्यास काय हरकत आहे ? लांबचलांब सांखळींतले कांहीं दुवे आपल्या नजरेस पडले आणि याच दुव्यांचें पुनरागमन वारंवार होत असतें असें आपणास दिसून आलें तर या अनुभवावरून साऱ्या सांखळीची परीक्षा आपणास झाली असें म्हणतां येणार नाहीं काय ? अशाच रीतीनें अनंतकालाच्या पोटांतला एखादा तुकडा आपणास वेगळा पाडतां आला आणि तेवढ्या तुकड्यांतील कार्यकारणसंबंध आपणास अजमावितां आले तर तेवढ्यावरून अनंतकालाच्या सांखळीची परीक्षा आपणास अवश्य करतां येईल. आपला भावी आयुष्यक्रम आपणास आज ठरवितां येतो ही गोष्ट चालू आयुष्यांतील अनुभवानें खरी ठरत असेल तर तिजवरून अखंड कालश्रृंखलेचें बरोबर अनुमान आपणास करतां येणें अगदीं शक्य आहे. प्रत्येक कार्याला कारण असतेंच हा सिद्धांत खरा असेल ( आणि तो खरा आहे असा आपला अनुभव आहे ) तर आपलें जें कांहीं स्वरूप आज-

मितीस कार्यरूपानें आपल्या अनुभवास येत आहे तें आपल्या पूर्वींच्या गत-कारणाचेंच व्यक्त स्वरूप असलें पाहिजे. याकरितां मानवी जातीची जी कांहीं बरीवाईट स्थिति असेल तिचें कारण शोधण्यास बाहेर कोठेंही जावयास नको. बाहेरची एखादी व्यक्ति उठली आणि मनुष्याच्या स्थितींत तिनें ढवळाढवळ केली असें मानण्याचें प्रयोजन आपणास मुळींच नाहीं. मनुष्याच्या बऱ्या-वाईट परिस्थितीची सारी जबाबदारी त्याजवरच आहे. जगांत वाईट ह्मणून जें कांहीं आपल्या अनुभवास येतें तेंही आपल्या स्वतःच्याच कर्तबगारीचें फळ आहे. आपणच या साऱ्या वाईटपणाचे ब्रह्मदेव आहों. मनुष्याच्या स्वतःच्या दुष्टपणानेंच नव्या दुष्टपणाची उत्पत्ति जगांत केली आहे. द्वैत-मताप्रमाणें या दुष्टपणाचा दोष परमेश्वराकडे जात नसून सर्वांशीं मनुष्या-च्याच पदरीं तो पडतो. जसें पेरावें तसें उगवतें हाच न्याय येथेही पूर्णपणें लागू पडतो.

प्रत्येक जीवात्मा अखेरीस मुक्त होईल असेंही द्वैतवाद्यांचें एकमत आहे. या मुक्तींतून कोणीही वगळला जाणार नाहीं. अनेक प्रकारच्या बऱ्यावाईट परिस्थितींतून आणि अनेक प्रकारच्या सुखदुःखांच्या अनुभवांतून तावून-सुलाखून प्रत्येक जीवात्मा या संसारचक्रांतून अखेरीस बाहेर पडेल. हिंदु-धर्मांतील अनेक मतांची एकवाक्यता ज्या एका गोष्टीबद्दल आहे ती गोष्ट ही कीं प्रत्येक जीवात्म्याला या विश्वचक्रांतून बाहेर पडलें पाहिजे. जें विश्व आज आपणास आपल्या दृष्टीसमोर दिसत आहे तें अथवा जें आपण कल्पूं शकतों तें कल्पनामय विश्व हीं दोन्हीही सत्यस्वरूपाचीं असूं शकणार नाहींत. कारण या दोहोंतही चांगलें आणि वाईट या दोहोंचें मिश्रण झालेलें आहे. याकरितां या दोहोंपैकीं एकही विश्व सत्यस्वरूपाचें नाहीं; तथापि द्वैतवाद्यांच्या मताप्रमाणें या विश्वापलीकडे एक पूर्ण सुखमय स्थान आहे. या ठिकाणीं जीवात्मा पोहोंचला ह्मणजे त्याला पुन्हां जन्ममृत्यूच्या फेऱ्यांत सांपडावें लागत नाहीं. या ठिकाणीं परमेश्वराच्या सन्निध अखंड सुखांत तो राहतो. ज्या ठिकाणीं दुःखाचें वारेंही पोहोंचूं शकत नाहीं अशा ठिकाणीं आ–ब्रह्म–कीटक सर्व प्राणी अखेरीस पोहोंचतील असें द्वैतवाद्यांचें ह्मणणें आहे; तथापि आमच्या या जगाला शेवट येईल असें नाहीं. लाटा ज्याप्रमाणें मागें पुढें होत असतात त्याचप्रमाणें जगाच्या स्वरूपांत भरती ओहोटी झाली तरी त्याचा नाश

होणार नाहीं. भरती मागून ओहोटी व ओहोटीमागून पुन्हां भरती हाच क्रम अखंड राहील. जीवात्मे अनंत असल्यामुळें इतकें सर्व पूर्णावस्थेस येईपर्यंत आणि इतके सर्व मुक्त होईपर्यंत जग चालेल असें द्वैतवादी ह्मणतात. जीवात्म्याचें स्वरूप अनेक प्रकारचे आहे. झाडाझुडपांच्या रूपानें ते आहेत, क्षुद्र कीटकांच्या रूपानें ते आहेत, मनुष्यांच्या रूपानें आहेत आणि देवदेवतांच्या रूपानेंही आहेत; तथापि हे सारे जीवात्मे अपूर्ण स्थितींत आहेत. अत्युच्च देवताही अपूर्ण स्थितींतच आहेत. हे सर्व बद्धावस्थेंतील जीवात्मे आहेत. हे बंधन कोणतें ? हें बंधन जन्ममृत्यूचें होय. यांतील प्रत्येकाला जन्मलें पाहिजे आणि मेलेंही पाहिजे. अत्युच्च प्रतीच्या देवदेवतांनाही मृत्यु अखेरीस गांठतोच. देवता म्हणजे काय ? देवता ही पूर्णत्वाकडे जाणाऱ्या रस्त्यावरील एक मुक्कामाची जागा आहे. पूर्णत्वाच्या शिखराकडे जाणाऱ्या सोपानपरंपरेंतील ही एक पायरी आहे. एखादा जीवात्मा कांहीं सुकृतानें सामान्य मनुष्याहून वरच्या कोटीला गेला ह्मणजे विश्वनियमांतील एखादा अधिकार त्याला प्राप्त होतो; आणि एक कल्प पुरा होईपर्यंत त्या अधिकारावर विश्वनियमाच्या अनेक कार्यांतील एक तो करीत असतो. कल्पांत झाला ह्मणजे त्याचाही अधिकार संपुष्टांत येऊन मृत्युवश होत्साता तो मानव योनींत पुन्हां जन्म घेतो. नव्या कल्पाच्या वेळीं पूर्व कल्पांतील पुण्यवान् लोक देवांच्या पदवीस चढून विश्वनियमनाचें कार्य करितात. साऱ्या देवांची स्थिति हीच आहे. देव ह्मणजे कांहीं विशिष्ट अधिकारावरील व्यक्ति. यावांचून दुसरें अधिक महत्व त्यांस नाहीं. लक्षावधि मनुष्यें अशा रीतीनें देवांच्या पदवीस पोहोंचत असतात आणि मनुष्य योनीला पुन्हां परत येत असतात. या जगांत कांहीं मनुष्यें सत्कार्य करीत असतांना आढळतात; तथापि तीं कार्यें अहेतुक नसतात. कांहीं तरी लाभाची लालुच अशा माणसांना असते. त्यांचा एक डोळा सत्कार्याकडे आणि दुसरा त्याच्या बक्षिसाकडे लागलेला असतो. आपल्या बांधवांस ते मदत करीत असतात आणि त्याच वेळीं त्यांचें मन स्वर्गसुखाकडे ओढ घेत असतें. दुसरे कित्येकजण केवळ लोकांच्या स्तुतीसाठींच सत्कार्यें करीत असतात. अशा मनुष्यांना त्यांच्या सत्कर्माचें प्रतिफल मिळावें हें योग्यच आहे. अशीं माणसें मृत्यु पावलीं ह्मणजे देवयोनींत तीं जन्म पावून स्वर्गास जातात; पण देवयोनींत जन्म पावणें म्हणजे मुक्त होणें नव्हे

आपल्या कर्माबद्दल प्रतिफल मिळावें अशी अपेक्षा चित्तांत आहे तोंवर मुक्तिलाभ होणें शक्य नाहीं. मनुष्याला होणाऱ्या सर्व इच्छा परमेश्वर पुऱ्या करीत असतो. मनुष्याला सामर्थ्याची इच्छा असते; त्याला बडेजाव हवा असतो आणि उच्च प्रतीचीं इंद्रियजन्य सुखेंही त्याला हवीं असतात. त्याच्या कर्मांच्या योग्यतेप्रमाणें या साऱ्या वस्तूंची प्राप्ति त्याला होत असते; पण कर्माचें फळ कधींही चिरकालीन रूपाचें असूं शकणार नाहीं. कालांतरानें तें अवश्य क्षीण होणारच. हा काल कदाचित् पुष्कळ दीर्घ असेल. तें कदाचित् दहावीस युगेंही टिकेल. तथापि तें क्षीण होण्याचा काळ केव्हां तरी अवश्य येणारच आणि असा काळ आला म्हणजे पुण्यक्षय होऊन देवांना मृत्युलोकांत पुन्हां येणें भाग पडतें. येथें मानवजन्म पुन्हां प्राप्त झाला म्हणजे मुक्त होण्याची संधि त्यांस आणखी एकवार मिळते. क्षुद्र कीटकही मनुष्ययोनींत येतात. कदाचित् ते देवही होतात आणि पुन्हां मनुष्ययोनींत येऊन कदाचित् पशुयोनीस पुन्हां परत जातात. अशा रीतीनें सर्व इच्छांचें पूर्ण निरसन होईपर्यंत हा क्रम अखंड चालतो. मी आणि माझें ही कल्पना नष्ट होईपर्यंत कोणासही मुक्तिलाभ होत नाहीं. जगांत वाईट म्हणून जितकें कांहीं आढळतें त्या साऱ्याचें मूळ मी आणि माझें या दोन शब्दांत आहे. एखाद्या ईश्वरभक्त द्वैतवाद्याला ‘ हें मूल तुमचेंच काय ? ’ असा प्रश्न तुम्ही केला तर तो म्हणेल ‘ हें माझें नव्हे, हें परमेश्वराचें आहे. हें घरदारही माझें नव्हे, या विश्वांतील प्रत्येक वस्तु देवाची आहे.’

हिंदुस्थानांतील द्वैतवादी हे पक्के वनस्पत्याहारी आहेत. कोणत्याही प्राण्याचा वध करूं नये असें त्यांचें मत आहे. पण या बाबींत बौद्धमताहून त्यांचा मुद्दा मात्र वेगळा आहे. कोणत्याही प्राण्याची हत्या कां करूं नये असा प्रश्न एखाद्या बौद्धाला केला तर तसें करण्याचा अधिकार मला नाहीं असें उत्तर तो देईल; पण हाच प्रश्न द्वैतवाद्याला तुम्हीं केला तर तो म्हणेल सर्व प्राणी परमेश्वराचे आहेत. अशा रीतीनें मी आणि माझें यांचें पूर्ण रूपांतर तूं आणि तुझें यांत झालें पाहिजे असें द्वैतवाद्यांचें म्हणणें आहे. विश्वांतील कोणतीही वस्तु माझी असें म्हणण्याचा अधिकार फक्त परमेश्वरालाच आहे. ज्यावेळीं मी आणि माझें या भावना हृदयांतून गळून जातात, ज्यावेळीं आपलें सर्वस्व एखादा मनुष्य परमेश्वराला अर्पण करितो, ज्यावेळीं व्यक्तिमात्रावर

तो प्रेम करूं लागतो, ज्यावेळीं एखाद्या क्षुद्र पशूसाठींसुद्धां आपल्या प्राणाची आहुति देण्यास तो तयार होतो आणि ज्यावेळीं कोणत्याही कर्मांच्या प्रतिफलाची अपेक्षा तो बाळगीनासा होतो तेव्हां त्याचें हृदय शुद्ध झालें आहे असें समजावें; आणि अंतःकरण असें शुद्ध झालें ह्मणजे परमेश्वराची भक्ति तेथें प्रवेश करील. सर्व जीवात्म्यांनीं प्रेम करावें असा मध्यवर्ती बिंदु परमेश्वर हाच आहे. 'एखाद्या सुईला चिखल लागलेला असतां तिला लोहचुंबकाचें सान्निध्य झालें तरी त्याला ती चिकटणार नाहीं; पण तो चिखल निघून जाऊन सुई स्वच्छ झाली ह्मणजे ती सुई चुंबकाकडे त्वरित ओढली जाते.' या उदाहरणार्थ द्वैतवाद्यांनीं आपलें मत व्यक्त केलें आहे. परमेश्वर हा चुंबक मण्यासारखा असून जीवात्मा सुईसारखा आहे. या सुईवर दुष्कृत्यांच्या चिखलाचा डाग पडलेला आहे. त्या चिखलानें ती सुई सारी झांकून गेली आहे. हा चिखल निघून जाऊन सुई शुद्ध झाली म्हणजे परमेश्वराकडे जाण्याची तिची नैसर्गिक पद्धति आपोआप जागृत होईल. ती त्याला जाऊन चिकटेल आणि अखंड त्याजपाशीं राहील; तथापि त्याच्याशीं ती एकरूप न होतां तिचें भिन्नपण अखंड कायम राहील. पूर्णत्व पावलेल्या जीवात्म्याला स्वेच्छेनुरूप देह धारण करतां येतो. त्याला वाटल्यास तो शेंकडों देह धारण करील अथवा वाटल्यास एकही धारण करणार नाहीं. सृष्टि निर्माण करण्याच्या सामर्थ्याशिवाय परमेश्वराचें बाकीचें सारें सामर्थ्य त्याला प्राप्त होतें. सृष्टि निर्माण करण्याचें सामर्थ्य फक्त परमेश्वराचेंच आहे. कोणी जीवात्मा पूर्णत्व पावला तरी विश्वनियमनाचें सामर्थ्य त्याला प्राप्त होत नाहीं. हें सामर्थ्य एका परमात्म्याला मात्र आहे; तथापि जीवात्मे पूर्णावस्था पावले म्हणजे त्यांना अखंडसुखाचा लाभ होऊन परमेश्वराचें सान्निध्यही त्यांना अखंड घडतें. अशा प्रकारचा द्वैतमताचा थोडक्यांत निष्कर्ष आहे.

तथापि द्वैतवाद्यांच्या आणखीही एका मताचा उल्लेख येथें करणें इष्ट आहे. कोणत्याही वस्तूसाठीं परमेश्वराची प्रार्थना करणें अथवा कोणतीही वस्तु त्याजवळ मागणें द्वैतमतवाद्यांच्या मतें इष्ट नाहीं. कोणतीही जड वस्तु मागावयाचीच झाली तर तिची याचना परमेश्वरापाशीं न करतां वाटल्यास क्षुद्र देवदेवतांपाशीं तिची याचना करावी असें ते म्हणतात. परमेश्वरावर निष्काम प्रेम मात्र असावें असें त्यांचें ह्मणणें आहे. 'परमेश्वरा मला अमुक दे अथवा

तमुक दे असें म्हणणें म्हणजे परमेश्वराचा उपहास करणें होय असें ते म्हणतात. आपणास लागणारी वस्तु क्षुद्र देवदेवतांपाशीं मागितल्यास ती त्यांजपासून केव्हांतरी मिळेल; पण मुक्तिलाभ त्यांच्यानें कधींही देववणार नाहीं. ज्याला मुक्तिलाभ करून घ्यावयाचा असेल त्यानें परमेश्वराची भक्ति निष्काम चित्तानें केली पाहिजे. हिंदुस्थानांतील कोट्यवधि सामान्य जनता ज्या मतानुसारें चालते तें द्वैतमत अशा प्रकारचें आहे.

या पुढें विशिष्टाद्वैत मताला आणि त्याबरोबरच खऱ्या वेदांत तत्त्वज्ञानालाही प्रारंभ होतो. कारण आणि कार्य हीं परस्परांपासून भिन्नस्वभाव नाहींत असें विशिष्टाद्वैतवाद्यांचें मत आहे. कारण निराळ्या रूपानें अवतरलें म्हणजे तेंच कार्यरूप होतें. विश्व हें कार्य आणि परमेश्वर हें कारण असें म्हटलें तर विश्व आणि परमेश्वर यांच्यांत स्वभावतः कांहीं अंतर असणें शक्य नाहीं. याकरितां हीं दोन्ही वस्तुतः एकरूपच असलीं पाहिजेत. याकरितां परमेश्वर हा विश्वाचें उपादानकारण आणि निमित्तकारणही परमेश्वरच असला पाहिजे या पायावर विशिष्टाद्वैत मताची उभारणी झाली आहे. या विश्वाचा उत्पन्नकर्ता तो असून स्वतःतूनच त्यानें विश्व निर्माण केलें असें ते म्हणतात. येथें उत्पन्न करणें हा शब्द सशास्त्र नाहीं हें लक्ष्यांत ठेवलें पाहिजे. मूळ कोणतीही वस्तु नसतां केवळ शून्यांतून परमेश्वरानें विश्व उत्पन्न केलें या पाश्चात्यांच्या कल्पनेचा मागमूस हिंदुस्थानांत कोठेंही सांपडावयाचा नाहीं. अशा मताचा एखादा पंथ प्राचीन काळीं केव्हां अस्तित्वांत असलाच तर सांप्रत त्याचा कोठें मागमूसही राहिलेला नाहीं. असें मत धारण करणारा एकही पंथ हिंदुस्थानांत असल्याचें माझ्या ऐकिवांत नाहीं. निर्माण करणें याचा अर्थ अस्पष्टत्वांतून स्पष्टत्वास आणणें एवढाच आम्ही समजतों. सर्व विश्व म्हणजे स्वतः परमेश्वरच आहे असें विशिष्टाद्वैतवाद्यांचें मत आहे. विश्वाचें तो उपादान कारण आहे. 'एखादा कोळी स्वतःच्या शरिरांतून तंतू काढून ज्याप्रमाणें आपलें जाळें विणतो त्याचप्रमाणें हें सारें विश्व परमेश्वरांतून निर्माण झालें' अशा अर्थाचे एक श्रुतिवचन आहे.

कार्य हें कारणाचेंच व्यक्तरूप असेल तर या विश्वाचें असें केवळ जड आणि चैतन्यविहीन रूप कां? असा प्रश्न उद्भवतो. परमेश्वर शुद्ध चैतन्यरूप आहे. तोच या विश्वाचें कारण असेल तर चैतन्यस्वरूप कारणांतून शुद्ध जड-

रूप कार्य कसें उद्भवलें ? कारण शुद्ध आणि पूर्णरूप असतां कार्य मात्र त्यापासून अगदीं भिन्न स्वभावी झालें हें कसें ? यावर विशिष्टाद्वैतवादी एक चमत्कारिक उत्तर देत असतात. परमात्मा, सृष्टि आणि जीवात्मा हीं तीन विभक्त रूपें नसून वस्तुतः तें एकरूपच आहे असें ते ह्मणतात. परमेश्वर हा आत्मरूप असून सृष्टि आणि जीवात्मे हा त्या परमेश्वराचा जड देह आहे. ज्याप्रमाणें मला शरीर आणि जीवात्मा हीं आहेत त्याचप्रमाणें त्या परमात्मरूप परमेश्वराला सृष्टि आणि जीवात्मे हीं आहेत. अशा रीतीनें या विश्वाचें उपादान कारणही परमेश्वरच आहे असें विशिष्टाद्वैतवादी सांगतात. देह बदलत गेला तरी त्यामुळें जीवात्म्याच्या स्वरूपांत बदल होत नाहीं हें आपणास ठाऊक आहेच. शरीर तरुण असलें अथवा वृद्ध असलें, अशक्त असलें अथवा सशक्त असलें तरी त्यामुळें आत्मरूपांत फरक होत नाहीं. अनेक शरीरें जातात व येतात तथापि तो एकरूप आत्मा अभेद्य राहून या अनेक शरिरांच्या द्वारें व्यक्त दशेस येत असतो. शरीरें कितीही आलीं आणि गेलीं तरी तो अनंत आत्मा सदोदित एकरूपच असतो. शरिरांबरोबर त्याच्या स्वरूपांत बदल होत नाहीं. अशाच रीतीनें विश्व हें परमेश्वराचें शरीर असल्यामुळें त्या दृष्टीनें तें परमेश्वरस्वरूपच आहे. तथापि विश्वाच्या स्वरूपांत होणाऱ्या फरकामुळें परमेश्वराच्या स्वरूपांत मात्र फरक होत नाहीं. हें विश्व तो निर्माण करतो आणि कल्पाच्या शेवटीं या परमात्मदेहाचें आकुंचन होऊन त्याचें स्वरूप अधिक विरल होतें आणि नव्या कल्पाच्या सुरवातीच्या वेळीं त्याचा विस्तार पुन्हां होऊं लागून त्यांतून अनेक जगें निर्माण होतात.

द्वैतवादी आणि विशिष्टाद्वैतवादी या दोघांचेंही एका गोष्टीबद्दल ऐकमत्य आहे. जीवात्मा हा स्वभावतः पवित्र असून स्वतःच्याच कर्मविपाकामुळें तो अशुद्ध होतो हें दोघांसही मान्य आहे. ही कल्पना दोघांनीं दोन प्रकारें व्यक्त केली आहे. यांत विशिष्टाद्वैतवाद्यांचा प्रकार अधिक सुंदर आहे. जीवात्म्याचें शुद्धत्व आणि पूर्णत्व हीं आकुंचन पावतात असें विशिष्टाद्वैतवादी म्हणतात. सांप्रतच्या आपल्या स्थितींत आपलें हें मूळचें पूर्णत्व आणि विशुद्धत्व आकुंचन पावलें असून सध्यांची आपली सारी खटपट हें पूर्णत्व व्यक्त दशेला आणण्यासाठींच चालली आहे. जीवात्म्यांना अनेक प्रकारचे गुण आहेत असें विशिष्टाद्वैताचें मत आहे. तथापि या गुणांत सर्व शक्तिमत्त्वाचा अथवा सर्व-

ज्ञत्वाचा अंतर्भाव मात्र होत नाहीं असें ते म्हणतात. प्रत्येक दुष्ट कृत्यामुळें जीवात्म्याचें स्वाभाविक रूप आकुंचन पावतें आणि प्रत्येक सत्कृत्यांनीं त्याचा विस्तार होत असतो असें त्यांचें मत आहे. सारे जीवात्मे परमेश्वराचेच अंश होत. मोठ्या पेटलेल्या अग्नींतून लक्षावधि स्फुलिंग जसे उसळत असतात त्याचप्रमाणें परमात्म्यांतून हे अनंत जीवात्मे निर्माण झाले आहेत तर, अग्नीची मोठी ज्वाला आणि तिच्यांतून निघालेला स्फुलिंग यांच्या मूळ स्वभावांत ज्याप्रमाणें कांहींच फरक नाहीं त्याचप्रमाणें अनंतरूप परमात्म्यांतून निघालेले हे जीवात्मेही स्वभावतः परमात्मरूपाचेच अंश आहेत. विशिष्टाद्वैतवाद्यांचा परमेश्वर द्वैतवाद्यांप्रमाणेंच व्यक्तिरूपाचा आहे. द्वैतवाद्यांच्या परमेश्वराप्रमाणेंच त्याच्या ठिकाणींही अनेक सद्गुणांचें भांडार आहे. या दोन मतांत फरक इतकाच कीं विशिष्टाद्वैतवाद्यांचा परमेश्वर द्वैतवाद्यांच्या परमेश्वराप्रमाणें विश्वबाह्य नसून तो विश्वांतच भरून राहिला आहे. तो प्रत्येक वस्तूंत आणि प्रत्येक ठिकाणीं आहे. ज्या ठिकाणीं तो नाहीं असें एक स्थल अथवा असा एक अणुही या विश्वांत कोठें नाहीं. जीवात्मे हे परमात्म्याप्रमाणें अनंतस्वरूपाचे नाहींत. ते सारे समर्याद आहेत. ते सर्वव्यापी नाहींत. ते पूर्ण शक्तिमान् होऊन आपल्या पूर्णरूपास पुन्हां गेले म्हणजे त्यांच्या मागचें जन्म मरणाचे चक्र सुटून अनंतकाल ते परमेश्वरापाशी राहतात असा विशिष्टाद्वैतवाद्यांच्या मताचा निष्कर्ष आहे.

द्वैत आणि विशिष्टाद्वैत यांचा विचार येथवर केल्यानंतर आतां अद्वैताकडे आपण वळूं. कोणत्याही देशांत आणि कोणत्याही काळीं अद्वैततत्त्वज्ञानाइतकें उच्च ज्ञान आजपर्यंत निर्माण झालेलें नाहीं. धर्म व ज्ञान यांच्या वृक्षाचा हा जणूं काय मोहोरच आहे. या ठिकाणीं मनुष्यज्ञानाची केवळ परमावधि झाली असून आजपर्यंत अगम्य म्हणून वाटणाऱ्या गोष्टी अद्वैत सिद्धांतामुळे करतलामलकवत् स्पष्ट झाल्या आहेत. अद्वैत सिद्धांत अत्यंत उच्च आणि केवळ तात्त्विक स्वरूपाचा असल्यामुळें तो सामान्य मनुष्याच्या बुद्धीच्या आटोक्यांत येऊं शकत नाहीं. आणि यामुळें तो सामान्यजनतेचा धर्म होऊं शकत नाहीं. हिंदुस्थान ही अद्वैत सिद्धांताची जन्मभूमि. या ठिकाणीं गेलीं तीन हजार वर्षें त्याचें अव्याहत साम्राज्य सुरू आहे. तथापि असें असतांही जनसमाजाच्या तळापर्यंत तो पोहोंचूं शकला नाहीं. सामान्य मनुष्याची गोष्ट

तर बाजूलाच राहो; पण कोणत्याही देशांतील अत्यंत मननशील आणि विचारी अशा स्त्रीपुरुषांनाही अद्वैतसिद्धांताचें आकलन करणें दुरापास्त होतें असें आपणास आढळून येईल. आपण सध्यां इतके दुर्बल झालों आहों आणि बुद्धीच्या इतक्या अवनत स्थितीस पोंहोंचलों आहों कीं अद्वैतासारखा गहन विषय आकलन करण्याचें सामर्थ्यच आपल्या ठिकाणीं उरलें नाहीं. स्वतःच्या मनोबलाबद्दल केवढीही प्रौढी आपण मिरविली तरी प्रत्येक वेळीं कोणाना कोणाचा तरी आधार घेतल्याशिवाय आपलें चालतच नाहीं. एखाद्या वेलीला स्वतःच्या वाढीसाठीं एखाद्या मोठया झाडाचा आधार जसा अवश्य लागतो त्याचप्रमाणें आपणासही कशाचा तरी आधार घेणें सदोदित भाग पडत असतें. सध्यांच्या काळीं सत्य कोणाला हवें असें नाहीं. सर्वांना सोइस्कर धर्म हवा. सत्याच्या शोधासाठीं होणारे परिश्रम सोसण्याची तयारी क्वचित् एखाद्याच्या ठिकाणीं आढळली तर आढळते. आणि अशी तयारी असलेल्या शेंकडों लोकांत तत्त्वाप्रमाणें प्रत्यक्ष आचरण करणारा हिरा एखादा तरी सांपडेल कीं नाहीं याची शंका आहे. एखादा नवा विचार आणि त्यांतूनही तात्त्विक विचार आपल्या कानावर आदळला ह्मणजे आपल्या चित्तांत तो मोठी खळबळ उसळून देतो. आपल्या मेंदूवर तो नव्या रेषा मुद्रित करूं लागतो. आणि यामुळें आपल्या मनोयंत्राची सर्व रचना कांहीं काळ अनियंत्रित होते. आणि आपला समतोलपणा बिघडून जातो. आपल्याभोंवतीं असलेल्या परिस्थितीची संवय आपणास जडलेली असते. पूर्वीचे अनेक ग्रह आपल्या ठिकाणीं असतात. कांहीं पूर्वग्रह आपल्या वाडवडिलांपासून वारसदारीच्या हक्कानें आपल्या रक्तांत खेळत असतात. मी अमुक वर्णाचा अथवा अमुक प्रकारच्या खानदानीचा अशी बडेजावी आपल्या ठिकाणीं असते. मी अमुक शहराचा रहिवासी असें सांगण्यांत आपणास अभिमान वाटत असतो. देशाभिमानाचें वारें आपल्या ठिकाणीं असतें. आणि या साऱ्यांच्या पाठीमागें भोळसरपणाच्या गोष्टींचा प्रचंड ढीग आपण जमवून ठेवलेला असतो. आपणापैकीं प्रत्येकाची स्थिती अशीच आहे. तथापि या जगांत कांहीं अफाट छातीचे पुरुषश्रेष्ठ असे असतात कीं, या साऱ्याचा त्याग करून ते सत्याचा शोध करतात. ते सत्याचें आकलन करतात आणि देहपातापर्यंत या सत्यवस्तूला धरूनच चालतात. असो;

आतां आपण अद्वैत सिद्धांताकडे वळूं. परमेश्वराचें अस्तित्व असेलच तर या विश्वाचें निमित्तकारण आणि उपादान कारणही तोच असला पाहिजे असें अद्वैतमत आहे. तो या जगाचा नुसता उत्पन्नकर्तांच आहे असें नाहीं तर तो स्वतः निर्मितही आहे. तो ज्याप्रमाणें निर्माता त्याच प्रमाणें निर्मित वस्तुही तोच आहे. हें सारें विश्व तो स्वतःच आहे. असें कसें असूं शकेल ? परमेश्वर पवित्र आणि शुद्ध चैतन्यरूप असतां तो स्वतःच हें जड विश्व होईल हें कसें ? होय. पण बाह्यतः असा देखावा दिसतो हें कांहीं खोटें नाही. अज्ञजनांना विश्व या रूपानें जें कांहीं भासतें त्याला वस्तुतः अस्तित्वच नाहीं. विश्व अनेक रूपांनीं प्रतीत होणें हा दृष्टीचा केवळ भ्रम आहे. जें कांहीं आहे तें एकरूपच आहे. तें अनंत आणि निरंतर कल्याणरूप आहे. या पूर्ण आणि एकरूप अस्तित्वाच्या आधारावर राहून अनेक प्रकारचीं स्वप्नें आपणास पडत असतात. जें कांहीं आहे तें अनंत, ज्ञानातीत असें आत्मरूपच आहे. त्या आत्मरूपांत आणि त्याच्याच द्वारें हें विश्व आपणास प्रतीत होत आहे. वस्तुतः खरी वस्तु एकरूपच आहे. माझ्या समोरील हे मेज, ही सभा आणि ही भित हें सारें तेंच अस्तित्व आहे. जें कांहीं आहे तें तेंच. मात्र त्याला नाम आणि रूप हीं नाहींत. तें नामरूपापलीकडचें केवळ अस्तित्व आहे. या मेजाचा हा दृश्य आकार तुम्हीं विसरून गेलांत आणि त्याचें नांव तुम्ही सोडून दिलें तर जें कांहीं उरतें तें शुद्ध अस्तित्व तेंच. या अस्तित्वाला तो अथवा ती अशा प्रकारचा लिगविशेष अद्वैतसिद्धांती लावीत नाहीं. अशा प्रकारचे लिगविशेष हा मानवी मेंदूचा भ्रम असून तो केवळ कल्पनारूप आहे. आत्म्यांत लिगभेद नाहीं. भ्रमिष्ट झालेले लोक स्त्री आणि पुरुष असा भेद पाहतात. पशूंत आणि अशा मनुष्यांत वास्तविक कांहींच भेद नाहीं. जे लोक सामान्य मनुष्यत्वापलीकडे गेलेले आहेत त्यांना हा लिंगभेद दिसत नाहीं. सर्व दृश्याच्या पलीकडे जो गेला त्यांच्या डोक्यांत लिंगभेदाची कल्पना येणार तरी कोठून ? जें कांहीं आहे तें आत्मरूपच आहे असें ते पाहतात. लिगभेदरहित पवित्र आणि कल्याणरूप अशा आत्मरूपाचाच प्रत्यय त्यांना सर्वत्र येत असतो. नाम, रूप आणि देह हीं सारीं जड असून त्यांजमुळेंच भेदाची उत्पत्ति झाली आहे. नाम आणि रूप या दोहोंचें अस्तित्व तुम्ही विसरलां

तर सारें विश्व एकरूप आहे असा प्रत्यय तुह्मांला येईल. या विश्वांत दोन असा शब्दच नाहीं. जें कांहीं आहे तें एकच. तुह्मी आणि मी एकच आहों. ही प्रकृती, हा परमेश्वर, हें विश्व असा भेद येथें नाहीं. जें कांहीं आहे तें एकच अस्तित्व असून नाम आणि रूप यांजमुळें अनेकधा भासतें. ज्ञात्याला कोण जाणणार ? आपण स्वतःलाच कधीं तरी पाहूं शकूं काय ? फार झालें तर आपलें प्रतिबिंब आपणास पाहतां येईल. हें सारें विश्व त्या अनंत अस्तित्वाचें प्रतिबिब असून तें ज्या मानानें बऱ्या अथवा वाईट वस्तूवर पडतें त्या मानानें बऱ्या अथवा वाईट वस्तु तुम्हांस दिसूं लागतात. खुनी मनुष्य हा आरसा वाईट असल्यामुळें त्यांस प्रतिबिंब वाईट दिसतें पण यामुळें मूळ बिब वाईट आहे असें मात्र नाहीं. सत्पुरुष हा आरसा शुद्ध असल्यामुळें बिबही शुद्ध दिसतें. आत्म्याचा मूल स्वभाव शुद्ध असणें हाच आहे. अत्यंत क्षुद्र कीटकापासून तों अत्यंत पूर्णावस्थेस पावलेल्या प्राण्यापर्यंत सर्वांच्या ठिकाणीं हे एकच आत्मरूप प्रतिबिंबित झालें आहे. हें सारें विश्व केवळ एकरूप आहे. तें एकच अस्तित्व आहे. शरीराचा, मनाचा अथवा चैतन्याचाही फरक त्यांत नाहीं. याच मूळ एकरूप अस्तित्वाकडे निरनिराळ्या आकारांच्या द्वारें आपण पाहतों आणि निरनिराळ्या प्रतिमा त्यावरच आपण उत्पन्न करतों. आपणा सामान्य मनुष्यांच्या दृष्टीनें हें अस्तित्व सामान्य जगासारखें आहे असें दिसतें. मनुष्याहून अधिक उच्च कक्षेच्या प्राण्याला हेंच अस्तित्व स्वर्गासारखें दिसतें; तथापि या दोहोंतही तें अस्तित्व वस्तुतः एकरूपच आहे. साऱ्या विश्वांत आत्मा एकच. तो कोठें जात नाहीं आणि कोठून येतही नाहीं. त्याला जन्म नाहीं, मृत्यु नाहीं आणि पुनर्जन्मही नाहीं. तो मरणार कसा ? मरून तो जाणार कोठें ? स्वर्ग लोक, मृत्यु लोक, पाताळ लोक आणि दुसरेही अनेक लोक या मानवी मनाच्या नुसत्या पोकळ कल्पना मात्र आहेत. या लोकांना अस्तित्व नाहीं; त्यांना पूर्वी कधीं अस्तित्व नव्हतें, सांप्रत नाहीं आणि पुढेंही कधीं असणार नाहीं.

मी सर्वव्यापी आणि अनंत आहे. मग मला जाण्याला आणखी निराळें स्थळ कोठून आणावें ? ज्या ठिकाणीं मी पूर्वी नव्हतों असें स्थळ तरी कोठें आहे ? माझ्या समोर पसरलेलें हें विश्वरूपी पुस्तक मी वाचीत आहें. पानामागें पान वाचून संपलें ह्मणजे तें मी उलटून टाकतों. एक स्वप्न संपलें ह्मणजे

दुसरें स्वप्न मी पाहूं लागतों. एक पान वाचून संपलें ह्मणजे तें उलटून टाकून दुसरें पान मी वाचूं लागतों. अशा रितीनें माझ्या नजरेपुढून पानांमागें पानें आणि स्वप्नांमागें स्वप्नें जात आहेत. माझें वाचन संपलें ह्मणजे पुस्तक बाजूला फेंकून देऊन मी आपलें तोंड फिरवितों. असें झालें ह्मणजे स्वप्नाची आणि ग्रंथाची इतिश्री आपोआपच होते.

अद्वैत मताचें सार काय ? अद्वैत सिद्धांतानें पूर्वी अस्तित्वांत असलेल्या सर्व देवांस रजा दिली आहे. एवढेंच नव्हे तर या विश्वाच्या साम्राज्याच्या तक्तावर कोणीही व्यक्तिविशेषानें यापुढें केव्हांही बसूं नये अशी तजवीज सुद्धां त्यानें करून ठेविली आहे. या सिंहासनावर केवळ आत्मरूपाची योजना त्यानें कायमची करून टाकली आहे. हें आत्मरूप सूर्यचंद्रांहून, स्वर्गासारख्या अनेक लोकांहून आणि या खुद्द प्रचंड विश्वाहूनही अधिक उच्च आहे. या आत्मरूपाचें वर्णन करणें शक्य नाहीं. ही गोष्ट कोणत्याही ग्रंथाला, धर्मपुस्तकाला अथवा शास्त्राला शक्य झाली नाहीं. जें आत्मरूप मनुष्याच्या रूपानें दिसतें त्याचें वैभव परमेश्वराहून सुद्धां अधिक मोठें आहे. किंबहुना परमेश्वर तो हाच. पूर्वी याच परमेश्वराचें अस्तित्व होतें, सध्यांही त्याचेंच अस्तित्व आहे आणि पुढेंही तेंच कायम राहणार आहे. याकरितां आत्मरूपाव्यतिरिक्त दुसऱ्या कोणाचेंही पूजन मला करतां यावयाचें नाहीं. मी आत्मपूजन मात्र करतों इतकेंच अद्वैती म्हणेल. आत्मरूपाशिवाय दुसऱ्या कोणाला मीं नमस्कार करावा ? मदतीसाठीं दुसऱ्या कोणाजवळ मीं याचना करावी ? या विश्वाचें अनंत अस्तित्व मीच असतां मला मदत करील असा दुसरा कोण असणार ? मला कोणीतरी मदत करील असें वाटणें हें स्वप्नवत् आहे. हा निव्वळ भ्रम आहे. या विश्वांत आजपर्यंत कोणींही कोणाला मदत केलेली नाहीं. एखादा दुर्बळ मनुष्य रडत आहे आणि आकाशांतून कोठून तरी आपणास मदत मिळेल या आशेनें ऊर्ध्व दृष्टि करून बसला आहे असाही देखावा आपणास दिसतो. याचें कारण हेंच कीं हें आकाश सुद्धां त्याच्या आत्म्यामध्यें अंतर्भूत झालेलें आहे ही गोष्ट त्याला कळत नाहीं. त्याला कोठून तरी आकाशांतून मदत हवी असते आणि ती त्याला मिळतेही. ती त्याला मिळते असें आपण पाहातों; पण वास्तविक ती मदत आंतून आली असतां कोठून तरी बाहेरून ती आली असा भ्रम त्याला होतो.

एखादा आजारी मनुष्य बिछान्यावर पडलेला असतो आणि आपल्या दुखण्याच्या गुंगींत तो असतां खोलीच्या दारावर त्याला थाप ऐकूं येते. तो दार उघडून पाहतो पण कोणीच त्याला दिसत नाहीं. दार बंद करून तो बिछान्यावर पुन्हां येऊन पडतो. कांहीं वेळानें तशीच थाप त्याला पुन्हां ऐकूं येते आणि पुन्हां दार उघडल्यावरही त्याला कोणी दिसत नाहीं. कांहीं वेळानें त्याचें त्यालाच असें समजून येतें कीं आपल्या हृदयाचें धडधडणेंच वास्तविक आपल्या कानावर पडलें असतां दुखण्याच्या गुंगीमुळें दारावर कोणीं थाप मारली असा भ्रम आपणास झाला. अशाच प्रकारें आपल्या बाहेर अनेक देवांचा शोध करून मनुष्य थकला ह्मणजे आपल्या मूळच्या पदावर तो पुन्हां येऊन बसतो आणि ज्या परमेश्वरासाठीं आपण त्रिखंड धुंडाळले तो परमेश्वर आपल्या आंतच आहे असें त्याला आढळून येतें. ज्याचा शोध अनेक गिरिकंधरांत, नदनद्यांत, अनेक देवळांत आणि स्वर्गादि अनेक लोकांत आपण केला तो परमेश्वर आपणच असें त्याला आढळून येतें '**सोऽहं सोऽहं**' असें तो ह्मणूं लागतो. मी स्वतः सर्वव्यापी परमेश्वरच होतों आणि या लहानशा शरिरांत भासणारा मी कधींच अस्तित्वांत नव्हतों असें तो ह्मणूं लागतो.

आतां येथें आणखीही एक शंका उपस्थित होण्यासारखी आहे. पूर्ण परमेश्वराच्या ठिकाणीं भ्रम कसा उद्भवला ? त्याला भ्रमाची बाधा झाली कशी ? त्याला अशी बाधा झालीच नाहीं. पूर्णत्वाच्या ठिकाणीं स्वप्नसृष्टि कशी निर्माण होईल ? परमेश्वराला स्वप्न कधींच पडले नाहीं. सत्याला स्वप्नाची बाधा होऊं शकत नाहीं. याकरितां या भ्रमाची उत्पत्ति झाली कोठून ? हा प्रश्नच वेडेपणाचा आहे. भ्रमापासूनच भ्रमाची उत्पत्ति होते. सत्याचें दर्शन झाल्याबरोबर भ्रम राहणें शक्यच नाहीं. भ्रमकाळांतच सत्यदर्शनापूर्वी भ्रम असणें शक्य आहे. त्याची उत्पत्ति सत्यापासून, परमेश्वरापासून, आत्म्यापासून झालेली नाहीं. हीं दोन एके ठिकाणीं असणेंच शक्य नाहीं. तुम्ही भ्रमाच्या ठिकाणीं नसून भ्रम तुमच्यासमोर आहे. हा समोर एक ढग दिसत आहे. इतक्यांत एक दुसरा ढग येतो आणि पहिला तिथून निघून जातो. पाठोपाठ आणखीही एक नवा ढग तेथें येतो व त्या दुसऱ्याची जागा तो बळकावतो. अशी स्थिति चालू असतां आकाश स्वयमेव पूर्वीसारखेंच आहे. त्याजपुढून नानाप्रकारच्या रंगांचे आणि आकारांचे ढग येतात, कांहीं वेळ तेथें

राहतात आणि नंतर अदृश्य होतात; पण यामुळें अनंत नीलाकाश बदलत नाहीं. तें पूर्वीसारखेंच निरंतर कायम असतें. त्याचप्रमाणें तुह्मीही सर्वदा पवित्र आणि सर्वदा परिपूर्ण आहां. या सर्व विश्वाचे परमेश्वर तुह्मीच आहां. येथें तुह्मी निरनिराळे परमेश्वर आहां असेंहि ह्मणणें चुकीचें होईल. तुम्ही परमेश्वर आणि मी परमेश्वर असा भेद तेथें नाहीं. याकरितां तुह्मी आणि मी अशी भाषा बोलणेंही चुकीचें आहे. सर्वत्र मी एकच व्यापून आहें असे ह्मणा. कोटयवधि मुखांनीं माझी भक्षणाची क्रिया चालू असतां मी क्षुधार्त कसा असेन ? कोटयवधि हातांनीं काम करीत असतां मी क्रिया-शून्य कसा असेन ? सर्व विश्वाचें चैतन्यही मी असतां मला मृत्यु कोठचा ? मी जीवितापलीकडचा आणि मृत्यूच्याही पलीकडचा आहें. मी स्वभावसिद्ध मुक्त असतां आणखी निराळी मुक्ति ती कोठें शोधावी ? या साऱ्या विश्वांचा अधिपति जो मी त्या मला बद्ध कोण करूं शकणार ? या जगांत जे धर्मग्रंथ निर्माण झाले आहेत ते माझ्या प्रभावाचें वर्णन करणारे लहानसे नकाशे आहेत. याकरितां माझ्या दृष्टीनें या पुस्तकांनांही कांहीं किंमत नाहीं. अद्वैत-वाद्याची भाषा अशा प्रकारची असते.

'सत्य जाणा आणि क्षणार्धांत मुक्त व्हा' असा बोध अद्वैत सिद्धांत तुह्मांस करीत आहे. सत्यप्रकाशानंतर सर्व काळोख नाहींसा होईल. या विश्वाचें अनंत आदिकारण आणि मी हे एकरूपच आहों असा अनुभव आ-ल्यानंतर, सर्व भेद लयास गेल्यानंतर, सर्व मनुष्यें, देवदेवता, पशुपक्षी, आणि झाडेंझुडपें यांचा लय त्या एकच अनंतरूपांत झाल्यानंतर, भय हा शब्द सुद्धां उरणार नाहीं. अमुक मला दुखापत करील अशी भीति आपणास वाटते ती द्वैत बुद्धीमुळें होय; पण सर्वत्र एकरूप झाल्यावर मी मलाच कसा दुखा-पत करणार ? मी मलाच मारूं शकेन काय ? मी भीति तरी कोणाची बाळ-गावी ? माझी मलाच भीति वाटणें शक्य आहे काय ? भीतीचें संपूर्ण उच्चाटन झाल्यावर दुःखाचें नांवही अर्थातच उरणार नाहीं. मला दुःख कशापासून होणार ? सर्व जगाचें चैतन्य मी असा अनुभव आल्यानंतर मत्सरादि विकार आपोआप लयास जातात. माझाच मत्सर मी करूं शकेन काय ? मजबद्दलच मला असहिष्णुता वाटेल काय ? विश्वांत माझ्याशिवाय दुसरें अस्तित्वच असणार नाहीं. ज्ञानाचा मार्ग हाच आहे असें वेदांती निश्च-

यानें सांगतात. भेदबुद्धीचा त्याग करा. विश्वांत विविधता आहे हा भ्रम टाकून द्या. या विविध जगांत जो ऐक्य पाहतो, या जड वस्तूंत ज्याच्या दृष्टीला चैतन्य दिसतें, या छायांच्या मागें असलेली सत्य वस्तु जो पाहतो त्यालाच अखंड शांतीचा लाभ होतो. दुसऱ्या कोणालाही तो होत नाहीं—तो होत नाहीं.

द्वैत, विशिष्टाद्वैत आणि अद्वैत हीं वेदांतधर्माचीं तीन अंगें आहेत. वेदांत धर्माच्या एकाहून एक चढत्या अशा या तीन पायऱ्या आहेत. या तिन्ही मतांतील मुख्य मुख्य मुद्दे सविस्तर सांगितले आहेत. व्यक्तिविशिष्ट परमेश्वराच्या कल्पनेपासून वेदांत धर्मास आरंभ होतो. विश्वबाह्य परमेश्वराची कल्पना ही वेदांतधर्माची पहिली पायरी असून दुसरी पायरी ईश्वराचें सर्वव्यापित्व ही आहे आणि अखेरची पायरी जीवात्मा आणि परमात्मा यांचें ऐक्य ही होय. श्रुतींची अखेर येथें होते. द्वैतापासून आरंभ होऊन विशिष्टाद्वैत मतांत वेदांत धर्माचा मध्य होतो. आणि त्याचें अखेरचें पर्यवसान पूर्ण अद्वैतांत होतें. आपल्या या जगांत हा अखेरचा सिद्धांत ज्यांना पटतो असे लोक किती थोडे आहेत हें आपणास ठाऊक आहेच. फार काय पण हा सिद्धांत खरा आहे असा विश्वास सुद्धां पुष्कळांस वाटत नाहीं. मग हा सिद्धांत पटून त्याप्रमाणें प्रत्यक्ष आचरण करणारे लोक किती थोडे असतील हें तुम्हीच पहा. पण अद्वैत मताचा हा सिद्धांत पुष्कळ लोकांस पटत नसला तरी साऱ्या तत्त्वज्ञानाचें, साऱ्या नीतिमार्गाचें आणि साऱ्या धर्माचें सार हेंच आहे यांत मात्र शंका नाहीं. धर्मतत्त्वें आणि नीतितत्त्वें यांची संगति अद्वैतमताच्या साहाय्यावांचून लावतां यावयाची नाहीं. परक्याचें हित करा असें सारे म्हणतात. याचें कारण काय ? हें म्हणणें बरोबर आहे असें साऱ्यांस कां वाटतें ? जगांत आजवर जितके महात्मे होऊन गेले तितक्या साऱ्यांनीं विश्वबंधुत्वाचा धडा जगास शिकविला. याचें तरी कारण काय ? याचें कारण हेंच कीं या विश्वांतील दृश्य विविधतेमागें पूर्ण ऐक्य हीच सत्य वस्तु आहे ही गोष्ट त्यांच्या बुद्धीला समजून अथवा न समजतांही जाणवत होती. हें तत्त्व पूर्ण विवेचनानें त्यांच्या बुद्धीला कदाचित् पटलें असेल अथवा कदाचित् पटलें नसेल. पण तें खरें आहे इतकी जाणीव त्यांच्या ठिकाणीं होती हें मात्र निश्चित आहे.

आपल्या इंद्रियद्वारा या विश्वाचें जडरूप आपणास दिसतें. तेंच रूप बुद्धीच्या द्वारा आत्म्याच्या रूपानें दिसतें आणि तेंच रूप आपल्या चैतन्यांतून पाहातां केवळ परमात्मरूप दिसतें. आपण दुष्ट वस्तूचा झगा पांघरलों ह्मणजे हेंच जग आपणास भयाण दिसूं लागतें. ज्यांना इंद्रियजन्य सुखांची लालसा आहे व त्या एकाच वस्तूच्या निदिध्यासाचें पटल ज्यांच्या डोळ्यांवर चढलें आहे त्यांना तेंच जग स्वर्गासारखें रमणीय दिसतें आणि ज्याच्या हृदयावरचे असले सर्व पडदे पार निघून गेले आहेत अशा पूर्णत्व पावलेल्या मनुष्याला हेंच जग आत्मवत् दिसतें.

आपल्या मानवी समाजाची जी कांहीं परिस्थिति सध्यांच्या काळीं आहे तिला या तिन्ही पायऱ्यांची आवश्यकता आहे. यांतील कोणतीही एक पायरी दुसऱ्या दोघींना फोडून काढते असें नाहीं तर दुसऱ्या दोघींची पूर्णता मात्र ती करते. हीं तीन अंगें मिळून एक संपूर्ण वस्तु बनलेली आहे. यांतील कोणतेंही एक अंग दुसऱ्या दोहोंशीं विरोध करीत नसून त्या दोहोंची पूर्णता मात्र तें करतें. द्वैतमत चुकीचें आहे असें प्रतिपादन अद्वैतसिद्धांत करीत नाहीं. द्वैतमतही बरोबर आहे पण तें खालच्या दर्जाचें आहे. सत्याकडे जाणाऱ्या मार्गांतील तो पहिला मुक्काम आहे. याकरितां अमुक एक मत आपणास पटलें अथवा न पटलें तरी त्याबद्दल भांडत न बसतां आपल्याला जेवढें कांहीं पटलें असेल तेवढयाच्याच साहाय्यानें सत्यवस्तूच्या शोधाला आपण निघावें हें अधिक बरें. कोणाचाही बुद्धिभेद आपण करूं नये. 'तुझें मत सर्वथैव चुकीचें आहे' असेंही कोणाला आपण म्हणूं नये. एखादा मनुष्य जेथें उभा असेल तेथेंच त्याला हातीं धरून शक्य असेल तर वरच्या पायरी-वर आपण त्याला न्यावें. हें बनत नसेल तर त्याचा बुद्धिभेद करून मूळाची मोडतोड तरी आपण करूं नये. सत्य वस्तु अखेरीस सर्वांनाच सांपडणार आहे. हृदयाचे सर्व आशापाश तुटले ह्मणजे सांप्रत मर्त्य असें वाटणारें तत्त्वच अमर होईल आणि त्या वेळीं मनुष्यच परमेश्वर होईल.

१४

# आत्म्याची बद्धता आणि मुक्ति.

अद्वैत सिद्धांताच्या मताप्रमाणें या विश्वांत सत्यवस्तु अशी एकच आहे. ती वस्तु ब्रह्म ही होय. या खेरीज बाकीचें सर्व दृश्य जग खोटें असून माया-शक्तीनें तें ब्रह्मांतून निर्माण झालें आहे. या ब्रह्माला परत जाऊन पोहोंचणें हें आपलें अंतिम साध्य आहे. आज आपणांपैकीं प्रत्येकाचें स्वरूप मायाविकृत ब्रह्म म्हणजे आपण वस्तुतः ब्रह्मरूप असतांही मायेच्या आधीन झालों आहों. माया ह्मणजे अज्ञान. या मायेंतून आपण मुक्त झालों ह्मणजे आपल्या खऱ्या मूलरूपास आपण प्राप्त होतों. देह, अंतरिंद्रियें अथवा मन आणि आत्मा असे तीन भाग मिळून मनुष्य बनला आहे असा अद्वैत सिद्धांत आहे. देह हें आत्म्याचें बाह्यावरण असून मन हें त्याचें अंतर्गत आवरण आहे. आत्मा हाच खरा द्रष्टा, खरा भोक्ता व देहाचा मध्यवर्ती चालक असा असून मनाच्या म्हणजे अंतर्गत इंद्रियांच्या द्वारें देहाला तो चाळवितो.

मानवी जीवितांत आत्मा ही एकच शुद्ध चैतन्यरूप वस्तु असून देहादि बाकीच्या साऱ्या वस्तु जडरूप आहेत. आत्मा केवळ चैतन्यरूप असल्यामुळें तो दोन पदार्थांच्या संयोगानें उत्पन्न झालेला अथवा मिश्र पदार्थ नाहीं. तो मिश्र पदार्थ नसल्यामुळें कारण आणि कार्य यांच्या कायद्याबाहेरचा तो आहे. आणि या कायद्या बाहेरच तो असल्यामुळें तो चिरंजीव आहे. चिरंजीव वस्तूला आरंभ असणें शक्य नाहीं. कारण जिला आरंभ आहे, तिला शेवटही निश्चयानें असल्यामुळें ती वस्तु चिरंजीव होऊं शकणार नाहीं. आत्मा निराकार आहे हेंही यावरून उघड सिद्ध होतें. कारण ज्या वस्तूला आकार आला तिचा तो आकार केव्हांतरी अवश्य नष्ट होणार. जडवस्तूवांचून आकार संभवत नाहीं. तसेंच ज्याला आकार आहे त्याला आरंभ आणि अंत हीं दोन्हीही अवश्य असलींच पाहिजेत. ज्या वस्तूला आकार आहे तिला आरंभ हा आहेच व तिचा अंतही केव्हांतरी होतो ही गोष्ट आपल्या रोजच्या अनुभवांतील आहे. जडवस्तु आणि शक्ति या दोहोंच्या संयोगानें आकार निर्माण होतो. या खुर्चीला एक विशिष्ट आकार आहे. याचा अर्थ हाच कीं कांहीं विशिष्ट परिमाणाची जडवस्तु आणि कांहीं विशिष्ट परिमाणाची शक्ति यांच्या संयो-

गांतून हा विशिष्ट आकार निर्माण झाला आहे. हा आकार दिसण्याचें कारण जडवस्तु आणि शक्ति यांचा संयोग हेंच होय. हा संयोग अखंडकाल असाच राहणें शक्य नाहीं. या दोहोंची संगति तुटण्याचा काल केव्हां ना केव्हां तरी अवश्य आलाच पाहिजे. याकरितां आकार झटला कीं त्याबरोबर आदि आणि अंत हीं दोन्ही अवश्य आलींच. आपला हा देह केव्हां तरी नाश पावणार हें आपणास ठाऊक आहेच. त्याला आरंभ होता तेव्हां त्याला अंत हा येणारच; पण आत्म्याला आकार नसल्यामुळें आदि आणि अंत या कायद्यांनीं तो बांधला जात नाहीं. त्याचें अस्तित्व अनाद्यनंत आहे. ज्याप्रमाणें काल अनंत आहे त्याचप्रमाणें मानवी आत्माही अनंतस्वरूप आहे. याकरितांच तो सर्वव्यापीही असला पाहिजे. देश, काल आणि निमित्त या उपाधीनें आकार मात्र बद्ध होत असतो. या उपाधींमुळें साकार वस्तु समर्याद होतात. निराकार वस्तु अमर्यादच राहणार. देश आणि परिस्थिति यांच्या मर्यादेची बाधा निराकाराला होणें शक्य नाहीं. यामुळें तुमच्यांतील, माझ्यांतील व प्रत्येकांतील आत्मा सर्वव्यापी आहे असें अद्वैत सिद्धांत सांगतो. तुह्मी या क्षणीं ज्या प्रमाणानें या ठिकाणीं आहां त्याच प्रमाणानें तुमचें अस्तित्व सूर्यातही आहे. ज्या प्रमाणानें तुमचें वास्तव्य इंग्लंडांत आहे त्याच प्रमाणानें तें अमेरिकेंतही आहे; पण ज्या साधनांनीं तुम्ही स्पष्ट दशेला येतां तीं तुमचीं साधनें जेथें असतील तेथें तुमचें रूप स्पष्ट दिसून बाकीच्या ठिकाणीं तुह्मी अव्यक्त स्थितींत असतां. तुमचीं व्यक्त होण्याचीं साधनें मन आणि देह हीं आहेत. आणि हीं जेथें असतील तेथें प्रत्यक्ष क्रियेच्या द्वारें तुह्मी व्यक्त दशेला येतां व बाकीच्या ठिकाणीं अव्यक्त राहतां.

आपण केलेलें प्रत्येक काम आणि आपल्या मनांत आलेला प्रत्येक विचार यांचा एकएक ठसा आपल्या चित्तावर उमटत असतो. या ठशाला संस्कार असें ह्मणतात. आपल्या मनावर असे अनेक संस्कार एकत्र झालेले असतात आणि त्यांच्या समीकरणानें दानत ह्मणून जिला म्हणतात ती उत्पन्न होत असते. प्रत्येक मनुष्याची जी कांहीं दानत असते ती त्यानें स्वतःच निर्माण केलेली असते. त्यानें केलेल्या क्रिया आणि त्याच्या मनांत आलेले विचार यांच्या समीकरणानें ती उत्पन्न झालेली असते. या संस्कारांच्या समीकरणापासून जी शक्ति निर्माण होते तीच त्यांच्या भावी जन्माची दिशा ठरवीत

असते. या संकलित कर्मसूत्रानें प्रत्येक मनुष्य पक्का बांधलेला असतो व तें कर्मसूत्र नियमित दिशेला त्याला ओढून नेत असतें. मनुष्य मरण पावला म्हणजे त्याचें जड शरीर जडतत्त्वांना मिळून जातें पण त्याचे संस्कार मनाला चिकटून राहतात आणि मन हें अत्यंत विरलवस्तूंचें बनलें असल्यामुळें त्याची विघटना न होतां तें तसेंच कायम राहतें. वस्तूंत जडत्वाचा अंश जों जों कमी तों तों तिचें जीवित अधिक दृढ असतें.

या ठिकाणीं वात्याचक्राची आठवण मला होते. निरनिराळया दिशांनीं येणारे वाऱ्याचे प्रवाह एकत्र मिळतात आणि त्या ठिकाणीं ते सर्व एकरूप होऊन चक्राकार परिभ्रमण करूं लागतात. या चक्राकार वायूला वात्याचक्र असें ह्मणतात. अशा रितीनें वात्याचक्र सुरू झालें ह्मणजे आजूबाजूची धूळ, कागदाचे तुकडे, गवत इत्यादि वस्तु या चक्राच्या मध्यबिंदूकडे ओढल्या जातात. या सर्व वस्तु एकत्र होऊन राहतात आणि तें वात्याचक्र तसेंच पुढें निघून जातें. अशा रीतीनें त्याचा प्रवाह संपेपर्यंत अनेक ठिकाणीं असल्या वस्तूंचे पुंजके तें जमा करतें. अशाच रीतीनें प्राणशक्तींचे निरनिराळे प्रवाह एकत्र येऊन जड पदार्थांतून शरीर आणि मन हीं निर्माण होतात. एक शरीर तयार झालें ह्मणजे प्राणशक्तीचें हें चक्र दुसरीकडे जातें, आणि दुसरीं शरीरें निर्माण करितें. एक शरीर जड होऊन पतन पावलें ह्मणजे याच रितीनें दुसरें शरीर त्याच्या जागीं निर्माण होतें. अशा रीतीनें प्राणशक्तीचें हें चक्राकार परिभ्रमण अखंड चालू आहे. शक्तीला प्रत्यक्ष गती मिळण्याकरितां जड-वस्तूंच्या साहाय्याची अपेक्षा असते. जडाच्या साहाय्यावांचून अमूर्त शक्ति प्रत्यक्षत्वास येऊं शकत नाहीं. जडदेह निर्जीव होऊन खालीं पडला तरी त्याचें अधिक सूक्ष्मरूप जें मन तें शिल्लक राहतें आणि प्राणशक्ति संस्का-रांच्या रूपानें राहिलेली असते. अशा रीतीनें प्राण आणि मन हीं दुसरीकडे जातात, तेथें दुसऱ्या जडवस्तु गोळा करितात आणि त्यांपासून नव्या देहाची रचना करतात. यथाकालानें हा देहही पतन पावतो. अशा रीतीनें या सर्व शक्तीचा क्षय होऊन जाईपर्यंत हा क्रम अबाधित चालू राहतो. अशा रीतीनें ज्या वेळीं मनाचा शेवट होईल, मनाचे सर्व घटक एकमेकांपासून पूर्णपणें विभागले जातील आणि त्याच्या ठिकाणीं कोणत्याही संस्कारांचें शक्तिबीज उरणार नाहीं तेव्हां आपण पूर्णपणें मोकळे होऊं. असा वेळ येईपर्यंत आपल्या

भोंवतींचे पाश शिल्लक राहतात. असा वेळ येईपर्यंत जीवात्मा मनाच्या आणि प्राणशक्तीच्या वात्याचक्रांत सांपडून परिभ्रमण करीत असतो. त्याच्या आजूबाजूस या वात्याचक्राचें आवरण असल्यामुळें आणि हें वात्याचक्र एका जाग्याहून दुसऱ्या जाग्यावर प्रवास करीत असल्यामुळें आपण प्रवास करीत आहों, स्थलांतर करीत आहों असा भ्रम जीवात्म्याला पडतो. हें वात्याचक्र थंडावलें म्हणजे आपण त्यानें निगडित नसून अथवा आपण कोठेंही परिभ्रमण करीत नसून आपण सर्वव्यापी आहों असा बोध आत्म्याला होतो. आपण पूर्णपणें मुक्त असून वाटेल तिकडे जाण्यायेण्यास आपणास मोकळीक आहे व स्वतःच्या इच्छेप्रमाणें वाटतील तितके देह व वाटतील तितकीं मनें निर्माण करण्यास आपण समर्थ आहों असा अनुभव त्याला येतो. अशा प्रकारचें स्वातंत्र्य मिळविणें हेंच आपणा सर्वांचें ध्येय असून याच उद्देशानें सर्व कर्में आपण करीत असतों.

अशी कल्पना करा कीं या ठिकाणी एक चेंडू पडला आहे आणि आपण सारे आपल्या हातांतील काठयांनीं त्या चेंडूवर आघात करीत आहों. या आघातामुळें चेंडू एकसारखा इतस्ततः परिभ्रमण करितो आणि अखेरीस एखाद्या तडाख्यानें खोलीच्या बाहेर निघून जातो. या त्याच्या बाहेर जाण्याच्या क्रियेंत त्याची बहिर्गमनाची दिशा कशानें निश्चित होते ? तसेंच त्याला बाहेर जावयास मिळालेल्या गतीचें प्रमाण काय ? या प्रश्नाचीं उत्तरें देण्यासाठीं त्याजवर झालेले आघात आणि त्यांचें प्रमाण हीं प्रथम निश्चित केली पाहिजेत. हीं निश्चित झालीं म्हणजे या दोन प्रश्नांचें उत्तर त्यांतच सांपडेल. त्या चेंडूवर जितके आघात झाले त्यांपैकीं प्रत्येकाचा कांहींना कांही परिणाम त्याजवर घडलेला आहे. त्याचप्रमाणें आपण केलेलें प्रत्येक कर्म आपल्या चित्तावर कोणत्याना कोणत्या स्वरूपाचा परिणाम अवश्य घडवीत असतें. आपल्या जडकर्मांचाच परिणाम आपल्या मनावर होत असतो असें नाहीं तर अत्यंत सूक्ष्म विचाराचा परिणामही त्याजवर घडत असतो. त्या चेंडूप्रमाणें मानवी मनही अशाच प्रकारचे कर्मांचे आघात घेत असतें. या जगद्रूपी जाग्यांत या आघातामुळें आपण एकसारखे स्थलांतर करीत असतों आणि याच आघातांच्या समवायी परिणामाचें जें कांहीं अखेरचें रूप होईल तेंच आपल्या बहिर्गमनाची दिशा आणि वेगही निश्चित करीत असतें. या मनोरूपी चेंडूवर जेवढया जोराचे आणि ज्या दिशेचे आघात बसले अस-

तील त्या सर्वांच्या एकत्रित परिणामानें त्याची पुढची दिशा ठरत असते. जगांत आपण केलेलें प्रत्येक कर्म अशा रीतीनें आपल्या भावी जन्माची आगाऊ तयारी करीत असतें. आपला सांप्रतचा जन्म हा आपल्या पूर्व-कर्मांचा संघटित परिणाम आहे. आतां अशी कल्पना करा कीं तुमच्या हातीं एक सांखळी मी दिली असून तिच्यांत एक दुवा पांढरा आणि एक दुवा काळा आहे. अशा रीतीनें पांढरे व काळे दुवे एकामागें एक असून त्यांची एक अखंडमंडलाकार शृंखला बनली आहे. या शृंखलेचें स्वरूप काय ? असा प्रश्न मीं तुम्हांस केला तर तुह्मी ती सांखळी तपासूं लागाल. या प्रश्नाचे उत्तर देणें तुम्हांस आरंभीं जड जाईल. या सांखळीचा प्रारंभ कोठें आणि शेवट कोठें हें तुह्मांस समजणार नाहीं. पुढें अशी एक गोष्ट तुमच्या ध्यानीं येईल कीं या शृंखलेला शेवट नसला तरी वेगवेगळया दुव्यांची ती बनली आहे. दोन दोन दुवे मिळून ही अखंड शृंखला तयार झाली आहे. फक्त दोनच दुवे पुन्हां पुन्हां एकामागें एक येऊन त्यांनी ही शृंखला बनविली आहे. ही कितीही लांब असली तरी या दोन दुव्यांचें जें स्वरूप तेंच या साऱ्या सांखळीचें स्वरूप ही गोष्ट तुमच्या लक्ष्यांत येईल. अशाच रीतीनें आपला गत जन्म, चालू जन्म आणि पुढला जन्म हे या सांखळीच्या दुव्यासारखे असून जन्म, मृत्यु आणि या दोहोंमधील अवकाश एवढयांचा एक दुवा होतो. अशा रीतीनें अनंत दुवे एकामागे एक येऊन त्यांची एक अनंतसांखळी बनते. या सांखळीला आदि नाहीं आणि अंतही नाहीं. आपण जीं जीं कर्में करतों त्यांचीच पुनरावृत्ति हजारों वेळ पुन्हां पुन्हां होत असते आणि तिज-मुळें हे दुवे एकसारखे घडले जात असतात. आपलीं बहुतेक कर्में सामा-न्यतः एकाच स्वरूपाचीं असल्यामुळें या दुव्यांच्या स्वरूपांतही फारसा फरक पडत नाहीं. याकरितां या अनंत शृंखलेंतील हे दोन दुवे आपणास समजले तर बाकीच्या सर्व दुव्यांचा उमजही आपणांस आपोआपच पडेल. आपला चालू जन्म आपल्या पूर्वजन्मांतील कृत्यांनीं निश्चित झालेला आहे. त्यांत आतां कोणतीही तफावत पडावयाची नाहीं. आपण या जगांत जो जन्म घेतला आहे तो आपल्याच कृत्यांनीं आपण घेतला आहे. या जन्मांतून बाहेर जातांना आपल्या चालू कर्मांचें समवायी स्वरूप आपण बरोबर घेऊन जाऊं आणि चालू जन्मीं पूर्वजन्मांतील कर्मांचें समवायीरूप आपण बरोबर

आणलें आहे. आपणास आंत येण्याचें कारण आणि बाहेर जाण्याचें कारण हीं दोन्हीं एकाच स्वरूपाचीं आहेत. आम्ही आंत कशानें आलों ? आमच्या पूर्वकर्मांनें. आह्मांस बाहेर कोण नेणार ? आमचीं चालू कर्में. अशा रीतीनें पूर्वकर्में आणि चालू कर्में यांच्या अखंडक्रियेंत जन्ममरणाचें रहाटगाडगेंही अखंड चालू राहील. रेशमाचा किडा आपल्या पोटांतून तंतू बाहेर काढून स्वतःसाठीं घरटें तयार करतो. पण अखेरीस आपण निर्माण केलेल्या या घरटयांत आपण बंदिवान् होऊन पडलों आहों असें त्यास आढळून येतें. त्याचप्रमाणें आमच्या स्वतःच्या कर्मानींच आम्ही आपणास बांधून घेतलें आहे. आमच्या कर्माचें जाळें आम्हीच स्वतःभोंवतीं विणून घेतलें आहे. कार्यकारणाच्या कायद्याला आम्हीं चालन दिलें आणि आतां त्याच्या सपाटयांतून बाहेर पडणें आह्मांस मुष्किलीचें झालें आहे. हें प्रचंड संसारचक्र आम्हींच चालू केलें आणि आतां त्याच्या तडाक्याखालीं आमचा चुराडा उडत आहे. आमचीं जीं कांहीं बरींवाईट कृत्यें पूर्वजन्मीं झालीं असतील तदनुरूप आम्हांस सांप्रतचा जन्म मिळाला आहे. चांगल्या आणि वाईट अशा दोन्ही प्रकारच्या कृत्यांची सांखळी आपणाभोंवतीं आहे असें वेदांतशास्त्र तुह्मांस सांगत आहे.

आत्मा कोठें जात नाहीं अथवा कोठून येतही नाहीं. तसेंच त्याला जन्म नाहीं आणि मृत्युही नाहीं. आत्म्यासमोर प्रकृतीचा पडदा हालत आहे आणि या गतीची पडछाया आत्म्यावर पडलेली आहे. हालचाल होते ती वास्तविक प्रकृतीची असतां प्रकृति स्थिर असून आपण हालचाल करीत आहों असा भ्रम आत्म्याच्या ठिकाणीं अज्ञानामुळें उत्पन्न झाला आहे. असा भ्रम आत्म्याच्या ठिकाणीं शिल्लक असेपर्यंत आपण बद्ध आहों असें त्याला वाटतें; पण आपण स्थिर असून प्रकृती मात्र हालत आहे असा अनुभव त्याला येतांच स्वतःच्या सर्वव्यापित्वाचा बोधही त्याला होऊन तो मुक्त होतो. आत्म्याचें जें बद्धरूप तोच जीव. याकरितां आत्मा जातो आणि येतो अशी भाषा वेदांत ग्रंथांत वापरलेली असते ती केवळ समजुतीसाठींच आहे हें ध्यानांत ठेवा. पृथ्वीसभोंवतीं सूर्य फिरत नसतांही एखाद्या ज्योतिषशास्त्राच्या प्रमेयाच्या समजुतीसाठीं जसें तें गृहीत धरतात तसेंच हेंही समजावें. अशा रीतीनें स्वकर्मामुळें जीव उच्च अथवा नीच स्थितीस जातो. पुनर्जन्माचा हा एक सुप्रसिद्ध सिद्धांत आहे आणि हा कायदा यच्चयावत् सृष्टीला लागू आहे.

खालच्या चतुष्पाद प्राण्यांतूनच मनुष्यप्राणी उत्पन्न झाला आहे असा सिद्धांत ऐकल्याबरोबर पुष्कळ पाश्चात्य लोक घाबरून जातात; पण यांत आश्चर्य तें काय ? जे कोट्यवधी प्राणी आज निर्माण झालेले दिसतात त्यांची वाट काय ? त्यांचा कांहीं हिशेबच नाहीं काय ? आमच्याप्रमाणेंच त्यांनाही जीवात्मा आहे. त्यांना आत्मा नसेल तर आम्हांसही तो नाहीं. इतर प्राण्यांना आत्मा नाहीं आणि मनुष्याला मात्र तो आहे हे म्हणणें शुद्ध वेडेपणाचें आहे. पशूच्याही पलीकडचीं कित्येक माणसें माझ्या पाहण्यांत आलीं आहेत.

मनुष्याचा जीवात्मा उच्च आणि नीच अशा अनेक योनींतून स्वतःच्या संस्कारानुसार परिभ्रमण करीत आलेला आहे; पण त्याला मुक्ति मिळविण्याची पात्रता मनुष्यत्वाच्या अत्युच्च स्थितींत मात्र प्राप्त होत असते. देवदूतांच्या योनीपेक्षांही मानवयोनी अधिक श्रेष्ठ आहे मग बाकीच्या सान्या दृश्य आकारांत मानवयोनि श्रेष्ठतम आहे हें सांगणें नकोच. मुक्ति मिळविण्याची पात्रता मानवयोनींत आहे एवढ्याकरितांच एकंदर चराचर सृष्टींत अत्युच्च पदवी तिला प्राप्त झाली आहे.

प्रारंभीं हें सारें विश्व ब्रह्माच्या ठिकाणीं लीन होतें आणि त्यांतूनच तें स्पष्टतेस आले असून त्याची सांप्रतची गती आपल्या पूर्वीच्या ठिकाणास परत जाण्याच्या हेतूनेंच चालू आहे. वीज ज्याप्रमाणें उत्पादक यंत्रांतून बाहेर पडून आपलें मंडल पुरें करिते व त्याच यंत्रांत पुन्हां परत येते त्याचप्रमाणें हें विश्व ब्रह्मांतून निर्माण झालें असून आपल्या मूल स्थानाकडे तें पुन्हां परत जात आहे. जीवाची गतीही हीच–तो ब्रह्मांतूनच स्पष्ट दशेस आला असून वनस्पतिसृष्टि आणि चतुष्पादसृष्टि इत्यादि आकार घेत घेत आतां मनुष्याचा आकार त्यानें घेतला आहे. ब्रह्माच्या अत्यंत निकट असलेला आकार म्हटला ह्मणजे मनुष्याचाच आकार होय. आपल्या जीवनक्रमांत जी धडपड आपण करीत आहों तिचा अंतिम हेतु आपल्या उगमस्थानाकडे परत जाण्याचाच आहे. ही गोष्ट कांहीं लोकांच्या लक्ष्यांत आली असेल अथवा कांहींच्या लक्ष्यांत ती मुळींच आली नसेल. पण ज्यांच्या लक्ष्यांत ती आली नाहीं त्यांचाही अंतिम हेतु तोच. जगांत जेथें जेथें गति ह्मणून आपणास आढळते, खनिज पदार्थांत, उद्भिज्जांत अथवा प्राणिसृष्टींत जेथें म्हणून धडपड दिसते तेथें तिचा हेतु या मूळ मध्यबिंदूला येऊन विश्रांती

ध्यावी हाच आहे. पूर्वीचा समतोलपणा नष्ट झालेला आहे आणि त्यामुळें खालींवर झालेले सर्व अणु आणि परमाणु आपापलें समतेचें स्थान पुन्हां शोधून काढीत आहेत. ही शोधून काढण्याची जी क्रिया तीच जीवितांतील धडपड. या धडपडींत ते एकमेकांशीं अनेक प्रकारें संयोग पावतात आणि हे अनंत संयोग सृष्टींतील विलक्षण चमत्कार आणि देखावे निर्माण करतात. चतुष्पाद सृष्टींतील सर्व धडपड, वनस्पतिसृष्टींतील जीवनकार्य आणि आपली ही सारी सामाजिक अथवा राजकीय धडपड आणि युद्धें वगैरे गोष्टी या सर्व क्रिया, नाहींसा झालेला तो समतोलपणा पुन्हां स्थापण्याकरतांच चालू आहे.

जन्मापासून मरेपर्यंत जो प्रवास आपण करतों त्याला संसार असें नांव आहे. या संसारचक्रांत धडपडणारे सर्व प्राणी आज ना उद्यां मुक्त होतील. आतां येथें आणखीही एक प्रश्न उपस्थित होण्याचा संभव आहे. जर केव्हां तरी आपण खास मुक्त होणार तर मुक्ति मिळविण्यासाठीं इतकी धडपड कशाला हवी ? जर साऱ्यांनाच मुक्ति मिळणार आहे तर खुशाल मांडी घालून तिची वाटच आह्मीं कां न पाहावी ? कोणत्याही आत्म्याचा आत्यंतिक नाश कधींच न होतां तो केव्हां तरी मुक्त होईल ही गोष्ट निश्चित आहे. सर्व नाश कशाचाच व्हावयाचा नाहीं. असें आहे तर ही धडपड कां ? याचें पहिलें कारण हें कीं मध्यबिंदूला परत जाण्याला हा एकच रस्ता आपणास मोकळा आहे. आणि दुसरें असें कीं ही धडपड आम्ही कां करतों हें आमचें आह्मां-सच समजत नाहीं. स्वतःचा उद्देश नसला तरी आह्मांस ती करावी लागत आहे इतकी गोष्ट मात्र खरी. अशा रीतीनें धडपड करणाऱ्या हजारों मनुष्यांत मुक्तीची कल्पना एखाद्यालाच प्राप्त होते. मनुष्यजातींतील बहुतेक मोठा भाग जड वस्तूंच्या प्राप्तीनेंच समाधान मानीत असतो. कांहीं माणसें मात्र जागीं होतात आणि या खेळाचा कंटाळा आल्यामुळें आपल्या मध्यबिंदूला जाऊन विश्रांती घ्यावी अशी इच्छा त्यांना होते. अशी इच्छा ज्यांना झालेली असते त्यांची धडपड मात्र सहेतुक असून बाकीच्यांची धडपड केवळ अहेतुकपणें चाललेली असते.

सर्व वेदांत तत्त्वज्ञानाचें सार थोडक्यांत सांगावयाचे म्हटलें तर तें त्याग या एकाच शब्दांत सांगतां येईल. असत्याचा त्याग व सत्याचा परिग्रह यांतच सर्व तत्त्वज्ञान आलें. संसाराचा मोह ज्यांच्या ठिकाणीं अनावर असेल

ते कदाचित् असें ह्मणतील कीं जगाचा त्याग आह्मीं कां करावा ? आणि आपल्या मध्यबिंदूला परत तरी कां जावें ? आह्मीं परमेश्वरत्वापासून उत्पन्न झालों असून या जगांत आलों आहों ही गोष्ट कदाचित् खरी मानली तरी ज्या अर्थी जग आह्मांला आनंदाचें स्थान वाटत आहे त्या अर्थी या जगांतलेच आनंद अधिकाधिक मोठ्या प्रमाणावर मिळविण्याचा यत्न आम्हीं कां करूं नये ? उलट त्यांतून बाहेर जाण्याची धडपड आम्हीं कां करावी ? जगांत रोज रोज नव्या सुधारणा किती होत आहेत पहा. रोज रोज नव्या सुखदायक वस्तूंची भर पूर्वीच्या संग्रहांत पडत आहे. अनेक प्रकारच्या नव्या चैनी रोज उत्पन्न होत आहेत. यांत अशा लोकांनां मोठें सुख वाटत असतें. मग हें सुख सोडून त्यांतून बाहेर जाण्याचा यत्न आम्हीं कां करावा असा प्रश्न ते सहजच विचारतात. या प्रश्नाचें उत्तर असें कीं जग हें पाण्यावरील बुडबुड्याप्रमाणें क्षणिक आहे. आज ना उद्यां त्याचा नाश अवश्य होईल. सध्यां जीं सुखें आपण भोगीत आहों तीं पूर्वी कोट्यवधि वेळ आपण भोगलेलीं आहेत. जे आकार आज आपणास दिसत आहेत ते पूर्वी कोट्यवधि वेळ पुन्हां पुन्हां दिसून गेलेले आहेत. या साऱ्या विश्वाच्या अशा किती तरी आवृत्ति पुन्हां पुन्हां निघाल्या आहेत. मी आतांप्रमाणेंच पूर्वीही अनंत वेळां तुमच्यापाशीं हेंच भाषण केलें आहे. आज जे शब्द तुम्ही माझ्या तोंडून ऐकत आहां तेच शब्द पूर्वी किती तरी वेळ ऐकले आहेत. पूर्वीप्रमाणेंच या आवृत्ती पुढेंही आणखी निघणार आहेत. अनेक देह गेले आणि आले तरी जीवात्म्याच्या स्वरूपांत फरक पडत नाहीं. अनेक देह त्यानें पुन्हांपुन्हां धारण केले तरी त्याचें स्वरूप तेंच. दुसरें असें कीं कालांतरानें या साऱ्या गोष्टींची पुनरावृत्ति होत असते. असें समजा कीं चार फांसे हातीं घेऊन ते आपण खालीं टाकले तर एकावर पांच, एकावर चार, एकावर तीन व एकावर दोन असे आंकडे दिसतात. हें फांसे टाकण्याचें काम आपण असेंच चालू ठेवलें तर याच संख्या पुन्हां येण्याचा पूर्ण संभव आहे हें आपल्या लक्ष्यांत येईलच. मध्यंतरीं केव्हां थोडा अवकाश जाईल तर केव्हां पुष्कळ जाईल; पण हीच संख्यारचना पुन्हां निर्माण होईल. यांत शंका नाहीं. यदृच्छेचा हा कायदाच आहे. हीच गोष्ट जीवात्मा आणि त्याच्या आनुषंगिक वस्तु यांना लागू आहे. मध्यंतरीं पुष्कळसा काळ एखाद्या प्रसंगीं

लोटला तरी पूर्वीची रचना पुन्हां पुन्हां अवश्य निर्माण होत राहील. जन्म, मरण आणि खाणेंपिणें यांच्या एकसारख्या आवृत्ति निघत आहेत. या पुनरावृत्तीहून अधिक उच्च अशी कांहीं स्थिति असेल ही गोष्ट पुष्कळांच्या स्वप्नींही येत नाहीं; पण ही सामान्य स्थिति सोडून उच्च भरारी मारावी असें ज्यांच्या मनांत येतें त्यांना अशा प्रकारच्या चैनींत सारसर्वस्व आढळून येत नसून त्या केवळ बाजूच्या गोष्टी आहेत असें त्यांस वाटतें.

क्षुद्रकीटकापासून मनुष्यदेहापर्यंत सारे देह हीं नुसतीं गाड्यांसारखीं वहनाचीं साधनें मात्र आहेत. यांच्यांतील उतारू वारंवार बदलत असतात आणि या गाड्या नव्या उतारूंसाठीं एकसारख्या प्रवास करीत असतात. एक उतारू उतरून गेला कीं गाडी पुढें सुरू होते आणि दुसरा उतारू तींत शिरतो. त्याचप्रमाणें एक जीवात्मा एका देहाचा आश्रय करून कांहीं काळ तेथें राहतो आणि पुढें तो देह सोडून दुसऱ्यांत जातो. तेथेंही पुन्हां हाच प्रकार घडून तिसऱ्या देहाचा अंगिकार तो पुन्हां करतो. अशा रीतीनें अनेक अनुभव त्यानें घेतले ह्मणजे अखेरीस या देहचक्रांतून बाहेर पडून तो मुक्त होतो.

मनुष्याच्या जीवनांतील भूतभविष्य जाणणारे लोक सर्व देशांत आणि सर्व काळीं आढळून येतात. या विद्येची उपपत्ति अशी आहे कीं आत्म्याभोंवतीं कार्यकारणाचें बंधन जोंपर्यंत शिल्लक आहे तोंपर्यंत त्यापुढें त्याला अवश्य मान वांकवावी लागते. आत्मा मूळचा स्वतंत्र असतो आणि हें स्वातंत्र्य त्याला परत मिळवितां येतें ही गोष्ट खरी; तथापि कायद्याच्या बंधनांत तो जोंपर्यंत असतो तोंपर्यंत त्या कायद्याच्या अनुरोधानें वर्तन करणें त्याला भाग पडत असतें. हे कार्यकारणसंबंध जाणण्याइतकी तीक्ष्ण दृष्टि ज्याला प्राप्त झाली असेल तो कोणाचेंही भूतभविष्य बिनचूक सांगूं शकतो यांत नवल नाहीं.

मला कशाची तरी जरूर आहे ही जाणीव शिल्लक असणें हीच अपूर्णतेची खूण आहे. पूर्णत्व पावलेल्या मुक्ताला कसलीच इच्छा असणें शक्य नाहीं. परमेश्वराला कशाचीही गरज नसते. त्याच्या ठिकाणीं गरज उत्पन्न झाली तर तो परमेश्वरच नव्हे. मग तीही एक अपूर्ण वस्तु होईल. याकरितां परमेश्वराची इच्छा अमुक आहे अथवा तमुक आहे असें ह्मणणें अथवा परमेश्वराला राग येतो अथवा तो प्रीति करतो असें म्हणणें हें बालबुद्धीचें लक्षण असून

अशा बोलण्यांत तात्पर्य कांहींच नाहीं. याकरितां कोणतीही आशा ठेवूं नका आणि सर्व वासनांचा उच्छेद करून सुखी व्हा असा सर्व संतांचा उपदेश आहे.

मूल जन्मास येतें तेव्हां त्याला दांत नसतात आणि उभें राहण्याचेंही सामर्थ्य त्याला नसतें. त्याचप्रमाणें वृद्ध मनुष्य जग सोडून जातो तेव्हांही त्याला दांत नसतात आणि पाय नसतात. हीं दोन टोंकें परस्परांशीं अत्यंत सदृश आहेत. फरक इतकाच कीं एकाला आपल्या पुढील जीवनक्रमाचा अनुभव नसतो आणि दुसऱ्याला हा सारा अनुभव आलेला असतो. अशा रीतीनें दोन टोंकांत नेहमींच सादृश्य आढळून येतें. या भिंतीला ज्याप्रमाणें कसलीही इच्छा नाहीं त्याचप्रमाणें पूर्णत्व पावलेल्या मनुष्याच्या ठिकाणींही इच्छा नसते. फरक इतकाच कीं भिंत चैतन्यविहीन असल्यामुळें इच्छा उत्पन्न होण्याची पात्रताच तेथें नसते आणि पूर्णत्व पावलेल्या मनुष्याला इच्छा उत्पन्न होण्यासारखें या विश्वांत कांहींच नसतें. कित्येक वेड्यांना कशाचीच इच्छा होत नाहीं. त्यांचे मेंदू अपूर्ण असल्यामुळें इच्छेची उत्पत्ति ते करूं शकत नाहींत. त्याचप्रमाणें पूर्ण मनुष्यालाही इच्छा नसते. मानवी जीविताचीं हीं दोन अखेरचीं टोंकें आहेत. यांतील पहिलें टोंक पशूच्या सन्निध असून दुसरें टोंक ईश्वरासन्निध आहे.

---

## १५

# मनुष्याचें सत्य आणि भासमय स्वरूप.

आपण येथें उभे आहों तथापि आपली दृष्टि कितीतरी लांब अंतरापर्यंत पाहात आहे आणि कित्येक वेळां आपणापासून कांहीं मैल लांब असलेल्या पदार्थावरही आपली दृष्टि पोहोंचते. मनुष्यप्राणी विचार करूं लागला तेव्हां-पासून त्याची नजर भविष्यत्कालाकडे अशाच रीतीनें लागलेली आहे. तो सदोदित पुढचा विचार करीत असतो. देहपातानंतर आपण कोठें जाणार हें सुद्धां जाणण्याची इच्छा त्याला आहे. या इच्छेच्या तृप्तीकरितां अनेक प्रकारच्या उपपत्ती पुढें आल्या, अनेक नव्या नव्या पंथांनीं या प्रश्नाचें उत्तर देण्याचा यत्न केला आणि या पैकीं कित्येक नामशेषही झाले. ज्या कित्ये-

कांचीं उत्तरें या मनुष्यप्राण्याला बरोबरशीं वाटलीं ते पंथ आणि तीं मतं अस्तित्वांत राहिलीं असून हाच प्रकार पुढेंही चालू राहणार आहे. मनुष्य प्राणी या जगतीतलावर असेल आणि विचारशक्ति त्याच्या ठिकाणीं जिवंत असेल तोंपर्यंत त्याची नजर अशीच पुढें राहावयाची. हल्लीं अस्तित्वांत असलेल्या प्रत्येक पंथांत सत्याचा अंश थोडाबहुत आहे. त्याचप्रमाणें ज्यांत कांहीं तथ्य नाहीं असा पुष्कळसा भागही या साऱ्या पंथांत आहे. हिंदुस्थानांत या बाबींत कोणती विचारपद्धती चालू आहे हें थोडक्यांत तुह्मांस सांगण्याचा प्रयत्न मी करणार आहें. या प्रश्नाचें उत्तर देण्याची खटपट हिंदुस्थानांत कशी झाली आणि तिला यश कोणत्या प्रकारचें आलें यांतील मुद्यांची चर्चा आज मी करणार आहें. हिंदुस्थानांत अनेक तत्त्ववादी होऊन गेले आणि या बाबींतील आपापलीं मतें लोकांपुढें त्यांनीं मांडलीं आहेत. या निरनिराळ्या मतांची एकवाक्यता करण्याचा यत्न मी करणार आहें. सूक्ष्मेंद्रियशास्त्राचें मत आणि अतींद्रियशास्त्राचें मत यांची एकवाक्यता अर्वाचीन भौतिक शास्त्रज्ञांच्या तत्त्वानुसार होते कीं काय याचाही विचार मी आज करणार आहें.

वेदांत तत्त्वज्ञानाचा मुख्य कल एकाच गोष्टीकडे आहे. ती गोष्ट ह्मणजे सर्व दृश्य विश्वाचें मूळ एकच रूप कोणतें हें शोधणें ही होय. या शोधाच्या कामीं फक्त प्रमुख मुद्याकडेच त्यांनीं दृष्टि ठेविली आहे. प्रत्येक गोष्टीचा बारीकसारीक अथवा गौण भागही कसून पाहावयाचा ही दृष्टि हिंदुतत्त्वज्ञांत नाहीं. कोणत्याही गोष्टीचें सामान्य स्वरूप त्यांच्या लक्ष्यांत आलें म्हणजे त्यांचें काम भागलें. जें एकच तत्त्व जाणलें असतां बाकीचें सारें विश्व जाणल्यासारखें होईल असें विश्वव्यापी तत्त्व शोधून काढण्याकडे त्यांच्या मनाचा कल आहे. मातीच्या एका लहानशा ढेंकळाचें स्वरूप कळलें म्हणजे सर्व मातीची परीक्षा जशी आपोआपच होते त्याचप्रमाणें विश्वांतील अशी कोणती एकच वस्तु कळली असतां साऱ्या विश्वाचें स्वरूप कळेल? एवढाच विचार त्यांचें मन करीत होतें. या एकाच शोधाकडे आमचे तत्त्वज्ञ वळले आहेत. आमच्या हिंदु तत्त्वज्ञांच्या मताप्रमाणें या साऱ्या विश्वाचें मूलतत्त्व आकाश हें होय. आपणाभोंवतीं ज्या ज्या वस्तु आपण पाहातों, ज्यांना ज्यांना आपणास स्पर्श करतां येतो, ज्यांची ज्यांची चव आपणास घेतां येते अथवा ज्यांचा ज्यांचा

विचार आपण करतों त्या साऱ्या वस्तु ह्मणजे आकाशाचेंच वेगवेगळें स्पष्ट रूप होय. आकाश ही वस्तु अत्यंत सूक्ष्म आणि सर्वव्यापी अशी आहे. आपणाभोंवतीं कांहीं पदार्थ कठीण असतात, कांहीं प्रवाही असतात आणि कांहीं हवारूप असतात. हे सारे पदार्थ आणि चंद्रसूर्यतारकादि सारे गोल या आकाश तत्त्वांतूनच निर्माण झाले आहेत.

आकाशांतून हे पदार्थ निर्माण होत असतां त्याजवरून कोणत्या प्रकारच्या शक्तीची क्रिया चालू असते ? या आकाशतत्त्वाबरोबरच एक विश्वव्यापी शक्तिही अस्तित्वांत आहे. प्रत्यक्ष चालनशक्ति, आकर्षण अथवा विचार-शक्ति वगैरे अनेक रूपांनीं या विश्वांत ती शक्ति प्रकट होत असते. या शक्तीला प्राण अशी संज्ञा आमच्या हिंदु तत्त्वज्ञांनीं दिली आहे. विश्वांतील शक्तीचीं सारीं दृश्य स्वरूपें हीं या प्राणशक्तीचींच वेगवेगळीं रूपें होत. प्राण-शक्तीचा आघात आकाशावर होऊन हें सारें विश्व निर्माण झालें आहे. कल्पाच्या आरंभीं प्राणशक्ति आकाशरूपी सागरांत जणूं काय झोंपीं गेलेली असते. या वेळीं तिचें अस्तित्व अगदीं निष्पंदावस्थेंत असतें. यानंतर या आकाशसागरांत गती सुरू होते. प्राणशक्ति जागृत होऊन तिला स्पंद प्राप्त होऊं लागतात आणि या आकाशसागरांतून अनेक ग्रहमाला, अनेक चंद्र, अनेक सूर्य, अनेक तारे, पृथ्वी, मनुष्यप्राणी, चतुष्पाद जनावरें, वनस्पती व अनेक प्रकारची क्रियाशक्ति हीं निर्माण होतात. याकरितां जगांत आढळून येणारें शक्तीचे कोणतेंही रूप प्राणशक्तीपासूनच निर्माण झालें आहे असें हिंदुतत्त्वज्ञांचें मत आहे. कल्पाची समाप्ति झाली ह्मणजे सारे जडपदार्थ एका-मागून एक वितळत जाऊन अखेरीस वायुरूप होतील व शेवटीं त्यांचें रूपां-तर अधिकाधिक सूक्ष्म स्वरूपांत होऊन अखेरीस ते मूळच्या आकाशरूपांत लीन होतील. त्याचप्रमाणें आकर्षण, प्रसारण, वगैरे शक्तीचीं रूपेंही प्राण-शक्तींत लीन होतील. अशा लीनावस्थेंत प्राणशक्ति कांहीं काल जणूंकाय झोंपीं गेलेली असते. आणि हा झोंपेचा काळ संपला म्हणजे नव्या कल्पास पुन्हां आरंभ होतो. अशा रीतीनें विश्वाच्या उत्पत्तीची व लयाची क्रिया अखंड चालू असून ती जणूंकाय मागें पुढें हेलकावे खाते. एका काळीं तिचें रूप चलित असतें तर दुसऱ्या काळीं तें निश्चल स्थितींत असतें. एका काळीं हें स्वरूप प्रत्यक्ष कार्यव्यापृत असतें तर दुसऱ्या काळीं तें केवळ कार्यक्षम

असतें. अशा रीतीनें ही घडामोडीची स्थिति अनंत काल एकसारखी चालू आहे.

तथापि विश्वाचें हें पृथक्करण केवळ एकपक्षी आहे हेंही ध्यानांत ठेवावें. येथपर्यंत सांगितलेल्या गोष्टी अर्वाचीन शास्त्रज्ञांनाही ठाऊक झाल्या आहेत. आणि जड शास्त्राची मजल आतां यापलीकडे जाऊं शकत नाहीं; पण एवढया कारणानें हा शोध येथेंच थांबला असें मात्र नाहीं. जें एक जाणलें असतां बाकीचें सारें विश्व जाणलें जाईल तें एक आपण अद्यापि जाणलेलें नाहीं. या विश्वाचें पृथक्करण करून जडवस्तु आणि शक्ति असे त्याचे दोन भाग आपण केले. हिंदुस्थानांतील प्राचीन तत्त्ववेत्त्यांनीं आकाश आणि प्राण अशा संज्ञा दिल्या आहेत. आतां आकाश आणि प्राण यांचें पृथक्करण करून त्यांचे मूळ घटक शोधून काढणें ही पुढील पायरी होय. ज्या मूळ रूपांतून हे दोन पदार्थ निर्माण झाले त्याला महत् अशी संज्ञा आहे. महत् ह्मणजे विश्वव्यापी विचारशक्ति. साऱ्या विश्वाचें केंद्रीकृत जें मन त्याला महत् असें नांव आहे. विचार हा पदार्थ आकाश अथवा प्राण यांहूनही अधिक सूक्ष्म स्वरूपाचा आहे. याच विचाराचे दोन विभाग होऊन त्यांतून आकाश आणि प्राण हे दोन पदार्थ निर्माण होतात. आरंभीं विचार एकरूप होतात. त्या वेळीं त्याला महत् ही संज्ञा होती. नंतर हा विचार दोन जागी विभागला गेला व आकाश आणि प्राण हीं निर्माण झालीं. आणि आकाश व प्राण या दोहोंच्या संयोगानें हें सारें विश्व निर्माण झालें.

आतां आपण सूक्ष्मेंद्रियशास्त्राचा विचार करूं. मी सध्यां तुमच्याकडे पाहात आहें. माझ्या बाह्य नेत्रांच्या द्वारानें बाह्य उपाधींचे ठसे मजकडे येतात. ज्ञानतंतूंच्या द्वारा हे ठसे मेंदूकडे रवाना होतात. बाह्यचक्षु म्हणजे पाहण्याचें खरें साधन नव्हे. बाह्यचक्षु हें केवळ उपकरण आहे. कारण ज्या खऱ्या इंद्रियाच्या द्वारें बाह्य आघात मेंदूकडे जाऊन पोहोंचतात त्याचा नाश झाल्यास मला वीस डोळे असले तरीही कांहीं दिसावयाचें नाहीं. माझ्या कनीनिकेवर पडलेलें बाह्य वस्तूचें चित्र कितीही पूर्ण आणि स्पष्ट असलें तरी-ही मला कांहीं दिसावयाचें नाहीं. याकरितां खरें इंद्रिय आणि बाह्य उपकरण हीं परस्परांपासून भिन्न आहेत हें यानांत घ्यावें. जड शरीरावर दिसणारें नाक हें वास घेण्याचें खरें इंद्रिय नव्हे. तेंही एक बाह्य उपकरण आहे. व

वास घेण्याचें खरें इंद्रिय त्याच्या मागें आहे. हीच गोष्ट बाकीच्या साऱ्या इंद्रियांसही लागू आहे. प्रत्येक इंद्रियाला एक एक बाह्य उपकरण जडदेहावर असतें आणि त्याच जडदेहांत त्या उपकरणामागें खरें इंद्रिय असतें. तथापि एवढयानेंच सारें काम भागतें असेंही नाहीं. अशी कल्पना करा कीं मी तुमच्याशीं बोलत असून माझें भाषण अत्यंत मनःपूर्वक तुह्मी श्रवण करीत आहां इतक्यांत कोठें तरी एक घंटा वाजते. हा घंटानाद बहुतकरून तुम्हांस ऐकूं यावयाचा नाहीं. त्या नादाचे स्पंद तुमच्या कानापर्यंत येऊन धडकले, कानाच्या आंतील पडद्यावर त्यांनीं आघात केला, त्या पडद्याला जोडलेल्या ज्ञानतंतूंनीं तो आघात मेंदूपर्यंत पोहोंचविला. इतकी सगळी तयारी बिनचूक झाली असतांही घंटानाद तुह्मांस ऐकूं कां आला नाहीं ? यांत कमीपणा कोठें आला ? कमीपणा हाच कीं मेंदूंतील खऱ्या इंद्रियाशीं मन जोडलेलें नव्हतें. ज्या वेळीं मन एखाद्या इंद्रियाशीं जोडलेलें नसतें तेव्हां त्या इंद्रियांनीं कोणत्याही बातम्या आणल्या तरी मनापर्यंत त्या पोहोंचूं शकत नाहींत. मन आणि इंद्रिय यांची संलग्नावस्था असेल तेव्हांच कोणतीही बातमी मनापर्यंत पोहोंचते. इतकें झालें तरीही ही सारी क्रिया पूर्ण झाली असें होत नाहीं. बाह्य उपकरणानें आघात आणून आंत पोंचविला आणि मनही तेथें हजर असल्यामुळें त्याला तो मिळाला तरी सुद्धां त्या आघाताचें ज्ञान मनाला होणार नाहीं. तें ज्ञान होण्याकरितां आणखीही एका क्रियेची जरूर आहे. ही क्रिया पुरी होण्यास आंतून प्रत्याघात झाला पाहिजे. या प्रत्याघाताबरोबर बाह्य वस्तूचें ज्ञान मनाला होतें. बाह्यवस्तु माझ्या मेंदूला बाहेरील बातमी जणूं काय पोंचविते. हा प्रवाह माझ्या मनाला पोंचतो. माझें मन तेथून त्याला बुद्धीकडे रवाना करतें. या ठिकाणीं पूर्वपरिचित वस्तूशीं ही नवी बातमी ताडून पाहाण्याची क्रिया बुद्धि करते व तेथून त्या क्रियेचा प्रत्याघात मनाकडे येतो. व या प्रत्याघाताबरोबरच वस्तूचें ज्ञानही येतें. मनाच्या ज्या स्थितीमुळें हा प्रत्याघात उत्पन्न होतो त्या स्थितीला बुद्धि असें ह्मणतात. इतकें झालें तरीही ही सारी क्रिया सर्वथैव पूर्ण झाली असें होत नाहीं. येथें आणखीही एका वस्तूची जरूर आहे. अशी कल्पना करा कीं माझ्या हातांत फोटो काढण्याचें एक यंत्र असून माझ्या समोर एक कापडाचा तुकडा पडला आहे. या तुकडयावर त्या यंत्राच्या द्वारा एक चित्र मला उमटवाव-

याचें आहे. हें साधण्यासाठीं निरनिराळे प्रकाशकिरण त्या यंत्रांत एकत्र करून त्याच्या द्वारा ते ह्या पडद्यावर पाडण्याची व्यवस्था मला करावी लागेल. ज्या ठिकाणीं तें चित्र पडावयाचें तें ठिकाण स्थिर असलें पाहिजे. कारण तें ठिकाण स्थिर नसून चलित असेल तर त्यावर चित्र उमटणार नाहीं. त्याजवर पडलेले किरणही स्थिर राहणार नाहींत. हे सर्व किरण एकरूप होणें अवश्य आहे. आणि तसें एकरूप त्यांना झाल्यानंतर ज्या स्थानांवर ते पडणार तें स्थान स्थिरही असलें पाहिजे. हीच गोष्ट आपल्या इंद्रियद्वारा येणाऱ्या बाह्य वस्तूंच्या प्रकाशकिरणांसही लागू आहे. मन आणि बुद्धि यांच्या पाठीमागें सर्वथैव स्थिर असें अधिष्ठान असल्यावांचून आघात व प्रत्याघात यांची क्रिया होऊन त्यापासून ज्ञान उत्पन्न होण्याची क्रिया पूर्ण होणार नाहीं. बाहेरून आलेल्या सर्व किरणांचें एकीकरण जेथें होईल अशी स्थिर वस्तु मन आणि बुद्धि यांच्या पाठीमागें असणें अवश्य आहे. मन, बुद्धि अथवा इतर इंद्रियें यांत एकही स्थिर वस्तु नाहीं. आपल्या सर्व शरीरांत एकसारखी बदलाबदल होत आहे आणि घडामोड चालू आहे. मग ही सारी घडामोड ज्या स्थिर अधिष्ठानाच्या आधारानें चालते तें अधिष्ठान कोणतें ? आपल्या शरीरांतील घडामोड प्रत्येक क्षणीं चालू आहे. प्रत्येक क्षणीं त्याच्या स्वरूपांत बदल होत आहे. असें असतांही त्याची पूर्वानुभवाची परंपरा तुटत नाहीं. अशा स्थितींत त्यांत स्थैर्य कशामुळें येतें ? बाहेरून येणारे अनेक ठसे जेथें एकत्र होऊन त्यांना संकलित असें एकरूप प्राप्त होईल असें स्थिर ठिकाण असणें अवश्य आहे हें आपणास कळलेंच आहे. हें अधिष्ठान देह आणि मन यांच्या अपेक्षेनें स्थिर असलें पाहिजे. ज्या कापडाच्या तुकड्यावर फोटोच्या यंत्रांतील किरण जाऊन पडतात तो तुकडा त्या किरणांच्या तुलनेनें निश्चल असतो. तसा तो निश्चल नसेल तर त्यावर चित्र उमटणार नाहीं. याचा अर्थ हाच कीं बाह्य वस्तूंचा द्रष्टा हा कोणीतरी एकच स्थिर पदार्थ असला पाहिजे. मन आणि बुद्धि यांच्या आघातप्रत्याघातांची क्रिया ज्या स्थिर अधिष्ठानाच्या साहाय्यानें चालते त्या स्थिर अधिष्ठानाला जीवात्मा असें नांव आहे.

महत् तत्त्वाचे दोन भाग होऊन त्यांतून आकाश व प्राण हीं दोन तत्त्वें निर्माण होतात हें मीं अगोदर सांगितलेंच आहे. मनुष्यदेहांतील मन व बुद्धि

यांच्या मागें जें स्थिर अधिष्ठान आहे त्याला जीवात्मा असें नांव आहे हेंही आपणास कळलें आहेच. मनुष्यदेहांत मनबुद्धीच्या पाठीमागें जसा जीवात्मा त्याचप्रमाणें विश्वांत महत् तत्त्वाच्या पाठीमागेंही एक आत्मा असून त्याला ईश्वर असें नांव आहे. व्यक्तींत जसा जीवात्मा त्याचप्रमाणें विश्वांत परमात्मा. ज्याप्रमाणें विश्वांत महत् तत्त्व विभागलें जाऊन प्राण आणि आकाश हीं निर्माण होतात त्याचप्रमाणें परमात्म्यांतून महत् तत्त्व निर्माण होतें. हीच गोष्ट मनुष्यव्यक्तीलाही लागू आहे काय ? मनुष्याचेंही शरीर मनापासून व मन जीवात्म्यापासून निर्माण झालें आहे काय ? ह्मणजे त्याचा देह, त्याचें मन आणि त्याचा आत्मा या तीन अगदीं भिन्न भिन्न व्यक्ति आहेत काय ? कीं या तिहींचें स्वरूप एकच आहे ? या प्रश्नाचें उत्तर मिळविण्याची खटपट हळूहळू आपण करूं. या बाबींत आतांपर्यंत जे मुद्दे आपण सिद्ध केले ते असे. सर्वांच्या बाहेर हें जड शरीर. या बाह्य कवचामागें इंद्रियें, मन व बुद्धि; व बुद्धीच्या मागें जीवात्मा. जीवात्मा हा देहापासून व मनापासून भिन्न आहे ही गोष्ट आतां आपण सिद्ध केलीच आहे. जगांत प्रचलित असलेल्या धर्मांत या बाबतींत बराच मतभेद आढळतो. जे धर्म द्वैतवादी या नांवानें ओळखले जातात त्यांच्या मतें जीवात्मा सगुण आहे. म्हणजे त्याचे स्वतःचे असे विशिष्ट गुणधर्म त्याच्या ठिकाणीं आहेत. सुखदुःखांच्या भावना हा जीवात्म्याचा गुणधर्म आहे असें या द्वैतधर्मांचें मत आहे. उलटपक्षीं जीवात्म्याला कोणतेही गुणधर्म नसून तो शुद्ध निर्गुण आहे असें अद्वैत मत आहे.

आतां आपण प्रथम द्वैत मताचा विचार करूं आणि त्यांच्या मताप्रमाणें जीवात्म्याची गतिस्थिति काय आहे हें पाहूं आणि यानंतर उलट बाजूचाही विचार आपण करूं. त्याचप्रमाणें या भिन्न मतांची एकवाक्यता अद्वैतमतानुसारें होते कीं काय याचाही विचार आपण करूं. मनुष्याचा जीवात्मा ज्या अर्थीं देह आणि मन यांपासून भिन्न आहे आणि त्याची उत्पत्ति ज्या अर्थीं आकाश व प्राण या तत्त्वापासून झालेली आहे त्याअर्थीं तो अमर असला पाहिजे. अमर ह्मणजे काय ? मृत्यु या शब्दाचा अर्थ काय ? मृत्यु म्हणजे विघटना. अनेक वस्तूंच्या संघातानें ज्याची उत्पत्ति झाली आहे अशाच पदार्थांत विघटना होणें शक्य आहे. जो पदार्थ कोणत्याही दोन वस्तूंच्या संयोगानें निर्माण झालेला नाहीं त्यांत विघटना होणें कधींही शक्य

नसल्यामुळें तो कधीं मृत्युही पावणार नाहीं. याकरितां तो अमर असला पाहिजे. मनुष्याचा जीवात्मा अनंत कालापासून अस्तित्वांत आहे. तो कोणीही निर्माण केलेला पदार्थ नाहीं. निर्माण झालेला प्रत्येक पदार्थ म्हणजे वस्तुसंघात होय. आपणापुढें दिसत असलेले सृष्ट पदार्थ केवळ अभावांतून निर्माण झालेले नाहींत. हे सारे पदार्थ त्यांच्यापूर्वी असलेल्या वस्तूंच्या संयोगांतून निर्माण झालेले आहेत. अनेक वस्तु संयोग पावून निरनिराळे आकार त्यांनीं धारण केले आणि तेच आकार सृष्ट पदार्थांच्या रूपानें स्पष्टत्वास आले. मनुष्याचा जीवात्मा हा स्वयंभू पदार्थ असल्यामुळें तो अनंतकाल अस्तित्वांत असला पाहिजे व पुढेंही अनंतकाल तो अस्तित्वांत राहील हें उघड सिद्ध होतें. देहपातानंतर जीवात्म्याचें अस्तित्व शिल्लक उरतें. हा जडदेह विघटनेस गेला ह्मणजे त्यांतील प्राणशक्ति मनांत लीन होते आणि मन प्राणांत लीन होऊन प्राण जीवात्म्यांत लीन होतो. अशा रीतीनें प्राण आणि मन यांच्या वस्त्रांनीं आच्छादिलेला आत्मा लिंगदेह धारण करून जडदेहांतून बाहेर पडतो. या लिंगदेहांत मनुष्याच्या पूर्व चरित्राचे संस्कार असतात. मनुष्याचें मन हें तळ्यासारखें असून विचार हे त्या तळ्यावर उठणाऱ्या तरंगांसारखे आहेत. तळ्यावर ज्याप्रमाणें लाटा उठतात आणि पुन्हां नाहींशा होतात त्याचप्रमाणें मनुष्याच्या मनावरही विचारतरंग जात येत असतात. हे विचारतरंग अदृश्य झाले तथापि ते समूळ नाहींसे होत नाहींत. त्यांचा संपूर्ण नाश होत नाहीं. अधिकाधिक सूक्ष्मरूप धारण करून मनाच्या तळाशीं ते दबा धरून बसतात व प्रसंगानुसार पुन्हां वर उसळतात. आठवण असें ज्या मनाच्या स्थितीला आपण म्हणतों ती स्थिति ह्मणजे निद्रावस्थेंतील विचारतरंगांचें जागें होणें ही होय. सूक्ष्म स्थितींत सुप्तप्राय पडलेले विचार जागृत होऊन उसळून वर आले व मनावर त्यांचा पुन्हां आघात झाला ह्मणजे अमुक प्रकारची आठवण मला झाली असें आपण म्हणतों. अशा रीतीनें आपल्या मनांत उद्भवलेला प्रत्येक विचारतरंग व आपल्या हातून घडलेली प्रत्येक कृति सूक्ष्मरूपानें आपल्या मनाच्या तळाशीं जाऊन बसलेली असते. मनुष्य मृत्यु पावला ह्मणजे या संस्कारांचें एकीकरण होऊन तें त्याच्या मनांत शिल्लक उरतें. मनुष्याचा जीवात्मा या साऱ्या संस्कारांचें पांघरूण आपणाभोंवतीं घेऊन व सूक्ष्म अथवा लिंगदेह धारण करून मृत्युसमयीं जड देहां-

तून बाहेर पडतो. या जीवात्म्याचें भवितव्य या संस्कारास अनुसरून अगोदरच आंखून ठेविलेलें असतें. या संस्कारांचें जें समवायी रूप तेंच जीवात्म्याचें पुढील जन्माचें नशीब. हिंदुतत्त्ववेत्त्यांच्या मताप्रमाणें देहपातानंतर जीवात्म्यापुढें तीन मार्ग मोकळे असतात.

योगाभ्यासानें जे बऱ्याच उच्च पदवीला पोंचलेले असतात ते देहपातानंतर सूर्यलोकीं जातात. सूर्यलोकाहून त्यांचें गमन चंद्रलोकीं होतें आणि चंद्रलोकाहून ते विद्युल्लोकाला जातात. या लोकीं दुसऱ्या एका आत्म्याची भेट त्यांना होते आणि हा आत्मा त्यांचा मार्गदर्शक होऊन तो त्यांना ब्रह्म लोकाला घेऊन जातो. ब्रह्मलोकीं आल्यानंतर त्यांना सर्वसाक्षित्व आणि सर्वशक्तिमत्त्व प्राप्त होतें; जवळ जवळ ते प्रतिपरमेश्वर बनतात आणि येथें त्यांचा वास अखंड असतो असें द्वैतमत आहे. अथवा अद्वैत मताप्रमाणें कल्पांतानंतर या आत्म्याला मुक्ति मिळून ते ब्रह्माशीं एकरूपता पावतात. यांच्या नंतरच्या पायरीचे लोक ह्मटले म्हणजे सहेतुकपणें सत्कर्में आचरणारे लोक होत. यांनाही मृत्यूनंतर त्यांच्या सत्कर्मांनुसार चंद्रलोकद्वारा स्वर्गवास मिळतो आणि तेथें त्यांना देवदेह प्राप्त होतो. या ठिकाणीं देवरूपानें राहून पुष्कळ काळपर्यंत स्वर्गलोकाचें सुख ते भोगतात. त्यांच्या भोगाचा हा काल संपला म्हणजे त्यांचें पुण्य क्षीण होतें व पृथ्वीवर ते पुन्हां परत येतात. वायु व मेघ या लोकांतून पर्जन्यवृष्टीच्या द्वारें भूमीवर ते पतन पावतात. भूमीवर कोठल्या तरी धान्यांत त्यांचा प्रवेश होतो आणि या धान्याच्या द्वारें ते मनुष्याच्या देहांत शिरतात व स्वतःचें नवें शरीर तयार करण्याची सामग्री येथें त्याला मिळते. ही सामान्य माणसांची गोष्ट झाली. आतां याहून तिसऱ्या वर्गाचे लोक ह्मणजे दुष्कृत्यें आचरणारे लोक होत. मृत्यूनंतर या लोकांना भूतसमंधांची योनी प्राप्त होते. आणि पृथ्वी व चंद्रलोक यांच्यामध्यें कोठें तरी त्यांचा वास असतो. या भूताखेतांपैकीं कांहीं भूतें मनुष्यजातीला उपद्रव देणारीं असून कांहीं तिच्या उपयोगीं पडणारींही असतात. या स्थितींत कांहीं काळ काढल्यानंतर हे जीवात्मे पृथ्वीवर येऊन पशुदेह धारण करतात. पशुदेहांत योग्य काळ घालविल्यानंतर त्या देहांतून त्यांची सुटका होऊन पुन्हां त्यांना मनुष्यदेह मिळतो व अशा रीतीनें मुक्तीची खटपट करण्याकरितां आणखी एक संधी त्यांना मिळते. जे लोक

जवळ जवळ पूर्णत्व पावलेले असतात व ज्यांच्या ठिकाणीं अशुद्धत्वाचा फारच थोडा अंश शिल्लक असतो ते सूर्यकिरणांच्या द्वारें ब्रह्मलोकास जातात. मध्यम स्थितींतले सत्कर्में करणारे लोक चंद्रलोकद्वारा स्वर्गास जातात आणि देव होतात. तथापि येथून त्यांना मृत्युलोकीं पुन्हां परत यावें लागतें व अशा रीतीनें मुक्त होण्याची संधि त्यांना पुन्हां मिळते. दुष्कृत्यें करणारे लोक भूताखेतांच्या योनीला जाऊन पशुदेहांत परत येतात व पशुदेहांतून पुन्हां मानवयोनीला जातात. पृथ्वी ही कर्मभूमी आहे. केवळ याच ठिकाणीं मनुष्याला सत्कर्म अथवा दुष्कर्म स्वतंत्रपणें आचरतां येतें. कोणाला स्वर्गलोकांत जाण्याची इच्छा असली तर तो हेतु मनांत धरून व तदनुरूप सत्कर्में आचरून देवदेह तो प्राप्त करून घेतो. या ठिकाणीं उद्दिष्ट भोगांची प्राप्ति त्याला होते. ते भोग भोगण्यावांचून दुसरें कोणतेंही स्वतंत्र कर्म देवलोकीं त्याला करावयाचे नसतें. त्याचा पुण्यासंचय भोगानें क्षीण झाला म्हणजे पूर्वजन्मांतील दुष्कर्में उदय पावतात व तीं त्याला पृथ्वीकडे पुन्हां घेऊन येतात. पृथ्वीकडे तो परत येतो तो स्वर्गात केलेल्या कर्मांमुळें नव्हे; कारण स्वर्गात स्वतंत्र कर्म नाहीं. त्याचप्रमाणें भूतेंखेतेंही नवीं कर्में आचरीत नाहींत. या योनींत मनुष्यजन्मीं केलेल्या दुष्कृत्यांचीं फळें मात्र त्यांस भोगावयाचीं असतात व अशा रीतीनें पूर्वी केलेल्या दुष्कृत्यांचा क्षय झाला ह्मणजे कांहीं काळपर्यंत तीं पशुदेह धारण करतात. या देहांतही नवें कर्म त्यांच्या हातून घडत नाहीं. पशुदेहाची मुदत संपली ह्मणजे तीं पुन्हां मनुष्यें होतात. देवयोनी, भूतयोनी, अथवा पशुयोनी यांत नव्या कर्माला अवकाश नसून पूर्वकर्माचे भोग भोगण्यापुरतीच त्यांची प्राप्ती झालेली असते. सत्कर्में अथवा दुष्कृत्यें यांचीं फळें भोगण्यापुरताच या दोन योनींचा उपयोग आहे. एखादें कर्म आत्यंतिक उत्तम अथवा आत्यंतिक वाईट असलें तर त्याचें फळ फार लवकर प्राप्त होत असतें. एखादा मनुष्य अनेक दुष्कत्यें आचरीत असतां मध्येंच एखादें मोठें सत्कृत्य त्याच्या हातून घडलें तर त्या सत्कृत्याचें फळ त्याला ताबडतोब मिळेल; पण हें फळ भोगानें क्षीण झालें ह्मणजे त्याच्या दुष्कृत्यांचीं फळेंही उदय पावल्यावांचून राहत नाहींत. जीं मनुष्यें सामान्यतः मोठ्या परोपकाराचीं आणि चांगलीं कृत्यें करीत असतात तथापि ज्यांची सारी वागणूक नीतिशुद्ध नसते अशीं माणसें देवयोनींत जातात व तेथें आपल्या सत्कृ-

त्याचीं फळें भोगून मानवलोकीं तीं पुन्हां परत येतात. सत्कृत्यांचीं फळें भोगानें क्षीण झालीं म्हणजे दुष्ट फळांचा उदय होतो व त्यामुळें मृत्युलोकीं त्यांना पुन्हां यावें लागतें. भयंकर दुष्कृत्यें करणारे लोक मनुष्यदेहाच्या पातानंतर भूतांचे अथवा समंधाचे देह धारण करतात व अशा रीतीनें दुष्फलांचा क्षय झाला म्हणजे चुकूनमाकून त्यांच्या हातून घडलेल्या सत्कृत्यांचा उदय होतो व त्यामुळें पुन्हां मानवदेहाची प्राप्ति त्यांना होते. ब्रह्मलोकांत पोहोंचलेल्या जीवात्म्याला पुनरावृत्ति नाहीं. तो ज्या मार्गानें ब्रह्मलोकीं गमन करतो त्याला देवयान असें नांव आहे. स्वर्गलोकास जाणाऱ्या मार्गाला पितृयान ही संज्ञा आहे.

मनुष्यप्राणी हा साऱ्या विश्वांत श्रेष्ठतम आहे हें वेदांतधर्माचें मत येथवर केलेल्या विवेचनावरून तुमच्या लक्ष्यांत आलें असेलच. त्याचप्रमाणें स्वतःच्या करणीनें नराचा नारायण होण्याची संधि फक्त मृत्युलोकांतच मिळत असल्यामुळें साऱ्या विश्वांत मृत्युलोक ही श्रेष्ठतम भूमि आहे ही गोष्टही तुमच्या ध्यानीं आली असेलच. देवदूत अथवा देव हे मनुष्याहून श्रेष्ठसे वाटत असले तरी पूर्णत्व पावण्याची संधि त्या योनींत नाहीं. पूर्णत्व पावण्याची इच्छा त्यांना असेल तर त्यांना मृत्युलोकींच आलें पाहिजे. याकरितां मानवी जीवन हा एक सर्वश्रेष्ठ मध्यबिंदु आहे. या ठिकाणीं विलक्षण समतोलपणा आहे. याच ठिकाणीं पूर्णत्व पावण्याची संधि आहे.

आतां इतर तत्त्वज्ञांच्या मताचा विचार आपण करूं. येथवर सांगितलेली सारी उपपत्ति बौद्धांना मान्य नाहीं. ‘ सर्व चलित वस्तूच्या पाठीमागें कांहीं तरी स्थिर रूप असलें पाहिजे. असें मानण्याचें कारण काय ? ’ असा प्रश्न बुद्धदेवानें केला आहे. ते ह्मणतात आपले विचार कोठें तरी स्थिरावलेच पाहिजेत असा हट्ट तरी कशाला? ते कोठेंही पळत सुटले तरी त्यांत काय बिघडलें ? या दृश्य देहापलीकडे आणि मनापलीकडे तिसरा पदार्थ आहे असें कां मानावें ? असा पदार्थ मानण्यापासून फायदा काय ? जें दिसतें आहे तेवढयानेंच साऱ्या भानगडीचा उलगडा होत असतां आणखी एका अध्याहृत पदार्थाची जरूर काय ? बुद्धदेवांची ही विचारसरणी मोठी जोमदार आहे यांत शंका नाहीं. त्यांतील तर्कपद्धतीही नांव ठेवण्यासारखी नाहीं. केवळ जड दृष्टीनें जितका शोध लागतो तेवढयावरून या दृश्य देहांत बऱ्या-

चशा प्रश्नांचा उलगडा होतो हें खरें; मग देह नव्हे आणि मनही नव्हे अशा प्रकारचा स्थायी भावात्मक जीवात्मा कां मानावा हा प्रश्न खरोखरच मोठ्या विचाराचा आहे. मन आणि शरीर एवढयांचेंच अस्तित्व आपल्या कामास पुरेसें आहे. देह ह्मणजे क्षणोक्षणीं बदलणाऱ्या जड वस्तूंचा प्रवाह; आणि मन ह्मणजे सूक्ष्म जाणिवेचा अथवा विचारशक्तीचा क्षणोक्षणीं बदलणारा प्रवाह. आतां या दोन क्षणोक्षणीं बदलणाऱ्या वस्तु एकत्र राहतात त्या कशाच्या आधारावर ? असा एक प्रश्न येथें उपस्थित होईल. याला आपण असें उत्तर देऊं कीं ही एकतानता वस्तुतः खरी नसून केवळ भासमान होणारी मात्र आहे. उदाहरणार्थ, एक पेटविलेलें कोलित हातीं घेऊन तें गरगरा फिरविलें तर एक तेजोवलय तुह्मांस दिसतें. वस्तुतः या अग्निवलयाला अस्तित्व नाहीं; पण तें कोलित एकसारखें चलित स्थितींत असल्यामुळें अग्निवलयाला भ्रमानें उत्पन्न करतें. मानवी जीवनांत दिसणाऱ्या एकतानतेंतही हाच सिद्धांत लागू आहे. जडवस्तूंचा एक मोठा समूह एकसारखी धांव घेत आहे आणि त्याच्या या प्रवाहाला जीवन अशी संज्ञा तुह्मी लावतां. ही बाह्यतः दिसणारी एकतानता त्या अग्निवलयाप्रमाणेंच भ्रामक आहे. मनालाही हीच गोष्ट लागू आहे. प्रत्येक विचार दुसऱ्यापासून भिन्न आहे. पण विचारामागें विचार अशा रीतीनें हा प्रवाह एकसारखा चालू असल्यामुळें तेथेंही एकरूपतेचा भ्रम निर्माण होतो. याकरितां मन अथवा शरीर यांच्यांत खरी एकरूपता नसतांही दृश्य एकरूपता भ्रममय असल्यामुळें तिची उत्पत्ति कशी होते हा प्रश्नच उत्पन्न होत नाहीं. आणि या प्रश्नाच्या अभावीं या दोहोंस स्थिर ठेवणाऱ्या जीवात्म्याचें अस्तित्व मानण्याचेंही कारण उरत नाहीं. कारण ही सारीच वंध्यासुताची कहाणी होय. सर्व विश्वभर आढळून येणारा देह आणि मन यांचा हा देखावा इतकीच कायती खरी वस्तु आहे. यांच्या पाठीमागें आणखी एखादें अधिष्ठान ठेवण्याचें कारण नाहीं. बुद्धदेवांची ही विचारसरणी कित्येक अर्वाचीन पंथप्रवर्तकांनीं व तत्त्ववेत्त्यांनीं उचलली असून ती आपल्याच मेंदूंतून जन्म पावली आहे असाही हक्क ते सांगत आहेत. जग जसें दिसतें तेवढयांतच साऱ्या प्रश्नांचा उलगडा होत असून त्या बाहेर आणखी एखादें अस्तित्व मानण्याचें कारण नाहीं ही कल्पना बौद्ध तत्त्वज्ञानाच्या बहुतेक ग्रंथांत प्रामुख्येंकरून आढळून येते. जग आहे तसेंच पाहिलें असतांही सर्व प्रश्नांचा उलगडा

जर होत आहे तर त्याव्यतिरिक्त अदृश्य अशी एखादी वस्तु कां मानावी ? असा बौद्धांचा प्रश्न आहे. अस्तित्व म्हणून जें कांहीं आहे तें इंद्रियज्ञात विश्व हेंच होय. याला आधार म्हणून आणखी एखादी वस्तु गृहीत करण्यापासून उपयोग काय ? विश्व हें अनेक गुणांचा समुच्चय आहे. ज्या ठिकाणीं हे सारे गुण एकरूप होतात असें काल्पनिक ठिकाण कां मानावें ? जसे ते प्रत्ययास येतात तेंच त्यांचें मूळरूप आहे असें मानलें तर त्यांत काय बिघडलें ? अमुक एक देखावा वस्तुरूप आहे ही कल्पना गुणांच्या झपाटयाच्या अतिक्रमामुळें उत्पन्न होते. त्यांत खरोखरच कोठें तरी स्थायीभाव असून त्यामुळें ती उत्पन्न होते असें नाहीं. या देखाव्यापाठीमागें कांहीं तरी स्थिर अधिष्ठान असून त्या अधिष्ठानावर ते स्थिरता पावत असल्यामुळें सद्रूप भासतात असें नसून केवळ गुणांच्या झपाट्याच्या प्रवाहामुळें अस्तित्वाचा आभास तेथें उत्पन्न होतो. या विचारसरणींत किती खोंच भरली आहे हें तुमच्या लक्ष्यांत आतां आलेच असेल. यांत दुसरी मौज ही कीं ही विचारसरणी सामान्य मनुष्याच्या अनुभवांतली असल्यामुळें त्याच्या गळीं ती तावडतोब उतरते. वस्तुस्थिति अशी आहे कीं लक्षावधि मनुष्यांत एखाद्यालाही दृश्य देखाव्यापलीकडे कांहीं अस्तित्व असूं शकेल अशी शंकासुद्धां येत नाहीं. विश्व म्हणजे लक्षावधि जड वस्तूंचा क्षणोक्षणीं बदलणारा देखावा इतकीच गोष्ट बहुधा साऱ्या माणसांच्या मनाला पटते. या प्रचंड घडामोडीच्या पाठीमागें जो नितांत शांत महासागर पसरला आहे त्याचें पुसटसें दर्शनही आपणा मनुष्यांपैकीं फारच थोडयांस घडतें. त्यावर उठणाऱ्या प्रचंड लाटा मात्र आपणा सर्वांच्या प्रत्ययास नेहमीं येत असतात. विश्व म्हणजे हजारों लाटा एकमेकींवर आदळत आहेत व एकमेकींत मिसळून पुन्हां विभागल्या जात आहेत हीच आमची कल्पना. अशा रीतीनें हीं दोन मतें प्रचलित आहेत. देह आणि मन यांच्या पाठीमागें कांहीं तरी स्थिर अधिष्ठान आहे हें एक मत आणि न बदलणारें अथवा स्थलांतर न करणारें असें या विश्वांत कांहींच नाहीं हें दुसरें मत. या दुसऱ्या मताप्रमाणें ही अदलाबदल आणि घडामोड अखंड चालू आहे. आतां अद्वैत मताप्रमाणें या प्रश्नाचा निकाल कसा लागतो याचा विचार आपण करूं.

या दृश्य देखाव्यामागें कधींही न बदलणारें असें स्थिर अधिष्ठान आहे हें द्वैतवाद्यांचें म्हणणें अद्वैत सिद्धांत कबूल करतो. स्थिर वस्तूचा आधार

असल्याशिवाय चल वस्तु चलन करूं शकतात असा अनुभव आपणास केव्हांही येत नाहीं. असा अनुभव कोणत्याही काळीं आणि कोणत्याही स्थळीं मुळींच प्रत्ययास येत नसल्यामुळें असें होणें असंभवनीय आहे असेंच म्हटलें पाहिजे. अमुक एक वस्तु अस्थिर आहे असें आपण ह्मणतों तेव्हां दुसऱ्या एखाद्या कमी अस्थिर वस्तूच्या सापेक्षतेनेंच आपण तसें म्हणत असतों. अशी कल्पना करा कीं एक बैलगाडी आणि एक आगगाडी अशा दोन गाड्या समांतर चालल्या आहेत. आगगाडीचा वेग अधिक असल्यामुळें त्याच्या सापेक्ष प्रमाणानें बैलगाडी स्थिर आहे असें आपणास वाटतें. अशा रीतीनें हें गतीचें प्रमाण अधिकाधिक कमी होऊन अखेरीस स्थिर पदार्थावर आपण येऊन पोहोंचतों. जेथें कोणत्याही प्रकारची गति नाहीं असा स्थिर पदार्थ असल्यावांचून बाकीच्या कमी अधिक गती आपल्या जाणिवेंत यावयाच्याच नाहींत. आपणापुढें दिसत असलेलें हें सारें दृश्य विश्व शांत अशा अदृश्यावस्थेंत केव्हांतरी असलेंच पाहिजे. ज्या वेळीं या विश्वांतील सारी शक्ति पूर्ण समतोल स्थितींत असेल असा एखादा काळ असलाच पाहिजे. आपणास कोणत्याही शक्तीच्या गतीचा प्रत्यय येतो तो त्या शक्तीचा समतोलपणा बिघडलेला असेल तेव्हांच येतो. समतोलपणा बिघडून ती शक्ति अनेकशः विभागली जाते व हे विभाग अनेक दिशांनीं ओढाताण करूं लागतात तेव्हांच ती शक्ति प्रत्यक्ष अस्तित्वांत येते. ज्या वेळीं असे अनेक विभाग झालेले नसतात त्यावेळीं ती मूलशक्ति समतोल असते व त्या स्थितींत तिचा प्रत्यय येणें शक्य नसतें. साऱ्या विश्वांत जी धडपड सुरू आहे ती हा नष्ट झालेला समतोलपणा परत मिळविण्याकरितांच आहे. हा सिद्धांत अत्यंत निश्चयात्मक स्वरूपाचा आहे. स्थिर असें अधिष्ठान या चल वस्तूंच्या पाठीमागें आहे हा द्वैतवाद्यांचा सिद्धांत आम्हांस पूर्णपणें मान्य आहे; पण हें स्थिर अधिष्ठान देह आणि मन यांच्यापासून अगदीं भिन्न गुणधर्मांचें आहे असें ते म्हणतात तें मात्र आम्हांस कबूल नाहीं. आमच्या दृष्टीनें त्यांची ही विचारमालिका चुकीची आहे. त्याचप्रमाणें विश्व म्हणजे अखंड वस्तूंचा अविरत चाललेला प्रवाह आहे हें बौद्ध मतही आम्हांस मान्य आहे. कारण, दृश्य विश्व आणि द्रष्टा मी या दोहोंत द्वैतभेद अनुभवास येत आहे तोंपर्यंत चलविश्वाच्या सापेक्षतेनें द्रष्टा मी अधिक स्थिर असल्यामुळें विश्व हा चल-

वस्तूंचा प्रवाह आहे असेंच मी म्हणेन. विश्व आणि मी अशा दोन भिन्न वस्तु अस्तित्वांत आहेत तोंपर्यंत त्यांतील एक चल व दुसरी स्थिर ही भावनाही कायम असणारच; पण वस्तुस्थिति अशी आहे कीं हें विश्व चलही आहे आणि स्थिरही आहे. जीवात्मा, मन आणि देह अशा तीन परस्पर भिन्न वस्तु आहेत असें नाहीं. हें सारें अस्तित्व वस्तुतः एकरूप असून तें त्रिपुटरूप दिसतें. एकच वस्तु देह, मन आणि या दोहोंच्या पलीकडची अशा त्रिविध रूपानें प्रत्ययास येते. ज्याच्या ठिकाणीं शुद्ध देहात्मभाव आहे त्याला मनाचें अस्तित्वही अनुभवास येणार नाहीं. त्याच प्रमाणें मी मनोरूप आहें ही भावना ज्याला दृढमूल असेल त्याची दृष्टि जीवात्म्यापर्यंत पोंचणार नाहीं. आणि ज्याची दृष्टि जीवात्म्यापर्यंत पोंचली आहे त्याला मन आणि देह यांचें अस्तित्व भासावयाचें नाहीं. ज्याच्या दृष्टीला केवळ चलपदार्थ मात्र दिसतात त्याला शुद्ध शांतरूप प्रत्ययास येणार नाहीं; आणि नितांत शांत रूप ज्यांच्या प्रत्ययास आलें असेल त्याला चलवस्तु दिसावयाची नाहीं. याला रज्जुसर्पन्याय असें ह्मणतात. एखादा दोरीचा तुकडा पडला असतां दृष्टिभ्रमानें आपणास साप पडला आहे असें वाटतें. हा सर्पभ्रम कायम असतो तोंपर्यंत दोरीचें अस्तित्व आपल्या दृष्टीनें नसतेंच. दोरी जणूं काय अस्तित्वांतच नाहीं असें आपणास वाटत असतें आणि हा भ्रम नाहींसा झाला म्हणजे दोरी दिसूं लागते पण साप मात्र त्याच क्षणीं नाहींसा होतो. हे दोन वेगवेगळे प्रत्यय एकाच काळीं आपणास कधींही येत नाहींत. त्यांतील एक असतो तेव्हां दुसरा नसतो.

यावरून सर्वांतर्गत असें एकच अस्तित्व असून तेंच अनेकविध रूपांनीं दिसतें ही गोष्ट आपल्या लक्ष्यांत आली असेलच. अस्तित्व म्हणून जें कांहीं आहे तेंच आत्मरूप अथवा वस्तुरूप. याच वस्तुरूपाला अथवा आत्मरूपाला अद्वैताच्या भाषेंत ब्रह्म असें नांव आहे. नामरूपांच्या उपाधींमुळें हें एकरूप ब्रह्म अनेक रूपांनीं दिसतें. समुद्रांत शेंकडों लाटा उठलेल्या असतात. यांतील कोणत्याही लाटेस समुद्राहून भिन्न असें अस्तित्व नाहीं; तथापि या सगळ्या लाटा वेगवेगळ्या दिसतात. या भेदाचें कारण काय? नाम आणि रूप हेंच या भेदाचें कारण होय. तेथें दिसणारा विशिष्ट आकार अथवा रूप आणि त्या आकाराला आपण दिलेलें लाट हें नांव या दोहोंमुळेंच समुद्राचा तेवढा

भाग बाकीच्या समुद्राहून वेगळा झाला आहे. हा आकार नाहींसा झाला आणि हें नांवही अस्तित्वांतून गेलें म्हणजे पूर्वीचा समुद्र जशाचा तसाच राहील. समुद्र आणि लाट यांत अमुक एक प्रकारचा खरा भेद आहे असें कोण दाखवूं शकेल? अशाच रीतीनें हें सारें अस्तित्व एकरूपच आहे. नाम आणि रूप यांच्यामुळें यांत अनेक भेद उत्पन्न झाले आहेत. पाण्याच्या लक्षावधि बुडबुडयांवर सूर्याचा प्रकाश पडला म्हणजे त्यांतील प्रत्येक बुडबुडयांत सूर्याचें संपूर्ण प्रतिबिंब उमटलेलें असतें. त्याचप्रमाणें तें एकच परमात्मरूप अनेक नामांच्या व अनेक आकारांच्या बुडबुडयांत प्रतिबिंबित होऊन दिसत आहे आणि यामुळेंच तें अनेकशः झाल्यासारखें भासतें. वस्तुतः त्यांत भेद नसून तें एकच अस्तित्व आहे. तेथें मी आणि तूं यांना अस्तित्व नाहीं. जें कांहीं आहे तें एकच. तें सर्व मी आहें अथवा सर्वच तूं आहे. मी आणि तूं अशा दोन स्वरूपांत आढळून येणारी द्वैताची भावना सर्वथा खोटी आहे आणि या खोट्या भावनेनें आपण सर्व पछाडलेले असल्यामुळें सांप्रतच्या अनेकविध रूपांनीं आपणास विश्व भासमान होत आहे. आत्मानात्मविवेक आपल्या ठिकाणीं उत्पन्न झाला म्हणजे द्वैत कोठेंही नसून जें कांहीं आहे तें एकच आहे असा अनुभव आपणास येतो. सर्व विश्व मीच आहें असें आपण मानूं लागतों. क्षणोक्षणीं बदलणारा विश्वाचा हा प्रवाह मीच आहें. या बदलणाऱ्या पलीकडच्या स्थितींतील एकरूप पदार्थ मी आहें; सर्व गुणांच्या पलीकडचा मी आहें; सर्व काल पूर्णरूप असा मी आहें; आणि आनंदरूपही मी आहें असा अनुभव आपण सांगतों.

ह्यावरून पूर्णरूप, पूर्ण शुद्ध स्वरूप आणि कधींही न बदलणारा आत्मा सदा एकरूप आहे हें आपल्या लक्ष्यांत आलें असेलच. आत्मरूपांत बदल असा केव्हांच झाला नव्हता. विश्वांत दिसणारे आणि वारंवार बदलणारे हे निरनिराळे आकार हीं त्या एकाचींच केवळ आभासमान होणारीं अनेक रूपें आहेत.

या आत्मरूपावरच नाम आणि रूप यांनीं हीं अनेक स्वप्नें चित्रित केलीं आहेत. आकारामुळेंच लाट समुद्रापासून भिन्नशी भासते; लाट नाहींशी झाली म्हणजे आकारही नाहींसा होतो. त्या लाटेचें अस्तित्व समुद्राच्या अस्तित्वावर सर्वतोपरी अवलंबून आहे; पण समुद्राचें अस्तित्व लाटेच्या अस्तित्वावर

कोणत्याही प्रकारें अवलंबून नाहीं. लाटेचें अस्तित्व असेपर्यंत त्या आकाराला अस्तित्व असतें आणि लाट गेल्याबरोबर तो आकारही नाहींसा होतो. नाम आणि रूप यांची उत्पत्ति मायाकृत आहे. मायेमुळेंच अनेक व्यक्ति निर्माण होऊन परस्परांपासून भिन्न अशा त्या भासतात; तथापि मायेला वास्तविक अस्तित्व नाहीं. माया सद्रूप आहे असें म्हणतां येत नाहीं. आकाराला सद्रूप अस्तित्व आहे असें म्हणतां यावयाचें नाहीं. कारण त्याचें अस्तित्व दुसऱ्या वस्तूच्या अस्तित्वावर अवलंबून असतें. तसेंच मायेला अस्तित्व नाहीं असेंही सांगतां यावयाचें नाहीं; कारण हे अनेक भेद तिच्यामुळें प्रत्यक्ष दिसत आहेत. याकरितां माया आहे असें नाहीं अथवा ती नाहीं असेंही नाहीं. माया अथवा अज्ञान किंवा नाम आणि रूप अथवा यूरोपीय तत्त्ववेत्त्यांचें काल स्थल कारण हिच्यामुळेच विश्व अनेकशः भासत आहे. वस्तुतः हें विश्व एकरूप आहे. दोन सत्यरूपें अस्तित्वांत आहेत असें जोंपर्यंत आपणास वाटतें तोंपर्यंत वस्तुस्थितीचा बोध आपणास झालेला नसतो. वस्तुस्थितीचा बोध झाला म्हणजे सर्व अस्तित्व एकरूप आहे ही खूण आपणास पटते. सांप्रतचीं भौतिक शास्त्रें सिद्ध करण्याच्या मार्गांत असून त्यांचें पाऊल प्रत्यहीं पुढें पडत आहे. सूर्य, चंद्र, तारे, तुम्ही आणि मी हीं एकाच जड पदार्थाचीं बनलेलीं अनेक रूपें असून जड पदार्थांच्या महासागरावर या एकाच स्वरूपाच्या अनेक लाटा जणूंकाय तरंगत आहेत ही गोष्ट आजमितीस सिद्ध झालेली आहे. या महासागरांत अनेक प्रकारच्या घडामोडी सुरू असून या वस्तूंतले घटक क्षणानें त्या वस्तूंत व त्या दुसरींतले घटक दुसऱ्या क्षणीं आणखी एखाद्या वस्तूंत जातात ही गोष्ट चालू काळीं सिद्ध झाली आहे. मूल शक्तीचे सूर्यांतील अणू आज सूर्यांत असतां कांहीं काळानें तेच मनुष्यांत आढळतात आणि आज मनुष्यांत राहून तेच अणु उद्यां एखाद्या पशूंत जातात आणि परवां तेच एखाद्या वनस्पतींतही प्रवेश करतील अशा प्रकारच्या त्यांच्या येरझारा अखंड सुरू आहेत. जडवस्तूंचा जो अफाट महासागर पसरला आहे त्यांत नाम आणि रूप यामुळें भेद होऊन आपण-साऱ्या लाटा उत्पन्न झालों आहों. यांतील एका लाटेला सूर्य असें नांव आहे, दुसरीला चंद्र, तिसरीला तारका, चौथीला मनुष्य, पांचवीला जनावरें आणि सहावीला झाड अशीं अनेक नांवें अनेक लाटांना प्राप्त झालीं आहेत. हीं सारीं नांवें

शुद्ध काल्पनिक आहेत. वस्तुस्थितींत त्यांना अस्तित्व नाहीं. कारण तो महासागर एकसारखा हालचाल करीत असून त्यांत तरंगणाऱ्या घटकांची अदलाबदल प्रत्येक क्षणीं होत आहे. केवळ जडवस्तूच्या दृष्टीनें विश्वाचें हें वर्णन आहे. आतां विचाराच्या दृष्टीनें पाहतांही हाच प्रकार आढळून येतो. विचाराच्या प्रचंड महोदधीवर अनेक लाटा उठल्या असून तींतील प्रत्येकास मन अशी संज्ञा प्राप्त झाली आहे. मी हें एक मन, तुह्मी हें एक मन आणि त्याचप्रमाणें बाकीचीं सारीं मनें. आतां ही मनाची कक्षा सोडून आपण तुरीयावस्थेंत ह्मणजे मनातीत अवस्थेंत गेलों व तेथून या विश्वाकडे पाहिलें म्हणजे भ्रमाचा पडदा आपणासमोर बसल्यामुळें हें सर्व केवलरूप अ–जर, अ–मर आणि विशुद्ध असें एकरूप आहे असें आपणास दिसूं लागतें. अशा स्थितींत विश्वांत दिसणाऱ्या अनेक लाटा दिसेनाशा होऊन अखंड एकरूपाचा प्रत्यय आपणास येतो.

एकरूपता हेंच जर वस्तुरूप असेल तर द्वैतवाद्यांच्या त्रिविधरूपाची काय वाट? त्याचप्रमाणें मृत्यूनंतर मनुष्य स्वर्गाला जातो, चंद्रलोकाला जातो अथवा वैकुंठाला जातो आणि दुष्ट मनुष्यें भुताखेतांच्या आणि पशूंच्या योनीस जातात अशा प्रकारच्या मतांची काय वाट लावावयाची? वस्तुस्थिति अशी आहे कीं कोणी जात नाहीं आणि कोणी येतही नाहीं. जावयाचें कोठें आणि यावयाचें कोठून हाच अद्वैतसिद्धांताचा प्रश्न आहे. तुह्मी स्वतःच अनंतरूप आहां. मग तुह्माला जाण्यास आणखी निराळी जागा तरी कोठून आणावी? एका शाळेंत एका लहान मुलांच्या वर्गाची परीक्षा चालली होती. परीक्षकानें अनेक प्रकारचे प्रश्न त्यांना विचारले. त्यांत एक प्रकारचा असा विचारला कीं, पृथ्वी पडत कां नाहीं? त्या परीक्षकाच्या मनांतून गुरुत्वाकर्षणाचा नियम त्या मुलांकडून वदवावयाचा होता. पुष्कळशा मुलांना या प्रश्नाचा अर्थच न समजल्यामुळें कांहीं तरी वेडीवांकडीं उत्तरें त्यांनीं दिलीं. अखेरीस एक हुशार मूल ह्मणालें "पृथ्वी पडणार कोठें?" परीक्षकानें विचारलेला प्रश्न मूर्खपणाचा होता हें मात्र यावरून उघड सिद्ध झालें. विश्वविस्तारांत खालीं आणि वर या कल्पनांना अस्तित्वच नाहीं. खालीं आणि वर ही कल्पना केवळ सापेक्ष आहे. हीच गोष्ट आत्म्यालाही लागू आहे. जन्म आणि मृत्यु या दोहोंचाही विचार आत्मदृष्टीनें असंभवनीय आहे. आत्म्याच्या ठिकाणीं

हा प्रश्नसुद्धां उद्भवत नाहीं. याकरितां असा प्रश्न उत्पन्न करणें हाच मुळीं मूर्खपणा होय. जातो कोण आणि येतो कोण ? तुह्मी नव्हतां असें स्थळ तरी कोठें आहे ? तुह्मी नव्हतां असा काळ कोणता अस्तित्वांत होता ? जेथें तुह्मी अगोदरच नाहीं असा स्वर्गलोक अस्तित्वांत तरी आहे काय ? सर्वव्यापित्व हेंच तुमचें रूप; मग तुमचें अस्तित्व जेथें नाहीं असें ठिकाण कोणतें सांपडूं शकेल ? तुह्मी जावें अथवा जाऊं नये असें एकही स्थल कोठें नाहीं. कारण तुमची व्याप्ति सर्वत्र अगोदरच आहे. याकरितां जन्म आणि मृत्यु आणि स्वर्गचंद्रवैकुंठादि लोक आणि पातालादि भुवनें हीं शुद्ध स्वप्नवत् आहेत. ही केवळ लहान मुलांची बडबड आहे. जो पूर्णत्व पावला त्याच्या दृष्टीला यांतलें एकसुद्धां दिसावयाचें नाहीं. त्याचें अस्तित्व केवळ अज्ञ जनांकरिता मात्र आहे.

तुमचें हें म्हणणें खरें असेल तर स्वर्गादि लोकांवर सर्व जगाचा विश्वास आहे हें कसें ? आणि मनुष्याचे जन्ममृत्यु तर आम्ही प्रत्यक्षच पाहतों. एक ग्रंथ मी वाचीत आहें असें समजा; वाचतां वाचतां पानांमागें पान मी उलटित जातों. एक पान मागें पडलें कीं दुसरें नवें माझ्या नजरेसमोर येतें. यांत बदल होतो तो कोणाचा ? जातें कोण आणि येतें कोण ? यांत मी वाचक स्थिर असून जाण्यायेण्याची क्रिया पुस्तकांत घडते. त्याचप्रमाणें आत्म्याच्या डोळ्यांपुढें हा विश्वरूपी महाग्रंथ उघडला असून त्याचीं पानांमागे पानें वाचीत आहे व वाचून उलटून टाकीत आहे. एक पान वाचून झालें की एक देखावा संपून नव्या देखाव्याला आरंभ होतो. तो संपला कीं तिसऱ्यास सुरुवात होते; पण अशा रीतीनें देखावे कितीही बदलले तरी जीवात्मा जागच्या-जागींच कायम असतो. तो सर्वदा एकरूपच असतो. बदल होतो तो प्रकृतीच्या देखाव्यांत होतो; मनुष्याच्या आत्मरूपांत होत नाहीं. तें रूप कधींच बदलावयाचें नाहीं. जन्म आणि मृत्यु हेही प्रकृतीचेच भाव आहेत. त्यांचा संबंध तुमच्या आत्मरूपाशीं मुळींच येत नाहीं. अज्ञानाच्या भ्रमामुळें त्यांचा आरोप आपण स्वतःवर करीत असतों. ज्याप्रमाणें पृथ्वी स्थिर असून सूर्य तिजभोंवती फिरतो असें दृष्टिभ्रमामुळें आपणास वाटतें त्याचप्रमाणें मी मरतों आणि मी जन्मास येतों असा भ्रम आपणास झाला आहे. या प्रकृतीच्या गुणांचा आरोप आत्मरूपावर आपण केला आहे. याकरितां हा सारा भ्रम आहे हे

नीट ध्यानीं आणावें. आपण आगगाडींत बसलों असतां गाडी झपाट्यानें चालूं लागली झणजे बाजूचीं झाडें आणि शेतें पळत असल्याचा भास आपणास होतो. आपली गाडी स्थिर असून बाजूचे भाग धांवत आहेत असें आपणास वाटतें. जन्म आणि मृत्यु यांचाही प्रकार हाच आहे. आपल्या मनाची जी सांप्रतची विशिष्टावस्था आहे तिजमुळें हा भ्रम उत्पन्न झाला आहे. तिच्यामुळेंच पृथ्वी, चंद्र, तारे, सूर्य इत्यादि भिन्न अस्तित्वें आपणास भासतात. मनाच्या या विशिष्टावस्थेंत जो जो कोणी असेल त्या प्रत्येकाला हे असेंच दिसावयाचें. याखेरीज एखाद्याची अवस्था निराळी असेल तर हेंच अस्तित्व त्याला वेगळ्याच रूपानें प्रतीत होईल. आमच्याहून वेगळ्या मनःकक्षेतील लोक असतील तर त्यांना तुम्ही व मी दिसणार नाहीं. तुम्ही आह्मी एकमेकांस पाहतों याचें कारण हेंच कीं आपण सारे मनाच्या एकाच अवस्थेंतील व एकाच कक्षेंतील लोक आहोंत. ज्या प्रकृतिस्पंदामुळें मनुष्यप्राणी ही वस्तु अस्तित्वांत आली तो प्रकृतिस्पंद कमी अथवा अधिक झपाट्याचा झाला तर मनुष्याचें अस्तित्वच दिसावयाचें नाहीं. अशा स्थितींत मनुष्य हा शब्दसुद्धां साऱ्या विश्वांत ऐकूं यावयाचा नाहीं. अशा स्थितींत सांप्रतच्याहून अगदीं वेगळा असा एखादा नवाच देखावा आपल्या आत्मचक्षूंपुढें दिसूं लागेल. कदाचित् मनुष्यशरीराच्या ऐवजीं देवशरीरें व मृत्युलोकाऐवजीं देवलोक आपणास दिसूं लागेल अथवा आपलीं हृदयें दुष्ट असतील तर समंधांचे देह आणि नरकलोक असा देखावा आपणांस दिसेल. वस्तुरूप एकच असतां दृष्टीच्या बदलामुळें असे अनेक बदल त्यांत होतात. सांप्रतच्या आपल्या मनुष्यकक्षेंत हें विश्व, पृथ्वी, सूर्य, चंद्र, तारे आणि इतर वस्तु या रूपानें आपणास भासत आहे. ही सांप्रतची मनुष्यकक्षा सोडून आपण एखाद्या दुष्ट बुद्धिकक्षेंत गेलों तर हेंच विश्व कैदखान्यासारखी शिक्षेची जागा मात्र आहे असें आपणास भासूं लागेल. मला स्वर्गवास हवा असा हव्यास ज्याला लागला असेल त्याला हेंच स्वर्गासारखें भासेल. सर्व जगाच्या तख्तावर बसलेल्या परमेश्वराला मला भेटावयाचें आहे अशी दृढतम इच्छा ज्याच्या हृदयांत असेल त्याला तोच देखावा दिसूं लागेल, त्याला देव दिसतील, देवदूत दिसतील, स्वर्ग अथवा वैकुंठ दिसेल आणि सिंहासनाधिष्ठित ईश्वरही त्याला दिसेल. वाटेल तो देखावा उत्पन्न करण्याचें

सामर्थ्य आपल्याच हातांत असल्यावर असल्या देखाव्यांना काय तोटा? स्वर्गनरकादि सारे लोक मनुष्यांनींच निर्माण केलेले आहेत. याकरितां द्वैतवाद्यांच्या दृष्टीला दिसणारे हे लोक त्यांच्या दृष्टीपुरते खरे आहेत असें आम्ही अद्वैतवादी खुशाल कबूल करतों. पण हे सारे लोक आपणच निर्माण केलेले आहेत हें मात्र विसरूं नका.

स्वर्गादिलोक आणि भुताखेतांच्या अथवा देवांच्या योनी या शुद्ध दंतकथा होत. त्याचप्रमाणें आपलें जीवित आणि जन्ममृत्यु व पुनर्जन्म याही शुद्ध दंतकथा आहेत. आपलें हें जीवितच फक्त खरें आहे असें जें आपणा मनुष्यांस वाटतें तीच आपली मोठी चूक होय. स्वर्गादिलोक या शुद्ध दंतकथा आहेत असें माणसांना सांगितलें तर तें त्याला लवकर पटतें; पण खुद्द आपलें जीवितही याच दंतकथांच्या पंक्तींतलें आहे हें ह्मणणें मात्र तीं कधींही कबूल करावयाचीं नाहींत. दृश्यजात म्हणून जितकें आहे ती सारीच दंतकथा असून सर्वांत अत्यंत मोठें असत्य, आपण शरीररूप आहों असें वाटणें होय. आपण शरीररूप कधींच नव्हतों आणि कधीं होणें शक्यही नाहीं. आपण केवळ मनुष्यें आहों हेंही सर्वथैव खोटें आहे. आपण या विश्वाचे धनी आहों. या विश्वाचे शास्ते आपण आहों. या विश्वाचे परमेश्वर आपणच आहों. परमेश्वराचें पूजन आपण करतों त्या वेळीं आपल्या ठिकाणीं गुप्त असलेल्या आत्मरूपाचें पूजनच आपण करीत असतों. देवा, मी जन्मापासून पापी आहें अथवा दुष्टत्वांतच माझा जन्म झाला असें बोलणें हें घोरतम असत्य होय. अमुक मनुष्य पापी आहे असें ज्याच्या नजरेला दिसतें तेवढाच मनुष्य काय तो जगांत खरा पापी आहे. येथें सोन्यानें भरलेली एखादी थैली तुम्हीं ठेविली आहे व जवळच एक मूल निजलें आहे अशी कल्पना करा. इतक्यांत एक चोर येतो व ती थैली घेऊन जातो. या चोरीचें सुखदुःख त्या मुलाला कांहींच वाटत नाहीं. त्याला चोर आणि सावकार सारख्याच किमतीचे वाटत असतात. याचें कारण हेंच कीं, त्याच्या स्वतःच्या मनांत चोराचें अस्तित्व नसल्यामुळें त्याला बाहेर तरी चोर कोठून दिसणार? जें आंत असतें तेंच बाहेर दिसत असतें. धर्माला सारेच धर्म आणि दुर्योधनाला सारेच दुर्योधन दिसत होते. दुष्ट आणि पातकी लोकांना दुष्टत्वाचा आणि पापाचा वास सर्वत्र दिसत असतो; पण सज्जनांना याचा मागमूसही जगांत कोठें लागत

नाहीं. दुष्टाच्या दृष्टीनें हें विश्व नरकासारखें दिसतें; मध्यम प्रतीच्या चांगल्या लोकांना तेंच स्वर्गासारखें दिसतें आणि संतांना तेंच परमात्मरूप दिसतें. हें संतपण प्राप्त झालें ह्मणजे आमच्या डोळयावरील पडदा निघून जाईल व विश्वाचें निराळेंच स्वरूप आम्हांस दिसूं लागेल. ज्या दुष्ट स्वप्नांच्या तडाख्यांत सांपडून कोटयवधि वर्षें आम्ही तळमळत होतों तीं स्वप्नें क्षणार्धांत विलयास गेल्याचा प्रत्यय आह्मांस येईल. जो मनुष्य स्वतःस कांहीं काळ मनुष्य, कांहीं काळ देव, अथवा कांहीं काळ दैत्य समजत होता त्याला अशा स्थितींत स्वतांच्या सर्वव्यापित्वाचा प्रत्यय येईल. काळाचा नियंता मी असून काळ माझा नियंता नाहीं असें तो ह्मणूं लागेल. मी स्वर्गांत नसून स्वर्ग माझ्यांत आहे असें त्याला आढळून येईल. ज्या अनेक देवांची पूजा आजवर मनुष्यें करीत आलीं ते सर्व देव स्वतःच्याच ठिकाणीं आहेत असा अनुभव त्याला येईल. देव, दैत्य, मनुष्यें, पशु, वनस्पती आणि दगड या साऱ्या चिजा आपणच बनविलेल्या आहेत हें तो जाणेल. आपलें खरें स्वरूप स्वर्गाहून अधिक उच्च, विश्वाहून अधिक विस्तृत आणि पूर्ण, काळाहून अधिक अनंत व सर्वव्यापी, आकाशाहूनही अधिक व्यापक असें आपलें खरें स्वरूप आहे ही गोष्ट त्याच्या प्रत्ययास येईल. असा प्रत्यय आला म्हणजे सर्व भ्रमनिरास होईल, सर्व दुःखांचाही लय होईल. भय हा शब्दसुद्धां त्याच्या कोशांत सांपडावयाचा नाहीं. जन्म आणि मृत्यु हे दोन्हीही नाहींसे होतील. दुःख आणि त्याचाच दुसरा भाग इंद्रियगत सुख हीं दोन्ही नाहींशीं होतील. त्याचें मन सुद्धां नाहींसें होईल. हें विश्व विविधरूपानें त्याच्या प्रत्ययास येणार नाहीं. हल्लीं जी सर्वत्र खळबळ आणि गडबड साऱ्या विश्वभर आपणास दिसते ती त्याच्या दृष्टीला दिसणार नाहीं. शक्ति आणि जड विश्व या रूपानें जें कांहीं दिसत होतें अथवा मनुष्यें आणि देव या रूपानें जें कांहीं दिसत होतें त्या साऱ्यांचें रूपांतर अनंत आणि अखंड अशा एकरूपतेंत होईल; आणि या एकरूपाशीं आपण स्वतः एकरूप आहों असें त्याला दिसेल. आकाशापुढें निरनिराळ्या रंगांचे ढग ज्याप्रमाणें येऊन व कांहीं काळ वास्तव्य करून अखेरीस नाहींसे होतात त्याच प्रमाणें आत्म्याच्या दृष्टिसमोर पृथ्वी, स्वर्गादि लोक, चंद्र, सूर्य, देव, तारे, सुखें, दुःखें इत्यादि अनेक रंगांचे ढग जात येत असतात; पण ढग कितीही आले व गेले तरी त्यांच्या जाण्यायेण्यानें

आकाशाच्या एकतानतेचा व वस्तुरूपाचा भंग जसा होत नाहीं त्याचप्रमाणें या अनंत प्रकारच्या ढगांनीं आत्मरूपांत बदल होत नाहीं. बदल होतो तो ढगांत होत असून आकाशांत कधींही होत नाहीं. आकाशाचा रंग पालटला अथवा आकाश लहानमोठें झालें अथवा त्याचा आकार बदलला असें म्हणणें ही मोठी चूक होय. त्याच प्रमाणें मी शुद्ध आहें, पापी आहें, नियंत्रित आहें अथवा इतर विश्वाहून वेगळा आहें असें वाटणें ही सुद्धां मोठी चूक आहे. आत्मरूप सर्वव्यापी असें एकरूपच आहे. आतां येथें कांहीं प्रश्न उपस्थित होण्याचा संभव आहे. एक प्रश्न असा–" या साऱ्याचा अनुभव होणें शक्य आहे काय ? तुम्ही सांगतां असें अद्वैत मताचें म्हणणें आहे खरें; पण तें कोरडें तत्त्वज्ञान अथवा हठमत नसेल कशावरून ? हें सारें तत्त्वज्ञान सुंदर आहे; पण त्याचा अनुभव घेणें शक्य आहे काय ?" होय; सर्वथा शक्य आहे असें अत्यंत निश्चयानें आणि त्रिवार आम्ही सांगतों. फार काय, पण असा अनुभव घेतलेलीं माणसें आजमितीला या जगांत जिवंत आहेत. असा अनुभव आल्यावरोबर त्यांचा देहपात होतो असें नाहीं. एकाच दांड्यांत दोन चक्रें बसविलेलीं असलीं व तीं दोन्हीही झपाट्यानें फिरत असतां त्यांपैकीं एक चक्र हातीं धरून त्या दांड्यापासून त्याला मीं वेगळें केलें तर त्या चक्राची गति बंद होईल; पण पूर्वीचा जोर दुसऱ्या चक्रांत शिल्लक असल्यामुळें कांहीं काळ तें तसेंच फिरत राहील व अखेरीस दांड्यांतून बाहेर पडल्यानंतर तें स्थिर होईल. शुद्ध आणि पूर्ण असें आत्मरूप हें एक चक्र असून देह आणि मन हें दुसरें चक्र आहे व कर्मांच्या दांड्यानें हीं दोन चक्रें एकमेकांशीं जोडलीं गेलीं आहेत. ज्ञानाच्या कुऱ्हाडीनें हा मधला दांडा तुटला म्हणजे आत्मचक्राची गति तत्काळ बंद होते. जाणें येणें, जन्ममृत्यु इत्यादि साऱ्या कल्पना आत्मा ताबडतोब सोडून देतो. त्याला कसलीही गरज उरत नाहीं आणि कशाची इच्छाही होत नाहीं. तो पूर्ण आणि निरिच्छ होतो; पण मन आणि देह या चक्रावर पूर्व कर्मांच्या गतीचा जोर शिल्लक राहिलेला असतो. तो जोर संपेपर्यंत ही गति चालू राहते. हा जोर संपला म्हणजे देह आणि मन यांचा पात होतो व आत्मा मुक्त होतो. मग तो कोठें जात नाही अथवा कोठून येतही नाहीं. त्याला जाण्याला सर्वश्रेष्ठ असा ब्रह्म लोक सुद्धां उरत नाहीं. कारण तो नाहीं असें ठिकाणच नसतें. अशा रीतीनें याच देहांत

ज्यानें मुक्ति मिळविलेली असते त्याला जीवन्मुक्त असें म्हणतात. अशा प्रकारची जीवन्मुक्ताची स्थिति प्राप्त करून घेणें हेंच वेदांत्यांचें अखेरचें साध्य होय.

हिंदी महासागराच्या तीरावर असलेल्या पश्चिम हिंदुस्थानाच्या एका भागांत एकदा मी प्रवास करीत होतों. कित्येक वेळां मोठमोठ्या वालुकामय प्रदेशांतून दिवसाचे दिवस चालत राहण्याचा प्रसंग मला येई. कित्येक वेळां या प्रदेशांत अत्यंत सुंदर अशीं सरोवरें माझ्या नजरेस पडत आणि अशा रखरखीत प्रदेशांत पाण्याचा एवढा संचय पाहून मला मोठें नवल वाटे. सरोवराभोंवतीं सुंदर झाडें असून त्यांचें प्रतिबिंब पाण्यांत पडे; यामुळें या देखाव्याला विलक्षण मनोहारित्व येई. असल्या सुंदर प्रदेशाला लोक वैराण मुलूख अशी संज्ञा लावतात तरी कशी याचें मला मोठें नवल वाटे. अशा-रीतीनें हा माझा प्रवास सुमारें महिनाभर चालू होता. आणि हा सारा वेळ हा सुंदर देखावा माझ्या नजरेस पडत होता. एके दिवशीं चालतां चालतां मला तहान लागली; तेव्हां समोरच दिसणाऱ्या त्या तळ्यावर जाऊन यथेच्छ पाणी पिण्याचा बेत करून त्या दिशेनें मी वाट चालूं लागलों. पण काय चमत्कार सांगावा ! त्या जागीं मी पोंहोंचतों तों तळ्याचा मागमूसही कोठें दिसेना. त्याबरोबर वीज चमकावी त्याप्रमाणें माझ्या मनांत लख्ख प्रकाश पडला. सारा महिनाभर जीं तळीं माझ्या नजरेस पडत होतीं तें मृगजळ असें मला कळून आलें. प्रत्यक्ष अनुभव येईपर्यंत हें मृगजळ पाण्याचा नुसता आभास असेल असें माझ्या स्वप्नींही आलें नाहीं. दुसऱ्या दिवशीं सकाळीं नित्य-क्रमाप्रमाणें सकाळीं उठून मी पुढें चालू झालों. आणि नेहमीप्रमाणें सरोव-रांच्या देखाव्यासही सुरवात झाली. पण एकवार आलेल्या अनुभवानें मला शहाणें केलें असल्यामुळें हें मृगजळ आहे ही गोष्ट तत्काळ माझ्या ध्यानीं आली. अशीच स्थिति आपल्या विश्वकल्पनेचीही आहे. दिवसांमागें दिवस, महिन्यांमागें महिने आणि वर्षांमागें वर्षें या विश्वारण्यांत आपण प्रवास करीत आहों; पण हा सारा आभास मात्र आपणापुढें पसरला असून यांत तथ्य कांहीं नाहीं ही गोष्ट आपल्या लक्ष्यांत येत नाहीं. तथापि एके दिवशीं आपला हा सारा भ्रम दूर होईल. असें झालें तरी मृगजळाचा हा देखावा दिसण्याचें बंद होईल असें मात्र नाहीं. पूर्व कर्माचें बंधन जें शरीर तें शिल्लक असेपर्यंत

हें मृगजळ दिसणेंही चालू राहील. आपण कर्मानें बद्ध आहों तोंपर्यंत हा विश्वाचा देखावा असाच चालू राहावयाचा. पुरुष, स्त्री, जनावर, झाड, सुख-दुःखांचे तरंग, कर्तव्यादिकांचा भ्रम हीं सारीं चालू असावयाचीं; पण त्यांत पूर्वीचा जोम मात्र कायम असणार नाहीं. आपल्या हातीं आलेलें ज्ञानखड्ग आपल्या कर्मांची पाठ मोडून टाकील. आपल्या कर्मांची स्थिति नांगी मोडलेल्या विंचवासारखी होईल. विंचवाचा आकार कायम राहिला असला तरी त्याचें खरें विंचूपण जसें नाहींसें होतें त्याचप्रमाणें विश्वाचा आभास कायम राहिला तरी त्याची भ्रामक शक्ति नाहींशी होईल. देखावा आपणांस दिसत राहिला तरी हें रूप खोटें आहे, भ्रामक आहे हें आपणास कळलें असल्यामुळें त्याच्या पाशांत आपण सांपडणार नाहीं.

जग पूर्वीसारखेंच चालू राहिलें तरी त्याचा अंमल पूर्वीप्रमाणें आपणावर चालणार नाहीं. तथापि अशा स्थितींतही भयाची जी एक जागा आहे ती दाखवून ठेवणें इष्ट आहे. " मी साऱ्या कर्माकर्माच्या बाहेरचा असल्यामुळें मला पाप नाहीं आणि पुण्यही नाहीं; मी नीतिबंधनांच्या पलीकडचा असल्यामुळें मनास येईल तसें वर्तन मी करीन. " असें म्हणून वाममार्गानें जाणारे बोलघेवडे वेदान्ती साऱ्या देशांत आढळतात. " मी ईश्वर आहें; मी बद्ध नाहीं; मी वाटेल तें करीन." असें म्हणून मनसोक्त आचरण करणारे लोक तुमच्या या देशांतसुद्धां कितीतरी सांपडतील. शारीरिक, मानसिक अथवा नैतिक बंधन आत्म्याला नाहीं ही गोष्ट खरी; पण इंद्रियगतसुखाकरितां वाटेल तसें वागणें ही मोठी चूक होय. कायद्याच्या कक्षेंत आपण आहों तोंपर्यंत आत्मा बद्धच आहे. ही मर्यादा सोडून आपण पलीकडे गेलों ह्मणजे आपण मुक्त होतों. आत्मा हा बद्ध असा कधींच नसून सर्वदा मुक्त असणें हीच त्याची प्रकृति आहे हेंही खरें आहे. आत्म्याभोंवतीं जडवस्तूंचें एवढें बंधन पडलें असतांही त्यांतून त्याची खरी मुक्तावस्था दिसते. आपल्या आयुष्याच्या प्रत्येक क्षणीं आपल्या या खऱ्या स्वरूपाचा अनुभव आपणांस येत असतो. वाटेल तें करण्यास आपण स्वतंत्र आहों—मुक्त आहों, अशी जाणीव सदोदित आपल्या ठिकाणीं कायम नसेल तर आपलें एक पाऊलही पुढें पडावयाचें नाहीं. फार काय, पण नुसता श्वासोच्छ्वाससुद्धां आपणांस करतां यावयाचा नाहीं. इतकें सारें खरें; पण थोडासा विचार

केला तर आपणांस असें आढळून येईल कीं, आपल्या या साऱ्या हालचाली यंत्रासारख्या होत असून त्यांत वास्तविक स्वातंत्र्य नाहीं. मग या दोन स्थितींत खरी कोणती? आपण स्वतंत्र आहों असें जें प्रत्येक क्षणीं आपणांस वाटतें ती आपली स्वतंत्रता खरी, कीं प्रत्येक क्षणीं अनुभवास येणारी यंत्रावजा परतंत्र स्थिति खरी? आपण मुक्त आहों असें वाटणें हा आपला भ्रम तर नसेल ना? हा आपला भ्रम आहे असें एक पक्ष म्हणतो, तर दुसरा त्याविरुद्ध बोलतो. आपण बद्ध आहों असें वाटणें हाच भ्रम असें दुसऱ्या पक्षाचें ह्मणणें आहे. वास्तविक पाहतां मनुष्य हा मुक्तच आहे. मुक्त असणें हा त्याचा स्वभावच आहे. मुक्त असण्यावांचून त्याला दुसरें गत्यंतरच नाहीं. पण मायाकृत जगांत तो आला व नाम आणि रूप हीं त्यानें धारण केलीं कीं तो बद्ध होतो. स्वतंत्र बुद्धि हा शब्दच खोटा आहे. बुद्धि आणि स्वतंत्रपणा हे दोन शब्द एकत्र उच्चारणेंसुद्धां शक्य नाहीं. बुद्धि कधींही स्वतंत्र असूं शकणार नाहीं. हें शक्य तरी कसें? मायाकृत जगांत अवतरून व नाम-रूप धारण करून आत्मा बद्ध झाला ह्मणजे मग बुद्धि जन्मास येते. या स्थितीपूर्वी तिला अस्तित्वच नसतें. याकरितां बुद्धिसुद्धां परतंत्र–बद्ध–आहे; पण बुद्धि ज्या मूलाधिष्ठानावर जन्मास येते, तें अधिष्ठानमात्र स्वतंत्र–मुक्त–आहे. यामुळें बद्धावस्थेंत असतांही आपल्या खऱ्या मुक्तावस्थेची आठवण आपण विसरत नाहीं. आपण पृथ्वीवर मनुष्यरूपानें असलों, अथवा स्वर्गात देवरूपानें असलों तरी आपण बद्धच असतों; पण या दृश्य बद्धावस्थेमागें आपली खरी मुक्तावस्था निरंतरची असल्यामुळें तिची जाणीव आपल्या ठिकाणीं सदोदितची कायम राहिली आहे. मुक्त असणें हा आपला ईश्वरदत्त हक्क आहे. आपणाजवळून तो हिरावून घेण्यास समर्थ कोण आहे? आपण बद्ध आहों हा भ्रमनिरास होण्याकरितां व आपल्या पूर्वीच्या नित्य मुक्त स्थितीस परत जाण्याकरितांच आपण सारे धडपडत आहों. ही गोष्ट आपल्या लक्ष्यांत आली असली अथवा नसली तरी आपली धडपड त्याकरितांच आहे हें मात्र खरें. मायाकृत कायद्याबाहेर आपण निघून गेल्यावर आपणांस बंधन तें कशाचें उरणार? विश्वाचे धनीपण आपणांस मिळाल्यावर विश्वाचे कायदे आपणांस कसे बांधणार? तोच सर्व विश्व होतो असें म्हणा; अथवा विश्व त्याला मुळीं उरतच नाहीं

असेंही पाहिजे तर ह्मणा. कांहीं म्हटलें तरी अर्थ एकच. विश्व ह्मणून पदार्थच त्याला उरला नाहीं, अथवा तो स्वतःच विश्व झाला तर त्याच्या ठिकाणीं हा पुरुष, ही स्त्री असल्या प्रकारच्या क्षुद्र भावना कोठून उरणार? त्याचप्रमाणें हें माझें घर, ही माझी वतनवाडी, हा माझा देश असल्या कल्पनांचा संभवही त्याच्या ठिकाणीं उरणार नाहीं. मी पुरुष आहें, स्त्री आहें, मूल आहें, ब्राह्मण आहें अथवा शूद्र आहें असें तरी तो कसें ह्मणणार? याचें अस्तित्व खोटें आहे हें तो अनुभवानें जाणत असतो. पुरुषांचे हक्क अमुक आणि स्त्रियांचे अमुक हा उमजही त्याला पडत नाहीं. स्वतंत्र अस्तित्वच कोणाला नाहीं मग स्वतंत्र हक्क तरी कोठून येणार? स्त्री आणि पुरुष हा भेद त्याच्या ठिकाणीं नाहीं. आत्म्याच्या ठिकाणीं लिंगभेद नसून तो सदा एकरूप आहे. मी स्त्री आहें, पुरुष आहें, अथवा अमुक देशाचा मी आहें असें ह्मणणें हा निवळ मिथ्या प्रलाप होय. सर्व जग माझा देश. हें सारें विश्व मी मजभोंवतीं वस्त्रासारखें पांघरलें आहे. तथापि असल्या प्रकारचीं मतें तोंडानें प्रतिपादून कसाबाची करणी करणारे महाभाग या जगांत आपणांस आढळून येतात हेंही खोटें नाहीं. 'अहो, तुह्मी असलें कर्म कां करितां?' असा प्रश्न आपण त्यांना केला तर हें दुष्कृत्य आहे असें तुह्मांला वाटतें हा तुमचा भ्रम आहे; माझ्या हातून दुष्कृत्य घडणें शक्य नाहीं' असा चोख जबाब ते देतात. अशा स्थितींत त्यांची पारख तरी कशी करावी? त्यांना पारखावयास कांहीं कसोटी आहे काय? होय, आहे.

बरें आणि वाईट हीं दोन्हींही आत्म्याचीं जड आवरणें आहेत, ही गोष्ट खरी; तथापि वाईट हें बाह्यावरण असून आत्मरूपापासून तें लांब अंतरावर आहे, आणि चांगलें हें अंतरावरण असून तें आत्मरूपासंनिध आहे. प्रथम बाह्यावरणाचा पूर्ण उच्छेद करून पुढील रस्ता मोकळा करीपर्यंत सदावरणापर्यंत कोणीही पोंहोंचूं शकत नाहीं; आणि असदावरण व सदावरण हीं दोन्ही मार्गे टाकून दिल्याशिवाय आत्मरूपाची भेट कोणालाही होत नाहीं. आत्मरूपापर्यंत जो पावता झाला त्याला शिल्लक असें तरी काय उरतें? थोडेंसें कर्म त्याच्या ठिकाणीं बाकी असतें. पूर्व जीवनक्रमाचा थोडासा आवेश त्याच्या ठिकाणीं शिल्लक उरलेला असतो. तथापि हा आवेश सत्कर्मांचा मात्र असतो हें लक्ष्यांत ठेवलें पाहिजे. त्याचा देहबंध कायम राहिला व तो सदो-

दित कर्मे करीत असला तरी तो सत्कर्मे मात्र आचरीत असतो. कोणाचें तरी बरें तो करीत असतो. त्याचे हात आशीर्वादासाठींच वर होत असतात. त्याचे ओंठ आशीर्वचन मात्र उच्चारीत असतात. सद्विचार मात्र त्याच्या मनांत येत असतात. तो जेथें जातो तेथें कल्याणमय विचारांचा शीतल वायु त्याजबरोबर जातो. तो बोलूं लागला म्हणजे '**आधीं प्रेम पाझरे । माघां चालती अक्षरें । शब्द पाठीं अवतरे । कृपा आधीं ॥ साच आणि मवाळ । मीत आणि रसाळ । शब्द जैसे कल्लोळ । अमृताचे ॥** असें बोलतो. त्याच्या वाणीनें कोणाचेंही जिव्हार छेदलें जात नाहीं. मंगलांचें मंगल तो. मूर्तिमंत कल्याण तोच. फार काय, पण त्याच्या नुसत्या दर्शनानें दैत्यांचे देव होतात. असल्या मनुष्याच्या हातून दुष्कर्म कधीं तरी घडेल काय ? तोंडानें बोललेला वेदान्त आणि त्याचा प्रत्यक्ष अनुभव यांत जमीन आणि अस्मान इतकें अंतर आहे हें लक्ष्यांत ठेवावें. नुसती बडबड करण्याचें काम कोणताही मूर्ख करूं शकेल. तें काम पोपट सुद्धां करीत नाहींत काय ? वेदान्ताच्या गोष्टी तोंडानें बोलणें हें फार सोपें काम आहे. पण त्याचा अनुभव घेणें अत्यंत दुष्कर आहे. वेदान्तादि तत्त्वचर्चा, वादविवाद, ग्रंथ, उपपत्ती, मतें, पंथ इत्यादि गोष्टी आपआपल्या परी चांगल्याच आहेत; पण अनुभवानंतर यांची किंमत कांहींच उरत नाहीं. उदाहरणार्थ, नकाशा ही मोठी उपयोगी वस्तु आहे हें खरें; पण एखादा देश प्रत्यक्ष जाऊन पाहण्यांत आणि त्याचा नकाशा पाहण्यांत केवढें अंतर आहे ? त्याचप्रमाणें सद्वस्तूचा प्रत्यक्ष अनुभव ज्याला झाला असेल, त्याला वादविवादाची आणि बुद्धीच्या तालीमखान्याची जरूर काय उरणार आहे ? मूर्तिमंत सत्य त्याच्या पुढें उभें असतें; किंबहुना, सत्यवस्तु ते स्वतःच होतात. मग सत्याची सिद्धि दुसऱ्या प्रमाणांनीं ती काय करावयाची ? हातवरील आंवळ्याप्रमाणें सत्य त्यांना ढळढळीत दिसत असतें. ' हें सत्य पहा' असें ते जगाला सांगत असतात. त्यांच्या समोर कांहीं आक्षेप काढून त्यांवर तुम्ही वादविवाद करूं लागलां तर उत्तर देण्याच्या भरीसही न पडतां ते तुमच्याकडे पाहून नुसते हंसतील. तुमचा मोठा शास्त्रीय वाद त्यांना पोरांच्या बडबडीच्या किंमतीचा वाटेल. तुमच्या नादीं न लागतां तुह्मांला ते खुशाल बडबडूं देतील. सत्यवस्तूशीं त्यांची प्रत्यक्ष भेट झाली असल्यानें ते पूर्णरूप झालेले असतात. एखादा

देश तुह्मीं प्रत्यक्ष पाहिलेला असला आणि एखादा मनुष्य तुम्हांकडे येऊन तो देश अस्तित्वांत नाहीं असें म्हणून मोठमोठीं प्रमाणें सांगूं लागला तर तुह्मी काय कराल ? त्यानें अनंत काळ बडबड केली तरी तिचा परिणाम तुमच्या चित्तावर काय होणार आहे ? हा मनुष्य वेड्याच्या इस्पितळांत पाठविण्याच्या लायखीचा आहे हेंच तुह्मी मनांत ह्मणणार नाहीं काय ? त्याचप्रमाणें धर्मविषयक सारे वादविवाद ब्रह्मनिष्ठाच्या दृष्टीनें पोरांच्या बडबडीसारखे आहेत. प्रत्यक्ष अनुभव होणें हाच साऱ्या वादांचा अंतिम हेतु होय. धर्मांचा प्रत्यक्ष अनुभव अवश्य होईल. तुमची तशी तयारी मात्र पाहिजे. तुम्हांला त्याची तशी खरी जरूर मात्र भासली पाहिजे. अडचण आहे ती अनुभव होण्यांत नाहीं; ती तुमच्या तयारींत नाहीं. धर्मविषयक विचार तोंडानें तुम्हीं कितीही बोलून दाखविले तरी जोंपर्यंत आत्मानुभव तुम्हांस झाला नाहीं तोंपर्यंत एखादा धर्मलंड आणि तुम्ही सारख्याच योग्यतेचे. धर्मलंड असतो तो निदान् ढोंगी तरी नसतो. त्याचा विचार आणि आचार यांत एकवाक्यता तरी असते. पण धर्मांच्या गोष्टी तोंडानें सांगून अनुभवाच्या एकही पाऊल पुढें पडण्याची खटपट न करणारे लोक शुद्ध दांभिक म्हटले पाहिजेत.

आत्मानुभवानंतरची स्थिति काय असा प्रश्न यापुढें उद्भवण्यासारखा आहे. हें सारें विविध विश्व वस्तुतः एकरूप आहे असा अनुभव आला; तसेंच सारें चैतन्यही अनंत आत्मरूप नसून एकात्मरूप आहे असाही अनुभव आला; त्याचप्रमाणें हेंच एकरूप विविधरूपानें प्रतीतीस येत आहे असेंही कळलें तरी पुढें काय ? आमची स्थिति यापुढें काय होणार ? आम्ही हतबुद्ध होत्साते मातीच्या ढेंकळासारखे कोंपऱ्यांत पडून राहूं काय ? आम्हांला हा सारा अनुभव आला तरी त्याचा उपयोग जगाला काय ? जगाचें बरें त्यानें काय होणार ? हे सारे प्रश्न जगाइतकेच वृद्ध आणि पुराणे आहेत. पण यावर पहिला प्रश्न आह्मी असा करतों कीं जगाचें बरें तें त्यानें काय करावें ? त्यानें जगाचें बरें केलेंच पाहिजे असें ओझें त्याच्या मानेवर कोणीं दिलें आहे ? जगाचें बरें काय होईल असा प्रश्न तुम्ही करतां तेव्हां त्याचा अर्थच आह्मांस समजत नाहीं. मुलांना गोड पदार्थांची मोठी आवड असते. समजा, कीं तुह्मी विजेचे कांहीं प्रयोग करून पाहत असलां आणि इतक्यांत एखादें मूल येऊन तुह्मांला ह्मणूं लागलें कीं "यानें एखादा लाडू मिळेल काय ? " यावर " नाहीं "

हेंच उत्तर तुह्मांस द्यावें लागेल. मूल पुन्हां प्रश्न करील " तर मग या प्रयोगांचा उपयोग काय ? " बालदृष्टीनें उपयुक्त वस्तु ह्मटली ह्मणजे लाडू हीच. जी गोष्ट केली असतां लाडूची प्राप्ति होत नाहीं ती गोष्ट करणें त्याच्या दृष्टीनें फुकट आहे. त्याचप्रमाणें "आत्मानुभव झाल्यास पैसा मिळेल काय ?" हा प्रश्नही बालबुद्धीस शोभणारा आहे. 'बरें' या शब्दाचा लौकिक अर्थ हाच. असो; असें आहे तरी अत्यंत निश्चयानें आम्ही ह्मणतों कीं जगाचें कांहीं बरें व्हावयाचें असेल तर तें तत्त्वानुभवानेंच होईल. लोकांना जी एक मोठी भीति वाटते ती हीच कीं '**एकमेवाद्वितीयम्**' असा अनुभव आम्हांस आला तर आमचे सारे प्रेमविषय नष्ट होतील; आणि आमच्या हृदयांतला प्रेमाचा झरा निखालस आटून जाईल. आमच्या जीवनांत जें जें आह्मांस प्रिय आहे तें सारें नष्ट होईल. असले क्षुद्र विचार चित्तांत बाळगणारे लोक एक मुद्दा नेहमीं विसरत असतात. ज्यांच्या डोक्यांतून स्वार्थाची बुद्धि नाहींशी झालेली होती, किंबहुना स्वतःचें अस्तित्वसुद्धां ज्यांना फारसें भासत नव्हतें अशाच लोकांच्या हातून आजपर्यंत महत्कृत्यें जगांत घडत आलीं आहेत, ही गोष्ट या क्षुद्र लोकांच्या ध्यानांत येत नाहीं. मोठमोठे कार्यभाग अविरत उद्योगानें ज्यांनीं पार पाडले त्यांच्या चित्तांत स्वतःच्या सुखाचा अभिलाष मुळींच नव्हता. माझ्या प्रेमाची वस्तु दिसते तितकी लहान नाहीं, तिचें खरें स्वरूप इवल्याशा बंधनांत कोंडलेलें नाहीं, आणि ती चिरंतन स्वरूपाची अनंतवस्तु आहे असें आपल्या प्रेमविषयाबद्दल ज्या दिवशीं प्रेमी मनुष्याला वाटूं लागेल त्याच दिवशीं प्रेमाचा खरा अर्थ त्याला समजेल. केवळ बाहेरून दिसणाऱ्या मातीच्या ढेंकळावरील त्याचा लोभ नष्ट होऊन तदंतर्गत परमेश्वरस्वरूपाची ओळख ज्या दिवशीं त्याला पटेल त्याच दिवशीं तो खरा प्रेमी होईल. माझा पति प्रत्यक्ष परमात्मरूप आहे असें ज्या दिवशीं एखाद्या पत्नीला वाटेल त्याच दिवशीं आपल्या पतीची खरी प्रेमळ पत्नी ती होईल. माझी पत्नी प्रत्यक्ष परमेश्वर आहे असें ज्या दिवशीं एखाद्या पतीला दिसेल त्याच दिवशीं त्याचें खरें प्रेम तिजवर जडेल. आपल्या शत्रूच्या ठिकाणींही परमेश्वराचें अस्तित्व एखाद्याला दिसलें तर त्यावरही तो प्रेम करील यांत काय नवल ? साधूच्या ठिकाणीं जें परमात्मरूप प्रकटावस्थेंत दिसतें तेंच रूप अत्यंत दुष्ट मनुष्याच्या ठिकाणींही अधिष्ठानरूपानें आहे

असें समजल्यावर साधु व असाधु यांवर त्याचें प्रेम सारखेंच जडेल. अशी दृष्टि ज्याला उत्पन्न झाली असेल त्याच्या ठिकाणची क्षुद्र स्वार्थबुद्धि अर्थात् नष्ट होणारच. त्याचें मीपण जाऊन त्या जागीं परमेश्वर येऊन राहील. अशा माणसांच्या अंगींच जग हालविण्याचें सामर्थ्य असतें. त्याच्या दृष्टीनें पूर्वीचें जग नाहींसें होऊन त्या जागीं नवें जग उत्पन्न होईल. पूर्वीच्या जगांतील दुःख आणि आपत्ति हीं त्याला औषधालासुद्धां सांपडावयाचीं नाहींत. जगांत अहमहमिकेचा प्रत्यय त्याला कोठेंही येणार नाहीं. जग सध्या आपणांस तुरुंगासारखें होऊन बसलें आहे. या तुरुंगांत चतकोर भाकरीसाठीं चढाओढ करून एकमेकांच्या माना आपण कापीत असतों. पण आत्मदृष्टि आपणांस प्राप्त झाली म्हणजे हेंच जग आपणांस खेळखान्यासारखी आनंदाची व बागडण्याची जागा होईल. जग ही अत्यंत सुंदर वस्तु आहे असें आपण ह्मणूं. 'अहाहा ! जग किती सुंदर आहे !' असें म्हणण्याचा खरा अधिकार कोणाला असेल तर तो आत्मानुभवी मनुष्यालाच आहे. सर्वत्र चांगल्याचाच वास आहे असें तोच एक ह्मणूं शकेल. आत्मप्रतीति सर्वांनाच आली तर साऱ्यांची स्थिति अशीच होईल. सर्वांना आत्मानुभवाची प्राप्ति झाली तर जगांतील सध्याची सारी चढाओढ नष्ट होईल. या सत्य वस्तूच्या अल्पांशाची प्रतीति जरी आज साऱ्यांना झाली तरी तितक्याचासुद्धां परिणाम इतका चांगला होईल. साऱ्या जगाचें रूप अशा स्थितींत पालटून जाईल; आणि सांप्रतच्या अंतर्बाह्य लढाया आणि अत्याचार हीं बंद होऊन शांतीचें साम्राज्य साऱ्या जगभर नांदूं लागेल. पुढें जाणाराच्या तंगड्या ओढून आपण पुढें सरावयाचें अशा स्वरूपाची पशूला शोभणारी चढाओढ आज जगभर सुरू आहे. आपणांस पुढें सरावयाचें असतां दुसऱ्यांचीं प्रेतें तुडवावीं लागत आहेत कीं काय याचा विचार आज कोणाच्या मनांत येत नाहीं. ही स्थिति पालटून तिच्या जागीं शांतीचें साम्राज्य यावयाचें असेल तर तें अद्वैतप्रसारानेंच येईल. चढाओढ संपली म्हणजे द्वेषबुद्धिही आपोआपच नाहींशी होईल. द्वेषाबरोबर मत्सरही नाहींसा होईल आणि जगांतील दुष्टत्वाचे सारे प्रकार बंद पडतील. अशा स्थितींतच परमेश्वराचें राज्य पृथ्वीवर होईल. याच जगाचें रूपांतर होऊन त्याचा स्वर्ग बनेल. दैवी संपत्तीनें युक्त अशींच माणसें पृथ्वीभर नांदूं लागलीं म्हणजे तंट्याचें कारण तरी काय उपस्थित होणार ? आत्मानु-

भवाचा उपयोग जगाला काय, या प्रश्नाचें हें उत्तर आहे. आजच्या स्वरूपांत मानव समाज तुह्मांस दिसत आहे तो निराळ्या स्वरूपांत दिसूं लागेल. गरीब लोक आज तुह्मांस तुच्छ वाटतात. त्यांजकडे उपहास बुद्धीनें तुह्मी पाहतां. पण आत्मानुभवाच्या स्थितींत त्यांच्या ठिकाणींही परमेश्वर आहे ही ओळख पटून त्यांचा अनादर तुम्ही करणार नाहीं. मनुष्य प्राणी दुष्ट आहे, ही कल्पना सुद्धां तुमच्या मनांत येणार नाहीं. एखाद्या स्त्रीच्या अथवा पुरुषाच्या हातून कांहीं दुर्वर्तन घडलें तरी त्यांचा तिरस्कार तुम्ही करणार नाहीं. सुडाची भावना तुमच्या चित्तांतून पार नाहींशी होईल. दुष्ट भावना नाहींशा होऊन प्रेमाचा असा पूर तुमच्या चित्तांत येईल कीं तुह्मांस सदाचार शिकविण्यास बडग्याची अथवा चौदाव्या रत्नाची जरूर लागणार नाहीं.

जगांतल्या मानवकुलाचा एक कोटयंशही जर आत्मानुभवाच्या मार्गाला लागला तर केवळ अर्ध्या तासाच्या अवधींत जगाचें सारें स्वरूप पालटून जाईल. आज कोंपऱ्या कोंपऱ्यांनीं द्वेषाचे बांबगोळे भरून ठेवण्याचा उद्योग साऱ्या जगभर चालला आहे. मत्सराचे ओहोळ जागोजाग वाहत आहेत. दुर्विचारांच्या लहरी सर्व वातावरणांत भरून राहिल्या आहेत. पण आत्मानुभव आपणांस झाला तर ही सारी स्थिति पालटून सर्वत्र ईश्वराचीं रूपें आपणांस दिसूं लागतील. स्पर्शानें अथवा दृष्टीनें ज्याचा ज्याचा अनुभव आपणांस होईल तें सारें परमात्म्याचें रूप असें आपणांस वाटूं लागेल. तुमच्या स्वतःच्या ठिकाणीं दुष्टत्व असल्याशिवाय बाहेर तरी तें तुह्मांस कोठून दिसेल? तुमच्या अंतर्यामींच्या खोल गुहेंत चोर राहत असल्याशिवाय तो बाहेरही तुम्हांस दिसणार नाहीं. तुम्ही स्वतः खुनी असल्याशिवाय बाहेरही तुम्हांस कोणी खुनी दिसणार नाहीं. तुह्मी स्वतः चांगले झालां म्हणजे बाहेरचें सारें दुष्टत्व नाहींसें होईल. साऱ्या विश्वाचा रंग याच रीतीनें पालटला जाईल. आत्मानुभवाच्या मार्गाचा फायदा जगाला काय, या प्रश्नाचें उत्तर हेंच. मानवकुळाला जो सर्वांत मोठा फायदा व्हावयाचा तो आत्मानुभवाच्या मार्गानेंच होईल. हिंदुस्थानांत प्राचीनकाळीं हीं पराविद्येचीं तत्त्वें जन्मास आलीं आणि तेथेंच त्यांचा प्रत्यक्ष व्यवहारही झाला. परकीयांच्या स्वाऱ्या व अनुभवी महापुरुषांची एकांतप्रियता इत्यादि अनेक कारणांमुळें या तत्त्वांचा प्रसार बाह्यदेशीं झाला नाहीं; तथापि हीं अत्युच्च तत्त्वें असून जेथें जेथें

त्यांचा आचार सुरू झाला तेथें तेथें त्यांनीं नराला नारायण केलें आहे. अशाच प्रकारच्या एका नारायणाच्या केवळ स्पर्शानें माझ्या जीवनाची सारी दिशा बदलून गेली. या विचाररत्नांचा प्रसार साऱ्या जगभर होण्याचा काळ आतां आला आहे.. आजपर्यंत हीं तत्त्वें फक्त मठांत नांदत होतीं, त्यांचा वास तत्वग्रंथांच्या पोटीं मात्र होता, आणि या गुप्त भांडाराची किल्ली विद्वज्जनांच्या हातीं होती. हीं रत्नें आजपर्यंत विशिष्ट पंथांच्या हातीं कोंडलेलीं होतीं; पण त्यांचा लाभ साऱ्यांना जगभर व्हावा असा योग आला आहे. असें झालें म्हणजे साधु आणि पापी व बायका आणि मुलें या साऱ्यांनाच त्याचा वांटा मिळेल. या वांटणींत विद्वान् आणि निरक्षर असा भेद राहणार नाहीं. या तत्त्वपुष्पांचा प्रसार सर्वत्र झाला म्हणजे पृथ्वीवरील सारें वातावरण त्यांच्या आमोदानें दुमदुमून जाईल. वाऱ्याची प्रत्येक झुळूक ' **तत्त्वमसि** ' हा संदेश आपणांस सांगेल. विश्वांतील कोट्यवधि सूर्य, चंद्र, तारे, ग्रह आणि उपग्रह एकरवानें आपणांस हेंच सांगतील कीं ' **तत्त्वमसि.** '

---

१६

# व्यावहारिक वेदान्त

## ( प्रथम पाद )

वेदान्त धर्माचें व्यावहारिक स्वरूप काय, असा प्रश्न मला अनेकांनीं अनेकवार केला आहे. वेदान्तमत पुष्कळ मोठें असेल आणि तत्त्वें कानाला मोठीं लागत असतील; पण प्रत्यक्ष आचरणांत हीं कशीं आणावयाचीं ? एखादी उपपत्ति कितीही सुंदर असली तरी ती व्यवहार्य नसेल तर तिला फुटक्या कवडीचीही किंमत नाहीं हें उघडच आहे. फार झालें तर विद्वानांच्या बुद्धीला कसरत म्हणून तिचा काय उपयोग होईल तेवढाच. याकरितां वेदान्त धर्माला कांहीं महत्त्व यावयाचें असेल तर धर्म व्यवहार्य व्हावयास पाहिजे. आमच्या जीवनक्रमाच्या प्रत्येक भागांत त्याचें स्वरूप दिसलें पाहिजे. त्याचें प्रत्येक तत्त्व व्यवहार्य आहे हें प्रत्यक्ष उदाहरणानें आम्हांस सिद्ध करतां आलें पाहिजे

इतकें करतां आलें तथापि तेवढयानें सुद्धां सारा कार्यभाग संपतो असें नाहीं. धर्म आणि प्रपंच, परमार्थी आणि संसारी असा जो भ्रामक भेदाचा समज आज सर्वत्र रूढ होऊन बसला आहे तोही नाहींसा होणें अवश्य आहे. ज्याला संसार साधावयाचा त्यानें परमार्थी होऊं नये आणि ज्याला परमार्थ हवा त्यानें संसाराकडे ढुंकूनही पाहूं नये ही कल्पना सर्वांना आज पटली आहे. पण ती भ्रामक आहे हें प्रत्यक्ष उदाहरणानें आम्हांस सिद्ध करतां आलें पाहिजे. सर्वत्र एकरूपता हें वेदान्त धर्माचें आदितत्त्व आहे. हा प्रपंच आणि हा परमार्थ असा भेद वेदान्तानें केलेला नाहीं. वेदान्त दृष्टीनें परमार्थ आणि प्रपंच यांचीही एकरूपता आहे. धर्मानें सांगितलेलीं तत्त्वें आमच्या साऱ्या आयुष्यभर प्रत्यक्ष दिसत राहिलीं पाहिजेत. आमच्या साऱ्या विचारपरंपरेंत त्यांचा वास झाला पाहिजे, आणि दिवसेंदिवस त्यांचें स्वरूप आमच्या चालू व्यवहारांत अधिकाधिक प्रमाणावर स्पष्ट होत गेलें पाहिजे. या गोष्टी आपणास कशा साधतां येतील याचा विचार हलुहलु मी पुढें करीन. आपल्या पुढील इमारतीचा पाया मात्र सध्याच्या प्रसंगीं आपणास घालावयाचा आहे. याकरितां वेदान्त-धर्माची उपपत्ति तरी काय आहे याचा विचार प्रथम करणें अवश्य आहे. या उपपत्तीची उत्पत्ति अरण्यांत आणि पर्वताच्या गुहेंत कशी झाली आणि अखेर तिचा प्रवेश शहराच्या रस्त्यांत आणि माणसांच्या भरवस्तींत कसा झाला हेंही पाहिलें पाहिजे. या उपपत्तीच्या उत्पत्तींत आणखीही एक ध्यानांत ठेवण्यासारखी गोष्ट आहे. हींतील पुष्कळ विचारमौक्तिकें अरण्यांत जन्मास आलीं नसून अत्यंत कार्यव्यापृत अशा क्षत्रिय राजांपासून त्यांचा जन्म झाला आहे !

श्वेतकेतु या नांवांचा अरुणीचा एक मुलगा होता. त्याचें सर्व बालपण अरण्यांत गेलें होतें. मोठा झाल्यावर तो पांचाळ राजाच्या नगरांत जाऊन राजा प्रवहण याची भेट त्यानें घेतली. श्वेतकेतूला राजानें प्रश्न विचारला "मुला, मृत्युसमयीं या जगांतून प्राणी कसा गमन करतो हें तुला ठाऊक आहे काय?" श्वेतकेतूनें उत्तर दिलें "राजा, हें मला माहीत नाहीं." राजानें पुन्हां प्रश्न केला "येथें ते परत कसे येतात हें तुला ठाऊक आहे?" "नाहीं." "तुला आर्चिरादि मार्ग, देवयान, पितृयान हीं माहीत आहेत काय?" "नाहीं." यानंतर राजानें आणखीही कांहीं प्रश्न श्वेतकेतूला विचारले.

त्या प्रश्नांचीही उत्तरें त्याला देतां आलीं नाहींत. तेव्हां राजा त्याला म्हणाला "मुला, तुला कांहींच ज्ञान नाहींसें दिसतें." तेव्हां श्वेतकेतु तेथून उठून आपल्या बापाकडे गेला व राजाचे प्रश्न त्यानें त्याला विचारिले. अरुणीलाही या प्रश्नांचीं उत्तरें देतां येईनात. तेव्हां श्वेतकेतु व अरुणी असे दोघेही राजाकडे आले व आपणास शिकवा असें म्हणूं लागले. तेव्हां राजा ह्मणाला "हीं सारीं रहस्यें फक्त क्षत्रियांनाच अवगत असून ब्राह्मणांना तीं मुळींच समजलेलीं नाहींत. असें म्हणून राजानें हें सर्व ज्ञान त्या दोन ब्राह्मणांना दिलें. केवळ अरण्यवासी मुनींनींच वेदान्ततत्त्वांचा शोध केला नसून प्रपंचांत पूर्ण गढून गेलेल्या पुरुषांनींही यांतील अनेक रत्नांचा शोध लावला असे उल्लेख अनेक उपनिषद्ग्रंथांत आढळतात. राज्याचीं सारीं सूत्रें एकट्याला हालविण्याचें काम ज्या राजाला पडतें त्याची कार्यव्यापृतता केवढी असेल याची कल्पना तुम्हीच करा. त्याच्या इतकें काम असणारा मनुष्य दुसरा विरळाच सांपडेल. तथापि इतकीं कार्यें करीत असतांही कित्येक राजे महाज्ञानी होते. इतक्या स्थितींतही त्यांची आत्मानात्मविचारणा चालू होती.

वेदान्तशास्त्र व्यवहाराला घातक नसून तें अगदीं व्यवहार्य आहे असें निश्चितपणें म्हणण्यास हरकत नाहीं. वेदान्तशास्त्र व्यवहाराला सोडून नाहीं एवढेंच नव्हे तर तें व्यवहारसाधकशास्त्र आहे ही गोष्ट भगवद्गीतेनें सिद्ध केली. भगवद्गीतेचा अवतार रणक्षेत्रावर झाला हा मुद्दा विशेष लक्ष्यांत ठेवण्यासारखा आहे. बाह्यतः अविरत कार्यव्यापृतता आणि अंतःशान्ति हें भगवद्गीतेचें ब्रीदवाक्य आहे. वेदान्तधर्म विशद करणारा ग्रंथ भगवद्गीतेसारखा दुसरा नाहीं. अंतःकरणांत पूर्ण शान्ति राखून इंद्रियें कार्याला योजावयाचीं हा सिद्धांत गीतेच्या प्रत्येक पानांत अधिकाधिक विशद होत गेला आहे. कर्मरहस्य हेंच असून वेदान्तधर्माचें अखेरचें साध्य हेंच होय. नैष्कर्म्य म्हणजे हात जोडून स्वस्थ बसणें हा गीताधर्म असणें शक्यच नाहीं. शरिराची सारी हालचाल बंद ठेवणें हे आपलें अखेरचें साध्य असतें तर ही भित आपणांहून अधिक श्रेष्ठ ठरती. भित कांहींच काम करीत नाहीं यावरून ती केवळ चैतन्यरूप आहे असें ह्मणावयाचें काय? तसें असेल तर मातीचीं ढेकळें आणि मेलेल्या झाडांचीं वाळलेलीं खोडें हींच ऋषिपद पावलीं असतीं. तीं कांहीं काम करीत नाहींत एवढयामुळेंच ज्ञानी पुरुषांच्या जागीं त्यांची

योजना झाली असती. याशिवाय येथें आणखीही एक मुद्दा विचार करण्यासारखा आहे. मनांत जळफळ सुरू असतां आणि सारे मानसिक विचार पूर्ण जागृत असतां नुसत्या शारीरिक स्वस्थतेनें नैष्कर्म्य सिद्ध होत नाहीं. कर्मयोग आणि अंतःशान्ति यांची संगति जोडीनें आहे. कांहीं झालें तरी जी बिघडावयाची नाहीं—बेताल व्हावयाची नाहीं—अशी शान्ति आम्हांस हवी आहे. मनाची समता—समतोलपणा हाच कार्यसाधक आहे हा अनुभव व्यवहारांत आपणांस नेहमींच येतो.

कोणतेंही काम करावयाचें ह्मटलें कीं त्याबद्दलची आसक्ति चित्तांत असली पाहिजे. अमुक एक कार्य होणें अवश्य आहे अशी गरज आपणांस भासूं लागल्याशिवाय तें काम करण्यास आपण प्रवृत्त होत नाहीं असा आपला सामान्य अनुभव आहे. मग अनासक्त चित्तानें कार्य करावयाचें तें कसें ? हा प्रश्न अनेकांनीं अनेक वेळां मला विचारिला आहे. कित्येक वर्षांपूर्वीं मला स्वतःलासुद्धां हीच अडचण भासत होती; पण माझें वय वाढत जाऊन मला अनुभव अधिक येऊं लागला तेव्हां या प्रश्नाचें उत्तर मला सांपडलें. कोणत्याही कार्याबद्दल चित्तांत आसक्ति असल्याशिवाय कर्मप्रवृत्ति होतच नाहीं हें म्हणणें खोटें आहे असे मला कळून आलें. उलट, आसक्ति जों जों कमी तों तों आपल्या हातून कोणतेंही कार्य अधिक चांगलें होतें असा मला अनुभव आला. आपलें चित्त जितकें अधिक समतोल असेल तितकें चांगलें. त्यांत आपलें हित अधिक असून आपल्या हातून काम अधिक प्रमाणावर होतें. आमच्या वृत्ति बेफामपणें उधळतात तेव्हां आपल्या कर्तृत्वशक्तीचा अपव्यय होत असतो. अशा स्थितींत आपल्या ज्ञानतंतूंचा क्षोभ होऊन अखेरीस त्यांचें बळ कमी होतें. आपलें मन भांबावतें. क्षणांत इकडे आणि क्षणांत तिकडे अशी त्याची गत होते आणि यामुळें आपल्या हातून कामही फारसें होत नाहीं. जी कर्तृत्वशक्ति कार्यसिद्धीकडे लागावयाची ती नुसत्या कल्पना करण्यांतच खर्च होऊन जाते. आणि नुसत्या कल्पना ह्मणजे त्यांत प्रत्यक्ष कार्य कांहींच नसून ती गंधर्वनगराची रचना होय. आपलें मन ज्या वेळीं अत्यंत शांत असतें त्या वेळीं त्याची सारी शक्ति एका केंद्रांत गोळा झालेली असते आणि त्या साऱ्या शक्तीचा उपयोग त्या कार्याकडेच झाल्यामुळें तें चांगलें वठतें यांत नवल नाहीं. जगांत जे जे कार्यधुरंधर पुरुष आजपर्यंत होऊन गेले

त्यांच्या जीवनक्रमाचा इतिहास आपण पाहिला तर ते अत्यंत शांतवृत्तीचे पुरुष होते असें आपणांस आढळून येईल. जग इकडचें तिकडे झालें तरी त्यांच्या मनाचा समतोलपणा यत्किंचित्‌ही नष्ट होत नाहीं. कोपाविष्ट माणसाच्या हातून कोणतेंही कार्य धडपणें निभावत नाहीं याचें कारण हेंच होय. ज्या मनुष्याच्या वृत्तीचा कांटेतोलपणा कोणत्याही कारणानें ढळत नाहीं तोच उत्तम कर्तृत्वशाली होतो. क्रोध, द्वेष, असूया इत्यादि कोणताही विकार ज्याच्या बुद्धीला भ्रष्ट करतो त्याचें मन शतखंड होऊन कोणतेंही कार्य करण्याची पात्रता त्याच्या अंगीं उरत नाहीं. क्षमाशीलता आणि शांति यांची जोड ज्याला मिळाली असेल त्याचा समतोलपणा कायम राहून त्याच्या हातूनच महत्कार्य घडून येईल.

वेदान्तशास्त्र हे अंतिमसाध्य तुमच्या दृष्टिपथांत आणून देणारें शास्त्र आहे. मानवजातीच्या अंतिमसाध्याकडे अंगुलिनिर्देश करणें इतकेंच त्याचें काम. आणि अंतिमसाध्य व चालू व्यवहार यांत नेहमींच फार मोठें अंतर असावयाचें. अंतिमसाध्य आपल्या दृष्टीच्या टप्प्यांत असलें तरी आपण शरिरानें त्यापासून फार लांब असतों. मानवी स्वभावाचा विचार केला तर त्यांत दोन अंगें असतात असें आपणांस आढळून येईल. त्याच्या ठिकाणीं दोन प्रवृत्तींचा वास असतो. अंतिमसाध्य आणि चालू जीवनक्रम यांत शक्य तोंपर्यंत मेळ घालीत असणें ही एक प्रवृत्ति; आणि जीवनक्रमाला उच्च मार्गाभिमुख करून त्याला ध्येयाकडे नेण्याचा यत्न करणें ही दुसरी प्रवृत्ति. मानवी स्वभावरचनेंतील हा विशेष फार महत्वाचा असून नित्य ध्यानांत ठेवण्यासारखा आहे. विशेषतः प्रथम सांगितलेली प्रवृत्ति फार महत्वाची आहे. कारण तिजमुळेंच पुष्कळ वेळां आपली दिशाभूल होत असते. आपणांस मोह उत्पन्न करणारी प्रवृत्ति हीच होय. अमुक एका विशिष्ट प्रकारचें कार्य मात्र माझ्या हातून होण्यासारखें आहे असें मला वाटतें. हें कार्य बहुधा कांहीं तरी वाईट प्रकारचें असतें. त्याच्या पाठीशीं बहुधा कोणता तरी विकार असतो व तोच कार्यप्रवृत्ति करीत असतो. क्रोध, लोभ अथवा स्वार्थ यांपैकीं एखाद्या विकाराला बळी पडून त्यानें दाखविलेल्या दिशेनेंच आपण कार्य करीत असतों. आतां असें समजा कीं एखाद्या गृहस्थानें एखादें सत्कार्य माझ्यावर सोंपविलें आणि त्याच्या सिद्धीकरितां क्रोधलोभादि विकार सोडणें अवश्य असलें, तर हें कार्य माझ्या हातून

निभावणार नाहीं असें मला प्रथमच वाटूं लागतें. पण एखाद्यानें मला सांगितलेलें कार्य माझ्या स्वार्थी बुद्धीच्या आड न येतां उलट तिला पोषक असलें तर तें मला ताबडतोब पसंत पडतें. हें ध्येय मला सुसाध्य वाटतें. हेंच माझें खरें ध्येय असें मला वाटूं लागतें. ‘ व्यवहार्य ’ या शब्दाची विलक्षण ओढाताण अलीकडे झाली आहे. ‘ जुन्या मताचा ’ ‘ पुराण पंथाचा ’ या शब्दांचा अर्थ प्रसंगाप्रमाणें जसा हवा तसा होतो त्याचप्रमाणें ‘ व्यवहार्य ’ या शब्दाचा अर्थही प्रसंगोपात्त बदलत असतो. या शब्दांना निश्चित अर्थ नाहीं असेंच जणूं काय झालें आहे. मला जें ‘ व्यवहार्य ’ ह्मणून वाटेल तेवढेंच खरें व्यवहार्य असून बाकी सारें अव्यवहार्य. मी वाण्याचें दुकान घातलें असलें तर वाण्याचा धंदा तेवढाच व्यवहार्य असें मला वाटतें. मी चोर असलों तर चोरीचा धंदा तेवढा व्यवहार्य आणि बाकीचे उद्योग अव्यवहार्य अशी माझी खात्री असते. चोरी करणें हाच खरा व्यवहार असून बाकीचे धंदे त्याज्य व अव्यवहार्य. ‘ व्यवहार्य ’ या शब्दाचा अर्थ जो तो आपआपल्या दृष्टीनें ठरवीत असतो. ज्या गोष्टी आह्मांला आवडतात व ज्या करण्यास आम्हांस सोपें वाटतें त्या गोष्टी आमच्या दृष्टीनें व्यवहार्य ठरत असतात. याकरितां वेदान्तशास्त्र पूर्णपणें व्यवहार्य आहे असें आह्मी बोलत असतों. वेदान्तशास्त्रानें भलतेंच साध्य तुमच्या पुढें ठेवलेलें नाहीं. तुम्हांस करण्यास सर्वथा अशक्य अशी कोणतीही गोष्ट वेदान्त तुह्मांस सांगत नाहीं. तें साध्य अत्यंत उच्च आहे; नुसत्या दृष्टिपथांत येण्यासही तें कठीण आहे, हें सारें खरें; पण तें अशक्य मात्र नाहीं. नुसतें साध्य या दृष्टीनें ज्याचें चिंतन करावयाचें तें क्षुद्र असण्यांत मतलब तरी काय ? ध्येय मोठेंच असलें पाहिजे. सिंहाच्या शिकारीची तयारी करावी तेव्हां कोल्हा तरी पदरीं पडतो. ज्याला उच्च ध्येयाचें चिंतनसुद्धां करवत नाहीं, नुसत्या कल्पनेनेंही जो तेथवर पोंहोंचूं शकत नाहीं त्यानें पुरुषार्थ तरी कशाचा संपादावा ? तुमचें ध्येय वेदान्तशास्त्रानें ‘ **तत्त्वमसि** ’ या एकाच सूत्रांत तुमच्यासमोर ठेवलें आहे. सर्व वेदान्तधर्माचें सार या एका सूत्रांत सांठविलेलें आहे. नानाप्रकारचे युक्तिवाद करून आणि बुद्धीला अनेक प्रकारचे पीळ देऊन अखेरीस हें एकच सूत्र वेदान्तसागरांतून बाहेर पडलें. जीवात्मा परम पवित्र आणि सर्वज्ञ आहे हा वेदान्तधर्माचा अखेरचा सिद्धांत होय. याकरितां जन्म आणि मृत्यु या गोष्टींची

चर्चा या सिद्धांताच्या दृष्टीनें निव्वळ मूर्खपणाची आहे. जीवात्म्याला जन्म नाहीं आणि त्याला मृत्युही नाहीं. आत्मा कधीं जन्मासच आला नसल्यामुळें अर्थात् तो कधीं मरणारही नाहीं. याकरितां आमचा जन्म झाला होता आणि आतां आह्मांस मृत्यु गांठील इत्यादि कल्पना गांवढळ आहेत. त्याचप्रमाणें अमुक गोष्ट व्यवहार्य आणि अमुक दुसरी अव्यवहार्य या कल्पनाही तितक्याच गांवढळपणाच्या आहेत. आह्मांस वाटेल तें करण्याचें सामर्थ्य आमच्या अंगीं आहे आणि आह्मी ह्मणूं तें सारें व्यवहार्यच आहे. मी वाटेल तें करूं शकेन; माझ्या अंगीं तसें सामर्थ्य आहे असा आत्मविश्वास धरा हें वेदान्ताचें पहिलें सांगणें आहे. आपल्याबाहेर परमेश्वराचें अस्तित्व असून तो व्यक्तिविशिष्ट परमेश्वर आहे हें खरें न मानणारा मनुष्य धर्मलंड आहे असें ज्याप्रमाणें कांहीं धर्म सांगतात त्याचप्रमाणें आत्मविश्वास नसणारा मनुष्य नास्तिक व धर्मलंड आहे असें वेदान्तधर्म सांगतो. स्वतःच्या ठिकाणीं असणाऱ्या आत्म्याचें दिव्यतेज ज्याला दिसत नाहीं तो धर्मलंड खराच. हें दिव्य तेज न दिसणें हेंच खरें नास्तिक्य. वेदान्ताचें हें वचन ऐकल्याबरोबर भयानें थरथरां कांपणारे लोक कितीतरी आहेत. आणि हें साध्य अव्यवहार्य आहे असें तर आपणांपैकीं बहुतेकांस वाटतें. आपल्या आटोक्याबाहेर ही गोष्ट आहे असा आपला बहुतेकांचा समज आहे. पण वेदान्त तुम्हांला पुनः पुनः निक्षून आणि त्रिवार असें सांगतो कीं ही गोष्ट प्रत्येकाला साध्य आहे. '**अहंब्रह्मास्मि**' असें प्रत्येकाला अनुभवानें ह्मणतां येईल. हा पुरुष, ही स्त्री, हें मूल, हा काळा, हा पिंवळा, हा गोरा असले भेद वेदान्त जाणत नाहीं. त्याच्या दृष्टीला असले क्षुद्र भेद दिसतच नाहींत. तुम्ही कोणीही असा तुह्मांला हा अनुभव घेणें शक्य आहे, कारण तसा अनुभव अनेकांनीं आजवर घेतला आणि सध्या अनेक तो घेत आहेत. त्याची व्यवहार्यता सिद्ध झाल्याला दीर्घ काळ लोटून गेला आहे; मग तुम्हांलाच तो अव्यवहार्य कां होईल ?

विश्वांतील सर्व शक्ति आमच्या ठिकाणीं अगोदरच आहेत. नवीन असें कांहींच आम्हांस मिळवावयाचें नाहीं. पण विश्वांतील हें सामर्थ्य आमच्या ठिकाणीं असूनही आह्मांस तें दिसत नाहीं. आमच्या ठिकाणीं प्रकाश असतां आह्मांस तो दिसत नाहीं, याचें कारण हेंच. आम्हीं स्वतःच आपल्या डोळ्यावर आपले हात ठेविले आहेत आणि 'अंधार, अंधार' म्हणून आम्ही ओरडत सुटलों आहों. डोळे

असून आम्हीं आमच्या कृतीनें आंधळेपण स्वतःवर ओढून घेतलें आहे. आमच्याभोंवतीं अंधार पडलेला नाहीं हेंच आपणांस आतां जाणावयाचें आहे. डोळ्यावरचे हात काढले कीं उजेडच उजेड आपणांस दिसूं लागेल. हा प्रकाश कोठून नवा उत्पन्न झाला नसून पूर्वीपासून आपल्या जागींच तो आहे. अंधाराला अस्तित्व कधींच नव्हतें. आम्ही दुर्बळ कधींच नव्हतों. केवळ स्वतःच्या वेडेपणामुळें 'मी दुबळा आहें' असली भाषा आपण बोलतों. केवळ स्वतःच्या अक्कलशून्यपणामुळें आपण स्वतःला पापी समजत असतों.

वेदान्तानें सांगितलेलें ध्येय पूर्ण सुसाध्य आहे एवढेंच नव्हे तर तें आपल्या ठिकाणीं आधींच आहे. आपणाजवळ नसलेली गोष्ट आपणांस साधावयाची असते. जें आपणांजवळ आधींच आहे तें मिळेल कीं नाहीं हा प्रश्नच नसतो. वेदान्तानें सांगितलेलें ध्येय हा आपला प्रकृतिसिद्ध स्वभावच आहे. याशिवाय बाकी जें जें दृश्य ह्मणून आहे तें सारें खोटें. 'मी एक क्षुद्र मर्त्य प्राणी आहें' असें जेव्हां तुम्ही ह्मणतां तेव्हां शुद्ध खोटी भाषा तुम्ही बोलत असतां. आपण जसे खरोखर नाहीं तसे आपण आहों असें तुम्ही भासवीत असतां. आपण दुर्बळ आहों असें चिंतन तुम्ही करतां तेव्हां स्वतःलाच तुम्ही भुरळ घालीत असतां. अशा चिंतनानें तुम्हांस भुरळ पडली म्हणजे ज्या स्थितींत आपण आहों असें तुम्हांस भासतें ती स्थिति अत्यंत नीचतेची, दौर्बल्याची आणि परमावधीची अनुकंपनीय असते.

पाप हा शब्द वेदान्ताला ठाऊक नाहीं. त्या शब्दाशीं त्याची ओळखच नाहीं. मनुष्याच्या हातून पाप कधींच घडत नाहीं असें वेदान्ताचें ह्मणणें आहे. त्याच्या हातून फक्त चूक मात्र घडते. आणि सर्वात भयंकर अशी जी चूक तो करतो ती स्वतःला दुर्बळ समजणें ही होय. 'मी पापी आहें, मी दुर्बळ आहें, मी दुःखाक्रांत आहें,' असें जें त्याला वाटतें तीच त्याची भयंकर चूक आहे. माझ्यानें अमुक गोष्ट होणें शक्य नाहीं, ती करण्यास मी असमर्थ आहें असें वाटण्यांतच मनुष्याची भयंकर चूक होते. असा एक एक विचार तुमच्या मनांत जेव्हां जेव्हां येतो तेव्हां तेव्हां तुह्मांस बांधणाऱ्या शृंखलेंत एक एक नवा दुवा घडविला जातो. त्या वेळीं तुमच्या जीवात्म्यावर भुलीचें आणखी एक पांघरूण पडतें. याकरितां मी दुर्बळ आहें असें वाटणें ही मोठी चूक आहे. मी पापी असे विचार जो कोणी मनांत आणीत

असतो तो जगाच्या विचारसागरांत एका वाईट तरंगाची भर घालतो. आमचें चालू जीवित सुसंगत आहे, शास्त्रशुद्ध आहे असें ठरविण्यासाठीं वेदान्ताचा अवतार नाहीं. चालू जीवित हें बोलूनचालून स्वप्न; त्यांत संगति कसली आणि धरबंध कसला? मृगजलाच्या सरोवरांतील माशांचा रंग कोणता आणि त्यांतील वनस्पतींचे गुणधर्म काय हें ठरविण्यासाठीं वेदान्ताचा अवतार नाहीं. आमचें हें खोटें, मायामय, भ्रमाचें जीवित अथवा हा जीवितभ्रम आणि आमचें अखेरचे साध्य यांत कांहीं संगति आहे, यांत कांहीं कार्यकारणभाव आहे, असें ठरविण्याचा वेदान्ताचा हेतु नाहीं. हा भ्रम आपण टाकून दिला पाहिजे आणि आमचें जें निरंतरचें प्रकाशमय आणि सत्य जीवित आहे तें प्रकाशण्यास अवसर करून दिला पाहिजे असे वेदान्ताचें सांगणें आहे. मनुष्य दिवसेंदिवस अधिक शुद्ध होतो असें नसून त्याचे सत्य जीवित अधिकाधिक स्पष्ट होत जातें. त्या प्रकाशमय सत्यवस्तूवरील आवरण जों जों अधिक फाटत जातें तों तों तो प्रकाश अधिक दृश्यत्वास येतो. सच्चिदानंद हें आपलें खरें रूप आहे. तें आधींच आपणापाशीं आहे.

अशा प्रकारचा आत्मानुभव केवळ अरण्यांत आणि पर्वतांच्या गुहांतच होणें शक्य आहे असें नसून जगांतील कोणत्याही परिस्थितींतल्या माणसाला तो होणें शक्य आहे असें वेदान्त शास्त्राचें ह्मणणें आहे. ज्यांनीं हीं तत्त्वें उजेडांत आणलीं ते महात्मे पर्वतांच्या गुहांत आणि अरण्यांत राहणारे होते असें नाहीं हें पूर्वीच्या हकीगतींवरून आपणांस ठाऊक आहेच. त्याचप्रमाणें केवळ सामान्य माणसांचीं सामान्य कामें ते करीत होते असेंही नाहीं; तर प्रचंड राज्यें शिरावर सांभाळून तद्विषयक अनेक प्रकारचीं महत्वाचीं कार्यें त्यांस करावीं लागत होतीं. ते अहोरात्र कार्यरत होते असें ह्मटल्यासही अतिशयोक्ति होणार नाहीं. मोठमोठ्या सेनासागराचें आधिपत्य त्यांना सांभाळावें लागत होतें. कोट्यवधि प्रजाजनांचें **कल्याण** कोणत्या प्रकारें होईल याची काळजी त्यांस वाहावी लागत होती. त्यांच्या काळीं एकमुखी राजसत्ता अस्तित्वांत होती. हल्लींच्या कांहीं राजांप्रमाणें नुसतें सिंहासन शोभविण्याचें काम त्यांजकडे नव्हतें. आणि अशा प्रकारच्या परिस्थितींतही हीं विचारमौक्तिकें बाहेर काढण्यास त्यांस फुरसत सांपडली हें मोठें नवल आहे. हे विचार त्यांच्या डोक्यांतच होते असें नव्हे, तर प्रत्यक्ष आचार करून त्यांचा अनु-

भव त्यांनीं घेतला आणि मग ते जनतेस दिले. इतक्या कार्यांत व्यापृत झालेल्या लोकांना जर हे सिद्धांत व्यवहार्य झाले तर आमच्यासारख्या रिकाम्या लोकांना ते अव्यवहार्य कां व्हावे ? त्यांची कार्यव्यापृतता लक्ष्यांत घेतली ह्मणजे आम्ही जवळ जवळ अगदीं रिकामे खरेच. आत्मानुभव घेण्यास आह्मांस वेळाची सबब सांगतां येत नाहीं. अशी सबब सांगणें हें खरोखर मोठें लाजिरवाणें आहे. केवळ सांगकाम्यासारखें थोडेंसें काम केल्यावर बाकीचा वेळ आम्ही काय करीत असतों हें आपल्या मनालाच विचारून पहा. प्राचीन राजांच्या गरजा आणि आमच्या गरजा यांची तुलना केली ह्मणजे समुद्रांत खसखस, अशाच प्रकारची ती तुलना होईल. कुरुक्षेत्राच्या रणभूमीवर उभ्या असलेल्या अर्जुनाच्या कार्यव्यापाशीं स्वतःच्या कर्तव्याची तुलना आपण केली तर आपणांस काय आढळून येईल ? एका प्रचंड सैन्याचें आधिपत्य त्याला संभाळावयाचें होतें. युद्धाच्या भयंकर गर्दीत आणि काळजींत तत्वज्ञानचर्चा करण्यास त्यास वेळ सांपडला; आणि ते सिद्धांत त्यानें आचरूनही दाखविले. त्याच्या तुलनेनें आमचें जीवित किती तरी सुलभ, निष्काळजीचें आणि स्वतंत्र ! मग त्यानें जें करून दाखविलें तें आह्मांस कां करतां येऊं नये ? मला वेळ नाहीं असें जें आपणांस वाटतें तो आपला भ्रम आहे. सत्कार्यासाठीं वेळ काढावयाचाच असा निश्चय आपण केला तर आपणांस तो मिळणार नाहीं असें नाहीं. आमच्या ठिकाणीं तितकी तीव्र इच्छा खरोखर असेल तर, एकच काय पण दोनशें साध्येंसुद्धां या जीवितांत आपणांस सिद्ध करतां येतील. पण आपलें साध्य सिद्ध करण्यासाठीं त्याला अवनत स्वरूप देऊन आपल्या स्वार्थाच्या सांच्यांत बसतें करावयाचें हें कृत्य मात्र टाळलें पाहिजे. आपल्या सिद्धीच्या वाटेंत एक मोठा मोह आड येत असतो. स्वार्थासाठीं कसलेंही वाईट कृत्य आपण केलें तरी त्याचें मंडन करून आपली वर्तणूक शुद्ध होती असें दाखविणारे लोक आपणांस भेटत असतात. आपल्या मूर्खपणाला चांगलें स्वरूप कसें द्यावें ही विद्या हे लोक आपणांस शिकवीत असतात. या लोकांचा पगडा आपल्या चित्तावर बसला म्हणजे त्यांचें ध्येय चांगलें असून आपलें ध्येयही तेंच असावें असें आपणास वाटूं लागतें. मग आपलें उच्च ध्येय अगदीं बाजूस पडतें अथवा तें आपल्या वर्तणुकीशीं आपण बसतें करूं लागतों यामुळें त्याची ओढाताण होते. असें

होतां उपयोगी नाहीं. आपलें जीवित दिवसेंदिवस अधिक उच्च स्थितीला नेऊन त्याचा मेळ ध्येयाशीं बसविण्याचा यत्न करा असा वेदान्ताचा उपदेश आहे. ध्येय आणि प्रत्यक्ष आचार यांच्यांत मेळ असला पाहिजे हें खरें; पण असा मेळ घालण्याकरितां ध्येयाला उच्चासनावरून खालीं ओढावयाचें नसून आचाराला अधिकाधिक उन्नत रूप देऊन त्याला ध्येयाकडे न्यावयाचें काम आपणांस करावयाचें आहे. चालू जीवित आणि अनंतकाल टिकणारें सत्य जीवित यांचा मेळ अखेरीस अशा रीतीनें आपणांस घालावयाचा आहे.

'सर्वं खल्विदं ब्रह्म' हा वेदान्तशास्त्राचा मध्यबिंदु आहे, हें आपण नित्य लक्ष्यांत ठेवलें पाहिजे. 'दोन' असें या विश्वांत कांहींच नसून जें कांहीं आहे तें 'एकच' हा वेदान्ताचा प्रमुख सिद्धांत आहे. तेथें ऐहिक–पारमार्थिक असाही भेद नाहीं. आरंभीं आरंभीं स्वर्गादि लोकांचा उल्लेख वेदान्तग्रंथांत तुम्हांस आढळेल; पण विषय जसजसा अधिक विशद होत जातो व मुख्य सिद्धांताच्या जवळ जों जों तुह्मी जातां तों तों असल्या प्रकारच्या कल्पना गळत जाऊन अखेरीस त्यांचा मागमूसही तेथें लागत नाहीं. जें कांहीं आहे तें एक. जीवित एक, जग एक, आणि अस्तित्व एक. विश्वांत भेद म्हणून जो भासतो तो गुणधर्ममूलक नसून कमीअधिक परिमाणाचा मात्र असतो. माणसे आणि जनावरें मूलतः भिन्नप्रकृतीची आहेत हे म्हणणें वेदान्त साफ नाकबूल करतो. जनावरें हलक्या दर्जाचीं असून मनुष्याच्या भक्ष्याकरितां परमेश्वरानें तीं उत्पन्न केलीं हें मत वेदान्तशास्त्राप्रमाणें बाष्कळपणाचें आहे.

वैद्यविद्येचे शोध लावण्याकरितां औषधींचे प्रयोग जिवंत जनावरांवर करून त्यांचा प्राण वैद्य लोक घेतात. हा प्रघात बंद पाडण्याकरितां पाश्चात्य लोकांनीं कांहीं संस्था काढल्या आहेत. या संस्थेच्या एका सभासदाला एकदां मीं म्हटलें "गड्या, मनुष्याच्या खाद्यासाठीं हजारों जनावरांचा घात होत असतो; मग वैद्यकासाठीं थोडींशीं जनावरें मेलीं म्हणून काय झालें?" तो गृहस्थ म्हणाला "छे! छे; अशा रीतीनें जनावरांचा घात करणें भयंकर आहे. अन्नासाठीं त्यांचा वध करावयाचा ही गोष्ट वेगळी; कारण परमेश्वरानें त्यासाठींच त्यांना जन्मास घातलें आहे." वेदान्तशास्त्राला असलें स्वार्थसाधु मत कधींही पसंत पडावयाचें नाहीं. 'एकम्' यांत पशुपक्ष्यांचाही समावेश वेदान्त करतो. मनुष्याचा आत्मा जसा अमर तसाच पशूचाही अमर आहे.

त्यांच्यांत फरक दिसतो तो मूळजातीच्या वेगळेपणामुळें पडला नसून आत्म्याचें आविष्करण कमी अधिक प्रमाणानें झाल्यामुळें पडला; दोघांचा आत्मा एकस्वभावच आहे; पण एकाच्या ठिकाणीं त्याची उज्ज्वलता अधिक उघड असून दुसऱ्याच्या ठिकाणीं ती अधिक गुप्त आहे. अगदीं मूलस्थितींतला एकावयवी प्राणी आणि मी हे मूलरूपानें एकच आहों. आमच्यांतील फरक परिमाणाचा आहे, आणि तोसुद्धां माझी मानवी विकृत दृष्टि कायम आहे तोंपर्यंतच. ही दृष्टि साफ होऊन मी माझ्या उच्चतमपदावर आरूढ झालों म्हणजे हा फरकही मला दिसेनासा होऊन **'सर्वं खल्विदं ब्रह्म' 'ब्रह्मैव केवलं भाति'** असें मी म्हणूं लागेन. एखाद्या रानांत आपण गेलों म्हणजे उंच वृक्ष आणि लहानगें गवत यांतील उच्चनीच भाव आपणांस दिसत असतो. पुढें एखाद्या उंच डोंगरावर आपण चढलों म्हणजे तेथून 'हिरवेंगार पसरलें आहे' एवढेंच आपण म्हणूं. हे अमुक लहान गवत आणि तो तमुक उंच वृक्ष हा भेद आपणांस दिसेनासा होईल. त्याच वेदान्ताच्या उच्चत्तम ध्येयाच्या शिखरावर जो कोणी उभा असेल त्याला मनुष्य आणि पशु असा भेद प्रतीत होणार नाहीं. ईश्वराचे अस्तित्व तुम्हांस मान्य असेल तर अत्युच्च मनुष्य आणि अति नीच पशु यांची किमत सारखीच असली पाहिजे हेही तुह्मांस कबूल करावें लागेल. आपल्या मानवी मुलांचा पक्ष स्वीकारून त्यांच्या सुखाकरितां आपल्या दुसऱ्या पशु मुलांचा संहार करणारा परमेश्वर दैत्याहूनही दैत्य होय. असल्या नीच आणि दुष्ट परमेश्वराची सेवा करण्यापेक्षां मी शंभर वेळां मेलों तरी पुरवलें. परमेश्वर खरोखरच असा असेल तर माझें जीवित ह्मणजे त्याशीं जन्मभर युद्धच होय. छे! छे; परमेश्वरानें आपल्या सृष्टींत असा भेदभाव निर्माण केलेला नाहीं. असा भेद आहे असें ह्मणणारे लोक बेजबाबदार, दुष्ट आणि मूर्ख होत. असले लोक केवळ अंतःकरणशून्य असतात. व्यवहाराचा दुरुपयोग ह्मणतात तो हाच. मी स्वतः कट्टा शाकभुक् आहें असें नसेल, तथापि या कल्पनेंतील भाव काय आहे हें तरी मला खचित समजतें. मी मांसभक्षण करतों तेव्हां ही चूक आहे हेंही मी जाणतों. आपल्या मूर्खपणाला चांगलें रूप देण्यासाठीं ध्येयाला खालीं ओढून माझ्या वर्तणुकीशीं तें जुळतें करण्याचा धंदा तरी मी करीत नाहीं. कित्येक वेळां बिकट परिस्थितींत मांसभक्षण करणें मला भाग पडलें तरी हें कृत्य दुष्टपणाचें आहे हें मी विसरत नाहीं. मांसा-

शन न करणें हेंच योग्य आहे; कारण पशु झाले तरी तेही माझे बांधव असल्यामुळें त्यांस मजकडून अपाय घडणें मला योग्य नाहीं. पशुही आपले बांधव आहेत असें तुम्हांस वाटूं लागेल तेव्हां सर्वत्र बंधुभावाच्या मार्गानें एक पाऊल तुम्हीं पुढें टाकलें असें होईल. केवळ मानवी सृष्टींत परस्पर बंधुभाव असावा असें नाहीं; तर अखिल सृष्टींत तो असला पाहिजे. वास्तविक पाहतां अखेरच्या साध्याच्या दृष्टीनें हा केवळ पोरखेळ आहे; तथापि चालू मार्ग सोडून ध्येयाच्या मार्गात एक पाऊल तरी पुढें टाकण्यास हें मत शिकवितें हेंही थोडें नाहीं. पुष्कळांना हें मत पसंत पडत नाहीं, याचें कारण तें त्यांच्या स्वार्थाच्या विरुद्ध आहे. पण त्यांच्या स्वार्थाचें मंडन होईल असें एखादें मत तुह्मीं पुढें आणलें तर तें मात्र तावडतोब त्यांच्या पसंतीस उतरेल.

होतां होईतों आपली जागा न सोडणें हा मनुष्यस्वभावाचा विशेष आहे. जुने आचारविचार न सोडण्याकडे त्याची प्रवृत्ति आहे. एकही पाऊल पुढें टाकूं नये असें आपणांस वाटतें. मनुष्याच्या अंगावर बर्फ पडावें आणि त्यांत तो गोठून जावा त्याप्रमाणें आपल्या जुन्या चालीसंबंधीं त्याचें मन गोठून गेलेलें असतें. बर्फात गारठलेला मनुष्य झोंपेचा भोक्ता असतो असें म्हणतात. त्याला वर ओढून काढण्याचा यत्न करूं लागल्यास तो म्हणतो "बर्फात झोंप कशी सुखाची येते ! मला येथेंच निजूंद्या." आणि झोंपेंतच अखेरीस त्याचा अंत होतो. आपला स्वभावही असाच आहे. आपला सारा जन्म असाच झोंपेंत जात आहे. आमचे हातपाय गार पडत चालले तरी आणखी झोंपच घेण्याची आमची इच्छा आहे. आतां मरण टाळावयाचें असेल तर हात पाय हालविणें आपणांस भाग आहे. आपल्या अखेरच्या साध्याच्या मार्गानें आपणांस धावत सुटलें पाहिजे. वाटेंत एखादा सद्गृहस्थ भेटला आणि ह्मणाला कीं तुमचें ध्येय तुह्मांला येथेंच खालीं आणून देतों तर त्याला दुरूनच नमस्कार करून आपला मार्ग पुढें चालूं लागा. त्याचा शब्दही कानीं पडूं देऊं नका. माझ्या दृष्टीनें त्याचाच धर्म अव्यवहार्य होय. तुला तुझ्या उच्च साध्याकडे पोंहोंचवितों, असें कोणी मला ह्मणेल तर डोळे मिटून त्याच्या मागें जाण्याची माझी तयारी आहे. इंद्रियजन्य सुखाची आणि मानवी दौर्बल्याची तरफदारी करणारा कोणी भेटला तर फार सावध रहा. आम्ही आधींच बोलून चालून मातीचे पुतळे. आह्मी आधींच देहात्मवादी. देह हेंच

सारसर्वस्व हा मंत्र आजपर्यंत आम्ही आधींच जपत आहों. मग हाच मंत्र पुन्हां सांगणाऱ्या गुरूचा उपदेश आम्हीं घेतला तर आमची उन्नति कोठून होणार ? असल्या अनेक मतवाद्यांचा अनुभव मला आहे. असल्या पुष्कळ गोष्टी माझ्या नजरेखालून गेल्या आहेत. आमच्या देशांत अनेक पंथ गवता-सारखे उगवत असतात. नवे पंथ दरसाल उत्पन्न होत असतात. पण सत्या-न्वेषी आणि भोगान्वेषी यांची एकवाक्यता करण्याचा यत्किंचित्‌ही यत्न ज्यांत नाहीं असाच पंथ पुढें पाऊल टाकतो असाही माझा अनुभव आहे. असा यत्न ज्या ज्या ठिकाणीं होतो तेथें तेथें अवनतीचें बीज हटकून पडतें. मनुष्याला त्याच्या पदवीवरून खालीं ओढून प्रपंचाचा गुलाम न करतां त्याला परमेश्वरत्वापर्यंत पोंचवा.

आतां येथें आणखी दुसरीही गोष्ट लक्ष्यांत ठेवण्यासारखी आहे. आपल्या-हून वेगळ्या पद्धतीनें कोणी वागत असला ह्मणून त्याचा उपहास करणें आपणांस योग्य नाहीं. मार्गांत भिन्नता झाली एवढ्यानेंच कोणीही उपहास्य ठरत नाहीं. आपणा सर्वांचें अखेरचें साध्य एकच आहे. आपण सारे त्या-करितांच आपआपल्यापरी खटपट करीत आहों. दौर्बल्य आणि दृढता यांत जो फरक आहे तोही गुणधर्ममूलक नसून परिमाणाचा आहे; त्याचप्रमाणें सुद्धां सद्गुण आणि दुर्गुण यांतही जातीचा फरक नसून गुणाच्या कमी-अधिकपणाचा फरक आहे; तसेच स्वर्ग आणि नरक यांचीही जात एकच आहे; मृत्यु आणि जीवन हेही सख्खे भाऊच आहेत; या जगांतील सारे फरक अशाच स्वरूपाचे. कमीपणा अथवा अधिकपणा याजमुळें हे फरक दिसतात. मूलस्वभावांत फरक नाहीं; कारण सर्वत्र एकरूपता असणें हेंच वस्तु-मात्राचें अंतर्गत रहस्य आहे. मग जो भेद मुळांतच नाहीं तो पुढें तरी कोठून येणार ? जें कांहीं आहे तें एकच असून तेंच जीवित, मृत्यु, विचार, विकार, आत्मा, देह इत्यादि अनेक रूपांनीं प्रतीतीस येतें. या प्रतीतींत दिसणारा फरक कमी अधिक स्पष्टपणामुळें झाल्यासारखा दिसतो. त्या एकाचें रूप कोठें अधिक स्पष्ट, तर कोठें कमी स्पष्ट असतें. याकरितां एखादा मनुष्य तुमच्या दृष्टीनें पापी दिसला तरी त्याचा तिरस्कार करूं नका. त्याला धिक्कारानें दूर लोटूं नका. तुमाच्यानें कांहीं मदत त्याला होण्याजोगी असली तर ती अवश्य करा. तुमच्यानें मदत होण्यासारखी नसली तर हात जोडून स्वस्थ बसा

आणि त्याच्या मार्गानें त्याला जाऊं द्या. त्याचा धिक्कार करून त्याला खालीं लोटणें हा त्याला सुधारण्याचा उपाय नव्हे. असल्या आततायीपणानें कोणतेंही कार्य होत नाहीं. लोकांना दूषणें लावीत बसण्यांत आपण आपल्या कर्तृत्वशक्तीची व्यर्थ हानी मात्र करीत असतों. लोकांवर टीका करीत बसणें, लोकांच्या कुकर्माच्या व वर्मांच्या गोष्टि किशीत बसणें यांत आपल्या स्वतःच्या सामर्थ्याचा अपव्यय मात्र होतो. कारण सर्व जग एकाच ध्येयाकडे धांव घेत आहे व कमी अधिक चालीनें एकच मार्ग चालत आहे असा प्रत्यय अखेरीस आपणांस येतो. मग अगोदरच जो योग्य मार्गानें चालला आहे त्याला सुधारावयाचें तें काय? एकाच मार्गानें जाणाऱ्या या कोट्यवधि वाटसरूंत फरक आहे तो इतकाच कीं त्यांतला एखादा पुढें आहे आणि दुसरा एखादा चार पावलें मागें आहे.

पाप म्हणजे काय? या कल्पनेचें शास्त्रीय स्वरूप काय आहे? यासंबंधीं वेदान्तमत काय आहे हें मीं नुकतेंच तुम्हांस सांगितलें. मनुष्य पापी आहे असें इतर धर्मांचें म्हणणें आहे. वास्तविक या दोन मतांत फरक नाहीं. यांत एकानें अस्तिपक्षाचा स्वीकार केला असून दुसऱ्यानें नास्तिपक्ष उचलला आहे इतकेंच. मनुष्याच्या सामर्थ्याची बाजू एकानें दाखविली आहे, तर दुसऱ्यानें त्याचें दौर्बल्य उघड केलें आहे. आमच्यांत दौर्बल्य पुष्कळ आहे; असूं द्या. त्याची पर्वा कशाला करीत बसतां? त्याकडे लक्ष्य न देतां आपल्या पुढल्या मार्गाला लागा, असें वेदान्ताचें सांगणें आहे. मनुष्य जन्माला आला तेव्हांच त्याचा रोग निश्चित झाला. या रोगाचें स्वरूप प्रत्येकाला माहीत आहे. कोणत्या रोगानें आम्हांस पछाडलें आहे हें सांगावयास दुसरा कोणी धन्वंतरी नको. पण 'मी रोगी, मी रोगी' असा जप करीत बसणें हा निरोगी होण्याचा मार्ग नव्हे. त्याच्या निराकरणासाठीं पथ्य आणि औषध यांची योजना केली पाहिजे. आपण मोठे बलवान् झालों आहों असें सोंग आपण आणलें तर जगाला कदाचित् आपण फसवूं शकूं; पण आपल्या मनाला आपण कसें फसविणार? आपल्या दुर्बळपणाची जाणीव आपल्या अंतःकरणाच्या खोल भागांत आपणांस टोंचल्याशिवाय राहणार नाहीं. आपल्या दंभाला बाह्य जग भुललें तरी आपलें अंतःकरण भुलणार नाहीं. आपल्या दौर्बल्याची नुसती जाणीव अंतःकरणांत असली तरी तेवढ्यानें आपलें

कार्य झालें असे नाहीं. आपणांस मनोबल मिळवावयाचें आहे आणि दौर्बल्याचा नुसता विचार करीत बसून तें मिळण्यासारखें नाहीं. दौर्बल्याचा विचार बाजूला सारून 'मी बलवान् आहें' असे चिंतन सदोदित करणें हाच त्याला उपाय आहे. आपल्या ठिकाणीं जें सर्वशक्तिमत्त्व आहे त्याचें चिंतन करा. सर्व मनुष्यांना हेंच करण्यास शिकवा. 'तुह्मी पापी आहां' असें कोणालाही न म्हणतां वेदान्त याच्या उलट असें ह्मणतो कीं 'तुम्ही पूर्ण आणि पवित्र आहां, ज्याला तुम्ही पाप असें ह्मणतां त्याचा संपर्क तुह्मांला लागत नाहीं.' पाप म्हणजे काय ? आत्मरूपाचें अत्यंत खालच्या प्रतीचें स्पष्टीकरण. आत्मरूपाचा प्रत्यय जेथें अत्यंत मंद असतो तें; आणि पुण्य म्हणजे हें स्पष्टीकरण जेथें अधिक उज्ज्वल असतें तें. याकरितां पुण्यवान् होणें हें मोठेंसें कठीण काम नाहीं. आपणा सर्वांस तें सुसाध्य आहे. कोणतीही गोष्ट आपणांस असाध्य नाहीं हा नेहमीं लक्ष्यांत ठेवण्याचा पहिला मुद्दा आहे. आपण अनंत आहों. याकरितां अमुक गोष्ट 'मला अशक्य' असें कधींही म्हणूं नका. काल आणि देश यांचा विस्तारही आपल्या विस्ताराच्या तुलनेनें कःपदार्थवत् आहे. तुम्हांला वाटेल तें करतां येईल, कारण तुह्मी सर्वशक्तिमान् आहां.

सर्व नीतिशास्त्राचें मूलतत्त्व हें आहे. आतां ही शुद्ध विचारसृष्टि बाजूला ठेवून आपण आचारसृष्टीकडे वळूं. या मूलतत्त्वाचें व्यवहार्यरूप काय आहे याचाही विचार करणें आपणांस अवश्य आहे. वेदान्तशास्त्राचा हा प्रमुख सिद्धांत आपल्या रोजच्या व्यवहारांत आपणांस कसा लागू करतां येईल हेंही आपण पाहूं. आपला आयुष्यक्रम केवळ एकांगी आहे असें नाहीं. त्यांत अनेक अंगें आहेत. आपण शहरांत राहत असलों तर तेथली आजूबाजूची राहणी कशी आहे याचा विचार करणें आपणांस भाग पडतें. आपण खेड्यांत राहत असलों तर तेथली समाजपद्धतिही आपणांस पाहावी लागते. ज्या देशांत आपण राहतों त्या देशाच्या स्थितीचा विचारही आपणांस करावा लागतो. आपल्या व्यावहारिक वर्तणुकीची दिशा ठरवितांना इतक्या आणि याहूनही अधिक अंगांचा विचार आपणास करावा लागतो. वेदान्तशास्त्राचीं आदितत्त्वें इतक्या अंगांनीं कशीं संभाळतां येतील याचाही विचार आपण करूं. असें करणें आपणांस अवश्यच आहे. कारण मनुष्य कोणत्याही स्थलीं, कोणत्याही परिस्थितींत आणि उत्क्रांतीच्या कोणत्याही पायरीवर असला तरी त्याला

धर्मतत्त्वांनीं पुढें सरण्यास मदत केली पाहिजे. जो धर्म ही गोष्ट करूं शकत नाहीं त्याचा फारसा उपयोग आपणांस होणार नाहीं. कोणी कोणत्याही अवस्थेंत असला तरी त्याला मदत करण्याची धर्माची तयारी पाहिजे. गुलामाला आणि धन्याला, पाप्याला आणि साधूला मदत करण्यास धर्माचा हात सारखाच पुढें सरला पाहिजे. कोणी कोठेंही उभा असला तरी धर्माची मदत त्याला तेथें कोणत्याही क्षणीं पोहोंचली पाहिजे. हें महत्कार्य वेदान्तधर्मानें संपादिलें तर त्याच्या उज्ज्वल तत्त्वांचें सार्थक्य झालें असें होईल.

आत्मविश्वास हा या कार्यातील आपला मोठा मदतगार आहे. आत्मविश्वासाचा धडा हल्लींहून अधिक मोठ्या प्रमाणांवर शिकविला गेला असता व त्याचा व्यवहार हल्लींहून अधिक मोठ्या प्रमाणांत प्रत्यक्ष दिसला असता तर जगांतील दुःखांचा व संकटांचा मोठा सांठा नाहींसा झाला असता अशी माझी खात्री आहे. जगांत आजपर्यंत जीं मोठीं स्त्रीपुरुषें होऊन गेलीं त्यांचा आयुष्यक्रम आपण पाहिला तर त्यांच्या ठिकाणीं आत्मविश्वास जबर होता असें आपणांस आढळून येईल. आपण महत्कार्य खचित करणार अशी जाणीव जन्मापासून त्यांना होती आणि तीप्रमाणें त्यांनीं महत्कार्यें केलीं. मनुष्य परमावधीच्या नीचावस्थेला गेला असला तरी एक वेळ उलट खाल्ल्यावांचून तो राहत नाहीं. प्रत्येक कामाकरितां लोकांच्या तोंडाकडे पाहण्याची संवय त्याला असते आणि एकही काम धडपणें तडीस न गेल्यामुळें दिवसेंदिवस अधिक दुर्गतीला तो जात असतो. अखेरीस एक वेळ अशी येते कीं तो अगदीं बेफाम बनतो व यापुढें दुसऱ्या कोणाची मदत घ्यावयाची नाहीं असा निश्चय तो करतो. आत्मविश्वासाचा पहिला धडा त्याला अशा रीतीनें मिळतो. आत्मविश्वासाला असाध्य असें जगांत कांहींच नाहीं. याकरितां अगदीं तळच्या पायरीला जाण्याची वाट न पाहतां प्रथमपासूनच आपण आत्मविश्वास धरूं या. आत्मविश्वास उत्पन्न होण्यासाठीं आपली स्थिति इतकी खालावली पाहिजे अशी शपथ कोणी घातलेली नाहीं. माणसामाणसांत जो फरक आपणास आढळून येतो त्याचें मूळ त्यांच्या आत्मश्रद्धेंतील फरकांत असतें. आत्मविश्वासाला हवें तें साध्य आहे असा अनुभव मला स्वतःला आला आहे, आणि चालू क्षणींसुद्धां मला तो येत आहे. माझ्या वाढत्या वयाबरोबर माझा आत्मविश्वासही वाढत आहे. ज्याच्या ठिकाणीं

आत्मविश्वास नाहीं तो खरा नास्तिक आणि अस्सल धर्मलंड समजावा. परमेश्वराच्या ठिकाणीं ज्याचा विश्वास नाहीं तो नास्तिक अशी जुन्या धर्माची व्याख्या आहे. पण नव्या धर्माची व्याख्या याच्याहून वेगळी आहे. ज्याला आत्मविश्वास नाहीं तो नास्तिक अशी नवी व्याख्या आहे. तथापि येथें आणखीही एक मुद्दा ध्यानांत ठेवला पाहिजे. स्वतःच्या पोळीवर तूप ओढणें ह्मणजे आत्मविश्वास नव्हे. स्वार्थासाठीं लोकांला नागविणें याचा अर्थ आत्मविश्वास असा होत नाहीं. सर्व जग एकरूप आहे हा वेदान्ताचा आदिसिद्धांत आहे. हें माझें, हें तुझें, हा मी आणि तो तूं असा भेद वेदान्त जाणत नाहीं. सर्वांच्या ठिकाणीं आत्मभाव असणें हाच खरा आत्मविश्वास. कारण वस्तुतः आपण एक आहोंच. सर्वभूतीं प्रेम हेंच खरें आत्मप्रेम. मनुष्यांबद्दलच नव्हे तर पशुपक्ष्यांबद्दलही तुमच्या मनांत प्रेम असलें पाहिजे. जगाची स्थिति सुधारावयाची असेल तर ती या सिद्धांताच्या आचारानेंच सुधारेल, अशी माझी खात्री आहे. 'मी स्वतःला जाणलें आहे' असें जो कोणी खऱ्या भावानें ह्मणूं शकेल तो खरोखरच मोठा मनुष्य होय. मनुष्यांत खरोखर काय काय चिजा भरल्या आहेत हें कोणत्या भौतिक शास्त्रज्ञानें जाणलें आहे ? तुमच्या या दृश्य जडदेहाच्या मागे किती परिमाणाची शक्ति, किती कर्तृत्व आणि किती जोम उभा आहे याची कांहीं कल्पना तरी तुम्हांला आहे काय ? जगतीतलावर मनुष्य अवतरल्याला आज कोटयवधि वर्षें होऊन गेलीं; तथापि इतक्या अवधींत त्याच्या खऱ्या सामर्थ्याचा कोटयंशसुद्धां पुरासा व्यक्त झालेला नाहीं. याकरितां ' मी दुर्बळ आहें ' असली कल्पनासुद्धां मनांत आणूं नका. बाह्यतः दिसणाऱ्या या अवनत स्थितीच्या मागें कोणकोणत्या गोष्टी आहेत यांचा हिशेब तुह्मांला काय ठाऊक आहे ? तुमच्या स्वतःच्या ठिकाणीं काय आहे याचाही पुरासा शोध तुह्मांला लागलेला नाहीं. तुमच्या मागें अनंतसामर्थ्याचा आणि परममंगलरूपाचा महासागर उभा आहे.

' आत्मरूप श्रवण करा,' अशी श्रुति आहे. मी आत्मरूप आहें अशा अर्थाचें श्रवण अहोरात्र करीत जा. हा विचार आपल्या रोमरोमांत खेळूं लागेपर्यंत त्याचा जप अहोरात्र करीत जा. रक्ताच्या प्रत्येक बिंदूबरोबर या विचाराचें अभिसरण होऊं लागेपर्यंत ' सोऽहम्' असा निदिध्यास राहूंद्या; आमच्या हाडींमासीं हा सिद्धांत एकजीव होऊन गेला पाहिजे. ' ज्याला जन्म नाहीं,

मृत्यु नाहीं, जो आनंदरूप, सर्वसाक्षी आणि सर्वशक्तिमान् आत्मा तो मीच, या एकाच ध्येयांत सदा मग्न रहा. आमचें सारें जीवित या एका ध्येयाशीं एकरूप झालें पाहिजे. हा सिद्धांत आमच्या जीविताचा एक भाग होऊन जाईपर्यंत त्याचा जप आणि त्याचें ध्यान आह्मांस केलें पाहिजे. हें ध्यान तुह्मी सदोदित करूं लागलां ह्मणजे कर्मयोगाचा मार्ग तुह्मांस दिसूं लागेल, अंतःकरण तुडुंब भरून गेलें म्हणजे तें मुखांतून वाहूं लागतें; मुखाच्या द्वारें तें बोलूं लागतें. त्याचप्रमाणें हस्ताच्या द्वारें तें कर्म करूं लागतें. अशा स्थितींत कर्मयोगाचा आचार तुह्मी आपोआप करूं लागाल. कोणत्याही स्थितींत तुम्ही असलां अथवा कोणतेंही काम करीत असलां तरी या विचाराचा लोप होऊं देऊं नका. या विचाराच्या सामर्थ्यानें तुमचें प्रत्येक कर्म दैवी होऊन जाईल. तुमच्या क्षुद्र कर्मालासुद्धां दैवी स्वरूप येईल; त्याचें आजचें आसुरी स्वरूप पालटून जाईल. जडांतील सामर्थ्यही जड आणि मर्यादित असतें; पण चैतन्य सर्वसामर्थ्यवान् आहे. त्याच्या सामर्थ्याला अगम्य असें स्थल नाहीं. आपल्या रोजच्या व्यवहारांतही हें तत्त्व विसरूं नका. त्याच्या प्रकाशांत रोजचा व्यवहार करा. ‘ मी सर्व समर्थ आहें, मी सत्तेचा अधिपति आहें, मी उज्ज्वलरूप आहें’ या विचारानें तुमचें अंतःकरण भरून वाहूं लागलें पाहिजे. भोळसट आणि खुळचट धर्मकल्पनांचा प्रवेश तुमच्या ठिकाणीं कधींच झाला नसता तर केवढी मौज झाली असती ! ‘तूं पापी, तूं दुबळा’ असल्या दुष्ट, वेडेपणाच्या आणि आम्हांस पक्षघाताचा विकार करणाऱ्या कल्पनांचें जाळें लहानपणापासून आमच्याभोंवतीं पडलें नसतें तर परमेश्वराचे केवढे उपकार आम्हांवर झाले असते ! अत्यंत उच्च सत्यापर्यंत जाण्याचा मनुष्यजातीचा मार्ग हल्लींच्याहून सुकर झाला असता तर देवाची केवढी कृपा झाली असती ! पण तसें व्हावयाचें नव्हतें. असल्या कांट्यांनीं भरलेल्या मार्गानेंच मनुष्यानें जावें असा जणूं काय पूर्व संकल्पच होता. असो. आतां जे कोणी तुम्हामागून येत आहेत त्यांचा मार्ग तरी अधिक कठीण करूं नका.

हीं मतें मोठीं भयंकर आहेत असेंही कोणाला कधीं कधीं वाटत असतें. हे सिद्धांत ऐकल्याबरोबर भयानें ज्यांना कांपरें भरतें असेही लोक मीं पाहिले आहेत. पण ज्यांना वेदान्त तत्त्वांचा आचार करावयाचा

असेल त्यांना हीं तत्त्वें प्रथम शिकण्यावांचून गत्यंतर नाहीं. 'मी दुर्बळ' हा विचार मनांत आणूं नका आणि कोणाजवळ बोलूनही दाखवूं नका. तुमच्यानें कोणाचें बरें झाल्यास करा; पण निदान कोणाचा घातपात करूं नका. काल्पनिक परमेश्वरापुढें गुडघे टेंकून भलभलत्या प्रार्थना करणें आणि रडून रडून त्याची करुणा भाकणें हा खुळेपणा आहे ही जाणीव तुमच्या अंतःकरणाच्या खोल भागांत असल्याचें तुम्हांलाही ठाऊक आहे. काल्पनिक परमेश्वराला आळवून नानाप्रकारच्या जिनसा त्याजपाशीं तुम्ही मागतां. पण यांतील एक तरी जिन्नस तुम्हांस कधीं प्राप्त झाला आहे काय? असें एक तरी उदाहरण मला दाखवून द्या. तुमची अडचण दूर होते तेव्हां तुमची अंतर्गत बुद्धिच तुमच्या उपयोगीं पडत असते. जगांत भुतेंखेतें नाहींत हें तुह्मांला ठाऊक असतें; पण गडद काळोखांत गेल्यावर अंगावर कांटा उभा राहूं लागतो, याचें कारण काय? कारण हेंच कीं लहानपणापासून या भेसूर कल्पना आमच्या डोक्यांत कोंबल्या गेल्या आहेत. आतां तुमच्या मुलांबाळांना तरी असलीं खुळें शिकवूं नका. भोळया धर्मकल्पनांचीही हीच स्थिति आहे. लहानपणापासून त्यांनीं आमच्या डोक्यांत घर केलें आहे. आतां लोकलज्जेसाठीं, लोकांच्या भीतीमुळें, मित्रोपहासाच्या भीतीमुळें अथवा स्वतःच्या मनोदौर्बल्याला बळी पडून या कल्पना दुसऱ्यांना तरी शिकवूं नका. फार दिवसांच्या सहवासानें या कल्पनांवर तुमचें प्रेम जडलें असेल; पण तें प्रेम आतां निष्ठुर अंतःकरणानें तोडून टाका. सध्या तुह्मी या सर्वांचे गुलाम आहां; पण आतां तुम्हीं त्यांचे मालक बनलें पाहिजे. सर्व विश्वाची एकरूपता आणि आत्मविश्वास यांवांचून आणखी शिकण्यासारखें धर्मांत काय असावयाचें? या एकाच साध्याला पोंचण्यासाठीं गेलीं हजारों वर्षें मानवजातीची धडपड एकसारखी सुरू आहे. लक्षावधि मनुष्यांनीं जें जें कांहीं केलें तें एकाच साध्याच्या सिद्धीसाठीं होय. आणि अद्यापिही मनुष्यप्राणी जें जें कांहीं करतो तें सारें या एकाच हेतूसाठीं. आतां हा हेतु सफल करून दाखविण्याची पाळी तुम्हांवर आली आहे. हें साधण्यास योग्य मार्ग कोणता हें तुम्हांला आतां कळून चुकलेंच आहे. सत्य काय आहे हें आतां तुम्हांला समजलें आहे. तत्त्वज्ञान आणि मानसशास्त्र यांनींच ही गोष्ट उघड करून दाखविली आहे असें नसून आतां जडशास्त्रेंही हीच गोष्ट सिद्ध करूं लागलीं आहेत. विश्वाची

एकरूपता कबूल करण्याची भीति ज्याला वाटते असा भौतिक शास्त्रज्ञ आतां एकही नाहीं. स्वर्गादि अनेक लोकांचें अस्तित्व आहे असें म्हणण्याची छाती आतां कोणालाही नाहीं. या साऱ्या गोष्टींचें अस्तित्व केवळ कल्पनेंत मात्र आहे. सर्व जीवित एकरूप आणि विश्वही एकरूप असून तेंच एक अनेक प्रकारांनीं भासत आहे. स्वप्नांत ज्याप्रमाणें अनेक मिथ्यावस्तु आपण पाहतों त्याच प्रमाणें हें अनेकत्वही स्वप्नरूप आहे. एक स्वप्न सुरू असतां मध्येंच दुसरें सुरू होतें आणि तें संपतें न संपतें तोंच तिसरें दिसूं लागतें. आणि हे सारे प्रकार आपण नामानिराळे राहून पाहत असतों. देखाव्यामागें देखावा येतो आणि आपणांस दर्शन देऊन चालता होतो. नव्वद टक्के दुःख आणि दहा टक्के सुख अशा मिश्रणाच्या या जगांतही हाच प्रकार चालू आहे. देखाव्यामागे देखावा आपल्या नजरेसमोरून जात आहे, आजच्या देखाव्यांत नव्वद टक्के दुःख दिसत असेल तर उद्यांच्या देखाव्यांत कदाचित् नव्वद टक्के सुख दिसूं लागेल. या दुसऱ्या देखाव्याला आपण स्वर्ग हें नांव देऊं पण जो आत्मप्रत्ययाच्या मार्गाला लागला असेल त्याला इंद्रजाल न दिसण्याचा एक काळ खचित येईल. अशा वेळीं सर्व विश्व परमात्ममय व परमात्मा आपण स्वतः असा अनुभव त्याला येईल. याकरितां विश्वाची विविधता सर्वथा खोटी आहे. अनेक जीवात्मे आणि अनेक प्रकारच्या वस्तु यांना अस्तित्व नाहीं. विश्वांत दिसून येणारी सारी विविधता त्या एकाचींच आभासरूप रूपें होत. तेंच एक अनेकविध प्रकारांनीं भासत आहे. जडरूपानें, चैतन्यरूपानें, मन या रूपानें, विचार या रूपानें आणि याशिवाय अनेक प्रकारच्या रूपांनीं तेंच एक स्पष्टत्वास आलें आहे, याकरितां हें सत्य स्वतः शिकावयाचें व दुसऱ्यास शिकवावयाचें हें आपलें पहिलें काम आहे.

या तत्त्वांच्या उच्च घोषानें सारें जग दुमदुमून सोडा म्हणजे भोळसटपणाचीं सारीं मतें नाहींशीं होतील. ज्या दुर्बळ मनुष्यांना स्वतःचें दौर्बल्य चवाठ्यावर सांगण्याची खोड लागली असेल त्यांना तर हा अद्वैतसिद्धांत अवश्य सांगितला पाहिजे. जें एक पवित्र रूप तें तुम्ही; जागे व्हा; उठून उभे रहा; अहो शक्तिमंत हो, ही झोंप तुह्मांला शोभत नाहीं. या तुमच्या खऱ्या सामर्थ्याला हा दुबळेपणा लांछनास्पद आहे. आह्मी दुःखी आहों, दुबळे आहों असला विचारही मनांत आणूं नका. आतां जागे होऊन आपलें गुप्त सामर्थ्य

प्रकट करा. तुम्ही स्वतःला पापी समजावें हें योग्य नाहीं. ' सोऽहम् ' असें नित्य म्हणत जा. ' शिवोऽहम् ' एवढें एकच चिंतन अहोरात्र करा. जगासमोर हेंच चिंतन आणि स्वतःशींही हेंच चिंतन करा, म्हणजे त्याचा परिणाम काय होतो हें तुह्मांस प्रत्यक्षच दिसेल. जादूची कांडी फिरल्याप्रमाणें विद्युद्वेगानें सारें विश्व पालटून जाईल. साऱ्या विश्वाचें रूप निराळें झाल्याचा प्रत्यय तुम्हांस येईल. मनुष्यमात्राला हा मंत्र सांगून त्यांच्या अंतर्गत सामर्थ्याची ओळख त्यांस करून द्या. हें झालें ह्मणजे या मंत्राचा विनियोग व्यवहारांत कसा करावयाचा हें शिकण्यास आपणांस वेळ लागणार नाहीं.

आपल्या विवेकशक्तीचा उपयोग व्यवहारांत होण्यास, आपल्या आयुष्याच्या प्रत्येक क्षणीं तिचा उपयोग करण्यास, आपल्या सर्व कर्मांत ती लागू करण्यास आणि सत्य व मिथ्या यांचें योग्य परीक्षण करण्यास आपणास शिकावयाचें असेल तर तसें करण्याची पात्रता आपण आपल्या अंगीं प्रथम आणिली पाहिजे. एकात्मभाव आणि पवित्र आचरण यांच्यायोगें ही पात्रता आपल्या अंगीं येते, सर्वत्र एकात्मभाव हा अद्वैताचा अखेरचा सिद्धांत आहे. याकरितां हा एकात्मभाव उत्पन्न होण्यास ज्या ज्या वस्तूची मदत होत असेल ती ती वस्तु सत्य होय. याकरितां प्रेम हें सत्य आणि द्वेष मिथ्यारूप होय. कारण द्वेषामुळें एकात्मतेचा बिघाड होऊन द्वैत-विविधता—उत्पन्न होते. द्वेषामुळेंच एक मनुष्यप्राणी आपल्या दुसऱ्या बांधवांपासून दूर होतो. याकरितां द्वेष हा विघटनात्मक, मिथ्यारूपाचा आणि चुकीचा भाग होय. घटनेंत विघटना करणें हें द्वेषाचें कार्य आहे. विघटना करून अखेरीस सर्व नाश करणें हें द्वेषाचें कार्य आहे.

विघटनेंत घटना उत्पन्न करणें, फूट मोडून जूट करणें हें प्रेमाचें कार्य आहे. एकात्मभाव प्रेमानें उत्पन्न होतो. आई आणि मूल हीं प्रेमानें एकरूप होतात. कुटुंबांतील अनेक माणसें प्रेमरज्जूनें एकत्र बांधलीं जातात. अनेक कुटुंबें प्रेमाच्या ग्रंथीनें ग्रामरूप पावतात. सर्व जग प्रेमानें एकरूप होतें. अनिर्वचनीय प्रेमानें हा मनुष्य आणि हा पशु इतका भेदही उरत नाहीं. प्रेम हेंच ईश्वर; प्रेम हेंच अस्तित्व; एकच प्रेम कमीअधिक प्रमाणानें अनेकधा होऊन विश्वरूपानें व्यक्तदशेला आलें आहे. या अनेक रूपांत मूलतः कांहींच भेद नाहीं. भेद म्हणून दिसतो तो केवळ कमीअधिक व्यक्तदशेचा मात्र

आहे. याकरितां हा भेद वास्तविक नसून सर्वत्र एकच प्रेमरूप भरलें आहे. याकरितां प्रत्येक कर्म करतांना विचार करावयाचा तो हाच कीं 'माझ्या या कर्मानें घटना निर्माण होते कीं विघटना?' जर आमच्या कोणत्याही कर्मानें विघटना आणि विविधता उत्पन्न होत असेल तर तें कर्म त्याज्य होय; तें अकर्म होय. आणि जर एखाद्या कर्मानें विविधता मोडून एकात्मता उत्पन्न होत असेल तर तें सत्कार्य होय असें निश्चयानें म्हणण्यास हरकत नाहीं. जड कर्माचा हा सिद्धांत आपल्या विचारांसही लागू आहे. कोणत्याही गोष्टीं-संबंधीं आपल्या मनांत विचार चालू असतील तर ते विघटनाकारक आहेत कीं संघटनाकारक आहेत हें पाहणें अवश्य आहे. आपल्या विचारांचें पर्यव-सान एकात्मता उत्पन्न करण्याकडे आहे कीं फूट पाडण्याकडे आहे हें अवश्य पाहिलें पाहिजे. जर ते एकीकरणात्मक असतील तर ते अवश्य ग्राह्य असून याहून विरुद्ध दिशेचे विचार त्याज्य होत. अशा विचारांना थारा देणें पापा-त्मक आहे.

अज्ञेय अशा कोणत्याही वस्तूवर नीतिसिद्धांतांची रचना झालेली नाहीं. नीतिशास्त्राच्या मुळाशीं अज्ञात अथवा अज्ञेय असें कांहीं नाहीं. 'ज्या अज्ञात परमात्म्याचें पूजन तुह्मी करतां त्याचेंच ज्ञान' उपनिषद्ग्रंथांनीं करून दिलें आहे. ज्ञानाचें मूळ आत्मप्रकाश हें होय. आत्मप्रकाशावांचून कोणत्याहि वस्तूचें ज्ञान होणें शक्य नाहीं. ही खुर्ची मला दिसते. पण ती दिसण्यापूर्वी मला आत्मदर्शन करावें लागतें. आत्म्याच्या द्वारें आणि त्याचें अधिष्ठान असेल तरच ही खुर्ची मला दिसेल. तुमच्या अस्तित्वाचें ज्ञान मला होतें तेंही आत्म्याच्या द्वारेंच होतें. आत्म्याच्या साक्षित्वावांचून विश्वांतील कोणत्याही पदार्थाचें ज्ञान मला होणार नाहीं. याकरितां आत्मा अज्ञेय आहे असें ह्मणणें हें शुद्ध वेडेपण होय. आत्मा वजा केला तर विश्वही वजा होऊन जाईल. सर्व ज्ञान आत्म्याच्या द्वारेंच होतें. याकरितां आपल्या पक्क्या ओळखीची अशी कोणती वस्तु असेल तर ती आत्मा हीच होय. ज्याला तुम्ही 'मी' असें ह्मणतां तें तेंच आत्मरूप. हें आत्मरूप सर्वत्र एकच आहे. तुमच्या आत्मरूपांत आणि माझ्या आत्मरूपांत कांहींच फरक नाहीं. तुमचें 'मी' आणि माझें 'मी' हीं एकच आहेत हें ऐकून तुह्मांस मोठें नवल वाटेल. तसेंच हें एवढयाशा शरिरांत बद्ध व मर्यादित झालेलें 'मी' अनंत

व विश्वव्यापी कसें असूं शकेल अशीही शंका तुह्मांस येईल; पण वस्तुस्थिति अशीच आहे हें खरें. आपलें रूप मर्यादित आहेसें वाटणें हाच भ्रम आहे. अनंतरूप जणुंकाय आवरणांत सांपडलें असून त्यांतील अत्यंत अल्प अंश ' मी' या रूपानें स्पष्टदशेला आला आहे. अनंतरूप खरोखर मर्यादित होणें शक्यच नाहीं. तें मर्यादित झालें आहे असें वाटणें हा भ्रम आहे. याकरितां आत्मरूपाची ओळख ज्याला नाहीं असा एकही प्राणी अस्तित्वांत नाहीं. स्त्री, पुरुष आणि मूलच काय, पण पशुपक्ष्यांनाही आत्मरूपाची ओळख आहे. ही ओळख नसेल तर आम्हांस जगणें अथवा कोणत्याही प्रकारची हालचाल करणेंही शक्य नाहीं. या सर्वव्यापी वस्तूची ओळख असल्याशिवाय श्वासोच्छ्वास करणें अथवा एक क्षणही जिवंत राहणें शक्य नाहीं. वेदान्तधर्मप्रणीत परमेश्वर सर्वांस ज्ञेय आणि ज्ञात असून त्याचें अस्तित्व काल्पनिक नाहीं.

परमात्म्याचें व्यवहारिक स्वरूप सांगण्याचा मार्ग हा नसेल तर दुसऱ्या कोणत्या मार्गानें हें कार्य साधणार आहे ? माझ्या समोर प्रत्यक्ष दिसणारें, सर्वसाक्षी, सर्वव्यापी व आपल्या इंद्रियांपेक्षां अधिक सत्य असें स्वरूप व्यावहारिक नाहीं असें म्हटलें तर दुसरें अधिक व्यावहारिक असें स्वरूप कोणतें सांगतां येणार आहे ? तें सर्वव्यापी स्वरूप तुह्मीच आहां. तुह्मी परमेश्वररूप नाहीं असें मीं ह्मटलें तर मात्र मी शुद्ध खोटें बोललों असें होईल. मला सर्वदा असाच अनुभव येत नसला तरी तुह्मी परमात्मरूप आहां हें निश्चयानें खरें आहे. सर्वांचें अंतिम एकच स्थान, सर्वांचें संकलित एकरूप, सत्यरूप आणि सर्व अस्तित्वाचा केवळ जीव तोच हा परमात्मा होय.

सर्व नीतीच्या मुळाशीं हाच वेदान्ताचा सिद्धांत आहे. त्याचा प्रत्यक्ष व्यवहार कसा करावयाचा याचा सर्वांगपरिपूर्ण विचार आपणांस करावयाचा आहे. हा प्रश्न फार नाजुक असल्यामुळें त्याचा निकाल एका घावांत लावतां येणें शक्य नाहीं; याकरितां धीराधीरानें ह्याचा विचार आपण करूं. यांतील अनेक अंगांचा आणि उपांगांचा विचार आपणांस करावयाचा आहे हें मीं पूर्वी सांगितलेंच आहे. अत्यंत कमी प्रतीच्या ध्येयापासून वेदान्ताच्या अत्युच्च ध्येयापर्यंत झालेल्या विचारांची उत्क्रांति कशी झाली व अखेरीस विश्वव्यापी सिद्धांताची प्राप्ति कशी झाली याचा सविस्तर विचार आपणास

करावयाचा आहे. इतक्या सविस्तरपणें हा विचार करण्याचें प्रयोजन काय असा प्रश्न कोणाच्या मनांत येईल. त्याचें उत्तर हेंच कीं या मार्गांतील धोक्यांच्या स्थळांची ओळखही आपणांस करून घ्यावयाची आहे. ही माहिती आपणांस झाली म्हणजे अशीं स्थळें आपणांस टाळतां येतील. अत्यंत तळाच्या पायरीपासून आरंभ करून हळूहळू मार्ग क्रमीत बसण्यास जगाला वेळ नाहीं. पण आपल्या मागून जे कोणी येत असतील अथवा येतील, त्यांना या मार्गाचें सविस्तर वर्णन आपणांस सांगतां आलें नाहीं तर उच्च शिखरावर आपण चढून गेल्याचा उपयोग काय ? याकरितां या सिद्धांतशिखरावर पोंचण्याचा जो मार्ग आहे त्याचें सविस्तर कथन करणें अत्यंत जरुरीचें आहे. यांतील बुद्धिगम्य स्थळें होतील तितकीं प्रकाशमय करणें हें तर अत्यंत आवश्यक आहे. या मार्गानें जाऊं पाहणारास बुद्धीची मदत होतेच असें नाहीं, हें आपणांस ठाऊक आहेच; किंबहुना तिची मदत फारशी होत नाहीं असेंही म्हटल्यास चालेल; तथापि मार्ग झाडूनझटकून साफ करण्याचें काम बुद्धि करीत असते; परमात्म्याकडे जाणारा रस्ता बुद्धींतून जात नसून अंतः-करणाच्या द्वारें जात असतो. परमात्मदर्शन बुद्धीला होत नसून अंतःकरणाला होत असतें. तथापि बुद्धि ही रस्त्यांतले कांटेकुटे दूर करते; चोराचिलटांचा बंदोबस्त करते. तिचा उपयोग पोलीसच्या शिपायासारखा आहे. पोली-सच्या शिपायाचें काम दुय्यम प्रतीचें आहे. दंगेधोपे होऊं न देणें व अकर्म घडूं न देणें इतकेंच त्याचें काम आहे. सामाजाची वाढ तो करूं शकत नाहीं. तथापि वाढ होण्यास योग्य परिस्थिति त्यानें राखली पाहिजे. बुद्धीचें कार्यही याच स्वरूपाचें आहे. बुद्धि स्वतः हस्तपादविरहित आणि आंधळी आहे. कोणतेंही प्रत्यक्ष कार्य तिच्यानें होत नाहीं. अंतःकरणाच्या भावनाच आप-णांस कार्याला प्रवृत्त करीत असतात. विद्युद्वेगाहूनही यांची गति अधिक जलद आहे. आपणांला अंतःकरणजागृति आहे कीं नाहीं हाच महत्त्वाचा प्रश्न आहे. अंतःकरणाची जागृति असेल तर परमात्मदर्शन खास होईल. तुमच्या भावानांचेंच रूपांतर होऊन त्या परमात्मपद पावतील. भावनांनाच उच्च दशा प्राप्त होणें शक्य आहे. भावनांची उत्क्रांति होत होत त्या शेवटीं इतक्या पूर्णतेस जातात कीं त्या स्थितींत त्यांना एकत्वाचा प्रत्यय येतो आणि सर्वांतर्यामीं एकच तत्त्व आहे असा अनुभव प्राप्त होतो. ही गोष्ट

बुद्धीला कधींही करतां येणार नाहीं. **'वाग्वैखरी शब्दझरी शास्त्रव्याख्यान-कौशलम् । वैदुष्यं विदुषां तद्वद्भुक्तये न तु मुक्तये ॥'**

हें तत्त्व प्राधान्येंकरून सर्व सत्पुरुषांनीं विशद केलें आहे. या कामीं बुद्धीची मदत इतक्याच साठीं पाहिजे कीं तिच्या अभावीं आपल्या हातून प्रसंगीं भलत्याच चुका होण्याचा संभव आहे. या चुका बुद्धि होऊं देत नाहीं; पण या पलीकडे तिचा कांहीं उपयोग होतो असें समजणें मात्र चुकीचें होय. बुद्धीची मदत प्रत्यक्ष नसून परोक्ष आहे आणि म्हणून ती दुय्यम प्रतीची आहे हें अवश्य लक्ष्यांत ठेवलें पाहिजे. प्रत्यक्ष मदत अंतःकरणांतील प्रेमाचीच होय. दुसऱ्याबद्दल तुमच्या अंतःकरणांत खरोखर प्रेम आहे काय ? त्यांच्याशीं तुमची केव्हांतरी समरसता होते काय ? तसें होत असेल तर अनुभवाच्या मार्गांत तुह्मी आहां. दुसऱ्यांबद्दल तुमचीं अंतःकरणें आर्द्र होत नसतील तर तुह्मी केवढयाही उत्तान बुद्धीचे पुरुष असलां तरी परमार्थदृष्ट्या तुमची किंमत शून्यच. कोरडे बुद्धिमान् पुरुष अखेरपर्यंत कोरडे पाषाणच असावयाचे. पण तुमचें अंतःकरण कोमल असेल, त्याला प्रेमाचा ओलावा असेल तर एकही ओळ न वाचतां अथवा एकही भाषा न शिकतां तुम्ही पूर्णत्व पावाल. परमेश्वर तुमचाच झाला आहे, असें तुम्ही समजा.

अवतारी पुरुषांच्या ठिकाणीं विलक्षण सामर्थ्य होतें ही गोष्ट जगाच्या इतिहासांत आपल्या निदर्शनास येते. पण हें सामर्थ्य त्यांना कोठून प्राप्त झालें होतें ? हें सामर्थ्य त्यांच्या बुद्धींत होतें काय ? तत्त्वज्ञानावर सुंदर ग्रंथ त्यांच्यापैकीं कितिकांनीं लिहिला आहे ? अथवा न्यायशास्त्रावर ग्रंथ लिहून साखरेची साल किती जणांनीं काढली आहे ? एकानेंही नाहीं. केव्हां केव्हां ते क्वचित् शब्द उच्चारीत. त्यांचें सामर्थ्य त्यांच्या प्रेममय अंतःकरणांत होतें. ख्रिस्तासारखें अंतःकरण करा, ह्मणजे तुह्मीही ख्रिस्त व्हाल. बुद्धासारखी आर्द्रता असेल तर तुम्हीही बुद्ध व्हाल. उच्च भावना हेंच परमजीवन; हेंच खरें बल; हाच खरा जिवटपणा. यांच्या साहाय्यावांचून परमेश्वरापर्यंत पोहोंचणें केव्हांही शक्य नाहीं. बुद्धीच्या केवढयाही उड्यांनीं परमात्मपद गांठतां येणार नाहीं. हालचालीची शक्ति नसलेले अवयव असावे त्याप्रमाणें बुद्धि आहे. ज्या वेळीं अंतःकरण जागृत होतें तेव्हां तिला क्रियासामर्थ्य प्राप्त होऊन ती स्वतःच्या व इतरांच्या उपयोगी पडते. साऱ्या जगभर हाच अनुभव

आहे. हा मुद्दा मुख्यत्वेंकरून आपण लक्ष्यांत ठेवला पाहिजे. वेदान्त धर्माचा हा एक प्रमुख आणि अत्यंत व्यवहार्य सिद्धांत आहे. तुम्ही सारेच अवतारी पुरुष आहां असें वेदान्ताचें म्हणणें आहे आहे. तुमची वर्तणूक पुस्तकाच्या आधारानें बरीवाईट ठरावयाची नसून तिचा आधार पुस्तकाला मिळावयाचा आहे. पुस्तकांत सांगितलेली गोष्ट बरोबर आहे कीं नाहीं हें तुम्ही कशावरून जाणतां ? कारण हेंच कीं तुम्ही स्वतः सत्यरूप असतां आणि यामुळें पुस्तकांतील सत्य तुह्मांस जाणवतें. ख्रिस्त आणि बुद्ध यांचीं वचनें सत्य आहेत याला प्रमाण काय ? त्यांचें सत्यत्व आपल्या हृदयाला पटतें हेंच. ख्रिस्त आणि बुद्ध यांचें अस्तित्व होतें हें खरें कशावरून ? यावरूनच कीं त्यांच्या भावना आमच्या ठिकाणींही आम्हांस दिसतात. आमचें स्वतःचें ईश्वरत्व हेंच त्यांच्या ईश्वरत्वाचें प्रमाण आहे. आमच्या ठिकाणीं असलेली ईश्वरी भावना हीच ईश्वराच्या अस्तित्वाचें प्रमाण. आमच्या ठिकाणीं ही भावना नसती तर ईश्वराच्या अस्तित्वाबद्दलच्या साऱ्या गोष्टी अगदीं खोट्या असें निश्चितपणें ह्मणतां आलें असतें. तुम्ही स्वतः परमात्मरूप नसाल तर ईश्वराचें अस्तित्वही नाहींच आणि तें पुढेंही कधीं असावयाचें नाहीं. हें आपलें मूळचें रूप पुन्हां प्राप्त करून घेणें हेंच आपलें ध्येय आहे असें वेदान्तशास्त्र सांगतें. आपणांपैकीं प्रत्येक जण परमात्मरूप आहेच आणि तो कधीं तरी स्पष्ट दशेलाही अवश्य येईल. आपण परमात्मरूप आहों हें प्रथम जाणून घ्या. अमुक गोष्ट करणें आपणांस अशक्य आहे असें चित्तांत कधींही येऊं देऊं नका. असें मनांत येणें यासारखें दुसरें मोठें पातक कोणतेंच नाहीं. जगांत कांहीं पाप ह्मणून असेल तर असें वाटणें हेंच. मी दुबळा आहें अथवा दुसरा अमुक दुबळा आहे असें चिंतन करणें हेंच पाप. यावांचून पापाला अस्तित्व नाहीं.

१७

# व्यावहारिक वेदान्त.

## (द्वितीय पाद)

छांदोग्य उपनिषदांतील एक प्राचीन कथा मी आज तुम्हांस सांगणार आहें; एका मुलाला ज्ञानप्राप्ति कशी झाली हें या कथेवरून तुमच्या लक्ष्यांत येईल. गोष्ट सांगण्याची तऱ्हा कांहीं अंशीं जुनाट आणि बोबडी अशी आहे, तथापि तिच्या पोटीं एक तत्त्व आहे व तेंच आपणांस मुद्याचें आहे. एके दिवशीं एक तरुण कुमार आपल्या आईला म्हणाला "आई, मला वेदाध्ययन करावयाचें आहे. तर माझा वर्ण कोणता आणि माझ्या पित्याचें नांव काय हें मला सांग." त्या स्त्रीचें लग्न झालेलें नव्हतें; आणि अविवाहित स्त्रीच्या पोटीं झालेल्या पुत्राला जात नाहीं असा निर्बंध हिंदुस्थानांत आहे. तसेंच निश्चित वर्णाच्या अभावीं वेदाध्ययनाचा अधिकारही त्याला नसतो. मुलाचा प्रश्न ऐकून ती गरीब बिचारी आई म्हणाली, "बाळा तुझ्या बापाचा वर्ण, त्याचें कुल अथवा त्याचें नांव यांपैकीं एकही मला ठाऊक नाहीं. मी पुष्कळ ठिकाणीं सेवाधर्म केला आहे. माझें नांव जाबाला व तुझें नांव सत्यकाम एवढें मात्र मला माहीत आहे." आईचें हें उत्तर ऐकून मुलगा उठला व तसाच एका ऋषीकडे जाऊन म्हणाला "गुरो, मला वेदाध्ययन करावयाचें आहे, तर आपल्या शिष्यगणांत मला घ्यावें." ऋषींनीं विचारलें "मुला, तुझा वर्ण कोणता आणि तुझ्या बापाचें नांव काय?" आईनें सांगितलेली सारी हकीगत मुलानें तशीच ऋषींना सांगितली. ती ऐकून घेऊन ऋषि म्हणाले "ब्राह्मणावांचून इतकें कटु सत्य कोणीही उच्चारणार नाहीं. स्वतःची अपकीर्ति स्वमुखानें दुसरा कोणीही सांगावयाचा नाहीं. याकरितां तूं ब्राह्मणच असला पाहिजेस. मी तुला वेद पढवीन; कारण तूं सत्यभ्रष्ट झालेला नाहींस." असें ह्मणून ऋषींनीं त्याला आपल्या घरीं ठेवून घेतलें आणि त्याजकडून अध्ययन करविलें.

हिंदुस्थानांतील प्राचीन शिक्षणपद्धति कशा प्रकारची होती हें येथें पाहण्यासारखें आहे. ऋषींनीं चारशें हाडकुळ्या व दुबळ्या गाई सत्यकामाच्या स्वाधीन केल्या व त्यांना चरावयास रानांत नेण्याची आज्ञा त्यांनीं त्याला केली. आज्ञेप्रमाणें सत्यकाम रानांत गेला व तेथेंच कांहीं दिवस त्यानें घालविले. गाईंचें खिल्लार एक हजारांचें होईपर्यंत रानांत रहा अशी ऋषींची आज्ञा होती. कांहीं वर्षे गेल्यानंतर एके दिवशीं एक तरणा खोंड सत्यकामाला म्हणाला " आह्मी आतां एक हजार झालों आहों तर तूं आतां आह्मांस घरीं घेऊन चल. मी तुला थोडेंसें ब्रह्मज्ञान सांगतों." सत्यकाम म्हणाला, "ठीक आहे महाराज, आपण बोलावें; मी श्रवण करतों." तेव्हां तो बलीवर्द ह्मणाला " पूर्व हा एक परमात्म्याचा भाग आहे, तसाच पश्चिम, आणि तसाच दक्षिण व उत्तर हाही परमात्म्याचाच भाग होय. चार दिशा ब्रह्माचे चार भाग होत. अग्निही तुला ब्रह्मज्ञान शिकवील. " यज्ञयागादि कर्मांत अग्निदेवता प्रमुख असल्यामुळें आणि त्या काळीं यज्ञांचें प्राबल्य असल्यामुळें अग्नि ही देवता मोठ्या महत्वाची मानली जात होती. प्रत्येक शिष्याला अग्नीची उपासना व यज्ञ करावा लागत असे. यानंतर दुसरे दिवशीं सत्यकाम गुरुगृहीं जावयास निघाला. सायंकाळीं संध्यावंदनादि कर्म झाल्यावर तो अग्निकुंडासन्निध बसला असतां अग्नींतून वाणी झाली, " हे सत्यकामा, तुला ब्रह्मज्ञान सांगण्यासाठीं मी आलों आहें. ही पृथ्वी त्या ब्रह्माचा अंश आहे. आकाशही त्याच ब्रह्माचा अंश, तसेंच महासागरही ब्रह्माचाच भाग आहे." इतकें बोलून अग्नीनें सत्यकामाला एका पक्ष्याकडे जावयास सांगितलें. सत्यकाम आपली वाट पुढें चालूं लागला. सायंकाळचें धर्मकर्म संपल्यावर एक हंस तेथें येऊन ह्मणाला, " सत्यकामा, ज्या अग्निदेवतेची पूजा तूं करतोस ती देवता ब्रह्माचा अंश आहे. त्याचप्रमाणें सूर्य, चंद्र आणि विद्युत् हींसुद्धां ब्रह्माचेच अंश होत. आतां मद्गु पक्षी तुला याहून अधिक ज्ञान सांगेल. " दुसरे दिवशीं सायंकाळीं तो पक्षी येऊन म्हणाला, "सत्यकामा तुला थोडेंसें ब्रह्मज्ञान सांगतों तें श्रवण कर. श्वासोच्छ्वास, श्रवण आणि मन हे ब्रह्माचेच अंश होत." यथाकाळीं सत्यकाम गुरुगृहीं पोंहोंचला, आणि त्यानें आदरानें गुरूचें पादवंदन केलें. गुरूंनीं त्याजकडे अवलोकन करून ह्मटलें " सत्यकामा, तुझ्या मुखावर ब्रह्मज्ञानाचें तेज झळकत आहे. तुला हें ज्ञान कोणीं

सांगितलें ? " सत्यकाम म्हणाला, "हें ज्ञान देवतांनीं मला दिलें; गुरो, आपण हें ज्ञान मला शिकवावें अशी माझी इच्छा आहे. कारण गुरूपदिष्ट ज्ञानावांचून परमार्थसाधन होत नाहीं असें मीं ऐकलें आहे. " सत्यकामाची ज्ञानजिज्ञासा जाणून गुरूंनींही सर्व ज्ञान त्याला सांगितलें. जें जाणलें असतां जाणावयाचें असें कांहींच शिल्लक उरत नाहीं असें ज्ञान गुरूंनीं त्याला सांगितलें.

आतां वरील गोष्टींत बैल, अग्नि आणि पक्षी यांनीं ज्ञान सांगितल्याचा जो उल्लेख आहे तो लाक्षणिक आहे. त्यांतील शब्द वजा करून खऱ्या तात्पर्याकडे आपण पाहिलें तर त्यावरून त्या काळीं विचारांची दिशा काय होती हें आपल्या लक्ष्यांत येतें. हे सर्व ज्ञानध्वनि आपल्याच अंतरंगांत आहेत, या प्रचंड सिद्धांताचें बीज या हकीगतींत दिसून येतें. सत्यवस्तूचा प्रकाश जों जों अधिक प्रमाणावर आपणांस प्राप्त होतो तों तों हे उद्गार आपल्या अंतः-करणाचेच आहेत असें आपणांस कळून येतें. आपणांस ऐकूं येत असलेले उद्गार सत्य आहेत हें सत्यकामाला समजलें; तथापि हे उद्गार आपल्याच अंतरंगाचे आहेत, हें त्याला समजलें नव्हतें. हें ज्ञान आपणांस बाह्य देवतांनीं सांगितलें असें तो म्हणाला ही त्याची समजूत चुकीची होती. हें ज्ञान अंतर्गत नसून बाह्य जगांतून आलें असे जें सत्यकामाला वाटलें तें चुकीचे होतें. असो. आतां वरील गोष्टींत आणखीही एक मुद्दा आहे. ब्रह्मज्ञान आणि व्यवहार यांची सांगड घालण्याचा यत्न वरील गोष्टींत दिसतो. धर्मज्ञानाला व्यवहारांत कसें आणतां येईल हा विचार अगदीं प्राचीन कालापासून मानवी मनांत उद्भूत झाला आहे, आणि हें ज्ञान दिवसेंदिवस अधिक प्रमाणावर व्यवहारांत कसें येतें हें यासारख्या कथांवरून आपल्या लक्ष्यांत येतें. चालू व्यवहारांत ज्या गोष्टी नजरेस पडतात त्यांच्याच द्वारें शिष्याला ज्ञानदान केलें जात असे.

यानंतर सत्यकामाचा शिष्य उपकोशल कमलायन याची कथा सांगितली आहे. उपकोशल हा सत्यकामाच्या घरीं राहात होता. एके प्रसंगीं सत्यकाम प्रवासास गेला असतां उपकोशल उद्विग्नचित्त झाला. त्याला कांहीं खाणें-पिणेंही सुचेना. तुझी अशी स्थिति कां झाली असा प्रश्न गुरुपत्नीनें त्याला केला असतां तो म्हणाला, "मला अत्यंत दुःख होत असल्यामुळें माझ्यानें तें खाववत नाहीं. " इतक्यांत अग्निकुंडांतून ध्वनि निघाला, " हें जीवित

ब्रह्ममय आहे. ब्रह्म आकाश आहे आणि ब्रह्म आनंद आहे. ब्रह्म जाण.'' त्या शिष्यानें उत्तर दिलें, 'महाराज, जीवित ब्रह्म आहे हें मला ठाऊक आहे; पण तें आकाश आहे आणि आनंद आहे हें मला माहित नाहीं.' अग्नींतूत पुन्हां ध्वनि झाला, ''आकाश आणि आनंद हे शब्द दोन असले तरी अर्थ एकच आहे. आणि यांचीच जाणीव शुद्ध बुद्धिरूपानें अंतःकरणांत राहते.'' अशा रीतीनें आकाश व आनंद यांचा वास अंतःकरणांत कसा आहे याचें ज्ञान त्या शिष्याला झालें. अग्नींतून पुन्हां ध्वनि झाला. '' ही पृथ्वी, अन्न, अग्नि आणि तूं ज्याचें पूजन करतोस तो अग्नि हीं सारीं ब्रह्माचींच गुप्त रूपें आहेत. सूर्यांतील जो द्रष्टा तो मी हें जाणून जो त्या ब्रह्मरूपाचें ध्यान करतो त्याचीं सर्व पापें नष्ट होतात आणि तो दीर्घायु होऊन सुखी राहतो. दिशा, चंद्र, तारे आणि पाणी यांच्या ठिकाणीं जें अस्तित्वरूप आहे तें मीं. या जीविताच्या ठिकाणीं, आकाशाच्या ठिकाणीं आणि विजेंत जी प्रतिभा आहे ती मी.''

या गोष्टींतही धर्मतत्त्वांच्या व्यावहारिक स्वरूपाचें दर्शन आपणास होतें. रोज नजरेस पडणाऱ्या अग्निसूर्यचंद्रादि पदार्थांच्या द्वारें उच्चज्ञान कसें शिकविलें जात असे व कथांच्या रूपानें सामान्य गोष्टींतूनही उच्च तत्त्वें कशीं काढलीं जात हेंही पाहाण्यासारखें आहे. वेदांताचें शुद्ध व्यावहारिक रूप तें हेंच. जग नाहींच असें ह्मणून वेदांत त्याचा नाश करीत नाहीं तर जगाचें वास्तविकरूप काय आहे याचें स्पष्टीकरण वेदांतानें केलें आहे. व्यक्तिविशिष्टत्व समूळ नाहींसें करण्याचा यत्न न करतां व्यक्ति ह्मणजे काय हे वेदांतानें सांगितलें आहे. दृश्य आणि जडव्यक्तीच्या मागें खरी व्यक्ति कोणती याचा खुलासा वेदांतानें केला आहे. या जगाला अस्तित्व नाहीं असें वेदांत म्हणत नाहीं. तर जगाचें खरें स्वरूप काय आहे हें लक्ष्यांत घ्या आणि त्याच्या पाशांत सांपडूं नका असें वेदान्ताचें म्हणणें आहे. सूर्य, चंद्र, अग्नि, विद्युत् अथवा इतर पदार्थ यांना अस्तित्वच नाहीं असें वेदांताचें म्हणणें नसून या पदार्थांच्या ठिकाणीं जें सत्यरूप आहे तेंच मनुष्याच्या ठिकाणींही आहे असें वेदान्तानें सांगितलें आहे. अशा रीतीनें पूर्वीचा दृष्टिकोण बदलून नवी दृष्टि सत्यकामाला प्राप्त झाली. त्याच्या डोळ्यांना जो अग्नि पूर्वी जडवत् दिसत होता आणि हविर्भाग घेणें इतकेंच ज्या अग्नीचे काम त्याला पूर्वी

वाटत होतें तोच अग्नि त्याला परमात्मरूप दिसूं लागला. अशाच रीतीनें पृथ्वी, सूर्य, चंद्र, तारे, विद्युत् इत्यादि साऱ्या पदार्थांचें रूपांतर होऊन त्यांचें जडरूप गेलें व परमात्मरूप त्यांना प्राप्त झालें. सर्वत्र एकच रूप आहे हें जाणणें हें वेदान्ताचें ध्येय आहे. केवळ बाह्य आकारावर थांबून न बसतां वस्तूचें अंतरंग पाहणें हें वेदान्त धर्माचें सार आहे.

" नेत्रांतून जें तेज प्रकाशतें तें ब्रह्म आहे. तें ब्रह्म प्रकाशरूप असून सर्व विश्व त्याच्यामुळें प्रकाशतें." अशा अर्थाचें एक सूक्त उपनिषदांत आहे. मनुष्य अंतःकरणानें पवित्र झाला म्हणजे त्याच्या नेत्रांत विशेष प्रकारचें एक तेज चमकतें. हें तेज जीवात्म्याचें स्वरूप होय. हेंच तेज चंद्रसूर्यात आणि ताऱ्यांत प्रकाशतें.

जन्ममरणासंबंधीं उपनिषद्ग्रंथांचें काय म्हणणें आहे याचीही थोडीशी माहिती मी तुह्मांस आतां सांगतों. एके वेळीं श्वेतकेतु पांचाल राजाकडे गेला असतां राजानें त्याला विचारलें, " मरण पावल्यानंतर मनुष्य कोठें जातो ? तेथून परत कसा येतो ? इत्यादि गोष्टी तुह्मांला ठाऊक आहेत काय ? " हा प्रश्न ऐकून ' नाहीं ' असें उत्तर श्वेतकेतूनें दिलें आणि घरीं परत जाऊन हेंच प्रश्न त्यानें आपल्या बापाला केले. त्यालाही हें ज्ञान नव्हतें. तेव्हां हे पितापुत्र पांचाल राजाकडे गेले. राजानें त्यांना ह्मटलें, ब्राह्मणांना या गोष्टींचें ज्ञान नाहीं. हें ज्ञान फक्त राजांना असल्यामुळेंच जगाचें आधिपत्य त्यांच्याकडे आलें आहे. पुढें हे पितापुत्र बरेच दिवस पांचाल राजाकडे राहिले असतां एके दिवशीं राजा त्यांना म्हणाला, 'सूर्य हा अग्नींत जळणाऱ्या काष्ठासारखा आहे. त्याचे किरण हे धूम्ररूप आहेत. दिवस ही त्या अग्नीची शिखा होय. चंद्र हा निखारा आहे; आणि तारे त्याच्या ठिणग्या आहेत. या अग्नींत श्रद्धेचा होम देव करतात आणि त्यांतून सोम उत्पन्न होतो.' अशा रीतीनें अनेक प्रकारच्या दृष्टातांनीं पांचाल राजानें अनेक प्रकारचें ज्ञान या पिता-पुत्रांना सांगून अखेरीस ह्मटलें, ' लहानशा कुंडांत लहानसा अग्नि पेटवून त्यांत हविर्भाग देण्याचें कारण नाहीं. सारें विश्व अग्निरूप आहे आणि तेथें हें अग्निपूजन अखंड चालू आहे. या प्रचंड अग्नीची पूजा देवदेवता आणि व्यक्तिमात्र करीत आहे. मनुष्याचा देहसुद्धां या अग्नीचेंच एक कुंड आहे.' या गोष्टींतही सामान्य वस्तूंत ब्रह्मरूप पाहणें हेंच अखेरचें साध्य असल्याचें

आढळून येतें. त्याचप्रमाणें मनुष्यानें आपल्या बुद्धीनें ईश्वरपूजनासाठीं नव्या प्रतिमा आणि चिन्हें निर्माण करण्याचें कारण नाहीं हेंही या गोष्टींत सूचित केलें आहे. परमेश्वराच्या पूजेसाठीं देऊळ बांधण्याचें कारण नाहीं. कारण, कितीही चांगलें देऊळ तुह्मी बांधलें तरी मनुष्याचें देहरूप देऊळ त्याहून अधिक श्रेष्ठ आहे.

श्रुतिग्रंथांत कर्मकांड आणि ज्ञानकांड असे दोन भाग असल्याचें तुम्हांस ठाऊक असेलच. कालेंकरून यज्ञयागादि क्रियाकलाप इतका वाढला आणि इतका घोंटाळ्याचा झाला कीं त्यांत कांहीं सूत्रबद्धताही राहिली नाहीं. पुढें उपनिषद्कालीं कर्मकांड आणि ज्ञानकांड हीं पूर्णपणें वेगळीं झालीं. उपनिषद्ग्रंथांत कर्मकांडाचा उल्लेख बहुधा नाहींच असें म्हटलें तरी चालेल. उपनिषद्ग्रंथांच्या पूर्वींच्या काळीं यज्ञयागादि कर्मांचा प्रघात मोठ्या जोरांत होता. त्यानंतर तत्त्वज्ञानाचा काळ आला. लहानसा अग्नि, लहानसें कुंड, लहानसें देऊळ हीं सारीं नाहींशीं होऊन त्यांच्या जागीं विश्व हें एकच प्रचंड देवालय स्थापन झालें. परमेश्वरपूजनासाठीं विशिष्ट स्थलाची, विशिष्ट कालाची अथवा विशिष्ट हविर्द्रव्यांची अपेक्षा तत्त्ववेत्त्यांनीं ठेविली नाहीं. मातीचें स्थंडिल नाहींसें करून चैतन्यमय मनुष्यदेह हाच जिवंत स्थंडिल त्यांनीं तेथें स्थापित केला. जड हविर्द्रव्यांनीं केलेल्या पूजनापेक्षां मनोमय पूजन अधिक श्रेष्ठ आहे असें त्यांनीं सिद्ध केलें

आतां येथें एका विशिष्ट मताचा उल्लेख करणें जरूर आहे. या मताचा उलगडा मला स्वतःलाही चांगलासा झालेला नाहीं; तथापि तें उपलब्ध आहे तसेंच मी तुह्मांला सांगतों. मनुष्य मृत झाला म्हणजे ध्यानानें आणि ज्ञानानें तो पवित्र झाला असेल तर तो प्रथम प्रकाशांत जातो. प्रकाशांतून तो दिवसाकडे जातो. तेथून पुढें अर्धचंद्रप्रकाशांत त्याचा प्रवेश होतो. तेथून तो उत्तरायणांत जातो. उत्तरायणांतून वर्षांत आणि वर्षांतून तो सूर्याकडे व सूर्यांतून चंद्राकडे जातो. चंद्रांतून तो विद्युल्लोकीं गमन करतो. तेथें एक मार्गदर्शक त्याला भेटतो आणि तो त्याला ब्रह्मलोकीं घेऊन जातो. या सगळ्या मार्गाला देवयान असें म्हणतात. सत्पुरुष जेव्हां मरण पावतात तेव्हां याच मार्गानें ते जातात आणि त्यांची पुनरावृत्ति केव्हांही होत नाहीं. या मार्गाचें चांगलेंसें स्पष्टीकरण कोणासही करतां येत नाहीं. त्याचा अर्थ जो तो

आपापल्या परी सांगतो. आणि हा निव्वळ मूर्खपणा आहे असेंही कित्येक म्हणतात. चंद्रलोक, सूर्यलोक अथवा विद्युल्लोक म्हणजे काय? याचा उलगडा कोणासही करतां येत नाहीं. चंद्रावर वस्ति आहे असा हिंदु लोकांचा समज आहे. ज्यांनीं या जीवितांत सत्कर्मे केलीं असतील तथापि ज्ञानप्राप्ति ज्यांना झाली नसेल असे लोक मरण पावल्यानंतर चंद्रलोकी जातात व तेथें अन्न-रूपानें ते राहतात. त्यानंतर ते देव होऊन पुण्य क्षीण होईपर्यंत अनेक भोग भोगतात. पुण्यकर्मांचा क्षय झाल्यानंतर ते मृत्युलोकीं पुन्हां जन्म पावतात. प्रथम त्यांचें रूपांतर आकाशांत होतें; ह्या आकाशाचा वायु होतो, वायूचा धूम्र होतो, धूम्राचें धुकें होतें, धुक्याचे ढग बनतात आणि पर्जन्यरूपानें हे जीव पृथ्वीवर पतन पावतात. मग त्यांचा प्रवेश अन्नांत होतो व हें अन्न मनुष्यांनीं भक्षण केल्यानंतर हे जीव मनुष्याच्या उदरांत प्रवेश करतात व पुढें मुलांच्या रूपानें जन्मास येतात. सत्कर्मे ज्यांनीं आचरिलीं असतील त्यांचा जन्म सत्कुलांत होतो आणि वाईट कर्म करणारांचा जन्म दुष्ट कुलांत होतो अथवा त्यांचीं कर्मे फारच वाईट असलीं तर त्या जीवांना पशुदेहही प्राप्त होतो. अशा रीतीनें जीवमात्राची उत्क्रांति व अपक्रांति एकसारखी चालू असल्यामुळें पृथ्वी कधीं संपूर्ण भरतही नाहीं व कधीं रिकामीही होत नाहीं.

या साऱ्या हकीकतीतून अनेक प्रकारच्या कल्पना निघण्यासारख्या आहेत. कदाचित् पुढेंमागें या मताचा उलगडाही होईल; तथापि आपणास उपयुक्त असा भाग त्यांत कितीसा आहे, याचा विचार आज करण्यास कांहीं हरकत नाहीं. स्वर्गादि कोणत्याही लोकीं मनुष्यप्राणी गेला तथापि ब्रह्मानुभ-वाच्या अभावीं मृत्युलोकीं त्याला परत जावें लागतें हा भाग या हकीकतीत महत्वाचा आहे. आत्मनुभव होईपर्यंत चिरकालीन आनंदाची प्राप्ति होणें शक्य नाहीं हा मुद्दा महत्वाचा आहे. या लोकीं ज्यांनीं सत्कर्मे आचरिलीं असतील तथापि ज्यांना आत्मानुभव नसेल अशीं मनुष्यें देवलोकीं जाऊन देवदेह धारण करतात व पुण्यक्षयापर्यंत तेथें राहतात. त्यांना दिव्य देहाची प्राप्ति झाली असली तरीही चिरकाल सुखाची प्राप्ति त्यांना होत नाहीं व त्यांच्या येरझारा संपत नाहींत, हा दुसरा महत्वाचा मुद्दा लक्ष्यांत ठेवण्या-सारखा आहे. ज्याला ज्याला नाम आणि रूप हीं आहेत तें सारें क्षणभंगुर आहे, हा वेदांताचा मुख्य आधारभूत सिद्धांत आपणास ठाऊक असेलच.

पृथ्वीला नाम आणि रूप हीं असल्यामुळें ती जशी क्षणभंगुर आहे, तसाच स्वर्गलोकही क्षणभंगुर असला पाहिजे. कारण त्यालाही नाम आणि रूप हीं आहेतच. चिरंतन टिकणारा स्वर्गलोक अस्तित्वांत असणें स्वभावतःच अशक्य आहे; कारण ज्याला नाम आणि रूप हीं आहेत त्यांचा आरंभ कोणत्यातरी कालीं झाला असला पाहिजे. ज्याला आरंभ आहे, त्याला मध्य आणि अवसान हीं असलीं पाहिजेतच. यामुळें चिरंतन टिकाऊ असा कोणताही लोक अस्तित्वांत असणें शक्य नाहीं. वेदांतशास्त्राचे हे ठरींव सिद्धांत आहेत. यामुळें स्वर्गादि कोणत्याही लोकांची किंमत वेदांतशास्त्रानें ठेवलेली नाहीं.

ख्रिस्ती आणि महंमदी धर्मात चिरकाल टिकाऊ अशा स्वर्गलोकाची कल्पना आहे. हीच कल्पना संहिताग्रंथांत आढळते. ही कल्पना मुसलमानांनीं अधिक स्पष्ट करून तिला अधिक जडरूप दिलें आहे. त्यांच्या स्वर्गलोकांत मोठमोठे बागबगीचे असून त्यांत नद्यांचेंही वैपुल्य आहे. अरबस्थानांत पाण्याचें दुर्भिक्ष असल्यामुळें स्वर्गलोकांत पाणी पुष्कळ असलें पाहिजे ही कल्पना ओघानेंच प्राप्त होते. जें सुख इहलोकीं मिळत नाहीं त्याचें वैपुल्य परलोकीं तरी मिळावें ही आशा मनुष्यस्वभावाला सुसंगतच आहे. वर्षातून सहा महिने पाऊस पडतो अशा ठिकाणीं माझा जन्म झाला. यामुळें माझी स्वर्गाची कल्पना म्हणजे अगदीं कोरड्या स्थलाची कल्पना होईल, हें उघड आहे. इंग्लंडांतही सदोदित पाऊस पडत असल्यामुळें त्यांचा स्वर्गही माझ्या स्वर्गासारखाच होईल. संहिता ग्रंथांत सांगितलेल्या स्वर्गांतल्या रहिवाश्यांना दिव्य देह असून तेथें त्यांच्या पूर्वजांशीं त्यांची भेट होते आणि तेथें चिरंतन सुखाचा उपभोग ते घेत असतात. त्या ठिकाणीं त्यांचे मृत आईबाप, मुलें आणि स्नेहीसंबंधी त्यांना भेटतात व तेथला त्यांचा आयुष्यक्रम येथल्यासारखाच असतो. फरक इतकाच कीं येथें त्यांना दुःख होतें. या आयुष्यांत सुखाच्या मार्गात ज्या अडचणी येतात त्या तेथें येत नाहींत. आणि येथील फक्त सुखोपभोग मात्र तेथें शिल्लक राहतात. अशा प्रकारची परिस्थिति मनुष्याला कितीही सोईची वाटत असली तरी सत्य हें वेगळें आणि सोय वेगळी. सत्य हें सुखाचें व सोईचें नसतें असा अनुभव पुष्कळ वेळां आपणास येतो. मनुष्यस्वभाव विलक्षण हट्टी आहे. आपण कांहीं तरी गोष्ट करावी आणि मग तिलाच चिकटून बसावें असा त्याचा

स्वभाव आहे. एक वेळ केलेली गोष्ट होतां होईतों सोडावयाची नाहीं हा मनुष्याच्या स्वभावाचा धर्म आहे. यामुळे नव्या विचारांचें ग्रहणही मनुष्याचें मन सहसा करीत नाहीं. जुन्याचा त्याग व नव्याचें ग्रहण या गोष्टी त्याला सोईच्या वाटत नाहींत.

या चालू मार्गाचा त्याग करून अगदीं नव्या मार्गाचा शोध उपनिषद्-ग्रंथांनीं केला. देवांचें निवासस्थान जो स्वर्ग लोक त्याला नाम आणि रूप हीं असल्यामुळें तो चिरंतन स्वरूपाचा नाहीं व त्याचाही केव्हां तरी नाश झालाच पाहिजे हें उपनिषदांनीं स्पष्टपणें सांगितलें. साकार स्वर्गलोक कालेंकरून अवश्य नाश पावेल. हा लोक कोट्यवधि वर्षें राहिला तरी त्याच्या विनाशाचा काल केव्हां तरी आलाच पाहिजे. स्वर्गलोक नष्ट झाल्यानंतर तेथील जीवांनीं मृत्युलोकीं पुन्हां परत यावें हें ओघालाच आलें. यामुळें स्वर्गादि लोक हे केवळ भोगलोक असून सत्कर्माच्या क्षयानंतर तेथील जीवांना मृत्युलोकीं पुन्हां जन्म घ्यावा लागतो, हा सिद्धांत उपनिषदांनीं स्थापित केला. यावरून कार्यकारणभावाची कल्पना त्या काळींही मनुष्यजातीला होती, हें उघड दिसतें. यानंतरच्या काळीं हाच सिद्धांत उत्तम प्रकारच्या तत्त्वज्ञानाच्या व तर्कशास्त्राच्या रेखीव भाषेनें सजला. त्यानें उपनिषद्कालांतील आपलें बालरूप टाकलें व पुढें पूर्ण तारुण्यांत त्यानें प्रवेश केला. हे ग्रंथ वाचतांना जी एक गोष्ट ध्यानांत ठेवायाची ती ही कीं हे सिद्धांत अंतर्निरीक्षणानें प्राप्त झालेले आहेत. हे सिद्धांत व्यवहार्य करतां येतील कीं नाहीं असा प्रश्न तुह्मीं मला केला तर त्याचें एकच उत्तर मला देतां येईल. तें हें कीं हे सिद्धांत प्रथम व्यवहारांत आले आणि नंतर रेखीव तत्त्वज्ञानाचें रूप त्यांना प्राप्त झालें. प्रथम ऋषींनीं या सिद्धांतांचें निरीक्षण केलें, त्यांचा प्रत्यक्ष अनुभव त्यांनीं घेतला आणि नंतर त्यांनीं ते लिहून काढले. सारें जग या मंत्रद्रष्ट्या ऋषींशीं बोलत होतें. पक्षी, पशु, सूर्य आणि चंद्र इत्यादि अखिल वस्तुजात त्यांच्याशीं संभाषण करीत होतें. सर्व वस्तूंचें अंतरंग त्यांनीं अवलोकन केलें आणि अशा रीतीनें थेट सृष्टीच्या अंतःकरणांत त्यांनीं प्रवेश केला. तर्कशास्त्राच्या कोटया लढवून अथवा दोन आणि दोन एकत्र करून या सिद्धांतापर्यंत ते पोहोंचले नाहींत. आपल्या व दुसऱ्यांच्या मेंदूला शीण देऊन भाराभर ग्रंथ अर्वाचीन काळाप्रमाणें त्यांनीं

लिहिले नाहींत अथवा दुसऱ्यांचीं पुस्तकें घेऊन माझ्याप्रमाणें लांब लांब व्याख्यानेंही त्यांनीं झोडलीं नाहींत. अत्यंत शांतपणें सर्व वस्तूंचें अंतरंग त्यांनीं तपासलें व अशा रीतीनें सत्य आपल्या हस्तगत करून घेतलें. अभ्यास हाच त्यांचा मोठा उद्योग. तत्त्वशोधनार्थ त्यांनीं दीर्घकाळ अभ्यास केला आणि हें असें असलेंच पाहिजे. अभ्यासावांचून वस्तूचें अंतरंग कोणासही प्राप्त व्हावयाचें नाहीं. धर्म हें नेहमींच अभ्यासाचें व व्यवहाराचें शास्त्र आहे. परमेश्वरविषयक गोष्टींचा कोरडा ऊहापोह धर्म कधींही करीत नाहीं. असा कोरडा धर्म पूर्वी अस्तित्वांत नव्हता, हल्लीं नाहीं आणि पुढें कधीं येणारही नाहीं. अभ्यास प्रथम आणि ज्ञान नंतर असा धर्मशास्त्राचा अनुक्रम आहे. नुसतें शाब्दिक ज्ञान प्रथम आणि व्यवहार व अभ्यास मुळींच नाहीं हा क्रम धर्मशास्त्राला संमत नाहीं.

जीवात्म्याला पुनरावृत्ति आहे हा सिद्धांत मागें सांगितलेल्या हकिकतींत आलाच आहे. जीं मनुष्यें फलहेतूनें सत्कर्में करितात त्यांना त्या हेतूप्रमाणें फलप्राप्ति होते; पण हें फल चिरकाल रूपाचें नसतें. या ठिकाणीं कार्य आणि कारण यांचे संबंध कसे नियत झाले आहेत हें फार सुंदर रीतीनें दाखविलें आहे. कारणाचें जें स्वरूप तेंच कार्याचें असावयाचें हा सिद्धांत येथें स्पष्ट केला आहे. ज्या गुणधर्मांचें कारण असेल त्याच गुणधर्मांचें कार्य असावयाचें. कारण मर्यादित रूपाचें असेल तर कार्यही मर्यादितच असावयाचें. कारण अनंतरूप असेल तर कार्यही चिरकाल स्वरूपाचें होईल. याकरितां सत्कर्में आचरणें व इतर गोष्टी करणें हीं कारणें मर्यादित रूपाचीं असल्यामुळें त्यांतून निघणारीं कार्यें अमर्याद आणि अनंतरूपाचीं असणें शक्य नाहीं.

आतां या प्रश्नाच्या आणखी एका बाजूचा विचार आपण करूं. ज्याप्रमाणें स्वर्गादि लोक चिरकालस्वरूपाचे असणें शक्य नाहीं त्याप्रमाणें नरकलोकही चिरकाल असणें शक्य नाहीं. मी अत्यंत दुष्ट मनुष्य असून माझ्या आयुष्याच्या प्रत्येक क्षणीं दुष्कर्मांचें आचरण मी करीत आहें अशी कल्पना करा. अशा स्थितींतही या जगांतल्या माझ्या साऱ्या आयुष्याची तुलना माझ्या अनंतरूपाशीं केली तर हें आयुष्य हिशेबांतही यावयाचें नाहीं इतकें थोडें भरेल. या आयुष्यांत केलेल्या पापकर्मांबद्दल मला अनंत काळ शिक्षा व्हावी असें झालें तर मर्यादित कारणांतून अमर्याद कार्य निर्माण झालें असें होईल

आणि ही गोष्ट तर सर्वथा अशक्य आहे. माझ्या साऱ्या आयुष्यभर सत्कर्में मीं आचरिलीं तरी चिरकाल टिकणाऱ्या स्वर्गाची प्राप्ति मला होणें शक्य नाहीं. कारण, या विचारसरणींतही पूर्वीचीच चूक आहे; तथापि या दोहों-वांचून तिसराही आणखी एक मार्ग मोकळा आहे. हा मार्ग ब्रह्मज्ञानाचा होय. ज्यांना ब्रह्मानुभव झाला आहे आणि जे स्वतः सत्यवस्तु बनले आहेत त्यांचा हा मार्ग होय. आत्मानुभव होणें हाच मायेच्या पलीकडे जाण्याचा मार्ग आहे. आत्मानुभव म्हणजे काय याचें दिग्दर्शन उपनिषदांनीं केलें आहे.

चांगलें आणि वाईट या द्वंद्वाच्या पलीकडे जाणें आणि अखिल दृश्यजात आत्मगत आहे हें ओळखणें याचें नांव आत्मानुभव. आत्मा प्रत्येक वस्तूंत पाहणें, विश्वांत दिसणारी विविधता लक्ष्यांत न घेणें, स्वर्गात आणि नरकांत एकच परमात्मा पाहणें, मृत्यूंत आणि जीवितांत त्याचाच वास ओळखणें म्हणजेच आत्मानुभव घेणें होय. पृथ्वी जशी परमात्म्याचें चिन्ह आहे त्याच-प्रमाणें आकाशही परमात्म्याचें दृश्य चिन्ह आहे. ब्रह्मावांचून मोकळी अशी यत्किंचितही जागा कोठें नाहीं. '**सर्वं खल्विदं ब्रह्म**' या महावाक्याचा प्रत्यक्ष अनुभव घेणें हेंच आपलें कर्तव्य आहे. यासंबंधीं नुसतें बोलणें अथवा नुसता विचार करणें इतक्यानेंच आपला कार्यभाग संपत नाहीं. ज्या जीवात्म्याला '**सर्वं खल्विदं ब्रह्म**' असा अनुभव आला असेल त्याला स्वर्ग आणि नरक हे सारखेच वाटणार हें अगदीं उघड आहे. असा जीवात्मा पृथ्वीवर अथवा स्वर्गात कोठेंही जन्मास आला तरी त्याची क्षिति त्याला काय वाटणार? स्वर्ग आणि नरक या शब्दांना त्याच्या दृष्टीनें अर्थच नाहींसा होतो. कारण, ज्या ठिकाणीं परमात्म्याचा वास नाहीं असा रिता ठाव त्याला कोठेंही आढळत नाहीं. त्याच्या दृष्टीनें प्रत्येक स्थल पवित्र असतें. स्वर्गात अथवा नरकांत एकाच परमात्म्याचा वास तो पाहतो. चांगलें आणि वाईट, मृत्यु आणि जीवित हीं द्वंद्वें त्याच्या दृष्टीनें नाहींशीं होऊन '**अहं ब्रह्मास्मि**' इतकेंच तो म्हणतो.

असा अनुभव ज्याला येतो तो मुक्त होतो असें वेदांत सांगतो. असाच मनुष्य या जगांत राहण्यास योग्य आहे असें वेदांताचें मत आहे. ज्या मनुष्याला जग वाईट दिसतें तो त्यांत राहणार तरी कसा? त्याचें आयुष्य केवळ दुःखांत जाणार हें उघड आहे. हें जग दुःखांनीं, भीतीच्या स्थलांनीं

भरलें असून याची अखेर केवळ मृत्यूनें होते असें ज्याला वाटतें, त्याचा आयुष्यक्रम म्हणजे अनंत दुःखांची एक शृंखलाच होय. "या जगांत सुख भरलें असून माझा चालू आयुष्यक्रम आनंदमय आहे असें जो म्हणतो तोच या जगांत राहूं शकेल. ज्याची सत्याशीं प्रत्यक्ष भेट झाली असेल व प्रत्येक वस्तु सद्रूप आहे असें ज्याला वाटत असेल तोच येथें राहूं शकेल. जातां जातां आणखीही एका गोष्टीचा उल्लेख येथें केला पाहिजे. श्रुतिग्रंथांत नरक या शब्दाचा उल्लेख कोठेंही नाहीं. हा शब्द पौराणिक कालीं उत्पन्न झाला असून त्याचा उल्लेख त्या व त्यानंतरच्या कालांत आढळतो. श्रुतिग्रंथांप्रमाणें मनुष्यजन्माला पुन्हां परत येणें हेंच आमच्या पातकाचें मोठें शासन होय. या जगांत पुन्हां परत यावें लागावें हेंच शासन आमच्या पातकांना पुरेसें आहे. त्यासाठीं निराळ्या नरकलोकाचें कारण नाहीं. सत्कर्माबद्दल बक्षिस व दुष्कर्मा-बद्दल शिक्षा या कल्पनाच ग्राम्य आहेत. या कल्पना जड आहेत; आणि व्यक्तिरूप परमेश्वराचें अस्तित्व ज्यांना मान्य आहे त्यांनाच त्या पटतील. असा परमेश्वर वस्तुतः मानवीरूपाचाच आहे असें ह्मणावयास हरकत नाहीं; कारण एकावर प्रेम आणि दुसऱ्याचा द्वेष हा स्वभाव सामान्य मनुष्याचा आहे. याच गुणांचा वास जर परमेश्वराच्या ठिकाणीं असेल तर तोही मनु-ष्यच ह्मटला पाहिजे; आणि अशा मानवी परमेश्वराच्या ठिकाणींच सत्क-र्माचें बक्षिस आणि दुष्कर्माबद्दल शिक्षा देणें हीं कर्में संभवतील. संहिता ग्रंथांत अशा प्रकारच्या परमेश्वराचा उल्लेख आढळतो; पण उपनिषद्ग्रंथांत हा सर्व मनु बदलला आहे. देहधारी मानवी परमेश्वर नाहींसा होऊन त्याच्या जागीं शुद्ध चैतन्यमय स्वरूपाची स्थापना झाली. शुद्ध चैतन्यरूपाचे आक-लन करणें स्वभावतःच अत्यंत कठिण आहे; कारण, जडाला चिकटून बसणें हा मनुष्याचा स्वभाव आहे. मी म्हणजे देह ही कल्पना त्याच्या ठिकाणीं पक्की झालेली आहे. यामुळें देहावांचून शुद्ध निराकार चैतन्याची कल्पना त्याच्या चित्ताला सहसा होत नाहीं. स्वतःला मोठे तत्त्ववेत्ते समजणारे लोकही अशा कल्पनेनें घाबरून जातात; पण देहधारी परमेश्वराची कल्पना मला तरी इतकी उद्वेगजनक वाटते कीं माझ्या मनाला तिचा स्पर्शही सहन होत नाहीं. चैतन्यमय परमेश्वर आणि जड परमेश्वर यांत अधिक श्रेष्ठ कोण हें तुह्मीच ठरवा. ज्या परमेश्वराला कोणी पाहात नाहीं आणि कोणी जाणत नाहीं तो

मोठा कीं प्रत्येकाच्या हृदयांत वास करणारा परमेश्वर मोठा हें तुम्हींच ठरवा. चैतन्यमय परमेश्वर हा जिवंत परमेश्वर आहे. तें एक अमूर्त तत्त्व आहे. या दोन मतांत फरक आहे तो हाच कीं जडपरमेश्वर केवळ मनुष्यरूप आहे, आणि चैतन्यमय परमेश्वरही मनुष्यरूप आहे एवढेंच नव्हे तर तो देवदूत आहे, चतुष्पाद प्राणी आहे व आपल्या जड दृष्टीनें दिसूं न शकणारें असें चैतन्यही तो आहे. फार काय, पण अमुक एक स्वरूप त्याचें नव्हे असें म्हणतां येणार नाहीं.

आम्हांस जिवंत परमेश्वराचें पूजन करावयाचें आहे. माझ्या साऱ्या आयुष्यभर परमेश्वराशिवाय दुसऱ्या कोणत्याच वस्तूचें दर्शन झालेलें नाहीं. त्याचप्रमाणें तुम्हींही आपल्या साऱ्या आयुष्यभर परमेश्वराखेरीज दुसरें कांहीच पाहत नाहीं. या खुर्चीकडे तुम्ही पाहतां तेव्हां प्रथम परमेश्वराचें दर्शन तुम्हांस होतें आणि नंतर खुर्ची तुम्हांस दिसते. त्याच्याच द्वारें आणि त्याच्याच ठिकाणीं खुर्ची तुह्मांस दिसते. 'मी' आहें असे शब्द उचारीत परमेश्वर सर्वत्र उभा आहे. 'मी आहें' असें ज्या ज्या क्षणीं तुम्हांस वाटतें त्या त्या क्षणी अस्तित्वाची जाणीव तुमच्या ठिकाणीं असते. प्रत्येक वस्तूंत, प्राणिमात्रांत आणि स्वतःच्या ठिकाणीं परमेश्वर जर आह्मांस सांपडला नाही तर त्याला धुंडण्यास आह्मीं आणखी कोठें जावें ? तोच पुरुष, तोच स्त्री, तोच कन्या आणि तोच पुत्र. वयाच्या भारानें वांकून गेलेला आणि लटलटां कांपणारा वृद्ध तोच, आणि तारुण्याच्या मदांत छाती वर करून चालणारा तरुणही तोच. जें कांहीं अस्तित्व म्हणून आहे तें सर्व तोच. या साऱ्या विश्वांत सद्रूप म्हणून जर कांहीं असेल तर तें तोच होय. पडद्यामागें लपून बसणाऱ्या आणि कोणाच्याही दृष्टीस न पडणाऱ्या परमेश्वरविषयक कल्पनेची मगरमिठी ज्यांना सुटत नाहीं त्यांना उपनिषदांतील परमेश्वरविषयक कल्पना मोठी भयप्रद वाटते. ख्रिस्ती धर्माधिकारी वर्गाला तर ही कल्पना अत्यंत पापाची वाटेल यांत संशय नाहीं. "आह्मी सांगतों तें तुह्मी निमूटपणें ऐका आणि आह्मी घालून दिलेल्या मार्गानें तुह्मी डोळे मिटून चाला. तुह्मी मेलां म्हणजे या पडद्यामागील परमेश्वराचें मुख पाहण्यासाठीं एक पास आह्मी तुम्हांला देऊं," असें सांगण्याची संवय ज्या वर्गाला लागली आहे, त्याला सर्वव्यापी परमेश्वर कसा पसंत पडावा ? असल्या लोकांच्या मेंदूंतूनच स्वर्गलोक आणि नरक लोक यासारख्या शुद्ध मूर्खपणाच्या कल्पना निघाल्या आहेत. आतां

केवळ चैतन्यमय परमेश्वराची कल्पना मोठी विनाशक आहे हें खरें. भटा-भिक्षुकांचा धंदा ती साफ बुडवून टाकते. त्याचप्रमाणें चर्चें आणि देवळें यांजवर पोसल्या जाणाऱ्या अनेक लोकांवर ती वरवंटा फिरवील हेंही खरें. हिंदुस्थानांत सध्यां मोठा दुष्काळ पडला आहे; पण तेथें कित्येक देवळें अशीं आहेत कीं त्यांत असलेल्या जवाहिरानें राज्येंसुद्धां खरेदी करतां येतील. शुद्ध चैतन्मय आणि सर्वव्यापी परमेश्वराची कल्पना भिक्षुकांनीं सामान्य लोकांना शिकविली तर त्यांचा पोटाचा धंदा साफ बसेल; तथापि या वर्गाला ही कल्पना विघातक असली तरी आह्मांसारख्या ज्या लोकांना कोणताही स्वार्थ साधावयाचा नाहीं, त्यांनीं तिचा प्रसार अवश्य केला पाहिजे. या गोष्टींत भिक्षुक वर्गाचें साहाय्य आह्मांस झालें अथवा न झालें तरी हें काम आह्मी केलें पाहिजे. ज्याप्रमाणें तूं ईश्वररूप आहेस त्याचप्रमाणें मीही ईश्वररूप आहें. अशा स्थितींत कोणाची आज्ञा कोणीं ऐकावी? कोणाचें पूजन कोणीं करावें? तूं स्वतःच परमेश्वराचें देवालय आहेस. देवळांत जाऊन एखाद्या प्रतिमेचें अथवा बायबलाचें पूजन करण्यापेक्षां तुझेंच पूजन मी करीन. कित्येक लोकांच्या विचारसरणींत फार धरसोड असते. त्यांना कोठेंही पकडावयास गेलें तरी एखाद्या बुळबुळीत पदार्थासारखे आपल्या हातून निसटतात. स्वतःला ते मोठे व्यवहारी समजत असतात. ठीक आहे. तसें असले तरी एखाद्या देवळांत जाऊन एखाद्या प्रतिमेचें पूजन करण्यापेक्षां तुझेंच पूजन करणें अधिक व्यवहार्य नाहीं काय? मी तुला पाहूं शकतों, स्पर्श करूं शकतों आणि तूं सद्रूप आहेस, परमात्मरूप आहेस हें मी जाणतों, त्या अर्थी तुझेंच पूजन करणें मला अधिक व्यवहार्य दिसतें. एका अल्लाशिवाय दुसरा परमेश्वर नाहीं असें मुसलमान ह्मणतात. जो परमेश्वर नाहीं असा कोणताच प्राणी अस्तित्वांत नाहीं असें वेदांत ह्मणतो. जगांतील वस्तुमात्र ईश्वरस्वरूप आहे हा सिद्धांत ऐकून भिण्याचें कांहीं कारण नाहीं. त्याची सत्यता हळूहळू तुह्मांस पटेल. हा जिवंत परमेश्वर तुह्मांपैकीं प्रत्येकाच्या ठिकाणीं जातीनें हजर असतां तुह्मी देवळें आणि चर्चें बांधतां आणि अनेक प्रकारच्या मूर्खपणाच्या कल्पनांवर विश्वास ठेवतात. मनुष्यमात्राच्या हृदयांत असलेला जीवात्मा हाच पूजनीय परमेश्वर होय. प्रत्येक प्राणी परमेश्वराचें देऊळ आहे हें खरें तथापि मनुष्यदेह हें देऊळ सर्वांत श्रेष्ठ प्रतीचें आहे. सर्व देवळांत जणूंकाय हा

ताजमहालच होय. या देवळांत जाऊन परमेश्वराचें पूजन मला करतां आलें नाहीं तर इतर देवळांत केलेल्या पूजनाचा उपयोग मला होणार नाहीं. ज्या क्षणीं प्रत्येक शरीरांत परमेश्वर बसलेला दिसेल, प्रत्येक प्राण्यापुढें अत्यंत आदरानें हात जोडून ज्या क्षणीं मी उभा राहीन आणि सर्वत्र परमेश्वर ज्या क्षणीं मला दिसेल, त्याच क्षणीं मी पाशमुक्त होईन. मला बद्ध करणाऱ्या सर्व वस्तु नाश पावतील आणि मी पूर्ण मुक्त होईन. **‘ नम्र झाला भूतां । तेणें कोंडिलें अनंता ॥’**

पूजनाच्या सर्व विधींत हा विधि अत्यंत व्यवहार्य होय. यांत बुद्धिवादाचें कारण नाहीं आणि मोठमोठ्या उपपत्तींनीं डोकेंही फिरवावयास नको; तथापि असें असतांही हा सिद्धांत ऐकल्याबरोबर पुष्कळ लोक भीतीनें कांपूं लागतात. हा सिद्धांत चुकीचा असला पाहिजे असें ते ठांसून सांगतात. ज्या जुन्यापुराण्या प्रतिमांचें पूजन त्यांचे बापदादे करीत होते, त्यांच्या ठिकाणीं परमेश्वराचा वास असल्याबद्दल अनेक प्रकारच्या उपपत्ति ते सांगूं लागतात. प्रत्यक्ष परमेश्वरानें अमक्या तमक्याला ही मूर्ति दिली असून मी त्यांत आहें असें खुद्द त्यानेंच सांगितलें, अशा प्रकारच्या भाकडकथा ते बिनदिक्कत सांगतात आणि अशा प्रकारच्या मूर्तींचें पूजन करणें हाच खरा व्यवहार होय असें ते ह्मणतात, आणि आमचे शास्त्रसिद्ध सिद्धांत त्यांना अव्यवहार्य वाटतात. आतां ज्याला त्याला आपापल्या मार्गानें जाण्याची पूर्ण मुभा वेदांतशास्त्रानें ठेविली आहे हें खरें; तथापि मार्ग ह्मणजे अखेरचें साध्य नव्हे हें मात्र अवश्य लक्ष्यांत ठेविलें पाहिजे. मार्ग हें साध्याला पोहोंचविणारें एक साधन आहे इतकेंच. आकाशांतील परमेश्वराचें पूजन करणें अथवा प्रतिमांचें पूजन करणें या गोष्टी वाईट आहेत असें नाहीं; पण सत्याकडे जाणाऱ्या त्या पायऱ्या आहेत इतकेंच. त्या स्वतः सत्यरूप नाहींत. हे मार्गसुद्धां चांगले आणि सुंदर आहेत आणि त्यांत कित्येक उदात्त स्थलेंही आहेत; पण परमेश्वर अज्ञेय म्हणून ज्या वस्तूंचें पूजन करितात त्यांतच परमात्मतत्त्व ओळखून वेदांत त्यांचें पूजन करतो. ज्या परमेश्वराला न ओळखतां साऱ्या विश्वभर तुह्मी त्याला धुंडाळतां व ज्याचें पूजन अशा अज्ञस्थितींत तुह्मी करतां तो परमेश्वर तुह्मांबरोबर सर्व काळ आहे. त्याच्याच अधिष्ठानावर तुमची जीवितयात्रा चालू आहे. या साऱ्या विश्वाचा अनंतसाक्षी तोच आहे.

तो आहे म्हणून विश्व आहे. मी आहें या भावनेंत त्याचाच वास आहे. सर्व विश्वाचा आधार आणि त्याचें चैतन्य तोच. स्वतःच्या अस्तित्वाची जाणीव तुमच्या ठिकाणीं नसती तर सूर्यही तुम्हांस दिसला नसता. तुह्मांस सर्वत्र गडद अंधार मात्र दिसला असता. परमेश्वर प्रकाशतो म्हणूनच जग तुम्हांस दिसतें.

आतां या ठिकाणीं एक मोठा नाजुक प्रश्न उपस्थित होण्याचा संभव आहे. हा सिद्धांत सर्वत्र मान्य झाला तर एक मोठी अडचण उभी राहील अशी शंका कोणाला येण्याचा संभव आहे. " मी परमेश्वर आहे त्याअर्थी मी जें कांहीं करतों तें सर्व चांगलेंच असलें पाहिजे. माझ्या मनांत येणारे विचार चांगलेच असले पाहिजेत. कारण, ईश्वराच्या हातून वाईट असें कांहींच होणें शक्य नाहीं. " हा सिद्धांत सर्वमान्य झाला तर अशा प्रकारची अडचण उभी राहील हें म्हणणें क्षणभर कबूल केलें तरी आमच्या विरुद्ध मतांतही अशा प्रकारचें भीतिप्रद स्थल नाहीं असें निश्चितपणें सिद्ध करतां येईल काय? स्वतःपासून विभक्त आणि आकाशांत राहणाऱ्या परमेश्वराचें पूजन केवढा तरी काळ लोक करीत आले आहेत. या परमेश्वराला त्याचे सर्व भक्त भितात. परमेश्वराचें नांव घेतल्याबरोबर आपले सारें आंग ते थरथरां कांपवितात आणि पुढेंही ते असेंच करीत राहतील; पण यामुळें जग कांहीं सुधारलें आहे काय? साकार, व्यक्तिविषयक आणि जड परमेश्वराचे भक्त आणि निराकार व शुद्ध चैतन्यमयाचे भक्त या दोहोंपैकीं कोणत्या पक्षांतून मोठे महात्मे जगांत निर्माण झाले? या दोहोंपैकीं अधिक नीतिमान् पुरुष कोणत्या पक्षांत होते? जगांतील प्रचंड कार्यें कोणत्या पक्षांतील लोकांनीं उठविलीं? या प्रश्नांचीं स्पष्ट उत्तरें देण्याचें कारणच नाहीं. भीतिमय अंतःकरणांत नीतीची वाढ कशी होणार? ही गोष्ट घडणें कालत्रयांत शक्य नाहीं. ज्या ठिकाणीं द्वैत आहे, त्या ठिकाणीं भीतिही आहेच; आणि ज्या ठिकाणीं भीति आहे त्या ठिकाणीं द्वंद्वें आणि चढाओढ हीं असावयाचींच. अशा स्थितींत नीतीची वाढ कोठें होणार? ज्या ठिकाणीं द्वैत नाहीं, ज्या ठिकाणीं सर्वत्र मीच आहें, तेथें मला भीति कोणाची वाटेल? तेथें मी युद्ध कोणाशीं आणि कां करावें? सर्वत्र परमेश्वर आहे, आणि ज्या ठिकाणीं परमेश्वर आहे त्या ठिकाणीं मीही आहेंच, अशा चिंतनांत जीवात्मा शुद्ध झाला म्हणजेच खऱ्या भक्तीची आणि प्रेमाची

कल्पना त्याला होते. भीतींतून खऱ्या भक्तीचा अथवा प्रेमाचा जन्म होत नाहीं. त्याचा जन्म स्वतंत्र वृत्तींतच होतो. साऱ्या जगाबद्दल खरें प्रेम जेव्हां आम्हांला वाटेल तेव्हांच सर्वत्र बंधुभाव ह्मणजे काय, हें आम्हांस समजेल. त्यापूर्वी त्याचा खरा अर्थ आम्हांस कधींच समजावयाचा नाहीं.

याकरितां निराकार चैतन्यरूप परमेश्वराची कल्पना प्रसार पावली तर त्यापासून जगांत अनर्थ ओढवतील हें म्हणणें चुकीचें आहे. ज्याला दुष्कर्मच करावयाचें आहे त्याला कोणत्याही मतांतून आधार सांपडतोच. जुन्या मतानें तरी आजपर्यंत कमी अनर्थ केले आहेत असें नाहीं. त्यांतून अनेक पंथ उपस्थित झाले व त्यांत तंटे उपस्थित होऊन अनेक धर्मयुद्धें झालीं; तुझा देव मोठा कीं माझा देव मोठा असे वाद उपस्थित होऊन भूमीवर रक्ताचे पाट वाहिले. द्वैतानें जगांत जी कामगिरी बजाविली ती हीच. मनुष्यांच्या वृत्ती द्वैतमतानें आकुंचित करून टाकल्या आणि अनेक हठवादी पंथ निघाले. आतां या निरुंद गल्ल्याकुच्या टाकून आपण राजमार्गावर येऊं या—सूर्यप्रकाशाच्या झोतांत आपण वावरूं या. अनंत स्वरूपाचा जीवात्मा लहानशा कोठडींत सध्या बंदिवान होऊन पडला आहे. सर्वव्यापी आत्म्याला हा बंदिवास कसा सहन होईल ? वीतभर जागेंत जगावें आणि मरावें हें त्याला कसें पसंत पडेल ? त्याला आपण विश्वव्यापी प्रकाशांत आणूं. या विश्वांत जें जें कांहीं आहे तें सारें तुमचेंच आहे. तुह्मी प्रेममय अंतःकरणानें हात पुढें करा आणि सर्व विश्वाला आलिंगन द्या. साऱ्या विश्वाला मी आलिंगन केव्हां देईन ? **'ऐसें सुख कधीं लहाता होईन । देखें अवघे जन । ब्रह्मरूप ॥'** अशी इच्छा खरोखर तुमच्या अंतःकरणांत कधी काळीं उद्भवली असेल तर त्या काळीं तुह्मांला परमात्म्याची भेट झाली होती असें समजा.

भगवान बुद्धावर एके काळीं प्रेमाचा असाच पूर लोटला होता. त्याचें प्रेम दशदिशा वाहूं लागलें होतें. अशा प्रकारची भावना तुमच्या ठिकाणीं जेव्हां उत्पन्न होईल तेव्हांच तुह्मीं स्वतःला जाणलें असें होईल. सर्व विश्व एकच पुरुष आहे असा अनुभव तेव्हां तुम्हांला होईल. आजूबाजूच्या या क्षुद्र गोष्टींना इतकी घट्ट मिठी कशाला मारतां ? क्षुद्र वस्तूंचा त्याग करून अनंतरूप व्हा. क्षुद्र इंद्रियजन्य सुखांचा त्याग करून अनंत आनंदरूप व्हा. या विश्वांत जें जें कांहीं आहे तें सारें तुमचेंच आहे. मग अमुक एक क्षुद्र

वस्तु माझी असा हट्ट कां करतां ? विश्वाच्या पोटांत बारीकसारीक गोष्टींचा अंतर्भाव सहजच होतो. विश्वव्यापी चैतन्यमयाच्या पोटांत व्यक्तिविषयक मानवी परमेश्वर सहजच अंतर्भूत होतो. विश्वव्यापी अनंत परमात्माच एकेका व्यक्तीच्या रूपानें नटला आहे. आह्मी स्वतः अनंतरूप असतां एका लहानशा देहांत स्वतःस आह्मीं मर्यादित करून घेतलें आहे. अनंतत्व हेंच आमचें खरें स्वरूप आहे असें वेदांतशास्त्राचें ह्मणणें आहे. हें आमचें स्वरूप कोणत्याही कालीं नष्ट होणारें नव्हे–सदासर्वदा एकसारखें राहणारें रूप आहे. अशी वस्तुस्थिति असतां आमच्या कर्मांच्या योगानें स्वतःभोंवतीं आह्मीं मर्यादा निर्माण केली आहे. कर्माची शृंखला आमच्या मानेभोंवतीं पडली असून या मर्यादित जागेंत तिनें आह्मांस जखडून ठेवलें आहे. ही शृंखला तोडा आणि मोकळे व्हा. सर्व कायदे पायाखालीं तुडवून टाका. मनुष्याच्या खऱ्या स्वरूपाला कायदा ठाऊक नाहीं, कशाचेंही बंधन त्याला नाहीं, नशीबाचा, अंमल त्याजवर चालत नाहीं–भवितव्यता हा शब्दसुद्धां त्याच्या ठिकाणीं संभवत नाहीं. तो अनंत आणि अमर्याद आहे. हा अनंत आणि अमर्याद सत्तेचा विश्वाचा बादशाहा रस्त्यांत कसा भिकाऱ्यासारखा फिरत आहे पहा. वस्तुतः हा पूर्ण स्वतंत्र आहे. पूर्ण स्वातंत्र्य हा त्याचा जन्मसिद्ध हक्क आहे. अनंतत्वांत बंधन आणि कायदा हीं कशीं निर्माण होणार ? याकरितां हा पाश तोडून तुह्मी मोकळे झालां ह्मणजे तुम्ही केवळ साक्षिरूप व्हाल. अशा स्थितींत कोणतींही कर्मे तुमच्या हातून घडलीं तरी त्याचें सुखदुःख तुम्हांस बाधणार नाहीं. अशा स्थितींत नाटकांतल्याप्रमाणें वाटेल त्या सोंगाची बतावणी तुह्मी करा. नाटकांतला एखादा सोंगाड्या रंगभूमीवर येतो आणि भिकाऱ्याच्या सोंगाची बतावणी तो करतो. त्याची तुलना खऱ्या भिकाऱ्याशीं करून पहा, ह्मणजे बाह्यतः एकसारख्या दिसणाऱ्या या स्थितींत वस्तुतः फरक किती आहे हें तुमच्या ध्यानीं येईल. रंगभूमीवरही रस्त्याचा देखावा असतो. रंगभूमीवरचा अधिकारी एकाच प्रकारचे शब्द वापरीत असतात; एकाच प्रकारचीं गाणीं दोघेही म्हणतात; दोघेही एकसारखेच हात पसरतात; पण या दोघांच्या अंतरंगांत केवढा फरक आहे बरें ? आपलें सोंग चांगलें वठलें म्हणून रंगभूमीवरच्या भिकाऱ्याच्या अंतःकरणांत आनंदाच्या गुदगुदल्या होत असतात आणि खऱ्या भिकाऱ्याच्या अंतःकरणांत दुःखाग्नीनें

पेट घेतलेला असतो. हा फरक कशानें झाला ? याचें कारण हेंच कीं रंगभूमीवरील भिकारी केवळ साक्षित्वानें कर्म करतो. वस्तुतः आपण मुक्त आहों हें जाणत असून तो बद्ध मनुष्यासारखें आचरण करतो; आणि रस्त्यावरील भिकारी हा खरोखरच भिकारी. भिकाऱ्याचें सोंग आपण आणलें असून आपण खरोखर भिकारी नाहीं, ही जाणीव रंगभूमीवरील भिकाऱ्याला असते; आणि मी खराच भिकारी असून भीक मागणें हेंच माझें नशीब ही जाणीव रस्त्यांतल्या भिकाऱ्यास असते. या दोन जाणीवांत असलेला फरक एकाच्या सुखाला आणि दुसऱ्याच्या दुःखाला कारणीभूत होतो. या जाणिवेंतल्या फरकामुळेंच कायदे आणि बंधनेंही उपस्थित होतात. मी भिकारी आहें ही भावना असणें हेंच बंधन आणि हाच कायदा. जोंपर्यंत आमच्या खऱ्या स्वरूपाची ओळख आम्हांस झाली नाहीं तोंपर्यंत आह्मी भिकारी खरेच. सृष्टीच्या वाटेल त्या शिपुरड्यानें आमच्याशीं धक्काबुक्की करावी. प्रकृतीच्या राज्यांतील वाटेल त्या अधिकाऱ्यानें आम्हांस गुलाम करावें हें योग्यच आहे. ही गुलामगिरी असह्य होऊं लागली ह्मणजे "अहो आम्हांस कोणी मदत करील काय ?" असा आक्रोश करीत साऱ्या जगभर आह्मी हिंडतों; पण आह्मांस मदत कोठूनही मिळत नाहीं. मग एखादा ईश्वर अथवा दुसरा एखादा प्राणी आह्मी कल्पनेनें निर्माण करतों आणि मदतीची याचना त्याजपाशीं करतों; पण काल्पनिक प्राणी आह्मांस मदत कशी करणार ? अशी मदत आम्हांस कधींच मिळत नाहीं, आणि हा अनुभव नित्य येत असतांही कोठून तरी मदत येईल ही आमची आशा सुटत नाहीं. अशा रीतीनें रडत भेकत, आक्रोश करीत नुसत्या आशेवर आह्मी कालक्रमणा करीत असतों आणि अशा स्थितींत एके दिवशीं आमच्या आयुष्याची इतिश्री होते. असा हा खेळ अखंड चालू आहे.

तुम्हांस मुक्ति पाहिजे तर ती तुह्मीं स्वतःच मिळविली पाहिजे. कोणाकडूनही या कामीं मदत मिळण्याची आशा करूं नये. आपल्या गत आयुष्यक्रमाचें सिंहावलोकन आपण केलें तर दुसऱ्याकडून मदत मिळण्याची अपेक्षा आपण नित्य करीत होतों आणि आपली नेहमीं निराशा होत होती; असें आपणास आढळून येईल. आपणास जेव्हां जेव्हां मदत मिळते तेव्हां तेव्हां आपल्याच अंतरंगांतून ती आलेली असते. आपण केलेल्या मेहनतीचें फळच

आपणास मिळत असतें. कर्म आणि त्याचें फळ हा सिद्धांत आपल्या नजरेसमोर सतत असतां आपण बाहेरून मदत मिळण्याची फुकट आशा करीत बसावें हें आश्चर्य नव्हे काय ? एखाद्या लक्षाधिशाच्या घरीं तुम्ही गेलां तर अनेक पाहुणे तेथें तुह्मांस आढळून येतात. या लक्ष्मीपुत्रापासून आपणास कांहीं तरी प्राप्ति होईल या आशेनें ते तेथें जमलेले असतात; पण त्या बिचाऱ्यांची ही आशा कधींच सफल होत नाहीं. अशाच रीतीनें सदोदित आशा करीत आमचें सारें आयुष्य आह्मी क्षीण करीत असतों, पण या आशेची तृप्ति केव्हांच होत नाही. हा आशाळभूतपणा सोडून द्या असें वेदांताचें सांगणें आहे. तुह्मीं आशा कां करावी ? तुह्मांजवळ नाहीं अशी कोणती चीज या विश्वांत आहे ? किंबहुना विश्वांतील वस्तुमात्र तुम्हीच आहां. मग तुम्ही आणखी आशा कसली करतां ? एखाद्या राजाला वेड लागलें आणि त्याच्या भरांत त्या देशाच्या राजाच्या भेटीसाठीं तो फिरत सुटला तर कधीं काळीं तरी राजाची भेट त्याला होईल काय ? आपल्या राज्यांतील प्रत्येक शहर, प्रत्येक खेडें आणि प्रत्येक घर त्यानें धुंडाळलें आणि 'अहो, मला राजा दाखवा अशी करुणा भाकली, तरी त्याला राजा कोठें सांपडणार ? कारण ज्याला तो शोधतो तो राजा तो स्वतःच आहे. त्याचप्रमाणें आम्ही स्वतः परमात्मरूप आहों, मग आणखी निराळा ईश्वर आह्मांस कोठून भेटणार ? याकरितां हा मूळसिद्धांत लवकर ओळखून बाह्य परमेश्वराला शोधण्याची फुकट मेहनत जितक्या लवकर आम्ही बंद करूं, तितकें अधिक चांगलें. आपण स्वतः परमात्मरूप आहों हें ओळखा आणि तृप्त होत्साते सुखी व्हा. ही सारी वेड्यासारखी धांवाधांव बंद करा आणि नंतर केवळ साक्षिरूप होऊन जगांतील रंगभूमीवर आपापल्या सोंगाची बतावणी खुशाल करा.

अशी स्थिति प्राप्त झाली म्हणजे सर्व देखावा बदलून जाईल. आज जें जग तुम्हांला कैदखान्यासारखें वाटत आहे तेंच जग खेळण्याच्या पटांगणासारखें तुम्हांस दिसूं लागेल. आज जें जग तुह्मांस चढाओढीचें ठिकाण असें दिसत आहे, तेंच जग तुमची आनंदभूमिका होईल. त्या ठिकाणीं सदासर्वदा वसंत ऋतु असेल, तेथें सदोदित फुलें फुलत असतील आणि मधमाशा इतस्ततः फिरतील. आज जें जग तुम्हांस नरकप्राय वाटत आहे तेंच जग अशा स्थितींत स्वर्ग होऊन जाईल. बद्ध जीवांना हें जग अत्यंत त्रासदायक

वाटतें, पण मुक्तांना तेंच जग त्याच्या उलट दिसतें. स्वर्गादि सर्व लोक त्यांना येथेंच आढळतात. साऱ्या देवदेवता त्यांना येथेंच भेटतात. देवदेवतांनीं हें जग निर्माण केलें नसून मनुष्यानें देवदेवता निर्माण केल्या आहेत. इंद्र येथेंच आहे आणि वरुण व इतर साऱ्या देवताही येथेंच आहेत. हे सर्व देव आमच्यांतूनच निर्माण झाले. याकरितां हे देव खरे नसून त्यांचे निर्माते जे आह्मी, तेच खरे देव आहों आणि याकरितां ते पूजनीय नसून आह्मी पूजनीय आहों. वेदांतशास्त्राचें मत अशा प्रकारचें आहे आणि तेंच व्यवहाराला पूर्ण धरून आहे. आम्ही आपले पाश तोडून मुक्त झालों ह्मणजे जगाला सोडून वेड्यासारखें अरण्यांत धावण्याचें अथवा एखाद्या गुहेचा आश्रय करण्याचें कारण तुम्हांस उरणार नाहीं. आम्ही आमच्या जागींच राहून आणि या जगाच्या गोंगाटांत वावरत असतांही त्याच्या देखाव्यानें आम्ही फसणार नाहीं. त्याचें रहस्य काय आहे हें एकवार समजून चुकल्यावर मग पुन्हां आह्मी कसे फसूं ? जगाचा सारा देखावा पूर्वीसारखाच कायम राहील, पण त्याचा अर्थ मात्र बदलेल. त्याचा पूर्वीचा अर्थ जाऊन नवा अर्थ त्याला प्राप्त होईल. वास्तविक पाहतां जग ह्मणजे काय, हें अद्यापि आह्मांस कोडेंच आहे. या कोड्याचा उलगडा केवळ मुक्त स्थितींत मात्र होणार आहे. हा उलगडा होईल त्या वेळीं सृष्टीचे कायदे, भवितव्यता, नशीब इत्यादि गोष्टींचे खरे अर्थ आह्मांस समजतील. आमच्या अनंत जीवनांत या गोष्टींची वस्ति एका अत्यंत अल्पशा भागांत होती असें आम्हांस आढळून येईल. या गोष्टींचा वास्तविक अर्थ न समजल्यामुळेंच आम्ही आज त्यांना भितों आणि त्यांजपासून आपला बचाव करण्यासाठीं सशाप्रमाणेंच आपलीं तोंडें वाळूंत खुपसतों. आमच्या वुद्धीस भ्रम झाल्यामुळें आमचें खरें स्वरूप विसरण्याचा यत्न आम्ही करीत आहों; पण इतका यत्न करूनही आम्हांस तें विसरतां येत नाहीं. तें आपल्या अस्तित्वाची जाणीव आह्मांस पुनःपुन्हां देतें, पण त्याची हांक कोठून येते याचा उमज आह्मांस बरोबर न पडल्यामुळें आम्ही ईश्वराला शोधित कोठें तरी बाहेर भटकत आहों. वास्तविक हें आमचें भटकणें आत्मशोधनासाठींच आहे. ती हांक कोठून आली हें आह्मांस समजलें नाहीं. ती अग्नींतून आली, एखाद्या देवतेकडून आली, सूर्याकडून आली अथवा तारकादिकांतून आली असा आमचा गैरसमज झाला होता, पण अखेरीस ही हांक

आमच्याच हृदयांतून आली अशी आमची खात्री झाली. अनंत कालापासून हा ध्वनि उमटत आहे आणि पुढेंही सदोदित तो तसाच उमटत राहील. अगदीं थोडक्यांत वेदांतशास्त्राचें मत सांगावयाचें ह्मटलें तर मनुष्याचें खरें स्वरूप ओळखा, इतक्याच शब्दांत सांगतां येईल. मनुष्य हेंच परमेश्वराचें व्यक्तरूप असून त्याचे पूजन जर तुह्मांस करतां येत नाहीं, तर अव्यक्त परमेश्वराचें पूजन तुम्ही कसें करणार, असा वेदांतशास्त्राचा प्रश्न तुह्मांस आहे.

"ज्या तुमच्या बंधूला नित्य तुम्ही चाहतां त्याचें पूजन जर तुह्मांला करतां येत नाहीं तर तुह्मांस न दिसणाऱ्या परमेश्वराचें पूजन तुम्ही कसे कराल ?" अशा अर्थाचें एक वाक्य बायबलांतही आहे. मनुष्याच्या मुखांत परमात्म्याचें प्रतिबिंब जर तुह्मांस दिसत नाहीं, तर ढगांत अथवा जड मृत्पिंडाच्या केलेल्या प्रतिमेंत तें तुह्मांस कसें दिसेल ? ज्या दिवशीं सर्व स्त्रीपुरुषांत तुह्मांस परमेश्वर दिसूं लागेल, त्याच दिवशीं धर्ममार्गावर तुम्ही आरूढ झालां असें मी ह्मणेन. तुमच्या उजव्या गालावर कोणी मारलें तर डावा गालही पुढें करा, या आज्ञेचा खरा अर्थही तेव्हांच तुह्मांस समजेल. मनुष्य हा परमेश्वराचा अवतार आहे, असें ज्या दिवशीं तुह्मांस दिसूं लागेल त्या दिवशीं वाघाचें स्वागतही तुम्ही प्रेमानें कराल. आपणास ज्या कोणाची भेट होते तो परमेश्वरच होय. तो परमेश्वर कधीं पित्याच्या रूपानें आणि कधीं मातेच्या रूपानें, तर कधीं मित्राच्या रूपानें आपणास दिसतो. हीं सारीं आमच्याच आत्म्याचीं रूपें आहेत.

अशा रीतीनें आह्मां मानवांतील परस्परसंबंध दैवी होऊन जातील आणि ईश्वर आमचा कधीं मित्र तर कधीं पिता आणि कधीं माता होईल. परमेश्वराच्या ठिकाणीं मातेचें वात्सल्य कल्पिणें हें पित्याच्या प्रेमाहून अधिक श्रेष्ठ आहे, आणि मातेच्या वात्सल्याहून परमेश्वराशीं मित्रत्वाचा संबंध जोडणें हें अधिक श्रेष्ठ असून त्याला आपला प्रियपति समजणें हें प्रेमाचें ध्येय सर्वश्रेष्ठ आहे. पर्शियन भाषेंत एक जुनी गोष्ट आहे, ती कदाचित् तुह्मीं ऐकली असेल. एके वेळीं एक प्रेमी आपल्या प्रियेकडे गेला व त्यानें दारावर थाप मारिली. 'तुह्मी कोण आहां ?' असा ध्वनि आंतून झाला. 'मी आहें' असे उत्तर त्यानें दिलें; तथापि दरवाजा उघडला नाहीं. पुन्हां दुसऱ्या वेळीं दरवाजावर त्यानें थाप मारली आणि 'मी येथें उभा आहें' असें ह्मटलें;

तथापि दरवाजा बंदच राहिला. पुन्हां तिसऱ्या वेळीं त्यानें दारावर थाप मारिली तेव्हां 'कोण आहे ?' असा ध्वनि पुन्हां आंतून आला. त्यानें उत्तर दिलें, 'प्रिये, तूंच आहेस.' या उत्तराबरोबर दरवाजा उघडला. आह्मी आणि परमेश्वर यांतील संबंध अशा प्रकारचा आहे. सर्वत्र त्याचाच वास आहे, किंबहुना सर्व तोच आहे. परमेश्वर अज्ञेय आहे असें कोणीं म्हणावें ? परमेश्वराला शोधले पाहिजे हे शब्द कोणीं उच्चारावे ? आह्मी परमेश्वराला नित्य नित्य भेटत आहों. आम्ही अनंतकाळ त्याच्यांतच वास करून आहों. सर्वत्र त्याची ओळख पटलेली असून त्याचें अखंड पूजन सर्वत्र चालू आहे.

परमेशपूजनाचे अनेक प्रकार जगांत आढळून येतात. नुकत्याच सांगितलेल्या अत्युच्च पूजाविधीहून हे प्रकार भिन्न असले तरी ते चुकीचे आहेत असें समजण्याचें कारण नाहीं. अनेक प्रकारचीं हव्यकव्यें आणि संतर्पणें करून जे लोक परमेशपूजन करतात ते सर्वथा चूक करतात असें कधींही समजूं नये. त्यांची पायरी कमी दर्जाची असली तरी त्यांचा मार्ग चुकलेला नाहीं. कमी प्रतीच्या सत्यांतून उच्च प्रतीच्या सत्याकडे ते प्रवास करीत आहेत. काळोख म्हणजे अत्यंत कमी प्रतीचा प्रकाश. वाईट ह्मणजे अत्यंत कमी प्रतीचें चांदणें; पाप ह्मणजे अत्यंत कमी प्रतीचें पुण्य. यांतील फरक फक्त कमी अधिक परिमाणाचा आहे, हा मुद्दा आपण अवश्य ध्यानांत बाळगिला पाहिजे. आपण ज्या मार्गानें जात आहों त्याच मार्गानें इतर लोकही जात असल्यामुळें त्यांजकडे प्रेमाच्या व सहानुकंपेच्या दृष्टीनें आपण पाहिलें पाहिजे. तुम्ही अगदीं जीवन्मुक्त स्थितींत असलां तरी इतर लोक पुढेंमागें त्याच स्थितीला येणार आहेत हें तुम्हीं नित्य ध्यानांत ठेविलें पाहिजे. तुम्ही खरोखरच जीवन्मुक्त असाल, तर हा बद्ध आणि हा मुक्त हा भेद तुह्मांस दिसणार नाहीं. तुम्ही खरोखर पवित्र असाल तर अपावित्र्य तुह्मांस कोठून दिसेल ? कारण, जें आंत आहे तेंच बाहेर दिसत असतें. आमच्या ठिकाणींच अपवित्रपणा असल्याशिवाय आह्मांस तो बाहेर दिसावयाचा नाहीं. वेदांताची दुसरी व्यावहारिक बाजू अशा प्रकारची आहे; आणि ती प्रत्यक्ष आचरणांत आणण्याचा यत्न तुम्ही कराल अशी मला आशा आहे. वेदांताचीं तत्त्वें प्रत्यक्ष आचारांत आणणें हाच आमचा जीवनहेतु आहे. आमची इच्छा असली अथवा नसली तरी वेदांतनिर्दिष्ट मार्गानें जाणें आम्हांस भाग

आहे; पण हीच गोष्ट जुलमानें करण्यापेक्षां आम्हीं आपखुषीनें केली तर त्यांत अधिक तृप्ति आणि अधिक संतोष यांचा लाभ तुह्मांस होईल. सत्य हें मूर्तिमंत आमच्या ठिकाणीं आहे. तो आमचा जन्मसिद्ध हक्कच आहे. फक्त अमूर्त स्थितींतून मूर्तरूपांत त्याला आणणें इतकेंच आमचें कर्तव्य आहे.

---

१८

# व्यावहारिक वेदान्त.

## ( तृतीयपाद. )

एके वेळीं नारदमुनींची स्वारी सनत्कुमाराकडे आली व त्यांनीं त्यांना अनेक प्रश्न विचारले अशी कथा छांदोग्य उपनिषदांत आहे. या प्रश्नास 'जगाची वस्तुस्थिति जशी आहे तशी ती असण्याचें कारण धर्म आहे कीं काय ' असा प्रश्न नारदमुनींनीं केला. अशा प्रकारच्या प्रश्नांवर चर्चा चालतां चालतां सनत्कुमारांनीं सर्व तत्त्वज्ञान नारदमुनींस सांगितलें. पृथ्व्यादि भूतांचें विवरण करतां करतां सनत्कुमार आकाशापर्यंत येऊन पोहोंचले. आकाश हें भूततेजाहून उच्च आहे; कारण आकाशाच्या पोटींच सूर्य, चंद्र, तारे आणि विद्युत् यांचा वास आहे. आकाशाच्या पोटींच आह्मीही राहतों आणि त्याच महाभूतांत आमचा अंत होतो. आकाशाहून अधिक मोठें तत्त्व कोणतें असा प्रश्न नारदमुनींनीं केला असतां सनत्कुमार म्हणाले 'प्राण हें तत्त्व आकाशाहून मोठें आहे.' वेदांतशास्त्राच्या मताप्रमाणेंच आपल्या जीविताचा मूल आधार प्राण हेंच तत्त्व होय. आकाशाप्रमाणें प्राणही सर्वव्यापी आहे. विश्वांत जेथें गति ह्मणून आहे तेथें तें प्राणाचेंच स्वरूप होय. आपल्या देहांत अनुभवास येणारी गति आणि आपल्या बाहेरील गति हें सारें प्राणाचें कार्य आहे. हें तत्त्व आकाशाहून उच्च आहे आणि विश्वांतील सारी सजीवता त्याजवरच अवलंबून आहे. प्राणाचा वास मातेच्या ठिकाणीं, पित्याच्या ठिकाणीं आणि गुरूच्या ठिकाणीं आहे. प्राण हाच देहांतील ज्ञाता होय. एके वेळीं ' सत्य वस्तु म्हणजे काय ? ' असा प्रश्न श्वेतकेतूनें आपल्या पित्याला केला असतां यानें उत्तर दिलें 'या अखिल वस्तुजाताचें आदिकारण आणि ज्याच्या सर्व वस्तु

बनल्या आहेत तेंच सत्य तेंच सर्व कांहीं आहे, आणि तूंही तेंच आहेस.' '**तत्त्वमसि**, ' ज्याप्रमाणें मधमाशी अनेक पुष्पांतून मध गोळा करिते आणि नंतर त्या मधाच्या बिंदूंना आपल्या मूळच्या घराचे ह्मणजे फुलाचें ज्याप्रमाणें विस्मरण होतें, त्याचप्रमाणें आपण सारे जीवदशेला आलों ह्मणजे आपण कोठून आलों याचें स्मरण आपणास राहात नाहीं; तथापि आपल्या ठिकाणीं अस्तित्व ह्मणून जें आहे तेंच सत्य आणि तें सत्य तूंच आहेस. समुद्रांत एकत्र झालेल्या नद्यांना ज्याप्रमाणें आपल्या मूळच्या वेगवेगळेपणाचें भान राहात नाहीं, त्याचप्रमाणें मूळ सद्रूपांतून बाहेर पडून या विश्वांत आपण अवतरलों ह्मणजे मूळच्या सद्रूपाचें भान आपणास उरत नाहीं. हें जें मूळचें रूप तेंच सत्य आणि तें सत्य तूंच आहेस.

कोणत्याही वस्तूचें ज्ञान आपणास करून घ्यावयाचे असेल तर तसें करण्याचे प्रकार दोन आहेत. एक प्रकार तुलनेचा. ज्या वस्तूचें ज्ञान करून घ्यावयाचें असेल तिची तुलना इतर सामान्य वस्तूशीं व त्या सामान्यांची तुलना एकंदर विश्वाशीं करून त्याद्वारें त्या वस्तूचें ज्ञान आपण निश्चित करतों. हा एक मार्ग झाला. दुसरा मार्ग वर्गीकरणाचा. ती वस्तु कोणत्या वर्गांत पडते याचा विचार करून आणि त्या एकाच वस्तूचें पृथक्करण करून तिजबद्दलचें ज्ञान निश्चित करावयाचें. एखादी घटना घडून आली ह्मणजे हें काय असावें अशी शंका आपल्या मनाला येते. आपलें मन शंकाकुल होतें. आपल्या कोडयाचा उलगडा होईपर्यंत जणूं काय आपलें चित्त असंतुष्ट राहतें. पण हीच घटना वारंवार घडत असते असा अनुभव आपणास आला ह्मणजे असें होणें हा सृष्टिस्वभावच होय असें कळून येऊन आपलें चित्त संतुष्ट होतें; आणि त्या घटनेला सृष्टिनियम अथवा विश्वांतर्गत एक कायदा असें नांव आपण देतों. झाडावरून एक फळ खालीं पडलेलें पाहून आपलें मन अस्वस्थ होतें; पण झाडावरून सुटलेलें प्रत्येक फळ खालीं पडतांना आपण पाहिलें ह्मणजेच प्रत्येक निराधार वस्तु खालीं पडते असा निश्चय आपण करतों. या निश्चयानें आपला संतोष होतो आणि त्याला आपण गुरुत्वाकर्षणाचा नियम म्हणतों. एक विशिष्ट घटना पाहून व तिची तुलना तिच्याच जातीच्या सामान्य घटनांशीं करून एक नियम अथवा कायदा आपण सिद्ध करतों. ज्ञान प्राप्त करून घेण्याची शास्त्रीय पद्धति अशी आहे.

धर्मांचा अभ्यास आपणास कर्तव्य असेल तेव्हांही याच पद्धतीचा अवलंब आपण केला पाहिजे. जें तत्त्व भौतिक शास्त्रांच्या अभ्यासांत आपण लागू करतों तेंच तत्त्व येथेंही लागू करावयाचें. याच पद्धतीचा अंगिकार सर्व शास्त्रांच्या अभ्यासांत केला जात असल्याचें आपणास आढळून येतें. उपनिषदादि अत्यंत प्राचीन ग्रंथांतही याच पद्धतीचा अवलंब केला आहे. अनेक देवदेवतांचा अंतर्भाव उपनिषद्ग्रंथांनीं अखेरीस एकाच सामान्य रूपांत केला आहे. त्याचप्रमाणें विश्वाच्या उत्पत्तीचा विचार करतांनाही हाच मार्ग स्वीकारून अखेरीस सर्वव्यापी असणाऱ्या आकाश या महाभूताचा निश्चय प्राचीन तत्त्ववेत्त्यांनीं केला. आकाशांतून प्राणशक्तीपर्यंत ते पोंचले. अनेक प्रकारच्या रूपांनीं दिसणाऱ्या या विश्वाचा लय अखेरीस एकाच आकाश तत्त्वांत होतो असें त्यांनीं दाखविलें. त्याचप्रमाणें प्राणशक्ति हेंही आकाशाचेंच एक उच्चतर रूप असून तेंच आकाशाच्या रूपानें व्यक्त होतें व आकाश रूपांतर पावून इतर तत्त्वांचें रूप धारण करतें, असेंही त्यांनीं सिद्ध केलें. अशा रीतीनें विशिष्टांतून सामान्याकडे जाण्याच्या शास्त्रीय पद्धतीचा अवलंब प्राचीन काळच्या ऋषिवर्यांनींही केला आहे.

व्यक्तिविशिष्ट परमेश्वरविषयक मतही अशाच प्रकारें रचलें गेलें. समष्टिरूप जाणीव हेंच व्यक्तिविशिष्ट परमेश्वराचें स्वरूप. आतां या ठिकाणीं एक अडचण उद्भवते. समष्टिरूप जाणीव ह्मणजे परमेश्वर हा सिद्धांत एकदेशीय होतो. जाणीव ही सृष्टीची एक बाजू आहे, आणि एवढीच बाजू ध्यानांत घेऊन हा सिद्धांत रचिल्यामुळें तो एकदेशीय आणि अपूर्ण झाला. त्यांत दुसऱ्या बाजूचा विचार झालेला नाहीं. या सिद्धांतांतही उणीव राहिलेली आहे. केवळ वस्तुगत तत्त्वें पाहून त्या तत्त्वानुसारें तीं समजून घ्यावयाचीं हा ज्ञानाचा दुसरा प्रकार नुकताच सांगितला. झाडावरून पडणारें प्रत्येक फळ एखाद्या भूतानें खालीं ओढलें असेल असें ह्मणणारेही कांहीं लोक प्राचीन काळीं असतील. अशा लोकांच्या डोक्यांत वस्तूंतील अंतर्गत गोष्टींचा विचार येत नाहीं. प्रत्येक घटना ते बाह्य कर्त्याशीं जोडूं पाहतात. फळांतील कांहीं अंतर्गत गुणामुळें तें खालीं पडलें असेल ही कल्पना त्यांच्या दृष्टीला पटत नाहीं. त्यांची दृष्टि केवळ बाह्यवर्ती असल्यामुळें प्रत्येक घटनेंत त्यांना बाह्यकर्ता दिसतो; पण प्रत्येक फळ खालीं पडण्याचें वास्तविक कारण गुरुत्वा-

कर्षण हें होय. आतां एवढें कारणसुद्धां अंशतः तरी अपुरें आहे हें खरें; तथापि पहिल्या कारणापेक्षां तें अधिक सुसंगत आहे; कारण तें त्या वस्तूच्या अंतर्गतच असून ही घटना बाह्य कर्त्याशीं जोडण्याचा यत्न या कारणांत नाहीं. सर्व प्रकारच्या ज्ञानास हेंच तत्त्व लागू आहे. जें स्पष्टीकरण वस्तूच्या अंतर्गत स्वरूपावरून सिद्ध होतें तें सशास्त्र स्पष्टीकरण होय; आणि जेथें एखाद्या घटनेचा संबंध बाह्य कर्त्याशीं जोडलेला असतो तें स्पष्टीकरण अशास्त्र आहे.

या सृष्टीचा कर्ता कोण या प्रश्नाला उत्तर ह्मणून व्यक्तिविशिष्ट परमेश्वर, सृष्टीचा आद्यजनक या नात्यानें पुढें करण्यांत आला; पण हें स्पष्टीकरणही शास्त्राच्या कसोटीला लावल्याशिवाय ग्राह्य ह्मणून समजतां येत नाहीं. जर हा परमेश्वर सृष्टीच्या बाहेरचा असेल, सृष्टीशीं त्याला कांहींच कर्तव्य नसेल आणि ही सृष्टि केवळ त्याच्याच हुकमानें केवळ शून्यांतून निर्माण झाली असेल तर सृष्टीच्या उत्पत्तीची ही उपपत्ति शुद्ध अशास्त्रीय ह्मटली पाहिजे. व्यक्तिविशिष्ट परमेश्वराचें अस्तित्व मानणाऱ्या सर्व धर्मांत हेंच तत्त्व मोठें नडणारें आणि लंगडें आहे. एकेश्वरी धर्मांच्या मार्गांत ही उपपत्ति आड येते. त्या धर्मांच्या मताप्रमाणें परमेश्वर हा मानवी गुणांचा असून ते गुण त्याच्या ठिकाणीं मनुष्याहून पुष्कळ पटीनें वाढले आहेत इतकेंच. त्यांच्या मताप्रमाणें स्वतः सृष्टीच्या बाहेर राहून या परमेश्वरानें अभावांतून हें जग निर्माण केलें आणि आपण स्वतः बाजूस राहिला. या मताच्या मार्गांत अनेक अडचणी उभ्या राहतात.

पहिली गोष्ट अशी कीं ही उपपत्ति अपुरी आहे; आणि दुसरी गोष्ट ही कीं सृष्टीच्या अंतर्गत स्वभावावरून ही उपपत्ति रचिली नसून सृष्टीचें कर्तृत्व बाह्यकर्त्याकडे दिलें आहे. यामुळें ही उपपत्ति अशास्त्रीय झाली आहे. कारण आणि कार्य हीं वस्तुतः एकरूप असून कारणांतूनच कार्य निर्माण होतें हा सिद्धांत आपणास ठाऊक आहेच. हा सिद्धांत या उपपत्तीला लागू पडत नाहीं. येथें कारण आणि कार्य हीं भिन्नरूपाचीं आणि भिन्नस्वभावी मानलीं आहेत. कार्य आणि कारण याच्या स्वरूपांत येथें कोणतेंही सादृश्य नाहीं. आपणा मनुष्यांस जें कांहीं ज्ञान आजवर उपलब्ध झालेलें आहे त्यावरून कारणांतूनच कार्य निर्माण होत असून कारण आणि कार्य हीं एकरूपाचीं व एक स्वभावाचीं असतात असें निःसंशय सिद्ध झालें आहे. अर्वाचीन शास्त्रांचे

शोध या सिद्धांताला दिवसेंदिवस अधिक पुष्टि देत आहेत. उत्क्रांतिवाद आतां सर्वमान्य झालेला आहे आणि या वादाचाही मूळसिद्धांत हाच आहे. कारणाचेंच रूपांतर होऊन कार्य बनतें, याच मूळसिद्धांतावर उत्क्रांतिवादाची सारी इमारत उभी राहिलेली आहे. केवळ अभावांतून बाह्यकर्त्यानें ही सृष्टि निर्माण केली ही उपपत्ति ऐकून अर्वाचीन पंडित हंसल्यावांचून राहाणार नाहींत.

आतां धर्मविचारांनाही हाच नियम लागू होतो कीं काय, याचा विचार केला पाहिजे. ज्या धर्माच्या उपपत्ति या सिद्धांताच्या कसाला उतरतील, त्याच अर्वाचीन पंडितांना मान्य होतील. अर्वाचीन विचारी लोकांना या उपपत्ति या सिद्धांताच्या कसाला लागल्या तरच पटतील. केवळ भिक्षुकवर्गाच्या पुस्तकांच्या अथवा मठाधिपतींच्या आधारावर उभ्या राहिलेल्या उपपत्तींस अर्वाचीन काळीं कोणीही विचारावयाचें नाहीं. अशा प्रकारच्या उपपत्तींवर आमचा पूर्ण भरंवसा आहे असे जे लोक ह्मणतात त्यांच्या ठिकाणींही बराचसा नाटकी बाणा असून खरा विश्वास त्यांच्या अंतरंगांत बहुधा मुळींच नसतो असेंही ह्मटल्यास चालेल. बाकीचे लोक असल्या उपपत्तींना कंटाळून जाऊन धर्माचा विचार अजिबात सोडतात आणि धर्म म्हणजे भिक्षुकांनीं माजविलेलें थोतांड असें समजतात.

सध्यां धर्माच्या बाह्यस्वरूपालाही राष्ट्रीयपणा आला आहे. अमुक धर्म अमक्या राष्ट्राचा असा शिक्का एकएका विशिष्ट पंथावर बसला आहे. प्राचीन समाजाचे जे अवशेष अद्यापि शिल्लक आहेत, त्यांपैकींच हाही एक असल्यामुळें त्याला राहूं द्या; पण गेल्या दोन पिढ्यांच्या मागच्या लोकांना या पंथांची जी आवश्यकता वाटत होती ती मात्र आज राहिलेली नाहीं. बुद्धीची क्षुधा शमविण्याचें सामर्थ्य या पंथांत आहे असें चालू पिढीला वाटत नाहीं. व्यक्तिविशिष्ट एक परमेश्वर आणि त्यानें अभावांतून निर्माण केलेली सृष्टि ही एकेश्वरीपंथांची उपपत्ति यापुढें कोणाच्याही गळीं उतरणार नाहीं. भगवान् बुद्धांनीं हिंदुस्थानांत हेंच कार्य केलें. त्यांनीं हीच उपपत्ति उलथून पाडली. बौद्ध धर्माचा प्रसार इतका झपाट्यानें होऊन त्याचा जय झाला यांतील मुद्दा हाच होय. सृष्टिरचनेला लागणारी तयारी तिच्याच पोटांत असून अनंतशक्तिही तिच्याच पोटांत आहे असें सिद्ध करतां आलें तर बाह्यकर्ता मानण्याचें कारण काय ? असा प्रश्न बौद्धांनीं उत्पन्न केला आणि याच मार्गानें जाऊन आत्म्याचें सुद्धां अस्तित्व मानण्याचें कारण नाहीं असें ते ह्मणूं लागले.

गुण आणि पदार्थ यांच्या संबंधाचा वादविवाद प्राचीन काळापासून चालू आहे; आणि त्याचा किंचितसा अवशेष सध्याच्या काळींही कोठें कोठें आढळतो. सुमारें दीडदोनशें वर्षांपूर्वी जड पदार्थ आणि गुण हे एकमेकांपासून भिन्न आहेत की एकमेकाशीं संलग्न आहेत हाच मोठा वादाचा विषय असे. गुण हें पदार्थाचे विशिष्ट रूप कीं पदार्थ हें गुणांचें अधिष्ठान याचा निश्चय पुष्कळ काळपर्यंत झाला नाही. अगदीं गुणविरहित असा पदार्थ राहूं शकेल कीं नाहीं आणि जड पदार्थांवांचून गुण असूं शकतील कीं नाहीं या वादाचा अवशेष अद्यापिही आढळतो. यावरून बौद्ध मत उत्तर देतें. "मुख्य अस्तित्व गुणांचेंच आहे; गुणावांचून पदार्थाचें अस्तित्व असूं शकेल असें मानण्यास पुरावा नाहीं. आपल्या दृष्टीला जें कांहीं दिसतें तो गुणच होय. त्यावांचून जड पदार्थाचें स्वरूप दिसणें आपणास शक्य नाहीं." अर्वाचीन संशयवादीही याच मुद्यावर अडकून पडले आहेत. दृश्य सृष्टि आणि अदृश्य अथवा कल्पनाशक्ति यांच्यांत स्पष्ट भेद कोठें करतां येईल याचा निश्चय अद्यापि झालेला नाहीं. प्रत्यक्ष जग आपल्यासमोर आहे. या जगांत एकसारखी घडामोड चालू आहे. त्यांतील प्रत्येक पदार्थाचें रूप प्रत्येक क्षणीं बदलत आहे, आणि या देखाव्याच्या मागें जें अधिष्ठान अस्तित्वांत आहे तें मात्र कधींही बदलत नाहीं. अशा रीतीनें स्थिर अधिष्ठान आणि चल पदार्थ असें द्वैत कायमचें आहे असें एक पक्ष ह्मणतो. हीं दोन्ही रूपें सत्य आहेत असे या पक्षाचें ह्मणणें आहे. यावर दुसऱ्या पक्षाचें प्रतिपादन वेगळें आहे. आपणास जें कांहीं दिसतें; ज्याला स्पर्श करतां येतो अथवा जें विचारांत आणतां येतें, तें केवळ दृश्य असल्यामुळें सद्वस्तूची किंमत त्याला देतां येत नाहीं, असें या दुसऱ्या पक्षाचें ह्मणणें आहे. याकरितां सद्वस्तु एकच असून जड पदार्थ हा नुसता भासमय देखावा आहे असें या पक्षाचें मत आहे. यावर पहिला पक्ष पुन्हां असे ह्मणतो कीं देखाव्यापलीकडे कांहीं अस्तित्व असेल असें ठामपणें सांगण्याचा अधिकार तुम्हांस नाहीं. या आक्षेपाला अर्वाचीन शास्त्रांनीं कोणतेंही उत्तर अद्यापि दिलेलें नाहीं. त्याला फक्त वेदांतानेंच उत्तर दिलेलें आहे. जें कांहीं अस्तित्व म्हणून आहे तेंच देखाव्याच्या रूपानें स्पष्टत्वास येतें अथवा अदृश्य रूपानें केवल स्थितींत राहतें असें वेदांतशास्त्राचें उत्तर आहे. दोन सत्य अस्तित्वें नसून जें कांहीं आहे तें एकच आहे आणि

तेंच बदलल्यासारखें दिसतें; तथापि वस्तुतः तें अचल व कधींही न बदलणारें आहे. देह, मन आणि आत्मा या सर्व भिन्न भिन्न वस्तु आहेत असें आपणास वाटतें तथापि वस्तुस्थिति अशी नसून सर्व अस्तित्व एकच आहे आणि तेंच या निरनिराळ्या रूपांनीं दिसत आहे. रज्जु आणि सर्प हें सुप्रसिद्ध उदाहरण वेदांतशास्त्री या बाबींत देत असतात. अर्धवट उजेडाच्या जागेंत पडलेली दोरी आपणास सापासारखी दिसते; पण वस्तुज्ञान होऊन ती दोरी आहे अशी खात्री झाल्यावर, सर्प नाहींसा होऊन दोरी मात्र शिल्लक उरते. यावरून आपल्या मनांत सर्पाचें अस्तित्व असतें तेव्हां दोरीचें नसतें आणि दोरीचे असतें तेव्हां सर्पाचे नसतें. ही गोष्ट सिद्ध होते. त्याचप्रमाणें ज्या वेळीं विविध वस्तूंचा देखावा आपल्या नजरेसमोर असतो आणि या देखाव्याशिवाय दुसरें कांहींही आपणाभोंवतीं नसतें, तेव्हां अचल एकरूप आपणास दिसत नाहीं; पण ज्या वेळीं या स्थिररूपाची भेट आपणास होते त्या वेळीं सांप्रत दिसणारा देखावा दिसावयाचा नाहीं. यावरून दृश्यवादी आणि कल्पनावादी यांच्यांतील भेद आपणास कळून येईल. या दोघांच्या मतांत वास्तविक तथ्य किती आहे याचें अनुमान यावरून आपणास करतां येईल. दृश्यवादी आपल्या पुढचा देखावा मात्र पाहतात आणि तोच सद्रूप आहे असें म्हणतात. आणि कल्पनावादी हा देखावा निव्वळ खोटा आहे असें ह्मणतात; ज्याला खरोखरच इतकी दिव्य शक्ति प्राप्त झाली असेल आणि वारंवार बदलणारा हा देखावा ज्याच्या नजरेंतून नाहींसा झाला असेल त्यालाच हें विश्व एकरूप दिसेल. अनेक आकारांनीं भरलेलें व प्रतिक्षणीं बदलणारें असें विश्व त्याच्या नजरेंतून नष्ट होईल. अशाच मनुष्याला विश्व हें न बदलणारें व एकरूप आहे असें ह्मणण्याचा अधिकार प्राप्त होतो. दृश्यवाद्याला बदलणारें विश्व मात्र दिसत असतें. यामुळें त्याच्या मनांत स्थिर आणि न बदलणाऱ्या वस्तूला राहावयास अवकाशच नसतो स्थिररूप त्याच्या दृष्टीला दिसत नाहीं आणि याकरितां वारंवार बदलणारें हे विश्वच खरें आहे असें ह्मणण्याचा अधिकार त्याला आहे.

वेदांतशास्त्राचें एकंदर सार काय? हेंच कीं व्यक्तिविशिष्ट परमेश्वराची कल्पना करून या विश्वाचें कोडें पूर्णपणें उलगडत नाहीं. जेथें व्यक्तीचा संबंध येत नाहीं अशा अधिक उच्च वस्तूकडे धांव घेतल्याशिवाय या कोडयाचा

पुरा उलगडा होणें शक्य नाहीं. वेदांतशास्त्राचें हें ह्मणणें तर्कशास्त्रदृष्ट्याही शुद्ध आहे. अशा रीतीनें प्राचीन काळापासून चालत आलेली परमेश्वराची कल्पना आपण बाजूस ठेविली तरी त्यांत कांहीं बिघडलें असें नाहीं. यामुळें त्या कल्पनेचा नाश होईल अशी भीति बाळगण्याचें कारण नाहीं; ती कल्पना अपुरी असल्यामुळे ती क्षणभर बाजूस ठेवून अव्यक्तरूपाकडे जाणें आह्मांस भाग आहे. पूर्वींची व्यक्तिविशिष्ट कल्पना आमच्या सिद्धांताच्या पोटीं राहीलच. व्यक्ति कितीही मोठी झाली तरी तिला मर्यादा असणारच. अव्यक्त रूपच अमर्याद आणि अनंत असूं शकेल. अशा रीतीनें मर्यादित परमेश्वराची कल्पना कायम राखून आह्मी आमचा मार्ग पुढें काढतों. अनंत, अमर्याद आणि केवल रूपाच्या ब्रह्माची कल्पना आपण ग्रहण केली, तर व्यक्तिविशिष्ट परमेश्वराची कल्पना नाश पावेल कीं काय, अशी शंका पुष्कळ वेळां येते. व्यक्तिविशिष्ट परमेश्वराच्या कल्पनेचा संपूर्ण नाश करावा अशी वेदांताची इच्छा नसून तिचें स्वरूप अधिक शास्त्रीय आणि ग्राह्य करावें असा त्याचा हेतु आहे. व्यक्तिविशष्ट परमेश्वर सृष्टिबाह्य आणि यच्चयावत् सृष्टीपासून भिन्नस्वभाव आहे हें मत शास्त्राच्या कसोटीला मुळींच टिकत नाहीं हें आपण पाहिलेंच आहे—अशा परमेश्वराचें अस्तित्वच शक्य नाहीं. याकरितां व्यक्तिविशिष्ट परमेश्वर आणि अनंत व अमर्याद ब्रह्म यांची एकरूपता सिद्ध झाली ह्मणजे व्यक्तिशिष्ट परमेश्वराचें अस्तित्व आपोआपच सशास्त्र सिद्ध होईल.

कोणत्याही वस्तूचें ज्ञान तिच्या अंतर्गत स्वभावांतूनच मिळविलें पाहिजे ही गोष्ट सशास्त्र आहे. हीच पद्धत आपल्या या विचारसरणीला लागू केली म्हणजे वेदांताचा आणखी एक सिद्धांत या विचारमालेच्या शेवटीं निघतो. सकृद्दर्शनीं हा सिद्धांत मोठ्या धाष्टर्याचा वाटतो आणि हा सिद्धांत समजण्यासही मोठा कठिण आहे हें खरें. '**तत्त्वमसि**' हा तो सिद्धांत आहे. एकरूप, अनंत आणि ज्यांतून हें सारें विश्व उत्पन्न झालें तें ब्रह्म तूंच आहेस, हा तो सिद्धांत आहे. तें निराकार, अव्यक्त अस्तित्व तूंच आहेस. या साऱ्या विश्वभर ज्या परमेश्वराला तूं धुंडाळीत होतास तो परमेश्वर तूंच आहेस.

या सिद्धांताच्या बाबतींत अनेक प्रश्न उपस्थित होण्यासारखे आहेत आणि हळूहळू त्या साऱ्यांचा विचार करण्याचा माझा मानस आहे. यांत पुष्कळशा

अडचणी उपस्थित होतील; तथापि अद्वैतशास्त्राचें सामान्य मत काय आणि त्याचें स्थान कोणतें, याचा विचार प्रथम करणें अवश्य आहे. व्यक्तदर्शंत असतां आपण सारे परस्परांपासून भिन्न आहों; तथापि आमचें सर्वांचें सत्यरूप एकच आहे. त्या एकरूपाहून आपण वेगळे आहों ही कल्पना आपल्या चित्तांतून जों जों कमी होईल तों तों तें अधिक बरें. त्या अनंतरूपापासून आपण वेगळे आहों हीच कल्पना आपल्या साऱ्या दुःखाचें कारण आहे. ही कल्पना जों जों अधिक दृढ तों तों आमचे दुःखही अधिक भारी. या अद्वैतसिद्धांतावरूनच नीतिशास्त्राचा मूळपायाही सिद्ध होतो. किंबहुना या अद्वैतसिद्धांतावांचून कसलेही नीतिशास्त्र संभवणार नाहीं असेंही म्हणण्याचें धाष्टर्य मी करतों. परमेश्वरानें अथवा अमक्या विशिष्टव्यक्तीनें सांगितलें म्हणून तुम्ही अमुक प्रकारें वागा, ही नीतिशास्त्राची कल्पना फार प्राचीनकाळीं होती; पण ही कल्पना अर्वाचीन काळीं कोणीही ग्राह्य मानणार नाहीं; कारण, या कल्पनेच्या मुळाशीं असलेलें व्यक्तिविशिष्ट परमेश्वराचें स्वरूपच शास्त्रदृष्टया अग्राह्य आहे हें आपण नुकतेंच सिद्ध केलें. जेथें परमेश्वरालाच अवकाश नाहीं तेथें त्याच्या आज्ञेचा पाड काय? वेदांनीं सांगितलें म्हणून अमुक रीतीनें वागावें असे हिंदु म्हणतील; पण वेदांचा अधिकार ख्रिस्ती लोक मानणार नाहीत. ख्रिस्ती लोक बायबलाची आज्ञा मानतील; पण त्यांचें ह्मणणें मुसलमान कबूल करणार नाहींत. याकरितां या साऱ्यांचा अंतर्भाव ज्या एकांत होईल असा एकच महासिद्धांत आपणास हवा आहे. व्यक्तिविशिष्ट परमेश्वराची कल्पना कोटयवधि लोक खरी मानीत असतांही कांहीं उच्चदर्जाच्या मानवी मानांना ती अपुरी वाटली आणि असे लोक सामान्य जनसमूहाच्या कक्षेंतून बाहेर पडले. त्यांना धर्मच नकोसा वाटूं लागला. विशेषतः युरोपखंडांत तर अशी स्थिति आज सर्व देशांत आढळून येऊं लागली आहे.

सांप्रतच्या धर्मांच्या आकुंचितपणामुळे जे लोक अशा प्रकारें धर्मापासून फाटून निघाले आहेत, त्यांचाही समावेश धर्मांच्या क्षेत्रांत करून घेतां येईल, इतकें तें क्षेत्र रुंदावलें पाहिजे. जे जे सिद्धांत धर्म सांगतो त्यांचें परीक्षण बुद्धीच्या कसोटीवर व्हावयास पाहिजे. बुद्धीच्या कसोटीला आम्ही बांधलेले नाहीं, असा हक्क धर्मानें कां सांगावा याचें कारण कोणासही ठाऊक नाहीं.

विवेकबुद्धीची कसोटी मान्य करावयाची नसेल तर कोणत्याही तत्त्वाचें खरें परीक्षण करणें शक्यच नाहीं. व्यवहारांत आपण बुद्धीच्या मार्गानें चालतों. मग हीच शिस्त धर्मासही लागू कां करूं नये? बुद्धीची कसोटी धर्मासही अवश्य लागू केली पाहिजे. उद्यां एखादा धर्म उठेल आणि वाटेल तें भलतें कृत्य करावयास लागेल. फार लांब कशाला, मुसलमानी धर्माचें उदाहरण आपल्यासमोर आहेच. स्वधर्मीयांशिवाय दुसऱ्या कोणाचीही कत्तल करण्याची परवानगी मुसलमानी धर्मानें आपल्या अनुयायांस दिली आहे. "जे महंमदी धर्माचे नसतील असल्या काफिरांची कत्तल करा," असें स्पष्ट वचन कुराणांत आहे. परधर्मीयांवर हवे ते अत्याचार करण्यास महंमदी धर्माची कुलपरवानगी आहे. आतां अशा प्रकारचें कृत्य गर्हणीय आहे असें कोणाही महंमदीयास आपण म्हटलें तर तो सहजच कुराणाकडे बोट दाखवील आणि आपलें म्हणणें खोडून काढील. अशा रीतीनें कोणत्याही धर्माचा मनुष्य आपल्या धर्मपुस्तकाकडे बोट दाखवून आपल्या कोणत्याही कृत्याचें समर्थन करूं शकेल. याकरितां धर्मतत्त्वांचें परीक्षण बुद्धीच्या कसोटीवर न करतां केवळ धर्मपुस्तकावर भिस्त ठेवणें चुकीचें आहे. आतां परस्पर धर्ममतांची तुलना करावयाची म्हटलें तर तसें करण्याकरितांही एखादा कांटा अवश्य पाहिजे. त्यांची योग्यता ठरविण्याचें माप कोणतें मानावें? ख्रिस्ती लोक म्हणतील बायबल मूळ प्रमाण मानावें; मुसलमान म्हणतील कुराण मानावें, नवा करार आणि कुराण यांच्यांत कांहीं विरोध आला तर अखेर निकालाचा मक्ता या दोघांपैकीं कोणा एकास देऊन चालावयाचें नाहीं. हा तंटा तोडावयास तिसऱ्या न्यायाधिशाची योजना केली पाहिजे. ज्या अधिकाऱ्याकडे हा तंटा आपण नेणार तो अधिकारी पूर्णपणें स्वतंत्र बाण्याचा असला पाहिजे. अशी स्वतंत्र वृत्ति कोणत्याही एकाच ग्रंथांत आढळून यावयाची नाहीं. हें स्वातंत्र्य फक्त विश्वव्यापी तत्त्वापाशींच सांपडेल; आणि विवेकबुद्धीहून अधिक मोठें असें कोणतें तत्त्व जगांत उपलब्ध आहे? आतां यावरही एक आक्षेप येण्याचा संभव आहे. आपली विवेकबुद्धि झाली तरी ती पूर्ण बलवान् नाहीं. सत्याची व आपली भेट ती नेहमींच करून देते असेंही नाहीं—पुष्कळ वेळां ती चुका करते. याकरितां कोणत्या तरी धर्ममताचा न्याय आपण अखेरचा मानला पाहिजे, असा आक्षेप विवेकबुद्धीवर येण्याचा संभव आहे. एका

रोमन कॅथलिक धर्माधिकाऱ्यानें हा आक्षेप मला स्पष्ट बोलूनही दाखविला पण या आक्षेपांतलें तर्कशास्त्र माझ्या तरी ध्यानांत येत नाहीं. उलटपक्षीं मी असें म्हणतों कीं मनुष्याची विवेकबुद्धि खरोखरच इतकी कमकुवत असेल तर दहापांच धर्माधिकाऱ्यांची एकत्र झालेली बुद्धि अधिकच कमकुवत झाली पाहिजे. याकरितां त्यांच्या बुद्धीनें दिलेला निकाल मीं मान्य केला नाहीं आणि स्वबुद्धीवर मीं भिस्त ठेविली तर असें करण्यांत माझी चूक कोणती ? माझी विवेकबुद्धि कितीही कमकुवत झाली तरी कधीं ना कधीं तरी सत्या-पर्यंत तिची उडी पोंचेल; पण मी आपलें स्वातंत्र्य गमावून बसलों आणि प्रत्येक बाबींत दुसऱ्याच्या ओंजळीनें पाणी पिऊं लागलों तर सत्याची व माझी भेट होण्याचा संभव त्रिकालांतही नाहीं.

याकरितां आपण आपल्या बुद्धीला धरूनच चाललें पाहिजे, आणि दुसरे जे कोणी अशाप्रकारें चालणारे असतील, त्यांच्याशीं सहानुकंपा ठेविली पाहिजे. दुसऱ्या कोणाच्या वचनावर आंधळ्यासारखा विश्वास ठेवून कोटय-वधि देवदेवतांच्या मागे लागणारे धार्मिक बनण्यापेक्षां स्वतःच्या बुद्धी-च्या प्रकाशानें चालणारे धर्मलंड बनणेंही जगाला अधिक फायद्याचें आणि स्वतःला अधिक श्रेयस्कर आहे. आपणांस प्रगति हवी आहे. आपली वाढ होणें इष्ट आहे. आपलें पाऊल मागें न पडतां पुढें पडत राहिलें पाहिजे. स्वानुभव आपणास हवा. नुसत्या उपपत्तींचा काथ्याकूट करून कोणाचीही वाढ जगांत आजवर झालेली नाहीं. लक्षावधि पुस्तकें एकत्र झालीं तरी आपल्या आंगीं अधिक पावित्र्य येण्यास त्यांची मदत काडीचीही होणार नाहीं. हें सामर्थ्य एकटया स्वानुभवाच्याच आंगीं आहे आणि हा अनुभव आपणा स्वतःच्या ठिकाणीं असून तो घेण्याचा मार्ग आत्मानात्मविवेक, हा एकच आहे. याकरितां मनुष्यमात्रानें सदोदित विचाररत असणें अवश्य आहे. मातीचा गोळा कधींही विचार करीत नाहीं; पण यामुळेंच जन्मभर तो मातीचा गोळाच राहतो. मनुष्याला विचारशक्ति आहे हाच त्याचा खरा मोठे-पणा, हेंच त्याचें खरें वैभव, हीच त्याची खरी उज्ज्वलता. विचार करावा हा मनुष्याचा स्वभावच आहे. मनुष्य आणि पशु यांतील भेद हाच होय. विवेकीबुद्धीच्या आज्ञेवर माझा पूर्ण विश्वास आहे आणि तिच्या आज्ञेप्रमाणेंच चालण्याची माझी इच्छा आहे. केवळ दुसऱ्याच्या सांगण्यानें चालण्याचे परिणाम काय होतात हें मला स्पष्ट कळून चुकलें आहे.

सर्व विश्व वेदांतून निर्माण झालें आहे असें हिंदु मानतात. जो शब्द वेदांत नाहीं त्या वस्तूचें अस्तित्व त्रैलोक्यांत नाहीं. याकरितां प्रत्येक वस्तूच्या अस्तित्वाला वेदवचनाचा पुरावा अवश्य पाहिजे. केवळ पुस्तकांच्या आधारानें चालण्याचा परिणाम याहून अधिक वाईट होणें शक्य नाहीं. बरें; श्रुतींचा अभ्यास तरी मनापासून सर्व करतात असेंही नाहीं. एखादा गृहस्थ उठतो आणि आपल्या बुद्धीच्या बळावर एखादें श्रुतिवचन घेऊन अनंत उपपत्तींचें विलक्षण जाळें त्याभोंवतीं निर्माण करतो. अशा प्रकारें एकाच वचनावर अनेक उपपत्ती निर्माण होतात. पुढें त्याचे अनुयायी त्या उपपत्ती तशाच ग्राह्य धरून हाच क्रम पुढें अबाधित चालू ठेवतात. अशा रीतीनें हजारों वर्षांच्या जुनेपणाचा शिक्का त्यांजवर बसून त्यांना मोठा अधिकार प्राप्त होत असतो आणि पुष्कळ वेळां या अधिकाराचे दुष्परिणाम मनुष्यजातीला भोगावे लागतात. केवळ दुसऱ्याचा अधिकार शोधण्याची प्रवृत्ति झाल्यामुळें मनुष्यजातीची वाढ खुंटते. आपणास मोठें व्हावयाचें आहे, वाढावयाचें आहे, ही गोष्ट आपण नेहमीं ध्यानांत ठेविली पाहिजे. केवळ दुसऱ्याच्या तोंडाकडे पाहून सत्याची भेट होण्यापेक्षां स्वतःच्या बुद्धीनें चालून कांहीं चूक झाली तरी तीही पुरवली. खरा जीवटपणा यांत आहे. अद्वैत मतांत जो मुख्य गुण आहे तो हाच कीं एकंदर धर्मांत फक्त त्याच्याच उपपत्ति बुद्धिग्राह्य आहेत. परमेश्वरविषयक कल्पना कितीही उच्च असली तरी ती एकपक्षीय, अर्धवट आणि केवळ व्यक्तिपुरती असली तरी ती बुद्धिग्राह्य होऊं शकत नाहीं. अद्वैत सिद्धांताचें श्रेष्ठत्व याच बाबींत आहे. अद्वैत सिद्धांत या बाबींत इतर धर्मांहून वेगळा असला तरी दुसऱ्या कोणत्याही धर्मांशीं अथवा ग्रंथाशीं त्याचा विरोध नाहीं; इतकेंच नव्हे तर त्या धर्मांच्या परमेश्वरविषयक कल्पना सामान्य जनासाठीं आवश्यक आणि ग्राह्य आहेत असेंही तो ह्मणतो, हाच त्याचा विशेष होय. अद्वैत मताची अत्यंत उज्ज्वल बाजू ती हीच. द्वैतवाद्यांनीं सांगितलेली परमेश्वरविषयक कल्पना अशास्त्रीय असून ती विवेकबुद्धिग्राह्य नाहीं हेंही खरें; तथापि पुष्कळांच्या समाधानाची ती जागा आहे. चित्ताला समाधान व आसरा देईल अशा धर्मांची आवश्यकता पुष्कळांना आहे, ही गोष्ट आह्मांस कबूल आहे. शुद्ध सत्याचा अत्यंत उज्ज्वल प्रकाश पुष्कळांच्या डोळ्यांना सहन होण्यासारखा नाहीं हेंही

आह्मी जाणतों. हा प्रकाश नुसता सहन करण्याची शक्तिसुद्धां जेथें नाहीं तेथें त्या प्रकाशांत सदोदित राहण्याचें बल कोठून असणार? याकरितां पुष्कळांच्या चित्तास समाधान आणि आसरा देणारें हें मत राहिलें पाहिजे हें उघड आहे. यामुळें पुष्कळांचें पाऊल पुढें पडतें. ज्यांचीं मनें कमकुवत असतात आणि ज्यांच्या दृष्टीला लांबवर पाहण्याची संवय नसते, अशा लोकांना बारीकसारीक वस्तूच फार उपयोगीं पडतात. या वस्तूंचें कुंपण त्या लोकांच्या मनाभोंवतीं असतें, यामुळें त्यांचीं मनें हळूहळू वाढीस लागतात. त्यांच्या परमेश्वरविषयक कल्पना अगदीं क्षुद्र असल्या तरी त्यांच्या मनाला त्याजपासून मदत होते. असें आहे तरी अव्यक्त आणि केवल ब्रह्माची ओळख बुद्धिद्वारा करून घेणें इष्ट आहे; कारण, ही ओळख झाली ह्मणजे तिच्या द्वारें इतर बारीकसारीक तत्त्वांची ओळख अधिक चांगल्या प्रकारें करून घेतां येईल. अव्यक्त परमेश्वराचें रूप ज्याच्या बुद्धीला पटलें आहे असा जॉन स्टुअर्ट मिलसारखा मनुष्य व्यक्त परमेश्वराचें अस्तित्व सिद्ध करतां येत नाहीं असें ह्मणेल आणि त्याचें हें ह्मणणें आह्मांसही पूर्णपणें मान्य आहे. व्यक्त परमेश्वराचें अस्तित्व सशास्त्र सिद्ध करतां येत नाहीं हें खरें; पण अव्यक्ताचीं जीं कांहीं रूपें मानवी बुद्धीला समजण्यासारखीं आहेत त्या सर्वांत व्यक्त परमेश्वराचें स्वरूप हें अत्युच्च आहे. विश्व ह्मणजे तरी काय? सारें विश्व केवलरूपाचेंच व्यक्तरूप होय. एखादा मोठा ग्रंथ आपणापुढें उभा असावा तसें विश्व आपल्या डोळ्यांसमोर पसरलें आहे. प्रत्येकजण आपापल्या बुद्धीनें हा ग्रंथ वाचतो आणि प्रत्येकजण आपापल्यापरी त्याचा अर्थ सांगतो. साऱ्या मानवबुद्धींत कांहीं वस्तु सामान्य रूपाच्या असतात. या वस्तु सर्व लोकांच्या बुद्धींत सारख्याच असतात आणि यामुळेंच एकानें सांगितलेला अर्थ पुष्कळांच्या बुद्धीस पटतो. ही समोरची खुर्ची तुम्हांला आणि मला सारखीच दिसते. यावरून तुमच्या आणि माझ्या दृष्टीचे घटक सारखेच असले पाहिजेत हें उघड दिसतें. आपणांपैकीं प्रत्येकास पांच ज्ञानेंद्रियें आहेत. आतां अशी कल्पना करा कीं सहा इंद्रियें असलेला एखादा मनुष्य येथें आला तर त्याला हीच खुर्ची, खुर्ची या रूपानें दिसणार नाहीं; पण तुमचीं आमचीं ज्ञानसाधनें सारखींच असल्यामुळें सर्वांस एक वस्तु सारखीच प्रतीत होते. अशाच रीतीनें हें सारें विश्व वस्तुतः एकरूप आहे. त्याच्या स्वरूपांत

केव्हांही बदल होत नाहीं, आणि तें अव्यक्त आणि एकरूप आहे, आणि त्याचा दिसणारा देखावा हे आपण केलेले त्याचे निरनिराळे अर्थ होत. सर्व देखावे क्षणभंगुर आहेत हें आपणास निःसंशय कबूल असलें पाहिजे. प्रत्येक देखाव्याला अंत आहे. कोणताही देखावा अमर्याद आणि अनंत नाहीं. आपणास दिसणारा, भासणारा अथवा आपल्या कल्पनेंत येणारा प्रत्येक देखावा आपल्या ज्ञानानें मर्यादित आहे. आपल्या ज्ञानाची मर्यादा त्याजभोंवतीं पडलेली आहे. व्यक्त परमेश्वराची आपली कल्पना ही या देखाव्यांपैकींच एक आहे. कार्य आणि कारण हे शब्द फक्त व्यक्त विश्वांतच संभवतात. अव्यक्तांत कारण नाहीं आणि कार्यही नाहीं. देखावा सुरू झाला म्हणजे त्याचें कारण काय असा प्रश्न उद्भवतो; पण जेथें सारेंच एकरूप आहे तेथें कारण आणि कार्य या कल्पनांनासुद्धां थारा नाहीं हें उघडच आहे. याकरितां व्यक्त विश्वाचें कारण परमेश्वर आहे असें म्हटल्याबरोबरच त्या परमेश्वराभोंवतीं मर्यादेचें कुंपण तयार होतें; तथापि तोही अव्यक्त एकरूपाचाच भाग आहे हेंही खरें आहे. विश्व ह्मणजे आपल्या बुद्धीनें सांगितलेला अव्यक्ताचा अर्थ, अथवा आपल्या बुद्धीनें व्यक्तदशेला आणलेलें अव्यक्ताचें स्वरूप. या विश्वांत सत्य वस्तु ह्मणून जी आहे ती अव्यक्त ब्रह्म हीच असून कल्पना आणि आकार हे आपल्या बुद्धीनें आपण त्या अव्यक्त ब्रह्माच्या ठिकाणीं निर्माण केले आहेत. या समोरच्या टेबलांत अस्तित्व म्हणून जें आहे तें ब्रह्मरूप असून त्याचें टेबल हें रूप आणि त्याचा विशिष्ट आकार हीं आपल्या बुद्धीनें त्याला दिलीं आहेत.

देखावा हा मुख्यत्वेंकरून गतीवर अवलंबून आहे. गतीवांचून देखावा असणें शक्य नाहीं; पण अव्यक्त विश्वास गति नाहीं. विश्वाच्या पोटांतील प्रत्येक अणु आणि परमाणु अविरत गतीनें फिरत आहे; पण समष्टिरूप विश्व कधींही न बदलणारें आहे; कारण गति अथवा बदल या वस्तु सापेक्ष आहेत. एखादी वस्तु अचल अथवा स्थिर असते तेव्हां तिच्या अपेक्षेनें दुसरी वस्तु चल अथवा अस्थिर ह्मणविली जाते. अशा प्रकारें परस्परविरोधी स्वभावाच्या दोन वस्तू शेजारीं असल्याशिवाय गति आपल्या लक्षांत यावयाची नाहीं. एकरूप अथवा समष्टिरूप विश्व गतिवान् असूं शकणार नाहीं. कारण, त्याच्याशीं तुलना करण्यास त्याजपासून भिन्न असा दुसरा कोणता पदार्थ

असणार? याकरितां समष्टिरूपानें पाहतां विश्व हें केवलरूपच आहे असें म्हटलें पाहिजे; तथापि या विश्वाच्या पोटांतील प्रत्येक वस्तु एकसारखी चलस्थितींत असून तिचें स्वरूप प्रत्येक क्षणीं बदलत आहे. याकरितां विश्व हें जसें बदलणारें तसेंच न बदलणारेंही आहे. अव्यक्त अथवा केवल स्थितींत तें न बदलणारें असून तेंच विश्व व्यक्तस्थितींत बदलणारें आहे. '**तत्त्वमसि**' म्हणून जें रूप श्रुतीनें सांगितलें आहे तें विश्वाचें रूप हेंच. याकरितां अव्यक्त ब्रह्माच्या सिद्धांतानें व्यक्त परमेश्वराच्या कल्पनेचा नाश होण्याचें कारण नाहीं. केवलरूपामुळें सापेक्षरूप नाहींसें होतें असें नाहीं; इतकेंच नव्हे तर केवलरूपाचा सिद्धांत आपल्या बुद्धीला पटला म्हणजे सापेक्ष अथवा व्यक्त स्वरूपही विवेकबुद्धिग्राह्य होईल. व्यक्त परमेश्वर आणि विश्वांत जें जें कांहीं आपणास दिसतें तें सारें आपल्या मनोद्वारा दिसणारें अव्यक्त ब्रह्माचेंच स्वरूप होय. आपलीं मनें नाहींशीं झालीं आणि मी अमुक ही व्यक्तिविषयक भावना आपल्यांतून निघून गेली म्हणजे त्या अव्यक्त ब्रह्माशीं आपली एकरूपता होईल. '**तत्त्वमसि**' या महावाक्याचा अर्थ हा होय. हेंच आपलें खरें स्वरूप आहे. वस्तुतः आपण केवलरूप आहों.

व्यक्तदशेला येऊन मर्यादित झालेला मनुष्य आपलें उगमस्थान विसरतो आणि आपण अगदीं वेगळे प्राणी आहों अशी भावना तो करतो. व्यक्तदशेला येऊन एकमेकांपासून भिन्न झालेले आपण मनुष्यप्राणी आपलें खरें स्वरूप विसरतों, आणि आपण परस्परांपासून खरेच भिन्न आहों असा भ्रम आपणास होतो. हा विभक्तपणा टाकून द्या असें अद्वैत सिद्धांताचें सांगणें आहे; तथापि तो इतकेंच सांगत नाहीं तर हा विभक्तपणा कसा उत्पन्न झाला आणि त्याचें स्वरूप काय याचीही समजूत तो आपणास करून देतो. वस्तुतः आपण अनंत ब्रह्मरूप आहों आणि तें ब्रह्म आपणांत निरनिराळ्या व्यक्तींच्या द्वारें स्पष्टत्वास आलें आहे. त्या अनंत महासागराचें पाणी इतक्या अनेक पाटांनीं जणूं काय वाहात आहे. या पाटांच्या द्वारें तो अव्यक्त महासागर व्यक्तत्वास येत आहे. या जीवात्म्याच्या ठिकाणीं जें अनंतसामर्थ्य आहे, तें व्यक्त करण्याकरितां जीव जी धडपड करतो, तिलाच उत्क्रांति असें नांव आपण देतों. अनंतत्वाच्या या मानुषी अथवा व्यक्त बाजूकडे अखेरचा मुक्काम असा कोठेंच नाहीं. या बाजूकडे असतां पूर्ण विश्रांति घेण्याचें

एकही स्थल नाहीं. आपल्या ठिकाणीं अव्यक्त दशेंत असलेलें सच्चिदानंदरूप पूर्ण व्यक्त दशेला येऊन स्वतः अनंतरूप होईपर्यंत त्याची धडपड अशीच चालत राहणार. अनंत सत्ता, अनंत अस्तित्व आणि अनंत आनंद या वस्तू आधींच आमच्या मालकीच्या आहेत; त्या कोठून बाहेरून पैदा करावयाच्या नाहींत; त्या आमच्याच आहेत; पण आज त्या अव्यक्त दशेंत असून त्यांना व्यक्त दशेला आणावयाचें इतकेंच आपलें कार्य आहे.

अद्वैत सिद्धांताचें मुख्य रहस्य हें होय. अद्वैतवादाचा मध्यवर्ती सिद्धांत हाच. हा सिद्धांत नुसत्या बुद्धीनें समजावयालाही फार कठीण आहे. आपल्या बुद्धीवर अनंत पूर्वसंस्कारांचें दडपण आधींच पडलेलें असतें आणि त्यांतून जन्मापासून आजूबाजूची परिस्थिति आणखी नवें दडपण तिजवर घालीत असते. तूं एक दुबळा आणि यःकश्चित् प्राणी आहेस असें क्षणोक्षणीं ती आपणांस बजावीत असते. यामुळें आपलें वास्तविक स्वरूप काय आणि खरें सामर्थ्य आपल्या आंगीं किती आहे, हें आपणास समजत नाहीं आणि मग उतारवयांत आपल्या ठिकाणीं आत्मविश्वास उत्पन्न होत नाहीं. याकरितां आत्मानात्म विवेक हा एकच वाटाड्या आपल्या उपयोगीं पडण्यासारखा आहे. विवेकबुद्धीनें अखिल वस्तुजाताचें पृथक्करण करून आत्मा आणि अनात्मा यांची निवड झाली, म्हणजे आपलें खरें सामर्थ्य काय याची ओळख आपणास पटेल आणि वस्तुस्थितीचा अनुभव आपणास येईल. आपण जितकें कांहीं ज्ञान आज मिळविलें आहे तें कोठून आलें? तें आपल्याच ठिकाणीं होतें. आपणाबाहेर असें यत्किंचितही ज्ञान कोठें नाहीं. तें बाह्य पदार्थांत नव्हतें; तें मनुष्याच्या अंतरंगांत होतें. मनुष्यानें तें नवीनच उत्पन्न केलें असें नाहीं. जें आंत अस्तित्वांत होतें तें त्यानें बाहेर आणलें इतकेंच. अनेक बिघे व्यापून टाकणारा हा प्रचंड वटवृक्ष एका लहानशा बीजांत एके काळीं सामावला होता. हें बीज मोहरीच्या दाण्याच्या आठव्या भागाइतकेंही मोठें नव्हतें, आणि एवढ्याशा त्या बीजांत एवढ्या प्रचंड जीवनशक्तीचा समावेश झाला होता. आज उज्ज्वल रूपानें दिसणारी बुद्धिमत्ता अशाच रीतीनें एके काळीं अगदीं लहानशा बीजांत सामावली होती. अत्यंत क्षुद्र दर्जातून उत्क्रांति पावत पावत सध्यांचें उज्ज्वलरूप आपणास प्राप्त झालें आहे. त्या एका बीजांत अनंतशक्ति निद्रावस्थेंत पडलेली होती. आपली सध्यांची शक्ति

केवळ अन्नामुळें प्राप्त होते असें आपणास ह्मणतां येत नाहीं. कारण अन्नाचे डोंगर आपण रचिले तरी त्यांत कोणतें सामर्थ्य दिसणार आहे ? आपल्या ठिकाणची असलेली शक्ति गुप्तरूपानें आपल्याच ठिकाणीं होती, आणि अन्ना-मुळें ती व्यक्त दशेस आली. त्याचप्रमाणें जीवात्म्याच्या ठिकाणीं अनंत-शक्ति अव्यक्त दशेंत आहे. ही खुणेची गोष्ट त्याला पटली म्हणजे ती व्यक्त होईल. हा अनंतशक्तीचा राक्षस हळू हळू जागा होत आहे. आपल्या शक्तीची कल्पना त्याला हळू हळू होत आहे. या जाणिवेचें प्रमाण जों जों वाढत जाईल तों तों त्याला बांधणारी एक एक शृंखला तुटत जाईल आणि अखेरीस त्याचे सर्व पाश तुटून तो खडबडून उभा राहील आणि आपण अनंत सच्चिदानंद-रूप आहों असें उच्च घोषानें तो म्हणेल. हा अखेरचा विजय होईल तितक्या लवकर संपादन करण्याची तजवीज आपण करूं या.

---

१९

# व्यावहारिक वेदांत

## ( चतुर्थ पाद. )

गेल्या तीन व्याख्यानांत विश्वाचा विचार आपण समष्टिरूपानें केला. आतां या समष्टीशीं व्यष्टीचा संबंध काय आहे हें मी आपणास सांगणार आहें. प्रत्येक जीवात्मा म्हणजे एक एक भिन्न व्यक्ति असून ती मर्यादित आहे हें द्वैतमत यापूर्वी आपणास मीं सांगितलें आहेच. जीवात्म्यासंबंधीं दुसऱ्याही अनेक उपपत्ति आजपर्यंत सांगण्यांत आल्या आहेत. प्रत्येक जीवात्मा आपल्यापरि पूर्ण आहे येथपासून तों थेट आत्म्याला अस्तित्वच नाहीं असें मानणाऱ्या मतापर्यंत अनेक प्रकारचीं मतें अनेकांनीं सांगितलीं आहेत. गुण आणि पदार्थ यांजसंबंधीं युरोपांत जो वाद चालू आहे तशाच प्रकारचा हा वाद आहे. गुणांच्या पाठीमागें पदार्थ म्हणून कांहीं तरी आहे

व त्यांत गुणाचा अंतर्भाव झाला आहे तर दुसरा पक्ष पदार्थांचें अस्तित्व मानित नसून फक्त गुणांचें अस्तित्व मात्र मानतो. पदार्थांच्या अस्तित्वाची आवश्यकताच त्याला वाटत नाहीं. ''मी आहें असें जें आपणास नित्य वाटत असतें या आपल्या जाणिवेवरून जीवाबद्दलची प्राचीन उपपत्ति रचिली गेली. माझ्या देहांत अनेक प्रकारच्या घडामोडी घडत असतात. माझा देह लठ्ठ होतो अथवा रोडका होतो. तसेंच क्रमानें तो वाढत जातो; पण तसें असतांही त्याच्या आंत असलेला ' मी ' सदोदित एकरूपच असतो. कालचाच ' मी ' आज आणि आजचाच ' मी ' उद्यां असा अनुभव येत असल्यामुळें जीव हा स्वयंसिद्ध, स्वयंपूर्ण आणि मर्यादित असा असला पाहिजे ही उपपत्ति आपोआपच पुढें आली. उलटपक्षीं आत्म्याला मुळीं अस्तित्वच नाहीं असें म्हणणारें बौद्धमत निर्माण झालें. आपणास जें कांहीं दिसतें, ज्याचें ज्ञान आज आपणास झालें आहे अथवा पुढें कधीं होण्याचा संभव आहे तें सारें ज्ञान फक्त सदोदित बदलणाऱ्या बाह्य स्वरूपाचें मात्र आहे. याच्या पाठीमागें न बदलणारा आणि स्थिर असा एखादा पदार्थ असला पाहिजे असें मानण्याचें प्रयोजन नाहीं. या बदलणाऱ्या पदार्थामागें न बदलणारें एखादें अधिष्ठान असेल तर तें कोणत्याही प्रकारें आपल्या समजुतींत येणें शक्य नाहीं. अथवा आपल्या इंद्रियांच्या द्वारा तें जाणणें शक्य नाहीं. युरोपांतही अशाच प्रकारचा वाद आजमितीस सर्वत्र चालू आहे. संशयवादी, कल्पनावादी आणि जुन्या धर्माचे लोक अशा प्रकारचे पक्ष निर्माण होऊन येथेंही असेच वाद चालू आहेत. या अस्थिर सृष्टीच्या मागें कांहीं तरी स्थिर पदार्थ असला पाहिजे असें हर्बर्ट स्पेन्सर वगैरे पंडितांचें मत आहे. उलटपक्षाला दुसरे अनेक संशयवादी आहेत. या पक्षांत कॉम्टीचे अनुयायी व फ्रेडरिक हॅरिसन इत्यादिकांची गणना होते. या वादांत पुष्कळ पर्याय निघाले असले तरी त्यांतील सामान्य मुद्दा जुनाच आहे. अस्थिराच्या मागें स्थिर अधिष्ठान आहे कीं नाहीं हा तो मुद्दा होय. कांहीं तरी स्थिर अधिष्ठान असल्यावांचून अस्थिर पदार्थांची कल्पना करतां येणेंच शक्य नाहीं, असें एका पक्षाचें म्हणणें आहे. यावर अशा प्रकारचें अधिष्ठान मानण्याची आवश्यकता नाहीं असें दुसरा पक्ष म्हणतो. या दुसऱ्या पक्षाची उपपत्ति सामान्यतः बौद्धमतासारखीच आहे.

प्राचीन काळीं हिंदुस्थानांतही या मोठ्या वादाचा निकाल लागलेला नव्हता गुणामागें गुणाव्यतिरक्त पदार्थांचें अस्तित्व सिद्ध करतां येण्यासारखें नव्हतें स्वतःच्या अनुभवावरूनसुद्धां ही गोष्ट सिद्ध करतां यावयाची नाहीं. कालच जो 'मी' तोच आजचाही 'मी' आहें; कारण तशी मला आठवण आहे याकरितां माझ्यांत कोणताच बदल झालेला नाहीं असें ह्मटलें तर तेंही प्रत्यक्ष सिद्ध करतां यावयाचें नाहीं. या वादविवादांत नुसता शब्दछलही पुष्कळ वेळां आढळतो. 'मी करतों,' 'मी जातों,' 'मी निजतों,' 'मी चालतों' इत्यादि अनेक क्रियांच्या पोटीं वेगवेगळेपणा असतांही त्यांतील मी एकच असल्या-मुळें हा 'मी' स्थिररूप असला पाहिजे आणि तसेंच तो स्वतंत्र आणि स्वयं-सिद्ध असला पाहिजे असें अनुमान कित्येक काढतात; पण या अनेक क्रिया झाल्या तरी त्यांचा संबंध फक्त देहापुरता असतो. यांत वस्तुतः क्रियांचा वेगळेपणा नाहीं. यांत वेगळेपणा जो दिसतो तो केवळ शब्दापुरता आणि म्हणून भ्रामक आहे. करणें, जाणें, येणें इत्यादि क्रिया आणि 'मी' हे शब्द लिहितांना वेगवेगळे दिसले तरी क्रिया करणाराला हा 'मी' आणि 'ही माझी क्रिया' असे भिन्न भिन्न पदार्थ स्पष्ट बोटें ठेवून दाखवितां येणार नाहींत; इतकेंच नव्हे तर ही भिन्नता स्वतःच्या चित्तांतही त्याला ओळखतां येणार नाहीं.

मी खात असतों त्या वेळीं मी आणि खाण्याची माझी क्रिया हीं एकरूप झालेलीं असतात. मी धांवतों, त्या वेळीं धावणें आणि 'मी' या दोन वस्तु विभक्त नसतात. याकरितां स्वतःच्या अनुभवावरूनही स्थिर आणि चल अशा दोन पदार्थांचें भिन्न भिन्न अस्तित्व सिद्ध करतां येत नाहीं. आजचीच आठवण मला उद्यां असते आणि स्मरणशक्ति एकरूप आहे यावरून क्रिया आणि स्मरणशक्ति हीं दोन अस्तित्वें स्वयंपूर्ण आणि विभक्त आहेत असें निःसंशय सिद्ध होत नाहीं. माझें व्यक्तित्व केवळ माझ्या आठवणीवर अव-लंबून आहे असें नाहीं. माझ्या आठवणींतून पुष्कळशा गोष्टी नाहींशा झालेल्या आहेत. मग माझ्यांत त्यामुळें उणेपणा आला आहे काय ? कित्येक वेळां कांहीं अपघातानें कित्येकांचें सारेंच पूर्वस्मरण नाहींसें झाल्याचीं उदा-हरणें आहेत. कित्येक वेड्या लोकांना आपलें सारें शरीर कांचेचें आहे असें वाटतें; तर दुसऱ्या कित्येकांना आपण कुत्रा आहों असा भ्रम झालेला असतो. त्या मनुष्याचें अस्तित्व केवळ स्मरणशक्तीवर अवलंबून असतें तर

तो काचेचा झाला असता अथवा तो कुत्रा झाला असता; पण असें कधींही होत नाहीं. याकरितां आत्मवस्तूची ओळख स्मरणशक्तीसारख्या क्षुद्र वस्तूच्या साक्षीवर निश्चित करतां येत नाहीं. याकरितां मर्यादित असतांही स्वयंपूर्ण आणि एकरूप अशा आत्म्याचें अस्तित्व गुणविरहित ह्मणजे केवल स्थितींत सिद्ध करतां येत नाहीं. एका निरुंद जाग्यांत सामावलेलें आणि मर्यादित स्वरूपाचे अस्तित्व व त्याला चिकटलेले तथापि त्यापासून भिन्न असे गुण अशा प्रकारचें अस्तित्व आपणास सिद्ध करतां येत नाहीं.

याहून बौद्धांची वादपद्धति अधिक जोरदार आहे. गुणांच्या पलीकडे काय आहे हें आपणास जाणतां येत नाहीं आणि तें जाणणें आपणास शक्यच नाहीं, हें ह्मणणें तर्कशास्त्रपद्धतीला अधिक सुसंगत आहे भावना आणि इंद्रियज्ञान याजपासून उत्पन्न झालेले जे गुण त्यांनाच जीवात्मा अशी संज्ञा आपण लावतों असें बौद्धांचें म्हणणें आहे. गुणांच्या या एकत्र संघाताला जीवात्मा असें नांव असून या संघातांत क्षणोक्षणीं बदल होत आहे असें बौद्ध मत आहे.

या वादाची एकवाक्यता अद्वैतसिद्धांतानें केली आहे. परस्परविरोधी दिसणाऱ्या या उपपत्तींची तोंडमिळवणी अद्वैतानें केली आहे. गुण आणि पदार्थ या दोन वस्तु भिन्नपणें आपल्या ध्यानांत येत नाहींत हे मत अद्वैताला कबूल आहे. स्थिर आणि अस्थिर अशा दोन्ही वस्तूंचा विचार एकाच वेळीं करतां येणें आपणास शक्य नाहीं; तथापि गुण आणि त्याचें अधिष्ठान यांत वास्तविक भिन्नता आहे असें नाहीं. या दोन्ही वस्तू एकच आहेत. जें वस्तुतः स्थिर आहे तेंच बाह्यतः चल असल्यासारखें दिसतें. त्यांत खरोखर बदल होत असतो असें नाहीं; तर त्यांत बदल झाल्याचा भास होतो. विश्वाच्या मागें जो अचल पदार्थ आहे तो विश्वाहून भिन्नरूपाचा आहे असें नाहीं अथवा तो त्यापासून वेगळाही नाहीं. दृश्य आणि अदृश्य या दोन वस्तु भिन्नस्वभाव नाहींत आणि एकमेकींपासून वेगळ्याही नाहींत; तर अस्पष्ट वस्तूच स्पष्टत्वास येते आणि दृश्य दिसूं लागतें. जीवात्मा स्थिर आहे आणि जिला आपण भावना, ज्ञानग्रहण इत्यादि नांवें देतों ती सूक्ष्म वस्तु अथवा देहासारखी जड वस्तूही जीवात्माच होय. यांत जो भिन्नपणा दिसतो तो त्या वस्तूंत नसून आपल्या दृष्टिकोणांत मात्र आहे. देह, विकार, विचार,

भावना, जीवात्मा इत्यादि वस्तु एकमेकींपासून भिन्न आहेत असें पाहण्याची संवय आपणास जडून गेली असल्यामुळें त्या खरोखरच भिन्न आहेत असा भ्रम आपणास होतो; पण वस्तुतः ती एकच वस्तु आहे.

मी देह आहें, अशी माझी दृष्टि असते तेव्हां तीच वस्तु मला देह या रूपानें दिसते. ती देहरूपानें मला दिसत असते त्या वेळीं ती दुसऱ्या कोणत्याच रूपानें मला दिसत नाहीं. ती दोन तीन रूपांनीं एकाच वेळीं मला दिसते असें ह्मणणें चुकीचें आहे; कारण तसा प्रत्यक्ष प्रत्यय आपणास केव्हांच येत नाहीं. मी जीवात्मा आहें, असें मला दिसतें त्या वेळीं देह नाहींसा होतो. त्या वेळीं देहाचें अस्तित्व मला भासत नाहीं. देहाच्या अस्तित्वाची जाणीव नाहींशी होईपर्यंत आत्म्याच्या अस्तित्वाचा प्रत्यय कोणासही येणें शक्य नाहीं. त्याचप्रमाणें गुणांचें अस्तित्व अदृश्य होईपर्यंत त्याच्या मागच्या अधिष्ठानाची जाणीव होणें कोणासही शक्य नाहीं.

ही उपपत्ति सिद्ध करण्यासाठीं रज्जुसर्पन्यायाचें उदाहरण अद्वैतशास्त्र नेहमीं देत असतें. येथें सर्प पडला आहे असा भास मनुष्याच्या डोळ्यांवर कायम असतो तोंपर्यंत दोराचें अस्तित्व नसतें, आणि दोर दिसूं लागला ह्मणजे सर्प नाहींसा होतो. अपूर्ण समजुतीमुळें गुण आणि पदार्थ यांचें अस्तित्व भिन्न आहे, अशा प्रकारच्या समजुतींचा उद्भव झाला. अशा प्रकारच्या द्वैतकल्पनांचा प्रसार होऊन आपल्या कानांवर त्या वारंवार आदळूं लागल्या आणि ग्रंथांतरींही त्याच कल्पना आपण वाचूं लागलों म्हणजे अशा प्रकारचा भेद खरोखरच असला पाहिजे असा भ्रम आपल्या बुद्धीला होतो. देह आणि आत्मा अशा दोन्ही वस्तूंची जाणीव एकाच वेळीं आपल्याठिकाणीं असते असें खरोखरच आपणास वाटूं लागतें; पण वस्तुतः अशी द्विधा अथवा त्रिधा जाणीव एकाच वेळीं आपल्या ठिकाणीं कधींही नसते. एका वेळीं एकच जाणीव आपणास असणें शक्य आहे. मग ती जाणीव देहाची असो अगर आत्म्याची असो. हे सिद्ध करण्यासाठीं मोठ्या बुद्धिवादाची आणि प्रमाणांची जरूर आहे असेंही नाहीं. आपल्या मनाशीं थोडासा विचार तुह्मीं केला तर ती गोष्ट तुमची तुम्हांसच समजण्यासारखी आहे. मी आत्मा आहें आणि देह नाहीं अशी भावना करण्याचा यत्न करून पाहा. अशी भावना उत्पन्न करणें जवळ जवळ अशक्यच आहे असें तुम्हांस आढ-

कून येईल. ज्या एखाद्याला ही गोष्ट शक्य होईल त्याला देहाची आणि आत्म्याची जाणीव एकाच वेळीं आपणास कधींही नसते असा अनुभव येईल. मी आत्मा आहें अशी भावना पूर्ण झाली कीं त्याच क्षणीं देहभावना नष्ट होते. उन्माद वायु ज्याला झाला आहे असा मनुष्य अथवा कांहीं औषधांमुळें विपरीत मानसिक स्थितींत गेलेला मनुष्य तुमच्या पाहण्यांत आला असेल. त्याच्या अनुभवाची छाननी तुम्हांस करतां आली तर ज्या वेळीं कांहीं अंतर्गत वस्तूंचा अनुभव अशा मनुष्यांस येत असतो त्या वेळीं त्यांची देहभावना नष्ट झालेली असते असें तुह्मांस आढळून येईल. यावरून अस्तित्व एकच आहे हें उघड सिद्ध होतें. तें एक अस्तित्व इतक्या अनंतरूपांनीं दिसत असतें; आणि हे अनंत आकार दिसूं लागल्यामुळेंच कारणकार्यांच्या श्रेणींची उत्पत्ति झाली आहे. कारण आणि कार्य यांच्यांतील परस्परसंबंध उत्क्रमणाचा आहे. कारणाचेंच उत्क्रमण होऊन त्याचें कार्य बनतें आणि कार्याची अपक्रांति होऊन त्याचें पुन्हां कारण बनतें. कार्य दिसत असतें त्या वेळीं कारण नाहींसें झालेलें असतें; कारण नाहींसें होऊन त्याचें कार्य मात्र जणूं काय शिल्लक राहतें. जीवात्मा हा देहाचें कारण असेल तर जणूं काय तें कारण ह्मणजे जीवात्मा नाहींसा होऊन त्याचें कार्य ह्मणजे देह मात्र शिल्लक उरतो; आणि हें कार्य ह्मणजे देह नाहींसा झाला म्हणजे त्याचें कारण जो जीवात्मा तो शिल्लक उरतो. देह आणि आत्मा अशीं भिन्न अस्तित्वें मानण्याचें कारण नाहीं, या बौद्धमताला अद्वैताच्या या उपपत्तीनें पुष्टि येते.

स्थिरतेची कल्पना विश्वाच्या समष्टिरूपाबरोबरच करतां येणें शक्य आहे. विश्व हें वस्तुतः एकरूप आहे, हा सिद्धांत प्रथम मान्य केल्याशिवाय त्याच्या स्थिरपणाची कल्पना करतां येणें शक्य नाहीं. त्यांतील एखादी व्यष्टि म्हणजे एखादा भाग पाहून स्थिरतेची कल्पना आपणास करतां येणार नाहीं. गति आणि अदलाबदल यांची कल्पना प्रथम असल्याशिवाय व्यष्टींची म्हणजे निरनिराळ्या भागांची कल्पना आपल्या मनांत येऊं शकणार नाहीं. गति आणि स्थैर्य या दोन भिन्न कल्पना लक्षांत येण्यास दोन भिन्न पदार्थांची कल्पना प्रथम असणें अवश्य आहे. जी वस्तु मर्यादित आणि अस्थिर असते ती आपल्या जाणिवेंत येऊं शकते; कारण तीहून दुसऱ्या अधिक स्थिर वस्तूशीं तिची तुलना आपणास करतां येते; पण समष्टिरूप विश्व स्थिरच

असलें पाहिजे; कारण त्याच्याशीं तुलना करण्यास त्याहून भिन्न अशी दुसरी वस्तूच आपणापाशीं नसल्यावर त्याची तुलना आपण कशाशीं करणार ? चल वस्तु असे शब्द आपण उच्चारतों तेव्हां त्यांच्या तुलनेनें स्थिर वस्तु अशी कल्पना आपल्या चित्तांत अगोदरच असते. स्थिर वस्तूची कल्पना अगोदर असते ह्मणून तिच्या अपेक्षेनें दुसऱ्या वस्तूला आपण चल म्हणतों; पण जेथें सारें अस्तित्व एकच झालें तेथें त्याच्याशीं तुलना करावयास दुसरी वस्तूच नाहीं.

याकरितां समष्टिरूप अथवा विश्वरूप आत्मा हा अमर आणि अचल आहे असा अद्वैताचा सिद्धांत आहे; आणि समष्टिरूपानें पाहतां हा सिद्धांत विवेकबुद्धीलाही ग्राह्य होणार नाहीं. अडचण येते ती फक्त व्यष्टीच्या विचाराच्या वेळीं येते. आपल्या चित्तावर द्वैताच्या कल्पनांचा पगडा पूर्णपणें बसलेला आहे. यामुळें हे सर्व आत्मे भिन्नभिन्न असून मर्यादित आहेत असा आपला पक्का समज झालेला आहे. हा समज नाहींसा झाल्याशिवाय समष्टिरूप आत्म्याची कल्पना आपणास व्हावयाची नाहीं आणि तो अनंत व अचल आहे हेंही आपणास पटावयाचें नाहीं.

विश्वात्मा समष्टिरूपानें अनंत आहे हें आपल्या लक्ष्यांत आतां आलें असेलच; तथापि आपले व्यष्टिरूप आत्मे अनंत असावे अशी जी आपली इच्छा तिची वाट काय लागणार हीच मोठी अडचण आहे. आमचें खरें स्वरूप अनंत आहे ही गोष्ट खरी; पण आमचे हे व्यष्टिरूप जीवात्मे अनंत असावे अशी आपली इच्छा आहे. हे व्यष्टिरूप जीवात्मे आपापल्यापरी स्वतंत्र असून त्यांच्यांत एकसारखा बदल सुरू आहे असा अनुभव आपणास येतो. ते एकच असून एक नाहींत असाही अनुभव आपणास आहे. कालचा जो 'मी' तोच आजचाही ' मी ' आहें या अनुभवाबरोबरच त्यांच्यांत कांहीं बदल झाला आहे—तो वाढला आहे—हाही अनुभव येतो. आतां या चलवस्तूंच्या मागें स्थिर अधिष्ठान आहे ही द्वैतवादाची कल्पना सोडून दिली आणि प्रत्येक वस्तूंत एकसारखी उत्क्रांति होत आहे ही अर्वाचीन कल्पना ग्राह्य मानली तर मनुष्यदेहाच्या आंतला 'मी' प्रत्येक क्षणीं वाढत आहें असें आपणास आढळून येईल.

अत्यंत क्षुद्र जंतूचा विस्तार होत होत ज्याचा मनुष्यप्राणी झाला तो अत्यंत क्षुद्र प्राणी आणि आजचा मनुष्य हे मूलतः एकरूपाचेच आहेत. त्या क्षुद्र प्राण्याचें जें मोठें विस्तार पावलेलें रूप तोच मनुष्य. अत्यंत क्षुद्र जंतूपासून तों मनुष्यापर्यंत विस्तार पावण्याचें हें कार्य एकसारखें सुरू होतें आणि तेंच कार्य अनंतरूपाला पोहोंचण्यासाठीं पुढें सुरू आहे. याकरितां मर्यादित जीवात्मा अनंत आत्मरूपाचा होण्याकरितां एकसारखा विस्तार पावत आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. तो अनंत झाला म्हणजे ही क्रिया अर्थातच थांबेल; कारण, तेथें तो पूर्णरूप होईल; पण जोंपर्यंत तो पूर्णरूपाच्या अलीकडल्या बाजूस आहे तोंपर्यंत विस्तार पावण्याची क्रिया चालू राहील हें उघडच आहे.

पूर्वींच्या अनेक मतांची एकवाक्यता करण्याकडे अद्वैतवेदांताचा कल आहे. पुष्कळशा बाबींत त्याच्या या विशेष गुणांमुळें त्याचा फायदा झाला आणि कांहीं थोड्या बाबींत त्याचें नुकसानही झालें. अर्वाचीन काळांतली उत्क्रांतीची उपपत्ति आमच्या प्राचीन ऋषिवर्यांस ठाऊक होती. वाढ हळूहळू होते ही गोष्ट ते विसरले नव्हते. यामुळेंच पूर्वींच्या सर्व मतांचें एकीकरण करण्याचा यत्न त्यांनीं केला. गतकल्पना तुच्छ समजून त्यांनीं टाकून दिल्या नाहींत. बौद्धांची नजर येथें चुकली. वाढ हळूहळू होते या गतानुभवाची आठवण त्यांना राहिली नाहीं. यामुळें पूर्वींच्या कल्पना मूर्खपणाच्या व त्याज्य असें म्हणून त्यांनीं त्यांचा अव्हेर केला. त्यांचा अंतर्भाव आपल्या पोटीं करून त्यांची एकवाक्यता आपल्या सिद्धांतांशीं करण्याचा यत्न त्यांनीं केला नाहीं.

अशा प्रकारची प्रवृत्ति कोणत्याही धर्माला फार अहितकारक आहे. पूर्वींच्याहून एखादी चांगली आणि नवी अशी कल्पना एखाद्या मनुष्याला सुचते. या नव्या कल्पनेनें त्याचें क्षितिज अधिक विस्तृत होतें. त्या उंच जाग्यावरून पूर्वींच्या कल्पनांकडे तो पाहतो. या नव्या कल्पनेच्या तुलनेनें त्या त्याला फिक्या दिसतात आणि या नव्या कल्पनेच्या उल्हासाच्या भरांत जुन्या कल्पना दुष्ट आणि टाकाऊ आहेत असें तो म्हणूं लागतो; पण त्याच्या मनांत असें येईना कीं आज ग्राम्य अशा दिसणाऱ्या त्या गत कल्पना त्याच्या त्या काळाच्या परिस्थितीला अनुरूप आणि अनुकूल अशाच होत्या; इतकेंच

नव्हे तर त्याच्या मनाची त्या काळांतली वाढ लक्ष्यांत घेतां त्या अत्यंत आवश्यकही होत्या. त्या कल्पनांचा प्रवेश त्याच्या मनांत त्या कालीं झाला ह्मणूनच त्याचें मन वाढीस लागलें आणि सांप्रतच्या उच्च कल्पनेचें ग्रहण करण्यास तें योग्य झालें. त्या जुन्या कल्पना त्या काळीं नसत्या तर सांप्रतच्या स्थितीलाही तो येऊन पोंचला नसता. हें तत्त्व लक्ष्यांत बाळगूनच अद्वैत सिद्धांत पूर्वींच्या साऱ्या कल्पना त्याज्य समजत नाहीं. अद्वैत सिद्धांत निर्माण होण्याच्या पूर्वी द्वैतादि जीं मतें अस्तित्वांत होतीं त्या साऱ्यांचा अंतर्भाव आपल्या पोटीं करून त्यांचा योग्य परामर्ष अद्वैतानें घेतला आहे. एकच सत्य अनेक मार्गानीं विशद होत असतें व द्वैतादि सारीं मतें या एकाच सत्याकडे धांव घेत आहेत हें अद्वैत मतानें लक्ष्यांत घेतलें आहे.

याकरितां मानवकुलाच्या आध्यात्मिक उन्नतीसाठीं या साऱ्या मतांचें अस्तित्व असणें इष्ट असल्यामुळें त्यांना शिव्याशाप न देतां योग्य प्रकारें त्यांचें जतन करणें हेंच इष्ट आहे. याकरितांच वेदांतानें या साऱ्या मतांचें रक्षण आजपर्यंत केलें आहे. कोणत्याही मताचा उच्छेद त्यानें केला नाहीं. या अनेक मतांचा उल्लेख अद्वैत ग्रंथांत आढळतो.

मनुष्य मृत झाला म्हणजे त्यानें केलेल्या कर्मानुरूप त्याची रवानगी कोणत्या तरी लोकांत होते असें द्वैतमत आहे. या साऱ्या कल्पना वेदांत शास्त्राच्या ग्रथांत आजही जशाच्या तशाच आढळतात. द्वैतादि मतांनीं सत्य वस्तूचें उद्घाटन आपापल्यापरी अंशतः केले आहे आणि पूर्ण सत्याकडे जाणाऱ्या जिन्याच्या त्या एकाहून एक उच्च पायऱ्या आहेत हें रहस्य ओळखून वेदांतानें या साऱ्या मतांची योजना त्यांच्या योग्यतेनुरूप केली आहे.

हें सारें विश्व जड वस्तु अथवा शक्ति यांतून कोणाच्या तरी विशिष्ट इच्छेनें निर्माण झालें आहे असा द्वैतमताचा आशय आहे; आणि ज्या इच्छाशक्तीनें तें निर्माण झाले ती शक्तिही विश्वांतर्गत नसून विश्वबाह्य आहे असें त्याचें म्हणणें आहे. द्वैत सिद्धांताच्या या मताप्रमाणें मनुष्यप्राण्यांतही देह आणि आत्मा अशा दोन भिन्न वस्तूंचे अस्तित्व आहे; आणि त्याचा जीवात्मा मर्यादित असला तरी त्या व्यष्टिरूपांत तो पूर्णस्वरूपाचा आहे. द्वैतमताचा हा मुद्दा लक्ष्यांत घेतला म्हणजे मृत्यूनंतर आत्म्याचें अस्तित्व व स्वर्गवैकुंठादि लोकीं त्याचें गमन या कल्पना या मूळ सिद्धांताशीं सुसंगत आहेत असें

आढळून येतें. वेदांतशास्त्रानें त्यांचा उच्छेद न करतां त्या तशाच राहूं दिल्या आहेत; याकरितां त्यांचा थोडाफार परामर्ष घेणें आपणासही योग्य आहे. द्वैतमताप्रमाणें आपल्या या दृश्य देहामागें एक सूक्ष्म देह आहे. हा सूक्ष्म देहही जड वस्तूंचाच बनला आहे. या सूक्ष्म देहांत आपलीं सारीं कर्में सांठविलेलीं असतात. आपले सारे विचार आणि भावना हींसुद्धां सूक्ष्मरूपानें येथेंच राहतात. याच बीजांतून योग्य काळीं नवे आकार निर्माण होतात. आपल्या मनांत आलेला प्रत्येक विचार आणि आपल्या हातून घडलेलें प्रत्येक कर्म यांचा कालांतरानें परिपाक होऊन तीं बीजरूप होतात आणि सूक्ष्म देहांत त्या रूपानें राहतात. योग्य काळ येतांच हीं कर्में बाहेर पडतात आणि अखेरीस फळापर्यंत येऊन पोंचतात. या परिपाकानुरूपच मनुष्याच्या भावी जीवनक्रमाची घटना होत असते. अशा रीतीनें आपल्या भावी आयुष्यक्रमाचा सांचा प्रत्येक मनुष्य आपापल्या हातानेंच तयार करीत असतो. स्वतः निर्माण केलेल्या कायद्यावांचून दुसऱ्या कोणत्याही कायद्याचें बंधन मनुष्याला नाहीं. आपले विचार, आपले शब्द आणि आपल्या कृति हीं सारीं दोऱ्यांसारखीं असून या दोऱ्यांचें जाळें आपल्या भोंवतीं आपणच आपल्या हातानें विणीत असतों; आणि मग हें जाळें परिस्थित्यनुरूप केव्हां सुखकारक तर केव्हां दुःखकारक होत असतें. कर्मचक्राला एकवार आपण गति दिली म्हणजे तिचा आवेग संपून जाईपर्यंत जे जे परिणाम तिच्यांतून निघतील तें भोगण्यावांचून आपणास गत्यंतर नाहीं. कर्माचा कायदा तो हाच. सूक्ष्म देहामागें जीवात्मा राहतो. या जीवात्म्याचा आकार आणि त्याचें क्षेत्रमापन यांजबद्दल अनेक मतें असून त्यांची एकवाक्यता झालेली नाहीं. कित्येकांच्या मतें तो अणुप्रमाण आहे, आणि दुसऱ्या कित्येकांच्या मतें तो फार मोठा आहे. हा जीवात्मा परमात्म्याचा अंश असून तो अनाद्यनंत आहे. स्वतःचें पावित्र्य स्पष्टत्वास आणण्यासाठींच इतक्या अनेक आकारांतून त्याला जावें लागतें. जीं जीं कर्में या स्पष्टत्वाच्या आड येतात तीं कर्में आणि ते विचार दुष्ट असून, जीं कर्में त्या स्पष्टत्वाला मदत करतात तीं पुण्यकर्में होत. अत्यंत ग्राम्य अशा द्वैतवाद्यापासून तों अत्यंत श्रेष्ठ अशा अद्वैतवाद्यापर्यंत एक सिद्धांत मात्र सर्वांना सारखाच कबूल आहे. तो हाच कीं जीवात्म्याच्या ठिकाणीं साऱ्या शक्ती आधींच एकवटल्या आहेत. त्या शक्ती त्याच्या ठिका-

णींच असून त्या बाहेरून कोठून आणावयाच्या नाहींत. या साऱ्या शक्ती बीजरूपानें त्याच्या ठिकाणीं असून त्या स्पष्टत्वास आणणें इतकेंच कार्य या देहांत आपणास करावयाचें आहे.

त्याच प्रमाणें पुनर्जन्माच्या उपपत्तीबद्दलही सर्वांची एकवाक्यता आहे. हा देह सोडल्यानंतर दुसऱ्या देहांत जीव प्रवेश करतो आणि नंतर तो सोडून तिसऱ्यांत जातो. अशा रीतीनें या लोकीं अथवा लोकांतरीं त्याचीं देहांतरें होत असतात. सर्व लोकांत मृत्युलोक या साऱ्या मतांनीं श्रेष्ठ मानला आहे. मनुष्यजन्माचें सार्थक्य होणें फक्त मृत्युलोकांतच शक्य आहे. दुसऱ्या लोकांत येथल्यापेक्षां सुख पुष्कळच अधिक आणि त्या मानानें दुःख अगदींच थोडें असें त्यांनीं कल्पिलें आहे; यामुळेंच मनुष्याच्या मनांत अधिक उच्च विचार इतर लोकीं येत नाहींत असेंही त्यांचें म्हणणें आहे. मृत्युलोकांत सुख थोडें आणि त्या मानानें दुःख डोंगराएवढें ही गोष्ट खरी, पण दुःखामुळेंच मनुष्य कधीं तरी जागा होतो आणि या सुखदुःखद्वंद्वांतून कायमचा मुक्त होण्याचा यत्न तो करूं लागतो. या लोकींसुद्धां फार श्रीमंत मनुष्यांना दुःखाचें वारें कमी लागतें, यामुळें उच्च विचारांची जागृति त्यांच्या चित्तांत होण्याचा संभव कमी असतो. त्याचप्रमाणें स्वर्गलोकांत गेलेल्या जीवालाही उच्च विचारांच्या जागृतीचा संभव फारच कमी असतो. तेथें त्याची प्रगति होऊं शकत नाहीं. अत्यंत श्रीमंत मनुष्याची जी स्थिति येथें तिचीच सुधारून वाढविलेली आवृत्ति स्वर्गलोकांत असते. तेथें जीवात्म्याला मिळालेला देह सूक्ष्म आणि निकोप असतो, त्याला रोगाचें भय नसतें, त्याला खाण्यापिण्याची गरज भासत नाहीं, आणि त्याच्या सर्व इच्छांची तृप्ति तेथें होत असते. एकामागून एक सुखोपभोग भोगीत जीवात्मा आपला काळ कंठीत असतो; पण यामुळेंच आपल्या खऱ्या स्वरूपाचा विसर त्याला होतो; तथापि या स्वर्गलोकाहून आणखी निराळ्या लोकाची कल्पनाही द्वैतमतांत आढळते. या दुसऱ्या लोकांत स्वर्ग लोकाप्रमाणेंच सुखोपभोग उपलब्ध असतांही जीवात्म्याची उन्नति थांबत नाहीं. ईश्वराबरोबर जीवात्म्याचा चिरकाल वास असणें हेंच मानवी जीविताचें अखेरचें साध्य आहे, अशीही कल्पना कित्येक द्वैतवाद्यांनीं केली आहे. परमेश्वराबरोबर त्याच लोकीं राहणाऱ्या जीवात्म्यांना सुंदर देह प्राप्त होतात, त्यांना जरा अथवा मृत्यु यांचें भय

नसतें, त्यांना कोणत्याही दुःखाचा स्पर्श होत नाहीं आणि त्यांच्या सर्व इच्छा तृप्त होतात, अशीही या द्वैतवाद्यांची कल्पना आहे. त्यांच्या मताप्रमाणें यांतील कित्येक जीवात्मे मनुष्यदेह धारण करून मृत्युलोकीं येतात व ईश्वराकडे जाणाऱ्या मार्गाची ओळख मनुष्यांस ते करूं देतात. या जगांत जे अवतारी पुरुष होऊन गेले ते यांपैकींच होत असें त्यांचें ह्मणणें आहे. ते स्वतः मुक्त होते आणि अत्युच्च लोकांत ईश्वरासन्निध ते राहत होते; पण दुःखपीडित मनुष्यप्राण्याबद्दल त्यांच्या चित्तांत दया उपजल्यामुळें आणि मनुष्यजातीवरील त्यांच्या प्रेमामुळें मृत्युलोकीं येऊन त्यांनीं मनुष्यदेह धारण केला आणि मुक्तीचा मार्ग मनुष्यांस दाखविला.

द्वैतवाद्यांचें हें म्हणणें अद्वैत वेदांताला मान्य नाहीं हें पूर्वी एकवार आपण पाहिलेंच आहे. अनंताशीं एकरूप होणें हें अद्वैताचें अखेरचे साध्य आहे. मर्यादित साध्य केवढेंही मोठें आणि केवढयाही उच्च दर्ज्याचें असलें तरी अद्वैताला तें नको. अनंतरूप होण्याच्या अलीकडील कोणतीही पायरी स्वीकारण्यास अद्वैत वेदांत तयार नाहीं; आणि अनंत व्हावयाचें म्हटलें तर कोणत्याही प्रकारचा देह असणें तेथें शक्य नाहीं. कारण, मर्यादित पदार्थातूनच देहाची उत्पत्ति होणें शक्य आहे. मग मर्यादित पदार्थातून अमर्याद देह कसा निघणार ? देह अमर्याद असणें शक्य नाहीं. याकरितां आपणास अमर्याद व्हावयाचें असेल तर देहाच्या पलीकडेच आपणास गेलें पाहिजे. एवढेंच नव्हे तर आपणास विचारातीतही झालें पाहिजे असें अद्वैताचें मत आहे. त्याचप्रमाणें हें स्वातंत्र्य कोठून बाहेरून आणावयाचें नसून आपणापाशीं तें अगोदरच सिद्ध आहे असेंही अद्वैताचें मत आहे. या आपल्या स्वतंत्र रूपाचा विसर आपणास पडला असल्यामुळेंच आपण परतंत्र आहों असा भ्रम आपणास होतो. पूर्णत्व हें कोठून बाहेरून मिळवावयाचें नसून आपणापाशीं तें आधींच आहे; त्याचप्रमाणें अमरत्व आणि आनंदरूपता या वस्तूही बाहेरून कोठून मिळवावयाच्या नसून आपणापाशीं त्या अगोदरच सिद्ध आहेत. या साऱ्या वस्तु आपल्याबरोबर चिरकाल आहेत.

मी मुक्त आहे असा तुमचा निश्चय ज्या क्षणीं होईल त्याच क्षणीं आपल्या अनंतत्वाचा अनुभव तुह्मांस येईल. मी बद्ध आहें असा जप जोंपर्यंत तुह्मी करीत राहाल तोंपर्यंत तुह्मी खरोखरच बद्ध राहाल. अद्वैत वादानें हा सिद्धांत

उच्च घोषानें सांगितला आहे. आतां द्वैत आणि अद्वैत या दोन्ही मतांचे सिद्धांत तुमच्यासमोर आहेत. यांपैकीं तुम्हांस आवडेल तो तुह्मी घ्या.

अद्वैतमताचा अत्युच्च सिद्धांत आणि त्याचें साध्य हीं नुसत्याबुद्धीनें समजण्यासही फार कठिण आहेत. या सिद्धांतांबद्दल वादविवाद अद्यापि सुरू आहेत, आणि मोठ्या अडचणीची गोष्ट ती ही कीं एखाद्याला कांहीं सिद्धांत समजले म्हणजे जगांत सत्य तें इतकेंच अशी कल्पना करून इतर पंथांच्या लोकांशीं तो भांडूं लागतो. माझें खरें आणि तुमचें खोटें अशा प्रकारचे निरर्थक तंटे मात्र सुरू होतात. असें करण्यांत अर्थ नाहीं. तुह्मांला योग्य दिसेल त्या मार्गानें तुह्मी सुखानें जा आणि दुसऱ्याला त्याच्या मार्गानें जाऊं द्या. तुम्हांला देहात्मवाद पसंत असेल आणि या क्षुद्र देहाला चिकटून बसावें अशी तुमची इच्छा असेल तर तसे करून तुम्ही आपले भोग भोगीत खुशाल रहा. या देहांतच सुखसर्वस्व आहे असा अनुभव तुम्हांस आला असेल तर तुमची इच्छा तृप्त होईपर्यंत या देहाला खुशाल चिकटून रहा. तुमचें बरेंवाईट तुमच्याच हातांत आहे. आपल्या इच्छेस अनुसरून वाटेल तसें वागण्याची पूर्ण मुभा तुम्हांस आहे. देहात्मवाद सोडून द्या असा जुलूम तुमच्यावर कोणीही करूं शकत नाहीं. आपण सामान्य मनुष्य असावें इतकीच तुमची हांव असेल तर या सामान्य स्थितींत खुशाल रहा. आपण देवदूत व्हावें अशी इच्छा तुह्मांला झाली तर तुह्मी देवदूतही व्हाल; कारण कायदा असाच आहे. तुमची कोणचीही इच्छा असो ती अवश्य तृप्त होईल; पण तुमच्याप्रमाणें सर्वांनीं देवदूतच बनावें असा तुमचा हट्ट तरी कां असावा ? तुमच्याहून त्यांची इच्छा कांहीं निराळीच असेल तर त्यांची समजूत चुकीची आहे अथवा त्यांच्या कल्पना पापरूप आहेत असें म्हणण्याचा अधिकार तुह्मांस कसा पोहोंचतो ? तुमच्या खिशांतून शेंपन्नास रुपये गेले तर तुह्मी कदाचित् घाबरून जाल; पण दुसरे कोणी लोक असेही असूं शकतील कीं ज्यांचें सर्वस्व गेल्यासही त्याची यत्किंचितही क्षिति त्यांना वाटणार नाहीं. अशीं माणसें आजपर्यंत अनेक होऊन गेलीं आहेत आणि सध्यांही आहेत. तुह्मी आपल्या मापानें दुसऱ्याची किंमत कां मोजतां ? या मर्यादित देहाला तुह्मी चिकटून बसतां आणि इंद्रियांचे भोग भोगणें हेंच आपलें जीवितसर्वस्व आहे असेही तुह्मी समजतां. तुह्मी खुशाल तसें समजा. या बाबींत तुह्मांला

कोणी यत्किंचितही आडकाठी करीत नाहीं. आपल्या मर्जीप्रमाणें तुह्मी सुखानें चाला; पण सत्य ज्यांनीं पाहिलें आहे, अशींही कांहीं माणसें असतील हें विसरूं नका. सत्यवस्तूची निश्चयात्मक कल्पना ज्यांच्या बुद्धीला झाली असेल अशा माणसांना या देहाच्या तुरुंगांत जखडून राहण्याची इच्छा कधींही असणार नाहीं. या तुरुंगाच्या भिंती फोडून त्यांतून बाहेर पडण्याची धडपड तीं अवश्य करतील. जग आणि त्यांतील साऱ्या चैनीच्या वस्तु त्यांच्या दृष्टीनें कःपदार्थ आहेत. एखाद्या डबक्यांत किडे वळवळ करतात त्याचप्रमाणें या जगांत माणसें वावरतात असें त्यांना वाटतें. अशा मनुष्यांनीं पदभ्रष्ट होऊन आपल्या पंक्तीला यावें अशी इच्छा तुह्मीं कां बाळगावी ? असली इच्छा आपल्या चित्तांतून समूळ काढून टाका. आपण आपल्या मार्गानें जावें आणि दुसऱ्यांना त्यांच्या मार्गानें जाऊं द्यावें हेंच आपणास इष्ट आहे.

लंडन येथील एका सचित्र पत्रांत दक्षिण समुद्राच्या भागांत मोठें वादळ झाल्याची हकिगत आली होती. या वादळांत कांहीं गलबतें सांपडलीं होतीं. त्यांचीं चित्रेंही त्या पत्रांत आलीं होतीं. यांत अखेरीस एक गलबत मात्र बचावून बाकीचीं सारीं समुद्रार्पण झालीं. गलबतें वादळांत हेलकावे खात असतां वरील खलाशी एकमेकांस उत्तेजन देत आहेत अशा प्रकारचा देखावा या चित्रांत दाखविला होता. तुह्मीही असेच शूर आणि उदार व्हा. दुसऱ्यांना आपल्याबरोबर खालीं ओढूं नका.

आतां येथें आणखीही एका खुळसट कल्पनेचा विचार करण्यासारखा आहे. कोणी असा आक्षेप काढतात कीं आम्ही सारे एक ह्मणून नाचत सुटलों तर समाजाला धरबंध कांहींच उरणार नाहीं, आणि सारीं नीतिबंधनें शिथिल होऊन मनुष्यजाति रसातळाला जाईल. ही कल्पना किती खुळेपणाची आहे बरें ? जणूं काय, प्रत्येकजण दुसऱ्याच्याच सुखासाठीं धडपडत आहे. अशी स्थिति उद्यां खरोखरच प्राप्त झाली तर परमेश्वराचा पूर्ण आशीर्वाद तुह्मांला मिळेल; पण असें होईल अशी कल्पनासुद्धां करूं नका. फार काय, पण स्वतःला केवळ परोपकारार्थ वाहून घेतलेलीं अशीं शें पन्नास तरी स्त्रीपुरुषें जरी एकएका देशांत निघालीं तरी पांच दिवसांच्या आंत सारें जग मंगलमय होऊन जाईल. आह्मी परोपकाराच्या बाता कितीही झोडल्या

तरी मनुष्यजातीशीं आमचें प्रत्यक्ष वर्तन कसें हें आमचें आह्मांस पुरें ठाऊक आहे. आमचीं लांबलांब भाषणें या नुसत्या वायूच्या भराऱ्या होत. त्यांत प्रत्यक्ष सत्य कांहींच नसतें. स्वतःच्या यःकश्चित देहाची पर्वा ज्यांनीं कधींही केली नाहीं असल्या माणसांनींच जगावर आणि मनुष्यजातीवर अत्यंत मोठे उपकार करून ठेवले आहेत आणि स्वार्थबुद्धीच्या माणसांनीं जगासाठीं कांहींच केलें नाहीं अशी साक्ष इतिहास आजवर स्पष्ट देत आला आहे. या लहानशा देहांत राहून इंद्रियभोग भोगीत कालक्रमणा करीत राहावी ही इच्छा निर्भेळ स्वार्थबुद्धीची द्योतक आहे. सत्य वस्तु शोधावी या इच्छेचा मागमूसही अशा मनुष्यांत नसतो. दया त्यांच्या चित्ताला शिवतसुद्धां नाहीं. दुसऱ्याचा खिसा कापून आपला खिसा भरावा एवढीच इच्छा त्याच्या हृदयांत असते. एखाद्या क्षुद्र प्राण्यासाठीं सुद्धां शंभर शंभर जीव आनंदानें देण्यास ज्यांची तयारी होती अशीं पूर्व काळीं होऊन गेलेलीं उज्ज्वल रूपाचीं माणसें पुन्हां जन्मास यावीं इतकीच माझी इच्छा आहे. नीति आणि परोपकार यांजवर लांब लांब व्याख्यानें आज पुष्कळ ऐकूं येतात पण कृतींत मात्र सारा शून्याकार दिसतो.

परमेश्वराच्या अस्तित्वावर गौतम बुद्धाचा भरंवसा नव्हता. तसेंच जीवात्म्याचें अस्तित्वही त्याला मान्य नव्हतें. या गोष्टींची चौकशीच त्यानें कधीं केली नाहीं. या बाबींत तो संशयवादी अथवा नास्तिक होता असें ह्मणण्यास हरकत नाहीं; पण असें असतांही कोणाही प्राण्याकरितां आपला जीव देण्याची त्याची तयारी होती. केवळ लोकांच्या बऱ्याकरितां सारा जन्म त्यानें उद्योग केला आणि लोकांचें बरें व्हावें एवढाच विचार त्याच्या चित्तांत सारा जन्म घोळत होता. अशा प्रकारचीं नास्तिक माणसें जितकीं अधिक जन्मास येतील तितकें बरें. जगाचें कल्याण व्हावें एवढयाचकरितां गौतम बुद्धाचा जन्म झाला असें कोणीं ह्मटलें आहे तें अगदीं बरोबर आहे. स्वतःची मुक्ति साधावी ह्मणून अरण्यांत जाऊन तो ध्यानस्थ बसला नाहीं. सर्व जग दुःखाग्नीनें होरपळून गेलें आहे असें पाहून त्या अग्नीच्या उपशमाची तरतूद त्यानें चालविली. या जगांत इतकें दुःख कां भरलें आहे या एकाच प्रश्नाच्या उत्तरासाठीं सारा जन्म तो धडपड करीत होता. आपली नीतिमत्ता बुद्धाच्या इतकी उज्ज्वल आहे असें तुह्मांस वाटतें काय ?

मनुष्य जों जों अधिक स्वार्थी तों तों तो अधिक अनीतिमान् समजावा. ही एका मनुष्याची कसोटी एखाद्या मानववंशालाही लागू आहे. जो मानववंश केवळ स्वार्थबुद्धीला चिकटून बसलेला असतो त्याच्या हातून जगांत अनीतीचीं आणि दुष्टपणाचीं कृत्यें जितकीं घडतात तितकीं तीं दुसऱ्या कोणाच्याही हातून घडत नाहीत. 'मी' आणि 'तूं' या द्वैताला अत्यंत चिकटून बसलेला असा जर कोणता धर्म असेल तर तो इस्लामी धर्म होय; आणि परधर्मीयांचा इतका भयंकर छळ त्या धर्मावांचून दुसऱ्या कोणत्याही धर्मानें केलेला नाही. मुसलमानी धर्मानें जितकें रक्त सांडलें तितकें दुसऱ्या कोणींही तें सांडलेलें नाहीं. कुराणप्रणीत धर्मावर ज्याचा विश्वास नसेल त्याचा खुशाल वध करावा अशी आज्ञा कुराणांत उघड नमूद केली आहे. काफिराला मारणें ह्मणजे त्याजवर दया करणें होय कसें कुराणाचें मत आहे ! जो कोणी काफिराला मारतो त्याला स्वर्ग खचित प्राप्त होतो. अशा प्रकारच्या मतांमुळें केवढा रक्तपात झाला असेल याचा विचार तुह्मीच करा.

ख्रिस्तानें सांगितलेला धर्म असा ग्राम्य नाहीं. ख्रिस्तानें सांगितलेलीं शुद्ध धर्मतत्त्वें आणि वेदांततत्त्वें यांत फारसा फरक नाहीं. अद्वैताचें बीज ख्रिस्ताच्या उपदेशांत आहे; पण सामान्यलोकांच्या बुद्धीला धर्म ग्राह्य व्हावा याकरितां द्वैताचा उपदेश लोकांस त्यानें केला आहे. द्वैताच्या द्वारें लोकांनीं उच्च ध्येयापर्यंत पोहोंचावें असा त्याचा उद्देश होता. "आमचा पिता जो आकाशांत आहे" असें म्हणणाऱ्या महात्म्यानें 'मी आणि माझा पिता एकच आहे' असेंही ह्मटलें आहे. द्वैतांतून आरंभ करून अखेरीस अद्वैताला पोहोंचावयाचें आहे हें तत्त्व येशूख्रिस्त विसरला नव्हता. येशूनें सांगितलेल्या धर्मात प्रेम, भक्ति आणि परोपकार हींच तत्त्वें आहेत; पण त्याच्या पाटीमागें त्याच्या धर्माला अवनतस्वरूप प्राप्त झालें, तो ग्राम्य लोकांच्या हातीं गेला आणि अखेरीस इस्लामी धर्माच्या जवळ जवळ येऊन तो बसला. देहात्मवादाला इतकें चिकटून बसणें, या जगांत केवळ इंद्रियसुखासाठीं जगणें आणि याचीच सुधारलेली पुनरावृत्ति स्वर्गांत निघावी अशी इच्छा करणें याहून अधिक ग्राम्यपणा तरी कोठें सांपडणार ? यालाच ते स्वार्थत्याग समजतात, आणि हाच नीतिशास्त्राचा पाया आहे असेंही ते ह्मणतात हें आश्चर्य नव्हे काय ? खरोखर नीतिशास्त्राचा पाया हाच असेल

आणि जगांतील नीति याच तत्त्वास धरून चालावयाची असेल, तर परमेश्वरानेंच या स्थितींतून आमचें रक्षण करावें. स्वार्थबुद्धीच्या अतिरेकाचे भयंकर परिणाम इतके उघड दिसत असतांही अद्वैतसिद्धांत मीपणाचा नाश करतो ह्मणून तो वाईट असें म्हणणारे लोक निघावे हें केवढें आश्चर्य आहे! अहंभाव नाहींसा झाला तर सर्व नीतीचा नाश होईल या भयानें त्यांची गाळण उडते; पण सर्व नीतिशास्त्राचा पाया 'मी' नसून 'तूं' आहे हें त्यांनीं लक्ष्यांत ठेवावें. स्वर्गनरकादि लोक आहेत कीं नाहींत याचा विचार तुह्मी कशाला करतां? आत्म्याचें अस्तित्व आहे कीं नाहीं हा कोरडा काथ्याकूट कशाला? चल पदार्थामागें स्थिर अधिष्ठान आहे कीं नाहीं असले शुष्क पांडित्य काय कामाचें? जग तुमच्यासमोर आहे. त्यांत अनंतदुःखें भरलीं आहेत हें तुह्मांस स्पष्ट दिसत आहे. भगवान् बुद्धानें अलोट धैर्यानें या दुःखसागरांत जशी उडी घातली तशीच तुह्मीही घाला. यांतील दुःखें कमी करण्यासाठीं धडपड करा. मग या प्रयत्नांत तुमचा देहपात झाला तरी हरकत नाहीं. स्वतःचें अस्तित्व तुह्मी पार विसरून जा. तुह्मी आस्तिक असा अथवा नास्तिक असा; संशयवादी असा अथवा वेदांती असा; ख्रिस्ती असा अथवा मुसलमानी असा; आपलें अस्तित्व विसरून जगाचीं दुःखें कमी करण्यासाठीं झटणें हेंच आपलें आद्यकर्तव्य आहे, हा पहिला धडा तुह्मी गिरवा. हा क्षुद्र अहंभाव टाकणें आणि आपला सत्य विश्वभाव प्रगट करणें हेंच आपलें खरें ध्येय आहे ही उघड गोष्ट यापुढें कधींही विसरूं नका.

आपल्या ठिकाणीं दोन शक्तींची क्रिया समांतर चालली आहे. एक क्रिया 'मी' असें ह्मणते; आणि दुसरी क्रिया 'मी नव्हें' असें म्हणते. या दोन क्रियांचें व्यक्तरूप केवळ मनुष्यांतच आहे असें नसून जनावरांतही तें सांपडतें. फार काय, पण अत्यंत क्षुद्र जंतूंतही या द्विधा रूपाचा प्रत्यय येतो. एखाद्या मनुष्याच्या छातींत आपल्या दाढा व आपले विक्राळ पजे निर्दयपणें खुपसून त्याचें उष्ण रक्त प्राशन करणारी वाघीण आपल्या पोरांच्या रक्षणाकरितां प्रसंगीं जीवही देईल. मनुष्याचा प्राण घेणें ही क्रिया ज्याला पोरखेळ वाटते अशा भयंकर मानसिक स्थितीला पोहोंचलेला एखादा ठगही आपल्या बायकोच्या अथवा मुलांच्या रक्षणाकरितां जीव देण्यास मागेंपुढें पाहणार नाहीं. अशा रितीनें स्वार्थ आणि परार्थ हीं मूळ शक्तीचीं दोन रूपें साऱ्या

सजीव सृष्टींत आढळून येतात. हीं दोन्ही रूपें एकमेकांच्या हातांत हात घालून चाललेलीं आहेत. यांपैकीं एक जेथें आढळेल तेथें दुसरेंही अवश्य असावयाचेंच. यांतील स्वार्थ हें रूप भोगी असून परार्थ हें रूप त्यागी आहे. भोगी रूपाचा हात सदोदित घेण्यासाठीं पुढें असतो आणि त्यागी रूपाचा हात फक्त देण्यासाठीं पुढें होत असतो. अत्यंत कमी प्रतीच्या सूक्ष्म रूपापासून तों अत्यंत उच्च प्रतीच्या स्पष्टावस्थेपर्यंत विश्वाच्या क्रीडांगणावर या दोन शक्तींचा खेळ सुरू आहे. हा खेळ इतक्या उघडपणें चालू आहे कीं प्रत्येकाच्या निदर्शनास तो प्रत्यहीं येत असल्यामुळें त्याच्या अस्तित्वाची खूण पटविण्यास बाहेरच्या पुराव्याची मुळींच जरूर नाहीं.

समाजरचनेंतही या दोन्ही तत्त्वांस वावरण्यास पूर्ण अवसर मिळाला पाहिजे. यांपैकीं एकच तत्त्व मूलभूत धरून त्यावर समाजाची सारी इमारत उठविण्याचा अधिकार कोणाही एका व्यक्तीस अथवा समाजाच्या एका शाखेस नाहीं. जेथें चढाओढ आणि तदंगभूत तंटे यांजवरच समाजाची रचना उभी आहे, तेथें स्वार्थ ही एकच शक्ति पायाशीं असते. या एकाच शक्तीला पूर्ण अवसर मिळाल्यामुळें मन मानेल तसा धिंगाणा तें घालूं लागतें. तिच्यांतून अनंत प्रकारचे दुष्ट विकार जन्माला येतात आणि त्या समाजांत अखेरीस द्वंद्वें आणि मारामाऱ्याही सुरू होतात. अशा प्रकारच्या गोष्टी प्रत्यहीं आपल्या नजरेस येत आहेत. त्या अस्तित्वांत नाहींत असें म्हणणें चुकीचें आहे. त्यांचें अस्तित्व कबूल करणें आपणास भाग आहे; पण एका शक्तीला याप्रमाणें पूर्ण मुभा मिळाली असतां दुसऱ्या शक्तीनें मात्र स्वस्थपणें झोंपीं जावें हा न्याय कोठला ? ही दुसरी शक्ति अस्तित्वांत नाहीं असें म्हणण्याचा कोणाला काय अधिकार आहे ? समाजांत प्रेमाचें आणि भक्तीचें अस्तित्व नाहीं असें कोणी म्हणूं शकेल काय ? किंबहुना परार्थ अथवा त्याग हीच विश्वांतील खरी विधायक शक्ति आहे हें कोण नाकबूल करील ? पहिली स्वार्थशक्ति ही वस्तुतः स्वयंसिद्ध अथवा स्वयंपूर्ण शक्ति नसून परार्थ शक्तीचें तें विकृत रूप आहे. जगांत तंटे आणि मारामाऱ्या होतात त्यांचें मूळ प्रेमांतच असतें, असें सूक्ष्म दृष्टीनें पाहाणारास आढळून येईल. त्याचप्रमाणें त्यागांतूनही दुष्टपणाचा संभव होत असतो. याप्रमाणें चांगल्यांतून वाईट आणि वाईटांतून चांगलें निर्माण होत असतें. वाईट याचा वास्तविक अर्थ चांग-

त्याची दिशाभूल इतकाच आहे. दुसऱ्यावर हत्यार उचलणारा मनुष्य स्वतःच्या मुलाच्या अथवा दुसऱ्या कोणाच्या तरी प्रेमामुळेंच अशा कृत्यास उद्युक्त होत असतो. त्या एकाच व्यक्तीच्या ठिकाणीं त्याचें सारें प्रेम एकवटल्यामुळें इतर व्यक्तींचें अस्तित्व तो जणूं काय विसरूनच जातो. मूळ भावना प्रेमाचीच आहे. तिचें रूप कित्येक प्रसंगीं संकुचित असतें आणि कित्येक प्रसंगीं तेंच प्रेम विस्तृत रूप धारण करतें. स्वार्थांत अथवा भोगांत जें प्रेम आकुंचित होतें तेंच प्रेम परार्थांत अथवा त्यागांत विस्तृत रूप धारण करतें.

साऱ्या विश्वाची चालकशक्ति प्रेम हीच आहे, ही गोष्ट या विवेचनावरून आपल्या लक्ष्यांत येईल; मग ही शक्ति कोणत्याही रूपानें प्रगट झालेली असो. ती केव्हां परार्थाच्या रूपानें, त्यागाच्या रूपानें, प्रेमाच्या रूपानें अथवा कधीं द्वेषादि रूपानें प्रगट झाली तरी मूळशक्ति एकच आहे. याकरितां साऱ्या विश्वाचें रूप वस्तुतः एक आहे असा निश्चय वेदांती करतात. विश्वोत्पत्तीला दोन कारणें असूं शकतील, ही गोष्ट आह्मांस मान्य करवत नाहीं. याकरितां सृष्टीचें आदिकारण ही एकच शक्ति आहे, असें आह्मी पुन्हां पुन्हां ह्मणतों. ही एकच शक्ति आकुंचित रूपानें प्रकट झाली म्हणजे तिला दुष्टत्वाचें अथवा नीचपणाचें स्वरूप येतें; आणि तीच आपल्या विस्तार रूपानें प्रगट झाली ह्मणजे तिचें स्वरूप उज्ज्वल आणि सुंदर दिसतें. विश्वाचें आदिकरण ही एकच शक्ति आहे असें आह्मी कां ह्मणतों हें यावरून आपल्या लक्ष्यांत येईल. हें म्हणणें कबूल करावयाचें नसेल तर विश्वाचीं आदिकरणें दोन असलीं पाहिजेत असें म्हणणें भाग पडतें. एक कारण चांगल्या स्वरूपाचें आणि दुसरें वाईट रूपाचें. एक कारण प्रेम आणि दुसरें कारण द्वेष. अशा रीतीनें दोन परस्परविरोधी स्वरूपाच्या कारणांपासून विश्व निर्माण झालें असें कबूल करावें लागेल. या दोन मतांत कोणतें मत अधिक तर्कशुद्ध आहे असें तुम्हांस वाटतें ? अर्थात् पहिलें मत.

आतां आपण आणखी कांहीं गोष्टींचा विचार करूं. द्वैतमताचा विस्तार याहून अधिक प्रमाणानें मला करतां येण्यासारखा नाहीं. माझा मुख्य मुद्दा इतकाच कीं त्याग आणि नीतिशास्त्राच्या अत्युच्च कल्पना या दोन वस्तू परस्परांशीं अत्यंत संलग्न आहेत. याकरितां नीतिशास्त्राचे सिद्धांत निश्चित करण्याकरितां अतींद्रियशास्त्राचे सिद्धांत टाकून देण्याची गरज नाहीं. उलट मीं असेंही

ह्मणेन कीं नीतिशास्त्राच्या सिद्धांतांचा खरा पाया समजण्यास अतींद्रियशास्त्राच्या आणि तत्त्वज्ञानाच्या उच्च सिद्धांतांचें ग्रहण प्रथम केलें पाहिजे. मानवी ज्ञान आणि मानवी कल्याण या वस्तू परस्परविरोधी आहेत असें नाहीं. ज्ञान वाढल्यानें समाजरचनेंत घोंटाळा उत्पन्न होईल असेंही नाहीं. ज्ञानवर्धनानें समाजव्यवस्थेचीं बंधनें शिथिल होतील असेंही नाहीं. उलटपक्षीं ' सर्वं ज्ञानप्लवेनैव वृजिनं सन्तरिष्यसि ' हेंच वचन खरें आहे. संसारांतील कोणत्याही अडचणींतून ज्ञानच आपणास मार्ग दाखवील. ज्ञान हेंच खरें परमेशपूजन होय. याकरितां तें जितकें वाढेल तितकें अधिक चांगलें. बाह्यतः वाईट ह्मणून दिसणाऱ्या गोष्टी स्वयंसिद्ध वाईट असतात असें नाहीं; तर त्यांच्या ठिकाणीं अमर्यादरूप अत्यंत आकुंचित झाल्यामुळें त्या वाईट दिसतात असें वेदांत्यांचें मत आहे. जें प्रेम अत्यंत आकुंचित स्वरूपानें आज प्रगट होऊन दुष्ट आहेसें दिसतें, तेंच प्रेम अखेरीस परमेश्वराच्या रूपानें प्रगट होतें. ईश्वर ह्मणजे अनिर्वचनीय प्रेमस्वरूप. आज जगांत ज्या वाईट गोष्टी दिसतात त्यांचें कारण आपल्याच ठिकाणीं आहे असें वेदांताचें म्हणणें आहे. या वाईट गोष्टींचें कर्तृत्व कोणत्याही अमानुषी कर्त्याकडे नाही. याकरितां या बाबींत निराश होण्याचें अथवा उदास बनण्याचें कारण नाहीं. ज्या जाग्यांतून दुसऱ्या कोणाच्या मदतीवांचून आपली सुटका होणार नाहीं, अशा पेंचाच्या जागेंत आपण सांपडलों आहों असें वाटूं देऊं नका. आपण सारे रेशमाच्या किड्यासारखे आहों. आपण आपल्याच पोटांतून धागा काढून स्वतःभोंवतीं गुंडाळतों आणि अखेरीस त्यांतच अडकून पडतों; पण हें घरटें आपल्याभोंवतीं कायमचेंच आहे असें समजूं नका. या घरट्यांत राहून आपण आत्मानुभवाची तयारी करूं आणि अखेरीस फुलपांखराप्रमाणें त्यांतून बाहेर पडून आपण मोकळे होऊं. हें कर्मजाल आपणच आपल्याभोंवतीं गुंफिलें आहे आणि अज्ञानामुळे आपण कायमचे बद्ध झालों असें आपणास वाटतें; आणि कोणाच्या तरी मदतीसाठीं रडून आपण करुणा भाकतों; पण ही मदत बाहेरून कोठूनही येत नाहीं. ती आंतूनच येते. साऱ्या विश्वांतील देवदेवतांस हांका मारून तुह्मीं आक्रोश केला तरी त्यांपैकीं कोणीही धावून येणार नाहीं. वर्षानुवर्षें असाच आक्रोश मींही केला आणि अखेरीस मला मदत मिळाली; पण ती बाहेरून न येतां आंतून आली. पूर्वीच्या चुकांमुळें ज्या गोष्टी माझ्या

हातून घडून गेल्या होत्या त्या मला मोडून टाकाव्या लागल्या. हा एकच मार्ग आपणास उपलब्ध आहे. जें जाळें मीं स्वतःभोंवतीं विणलें होतें, तें मलाच तोडावें लागलें; आणि ही गोष्ट करण्याचें सामर्थ्य माझ्या अंतरंगांतूनच मला प्राप्त झालें. मला जें जें व्हावेंसें वाटत होतें तें सारें घडून आलें, असा अनुभव अखेरीस मला आला. बरी अथवा वाईट माझी कोणतीही इच्छा विफल झाली नाहीं. माझ्या ठिकाणीं जें कांहीं बरें अथवा वाईट आहे तें माझ्या गतकर्मांचेंच फळ आहे. माझ्या आयुष्यांत अनेक चुका मीं केल्या; पण आपण ही गोष्ट पक्की ध्यानांत धरा कीं तशा चुका माझ्या हातून घडल्या नसत्या तर माझें जें कांहीं स्वरूप आज आहे तें मला कधींही प्राप्त झालें नसतें. याकरितां या चुका होण्यांतही मला संतोष आहे. यावरून प्रत्येकानें मुद्दाम चुका कराव्या असा मात्र माझ्या म्हणण्याचा आशय समजूं नका. माझ्या म्हणण्याचा असा विपरीत अर्थ करूं नका. मुख्य मुद्दा इतकाच कीं तुमच्या हातून प्रसंगीं चुका घडल्या तरी तेवढ्याच करितां रडत बसूं नका. निश्चयानें आपण अखेर मारणार असा आत्मविश्वास बाळगा आणि असें झालेंच पाहिजे; कारण पवित्रता हाच आपला मूळभाव आहे. हा आपला प्रकृतिस्वभाव आहे; आणि प्रकृतिस्वभावाचा नाश कशानेंही होणार नाहीं. कितीही विकृती उत्पन्न झाल्या तरी आपल्या मूळ प्रकृतीचें रूप एकच असतें.

एकंदरीनें ध्यानांत ठेवण्याचा मुख्य मुद्दा इतकाच कीं ज्यांना आपण चुका म्हणतों त्या आपल्या दुर्बळपणामुळें आपल्या हातून घडून येतात; आणि हा दुर्बळपणा अज्ञानामुळे आपल्या ठिकाणीं आलेला असतो. पाप हा शब्द तुम्ही प्रथम विसरून जा. या शब्दाऐवजीं चूक हा शब्द मी पसंत करीन. पाप या शब्दांत खरोखरच कांहीं वाईट अर्थ आहे असें नाहीं; तथापि त्या शब्दांत जो एक चमत्कारिक दंश आहे तो मला आवडत नाहीं; त्याची मला भीति वाटते. याकरितां या शब्दाऐवजीं चूक या शब्दाची योजना मला अधिक बरी वाटते. अज्ञानामुळें आपल्या हातून चुका घडतात; पण हें अज्ञान कोण उत्पन्न करतो ? आपले आपणच. आपण आपल्याच हातांनीं आपले डोळे घट्ट दाबून धरतों आणि 'काळोख रे काळोख' म्हणून रडूं लागतों. हा काळोख जाण्यास उपाय एकच. डोळ्यावरचे हात दूर करा कीं प्रकाशाचा झोत सर्वत्र तुम्हांस दिसेल. प्रकाश आपणाबरोबर नित्य आहे. प्रकाश हा

जीवात्म्याचा प्रकृति स्वभाव आहे. अर्वाचीन आधिभौतिक शास्त्री काय ह्मणतात तें तुमच्या कानावरून गेलें असेलच. उत्क्रांतीचें कारण काय ? तिचें कारण इच्छा हें होय. कांहीं तरी करावें ही इच्छा प्राण्यांच्या ठिकाणीं उद्भवते. या इच्छेच्या तृप्तीसाठीं तो धडपडूं लागतो; पण परिस्थिति प्रतिकूल आहे असें त्याला आढळतें. असा अनुभव आला म्हणजे त्या परिस्थितीला अनुरूप असा नवा देह तो धारण करतो. ही वाढ कशी झाली ? ही वाढ त्या प्राण्यानेंच आपल्या इच्छेनें केली. तुह्मी अत्यंत सूक्ष्म अशा एककोशी प्राण्यापासून वाढत वाढत सांप्रतच्या उच्चावस्थेस प्राप्त झालां आहां. अशाच रीतीनें आपल्या इच्छाशक्तीला सदोदित तुह्मी ताण देत राहिलां तर याहूनही उच्चतरावस्थेस तुम्ही जाल. आपली इच्छा ही एक अचिंत्य शक्ति आहे. अमुक एक गोष्ट करण्याचें तिला सामर्थ्य नाहीं असें नाहीं. ती जर खरोखरच इतकी समर्थ असेल, तर आमच्या हातून वाटेल ती गोष्ट कां होत नाहीं, असा प्रश्न तुह्मी कदाचित् कराल. याचें उत्तर हेंच कीं तुह्मी तिची मर्यादा आकुंचित करून ठेविली आहे. तिला या लहानशा देहांत तुह्मी कोंडून ठेविलें आहे. तिचे हातपाय तुह्मींच बांधून ठेविले आहेत. तिच्या ठिकाणीं जर खरोखर सामर्थ्य नसतें तर एककोशी प्राण्याच्या स्थितीपासून सांप्रतच्या स्थितीपर्यंत जी वाढ झाली तीही झाली नसती. ती वाढ कोणीं केली ? ही वाढ तुमच्याच इच्छाशक्तीनें झाली आहे. ही गोष्ट निश्चित झाल्यावर ती सर्वसमर्थ नाहीं असें तुह्मी ह्मणाल काय ! जिनें तुह्मांला येथवर येण्यास हात दिला ती यापुढें तुह्मांस दगा काय ह्मणून देईल ? ती तुम्हांस उच्चतरावस्थेस पोहोंचविणार नाहीं काय ? तुमच्यांत जी कांहीं उणीव आहे ती फक्त निश्चयाची. उत्तम दानत असणें हें पहिले साधन आहे. उत्तम दानतीचीच तुह्मांस गरज आहे. धरसोड सोडून द्या आणि ठाम निश्चयानें इच्छाशक्ति प्रबळ करा.

'मी पापी आहें' अशी शंकासुद्धां आणूं नका. "तुह्मी पापी आहां याकरितां आतां घरीं जाऊन आंगाला राख फांसा आणि जन्मभर 'पापी पापी' म्हणून रडत बसा," असा उपदेश मीं तुह्मांस केला तर त्याचा तुम्हांस यत्किंचितही उपयोग होणार नाहीं. तुमच्या हातून प्रसंगीं कांहीं चुका झाल्या असतील पण तेवढयाकरितां मीं तुह्मांस पापी ह्मटलें तर त्याचा तुम्हांस

काय उपयोग होणार ? असल्या रडक्या उपदेशानें दिवसेंदिवस अधिक दुबळे मात्र तुह्मी होत जाल, आणि तुह्मांस स्वर्गाचा मार्गदर्शक होण्याऐवजीं अधोगतीची सरळ वाट मीं तुम्हांस दाखविली असें मात्र होईल. या खोलींत हजारों वर्षें अंधार भरून राहिला असला आणि येथें येऊन ' अंधार अंधार ' म्हणून कितीही आक्रोश तुम्हीं केला तरी त्यानें अंधार नाहींसा होईल काय? एक काडी ओढली कीं उजेडच उजेड. सारा जन्म 'पापी पापी' म्हणून ओरडत बसण्यानें काडीचाही फायदा होणार नाहीं हें सांगावयास ज्योतिषी नको. आंत प्रकाश उत्पन्न करा म्हणजे सारीं पापें क्षणार्धांत नाहींशीं होतील. उत्तम प्रतीची दानत तयार करून आपल्या खऱ्या स्वभावाला बाहेर पडण्यास अवकाश करून द्या. तुमचा खरा प्रकृतिस्वभाव पूर्ण तेजोमय आणि पवित्र आहे. त्याचा प्रकाश पडूं द्या; आणि तुम्हांस जो जो कोणी आढळेल त्याला त्याला या कामीं मदत करा. अत्यंत पातकी मनुष्याच्या ठिकाणींही गुप्त असलेला हा प्रकृतिस्वभाव जाणण्याची विद्या आपणा सर्वांस प्राप्त झाली असती तर किती बहार झाली असती ? अशा स्थितींत त्याला आपण पापी समजलों नसतों. उलट त्याला उपदेश करून त्याचें खरें स्वरूप प्रकट होण्यास त्याला आपण मदत केली असती. अद्वैताचें तुह्मांस हेंच सांगणें आहे. ' **उत्तिष्ठत जाग्रत** ' अशी प्रार्थना सदोदित करून आपल्या या मूळ भावाला जागृति आणा असें अद्वैतशास्त्राचें सांगणें आहे. आपल्या या मूळरूपाचें स्मरण सदोदित ठेवणें हीच खरी प्रार्थना होय. आपल्या ठिकाणीं नित्य असलेल्या परमेश्वराचें सदोदित चिंतन करणें हेंच खरें पूजन होय. तो अनंत, सर्वशक्ति, कल्याणमय आणि अमर्याद स्वरूपाचा आहे असें चिंतन अखंड करणें, हीच त्याची खरी प्रार्थना आणि हेंच त्याचें खरें पूजन. आपल्या या मूळ प्रकृतिस्वभावांत आकुंचित स्वार्थाचा लेशही नाहीं. यामुळेंच तो अत्यंत बलवान आहे आणि निर्भय आहे. भीति उत्पन्न होते ती स्वार्थामुळें होत असते. ज्याच्या ठिकाणीं कोणत्याही प्रकारची इच्छा उरलेली नाहीं त्याला भीति कोणाची वाटणार ? त्याला भिववूं शकेल असा कोण आहे ? मृत्यूची भीति तरी त्याला कां वाटावी ? तो पापालाही भीत नाहीं. याकरितां आपणास अद्वैतशास्त्रास अनुसरावयाचें असेल तर आपला सध्यांचा आकुंचित भाव आपण टाकून दिला पाहिजे. आपण अमुक देह-

धारी ही जाणीव सोडून दिली पाहिजे. आपण अमुक असा जो भ्रम आपणास झाला होता तो नाहींसा झाला म्हणजे जें कांहीं उरेल तें परमपवित्र, परम बलवान् आणि परम ज्ञानवान् असें निर्भेळ रूप उरेल. असें झालें म्हणजे सर्व भय आपणापासून निघून जाईल. आपण सर्वव्यापी झाल्यावर आपलें कोणतें नुकसान होणार आहे ? आणि तें करूं शकेल असा तरी कोण राहणार ? अशा जीवन्मुक्तावस्थेंत दुसऱ्यांत जागृति आणणें इतकेंच कार्य आपणास उरेल. तेही आपणाप्रमाणेंच परमात्मरूप आहेत असें आपणास स्पष्ट दिसेल. ही ओळख ते आज विसरले आहेत; पण ही त्यांची ओळख त्यांस पटेल असें शिक्षण आपण त्यांस दिलें पाहिजे. त्यांचा अनंतभाव आपण जागृत केला पाहिजे. सर्व जगाला याच ज्ञानाची आज गरज आहे असें मला वाटतें. सर्व जगांत हें मत जुनें आहे. किंबहुना जग अस्तित्वांत येण्यापूर्वी हीं तत्त्वें अस्तित्वांत होतीं. सत्य चिरंतनरूपाचें आहे. त्याचा केव्हांच नाश होत नाहीं; आणि तें अमुक वेळीं उत्पन्न होतें असेंही नाहीं. तें अमक्यापासून उत्पन्न झालें असेंही नाहीं. कोणा एका व्यक्तीचा अथवा एखाद्या मानवकुलाचा त्यावर सर्व प्रकारचा हक्क आहे असेंही नाहीं. सर्व जीवात्म्यांच्या ठिकाणीं तें आहे; मग तें माझें असा हक्क त्याजवर कोण सांगूं शकेल ? पण तें व्यक्त स्थितींत आणावयास पाहिजे. तें सर्वांस सुलभ करून दिलें पाहिजे. तें इतकें सुलभ झालें पाहिजे कीं मनुष्यमात्राच्या आंगांत तें भिनलें पाहिजे. अत्यंत श्रेष्ठ विद्वानांपासून तों गांवढळ शेतकऱ्यापर्यंत आणि बायकापोरांपर्यंत तें पोंचलें पाहिजे. घटपटाची खटपट, तर्कशास्त्राची डोकेफोड आणि बुद्धीची कसरत हीं आपापल्या परी चांगलीं असतील; पण या साऱ्या खटपटी बाजूला ठेवून या सत्याला साधा पोषाख आपण देऊं या. सर्व मनुष्यें खरें पूजन करीत आहेत असा सोन्याचा दिवस लवकर उगवेल अशी खटपट आपण करूं या.

२०

# विश्वव्यापी धर्म अनुभवास येण्याचा मार्ग.

परमेश्वरापासून निघालेला प्रकाश थेट आपणापर्यंत येऊन पोहोंचेल असें करण्याची खटपट मनुष्यानें जितकी केली आहे तितकी दुसऱ्या कोणत्याही कार्यासाठीं त्यानें केली नाहीं. या विद्येचा अभ्यास करण्याच्या कामीं मनुष्यानें आपलें जितकें बळ खर्चीं घातले आहे तितकें तें दुसऱ्या कोणत्याही कामीं खर्चीं घातलेलें नाहीं. जीवात्मा म्हणजे काय, परमात्मा ह्मणजे काय आणि मनुष्याचें अखेरचें साध्य काय हें जाणण्यासाठीं जेवढी धडपड त्यानें केली आहे तेवढी दुसऱ्या कोणत्याही कामासाठीं त्यानें केली नाहीं. आपल्या रोजच्या व्यवहारांत आपण कितीही चूर होऊन गेलों असलों, आपल्या महत्त्वाकांक्षा तृप्त करण्याकरितां कितीही उद्योग आपण करीत असलों अथवा कोणत्याही कामांत आपलें चित्त कितीही गुंतलें असलें तरी ही आपली खटपट प्रसंगीं एकदम थांबते. मनाचें कार्य जणूंकाय जागच्याजागींच राहतें, आणि ही सारी खटपट सोडून देऊन या जगापलीकडे काय आहे हें जाणावें, अशी इच्छा आपणास होते. इंद्रियद्वारा होण्याऱ्या ज्ञानापलीकडच्या वस्तूचा एखादा किरण अचानकपणें कित्येक वेळां आपणापर्यंत येऊन पोहोंचतो आणि त्यामुळें त्या वस्तूकडे जाऊन पोहोंचण्याची धडपड आपण करूं लागतों, असा प्रकार सर्व देशांत आणि सर्वकालीं सुरू आहे. दृश्यापलीकडे काय आहे हें जाणण्याची इच्छा मानवी हृदयांत अनादि कालापासून आहे. जणूं काय एवढ्या दृश्य जगांत कोंडून राहणें त्याला बरें वाटत नसून त्यापलीकडे उडी मारण्याची त्याची इच्छा असते. ज्याला आपण सुधारणा, उत्क्रांति इत्यादि नांवें देतों ती उत्क्रांति मनुष्याच्या या शोधकबुद्धीचेंच फळ होय. मनुष्याचें अखेर काय होतें आणि परमेश्वर तो कोठें आहे हें जाणण्यासाठीं मनुष्यांनीं जो अविरत शोध चालविला आहे, त्यामुळेंच मनुष्यजातीची वाढ होऊन सांप्रतच्या स्थितीस तो पोहोंचला आहे. त्याच्या उत्क्रांतीचें मूळ बीज या धडपडींतच आहे.

समाजाच्या निरनिराळया अंगांत अनेक कारणांमुळें धडपड सुरू असते. एक अंग दुसऱ्याहून वरिष्ठ होण्यास पहात असतें. अशा प्रकारच्या धडपडीमुळेंच अनेक प्रकारच्या चालीरिती समाजांत उत्पन्न होत असतात. निरनिराळया देशांत निरनिराळ्या चाली आढळतात याचें कारण, ही धडपड हेंच आहे. कोणत्याही देशाची सामाजिक परिस्थिति तेथील चालीरितींवरून अजमावितां येते. एखाद्या विशिष्ट देशांतील समाज उत्क्रमणाच्या कोणत्या अवस्थेंत आहे हें ठरविण्याचें प्रमाण तेथील चालीरीती हेंच होय. त्याचप्रमाणें आपल्या मानसिक उन्नतीकरितां जी धडपड आपण करतों, ती मापण्याचें साधन आपला धर्म हें होय. एखाद्या विशिष्ट देशांत कोणत्या धर्मकल्पना प्रचलित आहेत हें समजलें म्हणजे तेथील समाजाची मानसिक अवस्था कोणत्या कोटीची आहे हे जाणतां येतें. अनेक प्रकारच्या समाजरचना जगांत आज उपलब्ध असून त्यांच्यांत जसे अखंड तंटे सुरू असतात, त्याचप्रमाणें अनेक धर्मही उपलब्ध असून त्यांच्यांतही अनादि कालापासून तंटे सुरू आहेत. समाजांत एखादा पक्ष प्रबळ असला म्हणजे जगण्याचा हक्क आपणासच आहे असें म्हणतो आणि बनेल तोंपर्यंत दुबळ्या पक्षावर वाटेल तसा अमल गाजवून मन मानेल तसें वर्तन तो करतो. अशा प्रकारचा भयंकर स्वरूपाचा तंटा दक्षिण अमेरिकेंत आज सुरू आहे हें आपणास ठाऊक आहेच. धर्मांच्या अवतारामुळें मनुष्यजातीचें कल्याण पुष्कळ झालें आहे हे खरें, पण त्याबरोबरच त्याच्या अवतारामुळे भयंकर उत्पात घडले हेंही खोटें नाहीं. धर्मामुळें अनेक परोपकारी संस्था निर्माण झाल्या. शांति आणि प्रेम यांची स्थापना करण्याकरितां धर्माइतकी धडपड दुसऱ्या कोणत्याही संस्थेनें केली नाहीं; पण भयंकर द्वेषाचें बीजारोपणही धर्मानेंच केलें. सर्व मनुष्यांत बंधुत्वाचें नातें आहे हें तत्त्व धर्मानें जितक्या उच्च घोषानें सांगितलें, तितकें दुसरें कोणत्याही संस्थेनें सांगितलें नाहीं; पण मनुष्यामनुष्यांत भयंकर शत्रुभावही धर्मानेंच निर्माण केला आहे. मनुष्यासाठींच काय पण जनावरांसाठींही धर्मानें रुग्णालयें बांधलीं आणि धर्मानेंच रक्ताचे पाटही वाहविले; पण अशी स्थिति चालू असतांही सर्व धर्मांत तत्त्ववेत्ते आणि विचारी पुरुष निर्माण झाले. धर्मांची परस्पर तुलना करून त्याचा सांगोपांग अभ्यास त्यांनीं केला आणि त्यांच्यांतील विरोध नाहींसा करण्याची खटपट

त्यांनीं केली. निरनिराळया धर्मांची आणि पंथांची एकवाक्यता होऊन एकंदरीनें मनुष्यजातीचा एकोपा वाढावा अशी खटपट पुष्कळ वेळां पूर्वी झाली आणि आजही ती सुरू आहे. कित्येक देशांत या खटपटीला थोडें बहुत यश आलें, पण एकंदर जगाच्या दृष्टीनें पाहतां हा प्रयत्न फारसा यशस्वी झाला नाहीं असेच ह्मणावें लागतें.

अत्यंत पुरातन काळापासून चालत असलेले जे धर्म आज आपणास उपलब्ध आहेत, त्यांपैकीं कांहीं धर्म उदार विचाराचे आहेत. प्रत्येक पंथ आपल्या विशिष्ट अनुयायांना हितकारक असून, त्याला जगूं दिला पाहिजे असें या उदार धर्मांचें ह्मणणें आहे. प्रत्येक पंथांत कोणतेंतरी एखादें तत्त्व अवश्य असतेंच, आणि हें तत्त्व जगाला उपकारक असल्यामुळें त्या पंथाला जगूं देणें व त्याची वाढ करणें इष्ट आहे असें या धर्मांचें मत आहे. अर्वाचीनकाळींही या कल्पनेला प्रोत्साहन मिळालें आहे आणि तिला मूर्तरूप देण्यासाठीं पुष्कळ वेळां प्रयत्नही झाले आहेत. या प्रयत्नांना अपेक्षित फळ नेहमीं येतेंच असें नाहीं. किंबहुना कित्येक प्रसंगीं त्यामुळें भांडणें वाढलीं असेंही घडतें. असें झालें म्हणजे त्या प्रवर्तकांची मोठी निराशा होते.

जगांतील प्रचलित असलेल्या धर्मांत जो हठवादाचा भाग आहे तो बाजूला ठेवून त्यांचें सामान्य निरीक्षण आपण केलें तर एक गोष्ट आपणास आरंभींच आढळून येईल. जगांतील सर्व मोठ्या धर्मांत विलक्षण जिवटपणा आहे, हें वरवर पहाणारासही दिसून येण्याजोगें आहे. कित्येकांना असा जीवटपणा दिसत नसेल, तर तें त्यांचें अज्ञान होय. बाह्य जगांत काय चाललें आहे हें एखाद्याला ठाऊक नसलें, तरी जग चालावयाचें थांबतें असें नाहीं. जग मला माहित नाहीं ह्मणून तें अस्तित्वांतच नाहीं असें कोणी म्हणेल, तर त्याची गणना मूर्खांच्या कोटींत आपण अवश्य करूं. जगांतील धर्मविचारांत कोणत्या प्रकारची गडबड चालू आहे याचें निरीक्षण तुह्मांपैकीं ज्या कोणीं केलें असेल, त्यांची एका गोष्टीबद्दल पक्की खात्री झाली असेल. ती गोष्ट ही की त्यापैकीं कोणताही धर्म मृत झालेला नाहीं; एवढेंच नव्हे तर उलट त्यांची वाढ सुरू आहे. ख्रिस्त्यांची संख्या वाढत्या प्रमाणावर आहे. महंमदाला दिवसेंदिवस अधिक अनुयायी मिळत आहेत. हिंदुधर्मांचीं मतें अधिकाधिक ग्राह्य होत चाललीं आहेत आणि यहुदी धर्म हा अधिक प्रसार पावत आहे.

यहुदी लोक साऱ्या जगभर पसरले असल्यामुळें त्या धर्माच्या वाढीस दिवसें दिवस अधिक प्रोत्साहन मिळत आहे.

प्राचीन काळी प्रचलित झालेल्या धर्मापैकीं फक्त एकच धर्म आज आसन्न-मरण स्थितीत आहे. हा धर्म जरदुष्ट्राचा होय. हाच जुन्या इराणी लोकांचा धर्म. इराण देश मुसलमानांनीं पादाक्रांत केला तेव्हां तेथील रहिवाशांपैकीं सुमारें लाखभर लोक हिंदुस्थानांत आले व त्या भूमीचा आश्रय त्यांनीं केला. कांहीं वस्ती इराणांतच राहिली. जे लोक इराणांत वस्ती करून राहिले त्यांचा छळ मुसलमानांनीं एकसारखा केल्यामुळें या धर्मास उतरती कळा लागली. सांप्रत इराण देशांत जरदुष्ट्राच्या धर्मानुयायांची वस्ती सुमारें दहा हजारांपर्यंत आहे. हिंदुस्थानांतही यांची वस्ती अगदीं थोडी असून, आहे तिचीही वाढ होत नाहीं. हा धर्म वाढीस न लागण्याचें मूळ कारण असें कीं या धर्मात परधर्मीयांचा प्रवेश होऊं शकत नाहीं. दुसरें असे कीं, हिंदुस्थानांत राहिलेल्या या धर्मानुयायांत चुलत बहिणीशीं लग्न करण्याची चाल असल्यामुळें तेंही लोकसंख्या न वाढण्याचें एक कारण आहे. प्राचीन मोठ्या धर्मापैकीं हा एकच धर्म अशा स्थितींत आहे. बाकीचे सारे धर्म वाढत्या प्रमाणावर आहेत. जगांतील मोठे धर्म फार प्राचीन काळापासून चालत आलेले आहेत, ही गोष्ट आपण लक्ष्यांत ठेविली पाहिजे. यांपैकीं एकही धर्म अर्वाचीन काळचा नाहीं. येथें दुसराही एक मुद्दा ध्यानांत धरण्यासारखा आहे. जगांतील साऱ्या मोठ्या धर्मांचा जन्म गंगा आणि युफ्रेटिस या दोन नद्यांच्या मध्यें असलेल्या प्रदेशांत झाला आहे. एकही मोठा धर्म युरोपांत अद्यापि जन्म पावलेला नाहीं, अथवा अमेरिकेंतही निर्माण झाला नाहीं. प्रत्येक धर्माचें मूलस्थान आशियाखंड हेंच आहे. जगांत जगण्यास योग्य असतें तेंच जगतें हें अर्वाचीन शास्त्रज्ञांचें मत खरें असेल, तर हे सारे धर्म ज्या अर्थी आज जिवंत आहेत, त्या अर्थी त्यांचा उपयोग कोणा तरी माणसांना चांगला होतो ही गोष्ट निःसंशय सिद्ध होते. त्यांनीं अद्यापि जगावें यांतच त्यांची उपयुक्तता सिद्ध होते. दक्षिण आशिया खंडांत महंमदी धर्माचा प्रसार कसा होत आहे याचा विचार करा, आणि आफ्रिकेंतही तो वणव्यासारखा कसा पसरत आहे हें पहा. बौद्धधर्माचा प्रसार मध्य आशियांत होत आहे. यहुदी धर्माप्रमाणेंच हिंदुधर्मातही परकीयांचा प्रवेश होत नाहीं, हें खरें; तथापि

हिंदुधर्मांच्या मतांचा प्रसार हळु हळु वाढत्या प्रमाणावर होत असून हिंदूंच्या चालीरीतींचें अनुकरणही इतर लोक झपाट्यानें करूं लागले आहेत. ख्रिस्ती धर्माचाही प्रसार होत आहे हें तर तुह्मी जाणत आहांच; तथापि त्यांत एक गोम मला दिसते. ती ही कीं ख्रिस्ती धर्माचा प्रसार व्हावा म्हणून जे भगीरथ प्रयत्न सुरू आहेत त्या मानानें त्याची वाढ होत आहे कीं नाहीं याबद्दल मला बरीच शंका आहे. धर्मप्रसारासाठीं जे आटोकाट प्रयत्न ख्रिस्ती लोक करतात, त्यांत माझ्या दृष्टीनें एक मोठी उणीव आहे. ती ही कीं, या कार्यासाठीं जीं साधनें ते सज्ज करतात, त्यांतच पुष्कळशा शक्तीचा अपव्यय होत असतो. कोणत्याही प्रकारची युरोपीय संस्था आपण पाहिली तरी तींत हाच दोष आपणांस आढळून येतो. प्रत्येक संस्था एखाद्या यंत्रासारखी असते आणि या यंत्रांत इतके वेगवेगळे भाग गुंतविलेले असतात कीं तें चालू होण्यांतच नव्वद टक्के शक्ति खर्च होऊन जाऊन प्रत्यक्ष कार्यासाठीं अखेर दहा टक्केच शिल्लक उरतात. धर्मोपदेश करणें हें आशियांतील लोकांचेंच काम आहे. राजशासन, युद्धशास्त्र, सैन्य, सामाजिक संस्था इत्यादि बाबींत पाश्चात्य लोक श्रेष्ठ आहेत. पण धर्मप्रचाराची बाब जेथें आली तेथें त्यांस आमच्यापुढें हात टेंकावे लागतात. धर्मोपदेश करणें हा आशियांतील लोकांचा पिढीजाद व्यवसाय आहे. आशियांतील लोकांचा हा गुण आपल्या अंगीं नाहीं हें पाश्चात्य लोकही जाणून आहेत. पौर्वात्य लोक या कामासाठीं मोठमोठ्या संस्था उभारीत नाहींत आणि यंत्रेंही निर्माण करीत नाहींत.

प्राचीन काळीं उत्पन्न झालेले सारे मोठे धर्म प्रसार पावत असून त्यांच्या अनुयायांची संख्या वाढत्या प्रमाणावर आहे, ही गोष्ट आज प्रत्यक्ष सिद्ध आहे. या वस्तुस्थितीला कांहीं अर्थच नाहीं काय? त्यांची वाढ चालू असणें ही गोष्ट अर्थशून्य आहे असें मानावयाचें काय? यापैकीं एकच धर्म जगावा व वाढावा आणि बाकीचे सारे मरून जावे असा सर्वज्ञ व दयामय परमेश्वराचा संकेत असता तर हे धर्म काळाच्या पोटांत कधींच गडप होऊन गेले असते. या अनेक धर्मांपैकीं एकच खरा आणि बाकीचे खोटे या म्हणण्यांत कांहीं तात्पर्य खरोखरच असतें तर त्या खऱ्या धर्मानें बाकीच्यांस बुडवून स्वतः सारें जग कधींच व्यापून टाकिलें असतें; पण असें झालेलें नाहीं हें आपण आज प्रत्यक्ष पाहत आहोंच. आज सारे धर्म जिवंत असून सारे वाढत आहेत हें आपल्या

अनुभवास येत आहे. चढती पडती ही स्थिति या जगांत प्रत्येक वस्तूला आहेच. हाच न्याय धर्मालाही लागू आहे. तुमच्या या देशांत ( क्यालिफोर्निया ) सहा कोटींची वस्ती आहे आणि यांत सुमारें सवादोन कोटी लोक कोणत्या तरी धर्माचे अनुयायी आहेत. बाकीच्यांना धर्मच नाहीं. यावरून धर्माचा प्रसार सर्व काळ वाढतोच असें नाहीं हें सिद्ध होतें. प्रत्येक देशांतले हे आंकडे आपण जमा केले तर तेथेंही निरनिराळ्या काळीं चढती-पडती होती व असते असेंच आपणांस आढळून येईल. मोठ्या धर्माचा हा प्रकार चालू असतां पंथांची वाढ मात्र एकसारखी होत आहे. नवे नवे पंथ निर्माण होत आहेत. एकाच धर्माच्या बाजूस सारें सत्य आणि परमेश्वर असता, तर इतके नवे पंथ कां निर्माण होते ? परमेश्वरानें सारें सत्य एकाच ग्रंथांत घालून तो आपल्या स्वाधीन केला हें एखाद्या धर्माचें म्हणणें खरें असतें, तर इतके पंथ निर्माण झालेच नसते. या एकाच ग्रंथाच्या आधारावर वीसपंचवीस पंथ निघाले नाहींत, अशीं पन्नास वर्षेंसुद्धां ओळीनें जात नाहींत. सारें सत्य कांहीं पुस्तकांत सांठवून परमेश्वरानें तीं आपल्या हवालीं केलीं, तीं त्यांच्या आधारावर आपण भांडणें उत्पन्न करावीं यासाठीं केलीं काय ? आज असा अनुभव येत आहे हें निर्विवाद आहे. मग असें कां व्हावें ? सारें सत्य एका ग्रंथांत एकत्र करून तो ग्रंथ परमेश्वरानें मनुष्याच्या हवालीं केला तरी तेवढ्यानें सारा कार्यभाग उरकत नाहीं हें यावरून उघड दिसतें. कारण त्या ग्रंथाचा पुरा उमज कोणासही पडत नाहीं. बायबलाचेच उदाहरण घ्या. ख्रिस्ती धर्माच्या पोटांत आज शेंकडों पंथ अस्तित्वांत आहेत, आणि यांतील प्रत्येक पंथ आधारादाखल बायबल पुढें करीत असतो, आणि आपलाच अर्थ बरोबर असून बाकीच्यांचे अर्थ चुकीचे आहेत असेंही प्रतिपादित असतो. हाच प्रकार प्रत्येक धर्मात आहे. मुसलमानांत आणि बौद्धांत असेच अनेक पंथ अस्तिवांत आहेत, आणि हिंदुधर्मांतही शेंकडों पंथ आहेत. ही सारी कर्मकथा एवढ्या विस्तारानें तुम्हांला सांगण्यांत माझा मुख्य उद्देश इतकाच कीं सारें जग एका धर्माचें करावयाचें या हेतूनें झालेले आजपर्यंतचे सारे प्रयत्न निष्फळ झालेले आहेत, आणि पुढेंही ते असेच निष्फळ होणार हा मुद्दा आपल्या ध्यानांत यावा. मौज अशी होते कीं एखाद्यानें एखादा पंथ काढावा आणि त्याचा प्रसार करण्याकरितां उपदेश

करूं लागावें; पहिला मुक्काम सोडून वीस कोससुद्धां तो पुरता गेला नसेल, इतक्यांत त्याच्या पाठीमागें त्याच्याच मताच्या आधारावर त्याचे अनुयायी वीस पंथ निर्माण करतात. हा प्रकार नित्य आपणांसमोर घडत आहे. कल्पना एकच असली तरी सर्वांच्या गळीं सारखीच उतरते असें नाहीं. वस्तुस्थिति अशा प्रकारची आहे, आणि ती अशी आहे हा परमेश्वराचा मोठाच अनुग्रह आहे असें मी समजतों. मी कोणत्याही पंथाविरुद्ध नाहीं. उलट, अनेक पंथ अस्तित्वांत आहेत याबद्दल मला आनंदच वाटतो, आणि दिवसेंदिवस असेच आणखीही पंथ निघावे हीच माझी इच्छा आहे. माझी अशी इच्छा असण्याचें कारण हेंच कीं विविधता हें प्रगतीचें मूळ आहे. येथें हजर असलेल्या सर्व लोकांच्या मनांत एकाच जातीचे विचार असतील तर आपलीं मनें विचारशून्य होतील. आपल्या मनांत कांहीं विचारच येणार नाहींत. जेव्हां दोन अथवा अधिक शक्ती कार्यकारी होतात तेव्हांच गति उत्पन्न होते, हें आपणांस ठाऊक आहेच. दोन भिन्न जातींच्या विचारांचें संघर्षण होतें तेव्हांच त्यांतून नवे विचार उत्पन्न होतात. विचारांत भिन्नता आहे म्हणूनच नवे विचार उत्पन्न होतात. आतां आपणा सर्वांचे विचार एक झाले तर आपण सारे प्रेतवत् होऊं. आपण विचारशून्य होत्साते एकमेकांचीं तोंडें पाहत बसूं. याहून अधिक प्रकारची चळवळ आपल्या चित्तांत उरणार नाहीं. खळखळाटानें वाहणाऱ्या जिवंत प्रवाहांतच भोंवरे आणि लाटा उत्पन्न होत असतात. डबक्यांतल्या मेलेल्या पाण्यांत लाटा कशाच्या आणि भोंवरे कोठले ? मोठे धर्म मृत झाले म्हणजे मात्र नवे पंथ उत्पन्न होणार नाहींत. मसणवटींत जसें शांतीचें आणि समतेचें अप्रतिहत साम्राज्य असतें, त्याचप्रमाणें आपणा जिवंत माणसांच्या जगांतही तें होईल; पण मनुष्याच्या मनांत विचार उत्पन्न होत आहेत तोंवर नानाविध पंथही निर्माण होणारच. विविधता ही जिवंतपणाची खूण आहे. जिवंतपणा असेल तेथें विविधताही असावयाचीच. जितकीं माणसें तितके पंथ निर्माण व्हावे हीच माझी इच्छा आहे. असें झालें तर प्रत्येकाला वेगळा धर्म मिळून त्याची वाढ होण्यास अवकाश सांपडेल. स्वतःच्या मर्जीप्रमाणें त्याला धर्माचरण करतां येईल.

वास्तविक पाहतां असाच प्रकार नित्य चालू आहे. आपणांपैकीं प्रत्येक जण आपआपल्यापरी विचार करीत असतो; पण दुःखाची गोष्ट इतकीच कीं,

असें होऊं नये याकरितां त्यांत अडथळा घालण्याच्या खटपटी प्राचीन काळापासून चालत आल्या असून, आजही त्या चालू आहेत. या कामीं पूर्वकाळीं तरवारीचा उपयोग करण्यांत आला होता, आणि आतांच्या काळीं दुसरीं साधनें उपयोगांत येतात इतकेंच. न्यूयॉर्क येथील एक प्रसिद्ध धर्मगुरु काय म्हणतो तें ऐका. फिलिपिनो लोकांना अवश्य जिंकिले पाहिजे. कां ? तर त्याशिवाय त्यांना ख्रिस्ती करतां येणार नाहीं ! फिलिपिनो लोक ख्रिस्ती झाले आहेतच; पण ते क्याथलिक पंथाचे आहेत, हेंच या गुरूला खपत नाहीं. त्यांना प्रेस्बिटेरियन पंथांत आणण्याकरितां रक्तपाताचें पाप माथीं घ्यावयासही हा गृहस्थ तयार आहे ! असले अमानुष विचारसुद्धां अंगावर शहारे आणतात; आणि नवलाची गोष्ट ही कीं हा भला गृहस्थ मोठा विख्यात धर्मगुरु आहे ! बहुश्रुतपणाबद्दल त्याची मोटी ख्याति आहे ! असल्या निर्भेळ गाळींव मूर्खपणाचें प्रदर्शन करण्यांत त्याला लाज वाटत नाहीं, त्या अर्थीं या जगाची स्थिति किती भयंकर झाली असली पाहिजे याचा विचार करा. आणि असलें आसुरी भाषण चालू असतां श्रोतृगण टाळ्या पिटतो, त्या अर्थीं जग कोठें वाहवले असलें पाहिजे हें ध्यानांत आणा. वाहवारे संस्कृति ! वाहवारे सुधारणा ! ऊन ऊन रक्त पिण्यास चटावलेल्या वाघोपंतालाच हें तत्त्वज्ञान शोभेल. प्रेतें खाणाऱ्या रानटी लोकांचे हे विचार नव्या परिस्थितींत नवें पांघरूण घेऊन आले आहेत. यांत शुद्ध नरभक्षकपणापेक्षां अधिक काय आहे ? सांप्रतच्या उदार विचारांच्या काळांत, एवढया सुधारलेल्या देशांत जर ही स्थिति चालू क्षणीं विद्यमान आहे तर पूर्वींच्या रानटी काळांत जेव्हां अनेक पंथ एकमेकांच्या नरडीचा घोंट घेण्यास टपत होते व या कामीं आपल्या साऱ्या शक्तीचा व युक्तीचा व्यय करीत होते, तेव्हां जगाची स्थिति किती भयंकर असेल हा हिशोब तुम्हीच पहा. आपल्यांतील पशुवृत्ति सध्या सुप्तावस्थेंत असून ती मेलेली नाहीं हेंच या इतिहासावरून ठरतें. थोडीशी सवड सांपडतांच दबा धरून बसलेला हा वाघोबा उडी मारतो आणि आपल्या नखादाढांचा उपयोग पूर्वींप्रमाणेंच खुशाल करतो. संधि सांपडण्याची खोटी, कीं त्यानें झांप घातलीच. तरवारीहून निराळीं पण तिजपेक्षां अधिक तिखट, अधिक जाज्वल्य आणि अधिक भयंकर शस्त्रें सांप्रतकाळीं निर्माण झालीं आहेत. तीं शस्त्रें म्हणणें सामाजिक धिक्कार आणि

सामाजिक निर्बंध हींच होत. जुन्या काळच्या जड आणि दृश्य शस्त्रांहून हीं अदृश्य शस्त्रें अधिक भयंकर आहेत. आपणांहून कोणाचे विचार भिन्न दिसले कीं त्याजवर हीं अस्त्रे आपण फेकतों; पण आपणांप्रमाणेंच साऱ्यांचे विचार असावे हा जुलूम कोठचा हेंच मला समजत नाहीं. मी खरा बुद्धिमंत प्राणी असेन तर या विचारभिन्नतेबद्दल मला संतोष वाटला पाहिजे. शांततेच्या आणि समतेच्या स्मशानांत राहणें कोणाही बुद्धिमंत प्राण्याला आवडणार नाहीं. जेथें जिवंत विचार म्हणून आहेत, तेथें विचारभिन्नता ही असावयाचीच. विचारांत विविधता असणें हें विचारांच्या जिवंतपणाचें लक्षण आहे. विचारांची ही नाडी आहे. मी स्वतः विचारवंत असेन तर माझ्यासारख्या विचारवंत प्राण्यांच्या सहवासांतच मला सौख्य वाटलें पाहिजे. ज्या ठिकाणीं नाना विचारांच्या तरंगांची मनोहर विविधता असेल, तेथेंच राहण्यांत माझ्या वृत्तीला प्रसन्नता वाटली पाहिजे.

धर्मविचारांत इतकी विविधता असतां हे सारेच विचार खरे कसे असूं शकतील, असा एक प्रश्न येथें उपस्थित होण्याचा संभव आहे. जर एक वस्तु खरी असेल तर तिचा जेथें अभाव असेल तेथें असत्य असलें पाहिजे. दोन मतांत परस्परविरोध असतां तीं दोन्ही खरीं कशीं असूं शकतील, अशा प्रकारच्या प्रश्नाचें उत्तर देणें अवश्य आहे; पण हें उत्तर देण्यापूर्वी उलट तुम्हांलाच एक प्रश्न मी विचारतों तो असाः जगांतील सर्व धर्मांत दिसणारा विरोध खरोखर विरोधच आहे काय? वेगवेगळ्या धर्मांच्या बाह्योपचारासंबंधीं हा प्रश्न नाहीं. बाह्योपचार हा नुसता बाहेरचा पोषाक आहे. माझा प्रश्न अंतर्गत तत्त्वासंबंधीं आहे. अंतर्गत तत्त्वें खरोखरच परस्परविरोधी आहेत कीं त्यांत विरोधाभास आहे असा माझा प्रश्न आहे. निरनिराळ्या धर्मांच्या देवळांचे आकार भिन्न आहेत, त्यांच्या भाषा भिन्न आहेत, त्यांचीं हव्यकव्यें वेगळीं आहेत, त्यांचे ग्रंथ वेगवेगळे आहेत, हें सारें खरें; पण त्यांच्या अंतरात्म्यांत भिन्नता आहे काय? हव्यकव्यें, ग्रंथ, देवळें वगैरे गोष्टी जड देहासारख्या असून आंतील तत्त्वें हीं धर्मांच्या जीवात्म्यासारखीं आहेत. प्रत्येक धर्माला हीं दोन अंगें असून प्रत्येकाच्या जडदेहामागें जीवात्मा आहे. या जीवात्म्यांच्या स्वरूपांतही भिन्नता असूं शकेल; पण जेथें भिन्नता असते तेथें विरोध अवश्यमेव असतो काय? हीं भिन्न स्वरूपें परस्परांस खोडून

काढतात कीं परस्परांचें पोषण करतात ? मुद्याचा प्रश्न असा आहे. माझें वय थोडें होतें तेव्हांच हा प्रश्न प्रथम माझ्या मनांत आला, आणि तेव्हां-पासून आजतागाईत त्याचा अभ्यास मी करीत आहें. या माझ्या अभ्यासां-तून निष्पन्न झालेल्या गोष्टी तुमच्या उपयोगीं कदाचित् पडतील असे वाट-ल्यावरून त्या तुम्हांला मी सांगतों. भिन्न धर्मांच्या तत्त्वांत वस्तुतः विरोध नसून तीं परस्परांचें पोषण करतात असें मला वाटतें. विश्वव्यापी सत्याचा एक एक भाग एकएका धर्मानें जणुं काय विशद केला आहे. आपलें सर्व बळ त्या धर्मानें त्या एकाच भागावर खर्चून त्याला नीटनेटका करण्याचें काम केलें, आणि अशा रीतीनें सर्व धर्म मिळून पूर्णत्वानें सत्य विशद झाले आहे. कोणताही एक धर्म बाकीच्यांपासून वेगळा पडला नसून सर्व सत्याचा तो एक घटक मात्र झाला आहे. आज हयात असलेल्या प्रत्येक पंथाच्या पोटीं एक महत्तत्त्व असतें. अशा रीतीनें तत्त्वांमागें तत्त्वें आणि प्रमेयामागें प्रमेयें आजपर्यंत विशद होत आलीं आहेत. मनुष्यजातीची धार्मिक उन्नति अशा प्रकारें झाली आहे. प्रथम चुकीच्या कल्पनेला आरंभ करून अखेर मनुष्य सत्याच्या मार्गाला लागला असें झाले नाहीं. तर कमी सत्यांतून अधिक सत्याकडे तो आला आहे. आज एखादा मुलगा आपल्या बापा-पेक्षांही अधिक हुशार झाला असेल; पण यावरून त्याचा बाप मूर्खशिरोमणी होता असा तर्क काढावयाचा काय ? तुह्मी स्वतः लहान होतां तेव्हांपेक्षां आज तुमचें ज्ञान अधिक असेल; पण त्यामुळें आपलें बाल्य निरर्थक, तुच्छ होतें असा विचार तुमच्या मनांत येतो काय ? असें होत नाहीं; याचें कारण हेंच कीं सांप्रतची वाढ ही पूर्वीच्या स्वरूपांतूनच निर्माण झाली आहे, पूर्वीच्या ज्ञानांत भर पडून तुमचें सांप्रतचें ज्ञान तुम्हांस प्राप्त झालें आहे.

याशिवाय यांत आणखीही एक मुद्दा आहे. एकाच वस्तूबद्दल अनेकांचीं अनेक मतें असतात व त्यांपैकीं कांहीं बऱ्याच अंशीं विरोधीसुद्धां असतात. तथापि सर्व एकच वस्तूचा निर्देश करतात हेंही खोटें नाहीं. एखादा मनुष्य सूर्यावर जाण्यास निघाला आहे अशी कल्पना करा, आणि आपल्या प्रत्येक मुक्कामाला सूर्याचे नवे नवे फोटो तो घेत आहे असेंही समजा; तो गृहस्थ परत येईल तेव्हां त्याजजवळ सूर्याचे फोटो पुष्कळ जमा झाले असतील. हे फोटो आपण पाहिले तर यांतील कोणत्याही दोन फोटोंत साम्य नाहीं असें

आपणास आढळून येईल; पण त्यांत साम्य नसलें म्हणून ते एकाच सूर्याचे निरनिराळ्या जाग्यांवरून घेतलेले फोटो आहेत ही गोष्ट कोण नाकबूल करील ? या समोरच्या देवळाचेच चार फोटो चार जाग्यांवरून घेतले तरी तेसुद्धां वेगवेगळे दिसतील; तथापि ते एकाच देवळाचे फोटो नाहींत असें होईल काय ? त्याचप्रमाणें आपण वेगवेगळ्या जाग्यांवरून एकाच सत्याकडे पाहत आहों. आपला जन्म, आपलें शिक्षण, आजूबाजूची परिस्थिति वगैरे गोष्टींत जी भिन्नता असते त्यामुळें आपणांपैकीं प्रत्येकाचा दृष्टिकोण वेगळा झालेला असतो. अशा प्रकारच्या परिस्थितींत सत्याचा जेवढा अंश आपल्या नजरेखालीं घालतां येईल तेवढा आपण घालीत असतों, आपल्या अंतःकरणाच्या वृत्तींनीं तो रंगवीत असतों, बुद्धीनें तो जाणिवेंत आणीत असतों आणि मनानें त्याचा ग्रास करीत असतों, सत्याच्या जेवढ्या अंशाचा संबंध आपणास घडतो तेवढाच अंश आपल्या जाणिवेंत येत असतो. जेवढा अंश घेण्याची पात्रता आपल्या अंगीं असते तेवढ्याचेंच ग्रहण आपण करतों. यामुळेंच माणसामाणसांत मतभेद उत्पन्न होतात आणि कित्येक प्रसंगीं परस्परविरोधी कल्पना पुढें येतात. तथापि आपण सारे त्या विश्वव्यापी सत्याचेच अंश आहों.

विश्वाचे व्यापार सुरळीत चालावे यासाठीं परमेश्वरानें निरनिराळ्या शक्तींची योजना केली आहे. या शक्तींपैकीं एकही फुकट जाऊं नये अथवा एकीचाही अपव्यय होऊं नये अशी त्यांची घटना त्यानें केली आहे. या शक्तींचीं रूपें निरनिराळीं दिसलीं तरी त्या सर्वांचें कार्य एकच आहे. मानवकुलाचें कल्याण हा एकच हेतु मनांत धरून या निरनिराळ्या शक्ति कार्यव्यापृत झाल्या आहेत. यांतील कोणतीही मृत व्हावयाची नाहीं आणि कोणतीही आपणांस नाहींशी करतां यावयाची नाहीं. जडशक्तीपैकीं जशी कोणतीही नष्ट करतां येत नाहीं, त्याचप्रमाणें चैतन्यशक्तीच्या या स्वरूपांपैकींही कोणतेंच आपणांस नाहींसें करतां यावयाचें नाहीं. प्राचीन धर्मांपैकीं प्रत्येक आज जिवंत राहिला आहे हें आपण पाहत आहोंच. यांत केव्हां एखाद्याची अधोगति तर दुसऱ्या वेळीं उन्नति असा प्रकार घडत असेल. कित्येक वेळां त्याच्या बाह्य पोषाकांतला पुष्कळसा भाग छिन्नभिन्नही होत असेल, आणि दुसऱ्या एखाद्या वेळीं त्याच्यावर अनेक तऱ्हेचे पोषाक एकाच वेळीं चढलेले आपणास

दिसत असतील. तथापि त्याचा आत्मा खरा एकरूपच असून तो तसाच एकरूप सदोदित असावयाचा, तो कधींही नष्ट व्हावयाचा नाहीं. ज्या साध्यासाठीं हे निरनिराळे धर्म अवतरले आहेत तें साध्य चिरंजीव आहे, आणि यामुळेच प्रत्येक धर्म जिवंत राहिला असून आपल्या पूर्वनिश्चित दिशेनें पुढें पाऊल टाकीत आहे.

सर्व जगाचा एक धर्म असावा अशी इच्छा सर्व देशांतील तत्त्वज्ञ करीत असतात; पण वास्तविक पाहतां असा धर्म नवीन निर्माण करावयाचा नसून तो आधीच अस्तित्वांत आहे. मनुष्यांत बंधुत्वाचें नातें जसें आधींच अस्तित्वांत आहे त्याचप्रमाणें सर्वांचें धर्मैक्यही आहे. तुम्हांपैकीं ज्या कोणीं दूरदूरच्या देशांत प्रवास केला असेल, त्याला त्या त्या देशांत आपले भाऊ आणि आपल्या बहिणी खास आढळल्या असतील. मला तर अशीं माझीं भांवडें प्रत्येक देशांत आढळलीं. बंधुत्वाचें नातें आधींच सिद्ध आहे. यांत गोम इतकीच कीं या नात्याचा विसर पुष्कळांस पडला आहे. यांतील कित्येक असें नवें नातें उत्पन्न करण्यास जातात आणि त्यामुळें जुन्या व सिद्ध असलेल्या नात्याच्या नाश मात्र होतो. आपला धर्म लोकांवर लादण्याकरितां धर्मप्रचारकांचा धंदा जे लोक करतात त्यांनीं तो धंदा कांहीं दिवस बंद ठेवला तर हें जुनें नातें अस्तित्वांत असल्याचा प्रत्यय ताबडतोब येईल. या नात्याची आठवण लोकांस होण्याचें कारण हे धर्मप्रचारकच आहेत. कारण तसें करण्यांत त्यांच्याच पोळीवर तूप पडावयाचें असतें. प्रत्येक देशांतील भिक्षुक आणि धर्माधिकारी कट्टे पुराणमताभिमानी असतात याचें कारण काय ? स्वतःस धर्माधिकारी म्हणविणाऱ्या लोकांत खरे मार्गदर्शक फारच थोडेच असतात. बाकीचे बहुतेक सारे लोकांस मार्ग न दाखवितां आपणच लोकांच्या मार्गानें चालत असतात. लोकांचे ते बंदे गुलाम बनलेले असतात. ‘ रेड्याला पांच शेर दूध ’ असे लोकांनीं म्हटलें तर हे ‘ हांजी ’ करून खुशाल माना डोलवितात. याकरितां लोकांची सुधारणा हे करतील ही आशाच नको. लोक सुधारले तर हे मात्र सुधारतील. लोक पुढें गेले म्हणजे मागें राहणें यांना अशक्यच होईल. मात्र ते आपण होऊन सुधरावयाचे नाहींत व लोकांस मार्गही दाखवावयाचे नाहींत. याकरितां या धर्मवीरांना नांवें ठेवण्यापेक्षां आपण आधीं आपल्याच डोळ्यांतलें कुसळ पाहावें हें अधिक बरें. आपणाला मिळणारी प्रत्येक वस्तु आपल्या

योग्यतेप्रमाणेंच प्राप्त होत असते. उद्यां एखादा धर्माधिकारी उठला आणि तुम्हांस नव्या कल्पना सांगूं लागला तर त्याची गत काय होईल? त्याचीं पोरेंबाळें उपाशीं मरतील आणि त्याला धड पांघरूणही मिळावयाचें नाहीं. स्वार्थसाधन हें प्रत्येकाला आहेच. कोणी धर्मोपदेशक झाला म्हणून त्याला स्वार्थ सुटला असें नाहीं. स्वार्थसाधनाचे जे नियम तुम्हांस लागू पडतात तेच उपदेशकवर्गालाही लागू आहेत. तुम्हीं पुढें पाऊल टाकलें तर तेही छाती काढून पुढें सरतील. आतां या वर्गातही अपवादात्मक माणसें मुळींच नसतात असे माझें म्हणणें नाहीं. केवळ सत्याची चाड बाळगून त्याच्या शोधासाठीं निधड्या छातीनें पुढें सरणारा एखादा पुरुषसिंह या वर्गातही असतो. असा पुरुष लोकमताला भीक घालीत नाहीं. तो सत्याकडेच नजर लावून चालत असतो आणि फक्त त्याचीच पर्वा करतो. त्याला सत्यानें जणुं काय पछाडलेलें असतें आणि तें त्याच्या मानेवर बसून त्याला चालवीत असतें. तो मागें वळूनसुद्धां पाहत नाहीं आणि त्याला कोणी अनुयायीही मिळावयाचे नाहीत. त्याला एक परमेश्वर मात्र दिसत असतो, आणि त्याच दीपाच्या खुणेवर नजर ठेवून आपला मार्ग तो आक्रमीत असतो. जग त्याला मेलेलें असतें आणि तो जगाला मेलेला असतो.

तुमच्या या देशांत मॉर्मान पंथाचा एक गृहस्थ मला भेटला. त्याचा पंथ मीं स्वीकारावा असा उपदेश तो मला करीत होता. मीं त्याला म्हटलें "तुमच्या मतांबद्दल मला फार आदर आहे; तथापि कांही बाबींत आपणा दोघांचीं मतें जुळतीं नाहींत. मी त्यागी मनुष्य आहें, मी संन्यासाश्रमी आहें आणि तुमच्या पंथांत तर एका वेळीं दहापांच बायका करतात. अहो, पण तुम्ही आपल्या मताचा प्रसार करण्याकरितां हिंदुस्थानांत कां जात नाहीं?" माझा हा प्रश्न ऐकून त्याला मोठें नवल वाटलें आणि तो म्हणाला, "हिंदु लोक ब्रह्मचर्य श्रेष्ठ मानतात आणि आम्ही तर दहापांच बायका एकदम करा असा उपदेश करणार; मग तेथें जाऊन काय फायदा? असा उपदेश तुम्ही मला करतां तरी कसा?" यावर मीं त्याला उत्तर दिलें "माझे देशबांधव कोणत्याही धर्मवाद्याचें म्हणणें ऐकून घ्यावयास तयार असतात. एखादा धर्मविचार कोठून आला अथवा तो कोणीं आणला हें न पाहतां शांतपणें तो ते ऐकून घेतात. तुम्ही खरोखरच तेथें जावें अशी माझी इच्छा आहे. पहिलें

कारण असें कीं जगांत अनेक पंथ जिवंत असावे अशी माझी इच्छा आहे आणि दुसरी गोष्ट अशी कीं ज्यांना चालू पंथांपैकीं एकही पसंत नाहीं असे लोक सांप्रत हिंदुस्थानांत पुष्कळ आहेत. त्यांना कसला धर्मच नकोसा झाला आहे. अशा लोकांत तुह्मांला कांहीं अनुयायी मिळतील."

जगांत पंथ जितके अधिक तितका धर्मप्रसाराचा संभव अधिक असतो. अनेक पंथ अस्तित्वांत असले म्हणजे धर्मलंड लोकसुद्धां त्यांपैकीं एखाद्याचा तरी विचार करतील. खाणावळींत अनेक प्रकारचे पदार्थ तयार असले ह्मणजे बहुधा सर्वांना आपली आवड तृप्त करतां येते. एखादा तरी आवडीचा पदार्थ त्यांना मिळून त्यांची भूक निवते. त्याचप्रमाणें अनेक पंथ असले म्हणजे एखादा तरी धर्मशून्यांच्या पसंतीस पडण्याचा संभव आहे. याकरितां प्रत्येक देशांत पंथांची अभिवृद्धि व्हावी अशी माझी इच्छा आहे. लोकांना धर्मच नको असे नाहीं, या म्हणण्यावर माझा मुळींच विश्वास नाहीं. पुष्कळ लोक धर्म टाकतात याचें कारण त्यांच्या आवडीचा धर्म त्यांस मिळत नाहीं हेंच होय. पक्का निरीश्वरवादी अथवा जडवादी समजला जाणारा मनुष्यसुद्धां पक्का धार्मिक बनण्याचा संभव आहे; मात्र त्याच्या चित्ताला पटेल अशा रीतीनें सत्याचें उद्घाटन करणारा पंथ त्याला मिळाला पाहिजे. प्रत्येकाच्या भुकेला आवडीप्रमाणें खाणें पाहिजे. ज्यानें त्यानें आपली भूक आपल्या मार्गानें शमवावी अशी सवलत समाजरचनेंत असली पाहिजे. आह्मी हिंदु लोक हातानें पदार्थ खातों, यामुळें आमचीं बोटें हवीं तशी वळतात. तुम्हांला आपल्या बोटांचा उपयोग आम्हांप्रमाणें करतां येणार नाही. यामुळें उद्यां तुम्हांला हातानें जेवावयास लाविलें तर तुमची तृप्ति होणार नाहीं. नुसतें अन्न दिल्यानें भूक भागते असें नाहीं; तर ज्याच्या त्याच्या आवडीच्या पद्धतीनेंही तें त्यानें खावें लागतें; म्हणजे त्याची तृप्ति होते. त्याचप्रमाणें धार्मिक विचार पुष्कळ सांगून फायदा नाहीं; तर तुम्हांला आवडेल अशा पद्धतीनें ते तुम्हांला सांगितले पाहिजेत. तुम्हांला समजेल अशा भाषेंत ते तुमच्याकडे आले पाहिजेत. तुमच्या जीवात्म्याला जी भाषा बरोबर समजत असेल, त्या भाषेंत त्या विचारांची मांडणी झाली पाहिजे. असें झालें तरच तुमच्या चित्ताचें समाधान होईल. माझीच भाषा बोलणारा एखादा मनुष्य मजकडे येऊन आपले विचार मला सांगतो, तेव्हां माझें चित्त त्याच्या

म्हणण्याकडे ताबडतोब वळतें. त्यानें सांगितलेलीं प्रमेयें मला ताबडतोब पटतात आणि मग जन्मभर माझ्या चित्तांत तीं राहतात. ही वस्तुस्थिति प्रत्येकानें ध्यानांत ठेवण्याजोगी आहे.

'व्यक्ती तितक्या प्रकृती' अथवा 'पिंडे पिंडे मतिर्भिन्ना' हे तत्त्व सर्वथा खरें आहे, असा सिद्धांत या एकंदर हकीगतीवरून काढण्यास हरकत नाहीं. इतक्या प्रकारच्या भिन्न प्रकृतींना वळण लावण्याचें कठीण काम धर्मांनीं आपल्या अंगावर घेतलें आहे. एखादा मनुष्य आपलीं दोन तीन मतें घेऊन पुढें सरतो आणि साऱ्या मनुष्यजातीचें समाधान त्या दोन तीन मतांनीं झालेंच पाहिजे असें प्रतिपादित सुटतो. एक लहानसा पिंजरा जणुं काय आपल्या हातीं घेऊन या जगद्रूप प्रचंड पशुसंग्रहालयांत तो येतो आणि झाडून साऱ्या पशूंचा प्रवेश त्यांत झाला पाहिजे असा हट्ट धरतो. परमेश्वर, हत्ति आणि बाकी साऱ्या वस्तु त्या पिंजऱ्यांत कोंबण्यासाठीं तो धडपड करतो. जिवंत हत्ती आंत शिरेना तर त्याचे तुकडे करून तरी ते आंत कोंबण्याची त्याची तयारी असते. इतक्यांत दुसराच एक पंथवाला उठतो आणि आपल्या पिंजऱ्यांत जाण्याविषयीं साऱ्या दुनियेला मोठ्या आग्रहानें सांगूं लागतो. इतकीं जिवंत माणसें एवढ्या पिंजऱ्यांत मावत नसलीं तर त्याचे तुकडे करून ते भरण्यासही त्यास कांहीं दिक्कत वाटत नाहीं; कारण त्याच्या पिंजऱ्यांत जे न शिरतील ते नरकाला जातील याची मोठी काळजी त्याला पडलेली असते! आपला उपदेश लोक ऐकेनासे झाले तर असे कां होतें याचा विचार आपल्या मनाशीं शांतपणें करणारा एकही प्रचारक आजपर्यंत मला भेटला नाहीं. 'मी सत्य कथन करीत असतां आणि लोकांना त्यांच्या बऱ्याचा मार्ग दाखवीत असतां लोक माझें कां ऐकत नाहींत?' असा प्रश्न आपल्या मनाला तो कधींही करीत नाहीं. 'लोकांना पटेल अशा भाषेत तें सत्य मला कां मांडतां येत नाहीं?' असा प्रश्न त्याच्या मनाला स्पर्शही करीत नाहीं. लोकांचे डोळे उघडावेसें करणें आपणास कां साधत नाहीं याचा विचार तो करीत नाहीं. उलट लोकांनाच तो शिव्या देतो आणि लोकच महामूर्ख आहेत, असा सिद्धांत आपल्या मनाशीं बांधून तो मोकळा होतो. मूर्खपणा कोणाच्या तरी पदरीं बांधणें अवश्य असेल तर वास्तविकपणें त्यानें आपलाच पदर पुढें केला पाहिजे. कोणाच्या तरी माथीं

त्याचे शिव्याशाप पडावयाचे असतील तर ते आपल्याच मस्तकीं त्यानें घेतले पाहिजेत; पण ही गोष्ट त्याच्या लक्ष्यांतच येत नाहीं. सारा अपराध काय तो लोकांचा ! आपल्या पंथाचीं तत्त्वें विस्तृत करून सर्वांचा समावेश त्यांत होईल, इतकें त्याचें स्वरूप मोठें करावें ही युक्ति त्याच्या डोक्यांत शिरत नाहीं.

आकुंचित वृत्तीचा सुकाळ जगांत इतका कां झाला आहे हें आतां आपल्या लक्ष्यांत आलेंच असेल. एखाद्या अल्पांशानें उठून मीच सारी वस्तु असा हट्ट करावा तसेंच हें आहे. एखाद्या तत्त्वाचा संग्रह करावा आणि यांत साऱ्या विश्वाचा अंतर्भाव होतो, असा आग्रह धरावा हाच क्रम प्रत्येक पंथानें चालविल्यामुळें धर्मविचारांत औदार्य ह्मणून राहिलें नाहीं. ज्यानें जगांत पुरीं शेंपन्नास वर्षेंही काढलीं नाहींत, आणि ज्याचा जन्म चुकीस पात्र अशा मानवी मेंदूंत झाला अशा एखाद्या कालच्या पंथानें अनंत सत्याचा पूर्ण शोध आपणांस लागला असा हक्क सांगावा हा केवढा उद्धटपणा ! अहंमन्यतेची ही अगदी शिकस्त झाली. यांत मानवी मेंदूच्या शाहणपणाचा प्रकाश तर नाहींच पण त्याचा पोकळ गर्व मात्र दिसून येतो खरा. अशा प्रकारच्या पोकळ शब्दावडंबराला अखेरीस यश येत नाहीं यांत नवल तें काय? पोकळ गर्वाला यश कधींही येऊं नये हा ईश्वराचा संकेत केवढया दयाळूपणाचा आहे बरें ! असल्या कर्मांत मुसलमानांना खरोखरच पुष्कळ यश आलें. त्यांनीं आपलें प्रत्येक पाऊल तरवारीच्या जोरावर पुढें टाकलें. एका हातांत तरवार आणि दुसऱ्या हातांत कुराण घेऊन ते धुमाकूळ घालीत सुटले, आणि त्यांत त्यांना कल्पनेपलीकडे यश आलें. सहाशें वर्षेंपर्यंत त्यांचा हात धरणारा सव्वाशेर त्यांना कोणीच भेटला नाहीं; पण अखेरीस त्यांचीही मुदत भरली आणि आपला हात त्यांना आंखडावा लागला. त्यांचा मार्ग जो कोणी स्वीकारील त्याचीही गत अखेरीस अशीच होईल. आम्ही माणसें किती बालबुद्धीचीं आहों ! मनुष्यस्वभाव आम्ही नेहमीं विसरतों. या जगांतील आपल्या जीवनक्रमास जेव्हां नुकताच आरंभ झालेला असतो, तेव्हां आपल्या चित्तांत केवढया मोठाल्या आशा असतात ? आपण कोणी तरी अद्वितीय पुरुष होणार असें आपणास वाटत असतें. कांहीं झालें तरी ही आपली आशा नाहींशी होत नाहीं; पण तेच आपण वृद्ध होत चाललों म्हणजे आपले सारे विचार बदलतात—आपल्या आशेची क्रांति होते. धर्मांनाही हीच गोष्ट लागू आहे. ते

बाल्यावस्थेंत असतात तेव्हां साऱ्या मानवजातीच्या विचारांत आपण क्रांति करूं असें त्यांना वाटत असतें, आणि या प्रसाराच्या आशेच्या आधीन होऊन ते जगभर कापाकापी सुरू करतात. अशा रीतीनें धर्मप्रसाराच्या कार्यात जुलमाचा प्रवेश होतो. अखेरीस जुलमाचा आणि रक्तस्रावाचा उपयोग फारसा होत नाहीं असा अनुभव आला म्हणजे ते थंडावूं लागतात; आणि मग त्यांचें चित्त विचाराकडे वळूं लागतें. जें काम करण्यासाठीं त्यांनीं कंबर बांधून हातीं तरवार घेतली तें काम त्यांच्या हातून घडलें नाहीं हें आपण पाहत आहोंच. साऱ्या मनुष्यजातीचें कल्याण करण्याचा विडा त्यांनीं उचलला होता. या माथेफिरू पंथांपैकीं एखाद्याचा प्रसार साऱ्या जगभर खरोखरच झाला असता तर काय अनर्थ ओढवते याचा विचार तुह्मीच करा. परमेश्वराची अत्यंत मोठी कृपा कीं या कामांत त्यांस यश आलें नाहीं; पण असें आहे तरी त्या प्रत्येकाच्या पोटीं एक एक महत्तत्त्व आहे हेंही विसरतां कामा नये. या प्रत्येक दृश्य पंथामागें त्याचा जीवात्मा आहे. या ठिकाणीं एका जुन्या हरदासी गोष्टीची आठवण होते. एका गांवीं एक चेटकी राहत होता, तो लोकांस ठार मारीत असे; पण लोक मात्र त्याला मारूं शकेनात. त्याचें मरण कशांत आहे हें कोणास ठाऊक नव्हतें. त्याचें मरण एका पक्ष्यांत होतें. त्या पक्ष्याजवळ त्यानें आपला जीवात्मा ठेवला होता. तो पक्षी सुरक्षित असेपर्यंत त्यालाही कशापासून मरणाची भीति नव्हती. आपणही अशाच रीतीनें आपले जीवात्मे, जणुं काय, एक एका पक्ष्याच्या स्वाधीन करून ठेविले आहेत. आपणापैकीं प्रत्येकाला विशिष्ट साध्य आहे. जगाला एक एक संदेश पोहोंचविण्याचें कार्य आपणांपैकीं प्रत्येकाकडे आलेलें आहे; एक एक विशिष्ट कार्य जणुंकाय मानवदेहाच्या रूपानें प्रकट झालें आहे. तुमच्या सर्वस्वाचें हरण उद्यां झालें तरी जोंपर्यंत तुमच्या या नियतकार्याला धक्का लागलेला नाहीं तोंपर्यंत जगांत कोणाच्यानेंही तुमचा वध करवणार नाहीं. तुमच्याकडे संपत्ति येईल आणि जाईल. डोंगराएवढीं संकटें तुह्मांवर कोसळतील; पण तुमचें साध्य तुह्मीं अभंग ठेवलें असेल, तर तुमचा नाश कोणासही करवणार नाहीं. तुमच्या आयुष्याचीं शंभर वर्षें पुरीं झालीं असलीं तरी तुमचें साध्य तरुण आणि जोमदार असेल तर तुमचा वध करूं शकेल असा समर्थ कोण आहे? पण तें साध्य भंगलें कीं तुमचें रक्षण करण्यासही कोणी समर्थ नाहीं.

साऱ्या जगांतील संपत्ति तुह्मांपाशीं असली अथवा साऱ्याचे चक्रवर्ती राजे तुह्मी असलां तरी तुमच्या रक्षणास या वस्तूंचा उपयोग यत्किंचित्‌ही व्हावयाचा नाहीं. प्रत्येक राष्ट्रालाही याचप्रमाणें एक एक कामगिरी करावयाची असते. राष्ट्र म्हणजे पुष्कळ मनुष्यांचा समूह आणि जोंपर्यंत हा समूह म्हणजे हें राष्ट्र आपल्या नियत साध्यापासून भ्रष्ट झालेलें नसतें तोंवर त्याचा नाश करण्याचें सामर्थ्य कोणासही नाहीं; पण तें आपल्या साध्यापासून च्युत झालें, आणि भलत्याच गोष्टींमागें धावूं लागलें कीं क्षणार्धात काळव्याघ्राची उडी त्याजवर पडते आणि पाहतां पाहतां तें दिसेनासें होतें.

हीच गोष्ट धर्मासही लागू आहे. सारे जुने धर्म आज जिवंत आहेत, याचा अर्थ हाच कीं ते अद्यापि कार्यच्युत झालेले नाहींत. ज्या उद्देशानें ते जन्मास आले तो त्यांचा उद्देश ते अद्यापि विसरले नाहींत. त्यांनीं अनेक चुका आजपर्यंत केल्या असल्या, त्यांच्या मार्गांत अनेक प्रकारच्या अडचणी आल्या असल्या, अनेक बखेडे त्यांनी केले असले आणि त्यांच्यावर बाह्योपचारांचीं पुष्कळशीं पुटें चढलीं असलीं तरी त्यांचें अंतःकरण अद्यापि शाबूद आहे. त्यांच्या उडण्याच्या क्रियेचा जोम अद्यापि पहिल्यासारखाच ताजा आहे. त्या अंतःकरणांतील जिवटपणा अद्यापि पहिल्यासारखाच मजबूत आहे. ज्या कार्यासाठीं त्यांचा अवतार झाला तें कार्य त्यांपैकीं कोणीही विसरला नाहीं. हें उद्दिष्ट कार्य कोणतें असावें हे पाहणें मोठें संतोषकारक आहे. या उदाहरणासाठीं महंमदी धर्म घ्या. ख्रिस्ती लोक महंमदी धर्माइतका द्वेष दुसऱ्या कोणत्याही धर्माचा करीत नाहींत. साऱ्या जगांत अत्यंत वाईट असा जर कोणता धर्म असेल तर तो महंमदी धर्म होय असें ख्रिस्ती लोकांस वाटतें. कोणाही मनुष्यानें महंमदी धर्माचा स्वीकार केला कीं जगांतले सारे मुसलमान त्याला भाऊ म्हणून मिठी मारावयास तयार होतात. मग तेथें कोणत्याही प्रकारचा भेदभाव ते पाहावयाचे नाहींत. हा पूर्वी कोणत्या धर्माचा होता ही चौकशी कोणी करावयाचे नाहीत. हा श्रीमंत आहे कीं भिकारी आहे याची चौकशी कोणी करावयाचे नाहीत. इतकें औदार्य जगांतल्या दुसऱ्या कोणत्याही धर्मात तुह्मांस आढळावयाचें नाहीं. तुमच्या अमेरिका खंडांतला एखादा मूळचा ताम्रवर्ण उद्यां मुसलमान झाला तर त्याला आपल्या ताटांत घेण्यास तुर्कस्तानच्या सुलतानाला सुद्धां दिक्कत वाटावयाची नाहीं. त्याच्या

मेंदूंत कांहीं तरतरी असेल तर मुसलमानी राज्यांतलें कोणतेंही स्थान त्याच्या आटोक्याबाहेर राहणार नाहीं. तुमच्या देशांत ख्रिस्ती धर्माचे अनेक पंथ आणि त्यांचीं अनेक प्रार्थनामंदिरें अथवा चर्चें अस्तित्वांत आहेत; पण जेथें गोरा उपासक आणि काळा शिद्दी हे मांडीला मांडी भिडवून बसूं शकतील असें एकही मंदिर माझ्या पाहण्यांत आजपर्यंत आलें नाहीं. हा फरक केवढा मोठा आहे याचा विचार करा. आपल्या साऱ्या अनुयायांतील भेद इस्लामी धर्म ताबडतोब मोडून टाकतो. त्याचे सारे अनुयायी बरोबरीचे होतात. इस्लामी धर्माचा हा विशेष अत्यंत रमणीय आहे. कुराणांत कित्येक ठिकाणीं इंद्रियांना पूर्ण मुभा दिली आहे असें दिसून येतें; पण तसें असलें तरीही हरकत नाहीं. जगांतील साऱ्या मुसलमानांत बंधुभाव आहे हा धडा जगाला शिकविण्याकरितांच इस्लामी धर्म अवतरला आहे. मुसलमानी धर्माचा हा विशिष्ट मार्ग आहे. याखेरीज स्वर्गादि लोकांच्या कल्पना वगैरे गोष्टी हीं त्याजवर चढलेलीं पुटें होत. तो मुसलमानी धर्माचा आत्मा नव्हे.

हिंदु धर्माचाही असाच एक विशेष आहे. चैतन्याचा अभ्यास हा त्याचा विशेष आहे. आह्मां हिंदूंचें हे राष्ट्रीय ध्येय आहे. परमेश्वरविषयक कल्पना निश्चित करण्याचा अट्टहास हिंदूंनी जेवढा केला आहे, तेवढा दुसऱ्या कोणत्याही लोकांनीं केलेला नाहीं. हा सिद्धांत निश्चित करण्याकरितां जितक्या प्रकारचे वादविवाद आमच्या धर्मग्रंथांत आढळतात, त्याचा शतांशही दुसऱ्या कोणत्याही धर्मपुस्तकांत आढळत नाहीं. जडाचा स्पर्शही ज्या कल्पनेंत शिल्लक उरलेला नाही, अशी आत्मविषयक कल्पना त्यांनींच निश्चित केली आहे. आत्मविषयक कल्पना अत्यंत शुद्ध असली पाहिजे. ऐहिक कल्पनेचा संपर्कसुद्धां तेथें उरूं नये, त्याला मानवी स्वरूप प्राप्त होतां उपयोगी नाही. परमेश्वरविषयक कल्पनेंत मानवी गुणावगुणांचें मिश्रण होणें हा त्या पवित्र रूपाचा अधःपात होय. सर्वत्र एकरूपता, आत्मानुभव, ईश्वराचें सर्वव्यापित्व इत्यादि विषयांची चर्चा सर्व हिंदु धर्मग्रंथांत तुम्हांस एकाच स्वरूपाची आढळेल. परमेश्वर स्वर्गांत राहतो, त्यानें हें जग शून्यांतून निर्माण केलें, असल्या प्रकारच्या कल्पना शुद्ध मूर्खपणाच्या होत असे हिंदु तत्त्वज्ञांचें मत आहे. ही कल्पना मानवी स्वरूपाची आहे. स्वर्ग लोक निराळा कल्पिण्याची जरूर काय आहे? तो लोक याच पृथ्वीवर आणि याच क्षणीं अस्तित्वांत आहे. काल अनंत

आहे. त्यांत अमुक क्षण चांगला आणि अमुक वाईट असें कांहीं नसून सर्व क्षण एकाच स्वरूपाचे आहेत. परमेश्वराला भेटावें अशी तुमची अंतःकरणपूर्वक इच्छा खरोखरच असेल तर तो तुह्मांस याच क्षणीं भेटेल. त्याच्या भेटीसाठीं मरेपर्यंत वाट पाहावयास नको आणि स्वर्गातही जावयास नको. प्रत्यक्ष अनुभवाच्या पायरीस चढूं लागेपर्यंत कोणीही मनुष्य धर्ममार्गारूढ झाला असें आह्मी समजत नाहीं. कांहीं मतांवर विश्वास ठेवण्यानें अथवा कांहीं तत्त्वें बुद्धिगत केल्यानें अथवा एखाद्या पंथाच्या यादीत नांव नोंदविल्यानें मनुष्य धार्मिक होत नाहीं. परमेश्वर खरोखर अस्तित्वांत असेल तर तुह्मीं त्याची भेट घेतली आहे कीं नाहीं हाच महत्त्वाचा प्रश्न आहे. या प्रश्नाला तुह्मांकडून नकारात्मक उत्तर आलें तर त्यावर उलट प्रश्न आह्मी असा विचारूं कीं असें असेल तर त्यावर विश्वास आहे असें तरी तुह्मी कां म्हणतां? परमेश्वर आहे कीं नाहीं याचीच जर तुह्मांला शंका आहे तर त्याच्या भेटीसाठीं धडपडतां कां ? त्याच्या अस्तित्वावर तुमचा विश्वास खरोखरच असेल तर संसारत्याग करून केवळ त्याच्याच भेटीची खटपट तुम्ही कां करीत नाहीं ? हा एकच हेतु तुह्मी आपल्या चित्तांत कां वागवीत नाहीं ? संन्यास आणि धर्मप्रवणता या दोन कल्पना हिंदूंच्या आहेत. या आपल्या कल्पनांना हिंदुस्थान देश अद्यापि चिकटून बसला आहे यामुळेंच त्यानें केलेल्या अनेक चुकाही त्याला माफ होतात.

ख्रिस्ती धर्मातही अशीच एक मध्यवर्ती कल्पना आहे. "सावध रहा आणि प्रार्थना करा; कारण कीं स्वर्गाचें राज्य जवळ आलें आहे." या आज्ञेचा अर्थ हाच कीं तुम्ही आपली अंतःकरणें पवित्र करून तयारींत असा. आत्मा अविनाशी आहे असें या शब्दांत ध्वनित केलें आहे. अज्ञानी आणि धर्मभोळ्या लोकांनीं भरलेल्या ख्रिस्ती देशांतही अत्यंत अवनतीच्या काळींसुद्धां ख्रिस्ती धर्मानुयायी परमेश्वर येण्याची तयारी करीत होते असें आपणांस आढळेल. परोपकार आणि परस्परांस साहाय्य हे त्यांचे मार्ग होते. याच निमित्तानें त्यांनीं रुग्णालयासारख्या संस्था उपस्थित केल्या. हें साध्य ख्रिस्ती धर्मानें आपल्यासमोर ठेवलें असेल तोंपर्यंत त्यालाही कशाची धास्ती नाहीं.

अशाच आणखी एका साध्याची कल्पना माझ्या मनांत आली आहे. ही माझी स्वप्नसृष्टिही असूं शकेल. या जगांत ही कल्पना कधीं काळीं तरी मूर्त-

रूपानें अवतरेल कीं नाहीं हेंसुद्धां मला सांगवत नाहीं; पण केवळ प्रत्यक्ष दिसतात एवढ्याचसाठीं भिकार गोष्टींना चिकटून बसून मरून जाण्यापेक्षां स्वप्नसृष्टींतला संचारही कांहीं वाईट नाहीं. प्रत्यक्ष दिसणाऱ्या क्षुद्र गोष्टींहून स्वप्नांत कां होईना मोठें प्रमेय पाहणें अधिक चांगलें. याकरितां थोडा वेळ आपण आतां स्वप्नसंचार करूं या.

मानवी मनाच्या अनेक स्थिती आहेत हें आपणास ठाऊक आहेच. तुह्मी कदाचित् शुद्ध व्यवहारी असाल. डोळ्यांनीं प्रत्यक्ष दिसतें तेवढेंच खरें मानून चालावयाचें अशी तुमची प्रवृत्ति असेल. केवळ सामान्य तारतम्य बुद्धीपलीकडे पाहण्याची इच्छा तुमच्या ठिकाणीं नसेल. केवळ बाह्योपचार आणि विधी यांकडे तुमचें पाहणें फारसें नसेल. आपल्या व्यवहारी बुद्धीला पटतील अशा प्रत्यक्ष गोष्टीच तुम्हांस हव्या असतील. नुसतीं अनुमानें काढून तुमचें समाधान होण्यासारखें नसेल. हा एक प्रकारचा वर्ग झाला. दुसरा एक वर्ग अत्यंत विचक्षकांचा असतो. उदाहरणार्थ मुसलमान लोक घ्या. एखादें चित्र अथवा एखादी मूर्ति यांचें दर्शनही त्यांच्या मशिदीस खपावयाचें नाहीं. तिसरा वर्ग सौंदर्यभोक्त्यांचा. त्यांचें पूजास्थान त्यांना नटविलेलें सजविलेलें पाहिजे. तेथें त्यांना पुष्पमाला हव्या. भिंतींवर वेलपत्ती असल्यास चांगलें. चोंहोंकडे मेणबत्त्यांचीं झुंबरें लागलीं आहेत, धूपदीपाचा वास सुटला आहे आणि प्रकाशाचा लखलखाट झाला आहे आणि मंत्रघोष चालला आहे अशी स्थिति असल्याशिवाय परमेश्वर दिसावयाचा नाहीं असें त्यांस वाटतें. त्यांच्या मनाची घटना अशा प्रकारची असते कीं अशा प्रकारच्या बाह्योपचारांशिवाय सत्यांशाचें ग्रहण करणें त्याला शक्यच नसतें. तुमच्या बुद्धिभक्तांना या उपचारांची जरूर वाटत नाहीं. बुद्धीला पटेल अशा रीतीनें सांगितलेल्या तत्त्वांचें ग्रहण तुह्मी करूं शकतां. याशिवाय शुद्ध भक्तांचा आणखी एक वर्ग असतो. त्यांचें अंतःकरण ईशदर्शनासाठीं कासाविस झालेलें असतें. सदोदित परमेशपूजन करावें आणि नामसंकीर्तन करावें यापलीकडे तो कांहीं पाहत नाहीं. त्याला तुमचा बुद्धिवाद नको आणि तत्त्वेंही नकोत. आतां या साऱ्यांच्या पलीकडचा वर्ग तत्त्ववेत्त्यांचा असतो. हा वर्ग साऱ्यांच्या बाहेर उभा राहून त्यांची चेष्टा करीत असतो. सामान्य लोकांत चालू असलेली परमेश्वरविषयक चर्चा त्याला उपहासास्पद वाटते. या चर्चेंत मूर्खपणाशिवाय त्याला दुसरें कांहींच दिसत नाहीं.

अशा रीतीनें परस्परांची थट्टा परस्परांनीं केली, तरी दुनियेंत या साऱ्यांना अवकाश आहे. दुनियेला या साऱ्या प्रकारांची गरज आहे. मानवी मनाचे इतके नमुने जिवंत असणें आवश्यक आहे. साऱ्या जगाच्या उपयोगीं पडेल असा एखादा नमुनेदार धर्म कधीं काळी उत्पन्न व्हावयाचा असेल तर इतक्या मनःस्थितींची सोय तो लावूं शकेल अशा प्रकारचें त्याचें स्वरूप विस्तृत असलें पाहिजे. इतक्या पाहुण्यांची भूक भागवील असें दातृत्व त्याच्या अगीं असलें पाहिजे. तत्त्ववेत्त्याला संतोष होईल अशी तत्त्वरत्नें त्याजपाशीं असली पाहिजेत. भक्ताच्या हृदयाला पाझर फुटण्यासारखा भक्तिरस त्याजजवळ हवा. कर्मठाकरितां बाह्योपचार आणि विधि यांची फौज त्याजजवळ जय्यत पाहिजे. काव्यमय अंतःकरणास पटेल असें सुंदर काव्य आणि उत्तान कल्पना त्याजजवळ भरपूर असल्या पाहिजेत. असा धर्म आपणांस निर्माण करावयाचा असेल तर त्यासाठीं धर्माच्या उत्पत्तीच्या काळापर्यंत मागें जाऊन त्यांच्या बाल्यावस्थेंतच त्यांचें एकीकरण करणें आपणांस अवश्य आहे.

अशा स्थितीला आपण परत जात आहो अशी कल्पना आपण केली तर आपल्या भावी इमारतीची कोनशिला संग्रह ही होईल, विग्रह ही नव्हे. सर्वांचा संग्रह करावयाचा आणि कोणासही आपल्या कक्षेबाहेर राहूं द्यावयाचें नाहीं असें संग्राहक धोरण आपण धरिलें पाहिजे. केवळ उदासवृत्तिही आपल्या उपयोगाची नाहीं. दुसऱ्या धर्माबद्दल आपण उदास आहों, आपल्या मनांत त्यांजबद्दल कांहीं रागद्वेष नाहीं अथवा प्रेमही नाहीं असें म्हणणारे लोक सध्या पुष्कळ आहेत; पण त्यांच्या उदासीनतेच्या सोंगावर माझा विश्वास मुळींच बसत नाहीं. तें त्यांचें म्हणणें शुद्ध खोटें आणि दांभिकपणाचें असतें. यापेक्षां संग्राहक धोरण अधिक श्रेयस्कर आहे. मीं उदासीन कां असावें ? 'मी उदासीन आहें' या वाक्याचा अर्थ सरळ भाषेंत असा होईल; 'तूं मूर्ख आहेस आणि तुझा धर्म खोटा आहे हें मला समजतें, तथापि मीं तुझ्या जगण्याच्या आड येत नाहीं. मी मनांत ह्मणतों कीं जाऊंद्या.' अशा रीतीनें आपल्या मर्जीप्रमाणें आपण इतरांस जगूं देतों असें वाटणें हा ईश्वराचा अपमान नव्हे काय ? प्राचीन काळचे सारे धर्म मी आपले म्हणतों आणि साऱ्यांना बरोबर घेऊन मी ईशपूजन करतों. त्यांच्या पूजनाचा प्रकार कोणताही असो, तो आहे

तसा घेऊन त्यांच्याच बरोबर मीही पूजा करतों. मुसलमानाबरोबर मी मशिदींत जाईन. ख्रिस्त्याबरोबर चर्चाला जाऊन तेथें त्याजबरोबर मी क्रूसासमोर गुडघे टेंकीन. बौद्धांबरोबर त्यांच्या देवळांत जाऊन बुद्ध देवासमोर नम्र होईन. हिंदूबरोबर अरण्यवास पत्करून मी ध्यानस्थ होईन.

या गोष्टींचीं सोंगें मी करीन असें मात्र आपण समजूं नका; तर माझ्या अंतःकरणाचें कवाड उघडें ठेवून यांपैकीं कोणत्याही द्वारानें येणाऱ्या सत्याचें ग्रहण करण्यास मी तयार असेन. परमेश्वराची ग्रंथरचना अद्यापि संपली आहे काय ? नाहीं. ती अद्यापि संपलेली नाहीं. ही ग्रंथरचना एकसारखी चालू असून नवीं नवीं तत्त्वें अद्यापि बाहेर पडत आहेत. जगच्चैतन्य नव्या नव्या प्रकारांनीं स्पष्ट होत आहे. परमेश्वराचा हा विश्वरूप ग्रंथ अत्यंत आश्चर्यजनक आहे. यांत नव्या नव्या वस्तु रोज सांपडत आहेत. वेद, पुराणें, बायबल, कुराण हीं या ग्रंथाचीं पानें होत. आजपर्यंत एवढीं पानें उलटून झालीं असून अद्यापि उलटावयाचीं बाकी अशीं पानें अनंत पडलीं आहेत. या न उलटलेल्या पानांतून काय निघतें हें पाहण्यासाठीं माझें मन मी तयार करून ठेवीन. वर्तमान काळीं जगत असतां भविष्यत्कालाकरितां आपण आपलीं मनें तयार ठेवूं या. गत कालीं होऊन गेलेल्या, सध्या हयात असलेल्या आणि भविष्यत्कालीं जन्मास येणाऱ्या सर्व अवतारी भविष्यवाद्यांस शतशः प्रणाम असोत.

---

२०

## विश्वव्यापी धर्माचें ध्येय.

ज्या ज्या ठिकाणीं आपलीं इंद्रियें पोंहोंचूं शकतात अथवा ज्या विषयाचें चिंतन आपलें मन करतें त्या ठिकाणीं दोन शक्तींची क्रिया आणि प्रतिक्रिया चालू असल्याचा प्रत्यय आपणांस येतो. एका शक्तीच्या क्रियेचा प्रतिकार दुसऱ्या शक्तीची क्रिया करीत असते. आपणांभोंवतीं दिसत असलेला देखावा हा या दोन क्रियांमुळेंच उत्पन्न झाला आहे, आणि आपल्या मनांत विचार उत्पन्न होतात याचें कारणही याच क्रिया होत. बाह्य जगांत या शक्तींची

क्रिया आकर्षण व प्रसरण या दोन स्वरूपांनीं अनुभवास येत असते. अथवा त्यांचें स्वरूप मध्याकर्षिणी गति आणि मध्योत्सारिणी गति असेंही दोन प्रकारचें असतें. अंतर्गत अथवा सूक्ष्म जगांत हेंच स्वरूप प्रेम, द्वेष, चांगलें, वाईट इत्यादि प्रकारांनीं अनुभवास येतें. कांहीं वस्तू जवळ आल्यास त्यांना आपण दूर ढकलून देतों आणि कांहींना आपण जवळ ओढतों. त्याचप्रमाणें कांहीं वस्तू आपणांस ओढणाऱ्या असतात आणि कांहीं आपणांस ढकलून देत असतात. ज्याची आपली फारशी ओळख नाहीं अशा एखाद्या तिऱ्हाइताबद्दलही आपल्या मनांत अकारण प्रेम उत्पन्न होत असल्याचा अनुभव आपणांस आपल्या आयुष्यांत पुष्कळ वेळां येत असतो. त्याचप्रमाणें कांहीं कारण नसतां एखाद्याचा तिटकाराही आपणांस वाटतो. अशा प्रकारचा अनुभव सर्वांस आलेला असतो. या दोन शक्तींचें कार्यक्षेत्र जों जों अधिक उच्च दर्जाचें तों तों त्यांचे परिणामही अधिकाधिक तीव्र होत जातात. मानवी जीविताचें आणि विचारांचें अत्युच्च कार्यक्षेत्र धर्म हें आहे, आणि यामुळेंच या क्षेत्रांत या दोन शक्तींच्या परिणामाचा प्रत्यय जितका स्पष्ट असतो, तसा तो दुसऱ्या कोणत्याही क्षेत्रांत आढळत नाहीं. अत्युच्च प्रतीची अव्यभिचारी भक्ति अथवा शुद्ध निष्काम प्रेम यांचा जन्म धर्मक्षेत्राशिवाय अन्य ठिकाणीं होत नाहीं. त्याचप्रमाणें तितकाच तीव्रातितीव्र द्वेषही दुसऱ्या कोठें निपजत नाहीं. अत्यंत शांतिदायक शब्दांचा वर्षाव धार्मिक पुरुषांनींच जगावर केला. धर्मक्षेत्र सोडून या पुरुषांचीं चित्तें दुसऱ्या क्षेत्राकडे कधींच वळलीं नव्हतीं. त्याचप्रमाणें हालाहल विषाच्या अर्कानें भरलेले शब्दही अशाच प्रकारच्या पुरुषांच्या तोंडून बाहेर पडले आहेत. कोणत्याही धर्माचें ध्येय जों जों अधिक उच्च आणि त्याच्या व्यावहारिक स्वरूपाची घटना जो जो अधिक सूक्ष्म तों तों त्याची कार्यव्यापृतताही अधिक मोठी असते. धर्मभावनांमुळें जगांत जेवढे मोठे रक्तपात झाले तेवढे दुसऱ्या कोणत्याही भावनांनीं झालेले नाहींत; पण त्याबरोबरच निराश्रितालयें, रुग्णालयें वगैरे परोपकारी संस्थाही धर्मभावनांचींच फळें होत हें ध्यानांत ठेवलें पाहिजे. केवळ मनुष्यांचीच नव्हे तर पशुपक्ष्यांचीही काळजी धर्मानें जितकी घेतली आहे तितकी दुसऱ्या कोणत्याही संस्थेनें घेतलेली नाहीं. धर्माभिमान आपणांस जितकें दुष्ट बनवितो तितकें दुसरें कोणीही बनवीत नाहीं; पण त्याचप्रमाणें आपलीं अंतःकरणें

धर्मभावनांनीं जेवढीं कोमल बनतात तेवढीं तीं दुसऱ्या कशानेंही कोमल बनत नाहींत. पूर्वकाळीं असेंच घडत होतें आणि भविष्यत्कालींही असें घडण्याचा पूर्ण संभव दिसत आहे. तथापि या गडबडींत, या मारामारींत, या रागद्वेषांच्या झगड्यांत आणि अनेक पंथांच्या घडामोडींत सुद्धां या साऱ्यांस बाजूस सारून शांतिसूक्तांचे मंजुळ ध्वनी वारंवार बाहेर पडले आहेत. रागद्वेषांच्या गडबडीहून या सूक्तांचें सामर्थ्य अधिक असल्याचा प्रत्यय वारंवार आला आहे. उत्तर ध्रुवापासून दक्षिण ध्रुवापर्यंत त्यांचा टाहो वारंवार ऐकूं आला आहे. मनुष्यजातींत शांतता आणि समता स्थापन करण्याकरितां त्यांचा अवतार वारंवार झाला आहे. मनुष्यजातीला ही शांति कधीं काळीं तरी प्राप्त होणार आहे काय ?

धर्माच्या रणक्षेत्रावर चालू असलेलीं युद्धें संपून तेथें अविच्छिन्न शांतता नांदण्याचा काळ केव्हां तरी प्राप्त होणें शक्य आहे काय ? समतेच्या घोषानें सारें जग गेलीं पन्नास वर्षें दुमदुमत आहे. अनेक प्रकारचे बेतबात मानवी समाजांत ऐकूं येत आहेत; आणि त्यांचा व्यवहार करण्याची धडपडही चालू आहे, पण हें काम किती कठीण आहे याचा अजमास आपणांस आहेच. केवळ जगण्यासाठीं सुद्धां केवढी भयंकर धडपड सांप्रत करावी लागते हें कोणास सांगण्याची जरूरी नाहीं. ही धडपड कमी करण्याची कांहीं युक्ति सांपडेल अशीही आशा लोकांस दिसत नाहीं; आणि या धडपडीनें मनुष्यमात्राच्या ज्ञानतंतूंवर केवढा ताण पडतो हेंही लोकांस दिसत आहे; पण हा ताण कमी करण्याची युक्ति मात्र कोणास सुचत नाहीं. केवळ जडवस्तूंच्या जगांतसुद्धां शांति आणि समता हीं आणणें आपणांस इतकें कठीण पडतें, तर अंतःसृष्टींत यांची स्थापना करणें हें काम त्याहून हजार पटींनीं अधिक कठीण असलें पाहिजे हें निर्विवाद आहे. केवळ शब्दसृष्टि सोडून थोडा वेळ बाहेर संचार करण्याची विनंति मी तुम्हांस करतों. प्रेम, शांति, भूतदया, समता हे आणि अशाच प्रकारचे दुसरे शब्द अगदीं लहानपणापासून आपल्या कानावर पडत आले आहेत, पण व्यवहाराकडे पाहावें तों ते अर्थशून्य शब्दांसारखेच दिसतात. हे शब्द आपण पोपटासारखे तोंडानें म्हणत असतों आणि अशा रीतीनें त्यांचा पाठ केव्हां केव्हां करणें आपल्या अंगवळणीं पडून गेलें आहे. त्यांचा अर्थ मनांत न आणतांच आपण ते तोंडानें

म्हणतों. ज्या महात्म्यांच्या हृदयांत त्यांच्या अर्थाच्या भावना उत्पन्न झाल्या त्यांनीं या शब्दांनीं त्या भावनांचें नामकरण केलें; आणि त्या काळीं त्यांचा अर्थ बरोबर समजणारीं माणसेंही पुष्कळ होतीं. कालेंकरून अज्ञ लोकांच्या तोंडीं हे शब्द गेले आणि मग ते त्यांचें खेळणें होऊन बसले. धर्म हा शब्दांचा बाजार झाला आणि पुराणांतलीं वांगीं पुराणांत राहूं लागलीं. धर्म आणि व्यवहार यांची फारकत झाली. यामुळें 'वाडवडिलांचा धर्म,' 'राष्ट्राचा धर्म,' 'तुमच्या देशाचा धर्म' असले शब्दप्रयोग निर्माण होऊं लागले. आपल्या राष्ट्राचा धर्म आपण पाळतों असें म्हणणें हाही देशाभिमानाचा एक भाग होऊन बसला. देशाभिमान म्हटला कीं तेथें पक्षपात त्याबरोबर असावयाचा हें निराळें सांगण्याची जरूर नाहीं.

प्रत्येक धर्मात तीन भाग आहेत हें आपणांस ठाऊक आहेच. निदान प्रत्येक मोठ्या आणि बहुमान्य धर्माला तरी ही गोष्ट लागू आहे. तत्त्वविचार हें धर्माचें पहिलें अंग होय. या अंगावरून धर्माच्या एकंदर संचारक्षेत्राचा आढावा सामान्यतः काढतां येतो. हें अंग म्हणजे त्या धर्माचा पाया होय. कोणत्या मूलभूत तत्त्वावर त्या धर्माची उभारणी झाली आहे, त्याचें अखेरचें साध्य काय आणि त्या साध्याचीं साधनें कोणतीं याचा उलगडा या अंगावरून होतो. दुसरें अंग पुराणें अथवा दंतकथा. या अंगांत प्रथमांगाच्या अमूर्त सिद्धांतांचें मूर्तरूप आढळून येतें. कोणत्या प्रसंगीं कोण धार्मिक मनुष्य कसा वागला अथवा विशिष्ट प्रसंगी एखाद्या भक्ताला ईश्वराचें साहाय्य कसें झालें हें कथांच्या रूपानें या अंगांत सांगितलेलें असतें. तिसरें अंग विधि हें होय. पूजेअर्चेचे विधि, हव्यकव्यें वगैरे गोष्टींच्या द्वारें मूलतत्त्वांचें अधिक स्पष्टीकरण या अंगांत असतें. पूजेअर्चेचे वेळीं बसावें कसें, हातपाय कसे ठेवावे, तोंड कोणीकडे करावें, फुलें कोणतीं घ्यावीं, धूपदीप कसा असावा इत्यादि अनेक प्रकारांचें वर्णन या अंगांत असून इंद्रियांच्या द्वारें मनापर्यंत पोहोंचण्याची खटपट या अंगांत दिसून येते. सांप्रत जिवंत असलेल्या सर्व बहुमान्य धर्मात हीं तिन्ही अंगें तुम्हांस आढळून येतील. एखाद्या धर्मात एखाद्या अंगाला विशेष प्राधान्य दिलेलें असतें अथवा दुसऱ्यांत निराळ्याच अंगाला प्रमुखत्व असतें; तथापि हीं तिन्ही अंगें कमी अधिक प्रमाणानें या साऱ्या धर्मांत आहेत. या तीन अंगांपैकीं पहिलें अंग म्हणजे तत्त्व-

विचार याकडे आपण वळूं. सर्व जगाला मान्य होईल अशा प्रकारचें एकाच निश्चित विचारसरणीचें तत्त्वज्ञान अद्यापि उपलब्ध झालेलें नाहीं. प्रत्येक धर्माचीं मतें या बाबतींत वेगवेगळीं आहेत आणि आपलींच मतें तेवढीं खरीं असाही त्याचा हट्ट असतो. एवढेंच म्हणून प्रत्येक धर्माचें समाधान होत नाहीं; तर त्याच्या मतांना जो कोणी मान डोलविणार नाहीं तो नरकाला जाईल, असा शाप द्यावयास तो कमी करीत नाहीं. आपलीं मतें दुसऱ्यांवर जुलमानें लादण्याकरितां एखादा धर्म तरवारीचें साहाय्यसुद्धां घेतो. यांत त्याचा हेतु दुष्टपणाचा असतो असें नाहीं; अशा गोष्टी धर्मवेड नांवाच्या मेंदूच्या विकारामुळें घडतात. धर्मवेडे लोक प्रत्येक गोष्ट मनःपूर्वक करतात. धर्मवेड्यांइतकी मनःपूर्वकता दुसऱ्या कोणाच्याही अंगीं तुम्हांस आढळावयाची नाहीं; पण इतर वेड्यांना ज्याप्रमाणें त्यांच्या कृत्यांबद्दल जबाबदार धरतां येत नाहीं त्याचप्रमाणें धर्मवेड्यांनाही त्यांच्या दुष्ट कृत्यांबद्दल जबाबदार धरतां येत नाहीं. आपण करीत आहों हें कृत्य खरोखर वाईट कीं चांगलें हें जाणण्याची पात्रता त्यांच्या अंगीं नसते. सर्व प्रकारच्या रोगांत धर्मवेड हा रोग फार भयंकर आहे. मनुष्यस्वभावांत जितका म्हणून दुष्टपणा असतो तितका सारा या रोगांत बाहेर पडतो. क्रोध जागृत होतो; ज्ञानतंतूंचा अत्यंत क्षोभ होतो आणि मनुष्यप्राणी वाघाशीं स्पर्धा करूं लागतो.

दुसऱ्या अंगाकडे पाहतां त्यांत तरी सर्वांचें साधर्म्य आढळतें काय ? नाहीं; येथेंही पहिल्या अंगासारखीच विविधता आढळून येते. प्रत्येक धर्माचीं पुराणें वेगळीं, आणि ‘ माझीं पुराणें खरीं; त्या प्रत्यक्ष घडलेल्या गोष्टी आहेत; त्या खोटया दंतकथा नव्हत;’ असें प्रत्येक धर्म जोरानें प्रतिपादीत असतो. कोणत्याही धर्मावर टीका करण्याचा माझा उद्देश नाहीं; तथापि केवळ स्पष्ट समजुतीकरितां कांहीं उदाहरणें आपण घेऊं. परमेश्वरानें खबुतराचा आकार घेतला आणि मग तो पृथ्वीवर उतरला असा ख्रिस्त्यांचा समज आहे. ही दंतकथा नसून हा प्रकार खरोखर प्रत्यक्ष घडला असें ते प्रतिपादीत असतात. हिंदु लोकांना गाईच्या ठिकाणीं परमेश्वर दिसतो. गाईच्या ठिकाणीं ईश्वर पाहणें हा शुद्ध वेडेपणा आहे असें ख्रिस्ती म्हणतात. परमेश्वरानें गाईचें रूप घेणें ही त्यांना दंतकथा वाटते. अशी गोष्ट इतिहाससिद्ध आहे असें ते मानीत नाहींत. एखाद्या पेटीची आकृति करून तिच्या दोन्ही

बाजूंस देवदूतांचीं चित्रें उभीं केलीं तर ती पेटी अत्यंत पवित्र–अगदीं पवितांतील पवित्र–असे यहुदी लोक मानतात; पण त्या पेटीच्या ऐवजीं एखाद्या स्त्रीची अथवा पुरुषाची आकृति केली कीं झालें पाप ! मग ती प्रतिमा फोडलीच पाहिजे. निरनिराळ्या धर्मांतील समजुती पाहिल्या तर त्यांत इतकी संगति आढळते ! एखाद्या धर्माचा अनुयायी उठून ' आमच्या भविष्यवाद्यानें अशा प्रकारचे चमत्कार केले ' असें ह्मणूं लागला तर दुसरे लोक 'हें सारें खोटें, सारें थोतांड' म्हणून एकच गिल्ला करतात; पण त्यांच्या धर्मपुस्तकांत तसल्याच जातीचे सांगितलेले चमत्कार मात्र ते खरे मानतात. असले चमत्कार म्हणजे दंतकथा नसून खरा इतिहास होय, असें त्यांचें ह्मणणें पडतें. दंतकथा आणि इतिहास यांत काय फरक हे लोक समजतात, याचा उलगडा साऱ्या जगांत कोणाला करतां आल्याचें मला तरी माहीत नाहीं. साऱ्या धर्मपुस्तकांत असल्या प्रकारच्या गोष्टी असून त्या बहुतांशीं दंतकथाच असतात. क्वचित् प्रसंगीं त्यांत खऱ्या इतिहासाच्या एखाद्या अंशाचें मिश्रण झालेलें असतें.

आतां आपण क्रियाकलापाकडे वळूं. एखाद्या पंथाच्या बाह्य आचरणाच्या कांहीं ठराविक क्रिया त्याला अत्यंत पवित्र वाटत असतात; पण दुसऱ्या पंथाच्या तसल्या क्रिया मात्र त्याला वेडेपणाच्या वाटतात. एखाद्या धर्म-पंथानें एखाद्या विशिष्ट प्रतिमेचें पूजन केलें कीं दुसरा पंथ त्याला 'पाप, पाप' म्हणत सुटतो. उदाहरणार्थ लिंगपूजा घ्या. लिंगप्रतिमा ही वास्तविक स्त्रीपुरुषभाव दाखविणारी प्रतिमा आहे; पण कालांतरानें तिचा हा भाव नष्ट होऊन ती सृष्टिकर्त्यांची प्रतिमा, इतकाच तिचा अर्थ लोक समजूं लागले आहेत. ज्या राष्ट्रांत लिंगपूजेचा प्रचार आहे, तेथें तींत स्त्रीपुरुषभावाचा संबंध कोणाच्याही लक्ष्यांत येत नाहीं. दुसऱ्या प्रतिमांसारखीच तीही एक प्रतिमा आहे, इतकेंच लोक समजतात; पण दुसऱ्या एखाद्या परदेशस्थानें ही प्रतिमा पाहिली तर खरा अर्थ त्याच्या लक्ष्यांत ताबडतोब येतो, आणि तो या पूजेला दोष देऊं लागतो; पण त्याच वेळीं तो स्वतः असल्या वेडापासून मुक्त असतो असें मात्र नाहीं. तो दुसरी एखादी गोष्ट अशी करीत असतो, कीं दुसरे लोक त्याला तिजबद्दल नांवें ठेवीत असतात. लिंगपूजा ख्रिस्ती लोकांना भयंकर वाटते, आणि ख्रिस्त्यांचें पवित्र प्रभुमांसरक्ताचें भोजन

हिंदूंना भयंकर अपवित्र वाटतें. मनुष्याला मारून त्याचें मांस खाणें आणि रसा पिणें आणि त्याद्वारें त्याचे सद्गुण आपल्या अंगीं आणूं पाहणें हें रानटीपणाचें चिन्ह आहे. मनुष्यभक्षक रानटी लोकांनाच हें शोभणारें आहे. असल्या गोष्टी नरभक्षक रानटी टोळ्यांनीं मात्र कराव्या. एखादा मनुष्य शूर असला म्हणजे त्याला मारून कांहीं रानटी जाती त्याचें हृदय फाडून खातात. भावार्थ हा कीं त्यामुळें त्याचें शौर्य आणि त्याची निधडी छाती आपणास प्राप्त व्हावी. सर जॉन लबॉकसारख्या कट्टया ख्रिस्त्यानेंही ही चाल याच रानटी कल्पनेंतून जन्म पावली, असें कबूल केलें आहे. सामान्य ख्रिस्ती लोकांना हें मत अर्थातच पटावयाचें नाहीं; एवढेंच नव्हे तर या चालीचें मूळ कोठें असावें, असा प्रश्नही त्यांच्या मनांत यावयाचा नाहीं. ही चाल पवित्र आहे असें त्यांच्या मनानें एकवार घेतलें आहे आणि यापलीकडे अधिक कांहीं जाणण्याची त्यांची इच्छा नसते. अशा रीतीनें सर्व धर्मातील विधि आणि आचार यांची पाहणी करतां, त्यांतही कोठें साम्यता आढळत नाहीं. सर्वांना सारखींच पटतील, अशीं कोणतींही बाह्य धार्मिक चिन्हें अस्तित्वांत नाहीत. अशा स्थितींत धर्माच्या बाबींत सर्वांची एकवाक्यता होण्याचा मार्ग कोणता आहे? सर्व जगाला सारखाच मान्य होईल असा धर्म निर्माण करणें शक्य कसें? तथापि असाही धर्म अस्तित्वांत आहे, आणि तो धर्म कोणता, याचा विचार आपण आतां करूं.

सर्व मनुष्यजातींत बंधुभाव उत्पन्न केला पाहिजे, या मताचा घोष आपणां सर्वांच्या कानीं येत असतो. केवळ याच तत्त्वाचा उपदेश करण्यासाठीं मंडळ्याही स्थापन झाल्या आहेत. येथें एक जुनीपुराणी गोष्ट मला आठवते. दारू पिणें हें पाप आहे, असा समज हिंदुस्थानांत आहे. एके वेळीं एका गांवीं दोन भाऊ राहत होते. त्यांना एका रात्रीं चोरून दारू प्यावयाची होती. त्यांचा एक चुलता होता. हा वृद्ध कट्टा धर्माभिमानी होता. तो त्या भावांच्या शेजारच्या खोलींतच निजत असे. तो जागा होऊं नये ह्मणून तोंडांतून शब्दही न काढतां मुकाट्यानें दारू प्यावयाचा बेत त्या दोघा भावांनीं केला. दारू पितां पितां दोघेही एकमेकांस 'चुप; बोलूं नको,' असें ह्मणूं लागले. होतां होतां दोघेही हेच शब्द मोठमोठ्यानें ओरडून बोलूं लागले. या त्यांच्या आरडाओरडीनें चुलता अर्थातच जागा झाला, तो त्यांच्या

खोलींत आला आणि सर्व प्रकार त्यानें पाहिला. याच दोन भावांचें अनुकरण आपण सांप्रत करीत आहों. 'विश्वबंधुत्व' असा एकच गिल्ला आपण सारे करीत आहों. 'आपण सारे एक' या तत्त्वावर आपण एखादा पंथ उभारतों. पंथ उभा झाला कीं 'मी खरा आणि तूं खोटा' हें द्वंद्व उभें राहतें आणि विश्वबंधुत्व कोठें हरवतें, त्याचा मागमूसही लागत नाहीं. मग सर्वत्र समता ती कोठें राहिली? विश्वबंधुत्वाच्या गोष्टी मुसलमानही सांगतात; पण वस्तुस्थितीत या त्यांच्या तत्त्वाचा अनुभव कसा येतो हें सांगणें नकोच. असा कटु अनुभव कां येतो? याचें कारण हेंच कीं जो मुसलमान नसेल त्याला या विश्वबंधुत्वांत मज्जाव होतो. त्यांत त्याचा प्रवेश व्हावयाचा नाहीं; एवढेंच नव्हे तर तो मुसलमान नाहीं म्हणून त्याची मान जाण्याचाही प्रसंग यावयाचा. विश्वबंधुत्वाच्या गोष्टी ख्रिस्ती लोकही सांगतात, पण जो ख्रिस्ती नसेल, त्याला मात्र ते कायमचा नरकांत पाठविण्यास कमी करीत नाहींत.

विश्वबंधुत्व आणि सर्वत्र समता हीं तत्त्वें जगावर स्थापन करण्याच्या आपल्या यत्नाचा इतिहास असा आहे. हीं तत्त्वें स्थापण्याचा यत्न कोठें होत असल्याचें तुमच्या कानावर आलें, तर थोडा वेळ मूग गिळून बसा. अशा यत्नाला एकदम आपली संमति देऊं नका; कारण अशा देखाव्यामागें पुष्कळ वेळां स्वार्थ दडून बसलेला असतो. हिंवाळ्यांतही पुष्कळ वेळां ढग येऊन ते गर्जनाही करतात; पण त्यांतून पाण्याचा एक थेंब पडेल तर शपथ. सर्वत्र समता आणि सर्वत्र बंधुभाव ज्यांच्या चित्तांत खरोखरच नांदत असतो, ते लोक बहुधा अबोल असतात. या तत्त्वांच्या नांवानें नवा पंथ उभारण्याची खटपट न करतां ते खरें काम करीत असतात. त्यांचीं सर्व कर्में, साऱ्या हालचाली, किंबहुना त्यांचा सारा जीवनक्रम या तत्त्वांस अनुसरून चालत असतो. त्यांच्या सर्व व्यवहारांत हें तत्त्व मूर्तिमंत दिसत असतें. अखिल मानवजातीबद्दल त्यांच्या चित्तांत खरा बंधुभाव आहे, हें त्यांच्या आयुष्याच्या प्रत्येक क्षणीं स्पष्ट होत असतें. त्यांचें सर्वाभूतीं प्रेम क्षणोक्षणीं व्यक्त होतें. ते तोंडानें बोलत नाहींत, हातानें कृति करतात आणि प्रत्येक तत्त्व तुह्मांपुढें मूर्तिमंत उभें करतात. नुसती तोंडाची बडबड जगांत सध्या इतकी झाली आहे, कीं तिचा आतां कंटाळा येऊं लागला आहे. आतां बडबडीच्या जागीं खरें कार्य व्हावयास हवें.

धर्माच्या बाबतींत सर्वांचें मतैक्य होणें अत्यंत दुरापास्त आहे हें या हकीगतीवरून दिसतें; तथापि या बाबींत अगदींच निराश व्हावयास पाहिजे असें नाहीं. सर्वांचें मतैक्य ज्यांत होईल अशींही तत्त्वें येथें आहेत. आपण सारे मनुष्यप्राणी आहोंत; तथापि आपणा सर्वांचें स्वरूप सारखेच आहे काय? आपली मनोघटना एकसारखी आहे काय? आपण सर्व एकसारखेच आहों, असें ह्मणण्याचें धाडस शुद्ध वेड्यावांचून कोणीही करणार नाहीं. आपणा सर्वांचे मेंदू सारखेच आहेत काय? आपलें सर्वांचें शरीरबळ तरी सारखें आहे काय? एक मनुष्य भीमसेन असतो, तर दुसरा सुदामदेव असतो. एक मनुष्य बुद्धिमान्, तर दुसरा केवळ पशूसारखा. जर आपण सारे सारखेच असतों, तर आपल्यांत असलें वैषम्य कोठून आलें असतें? हें वैषम्य कोणीं उत्पन्न केलें? हें वैषम्य आह्मींच निर्माण केले आहे. ज्या अर्थी आह्मांत असें वैषम्य आहे, त्या अर्थी सर्व प्रकारचे भेदही आमच्यांत असणारच; पण असें आहे तरी सर्वत्र समतेचें तत्त्व आपल्या अंतःकरणास प्रिय आहे हेंही खोटें नाहीं. या तत्त्वाचा पुकारा ऐकल्याबरोबर आपलें अंतःकरण आनंदानें डोलूं लागतें. आपण सारे मनुष्यप्राणी खरे; पण त्यांत स्त्रीपुरुष हा भेदही आहे. याशिवाय हा काळा, तो गोरा, तो पिवळा असेही भेद आहेत; तथापि सर्व मनुष्यप्राणीच; त्यांची कोटि एकच. आमच्या चेहऱ्यामोहऱ्यांत किती तरी प्रकार; एकासारखा दुसरा चेहेरा आढळावयाचा नाहीं; तथापि आम्ही सारे मनुष्य या एकाच कुलांतील प्राणी आहों. सर्वांना सामान्य अशी ही माणुसकी आहे तरी कोठें? माझ्यासमोर इतकीं स्त्रीपुरुषें बसलेलीं असतात; त्यांत कांहीं काळीं आणि कांहीं गोरीं असतात, आणि या साऱ्यांस सामान्य असें माणुसपण आहे हेंही मला जाणवतें. अमुक हें माणुसपण असें मला बोट ठेवून दाखवितां यावयाचें नाहीं हें खरें, माझ्या जड इंद्रियांना त्याचा अनुभव व्हावयाचा नाहीं हेंही खरें, तथापि या दृश्य विविधतेमागें माणुसकीची एकतानता आहे, ही जाणीव माझ्या ठिकाणीं अगदीं पक्की आहे. जगांत जर कशाची पक्की जाणीव मला असेल, तर ती याच गोष्टीची आहे. या जाणिवेच्या द्वारा अवलोकन करूनच मी तुम्हांस स्त्री अथवा पुरुष या रूपानें पाहतों. माझ्या ठिकाणीं हें समष्टिज्ञान अगोदरच सिद्ध असतें आणि नंतर त्याच्या द्वारें व्यष्टीचें ज्ञान मला होतें. हीच गोष्ट आपल्या विश्वधर्म-

कल्पनेसही लागू आहे. जगांत विविध धर्म अस्तित्वांत आहेत तथापि त्या सर्वांच्या पाठीमागें ईश्वरत्व ही ऐक्याची भूमि आहे. सर्व धर्मांची उभारणी या सामान्य भूमीवर झालेली आहे. ही ऐक्यभूमि अनाद्यनंत आहे. ' **मयि सर्वमिदं प्रोतं सूत्रे मणिगणा इव ।**' धर्मरूपी अनेक मणी एकाच सूत्रांत ग्रथित झालेले आहेत. केवळ मोठे धर्मच काय, पण बारीकसारीक पंथही याच प्रकारचे मौक्तिक मणि आहेत, आणि त्या सर्वांच्या पोटांतून ईश्वररूप सूत्र गेलें आहे. यांत प्रत्यवाय इतकाच कीं जगांतील मनुष्यांपैकीं बहुतेक भागाला या मुद्याची मुळींच जाणीव नाहीं.

विविधतेमागें ऐक्य या तत्त्वावर साऱ्या विश्वाची उभारणी झालेली आहे. माणुसकीच्या दृष्टीनें आपण सारे एक आहों; तथापि आपणा सर्वांत भेद आहेत. मनुष्यजातीचा एक घटक या नात्यानें मी तुमच्याशीं एकरूप आहें, आणि मी राजमान्य राजश्री अमुक या नात्यानें तुम्हांपासून भिन्न आहें. पुरुष या दृष्टीनें स्त्रीपासून तुह्मी भिन्न आहां; आणि मानवी प्राणी या दृष्टीनें सारीं स्त्रीपुरुषें एकरूप आहेत. मनुष्य या दृष्टीनें पशूपासून तुम्ही भिन्न आहां, पण सजीव प्राणी या दृष्टीनें पुरुष, स्त्री, पशु आणि झाड हीं सारीं एकरूप आहेत; आणि केवळ अस्तित्व या दृष्टीनें सर्व विश्वाशीं तुम्ही एकरूप आहां. सर्व विश्वाचें एकीकृत अथवा समष्टिरूप अस्तित्व म्हणजेच परमेश्वर; आणि याच परमेश्वराच्या ठिकाणी सर्व विश्व एकरूप होतें. त्याच्या स्वरूपांत आपण सारे एकरूप आहों; तथापि व्यक्त अथवा स्पष्टदशेंत हे सारे भेद अवश्य राहणारच. आमच्या कर्मांत, आमच्या क्रियासामर्थ्यांत हे भेद असावयाचेच. अव्यक्तांतून व्यक्त दशेला येणाऱ्या साऱ्या स्थूल अथवा सूक्ष्म वस्तूंत भेद नेहमींच असावयाचे. याकरितां विश्वव्यापी धर्म या शब्दांचा अर्थ सर्वांचा विश्वास एकाच मतावर असणें असा आपण करूं तर असा विश्वव्यापी धर्म अस्तित्वांत येणें सर्वथा अशक्य आहे. सर्वांचे चेहरे हुबेहूब एकसारखे असण्याचा काळ ज्याप्रमाणें कधींच यावयाचा नाहीं, त्याचप्रमाणें धर्मांचीही गोष्ट आहे. त्याचप्रमाणें सर्वांचीं पुराणें एकच असावींत, अशी आपली इच्छा असेल, तर तीही कधीं सफल होणार नाहीं; तसें होणें शक्य नाहीं. त्याचप्रमाणें सर्वांचे धर्मविधि आणि आचारही कधीं एक होणार नाहींत. अशा प्रकारची परिस्थिति कधींच अस्तित्वांत यावयाची नाहीं, आणि एखाद्या

क्षणीं अशी परिस्थिति प्राप्त झालीच, तर जगाचा नाश त्याच क्षणीं होईल; कारण, विविधता हें जगाच्या अस्तित्वाचें आदि तत्त्व आहे. केवलरूप अस्तित्वांतून सजीव प्राणी या नात्यानें आपला उद्भव कसा होतो? वर्गीकरणानें; आणि वर्गीकरण म्हणजे एकापासून दुसरा वेगळा करणें. विश्वांत पूर्ण समतोलपणा उत्पन्न होणें याचा अर्थ आपला नाश होणें हाच आहे. आपण बसलों आहों या खोलींत, एका विशिष्ट परिमाणाची उष्णता आहे. सर्वत्र सारख्या प्रमाणांत पसरावें असा या उष्णतेचा कल आहे. आतां ज्या क्षणीं ती सर्वत्र एकाच प्रमाणांत पसरली जाईल, त्याच क्षणीं उष्णता हें तिचें रूप राहावयाचें नाहीं. विश्वांत जी गति आपणांस आढळते ती कशी उत्पन्न होते? समतोलपणाच्या बिघाडानें ती उत्पन्न झाली आहे. सर्वत्र समता आणि एकरूपता हीं प्राप्त होण्याकरितां या दृश्य विश्वाचा नाश होणें हीच गोष्ट आवश्यक आहे. दृश्य विश्व अदृश्यावस्थेंत न जाईल, तर ही समता कधींही उत्पन्न होणार नाहीं. वास्तविक अशी समता नाहीं हें आपलें मोठें भाग्य आहे. समता असणें हाच मोठा अनर्थ आहे. सर्वांचे विचार एक व्हावे अशी इच्छासुद्धां आपण करूं नये; कारण अशा स्थितींत विचार हा शब्दच अर्थशून्य होईल. विचार अस्तित्वांतून जाईल. मग आपली स्थिति पेंढे भरून ठेवलेल्या निर्जीव माणसांसारखी होईल; आणि केवळ निर्विचार व शून्य दृष्टीनें आपण एकमेकांकडे पाहत बसूं. आपणांत फरक आहे. समतोलपणा नाहीं म्हणूनच आपलें पाऊल पुढें पडत आहे. भेद हा आपल्या वाढत्या संस्कृतीचा आत्मा आहे. आपल्या साऱ्या विचारपरंपरेचा आत्माही तोच. याकरितां भेद हा अवश्य राहिला पाहिजे आणि तो राहणारच.

तर मग विश्वव्यापी धर्माचें ध्येय म्हणजे तरी काय, असा प्रश्न आपण मला विचाराल. विश्वव्यापी धर्म म्हणजे त्यांत सर्वांस एकच तत्त्वज्ञान असावें, अथवा त्यांची पुराणमालिका एकच असावी, अगर सर्वांचे बाह्य विधि एकच असावे, असा माझ्या म्हणण्याचा आशय नाहीं; कारण हें जगाचें रहाटगाडगें विलक्षण गुंतागुंतीचें आणि अत्यंत आश्चर्यजनक असून तें असेंच चालणार हें मला माहीत आहे. त्यांत सध्या दिसत असलेले सारे भेद राहणार आणि त्याच्या चक्रांची गुंतागुंतही कायम राहणार. त्यांत आपणास करतां येण्यासारखी गोष्ट इतकीच—हीं चक्रें एकमेकांवर घांसलीं न जातां सुरळीतपणें

चालतील असें करणें. या चक्रांना सध्या वंगण नाहीं, यामुळें तीं फार करकरतात आणि त्यामुळें तीं अधिक घांसलींही जातात. हें वंगण आपणांस घालतां येण्यासारखें आहे. हें कसें करावें ? हें साध्य करण्याचा खरा मार्ग एकच. तो हा कीं जगांत भेद असणें हें स्वाभाविकच नव्हे तर आवश्यकही आहे, हें ओळखून ही ओळख पक्की मनांत धरणें. ज्याप्रमाणें सर्वांची स्वाभाविक एकरूपता आपण ओळखली आहे, त्याचप्रमाणें हे भेदही ओळखणें अवश्य आहे. सत्याला प्रकाशावयास एकच मार्ग आहे असें नाही. लक्षावधि मार्गांनीं तें प्रकाशत असतें हें जाणावयास आपण शिकले पाहिजे. या लक्षावधि मार्गांपैकीं प्रत्येक मार्ग आपआपल्यापरी खरा आहे, हें ध्यानांत ठेवले पाहिजे. एकाच वस्तूकडे पाहावयाचें झालें तर निरनिराळ्या शंभर जाग्यांवरून तिजकडे पाहतां येईल. इतक्या निरनिराळ्या स्थळांवरून तिचें स्वरूप निरनिराळें भासलें तरी मुख्य वस्तु एकच असते. एखादा मनुष्य पृथ्वीवरून सूर्याकडे जावयास निघाला आणि मध्यें अनेक मुक्कामांवरून सूर्याचीं छायाचित्रें त्यानें घेतलीं तर त्यांतील प्रत्येक चित्र दुसऱ्याहून वेगळें दिसेल; तथापि सूर्य एकच आहे हें आपण विसरत नाहीं. आपल्या परमात्मविषयक ज्ञानासही हीच गोष्ट लागू आहे. तत्त्वज्ञान अत्यंत गहन असो अगर अगदीं रानटी असो; अत्यंत उच्चप्रतीच्या पुराणांच्या द्वारें असो अगर शुद्ध भाकडकथांच्या द्वारें असो; मोठ्या सुधारलेल्या आचारविधींच्या द्वारें असो अगर अगदीं जंगली पद्धतीच्या द्वारें असो; प्रत्येक पंथ, प्रत्येक जीव, प्रत्येक राष्ट्र, प्रत्येक धर्म, समजून उमजून अथवा अजाणपणें एकाच ईश्वराकडे धांव घेत आहे. नानाविध माणसांना ईश्वराचीं रूपें नानाविध दिसलीं, तरी तीं एकाच ईश्वराचीं रूपें होत. यांतील एकही रूप ईश्वराशिवाय दुसऱ्या कोणाचें नव्हे. एखाद्या तळ्यांतून पाणी आणण्याकरितां हातीं भांडीं घेऊन आपण सर्व निघालों आहों अशी कल्पना करा. एका जवळ एक पेला आहे, दुसऱ्या जवळ एक बरणी आहे, तिसऱ्याजवळ मोठें पातेले आहे, आणि अशाच रीतीनें प्रत्येकाजवळ वेगवेगळ्या परिमाणाचें व आकाराचें भांडें आहे असे समजा. अशा स्थितींत प्रत्येकाच्या हातीं असलेल्या पाण्याचा आकार त्याच्या हातांतील भांड्यासारखा असणार हें उघड आहे. पेला हातीं असेल त्याच्या हातांतील पाणी पेल्याच्या आकाराचें, पातेल्यांतील पाणी पातेल्याच्या आकाराचें आणि

दुसरीं दुसऱ्या आकाराचीं असणार हें उघड आहे; तथापि प्रत्येक भांड्यांत पाण्याशिवाय दुसरें कांहीं आढळणार नाहीं. धर्मासही हीच गोष्ट लागू आहे. आपलीं मनें हीं त्या भांड्यासारखीं आहेत, आणि आपल्या मनांच्या द्वारें सत्य वस्तूचा अनुभव घेण्यासाठीं आपण धडपडत आहों. परमेश्वर हा त्या पाण्यासारखा असून या मनोरूपी भांड्यांत तो प्रवेश करीत आहे. अशा स्थितींत प्रत्येक भांड्याच्या आकाराचा तो होतो यांत नवल कशाचें? तथापि असें आहे तरी तो एकरूपच आहे. प्रत्येक भांड्यांत तोच परमेश्वर आहे. जेथें सर्वांची एकवाक्यता होते असें हें एकच ठिकाण आहे.

निवळ उपपत्तीच्या दृष्टीनें येथवर सर्व ठीक दिसतें; पण या तत्त्वाचें दृश्य स्वरूप व्यवहारांत आणण्याचा कांहीं मार्ग आहे काय? प्रत्येक धर्म आपआपल्या परी एकच सत्यस्वरूप विशद करीत आहे, हें मत आजच मीं नव्यानें सांगितलें आहे असें नाहीं. हें मत अत्यंत प्राचीन आहे. सर्वांना पसंत पडेल असा पंथ उत्पन्न करण्याचे यत्न हिंदुस्थानांत, अलेक्झांड्रियांत, युरोपांत, चिनांत, जपानांत, आणि अखेरीस अमेरिकेंतही झाले आहेत. सर्व धर्मांनीं सुखानें एकत्र नांदावें या हेतूनें अनेक खटपटी आजपर्यंत झाल्या, पण यांपैकीं एकालाही यश आलें नाहीं; कारण व्यवहार्य असा मार्ग त्यांनीं स्वीकारला नाहीं. जगांतील सर्व धर्म खरे आहेत, ही गोष्ट पुष्कळांस मान्य होते; पण सर्व धर्म सुखानें एकत्र नांदते करण्यास काय युक्ति करावी, हें मात्र कोणास सुचत नाहीं. प्रत्येक धर्माला आपलें विशिष्टत्व ज्यांत कायम राखतां येईल आणि इतरांशीं सलोख्यानेंही राहतां येईल असा मार्ग कोणी सुचवीत नाहीं. धर्माचें विशिष्टत्व भंग न पावतां इतरांशीं एकरूप होण्याचें ठिकाण ज्यांत सांपडेल, तोच मार्ग व्यवहार्य होईल हें उघड आहे. प्रत्येक धर्माचा विशिष्ट मुद्दा ध्यानांत घेऊन कांहीं मतें तयार करण्याचे मार्ग कित्येकांनीं काढले. यायोगें सर्व धर्माच्या लोकांचा अंतर्भाव एका विश्वधर्मात करतां येईल, असा त्यांचा समज होता; पण प्रत्यक्ष व्यवहारांत या समजाचा कांहीं उपयोग झाला नाहीं. यायोगें अधिक पंथ मात्र निघाले आणि या पंथांत नवी नवीं भांडणें उपस्थित होऊन जो उठला तो दुसऱ्यास मागें टाकून आपण पुढें सरण्यासाठीं धडपडूं लागला.

माझ्याही डोक्यांत असाच एक लहानसा मार्ग सुचत आहे. त्याचा तरी प्रत्यक्ष उपयोग कितपत होईल हें सांगवत नाहीं; याकरितां तुमच्या विचा-

रासाठीं त्याचें उद्घाटन मी तुम्हांपुढें आज करणार आहें. ‘ कशाचाही नाश करूं नका’ हा उपदेश मनुष्यजातीच्या हृदयावर ठसविणें हा माझ्या कार्यक्रमांतील पहिला मुद्दा आहे. परमतभंजक लोकांनीं जगावर कोणताही उपकार कधींच केला नाहीं. त्यांनीं जगाचें बरें केव्हांच केलें नाहीं. कशाचीही मोडतोड करूं नका, कोणताही भाग पाडून न टाकतां त्याला नवी जोड देतां येईल तर पहा; तसें होत नसेल तर हात जोडून स्वस्थ तरी बसा. जग आपला मार्ग कसा शोधून काढतें, हें बाजूला उभें राहून निमूटपणें पाहणें हेंच तुम्हांला ठीक आहे. तुमच्यानें मदत होत नसेल, तर निदान दुसऱ्याची तंगडमोड तरी करूं नका. एखादा मनुष्य मनःपूर्वकपणें आपल्या मार्गानें जात असला, तर त्याच्याविरुद्ध बोलून त्याच्या मार्गांत अडथळा आणूं नका. जेथवर एखादा मनुष्य पोंहोंचला असेल, तेथूनच त्याला पुढील मार्गाला लावणें हें तुमचें कर्तव्य आहे. सर्व धर्मांचा मध्यबिंदु परमेश्वर आहे हें खरें असेल, आणि आम्ही सारे या अनेक त्रिज्यांनीं त्या एकाच मध्यबिंदूकडे जात आहों हेंही खरें असेल तर आपण सारे त्याच बिंदूला अखेरीस पोंहोंचूं हेंही अवश्यमेव खरें असलें पाहिजे; आणि ज्या मध्यबिंदूंत सर्व त्रिज्या एकत्र व एकरूप होतात, तेथें आपलेही सारे भेद अवश्य नष्ट होतील; पण या मध्यबिंदूला पोंहोंचेपर्यंत आपणांत भेद राहणारच. या साऱ्या त्रिज्या आरंभीं एकमेकींपासून लांब असतात; पण त्या मध्यबिंदूकडे जाऊं लागल्या म्हणजे एकमेकींच्या जवळ येतात आणि मध्यबिंदूंत अखेरीस एकरूप होतात. आपल्या स्वभावाला अनुरूप अशी यांतील एखादी त्रिज्या स्वीकारून आपण तिच्या अनुरोधानें चालूं लागतों. दुसऱ्याला दुसरी एखादी त्रिज्या पसंत पडते, अशा रीतीनें अनेक त्रिज्यांनीं अनेक लोक जातात; आणि ते सारे आपआपला मार्ग यथाक्रम चालत राहिले, तर अखेरीस एकत्र आणि एकरूप होतील हें उघड आहे; कारण त्रिज्या अनेक असल्या तरी मध्यबिंदु एकच आहे. आपणांपैकीं प्रत्येक जण आपआपल्या विशिष्ट प्रकृतीला अनुरूप अशा मार्गानें पुढें पाऊल टाकीत आहे. प्रत्येकाला अत्युच्च सत्याचा लाभ व्हावयाचा आहे. बाहेरची मदत कोणाच्या उपयोगीं पडत नाहीं. ज्यानें त्यानें आपल्या हिंमतीवरच आपला मार्ग आक्रमिला पाहिजे. तुम्ही आणि मी काय करूं शकणार आहों ? एखाद्या लहान पोराला तरी मार्गाला लावणें तुमच्यानें होईल काय ?

कधींही नाहीं. प्रत्येक मूल स्वतःचा शिक्षक आहे. तें स्वतःच स्वतःला शिकवीत असतें. तुमचें कर्तव्य म्हटलें म्हणजे त्याला शिकण्याला संधि प्राप्त करून देणें आणि त्याच्या मार्गातील अडथळे दूर करणें इतकेंच. झाड वाढतें तें तुम्ही त्याला वाढवितां म्हणून काय ? गुरांढोरांचें तोंड त्याला लागूं नये म्हणून त्याच्या भोंवतीं कुंपण घालण्याचें काम तुम्हीं केलें कीं तुमचें कर्तव्य संपलें. माणसाच्या अंतर्गत वाढीला हीच गोष्ट लागू आहे. तुम्हांला कोणीही कांहीं शिकवूं शकत नाहीं. तुम्हांला साधु बनविणें कोणासही शक्य नाहीं. हें काम तुमचें तुम्हींच केलें पाहिजे. तुमची वाढ बाह्य उपाधींवर अवलंबून नाहीं. ती आंतूनच झाली पाहिजे.

बाह्य शिक्षक काय करूं शकेल ? फार झाले तर तुमच्या मार्गातील अडथळे तो दूर करूं शकेल. इतकें त्यानें केलें कीं त्याचें कार्य संपलें. याकरितां तुमच्यानें कांहीं मदत होत असेल तर करा; हें काम होत नसेल तर निदान मोडतोड तरी करूं नका. कोणालाही आपण साधु करून सोडूं असें तुह्मांस वाटत असेल तर हा भ्रम सोडा. ही गोष्ट सर्वथा अशक्य आहे. जो तो आपआपला गुरु असतो, हा सिद्धांत कधींही विसरूं नका. जनसमूहांत नाना प्रकारच्या प्रवृत्तींचीं माणसें आपणांस दिसतात. मानवी मनाच्या इतक्या लक्षावधि जाती आहेत कीं त्यांचें निश्चित वर्गीकरण करणें शक्यच नाहीं. तथापि सामान्य व्यवहाराकरितां मुख्य चार वर्ग आपणांस पाडतां येतील. एक वर्ग कामकऱ्यांचा. कामाकडे यांचा कल असतो. त्यांच्या मांसपिंडांत जोम भरून राहिलेला असतो. सदोदित कांहीं तरी उद्योग करावा असेंच त्याला वाटत असतें. शरिरांतील जोमाचा खर्च कोठें तरी झालाच पाहिजे. मग कोठें इस्पितळें बांधावीं, दुसरीं परोपकारी कार्यें करावीं, सडका बांधाव्या आणि मनुष्यांचे संघ बनवून त्यांजकडून मोठमोठीं कार्यें उठवावीं हाच त्यांचा उद्योग असतो. दुसरा वर्ग काव्यमय अंतःकरणाच्या लोकांचा. उदात्त आणि सुंदर देखावे पाहत बसावें, हेंच वेड त्यांना असतें. सृष्टीच्या विकृत रूपाकडे ते पाहावयाचे नाहींत. शुद्ध सौंदर्य ते न्याहाळतील आणि त्यांतच रममाण होतील. काव्यमय परमेश्वराची भक्ति ते करतील. जगांतील साऱ्या उदार अंतःकरणाच्या लोकांवर त्याचें प्रेम असतें. त्यांत जातगोत अथवा अर्वाचीन आणि प्राचीन असा भेद ते करणार नाहींत. कोणत्याही स्थळीं आणि

कोणत्याही काळीं उदात्त अंतःकरण त्यांना दिसलें कीं त्यांचें प्रेम तेथें जडतें. सर्व धर्मांचे महात्मे त्यांच्या प्रेमाचे विषय होऊं शकतात. साऱ्या अवतारी पुरुषांची भक्ति ते करतील. ख्रिस्त अथवा बुद्ध अशा व्यक्ती खरोखर जन्मास आल्या होत्या कीं नाहीं, याचा विचार करण्याकडे त्यांची बुद्धि धावावयाची नाहीं. कृष्णाचा जन्म कोणत्या तिथीला झाला, अथवा ख्रिस्तानें कोणत्या तारखेला उपदेश केला, याची चौकशी ते कधींच करावयाचे नाहींत. बुद्धानें अथवा कृष्णानें काय सांगितलें आणि ते स्वतः कसे वागले हेंच ते पाहतात. त्यांची नजर यापलीकडे जात नाहीं; त्यांचें प्रेममय रूप पहावें, त्यांच्या उपदेशाचें अमृत प्राशन करावें आणि आनंदांत मग्न होऊन जावें, इतकीच त्यांची इच्छा असते. यापुढचा वर्ग सूक्ष्मेंद्रियांचा अभ्यास करूं पाहणारांचा. मनुष्याच्या मनाची रचना आणि त्याच्या हालचाली पाहाव्या, हेंच यांच्या मनानें घेतलेलें असतें. अंतर्गत शक्ति कोणत्या स्वरूपाची आहे आणि तिची जाणीव होऊन तिजवर आपला ताबा कसा बसवितां येईल, याचाच विचार ते सदोदित करीत असतात. यानंतरचा वर्ग तत्त्वज्ञांचा. प्रत्येक वस्तूचा तारतम्य भाव ते शोधीत असतात. मनुष्याची उडी जेथवर जाणें शक्य आहे, त्याच्याही पलीकडे उडी मारण्याची इच्छा ते करीत असतात.

मनुष्यजातीच्या मोठ्या भागाला उपयुक्त व्हावें अशी ज्या धर्माची इच्छा असेल त्यानें नानाविध प्रकृतींना मानवेल असें मानसिक खाद्य पुरविण्याची तयारी ठेवली पाहिजे. अशा प्रकारच्या सामर्थ्याचा अभाव असल्यामुळेंच अनेक पंथ एकतर्फी होऊन बसले आहेत. एखादा पंथ शुद्ध भक्तिमार्गी असला, तर त्यांत तुह्मांला भक्तिपूर्ण आणि भावनाप्रधान गीतें ऐकावयास सांपडतील. भक्तिमान् व्हा, हा उपदेश तुम्हांला तेथें ऐकूं येईल. ते गीतें गातील, कंठ सद्गदित करतील आणि डोळ्यांना पाणी आणतील, आणि प्रेमी व्हा असा उपदेश करतील; पण तुह्मी त्यांना कांहीं तत्त्वविषयक प्रश्न विचारला, कीं सारें बिघडलें. बुद्धीला पटेल असें कांहीं तत्त्वज्ञान मला सांगा असें तुह्मीं ह्मटलें, कीं ते ताबडतोब तुह्मांस तेथून हांकून लावतील; एवढेंच नव्हे तर तुह्मीं नरकांत जावें अशी इच्छासुद्धां ते करतील. त्यांच्या अंगीं सामर्थ्य असतें तर तुमची रवानगी त्याच क्षणीं त्यांनीं तिकडे केली असती. याचा परिणाम असा होतो कीं केवळ भावनाप्रधान लोकांच्या उपयोगीं मात्र तो

पंथ पडतो. इतरांना त्याचा उपयोग होत नाहीं; एवढेंच नव्हे तर उलट इतरांचा नाश करण्याचा यत्नसुद्धां तो करतो. इतरांना ते मदत तर करीत नाहींतच, पण त्यांच्या ठिकाणीं खरी धर्मबुद्धि नाहीं असेंही ते म्हणतात, हेंच मोठें वाईट आहे. कांहीं लोक आपणास तत्त्वज्ञ पंडित म्हणवीत असतात. हिंदुस्थानांतील अध्यात्मज्ञानाचीं चार अक्षरें त्यांच्या कानावरून कधींकाळीं गेलेलीं असतात; त्यांची वडबड तोंडानें करून पन्नास पन्नास अक्षरी शब्द ते उच्चारीत असतात, पण माझ्यासारखा एखादा सामान्य अल्पज्ञ मनुष्य जर त्यांना म्हणूं लागला कीं ‘ धार्मिक होण्याचा कांहीं उपाय मला सांगा ’ तर त्याच्याकडे तुच्छतेनें पाहून ते आधीं नुसतेच हंसतील. मग कांहीं वेळानें ह्मणतील “ आमच्या मानानें तुझी बुद्धि फारच कोती; मग तुला सांगावें काय, आणि तें तुला समजणार तरी कसें?” हे पंडित फारच वरिष्ठ कोटींतले होत. यांच्याकडे आमच्यासारखा सामान्य मनुष्य गेला कीं हे एकदम दरवाजाकडेच बोट करावयाचे.

कांहीं लोक चमत्कारप्रिय असतात आणि चमत्कार करण्याच्या मागें लागलेले असतात. अस्तित्वाच्या निरनिराळ्या पायऱ्या, बाह्यावरण, अंतरावरण, मनाचें सामर्थ्य, मनाच्या वेगवेगळ्या दशा असल्या प्रकारच्या अनेक गोष्टी ते सांगत असतात; पण ‘ माझ्या हातून होण्यासारखें कांहीं असेल तर मला सांगा ’ असें तुह्मीं त्यांना म्हटलें कीं तुम्हांला नुसतें तुच्छ करून टाकण्यापलीकडे ते कांहींसुद्धां करावयाचे नाहींत. तुमचें जीवित अगदीं निरुपयोगी आणि तुह्मी गाढवांतले गाढव आहां असें ते तुम्हांस भासवितील. जगभर हाच प्रकार चालू आहे. केवळ आपल्याच पंथाचें स्तोम माजवून बाकीच्या जगाला तुच्छ करणाऱ्या या अनेक पंथांचे पुढारी माझ्या हातीं सांपडते तर त्यांना खोलींत कोंडून टाकून त्यांच्या त्या इतरांना तुच्छ करणाऱ्या हास्ययुक्त चेहऱ्यांचे फोटो मीं काढून ठेवले असते.

साऱ्या जगांत धर्माची दशा सध्या अशी झाली आहे. जो धर्म सुरू व्हावा असें माझ्या मनांत आहे, तो सर्वांच्या मनाला पटेल असा होईल. तो तत्त्वपूर्ण असेल, भावनाप्रधान असेल, विज्ञानमय असेल आणि कर्मप्रधानही असेल. पाठशाळेंतील गुरु येवोत, तर्कशास्त्री येवोत अथवा आधिभौतिक शास्त्रज्ञ येवोत, त्या साऱ्यांचें समाधान तो करील. त्यांना पुरून

उरेल इतका बुद्धिवाद तो त्यांच्याशीं करील. अखेरीस अशा ठिकाणीं तो त्यांना पोंहोंचवील, कीं त्यापुढें जावयाचें तर बुद्धीशीं फारखतच केली पाहिजे, अशी त्यांची खात्री पटेल. "परमेश्वर, मुक्ति वगैरे साऱ्या कल्पना शुद्ध भोळेपणाच्या असल्यामुळें त्यांना रजा दिली पाहिजे" असें जे म्हणूं लागतील. त्या राजमान्य राजश्रींना मी इतकेंच सांगतों कीं, "अहो राजश्री, तुमचा देह अस्तित्वांत आहे असें मानणें हाच सर्वात मोठा भोळेपणा आहे. याकरितां प्रथम तो टाकून द्या पाहूं. घरी जेवायलाही जाऊं नका, अथवा पाठशाळेंत जाऊन व्याख्यानेंही झोडूं नका. देहकल्पनाच एकदम सोडून द्या, आणि हें तुमच्यानें होत नसेल तर आतां आमची करुणा भाकून गप बसा." हें सर्व जग एकरूप आहे; विश्वांतील सारें अस्तित्व एकरूप आहे, अशा प्रकारचीं तत्त्वें जो धर्म सांगतो, त्यानें त्यांच्या अनुभवाचा मार्गही आम्हांस दाखविला पाहिजे. नाहीं तर कोरडें तत्त्वज्ञान काय कामाचें? तसेंच मानसशास्त्राचा भोक्ता कोणी आला, तर त्याचेंही स्वागत आमच्या धर्मानें केलें पाहिजे. मनाचें पृथक्करण त्याच्या उपभोगार्थ त्यानें तयार ठेवलें पाहिजे, आणि त्याचें समाधान सप्रयोग त्यानें केलें पाहिजे. आतां भक्तिप्रधान कोणी आम्हांपाशीं येतील, तर त्यांचीही चांगली बरदास्त आम्हीं राखिली पाहिजे. त्यांच्याबरोबर आह्मी हंसलें पाहिजे, रडलें पाहिजे आणि ईश्वराचें भजन केलें पाहिजे. त्यांच्याबरोबर प्रेमचषक पिऊन आपणही बेहोष झालें पाहिजे. कोणी कर्मयोगी आला, तर आपलें सारें बळ खर्चून त्याजबरोबर आपण कामही केलें पाहिजे. अशा प्रकारचें सम्मेलन ज्यांत होईल तोच खरा विश्वधर्म होईल. प्रत्येकाच्या मनांत अशा प्रकारचें सम्मेलन पूर्णपणें असतें, तर काय बहार झाली असती! पूर्णावस्थेस पोंहोंचलेला मनुष्य कसा असतो, असा प्रश्न मला कोणीं केला, तर अशा माणसाकडे मी बोट दाखवीन. यांपैकीं एखाददुसरी बाजू ज्याजवळ असते तो मनुष्य एकतर्फी आहे असें मी समजतों. जगांतील बहुतेक सारीं मनुष्यें बहुधा अशींच एकतर्फी असतात. त्यांना कोणता तरी एकच मार्ग ठाऊक असतो आणि त्याच मार्गानें ते जात असतात. त्याहून दुसरा मार्ग त्यांना भीतिप्रद आणि धोक्याचा वाटतो. आतां सांगितलेल्या चतुर्विध मार्गाचें समतोल सम्मेलन असणें, हाच खरा आदर्शरूप धर्म होय असें मला वाटतें. योगमार्गानें

हा धर्म सिद्ध करतां येतो. योग म्हणजे एकीकरण. कर्ममार्ग्याच्या दृष्टीनें योग म्हणजे सर्व मनुष्यांचें एकीकरण. मानसशास्त्र्याच्या दृष्टीनें योग म्हणजे जीवात्मा आणि परमात्मा यांचें ऐक्य. भक्तिमार्गाचा योग म्हणजे प्रेममय परमेश्वराशीं भक्ताचें ऐक्य; आणि तत्त्वज्ञाचा योग म्हणजे ' सर्वं खल्विदं ब्रह्म.' योग या शब्दाचा अर्थ असा आहे. योग हा संस्कृत भाषेतील शब्द आहे, आणि आतां सांगितलेल्या चार मार्गास चार निराळीं नांवेंही त्या भाषेंत आहेत. योगमार्गानें जाणाराला योगी अशी संज्ञा आहे. कर्मयोगी, भक्तियोगी, राजयोगी आणि ज्ञानयोगी असे चार प्रकारचे योगी आपापल्या मार्गानुरूप होतात. योगी या एका शब्दांत या साऱ्यांच्या अंतर्भाव होतो.

आतां आपण प्रथम राजयोगाचा विचार करूं. राजयोग अथवा मनावर ताबा मिळविण्याचा योग म्हणजे काय ? योग हा शब्द उच्चारला कीं त्याशीं नाना प्रकारच्या भुताखेतांच्या कल्पना जोडावयाच्या अशी संवय तुमच्या या देशांतील लोकांस पडून गेली आहे. याकरितां असल्या भलत्यासलत्या कल्पनांचा अर्थाअर्थी संबंध नाहीं हें तुम्हांस पुनःपुन्हां सांगणें अत्यावश्यक आहे असें मला वाटतें. विवेचक बुद्धीला सोडून कांहीं करा असें यांपैकीं एकही योग तुम्हांस सांगत नाहीं. तुम्हांला फसविण्याची इच्छा एकालाही नाहीं. आपली विवेचक बुद्धि तुम्ही गुंडाळून ठेवावी असेंही कोणी म्हणत नाहीं. बुद्धि घरीं ठेवून मग चर्चमध्यें या व उपदेशक बडबडेल त्यावर डोळे मिटून विश्वास ठेवा असेंही योगशास्त्राचें सांगणें नाहीं. असामान्य कोटींतला म्हणून मिरविणाऱ्या एखाद्या माणसाच्या चरणीं आपला सारा जीवभाव वहा असें एकही योग तुम्हांस सांगत नाहीं. उलट आपल्या विवेचक बुद्धीला घट्ट चिकटून बसा असाच त्यांचा उपदेश आहे. कांहीं झालें तरी बुद्धीची कांस सोडूं नका असेंच ते तुम्हांस सांगत आहेत.

प्राणिमात्रांत ज्ञानार्जनाचीं तीन साधनें अथवा करणें आहेत असें आपणास आढळून येतें. पहिलें साधन उपजत बुद्धि. हें साधन पशुवर्गात फार उच्चदशेला पोंहोंचलें असल्याचें तुम्हांस आढळेल. साधनत्रयांत हें साधन अत्यंत कमी प्रतीचें आहे. दुसरें साधन विवेचक अथवा विचारवती बुद्धि हें होय. हें साधन मनुष्यांत उच्चावस्थेला पोंहोंचलेलें आहे. उपजतबुद्धि हें साधन अपुरें आहे. पशूंचें कर्मक्षेत्र अत्यंत मर्यादित असतें आणि तेवढ्या

मर्यादेंत उपजतबुद्धि आपलें कार्य करीत असते. पशुयोनि सोडून मानवयोनीकडे तुह्मी वळलां म्हणजे तेथें विचारवती बुद्धीचा विकास तुह्मांस दिसेल, आणि त्याबरोबर कर्मक्षेत्राचाही विस्तार झाला असल्याचें तुमच्या प्रत्ययास येईल. विवेचकबुद्धि हें साधन उपजतबुद्धीहून श्रेष्ठ असलें तरी तेंही सर्वांशीं पुरें आहे असे नाहीं. तेंही पुष्कळ अंशीं अपुरेंच आहे. कांहीं थोडा मार्ग चालून विवेचकबुद्धिही तेथें मुक्काम करते. त्यापुढें जाणें तिला अशक्य होतें. तिला तशीच पुढें दामटण्याचा यत्न तुह्मीं केला तर साराच घोंटाळा होतो. ती स्वतःच गोंधळून जाऊन मठ्ठ होते अथवा हटवादांत शिरते. तर्कशास्त्राला भोवंड येऊं लागून तें स्वतःभोवतींच फिरूं लागतें. आपल्या दृश्य ज्ञानाचेंच उदाहरण घ्या. जड पदार्थ आणि शक्ति हा आपल्या साऱ्या दृश्य ज्ञानाचा पाया आहे. जड पदार्थ म्हणजे काय ? शक्तीचा आघात ज्यावर होतो तो; आणि शक्ति ह्मणजे काय ? जड पदार्थावर जी आघात करते ती. याशिवाय अधिक कांहीं व्याख्या आपणास करवत नाहीं. येथें तर्कशास्त्र आपल्याच भोंवतीं कसें फिरूं लागलें आहे हें ध्यानांत घ्या. पहिली कल्पना दुसरीवर व दुसरी पहिलीवर असें परस्परावलंबन येथें झालें आहे, आणि निश्चित ठाव एकीलाही नाहीं. अशा रीतीनें अखेरीस कोणताच मुक्काम न सांपडतां हें अखंड चक्राकार परिभ्रमण मात्र होतें. बुद्धीची गति कुंठित करणारी एक भक्कम भिंत येथें तिला भेटते. ही उल्लंघन करून तिला पुढें जाववत नाहीं; तथापि येथें तिची पलीकडे जाण्याची इच्छा नष्ट होते असें मात्र नाहीं. पलीकडच्या अनंतांत उडी मारण्यासाठी ती धडपड करीत असतेच. हें जगच काय, पण आपल्या इंद्रियद्वारा ज्याचा अनुभव आपणांस होतो तें सारें विश्वसुद्धां अनंत अस्तित्वाचा एक अणुमात्र आहे. आपल्या जाणिवेंत हा एक अणु असतो, आणि या अणूच्या हद्दींत आपली विवेचकबुद्धि धडपडत असते. ही हद्द सोडून पलीकडे जाणें तिला शक्य नाहीं. याकरितां या हद्दीपलीकडे नेण्यास समर्थ असें आणखी एखादें साधन आपणास हवें आहे. या साधनाला स्फूर्ति असें नांव आहे. अशा रीतीनें उपजतबुद्धि, विवेचकबुद्धि आणि स्फूर्ति अशीं ज्ञानाचीं तीन साधनें आहेत. उपजतबुद्धि पशूंमध्यें, विवेचकबुद्धि मनुष्यांत आणि स्फूर्ति अवतारी पुरुषांत असते. तथापि सर्व मनुष्यांत या तीन्ही साधनांचीं बीजें आढळतात. या साधनांची उत्क्रांति

होण्यास मूळ बीज तरी अवश्य असलें पाहिजे. याशिवाय येथें लक्ष्यांत ठेवण्यासारखा आणखीही एक मुद्दा आहे; तो हा कीं, हीं साधनें, एकाच्या उत्क्रांतीनें दुसरें व दुसऱ्याच्या उत्क्रमणांतून तिसरें अशा रीतीनें बनलीं आहेत. याकरितांच यांत परस्पर विरोध आढळत नाहीं. विवेचकबुद्धीची वाढ होऊन तिचीच स्फूर्ति बनते; याकरितां स्फूर्ति ही विवेचकबुद्धीला विरोध करीत नसून तिला पोषक मात्र होते. विवेचकबुद्धीची अपूर्णता स्फूर्ति पूर्ण करते. लहान मूल आणि वृद्ध मनुष्य हीं स्वरूपें परस्परांहून बाह्यतः भिन्न दिसतात; पण लहान मुलाचें जें पूर्ण रूप तेंच वृद्ध गृहस्थ. येथें परस्पर विरोधनसून परस्पर पूर्तताच असते. अशी वस्तुस्थिति असल्यामुळें येथें जें एक धोक्याचें स्थळ उत्पन्न झालें आहे तेंही लक्ष्यांत ठेवलें पाहिजे. एखाद्या प्रसंगीं यांचीं स्पष्ट रूपें फसवेगिरीचीं असतात; यामुळें खालच्या प्रतीचें साधन वरच्या प्रतीच्या साधनासारखें असतें. उपजतबुद्धि स्फूर्तीसारखी दिसते. केवळ उपजतबुद्धीस अनुसरून केलेल्या गोष्टी पुष्कळ वेळां स्फूर्तीसारख्या दिसतात, आणि अशा गोष्टी करणारीं माणसें भविष्यवाद्यांच्या पदावर आपला हक्क सांगूं लागतात. एखाद्या मूर्खाच्या अथवा अर्धवेड्याच्या डोक्यांत जो विचारांचा विलक्षण घोंटाळा चाललेला असतो ती स्फूर्तिच आहे असें तो समजत असतो आणि लोकांनीं आपल्यामागें यावें अशीही त्याची इच्छा असते. धर्माच्या बाबतींत ज्या परस्पर विरोधी गोष्टींचा सुळसुळाट झाला आहे त्या गोष्टी असल्याच मूर्खाच्या डोक्यांत पिकल्या होत्या. त्यांच्याच उपजत बुद्धीचा हा खेळ होता, आणि ती सारी स्फूर्ति आहे असें ते जगाला सांगत सुटले.

कोणत्याही मताच्या सत्यत्वाची पहिली पारख ही आहे कीं विवेचकबुद्धीशीं त्याचा विरोध केव्हांही असतां कामा नये. आतांच ज्या योगांचें वर्णन मीं केलें त्यांचा पाया हाच आहे असें आपणांस आढळून येईल. आतां आपण राजयोगाचा विचार करूं. राजयोग हा सूक्ष्मेंद्रिययोग आहे. सूक्ष्मेंद्रियांच्या द्वारा अंतिम हेतु सिद्ध करणारा तो राजयोग. हा विषय अत्यंत विस्तृत आहे. याचें सांगोपांग विवेचन चुटकीसरसें करतां येणें शक्य नसल्यामुळें त्यांतील मध्यवर्ती मुद्दा मात्र मी आपणास सांगणार आहें. ज्ञानार्जनाचें एकच साधन आपणा सर्वांच्या हातीं आहे. अगदीं निर्बुद्ध माणसापासून तों थेट उच्चप्र-

तीच्या योग्यापर्यंत सर्वांना सामान्य असें साधन एकच आहे. तें साधन केंद्रीकरण हें होय. आपल्या रसशालेंत काम करणारा रसायनशास्त्री आपल्या मनाच्या साऱ्या शक्तींचें केंद्रीकरण करीत असतो. या साऱ्या शक्ती तो एका केंद्रांत अथवा बिंदूंत आणतो, आणि मग हें केंद्रीकृत मन तो ज्ञातव्य वस्तूवर लावतो. अशा स्थितीत पदार्थांचीं सारीं तत्त्वें त्याच्या दृष्टीसमोर उघडीं होतात, व त्यांचें ज्ञान त्याला होतें. त्याचप्रमाणें ज्योतिषीही आपलें केंद्रीकृत मन दुर्बिणीच्या द्वारें ताऱ्यांकडे लावतो. त्याच्या मनासमोरून सारे तारे परिभ्रमण करतात आणि आपली रहस्यें त्याच्या स्वाधीन करतात. हीच गोष्ट प्रत्येक जातीच्या ज्ञानाला लागू आहे. खुर्चीवर बसणारा पंडित असो कीं त्यासमोर हातांत पुस्तक घेऊन बसणारा अज्ञ विद्यार्थी असो; ज्याला ज्याला ज्ञानार्जनाची इच्छा म्हणून आहे त्याला त्याला याच साधनाची कांस धरणें अवश्य आहे. माझें भाषण तुम्ही ऐकत आहां. यांत तुम्हांला गोडी लागली तर तुमचें मन त्याकडे वेधून जाईल. त्याचें केंद्रीकरण होईल. अशा स्थितींत एखाद्या घड्याळाचे ठोके पडले तर तो आवाज तुम्हांस ऐकूंही येणार नाहीं. कारण तुमचें सारें मन माझ्या शब्दांकडे लागलेले राहील. आपल्या मनाचें केंद्रीकरण तुम्ही जों जों अधिक कराल तों तों माझें भाषण तुह्मांस अधिक चांगलें समजेल, आणि जों जों मी आपल्या प्रेमाचें आणि सामर्थ्याचें अधिक केंद्रीकरण करीन तों तों माझ्या शब्दांत अधिक सुलभता येईल. हें केंद्रीकरणाचें सामर्थ्य जों जों अधिक तों तों ज्ञानाची प्राप्ति अधिक प्रमाणावर होते. कारण, ज्ञान प्राप्त करून घेण्याचें हें एकच साधन आहे. एखाद्या चांभारानें आपल्या मनाचें केंद्रीकरण अधिक केलें तर त्याला जोडे अधिक चांगले शिवतां येतील. याच रीतीनें आचारीसुद्धां स्वयंपाक अधिक चांगला करूं शकेल. पैसा मिळविण्याच्या कामांत काय, ईशपूजनांत काय, अथवा दुसऱ्या कोणत्याहि उद्योगांत काय, मुख्य साधन मनाची एकाग्रता हेंच होय. जों जों ही एकाग्रता अधिक तों तों कोणतेंही कार्य अधिक चांगलें होतें. प्रकृतीच्या खजिन्याची ही एकच किल्ली आहे. ज्ञानाचा खजिना उघडण्याचीही ही एकच किल्ली आहे. राजयोगांत मुख्यतः मनाचे केंद्रीकरण हाच प्रमुख विषय आहे. आपल्या सध्याच्या देहस्थितींत आपल्या बुद्धीला अनंत शाखा फुटल्या आहेत, आणि आपलें मन शेंकडों गोष्टींमागें लागून स्वतःची शक्ति

क्षीण करीत असतें. ज्ञानार्जनाचा हेतु धरून मी आपलें मन एखाद्या विषयाकडे एकाग्र करण्याचा यत्न करूं लागलों कीं शेंकडों हजारों अनिष्ट विचार माझ्या मेंदूवर आघात करूं लागतात, व हजारों विचार मनांत शिरून त्याच्या शांतीचा भंग करतात. हे आघात कसे चुकवावे, मनाचा संयम कसा करावा आणि त्याला ताब्यांत कसें आणावें हाच अभ्यास राजयोगांत प्रमुखत्वानें सांगितला आहे.

आतां कर्मयोग म्हणजे काय हें पाहूं. कर्मयोग म्हणजे कर्माच्या द्वारें ईशप्राप्ति करून घेणें. कांहींना कांहीं काम करण्यासाठींच ज्यांचा जन्म झाला आहे, अथवा कोणत्याही प्रकारच्या विचारांत ज्यांना आपलें मन एकाग्र करतां येत नाहीं, अथवा ज्यांना दृश्यापलीकडे पाहवत नाहीं अशींच माणसें समाजांत पुष्कळ असतात असें आपणांस आढळून येईल. अशा प्रकारच्या माणसांकरितांही सशास्त्र मार्ग असणें अवश्य आहे. आपणांपैकीं प्रत्येकजण कोणत्याना कोणत्या कामांत गुंतलेला असतो; पण आपल्या मनाच्या शक्तीचा फुकट व्यय बहुतेक लोक करीत असतात. याचें कारण हेंच कीं कर्माचें रहस्य त्यांना ठाऊक नसतें. हें रहस्य कर्मयोग तुमच्या हातीं देतो. कर्म कोठें आणि कसें करावें हें कर्मयोग तुम्हांला शिकवितो. आपल्या क्रियाशक्तीचा अपव्यय न होतां तिचा मोठा भाग कामीं लावून अधिकांत अधिक फायदा कसा काढून घ्यावा याचें स्पष्टीकरण कर्मयोगानें केलें आहे. काम कोणतेंही असो; तें सशास्त्र मार्गानें केलें तर क्रियाशक्तीचा अपव्यय न होतां अधिकांत अधिक फायदा करून घेतां येतो. पण या रहस्याबरोबरच आणखीही एक मुद्दा ध्यानांत ठेवण्यासारखा आहे. कर्माविरुद्ध जो एक मोठा आक्षेप आहे तो हा कीं, तें दुःखदायक झाल्यावांचून राहत नाहीं. सर्व दुःख, सर्व प्रकारचे कष्ट यांची उत्पत्ति आसक्तीमुळें होत असते. माझ्या मनांत एखादें कार्य करावयाचें असतें. एखाद्या मनुष्याच्या उपयोगीं पडावें अशी मला इच्छा असतें; आणि गंमत अशी होते कीं नव्याण्णव हिश्शांनीं तो गृहस्थ कृतघ्न बनतो आणि माझ्याविरुद्ध वागूं लागतो. याचा परिणाम मला दुःख होणें हाच. अशा गोष्टी घडल्या म्हणजे मनुष्याचें मन उदास होतें, आणि कांहींच करूं नये असें त्याला वाटूं लागतें. यामुळेंच सत्कार्यांचा नाश होतो आणि मानवी क्रियाशक्तीचा अपव्ययही होतो. सत्कार्य हातीं घ्यावें

असें पुष्कळांच्या मनांत येतें; पण पुढील दुःखाचा विचार आल्याबरोबर त्याचें मन त्या कार्यापासून परावृत्त होतें. केवळ अंगीकृत कार्य म्हणून आपलें काम कसें करावें हें कर्मयोग शिकवितो, कोणत्याही प्रकारच्या फळाची आशा न ठेवतां अथवा आपल्या कार्यापासून कोणास मदत होत आहे कीं नाहीं याचाही विचार न करतां अथवा त्याला मदत मिळणें योग्य आहे कीं नाहीं हेंही न पाहतां आपलें काम कसें करावें हें कर्मयोग आपणास शिकवितो. कर्म करणें हा कर्मयोग्याचा प्रकृतिधर्म असल्यामुळेंच तो कर्म करतो. कर्म करणें यांतच आपलें कल्याण आहे अशी त्याची दृढ भावना असल्यामुळेंच तो कर्म करतो. कर्म करून मोकळें व्हावें यापलीकडे दुसरा कोणताही हेतु त्याच्या मनांत नसतो. तो सदोदित दाता असतो. तो स्वतःसाठीं म्हणून कोणतेंही कर्म करीत नाहीं अथवा दुसऱ्याकडून आपणास कांहीं प्राप्ति व्हावी अशीही त्याची इच्छा नसते. आपण दाते आहों या गोष्टीचा विसर त्याला पडत नाहीं. त्याचप्रमाणें आपल्या कर्माचें प्रतिफल आपणास मिळावें अशीही इच्छा तो करीत नाहीं. यामुळें दुःखाच्या मगरमिठींतही तो कधीं सांपडत नाहीं. आपल्या मनांत प्रतिफळाची जी अपेक्षा असते तिचाच परिणाम दुःख होय. दुःख केव्हांही येवो; प्रतिफलाच्या अपेक्षांचाच तो परिणाम होय.

आतां यापुढें भक्तियोग येतो. ज्यांचीं अंतःकरणें भावनामय असतात त्यांना हा योग उपकारक होतो. परमेश्वरावर प्रेम करावें असें त्यांना मनापासून वाटत असतें. अनेक प्रकारचे पूजाअर्चाविधि, पुष्पें, धूपदीप, सुंदर देवालयें इत्यादि प्रकारच्या बाह्यसाहित्यावर त्यांचें प्रेम असतें. आतां हे बाह्योपचार अनाठायीं आहेत असें तुम्हांला वाटतें काय ? एकच मुद्दा याबद्दल मी सांगतों. तो हा कीं, ज्या देशांत बाह्योपचार, पुराणें आणि दंतकथा यांचें वैपुल्य आहे त्याच देशांत अत्यंत धार्मिक पुरुष आजपर्यंत निर्माण झाले आहेत. ज्या पंथांत या वस्तूंचें भांडार भरपूर आहे, त्याच पंथांत महादैवी पुरुष निर्माण झाले आहेत. बाह्योपचार कांहीं नको अथवा विधिविधानेंही नकोत असें म्हणून ईश्वराचें अर्चन करण्याचा यत्न ज्या ज्या पंथांनीं आजपर्यंत केला त्यांनीं धर्मातील सुंदर आणि उदात्त वस्तूंचा सर्वथा विध्वंस केला. या वस्तूंबद्दल यत्किंचित्‌ही दयामाया त्यांनीं दाखविली नाहीं, आणि त्यांचा स्वतःचा पंथ पाहिला तर त्यांत काय आढळतें ? त्यांत शुष्क धर्म-

वेडावांचून दुसरें कांहीच आढळत नाहीं. जगांतील धर्मांचा इतिहास पाहिला तर त्यांत हा प्रकार जागोजाग आढळेल. याकरितां पुराण भाग आणि बाह्योपचार यांच्याविरुद्ध गिल्ला करण्याचें कांहीं कारण नाहीं. ज्यांना त्या मार्गानें जाण्याची इच्छा असेल त्यांजसाठीं तो मार्ग खुशाल मोकळा राहूं द्या. पण असें करतांना आपण मोठे शहाणे आणि ते सारे महामूर्ख असा विचार मात्र मनांत आणूं नका. त्यांची आपण थट्टा उडवीत नाहीं हा मोठाच उपकार आपण त्यांजवर करतों असें तुम्हांस वाटूं देऊं नका. कोणाबद्दलही उपहासाचें हास्य तुमच्या चेहऱ्यावर दिसूं देऊं नका. माझ्या आयुष्यांत जे जे महान् धर्मवीर मला भेटले ते सारे या पुराणांच्या आणि बाह्योपचारांच्या कडक शिस्तींतूनच बाहेर पडलेले होते. त्यांच्यापाशीं बसण्याची योग्यता माझ्या अंगीं नसतां त्यांजवर टीका करण्यासाठीं मी तोंड उघडावें काय? शामभटाच्या तट्टाणीनें ऐरावतावर दुगाण्या झाडण्यासारखेंच हें आहे. बाह्योपचाराच्या कल्पनांचा परिणाम कोणत्या मनुष्यावर कसा होतो आणि त्यांतल्या त्याज्य कोणत्या व ग्राह्य कोणत्या हें निश्चितपणें सांगण्याची अक्कल मला आहे काय? कसलाही विचार न करतां जगांतील हव्या त्या गोष्टीवर तोंड सोडण्याची प्रवृत्ति आपल्या ठिकाणीं फार असते. लोकांना हवीं तितकीं पुराणें खुशाल घेऊं द्या. त्यांतही शुद्ध स्फूर्तिजन्य कथा अनेक असतात. भावनामय मनुष्यांस अमूर्तसत्य पसंत पडत नाहीं हें लक्ष्यांत ठेवलें पाहिजे. परमेश्वर हीच एक सद्वस्तु असून ती प्रत्यक्ष दिसेल अशी त्यांची भावना असते. त्याची मनोमय आकृति ते निर्माण करतात; त्याचें भाषण ऐकतात; त्याला पाहतात; त्याच्याशी बोलतात; आणि त्यावर प्रेम करतात. त्यांच्या भक्तींत आपण व्यत्यय कां आणावा? ते आणि त्यांचा परमेश्वर यांची ताडातोड करण्याचा यत्न आपण कां करावा? तुमचा बुद्धिवादी तत्त्ववेत्ता त्यांना शुद्ध मूर्ख वाटतो. एखादा सुंदर पुतळा एखाद्याच्या नजरेस पडावा आणि तो कशाचा केला आहे हें जाणण्यासाठीं त्यानें तो छिन्नभिन्न करावा त्याचप्रमाणें बुद्धिवाद्याची कृति त्यांना वाटते. कोणत्याही प्रकारची आशा मनांत न ठेवतां अव्याज प्रेम कसें करावें हें भक्तियोग त्यांना शिकवितो. सद्वस्तूवर प्रेम करणें हेंच कल्याण असें भक्तियोग त्यांना सांगत असतो. स्वर्गप्राप्तीसाठीं, पुत्रप्राप्तीकरितां, धनलाभास्तव अथवा दुसऱ्या कोणत्याही उद्देशानें

भक्ति करावयाची नाहीं असें भक्तियोगाचें त्यांना सांगणें असतें. प्रेमाचें अत्युच्च प्रतिफल प्रेम हेंच होय आणि परमेश्वर म्हणजे अनिर्वचनीय प्रेमरूप असें भक्तियोग त्यांना शिकवितो. मातृरूपानें, पितृरूपानें, सर्वशक्तिमान् जगच्चालक या नात्यानें, सर्वांतर्यामित्वानें, सर्वज्ञत्वानें इत्यादि अनेक प्रकारच्या गुणांच्या द्वारें त्याला भजण्यास भक्तियोग शिकवितो. त्याच्या स्वरूपाचें स्पष्टीकरण करणारे अत्युत्कृष्ट शब्द म्हणजे तो प्रेमरूप आहे हेच होत. त्याच्याबद्दल जी अत्युच्च कल्पना मानवी मनांत येणें शक्य आहे, ती त्याचें प्रेममय रूप हीच होय. ज्या ठिकाणीं प्रेमाचे आविष्करण दिसेल तेथें तो अवश्य आहेच. किंबहुना, तेथें जो प्रेमाचा आविर्भाव तोच परमेश्वर. पति पत्नीचें चुंबन घेवो अथवा माता आपल्या लेंकराचें चुंबन घेवो, तें चुंबन तोच. जेथें दोन मित्र प्रेमानें परस्परांस आलिंगन देतात तेथें तें आलिंगन तोच. जेव्हां एखादा संत बुडत्या जनाला हात देण्यासाठींच पुढें सरतो तेव्हां आपल्या जवळील प्रेमाचा अनंत सांठा मनुष्यजातीसाठीं तो रिकामा करीत असतो. ज्या ठिकाणीं अंतःकरण विस्तृत होतें तेथें तो गोचर होतो.

आतां आपण ज्ञानयोगापर्यंत येऊन पोंहोंचलों. तत्त्वजिज्ञासु, आत्मानात्मविवेकी आणि दृश्यापलीकडे जाण्याची इच्छा करणारा पुरुष तो ज्ञानयोगी. मिकार ऐहिक वस्तूंनीं त्याच्या अंतःकरणाची तृप्ति होत नाहीं. केवळ खावें, प्यावें आणि आला दिवस कसा तरी घालवावा अशा प्रकारच्या चालू जीवितावर तृप्त न राहतां त्यापलीकडे काय आहे हें जाणण्याची प्रबळ इच्छा त्याला असते. हजारों ग्रंथ वाचूनसुद्धां तो तृप्त होत नाहीं. जगांतल्या साऱ्या भौतिक शास्त्रांनीही त्याच्या मनाची शांति होत नाहीं. जगांतले अनंत पंथसुद्धां त्याच्या उपयोगीं पडत नाहींत. अनंत अस्तित्वाच्या महासागरांतील एखाद्या बिंदूसारखे ते त्याला वाटतात. मग त्याची तृप्ति होणार कशानें? या साऱ्या देखाव्यापलीकडे जाऊन त्याच्या मूळकारणाच्या अंतरंगांत प्रवेश करण्याची इच्छा तो करीत असतो. भ्रामक देखाव्या मागें सत्यवस्तु कोणती आहे, आणि तिचें खरें स्वरूप कसें आहे, हें त्याला प्रत्यक्ष जाणावयाचें असतें— त्याचा अनुभव घ्यावयाचा असतो; आणि त्याला तें स्वतःच होऊन जावयाचें असतें. विश्वव्यापी अस्तित्वाशीं एकरूप होण्याची इच्छा तो करीत असतो. तत्त्वजिज्ञासु अथवा खरा मुमुक्षु म्हणतात तो हा. परमेश्वर या विश्वाचा

पिता अथवा माता आहे, त्याचा पालनकर्ता आहे अथवा शास्ता आहे एवढें म्हटल्यानें परमेश्वराच्या खऱ्या स्वरूपाचें आविष्करण पूर्णत्वानें होतें असें त्याला वाटत नाहीं. परमेश्वर हा आपल्या जिवाचा जीव, आत्म्याचा आत्मा, किंबहुना मी म्हणजेच परमेश्वर असें त्याला वाटत असतें. परमेश्वराव्यतिरिक्त असें कांहींच त्याला उरत नाहीं. त्याच्या ठिकाणीं मर्त्य म्हणून जो कांहीं भाग असतो तो तत्त्वज्ञानाच्या प्रचंड घणाच्या तडाख्याखालीं चूर होऊन त्याजपासून वेगळा होऊन पडतो आणि मग जें कांहीं उरतें तें प्रत्यक्ष परमेश्वरच.

एकाच वृक्षावर दोन पक्षी बसले आहेत. एक शेंड्यावर बसला असून दुसरा त्याच्या खालच्या फांदीवर बसलेला आहे. शेंड्यावरील पक्षी शांत आणि आपल्याच ठिकाणीं तृप्त होत्साता स्वतःच्या ऐश्वर्यात निमग्न होऊन स्थिर राहिला आहे. खालच्या फांदीवरील पक्षी या खांदीवरून त्या खांदीवर व तेथून तिसरीवर अशा येरझारा घालीत आहे, आणि मधून मधून बरीं वाईट, गोड-कडू फळें खात आहे. एखादें फळ कडू लागलें कीं तोंड वांकडें करावें आणि एखादें गोड लागलें कीं हर्षातिशयानें फुरफुरावें असा त्याचा क्रम सुरू आहे. अशा रीतीनें सुखामागून दुःख व दुःखामागून सुख तो भोगीत आहे. थोड्या वेळानें त्यानें आणखी एक फळ चावलें. तें त्याला इतकें कडू लागलें कीं फळें खाण्याची वासना म्हणून त्याला राहिली नाहीं. त्याला त्याच्या जीविताचा कंटाळा आला. इतक्यांत त्यानें वर पाहिलें तों एक सुंदर आणि मोहक पिसाऱ्याचा पक्षी त्याला दिसला. त्याचे पंख सुवर्णतुल्य होते. तो कडु अथवा गोड, कोणतींच फळें खात नव्हता. तो सुखानें फुगलेला दिसत नव्हता अथवा दुःखही भोगीत नव्हता. तो आपल्याच ठिकाणीं तृप्त दिसत असून अगदीं निश्चल राहिला होता. स्वतःपलीकडे तो कांहींच पाहत नव्हता. त्याची ही स्थिति पाहून त्या खालच्या पक्ष्यालाही तसें व्हावें अशी इच्छा क्षणमात्र झाली; पण थोड्याच वेळानें त्या इच्छेचाही विसर त्याला पडून तो तीं कडू-गोड फळें पुन्हां खाऊं लागला. थोड्याच वेळानें पुन्हां एकवार एक अतिकडू फळ त्यानें चावलें. त्यायोगानें त्याला पुन्हां महद्दुःख होऊन तो पुन्हां वर पाहूं लागला. त्या पक्ष्याकडे जाण्याच्या इच्छेनें तो वर वर जाऊं लागला. मध्यंतरीं त्याला पुन्हा एकवार विसर पडला;

तथापि सावध होऊन तो पुन्हां वर चढूं लागला. अशा रीतीनें केव्हां विसर पडावा तर केव्हां आठवण व्हावी असें होतां होतां अखेरीस त्या सुंदर पक्ष्याच्या जवळ तो आला. त्या वेळीं त्या पक्ष्याच्या सुंदर पिसाऱ्याच्या तेजाचें परावर्तन आपल्या भोंवतीं पसरलें आहे असें त्यानें पाहिलें. आपल्या स्वरूपांत कांहीं बदल होत आहे असें त्याला वाटलें. आपण स्वतः वितळून जात आहों कीं काय असें त्याला दिसलें. तो आणखी जवळ गेला. त्याच्या भोंवतीं असलेलें अनेक वस्तूंचें जाळ नाहींसें झालें. हा बदल कशानें होत आहे हें अखेरीस त्याच्या लक्ष्यांत येऊं लागलें. खालचा पक्षी म्हणजे वरच्या पक्ष्याचें प्रतिबिंबच होता. वरच्या पक्ष्याची तो जणुं काय छाया होता. वस्तुतः वरचा पक्षी तो स्वतःच होता. फळें खाणें, रडणें, हंसणें वगैरे त्याच्या साऱ्या क्रिया स्वप्नांत झाल्या होत्या. त्या क्रियांत सत्यत्व नव्हतें. खरा पक्षी वर जागच्या जागीं निश्चल असतां त्याला स्वप्न पडून त्यांत तो अनेक क्रिया करीत होता व त्या खरोखर घडत आहेत असा भ्रम त्याला झाला होता. वस्तुतः जागच्या जागींच तो अचल आणि आत्मतुष्ट होता. तो सुखदुःखातीत होता. वरील पक्षी म्हणजे विश्वाचा अधिष्ठाता परमेश्वर होय, आणि खालचा पक्षी म्हणजे जीवात्मा होय. मानवी जीवात्मा कडू-गोड फळें खात असतो. मध्यंतरीं एखादा प्रचंड आघात त्याजवर कोसळतो. तेव्हां कांहीं कालपर्यंत हीं फळें खाण्याची आपली क्रिया तो बंद करतो आणि अज्ञात परमेश्वराकडे जाऊं लागतो. अशा वेळीं त्याला प्रकाश दिसूं लागतो. हें जग म्हणजे शुद्ध भ्रामक देखावा आहे असे त्याला वाटूं लागतें. तथापि त्याचीं इंद्रियें त्याला पुन्हां मागें ओढतात आणि कडु व गोड फळें खाण्याची त्याची क्रिया पुन्हां सुरू होते. इतक्यांत पुन्हां एखादा जबर रपाटा बसतो आणि त्याचे डोळे पुन्हां एकवार उघडून प्रकाशाचें दर्शन त्याला पुन्हां घडतें. तो ईश्वरासंनिध जाऊं लागतो आणि जों जों अधिक जवळ तो जातो तों तों आपलें पहिलें स्वरूप वितळत आहे असे त्याला दिसूं लागतें. तो अगदीं संनिध गेला म्हणजे आपण दुसरा कोणी नसून प्रत्यक्ष परमेश्वरच आहों असा अनुभव त्याला येतो व ' सोऽहम्' मीच परमेश्वर असें तो म्हणूं लागतो. ज्ञानयोगाचें सांगणें या प्रकारचें आहे. मनुष्य हा स्वभावतः परमात्मरूप आहे असें ज्ञानयोगाचें म्हणणें आहे. आपणांपैकीं प्रत्येक जण परमेश्वर असून सर्वत्र एका-

त्मता आहे असा ज्ञानयोगाचा सिद्धांत आहे. पायाखालीं तुडविल्या जाणाऱ्या अत्यंत क्षुद्र कीटकापासून तों अत्यंत श्रेष्ठ प्रतीच्या प्राण्यांपर्यंत सर्व परमात्म्याचींच रूपें आहेत.

हे सारे योग प्रत्यक्ष आचरणाकरितां आहेत हें मुद्दाम सांगण्यासारखे आहे. त्यांच्या नुसत्या शाब्दिक उपपत्ती कामास यावयाच्या नाहींत. अभ्यास न करतां अनेक योग तोंडानें तुम्ही बडबडलां तरी काडीचाही फायदा तुमच्या पदरीं पडावयाचा नाहीं. प्रथम त्यांजबद्दल सर्व ऐकून घ्या. नंतर त्यांजवर पूर्ण विचार करा. त्यांचा खरेखोटेपणा आपल्या बुद्धीच्या कसोटीनें ठरवा. ते विचार आपणास पटले म्हणजे पुनःपुन्हां त्यांचा खल करून आपल्या चित्तावर ते आपण ठसविले पाहिजेत. मग मनन आणि अभ्यास यांच्या द्वारें त्यांचा अनुभव घेतला पाहिजे. असें झालें म्हणजे आपल्या साऱ्या जीवभावाशीं ते एकरूप होतील. मग धर्म म्हणजे उपपत्तींचें आणि कल्पनांचें जाळें असें आपणास वाटणार नाहीं. अथवा धर्म म्हणजे बुद्धीच्या भराऱ्या असेंही आपण म्हणणार नाहीं. आपण स्वतःच धर्मरूप होऊन जाऊं. बुद्धीच्या भरारीवर आपण मूर्खत्वाच्या पुष्कळ गोष्टींस आज संमति देत असूं आणि उद्यां त्या विसरतही असूं. पण खऱ्या धर्मज्ञानांत असा बदल कधींच होत नाहीं. धर्म म्हणजे प्रत्यक्ष अनुभव. धर्म म्हणजे पोकळ बडबड नव्हे, मतें नव्हत, उपपत्ती नव्हत अथवा बुद्धीची भरारीही नव्हे. तुमच्या उपपत्ती कितीही सुंदर असल्या तरी त्या धर्म नव्हत. धर्म म्हणजे प्रत्यक्ष अनुभव—प्रत्यक्ष तें होणें. धर्म ह्मणजे ऐकणें अथवा संमति देणें नव्हे, तर ज्याला आपण संमति देतों तें तत्त्व आपण स्वतः होऊन जाणें याचें नांव धर्म. खरा धर्म तो हाच.

# पव्हारी बाबा.

दुःखी कष्टी जनांचा क्लेशपरिहार करणें हाच खरा धर्म होय असें प्रतिपादन भगवान् बुद्धांनीं केलें आहे. धर्मसाधनाचीं जीं अनेक अंगें आहेत त्यांपैकीं या एकाच अंगाला त्यांनीं विशेष प्राधान्य दिलें आणि बाकीचीं अंगें त्या काळापुरतीं तरी त्यांनीं मागें ठेवलीं. केवळ स्वार्थाला चिकटून बसण्याचा सामान्य मार्ग किती पोकळ आणि भ्रामक आहे याचा पुरा अनुभव येण्यास भगवान् बुद्ध यांना दीर्घ काळपर्यंत आत्मसंशोधन करावें लागलें. बुद्धदेवांइतका निरलस कर्मयोगी आणि स्वार्थ विसरलेला पुरुष आपल्या अत्यंत विशाल कल्पनेनेंही आपणांस निर्माण करतां यावयाचा नाहीं; तथापि दृश्य वस्तुजाताचें खरें स्वरूप कळण्यास त्यांच्या इतकी खडतर तपश्चर्या कोणास करावी लागली आहे बरें ! जों जों कर्तृत्वशक्ति विस्तृत तों तों तिच्या मागचा अनुभवही अधिक विस्तृत असतो हा सिद्धांत सर्व कालीं आणि सर्वत्र खरा आहे. एखाद्या कार्याचा तपशिलवार नकाशा अगोदर रेखाटलेला असला तर तो सारा तपशील व्यवहारांत आणण्यास अत्यंत खोल विचाराची जरूर कदाचित् लागत नसेल, पण मोठी कर्तृत्वशक्ति म्हणजे केंद्रीकृत विचारशक्तीचें स्पष्ट रूपच होय. विचारशक्तीचें अत्यंत केंद्रीकरण झालें म्हणजे तीच शक्ति कार्यकारी होऊन व्यवहारांतर क्रिया करूं लागते. अदृश्य विचारशक्तीचें दृश्यरूप ह्मणजे क्रियाशक्ति. नुसत्या उपपत्तीचा उपयोग फार तर एखाद्या लहानशा कामीं होईल. लहानसा तरंग उठविण्यास लागणारी चालनाशक्ति ही मोठी लाट उठविण्यास लागणाऱ्या शक्तीहून भिन्न आहे; तथापि त्या लहानशा तरंगाच्या पोटीं क्रिया करणारी शक्ति ही मोठ्या शक्तीचेंच लहानसें रूप आहे. दोहोंच्या परिमाणांत भेद दिसला तरी त्याच्या मूळरूपांत भेद नाहीं. वस्तुस्थिति कितीही कठिण असली तरी जशी आहे तशीच घेऊन चालणें भाग आहे. ती भयंकर असली तरी तिकडे डोळेझांक करून चालावयाचें नाहीं. सत्याच्या शोधार्थ निघालेल्या मनुष्यानें आपलें हृदय दगडासारखें कठीण केलें पाहिजे.

सत्याच्या कसल्याही भयंकर स्वरूपानें त्यानें आपली छाती फाटूं देतां उपयोगीं नाहीं. त्याच्या हृदयांत कसल्याही स्वार्थाला थारा असूं नये. अत्यंत मनःपूर्वकपणें त्यानें सत्याच्या मागें लागलें पाहिजे. मग या शोधांत अवयवामागें अवयव गमविण्याची पाळी आली तरी त्यानें परततां उपयोगीं नाहीं. आपलें मन सध्या अगदी बाल्यदशेंत आहे. त्याची क्रियाशक्ति अत्यत अल्प आहे. सत्याच्या प्राप्तीसाठीं अहर्निश तें निर्भयपणें धडपडूं लागलें म्हणजे त्याची क्रियाशक्ति वाहते आणि मग प्रचंड लाट उठविण्यास तें समर्थ होतें, आणि अफाट कार्यें करतें. सूक्ष्म वस्तु आपल्या भोंवतीं जड वस्तू जमा करीत असते. अशा रीतीनें जों जों अधिक काल व्यतीत होतो तों तों हें जडवस्तूंचें आवरण वाढत जाऊन अखेर ती सूक्ष्म वस्तु स्थूलरूपानें व्यक्तदशेस येते. अदृश्याला दृश्यरूप प्राप्त होतें, नुसत्या शक्य कोटींतल्या वस्तू प्रत्यक्ष सृष्टींत येतात, कारणाचें रूपांतर कार्यांत होतें, आणि विचारांना स्नायूंचें स्पष्टरूप प्राप्त होतें.

हजारों प्रकारच्या परिस्थितींनीं कारण झांकलेलें असलें तरी आज ना उद्यां तें कार्यरूपास आल्यावांचून राहाणार नाहीं. ज्या विचारांत जिवटपणा म्हणून कांहीं आहे, तो विचार आज दुबळा दिसत असला तरी त्याचा उज्ज्वळ प्रकाश पडण्याचा दिवस कधींना कधीं खास उगवेल. या ठिकाणीं दुसराही एक मुद्दा लक्ष्यांत ठेवण्यासारखा आहे. तो हा कीं कोणत्याही गोष्टीचें महत्त्व इंद्रियजन्य सुखाच्या मापानें ठरविणें बरोबर नाहीं. आपल्या इंद्रियजन्य सुखांच्या साधनांत एखादी गोष्ट किती भर टाकिते एवढेंच पाहून त्यावरून तिची योग्यता ठरविणें चुकीचें आहे.

कोणत्याही प्राण्याची पायरी जों जों खालच्या दर्जाची, तों तों त्याचें सुख त्याच्या इंद्रियांत अधिक गुरफटलेलें असावयाचें, आणि त्याचा सारा जीव फक्त इंद्रियांतच गुंतलेला राहावयाचा. केवळ इंद्रियांच्या वस्तींतून मनुष्याला बाहेर काढणें हेंच संस्कृतीचें-खऱ्या संस्कृतीचें कार्य असलें पाहिजे. केवळ बाह्यसुखांत त्याला गुंतवून न ठेवतां त्याची दृष्टि ऊर्ध्वगामी करून त्याला अधिक उच्च प्रतीच्या आनंदाची गोडी लावणें हा संस्कृतीचा हेतु असला पाहिजे. त्याच्या इंद्रियजन्य सुखसाधनांत भर घालीत बसणें म्हणजे संस्कृति नव्हे.

या तत्त्वाची जाणीव मनुष्याला उपजतच असते. सर्व प्रकारच्या परिस्थितींत ही जाणीव त्याला स्पष्ट करतां येत नसली तरी ती आहे हें खोटें नाहीं. या तत्त्वासंबंधीं अनेक प्रकारच्या निरनिराळ्या रूपांचे विचारही त्याच्या मनांत येत असतील; तथापि त्याचें अस्तित्व त्याच्या ठिकाणीं निःसंशय आहे. हें तत्त्व पुष्कळ वेळां मागे पडत असलें तरी तें स्पष्ट होण्याचे प्रसंगही मनुष्याला पुष्कळ येतात आणि त्या वेळीं तो तें स्पष्ट करतोही. एखाद्या धर्मोपाध्यायाबद्दल पूज्यबुद्धि मनुष्य कां दाखवितो? शास्त्रीपंडितांबद्दल त्याच्या मनांत आदर कां असतो? याचें कारण हेंच कीं हीं माणसें सामान्य व्यवहाराबाहेरचीं आहेत–इंद्रियांपलीकडचीं आहेत–असें त्याला वाटत असतें. आपल्या इंद्रियांनीं आंखून दिलेली मर्यादा ओलांडून एखाद्याला पलीकडे किती जातां येतें हें पाहून त्यावरूनच त्याच्या खऱ्या उन्नतीचें स्वरूप समजतें. इंद्रियजन्य वातावरण सोडून अधिक शुद्ध पण अधिक तीव्र असा वायु आंत खेंचण्याची शक्ति त्याच्या फुप्फुसांस किती आहे हें पाहून त्याच्या खऱ्या संस्कृतीचें स्वरूप ठरवावयाचें असतें. त्याचप्रमाणें अशा प्रकारच्या इंद्रियातीत वातावरणांत किती काळ तो पोहूं शकतो याचाही विचार करावा लागतो.

केवळ सांप्रतची मनुष्याची स्थिति पाहिली तरी एक गोष्ट आपल्या लक्ष्यांत येईल. स्वतांच्या जीविताला आवश्यक अशा वस्तू मिळविण्याला लागणारा काळ वजा जातां जो वेळ शिल्लक उरतो त्याचा उपयोग सुसंस्कृत मनुष्य कसा करतो? त्याचा उपयोग चैनीच्या वस्तू मिळविण्याकडे तो कधींही करणार नाहीं. किंबहुना अशा वस्तूंचा कंटाळा त्याच्या ठिकाणीं आढळून येईल; आणि जों जों त्याची संस्कृति वाढत जाईल तों तों अवश्य वस्तूही त्याला नकोशा होऊं लागतील.

भोगकल्पनांचा अखेरचा अवधि कोणता याबद्दल ज्या कांहीं कल्पना मनुष्याच्या चित्तांत प्रादुर्भूत होतात त्यांस मूर्तरूप देण्याचा यत्न तो करीत असतो. या कल्पनांचें स्पष्ट प्रतिबिंब व्यवहारांत दिसावें अशी त्याची धडपड असते. या धडपडीलाच कला असें नांव आहे. साहित्य संगीतादि कला या अशाच उत्पन्न झालेल्या आहेत.

साऱ्या विश्वांत आढळून येणारीं अनंत स्पष्टास्पष्ट रूपें हीं त्या मूलतेजाच्या केवळ एका अंशाचीं व्यक्तरूपें होत. व्यक्तदशेस आलेला भाग अत्यल्पांश असून अव्यक्त भाग कितीतरी तसाच शिल्लक आहे. अनंत विचारसागराचा अत्यंत अल्प अंश मात्र जडसृष्टींत येणें शक्य आहे. हा अल्पसा अंश आमच्या साऱ्या चैनी भागविण्यास पुरेसा होतो, आणि बाकीचा भाग जशाचा तसाच राहतो. त्याला हात लावण्याची छाती कोणास होत नाहीं. सूक्ष्म चैतन्य नेहमींच आमच्या दृष्टिपथाबाहेर राहतें आणि त्याला आपल्या कक्षेंत आणण्यासाठीं आपण केलेली धडपड पाहून तें थट्टेनें हंसत मात्र असतें. या ठिकाणीं महंमदानें उठून डोंगराकडे गेलें पाहिजे, त्याखेरीज दुसरें गत्यंतरच नाही. तेथे ' नाहीं ' म्हणून चालावयाचेंच नाहीं. तें सूक्ष्म चैतन्य जडसृष्टींत ज्या अर्थी येत नाहीं त्या अर्थी मनुष्यानें आपली क्षमता वाढवून त्याच्या सृष्टींत गेलें पाहिजे. तेथील सौंदर्याचा उपभोग ज्याला घ्यावयाचा असेल, तेथील तेजोमयसागरांत ज्याला बुडी मारावयाची असेल आणि खऱ्या विश्वाचें अधिष्ठान व आपण एकच आहों हा अनुभव ज्याला घ्यावयाचा असेल त्यानें त्या रूपाला गेलेंच पाहिजे. याखेरीज दुसरा उपाय येथें नाहीं.

चमत्कारसृष्टीचे दरवाजे उघडण्याची किल्ली ह्मटली म्हणजे ज्ञान हीच आहे. ज्ञानानें पशूचा परमेश्वर बनत असतो, आणि जें जाणलें असतां जाणावयाचें असें कांहींच शिल्लक उरत नाहीं असें जें ज्ञान तें उच्चतम ज्ञान होय. सर्व ज्ञानाचा हा गाभा आहे. फक्त याच ज्ञानाच्या बळावर मनुष्यांना पूर्णत्वाचा अनुभव होतो. पूर्णत्व ह्मणजे काय हें त्याला याच ज्ञानानें जाणतां येतें. या ज्ञानाला ' **ज्ञानानां ज्ञानमुत्तमम्** ' ' **एतज्ज्ञानमिति प्रोक्तमज्ञानं यदतोऽन्यथा** ' असें ज्या भूमीनें म्हटलें ती भूमि धन्य होय. त्या भूमीचें कल्याण असो.

या महातत्त्वाचें प्रत्यक्ष रूप या सृष्टींत क्वचित् दृष्टीस पडतें; तथापि त्याचा समूळ लोप मात्र कधींच होत नाहीं. एका पक्षीं, या अखेरच्या मुक्कामाचा विसर आपणास कधीं पडूं न देणें हें आपलें कर्तव्य आहे. या साध्याकडे आपण झपाट्यानें प्रवास करीत असलों अथवा आपली गति गोगलगाईसारखी मंद असली तरी निदान त्याचा विसर तरी आपणास पडूं नये. दुसऱ्या पक्षीं,

मौज अशी कीं हें साध्य आपल्या नजरेपुढें नित्यशः असतेंच. त्याचा प्रकाश आपल्या डोळ्यांपर्यंत पोंहोंचूं नये म्हणून आपले हात आपल्या डोळ्यांवर आपण धरले तरी त्याचा कांहीच उपयोग न होतां तो प्रकाश आपल्या डोळ्यांत शिरतोच.

आचारसृष्टि ही विचारसृष्टीचें प्रत्यक्ष रूप होय. सर्व आचारसृष्टीच्या पोटीं विचारसृष्टि भरून राहिली आहे. आपण संसाराचे काबाडी होऊन कष्टांचीं ओझीं वाहात असलों अथवा मोठ्या तत्त्ववेत्त्याप्रमाणें विचारांत गुंग होऊन बसलों तरी त्या दोन्ही प्रसंगीं विचाराचें अधिष्ठान असतें. फार काय पण आपली प्रत्येक बरी वाईट कृति आपल्या अखेरच्या साध्याच्या अनुरोधानेंच चाललेली असते. त्याच्या प्रकाशाशिवाय एक पाऊल टाकणेंसुद्धां आपणास शक्य नाहीं. या साध्याच्या प्रकाशाचे किरण सरळ अथवा वक्र रेषेनें प्रत्येक द्वारानें आपल्या अंतरंगांत प्रवेश करीत असतात. कळत अथवा न कळत आपली प्रत्येक कृति त्याच्याच प्रकाशांत घडत असते, आणि ती बरी कीं वाईट हेंही त्याच प्रकाशाच्या साहाय्यानें आपण ठरवीत असतों. आपलें जें कांहीं बरें वाईट रूप आज आहे, तें त्यामुळेंच आहे. त्याचप्रमाणें भविष्यत्कालीं आपणास प्राप्त होणारें रूपही आपल्या साध्याच्या रूपास अनुसरूनच ठरत असतें. आपल्याभोंवतीं आपल्या साध्याच्या शक्तीचें आवरण असून आपल्या सुखदुःखांच्या प्रसंगीं त्याचा अनुभव आपणांस होत असतो. त्याचप्रमाणें आपल्या क्षुद्र अथवा मोठ्या कार्यांत आणि आपल्या सद्गुणांत आणि दुर्गुणांतही त्याचें प्रतिबिंब पडलें आहे.

अशा रीतीनें प्रत्यक्ष अथवा आचारसृष्टीवर आपल्या ध्येयाचा अथवा विचारसृष्टीचा अंमल चालत असतो; पण त्याचप्रमाणें आपल्या आचरणास अनुसरून आपलें ध्येय बनत असतें हेंही ध्यानांत ठेवलें पाहिजे. विचारसृष्टीप्रमाणेंच आचारसृष्टीच्या अंगींही सामर्थ्य आहे. आपलें अखेरचें ध्येय काय आहे याचा खरा निश्चय आपल्या आचरणावरून होतो. आचरणाचा पडताळा पाहून त्यावरून आपलें ध्येय कितपत फलद्रूप होत आहे याचा निर्णय होतो. साध्य मोठ्या विस्तृतरूपाचें असलें तरी आचरणाचे लहान लहान भाग मिळूनच तें बनलेलें असतें. आचरणाच्या निरनिराळ्या भागांचें जें एकीकृत अथवा सामान्यरूप तेंच साध्य अथवा ध्येय.

ध्येयाचें सामर्थ्य आचरणाच्या द्वारें प्रकट होतें. आपल्या आचरणाच्या द्वारेंच त्याच्या सामर्थ्याचें कार्य आपणांवर घडत असतें. ध्येय हें शुद्ध सृष्टींतील असल्यामुळें तें आपल्या जड इंद्रियांच्या कक्षेबाहेर आहे. तेंच आचरणांत येऊं लागलें म्हणजे तें इंद्रियांनींही जाणतां येण्याजोगें होतें, व आपल्या पचनीं पडतें. प्रत्यक्ष आचरणानें साध्याकडे जाणाऱ्या जिन्याच्या पायऱ्या आपण बांधीत असतों. अखेरच्या सिद्धीची सारी आशा या पायऱ्यांवरच अवलंबून आहे. हें पायऱ्या बांधण्याचें कार्य सुरळीत चालत असलें म्हणजे पुढें पाऊल टाकण्यास आपणास मोठें अवसान येतें.

हें आपलें साध्य एकाच जन्मांत जो सिद्ध करतो त्याचें सामर्थ्य लक्षावधि लोकांच्या एकीकृत सामर्थ्याहूनही अधिक आहे. असा मनुष्य केवळ शब्दांनीं आपल्या साध्याचें अत्यंत सुंदर चित्र काढूं शकतो; अथवा अत्यंत सूक्ष्म तत्त्वें सुंदर रीतीनें मांडूं शकतो.

जगांत अनेक प्रकारच्या तत्त्वोपपत्ती आज उपलब्ध आहेत; पण त्यांचा प्रत्यक्ष व्यवहार करणारीं माणसे मिळालीं नाहींत तर या शब्दभांडाराचा उपयोग मनुष्यजातीला कांहींच नाहीं. विचारसृष्टींतून आचारसृष्टींत हीं तत्त्वरत्नें येतील तरच त्यांचा उपयोग. याकरितां उपपत्ति, धर्म आणि व्यवहार यांची फारकत असतां उपयोगी नाहीं. या साऱ्याच उपपत्ती प्रत्यक्ष व्यवहारांत तंतोतंत उतरतील असें नाहीं; तथापि तसें करण्यास धडपडणारीं माणसें असल्याशिवाय त्या साऱ्याच जागच्या जागीं राहतील. प्रत्यक्ष कार्यकारी माणसांच्या अभावीं उत्कृष्ट उपपत्तीही विलयास जातात, आणि ज्यांत तादृश विचारसंपत्ति नाहीं असल्या शुष्क उपपत्ती कार्यकारी माणसांमुळें जगांत कायम राहतात. याकरितां तत्त्व जगावयाचें असेल तर मोठ्या जनसमूहांत त्याचा आचार रूढ केला पाहिजे.

आपली स्वतःची विचारसृष्टि आणि आचारसृष्टि यांतही पुष्कळ अंतर पडतें. आपल्या विचारांप्रमाणें आचार आपण सदोदित करतोंच असें नाहीं. विचार आणि क्रिया यांत पूर्ण एकवाक्यता असणारीं पुण्यवान् माणसें क्वचित् असतात. आमच्यांपैकीं बहुतेकांची मजा अशी होते कीं त्यांचा विचार जों जों अधिक खोल होत जातो तों तों त्यांचें आचारसामर्थ्य कमी होतें, आणि आचरणाकडे लक्ष्य अधिक पोहोंचवावें तों विचार मागें पडूं लागतात. याक-

रितांच पुष्कळ तत्त्ववेत्त्यांना आपलीं तत्त्वें कालाच्या अनंतत्वावर व सृष्टीच्या विस्तारावर मोकळीं सोडावीं लागलीं आहेत. त्यांनीं तत्त्वरत्नें शोधून काढावीं आणि त्यांचा उपयोग प्रत्यक्ष सृष्टींत कितपत होतो हें पाहण्यास अनंत कालाची अपेक्षा करीत बसावें असें झालें आहे. त्यांचें सामर्थ्य विचारांत खर्चून गेलें असल्यामुळें आचाराचें सामर्थ्य असणारीं दुसरीं माणसें येईपर्यंत वाट पाहत बसण्याशिवाय दुसरें गत्यंतरच त्यांस नव्हतें. ही विचारपरंपरा आपल्या चित्तांत येऊन जाते न जाते तोंच एक श्यामसुंदर मूर्ति आपल्या मनश्चक्षूंपुढें उभी राहते. हा पहा पार्थसारथी. पार्थाचा रथ दोन दळांच्यामध्यें उभा आहे. त्या सारथ्याच्या डाव्या हातांत घोड्यांच्या दोऱ्या आहेत. या दोऱ्यांनीं त्या तेजीचें आकलन तो करीत आहे. त्याच्या अंगावर चिलखत आहे. गरुडाप्रमाणें तीक्ष्ण असणारी त्याची दृष्टि दोन्ही दळांवरून फिरत आहे. त्या दोन्ही दळांचें बलाबल काय आहे, हें तो जणुं काय साहजिकपणेंच अजमावीत आहे, आणि अशा भीषणप्रसंगीं त्याच्या मुखांतून '' **कर्मण्यकर्म यः पश्येदकर्मणि च कर्म यः। स बुद्धिमान् मनुष्येषु स युक्तः कृत्स्नकर्मकृत्**'' हे दिव्य उद्गार बाहेर पडून अर्जुनाच्या अंतःकरणावर आदळत आहेत. या उद्गारांत कर्माचें सारें रहस्य आहे.

आपलें अत्युच्च आणि पूर्णस्वरूपाचें साध्य तें हेंच. पण एवढ्या उच्च भागीं क्वचित् एखादा पोहोंचतो. याकरितां एवढी मोठी हांव न बाळगतां जी परिस्थिति उपलब्ध आहे तींतूनच एकएका तत्त्वाचा आचार करणारा एक एक पुरुष पाहून आपल्या साध्याचीं सर्व अंगें त्या सर्वांच्या समीकरणानें पुरीं केलीं पाहिजेत.

अत्यंत मननशील, अत्यंत परोपकारी, अत्यंत धीर वृत्तीचीं आणि आत्मानुभवासाठीं हवें तें धाडस करण्यास तयार असणारीं, अत्यंत निरुपद्रवी आणि अत्यंत नम्र अशीं माणसें धर्म उत्पन्न करूं शकतील.

आपल्या आजच्या प्रतिपादनाचा विषय अशाच प्रकारचा अत्यंत नम्र आणि आत्मानुभवी असा लोकोत्तर पुरुष होता.

पव्हारी बाबा यांचा जन्म काशी प्रांतीं गुझी नांवाच्या गांवाजवळील एका खेड्यांत एका ब्राह्मणकुलांत झाला होता. पव्हारीबाबा यांचा चुलता गाझीपूर येथें राहत असे. विद्याभ्यासासाठीं बालवयांतच ते चुलत्यापाशीं येऊन राहिले.

संसारापासून पराङ्मुख केवळ धर्मसाधनाकडे जे आपला सारा वेळ खर्च करतात, त्यांत मुख्यतः संन्यासी, योगी, बैरागी आणि पंथी इतके प्रकार आहेत. श्रीमत् शंकराचार्यांच्या अद्वैत मताला अनुसरणारे ते संन्यासी. निरनिराळ्या प्रकारचीं योगसाधनें करणारे ते योगी. हेही प्रायः अद्वैतमतीच असतात. बैरागी हे बहुधा द्वैतमार्गी असून श्रीरामानुजादि आचार्यांचे ते चेले असतात. पंथी हे द्वैती आणि अद्वैती अशा दोन्ही मार्गांतील असून ही शाखा मुसलमानांच्या अंमलांत जन्मास आली. पव्हारी बाबांचा चुलता रामानुजपंथी असून तो नैष्ठिक ब्रह्मचारी होता. आजन्म ब्रह्मचर्य पाळण्याची शपथ घेणें याचें नांव नैष्ठिक ब्रह्मचर्य. गाझीपूरच्या उत्तरेस दोन मैलांवर त्याच्या मालकीची थोडीशी जमीन गंगातटाकीं होती. त्याच्या घरीं दुसरींही नात्याचीं मुलें अभ्यासाकरितां राहिलीं होतीं. पव्हारी बाबांस दत्तक घेऊन त्यांना आपल्या मिळकतीचें मालक करावें अशा हेतूनें त्यानें पव्हारी बाबांस आपल्या घरीं आणून ठेविलें.

पव्हारी बाबांच्या या वेळच्या आयुष्यक्रमाबद्दल फारशी माहिती उपलब्ध नाहीं; आणि ज्या गुणांनीं ते पुढें प्रसिद्धीस आले, त्या गुणांचा स्पष्ट उदय या काळीं झाला असावा असेंही दिसत नाहीं. व्याकरण आणि न्याय यांचा अभ्यास पव्हारी बाबांनीं फार मन लावून केला व त्याच वेळीं आपल्या पंथाचीं तत्त्वेंही ते पढले. पव्हारी बाबा लहानपणीं मोठ्या आनंदी वृत्तीचे व थोडेसे व्रात्य होते. कित्येक वेळां त्यांचा व्रात्यपणा त्यांच्या सहाध्यायांच्या प्रत्ययास प्रत्यक्ष येत असे.

अशा रीतीनें सामान्य हिंदी विद्यार्थ्यांप्रमाणेंच त्यांचा लहानपणचा काल ठरींव रीतीच्या विद्याभ्यासांत गेला. फरक इतकाच कीं सामान्य विद्यार्थ्यांहून ते अधिक मेहेनती असून अनेक भाषा शिकण्याची आवड त्यांस विशेष होती. तथापि पुढें ज्या लोकोत्तर गुणांचा उदय त्यांच्या आयुष्याच्या उत्तर भागांत झाला त्यांचा मागमूससुद्धां या काळीं त्यांच्या ठिकाणीं दिसला नाहीं, असें म्हणण्यास प्रत्यवाय नाहीं.

याच वेळीं जी एक गोष्ट घडली तीमुळें पव्हारी बाबांचें लक्ष्य पुस्तकांतून निघून अधिक गंभीर विचारांकडे वळलें. मानवी जीविताचा अंतिम हेतु काय याचा विचार ते करूं लागले. आपलें मानसिक क्षेत्र खोल दृष्टीनें ते

तपासून पाहूं लागले. केवळ पुस्तकी ज्ञानांतून निघून त्यांचें मन धर्मानुभवाकरितां आतुर होऊं लागलें. त्यांचा चुलता मृत्यु पावला. चुलत्याच्या ठिकाणीं त्यांचें निर्व्याज प्रेम होतें, यामुळें त्याच्या मरणानें त्यांना अत्यंत दुःख झालें यांत नवल नाहीं. पण तेंच प्रेम अचल वस्तूला अर्पण करण्याचा निश्चय त्यांनीं केला.

गुरुमुखावांचून कोणतीही विद्या साध्य होत नाहीं असा आम्हां हिंदूंचा समज आहे. ग्रंथांचें कार्य विषयाच्या दिग्दर्शनापलीकडे नाहीं असें आमचें मत आहे. रहस्य म्हटलें म्हणजे तें गुरूपासूनच शिष्यांला प्राप्त व्हावयाचें. हा नियम सर्व प्रकारच्या विद्यांस लागू आहे, आणि धर्माच्या बाबींत तर गुरुशिवाय सद्गतिच नाहीं.

एकांतवासांत राहून सूक्ष्मसृष्टीचा अभ्यास करण्याची चाल हिंदुस्थानांत कधीं पडली, याचें स्मरणही आतां कोणास नाहीं, इतकी ती प्राचीन झाली आहे. एखाद्या महात्म्याच्या वासानें पवित्र झाली नाहीं, अशी एकही गुहा अथवा असें एकही अरण्य हिंदुस्थानांत तुम्हांस सांपडावयाचें नाहीं. 'वाहण्यानें पाणी आणि चालण्यानें साधु पवित्र होतो ' अशा अर्थाची एक म्हण हिंदुस्थानांत आहे. नैष्ठिक ब्रह्मचर्याचा अंगिकार केलेले साधू यात्रा करण्यांत पुष्कळ काळ खर्च करीत असतात. अशा रीतीनें स्वतःचें धर्मशिक्षण ते संपादितात; एवढेंच नव्हे तर आपल्या प्रवासांत धर्मज्ञानाचा प्रसार दारोदार आणि गांवोगांव ते करीत असतात. चारी धामाच्या यात्रा करणें हें प्रत्येक त्याग्याला अत्यावश्यक मानलें जातें.

आपल्या तरुण ब्रह्मचाऱ्याच्या मनांत या साऱ्या गोष्टी आल्या असतील. पण विशेषतः ज्ञानाची उत्कंठा त्याला फार होती. पव्हारी बाबा यांस द्राविडी भाषांचें ज्ञान चांगलें होतें आणि रामानुज पंथाचे बरेचसे ग्रंथ द्राविडी भाषांत लिहिले आहेत, यामुळें द्राविड देशांत त्यांच्या प्रवासाचा बराच काळ गेला असावा असें अनुमान करण्यास हरकत नाहीं. त्याचप्रमाणें चैतन्यपंथाचे ग्रंथ ज्या जुन्या बंगाली भाषेंत आहेत तिचें ज्ञानही त्यांस चांगलें असल्यामुळें बंगाल्यांतही त्यांचा मुक्काम बराच काळ असावा.

काठियावाड प्रांतीं असलेल्या गिरनार पर्वताच्या यात्रेला पव्हारी बाबा गेले असतां तेथें त्यांस योगदीक्षा मिळाली असें त्यांच्या मित्रांचें म्हणणें आहे.

बौद्धधर्मी लोकही गिरनार पर्वताला पवित्र मानतात. या पर्वताच्या पायथ्याशीं एका मोठ्या शिलेवर अशोकराजाचा एक लेख कोरलेला आहे. आजूबाजूस अरण्यानें व्याप्त असा प्रचंड स्तूपांचा मोठा समुदाय आहे. बौद्ध धर्म हा जैन धर्माची एक संशोधित आवृत्ति आहे असें कित्येकांचें ह्मणणें आहे. बौद्धधर्माचा प्रसार हिंदुस्थानाच्या बाहेर फार झाला; पण खुद्द त्याच्या जन्मभूमींत तो हिंदुधर्माच्या पोटांत गडप झाला. गिरनार हें ठिकाण जैनाचेंही पवित्र स्थान आहे.

अवधूत गुरु श्रीदत्तात्रेय यांचा वास गिरनार पर्वतावर होता अशी आख्यायिका आहे. कोणी परम भाग्यवान् असला तर त्याला महायोग्यांचें दर्शन अद्यापिही तेथें होतें अशी लोकवार्ता आहे.

गिरनार येथून पव्हारी बाबा निघाले, ते गंगातटाकीं असलेल्या काशी जवळील एका स्थळीं आले. त्या ठिकाणीं एका गुहेंत राहणाऱ्या योग्याचें शिष्यत्व त्यांनीं पतकरलें. हा योगी एका खोल गुहेंत राहत असे. त्या वेळीं लागलेल्या संवयीप्रमाणें पव्हारी बाबाही पुढें गाझीपूर येथें गंगातटाकीं एक खोल बोगदा पोखरून त्यांत राहूं लागले.

राहण्याकरितां गुहा पसंत करण्याचा परिपाठ योग्यांना फार प्राचीन काळापासून आहे. गुहेंत हवेचें मान बहुधा एकसारखें असतें. त्यांत शीतोष्णाचा मोठा फरक होत नाहीं; यामुळें योगाभ्यासाला अशा जागा प्रशस्त मानिल्या जातात.

अशा रीतीनें इकडे योगाभ्यास चालू असतां पव्हारी बाबा काशी येथें जाऊन एका संन्याशापाशीं अद्वैतमताचें अध्ययनही करीत असत.

चारी धामाच्या यात्रा, योगाभ्यास आणि अद्वैतमताचें परिशीलन यांत बरींच वर्षे घालविल्यानंतर पव्हारी बाबा आपल्या पूर्वस्थळीं पुन्हां आले. या स्थितींत त्यांच्या चुलत्यानें त्यांना पाहिलें असतें तर " मुला, तुझ्या चेहऱ्यावर ब्रह्मतेज झळकत आहे " असे उद्गार त्यानें निःसंशय काढले असते. पण त्यांचें तेज पाहण्यास त्यांचा चुलता हयात नव्हता. गाझीपूर येथें त्यांचे बाळमित्र मात्र त्यांस भेटले; पण ते शुद्ध संसारी व क्षुद्र विचारांत गर्क असल्यामुळें पव्हारी बाबांचें कौतुक त्यांस वाटलें नाहीं.

तथापि पव्हारी बाबांच्या ठिकाणीं कांहीं तरी असामान्य गुण आहे अशी त्यांची खात्री पटून त्यांजबद्दल त्यांस आदर वाटूं लागला. हा आपला पूर्वीचा समवयस्क खेळगडी राहिला नाहीं अशी त्यांची खात्री पटली. तथापि आपल्या स्नेह्याच्या ठिकाणीं हा बदल कशानें झाला हें जाणण्याची जिज्ञासा त्यांस झाली नाहीं. त्यांच्या ठिकाणीं एवढी आतुरता नव्हती. केवळ लौकिक दृष्टीच्या आणि संसाराच्या बाहेर तो गेला आहे व यापुढें जगाची उपाधि त्याला बाधा करूं शकणार नाहीं एवढें मात्र त्यांस समजलें. पण या फरकाचें रहस्य त्यांच्या ध्यानीं आलें नाहीं व तें जाणावें अशी तादृश इच्छाही त्यांस झाली नाहीं. यामुळें अधिक चौकशीच्या भानगडींत न पडतां य संसारातीत स्नेह्याचा आदर ते करूं लागले.

पव्हारी बाबांचे विशिष्ट गुण हळुहळू अधिक स्पष्टदशेस येऊं लागले. एक खोल भुयार त्यांनीं तयार केलें व त्यांत तासांचे तास ते घालवूं लागले. यानंतर मोठ्या खडतर तपश्चर्येस त्यांनीं सुरवात केली. विलक्षण निग्रहाची तालीम ते करूं लागले. त्यांचे यमनियम प्रथम खाण्याच्या बाबतींत सुरू झाले. आपल्या लहानशा आश्रमांत दिवसभर त्यांनीं काम करावें. प्रभु श्रीरामचंद्राची पूजाअर्चा करावी. उत्तम स्वयंपाक तयार करून प्रभूला नैवेद्य करावा. त्यांना पाकक्रिया उत्तम येत असे असें म्हणतात. प्रभूचा सर्व नैवेद्य आपल्या मित्रांस, अतीत अभ्यागतांस व गरीबदुबळ्यांस अर्पण करावा. रात्र पडेपर्यंत सर्वांची सेवाचाकरी करावी. सर्व मंडळी झोंपीं गेली म्हणजे बाबांनीं नदीतटाकीं जाऊन पोहत पलीकडे जावें व तेथें पहांट होईपर्यंत अभ्यास करावा. अरुणोदयापूर्वीं पुन्हां परत येऊन सर्व मंडळीस त्यांनीं जागें करावें व आपल्या नित्य सेवेस पुन्हां सुरवात करावी असा त्यांचा क्रम सुरू झाला. अशा रीतीनें परसेवेचें व्रत त्यांनीं स्वीकारलें.

स्वतःचा आहार ते तोडूं लागले, आणि अखेरीस केवळ मूठभर निंबाच्या पाल्यावर तो त्यांनीं आणून ठेवला होता असें सांगतात. कित्येक वेळां निंबाच्या पाल्याऐवजीं दहा पांच लाल मिरच्या ते भक्षण करीत. पुढें नदीपलीकडे जाणें त्यांनीं हळुहळू सोडून दिलें व आपल्या भुयारांत अधिकाधिक काळ ते घालवूं लागले. दिवसच्या दिवस आणि महिनेच्या महिने ते भुयाराबाहेर येईनासे झाले. हा सारा काळ ते समाधींत मग्न असत. या

साऱ्या काळांत ते काय खात असत आणि कसे जगत याची माहिती कोणासही नव्हती. ते वायुभक्षण करतात असें समजून त्यांचें नांव पव्हारी बाबा असें लोकांनीं ठेवलें. पव्हारी म्हणजे पवनाचा आहार करणारे.

त्या भुयारांत कायमचा वास त्यांनीं स्वीकारला. एके वेळीं दीर्घ काळ लोटला असतांही बाबा बाहेर आले नाहींत तेव्हां बाबांनीं इहलोकची यात्रा संपविली असावी असा तर्क लोक करूं लागले; तों अकस्मात् एके दिवशीं बाबांची स्वारी दत्त म्हणून उभी राहिली व त्या दिवशीं मोठा भंडारा करून बाबांनीं पुष्कळ साधूंस जेवूं घातलें.

बाबा समाधिसुखांत मग्न नसले म्हणजे भुयाराच्या तोंडाशीं असलेल्या खोलींत येऊन बसत आणि या वेळांत पुष्कळांस त्यांच्या दर्शनाचा लाभ घडे. बाबांची कीर्ति हळुहळू पसरत चालली. गाझीपूर येथील सरकारी अफूच्या खात्यांतील राय गगनचंद्र राय बहादुर यांच्या मेहेरबानीनें बाबांच्या दर्शनांचा योग आम्हांस आला. राय गगनचंद्र हे गृहस्थ फार सालस, उदार आणि धर्मशील असल्यामुळें ते लोकांस फार प्रिय झाले आहेत.

बाबांच्या चरितांत बाह्य आचारविचारांची अथवा उपदेशाची चळवळ दिसून आली नाहीं. हिंदुस्थानांतील पुष्कळ सत्पुरुष अशाच शांत व अबोल वृत्तीनें राहत असतात. लोकांस जें कांहीं शिकवावयाचें तें तोंडाच्या बडबडीनें शिकवावयाचें नसून प्रत्यक्ष आचरणानें शिकवावयाचें हा हिंदूंच्या प्राचीन शिक्षणपद्धतीचा विशेष कटाक्ष आहे. सत्पुरुषाचें नुसतें आचरण पाहून त्याचें रहस्य जाणण्याचें ज्ञान ज्याला असेल तो त्यापासून लाभ करून घेतो व इतरेजन असतात ते पूर्वीसारखे कोरेच राहतात. स्वतःच्या ज्ञानाचा बाजार घालावयाचा ही गोष्ट बाबांसारख्या वृत्तीच्या सत्पुरुषांस अत्यंत अप्रिय असते. कारण ज्ञानाच्या नुसत्या गोष्टी ऐकून मनुष्याला ज्ञान होत नसून अंतर्गत यमनियमांनीं तयार झालेल्या बुद्धीला ज्ञान आपोआप भेटतें अशी त्यांची खातरी असते. ज्ञानाची भेट शब्दांनीं होत नसून क्रियेनें होत असते हें त्यांस ठाऊक असतें. लोकव्यवहार चालू राखण्यापुरतें धर्माचरण असे सत्पुरुष करीत नसून या एकाच जीवितांत सत्याची प्रत्यक्ष भेट घेणें हें त्यांचें कार्य असतें व या कार्यपूर्तीकरितां ते अट्टहास करीत असतात.

धर्माचरणाला अमुक काल विहित अथवा अमुक काल अविहित असतो असें त्यांस वाटत नाहीं. त्यांना सर्वकाल सारखाच विहित वाटतो. हरीच्या

दासाला दाही दिशा आणि सर्व काल शुभच होय. ' **याच देहीं याच डोळां। पाहीन मुक्तीचा सोहळा ॥**' अशी त्यांची प्रतिज्ञा असते. मरेपर्यंत वाट पाहण्याची फुरसुद त्यांना नसते.

' महाराज, मुमुक्षु जनांना उपदेश करण्यासाठीं आपण गुहेबाहेर कां पडत नाहीं' असा प्रश्न प्रस्तुत लेखकानें त्यांना केला, तेव्हां आपल्या नेहमींच्या विनयशील व विनोदी पद्धतीनें बाबा म्हणाले:—

" कोणा एका दुष्ट मनुष्यानें कांहीं वाईट कृत्य केल्यामुळें शिक्षा म्हणून त्याचें नाक कापण्यांत आलें.असलें निर्नासिक अशुभ तोंड लोकांस दाखविण्याची लाज त्याला वाटून तो रानांत पळून गेला आणि व्याघ्रासन घालून त्यावर बसून राहिला. कोणी माणूस आल्याचा भास होतांच तो समाधींत मग्न झाल्याचें सोंग करून स्तब्ध बसे. हळु हळु त्याची कीर्ति लोकांत पसरूं लागली आणि या महा-साधूच्या दर्शनासाठीं लोकांच्या झुंडीच्याझुंडी येऊं लागल्या. अशा रीतीनें त्या अरण्यांत राहूनही त्याची चैन चालू झाली. अशा रीतीनें कित्येक वर्षांचा काळ लोटला. त्यानें नेहमीं समाधीत डुलत बसावें, आणि कधींही तोंड म्हणून उघडूं नये. शेवटीं या महासाधूचा थोडा तरी उपदेश ऐकावा म्हणून लोक फार उत्सुक झाले. एका तरुणाला तर महाराजांचें शिष्यत्व पत्करावें अशीही उत्कंठा लागली. अखेरीस लोकांची उत्सुकता इतकी वाढली कीं आतां आपण कांहीं तरी बोललों नाहीं तर आपली झालेली कीर्ति हातची खास जाते असें त्यास दिसून आलें. तेव्हां आपली मूकवृत्ति सोडून त्या तरुणाला तो म्हणाला, "अरे उद्यां एक तीक्ष्ण धारेचा वस्तरा बरोबर घेऊन ये." गुरुमहाराजांची आज्ञा ऐकून त्या तरुणाला मोठा आनंद झाला, आणि दुसरे दिवशीं भल्या पहांटेस एक तिखट धारेचा वस्तरा घेऊन तो गुरूसमीप आला. गुरुमहा-राजांनीं त्याला एका आडोशाच्या जागीं नेलें आणि एका झटक्यासरशी त्याचें नाक कापून म्हटलें, " तरुणा माझी दीक्षा मला अशाच रीतीनें मि-ळाली. तेव्हां तीच मींही तुला दिली. आतां संधि सांपडेल त्या वेळीं तूंही ती लोकांस देण्यास कमी करूं नको." आपल्या नकटेपणाची लाज वाटून तो तरुणही तेथून नाहींसा झाला व शक्य असेल तेव्हां दीक्षेच्या नांवा-खालीं लोकांचीं नाकें कापूं लागला. अशा रीतीनें नकट्या साधूंचा एक नवाच पंथ निर्माण झाला. मीही अशाच रीतीनें असल्या एखाद्या पंथाचें पितृत्व स्वीकारावें अशी का तुमची इच्छा आहे ?"

थोडा वेळ गेल्यानंतर गंभीरस्वरानें बाबा म्हणाले, " शारीरिक मदत करणें हाच काय तो मदतीचा मार्ग आहे, अशी तुमची समजूत आहे का? आपलें शरीर जागचें न हालवितां एक मन दुसऱ्या मनास मदत करूं शकत नाहीं का? शरीर यत्किंचित्‌ही न हालवितां मदत करतां येणें शक्य नाहीं का?"

दुसऱ्या एका प्रसंगीं बाबांना मीं म्हटलें "आपण एवढे महायोगी असतां कोणतेंही कर्म करण्याची जरूर आपणास काय आहे? श्रीरघुपतीची पूजा करणें अथवा वैश्वदेव करून आहुती देणें या कृत्यांची जरूरी आपणासारख्यांस काय आहे? सामान्य नवशिक्यांकरितां हीं कर्में आहेत." यावर बाबा म्हणाले " कोणीही जें कर्म करतो तें केवळ स्वकल्याणासाठींच तो करतो असें तुम्ही गृहीत कां धरतां? तें तो दुसऱ्याकरितांही करीत असेल. दुसऱ्याकरितां एखादें कर्म एखाद्याला करतां येत नाहीं काय? "

एकेवेळीं एक चोर बाबांच्या आश्रमांत शिरला आणि तेथील कांहीं सामानाचें गांठोडें त्यानें बांधलें. आतां तो पळणार इतक्यांत बाबा त्याच्या नजरेस पडले. त्याबरोबर घाबरून जाऊन गांठोडें टाकून तो पळत सुटला. तेव्हां तें गांठोडें उचलून बाबाही त्याच्यामागें धावत सुटले. अशा रीतीनें हा पाठलाग कोस दोन कोस चालल्यावर बाबांनीं त्या चोराला गांठून तें गांठोडें त्याच्या पायापाशीं ठेवलें आणि सद्गदित स्वरानें त्याला म्हटलें; " भल्या माणसा, तुझ्या कर्मांत मीं व्यत्यय आणला याबद्दल मला क्षमा कर. हें गांठोडें तूं घेऊन जा एवढीच माझी तुला हात जोडून प्रार्थना आहे. ही मालमत्ता माझी नसून तुझी आहे. याकरितां तूं ती घेऊन जाणें हेंच रास्त."

एके वेळीं बाबांना एका मोठया नागानें दंश केला. बाबा बराच वेळपर्यंत बेशुद्ध होते. त्यांचें प्राणोत्क्रमण झालें असेंही लोकांस वाटूं लागलें. इतक्यांत खडबडून जागी झाल्यासारखी बाबांची स्वारी उठून बसली आणि बाजूच्या मंडळीस म्हणाली रघुपतीनें आपला दूत नागाच्या रूपानें पाठविला होता."

बाबांच्या अव्यभिचारी भक्तीचा आणि प्रेमी स्वभावाचा विचार करतां सर्पही त्यांना रामदूत वाटला यांत नवल नाहीं. कसलाही रोग त्यांना झाला तरी तोसुद्धां त्यांना रामदूतच वाटे, एवढेंच नव्हे तर त्या रोगाला कोणीं कांहीं वाईट नांव दिल्यास तेंही त्यांना खपत नसे. एखादा रोग इतका त्रासदायक असे कीं त्यापासून त्यांना भयंकर यातना होत; तथापि तो रोगही रामदूतच.

बाबांच्या या प्रेमळस्वभावाचा परिणाम आजूबाजूच्या मंडळीवरहि झाला होता. गाझीपूरच्या आजूबाजूच्या खेड्यांतून ज्यांनीं प्रवास केला असेल त्यांना बाबांच्या या कार्याचा प्रत्यय खचित आला असेल.

अखेरी अखेरीस बाबा कोणाच्याही नजरेस पडत नसत. आपल्या खोल भुयारांतून ते केव्हां बाहेर आले तरी गुहेचें दार लावून त्या मागें बसत. ते यज्ञ करीत तेव्हां अग्नींत दिलेल्या आहुतींचा जो धूर बाहेर येई त्यावरून बाबा बाहेर आले आहेत असा तर्क लोक करीत इतकेंच.

कोणतेंही काम हातीं असो, बाबा त्यांत पूर्ण गक झालेले दिसत. काम कितीही क्षुल्लक असलें तरी तें ते मनापासून करीत. श्रीरघुपतीची पूजा जितक्या काळजीनें करावयाची तितक्याच काळजीनें भांडींही घांसावयाचीं. कर्माचें रहस्य काय या प्रश्नाचें उत्तर म्हणून बाबा म्हणाले, “ साधनांची फार काळजी घेणें आणि साध्या इतकेंच त्यांजवर प्रेम करणें ही होय. ”

स्वभावानें बाबा फार लीन होते; पण लीनपणा म्हणजे स्वत्व विसरणें असा अर्थ मात्र नव्हे. दु:खाखालीं चूर झालेला, काळजीनें मृत्पिंड बनलेला आणि स्वत्व विसरून एखादा स्वार्थ पोटीं बाळगणारा मनुष्यही बाह्यत: लीन दिसतो. पण बाबांचा लीनपणा असा तमोगुणप्रधान नव्हता. ‘ **सदानंदरूप: शिवोऽहं शिवोऽहम्** ’ ही जाणीव ज्यांत पूर्णतेला गेली आहे असा तो लीनपणा होता. “ जे अकिंचन आहेत त्यांचा खजिना परमेश्वर. ‘माझें’ ही भावना ज्यांच्या चित्तांतून गेली आहे, ‘ माझा जीव ’ म्हणण्याइतकेंही ‘ माझें ’पण ज्यांच्या ठिकाणीं नाहीं त्यांचें सर्वस्व रघुपति आहे ” असें बाबा म्हणतात.

‘ मी श्रोत्रीय ही भावना बाबांच्या ठिकाणीं कधींच उदय पावली नाहीं. मी गुरु आणि हे शिष्य हा कमी अधिकपणाही त्यांनीं कधीं दाखविला नाहीं. वेदान्ताचीं गूढ प्रमेयें बोलतांनाही आपल्या स्नेही मंडळीबरोबर चार शिळोप्याच्या गोष्टी बोलाव्या त्याप्रमाणें ते तीं बोलत. ते आधीं फार बोलतच नसत. पण एक वेळ त्या वाग्झरीला भरती आली कीं ज्ञानगंगेचे लोटच्या लोट वाहूं लागत. ‘ **सिद्ध प्रज्ञेचेन लाभें । मनचि सारस्वतें दुभे । सकल शास्त्रें स्वयंभें । निघती मुखें ॥** ’ असा अनुभव श्रोत्यास होऊन तो आनंदसागरांत पोहूं लागावयाचा. तथापि यांत सुद्धां विचारलेल्या प्रश्नांना सरळ

उत्तर असे असें नाहीं. तुमच्या साऱ्या प्रश्नांना त्या भाषणांत गर्भित उत्तर सुचविलेलें असावयाचें.

शरिरानें बाबा उंच काठीचे पुष्ट होते. त्यांना एकच डोळा होता आणि खऱ्या वयाहून ते बरेच लहान दिसत. त्यांच्या इतका गोड आवाज क्वचितच कोणाच्या ऐकण्यांत आला असेल. शेवटचीं दहाबारा वर्षे बाबा कोणाही माणसाच्या नजरेस पडले नाहींत. थोडे बटाटे आणि लोणी हे पदार्थ त्यांच्या भुयाराच्या दाराबाहेर ठेवीत आणि रात्रींच्या वेळीं बाबा समाधींत नसले तर हे पदार्थ ते आंत नेत. ते भुयाराच्या खोल भागांत असत त्या वेळीं इतके पदार्थही त्यांस लागत नसत.

अशा रीतीनें अत्यंत पवित्रतेनें, लीनपणें आणि भक्तीनें पूर्ण असें हें जीवनचरित चालू होतें. बाबा म्हणजे मूर्तिमंत योगच होत.

गुहेबाहेर धूर येऊं लागला म्हणजे बाबा याग करीत असल्याची खूण पटे हें वर सांगितलेंच आहे. एके दिवशीं असाच धूर निघूं लागला व त्यांतच मांस जळत असल्याची घाण येऊं लागली. आंत काय प्रकार चालला आहे याचा अजमास कोणासही होईना. शेवटीं मांसाची घाण फारच येऊं लागली व धुराचे लोटच्या लोट बाहेर पडूं लागले, तेव्हां लोकांनीं गुहेचें कवाड फोडलें; तेव्हां बाबांनीं स्वतःच्या देहाची अखेरची आहुति दिली असल्याचें त्यांस आढळलें. थोड्याच वेळांत बाबांच्या अस्तित्वाचा अखेरचा अवशेष राखेच्या रूपानें तेथें राहिला.

" मोठ्यांच्या कृत्यावर टीका करूं जाणें हें मौर्ख्यांचें लक्षण आहे; कारण मोठयांचीं कृत्यें सामान्यांहून फार वेगळीं असतात, आणि त्यांचीं कारणें सामान्य मानवी बुद्धीच्या बाहेरचीं असतात," ही कालादासाची उक्ति येथें ध्यानांत ठेवली पाहिजे.

आपला देहावसानसमय आला ही गोष्ट बाबांस कळली असेल आणि देहपातानंतरही आपला उपसर्ग कोणास लागूं नये या इच्छेनें हा शेवटचा आर्यपद्धतीचा होम त्यांनीं केला असेल अशीही कल्पना संभवते.

या महासाधूचे उपकार प्रस्तुत लेखकावर फार झाले आहेत आणि त्या महाब्रह्मनिष्ठाच्या स्मरणार्थ या कशाबशा चार ओळी त्यानें खरडल्या आहेत. या साधुवर्याच्या ठिकाणीं प्रस्तुत लेखकाची मोठी भक्ति होती आणि आपल्या हातुन त्याची सेवा थोडीबहुत घडली यांत तो स्वतःस धन्य समजतो.

# विश्वप्रेम.

[ एका मित्रास. ]

१

श्लोक [ स्रग्धरावृत्त. ]

अंधारा तेज जेथें म्हणति समजती दुःख ते सौख्यभोग
आरोग्याचेंच जेथें प्रगट मिरवती सोंग घेवोनि रोग ।
दावीतें अर्भकाचें मुळुमुळु रडणें फक्त चैतन्य भास
तेथें सुज्ञा ! सुखाची वद वद वद तूं काय रे काय आस ॥

२

युद्धस्पर्धाच जेथें अनुदिनिं सखया सारखीं चालतात
ताताला शत्रु जेथें तनय समजतो शत्रु पुत्रास तात ।
माझें माझें म्हणोनी पडति निजहितीं गुंतुनी आदि अंतीं
बाबा शोधोनि तेथें चुकुनि तरि तुला काय लाभेल शांती ॥

३

श्लोक [ शार्दूलविक्रीडित वृत्त. ]

स्वर्गाचें नरकांत मिश्रण असा प्रत्यक्ष लोकीं पहा
मायानिर्मित कोण पार उडुनी जाईल संसार हा ।
कर्माची जड शृंखळा जखडुनी तत्पाश लागे गळां
ऐसा कोण गुलाम निर्भय अशा जाईल अन्य स्थळां ॥

४

भोगीं इंद्रियभोग योगाहि करीं धर्मे गृहस्थाश्रम
संन्याशी सजलों कुबेर बनलों साधूनि भक्तिक्रम ।
केला त्याग तपें बहू वळविलें मच्चित्त माझ्या मतें
झालें सर्व परी नवीन शिकलों जें ज्ञान तें कोणतें ॥

५

श्लोक [ स्रग्धरा वृत. ]

सौख्याचा ह्यांत नाहीं खचित खचित कीं बिंदुही एक साचा
पेला हा जन्म केला निवळ समज तूं ग्रीसच्या *टॉंट्लसाचा ।
जों जों होशी मनानें अधिक अधिक तूं शुद्ध चित्तें उदार
दुःखाचा थोर वांटा तंव तंव मिळुनी मस्तकीं होय भार ॥

६

श्लोक [ पृथ्वीवृत्त. ]

उदारचरिता बसें स्वहित सोडुनी तूं उगी
पुरें समज मानसीं स्थळ तुला नसे या जगीं ।
प्रचंड जड लोह तें प्रखर घाय साहे शिरीं
अघात करि काय तो सहन बाहुली काश्मिरी ॥

७

श्लोक [ शार्दूलविक्रीडितवृत्त. ]

बाबा होशिल सत्त्वहीन पुतळा तूं मृत्तिकेचा जरी ।
तोंडीं पीयुष ठेवुनी विष भरीं तूं सर्वही अंतरीं ।
स्वार्था सोडुनि सत्य होइन असें आहे तुला का बळ
संसारीं तरि ह्या खुशाल तुजला हर्षें मिळेल स्थळ ॥

८

श्लोक [ स्रग्धरावृत्त. ]

मी तों ज्ञानार्जनाला भुलुनि बहुपरी प्राण ठेवीं गहाण
गेलें ऐशा रितीनें खरचुनि सखया अर्ध आयुष्य जाण ।

*ही एक ग्रीक दंतकथा आहे. टॉट्लस म्हणून लीडियाचा एक राजा होता. त्यानें नेहमीं क्षुधातृषाक्रांत असावें, अशी देवानें त्यास शिक्षा दिली होती. पाण्यानें कांठोकांठ भरलेले प्याले त्याला दिसावेत, पण ओंठ जवळ नेतांच ते नाहींसे व्हावेत. अनेक फळें आणि पक्वान्नें त्याच्यासमोर सदोदित दिसावींत, पण तो हात लावूं लागला कीं तीं नाहींशी व्हावींत !

प्रेमासाठींच वेडा बनुनि भटकलों दाविल्या बाललीला
भ्रांतीनें कैक वेळां कवळुनि धरिलें घट्ट मीं सावलीला ॥

९

धर्मासाठीं पहा मीं सकल परिशिले जाउनी पंथ कानीं
हिंडें रानीं वनींही बसुनी गिरिदरीं वास केला स्मशानीं ।
गेलों गंगातटाकीं किततरि सरिता वंदिल्या स्नानपानें
हर्षें वर्षानुवर्षें दिवस ढकलिले शुद्ध भिक्षाशनानें ॥

१०

नाहीं आधार चिंध्या मळकट शरिरीं शुद्ध ऐसा भिकारी
भक्षीं जें काय हातीं नियमित पडतें रोज हिंडूनि दारीं ।
कष्टानें या तपाच्या झिजुनि झिजुनियां हालतो देह वातें
जन्मा येवोनियां मीं म्हणसि मिळविलें कोणत्या वैभवातें ॥

११

श्लोक [ शार्दूलविक्रीडित वृत्त. ]

तेंही सांगतसें सख्या मन तुला ठेवोनियां मोकळें
जन्मा येउनि सत्य एक मजला अत्युच्च ऐसें कळे ।
आवर्तीं फिरुनी भराभर धके खाती भवाच्या जरी
व्हाया पार तयार त्यांसहि असे नौका बरीशी तरी ॥

१२

प्राणायाम करा महाव्रत धरा पूजाहि बांधा कधीं
जोडा भक्तिपथा तथा हरिकथा ऐसे विधीचे निधी ।
चित्तीं हा तुमच्या सदा भ्रम पहा माजूनि राहे उगी
भक्तिप्रेम सदैव एकच असे सद्वस्तु साऱ्या जगीं ॥

१३

ब्रह्मामाजि जिवाशिवांत मनुजीं कीं ईशहृत्संपुटीं
भूत प्रेत पिशाच ह्यांतहि असे सर्वत्र सर्वांघटीं ।
तिर्यङ्‍ योनिंत कीं सुरासुरनरीं पूर्वीच जें वाटलें
सर्वांच्या हृदयीं भरूनि अवघें हें प्रेम कोंदाटलें ॥

१४

देवाचा अधिदेव सांग दुसरा प्रेमाविणें कोण रे
विश्वा चालक अन्य कोण म्हणसी तो सांग पाहूं बरें ।
माता दे निज जीव चोरहि जगीं प्रेमार्थ चोरी करी
एक प्रेम गती अखंड असती ह्या दोन त्याला तरी ॥

१५

श्लोक [ स्रग्धरा वृत्त ]

आटोपेना मनाला बहुत पलिकडे बोलवेनाच वाचे
कांहीं कोणास होवो सुख असुख असो त्यांत वात्सल्य त्याचें।
सत्तासामर्थ्यधारी नियमित समयीं तेंच संहारकारी
कालीमाताहि होतें सदयहृदय तें होउनी देहधारी ॥

१६

श्लोक [ शार्दूलविक्रीडित वृत्त ]

धर्माधर्म वियोग रोग विपदा सत्कर्म दुष्कर्महीं
सर्वांचे परिपाक होउनि विधी व्यापून गेली मही ।
झाले तेच अनेक पंथ पुढती तत्पूजनाचेच रे
ऐसे कोण करील जीव अपुल्या साठींच सांग बरें ॥

१७

श्लोक [ भुजंगप्रयात वृत्त ]

सुखाचा करी शोध जो तो अभिष्ट
विपत्ती बळें मागतो बुद्धिनष्ट ।
टपे मृत्युला तो करी चूक मोठी
चिरंजीव होईन ही हांव खोटी ॥

१८

श्लोक [ पृथ्वीवृत्त ]

मनोरथ भले भले बहुत युक्तिनेंही रचा
प्रवास वरती करा बसुनि दूरचा दूरचा ।

तरी दशदिशांसही भवसमुद्र दृष्टी पडे
अखंड सुखदुःख हें भ्रमत चक्र चोहींकडे ॥

१९

श्लोक [ शार्दूलविक्रीडित वृत्त. ]

शस्त्रें घेउनि तोडणें निजकरें पंखें तुझीं पांखरा
मुक्तीचा तुझिया विचार करितां हा मार्ग नाहीं खरा ।
सोसोनी बहु घाय हाय पडशी होवोनिया दुर्दशा
आहे गोष्ट अशक्य जाणुनि तिच्या पाठीस लागा कशा ॥

२०

श्लोक [ स्रग्धरा वृत्त. ]

मिथ्या ज्ञानासि बाबा बघुनि फसुं नको वाटतां तेंच गोड
सामर्थ्यें यज्ञयाग प्रचलित पथ कीं प्रार्थना सर्व सोड ।
कां कीं निर्व्याज ऐसें सुखकर बरवें प्रेम हें एक अंग
दीपज्योतीस वेगें कवळुनि धरुनी हेंच दावी पतंग ॥

२१

श्लोक [ मंदाक्रांता वृत्त. ]

होशी कांती सरस बघुनी कीटका तूंहि अंध
प्रेमाची ही पिउनि मदिरा फार झालासि धुंद ।
प्रेमी जीवा ! झडप अनलीं घाल सोडोनि धाक
स्वार्थाचें जें खिळुनि बसलें हीण जाळूनि टाक ॥

२२

श्लोक [ शिखरिणी वृत्त. ]

भिकाऱ्याला कोठें सुख कधिं तरी काय मिळतें
दयेला लोकांच्या विषय करुनी काय फळ तें ।
सुटे देवोनियां कधिं नच बघे ढुंकुनि फल
तुझ्या अंतःकर्णीं जरि खळबळे प्रेम सकल ॥

२३

श्लोक [ शार्दूलविक्रीडित वृत्त ]

तूंही वारस जाण विश्वपतिचा जन्मोनि भूमीवर
प्रेमाचा हृदयीं तुझ्या निशिदिनीं राहे सदा सागर ।
मागे कोण फळा प्रपंच सगळा टाकूनि हो मोकळा
मागावें फळ बिंदु होउनि तरी सिंधूच जातो तळा ॥

२४

श्लोक [ स्रग्धरा वृत्त ]

विप्रापासूनि सारे खगमृग सगळे कीटकांचेही वंश
किंवा लोकांत जे जे पसरुनि भरले फार जे सूक्ष्म अंश ।
सर्वीं सर्वांतरात्मा जगभर भरला बोलती तोच हा रे
कायावाचा ह्मणोनी मनहि सकलिका तूंहि मित्रा वहा रे ॥

२५

श्लोक [ पृथ्वी वृत्त. ]

असंख्य अवतार हे पसरले तुझ्या भोंवतीं
तयां त्यजुनि धुंडिशी इतर देव कोठें किती ।
प्रभूच जड जीव हे समजुनी, करीं चाकरी
स्मरोनि जगदाधिपा उचित तीच पूजा करीं ॥

क्रु. ना. आठल्ये.

# स्वामी विवेकानंद यांचे समग्र ग्रंथ.

अमेरिकेंत भरलेल्या महाधर्मपरिषदेंत स्वामी विवेकानंद यांनीं केलेल्या कार्यांची माहिती आतां नव्यानें कोणास सांगावयास पाहिजे असें नाहीं. जगांत चालू असलेल्या सर्व धर्मांत हिंदुधर्माची योग्यता श्रेष्ठतम आहे ही गोष्ट त्यांनीं निर्विवाद सिद्ध करून हजारों पश्चात्यांस आपलें शिष्यत्व पत्करावयास लाविलें. हें महत्कृत्य त्यांनीं कसे केलें हें जाणण्याची इच्छा ज्यांस असेल त्यांनीं त्यांच्या व्याख्यानांचा मनःपूर्वक अभ्यास केला पाहिजे.

स्वामीजींचीं सर्व व्याख्यानें इंग्रजींत असल्यामुळें निव्वळ मराठी वाचकांस त्यांचा लाभ घेतां येण्यासारखा नव्हता. ही अडचण दूर करण्याकरितां प्रस्तुत ग्रंथमाला आम्हीं सुरू केली आहे.

वेदान्त धर्म व्यवहार्य नाहीं असा आक्षेप अर्वाचीन 'सुशिक्षित' आमच्या धर्मावर आणीत असतात. त्यांच्या मतें आमचा धर्म मृत झाला असून अर्वाचीन मनूंत त्याचा आम्हांस उपयोग नाहीं; एवढेंच नव्हे तर तो उलट अपायकारक झाला आहे. या मताचें पूर्ण खंडन करून वेदान्तधर्माच्या साहाय्याशिवाय कोणतीही चळवळ यशस्वी होणें शक्यच नाहीं, ही गोष्ट स्वामींनीं सप्रमाण व तर्कशास्त्रपद्धतीनें निर्विवाद सिद्ध केली आहे. वेदान्त हें व्यवहारविघातक शास्त्र नसून तें व्यवहारसाधक आहे हें भगवान् श्रीकृष्णाचें मत स्वामी विवेकानंदांनीं अर्वाचीन पद्धतीच्या मांडणीनें पुन्हां सिद्ध करून दाखविलें आहे. आमचा धर्म सुटल्यामुळेंच व्यवहारासही आम्ही कसे पारखे झालों आहों व तेल आणि तूप हीं दोन्ही गमावून हातीं धुपाटणें घेऊन कसे बसलों आहों हें स्वामीजींनीं आपल्या व्याख्यानांत स्पष्ट केलें आहे.

व्यवहारांत यश मिळवूं पहाणारांस, देशसेवा करूं इच्छिणारांस आणि धर्माचा अभ्यास करूं पाहणारांस या ग्रंथावलीसारखा दुसरा खात्रीलायक आणि भरंवशाचा वाटाड्या मिळणें शक्य नाहीं.

या ग्रंथावलीचें महत्व जाणून मराठी वाचकवर्ग हिचा घरोघर प्रसार करण्याच्या कामीं आम्हांस मदत करील असा आम्हांस भरंवसा आहे. वाचकवर्गाच्या अभावीं प्रस्तुत कार्य बंद पडण्याचा प्रसंग आला तर तें महाराष्ट्रास लांच्छनास्पद होणार आहे.

ज्यांनीं या ग्रंथमालेला अझून आपला आश्रय दिलेला नसेल त्यांनीं यापुढें विलंब न लावतां ताबडतोब आश्रयदाते होऊन ही माला यशस्वी करण्याचे कामीं साहाय्यभूत व्हावें अशी आमची त्यांस कळकळीची नम्र विनंति आहे. ही माला यशस्वी झाली तर अशाच प्रकारचीं दुसरीं अवजड पण आमच्या व्यावहारिक व राष्ट्रीय जीवनास आवश्यक कार्यें हातीं घेण्यास आम्हांस हुरूप येईल. स्वधर्माचे जाज्वल्य अभिमानी अशी कीर्ति असलेल्या महाराष्ट्रीयांचा अशा या स्तुत्य कामीं आश्रय मागणें आणि तो त्यांनीं देणें हें योग्यच नाहीं काय ?

---

## आजपर्यंत प्रसिद्ध झालेल्या सात खंडांतील विषयांची त्रोटक माहिती.

### प्रथम खंडांतील विषय.

१ भगिनी निवेदिता यांनीं स्वामीजींचा करून दिलेला उपोद्घातरूपी परिचय.

२ अमेरिकेंतील सर्व धर्मांच्या परिषदेपुढें दिलेलीं व्याख्यानें--

१. अमेरिकेंतील स्वागतास उत्तर.
२. मतभेद कां होतो ?  ३. हिंदुधर्माचें स्वरूप.
४. हिंदु लोकांस धर्मज्ञानाची उणीव नाहीं.
५. बौद्धधर्म हा हिंदुधर्माची पुरवणी आहे.
६. धर्मपरिषदेंतील शेवटचें व्याख्यान.

३ आत्मा, परमेश्वर आणि धर्म.  ४ हिंदुधर्म.

५ कर्मयोग—

प्रकरण १ लें–कर्माचा दानतीवर परिणाम.
,, २ रें–स्वकर्तव्यदक्ष प्रत्येक मनुष्य सारखाच मोठा आहे.
,, ३ रें–कर्मरहस्य.  प्रकरण ४ थें–कर्तव्य.
,, ५ वें–परोपकार स्वतःसच कल्याणप्रद आहे.
,, ६ वें–अनासक्ति हाच अहंकारनाश.
,, ७ वें–मुक्ति.  प्रकरण ८ वें–कर्मयोगाचा आदर्श.

६ धर्म म्हणजे काय ?
७ अनुभवाचा मार्ग.
८ विवेचकबुद्धि आणि धर्म ( इंग्लंडांतील व्याख्यान ).
९ आर्यज्ञानमंदिराची सोपानपंक्ति.
१० वेदान्तमताचे जगावर घडलेले सुपरिणाम ( अमेरिकेंतील बोस्टन शहरीं दिलेलें व्याख्यान ).
११ स्वामीजींचीं खासगी पत्रें—१ ते २१.

## द्वितीय खंडांतील विषय.

१. राजयोग—प्रस्तावना.
२. राजयोग ( पूर्वार्ध )—
प्रकरण १ लें—विषयप्रवेश. प्रकरण २ रें—अगाऊ तयारी.
,, ३ रें—प्राण. ,, ४ थें—प्राणशक्ती.
,, ५ वें—प्राणशक्तीचें नियमन.
,, ६ वें—प्रत्याहार आणि धारणा.
,, ७ वें—ध्यान आणि समाधि.
,, ८ वें—सिंहावलोकन.
३. राजयोग ( उत्तरार्ध )—पातंजल योगसूत्रें ( उपोद्घात )—
अध्याय १ ला.—समाधिपाद. अध्याय २ रा.—साधनपाद.
,, ३ रा.—विभूतिपाद. ,, ४ था.—कैवल्यपाद.
४. परिशिष्ट—राजयोगाच्या विवेचनांत अनेक ग्रंथांतील ज्या आधारांचा उपयोग केला आहे ते या परिशिष्टांत स्वामीजींनीं नमूद केले आहेत.
५. खासगी पत्रें २२ ते २७.

## तृतीय खंडांतील विषय.

१. वेदांतमताचें सामान्य निरीक्षण. ( हार्वर्ड युनिव्हर्सिटीच्या तत्त्वसंशोधक मंडळापुढें दिलेलें व्याख्यान ).
२. वेदान्त आणि मानवी संस्कृति.
३. श्रुतींतील तत्त्वज्ञानाची उत्क्रांति.
४. रामायण.

५. महाभारत.

६. सांख्यदर्शन ( उपोद्घात )—

प्रकरण १ लें–विश्वरचना. प्रकरण २ रें–प्रकृति आणि पुरुष.

,, ३ रें–सांख्य आणि अद्वैत. ,, ४ थें–मुक्त आत्मा.

,, ५ वें–एक तेंच अनंत. ,, ६ वें–आत्मैक्य.

,, ७ वें–ज्ञानयोगाचा अत्युच्च आदर्श.

७. कर्मरहस्य.

८. मानवी मनाचें सामर्थ्य.

९. हिंदुस्थान अज्ञानग्रस्त देश आहे काय ?

१०. सामाजिक परिषदेंतील प्रास्ताविक भाषणावर टीका ( सामाजिक परिषदेपुढील न्या. मू. रानडे यांच्या प्रास्ताविक भाषणावरील स्वामीजींची टीका ).

११. आर्यावर्ताचा जगाला संदेश.

१२. उपोद्घात.

१३. थिआसफीसंबंधीं कांहीं स्फुट विचार.

१४. डा. पॉल डयूसन.

१५. खासगी पत्रें २८-३७.


## चतुर्थ खंडांतील विषय.


१ कोलंबो–आल्मोरा व्याख्यानमाला—

कोलंबो येथील मानपत्र व त्यास उत्तर. जाफना येथील मानपत्र.

वेदान्त ( जाफना येथील व्याख्यान ).

पांबन येथील मानपत्र व त्यास उत्तर.

रामेश्वर येथील व्याख्यान.

रामनद येथील मानपत्र व उत्तर. परमकुडी येथील व्याख्यान.

शिवगंगा आणि मनमदूरा येथील मानपत्र.

मदूरा येथील मानपत्र व उत्तर.

कुंभकोणम् येथील मानपत्र आणि व्याख्यान.

मद्रास येथील मानपत्र. भावी कार्याची रूपरेषा.

२. ईश्वराचे अवतार.
३. भगवान् बुद्ध.
४. भगवान् येशू ख्रिस्त.
५. माझे सद्गुरु.
६. गीतेसंबंधानें कांहीं विचार.
७. भक्ति.
८. जडभरताख्यान.
९. प्रल्हादाख्यान.
१०. खासगी पत्रें.

## पंचम खंडांतील विषय.

१. कोलंबो–आल्मोरा व्याख्यानमाला—
 १. कलकत्ता येथील मानपत्र व त्यास उत्तर.
 २. मद्रास येथील मानपत्रास उत्तर.
 ३. हिंदुसमाजरचनेंत वेदान्ताचा प्रत्यक्ष उपयोग.
 ४. आर्यावर्तांतील महर्षी.
 ५. आल्मोरा येथील मानपत्र व त्यास उत्तर.
२. भक्तियोग–भाग पहिला–
प्रकरण १ लें, भक्तीची व्याख्या. प्रकरण २ रें, ईश्वर म्हणजे काय?
 ३ रें, मुक्ति हेंच भक्तियोगाचें साध्य.
 ४ थें, सद्गुरुवांचोनी सांपडेना सोय.
 ५ वें, शिष्य आणि गुरु यांस आवश्यक लागणारे गुण.
 ६ वें, अवतारी गुरु आणि अवतार.
 ७ वें, मन्त्र, ॐ शब्द आणि ज्ञान.
 ८ वें, प्रतीक पूजन आणि प्रतिमापूजन.
 ९ वें, इष्टनिष्टा. प्रकरण १० वें, मार्ग आणि साधनें.
भक्तियोग—भाग दुसरा—
प्रकरण १ लें, त्यागाची पूर्वतयारी. प्र० २ रें, भक्तींतूनच त्यागाचा उद्भव.
 ३ रें, भक्तियोगाचा स्वाभाविकपणा आणि त्यांतील रहस्य.

प्रकरण ४ थें, व्यक्त प्रेमाचे प्रकार. प्रकरण ५ वें, विश्वव्यापी प्रेम.
६ वें, पराविद्या आणि पराभक्ति हीं भक्ताच्या दृष्टीनें एकच आहेत. प्रकरण ७ वें, भक्तीचा त्रिकोण.
८ वें, भक्ताचा परमेश्वर स्वयंव्यक्त नसतो.
९ वें, पराभक्तीचीं मानवी व्यक्तरूपें. प्रकरण १० वें, उपसंहार.
३. हिंदुस्थानचा भविष्यकाळ.
४. पाश्चात्य देशांत हिंदुधर्मविचारांचें कार्य.
५. संन्यास, त्याचें साध्य आणि अभ्यास.
६. आमचा धर्म.
७. वेदांताचा सर्व बाजूंनीं विचार.
८. खासगी पत्रे.

---

## षष्ठम खंडांतील विषय.

१. वर्तमानपत्रकारांशीं मुलाखती—
१. लंडनांत आलेला हिंदुस्थानांतील एक योगी.
२. भरतभूमीचा संदेश. ३. हिंदुस्थान व इंग्लंड.
४. इंग्लंडास हिंदुधर्मप्रचारकाचा संदेश.
५. मदुरा येथें स्वामी विवेकानंदांशीं एक तास मुलाखत.
६. हिंदुस्थानांतील व बाह्य देशांतील कांहीं विषयांची चर्चा.
७. पहिल्या हिंदु संन्याशाचें पाश्चात्य देशांत धर्मप्रसाराचें कार्य व हिंदुस्थानच्या पुनरभ्युदयासाठीं प्रयत्न.
८. राष्ट्रीय पायावर हिंदुधर्माचें पुनरुज्जीवन.
९. हिंदु स्त्रियांची पूर्वींची, सध्यांची आणि भावी स्थिति.
१०. परधर्मीयांचा हिंदुधर्मांत प्रवेश.
२. प्रश्न आणि उत्तरें.
३. पूर्व आणि पश्चिम.
१ लें. प्रकरण. २ रें पोषाखाच्या पद्धती.
३ रें सभ्यपणाच्या चालीरिती. ४ थें—फ्रान्स—पारीस.
४. संभाषणें व बैठकी.
५. उद्गार व बोधवचनें.
६. खासगी पत्रें.

---

## सप्तम खंडांतील विषय.

१ टिपणें—

१ कर्मयोग. २ आततायित्व.
३ कर्म हेंच ईशपूजन. ४ अहेतुक कर्म.
५ साधनें. ६ विश्व आणि आत्मा.
७ खरा गुरु कोण ? ८ कला.
९ भाषा. १० संन्यासी.
११ संन्यासी व गृहस्थाश्रमी. १२ अधिकारवादाचे दुष्परिणाम.
१३ भक्तियोग. १४ ईश्वर आणि ब्रह्म.
१५ ज्ञानयोग. १६ मायेचें कारण काय ?
१७ उत्क्रांति. १८ बौद्धधर्म आणि वेदान्त.
१९ वेदांत २० कायदा आणि मुक्ति.
२१ आत्मानुभव आणि तो मिळविण्याचे मार्ग.

२ ज्ञानयोग व्याख्यान-माला—

१ धर्माची आवश्यकता. २ मनुष्याची खरी प्रकृती.
३ माया आणि भ्रम. ४ माया आणि ईश्वरविषयक कल्पनेचा विकास.
५ माया आणि मुक्ति. ६ केवलरूप आणि व्यक्तदशा.
७ ईश्वराचें सर्वव्यापित्व. ८ अनुभव.
९ विविधतेंत ऐक्य.

३ खासगी पत्रें.

समग्र ग्रंथ दहा खंडांत पूर्ण होतील. प्रत्येक खंडास कायमच्या वर्गणीदारांस, साधी बांधणी रु. १।, कापडी सोनेरी बांधणी रु. १॥. किरकोळ ग्राहकांस प्रत्येकीं चार आणे अधिक पडतील. छपाईच्या साधनांचे भाव वाढल्यामुळें ही किंमत प्रत्येकीं ०४ आण्यांनीं वाढविली आहे. बाजारभाव पूर्वस्थितीवर येतांच ही किंमत प्रत्येकीं ०४ आण्यांनीं कमी केली जाईल.

**नवीन वर्गणीदारांस सवलत**—वर्गणीदार होण्याचें मनांत असूनही ज्यांना सर्व खंड एकदम घेण्यास सवड नसेल त्यांना पहिल्या भागापासून दरमहा अनुक्रमें एक एक खण्ड वर्गणीदारांस मिळणाऱ्या सवलतीच्याच किंमतीनें पाठवूं.

प्रकाशक—**म्यानेजर, कर्नाटक प्रेस, ठाकुरद्वार, मुंबई.**